ग्रंथमाला

मासिकपुस्तकांत छापलेलें प्रकरण

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें

खंड ८ वा

इ० स० १६४९-१८१७ पर्यंतचे

श्रीमंत गगनबावडेकर पंतअमात्य यांच्या दफ्तरांतील लेख

अन्या वाचो विमुंचथ

विश्वनाथ काशीनाथ राजवाडे

यांनीं शोधिलीं

तीं

विष्णु गोविंद विजापूरकर, एम्. ए.,

संपादक ग्रंथमाला,

यांनीं

कोल्हापूर, 'श्रीसमर्थप्रसाद' छापखान्यांत छापिलीं

फेब्रुवारी १९०३

किंमत २॥। रुपये

शुद्धिपत्र

शुद्धिपत्राचा उपयोग केल्यानंतर उपप्रस्तावना व ग्रंथ वाचावा.

उपप्रस्तावना

पृष्ठ.	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
९	१	१२०९	१२०७
२२।२३ २४।२५	ह्या पृष्ठांत ११२८ असा जेथें जेथें आंकडा आला आहे,		तेथें तेथें ११११८ असा आंकडा वाचावा.
१०९	४	" ११९१ च्या " हे शब्द गाळावे.	

मूळग्रंथ

१	३	सेवक	सेवकें
१	४	स्वा	रवा
१	१३	षाहनूरगादअल्ली दीयानतराव	दियानत्राव बंदह् ई आली आदिल-शाह्
१	१८	सेवक	सेवकें
२	११।१२	षाहनूरगादअल्ली दीयानतराव	दियानत्राव बंदह् ई आली आदिल-शाह्
६	१८	सेवसी	शेवेसी
६	१९	फुराशिस	फ्रांशेश
६	२०	कृपेस्तव	कृपेस्तव
६	२०	जाणोन	जाणोनु
६	२१	वेळवेळ	वैभव

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध	शुद्ध
६	२१	लिहाया	लेहावया
६	२२	अमृतवृष्टी	अमृतम्रीष्टी
६	२३	रविलोवळ	रविलोवळीं
६	२३	होऊन	होऊनु
६	२४	मुशा	मुशे
७	१	ह्मणोन	ह्मणोनु
७	३	आपळ	आपळा
७	४	त्याची	त्याचा
७	४	आली	आला
७	५	लेहून	लिहोनु
७	६	लेहून	लिहून
७	८	सेवकावरी	शेवकावरी
७	९	अमृतवृष्टी	अमृतम्रीष्टी
७	१२	सोनदेव	सोनदेउ
७	१२।१३	खबर	बखर
७	१३	करून	करुनु
७	१४	पासून	पासूनु
७	१७	राजगडीहून	राजगडीहूनु
७	२०	अबाजीपंता-करन	अबाजीपंताकडूनु
७	२०	राघोपंताकरन	राघोपंताकडूनु
७	२१	आळियासी	आली. यासी
७	२४	करून	करुनु
७	२५	पासून	पासुनु
७	२६	करून	करुनु
८	५।६	बोलावून	बोलावूनु

पृष्ठ	पंक्ति	अशुद्ध	शुद्ध
८	८	पासून	पासुनु
१०	१३	अनाजीपंताचे	गा अनाजीपंताचे
११	१४।१७	घेऊन जाऊन	घेऊनु जाऊनु
१२	५	पाहोन	पाहोनु
१२	८	पाठवून	पाठवूनु
१५	१८	इनाम	खजाना
१५	१९	पचां	पांच
१५	१६	सरंजाम	सरंजामी
१६	१०	लेहून घेऊन	लेहुनु घेऊनु
१६	२७	होन	होनु
१७	१७	होन	होनु
१८	४	होन	होनु
१९	२०	सुखरूप	क्षेमरूप
१९	२१	घेऊन	घेऊनु
१९	२१	+बंधिको.	व बंधु
२०	४	पाववीत	पाववीत पाववीत
२०	१२।१३	होऊन	होउनु
२०	२५	ठवून	ठेवुनु
२१	१०	जाऊन	जाऊनु
२३	६।८।९	होन	होनु
२३	११	साबान	साबानु
२३	१३	बांदे	दादो
२३	२७	ऐसा	येसा
२८	५	लाऊन	लाउनु

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें.

खंड ८ वा.

उपप्रस्तावना.

१. इतिहासाचीं साधनें अव्वल व दुय्यम अशीं दोन प्रकारचीं असतात. स्थूलमानानें अस्सल लेख अव्वल प्रतीचे व त्याव्यतिरिक्त लेख दुय्यम प्रतीचे. अस्सल लेखांत पत्रें, यादी वगैरेंचा व तद्व्यतिरिक्तांत बखरी, टिपणें वगैरेंचा समावेश होतो. नीळकंठराव कीर्तन्यांनीं नुसत्या बखरी छापिल्या. काव्येतिहाससंग्रहकारांनीं दोन्ही प्रकारचीं साधनें निरनिराळीं छापिलीं. प्रभू लोकांच्या इतिहासाच्या साधनकारांनीं दोन्ही साधनांना अव्यवस्थित संग्रह केला. प्रो० फारेस्ट यांनींहि तोच मार्ग स्वीकारिला आहे. ज्या ग्रंथांत शिवाजीची एक गबाळ बखर त्यांनीं प्रसिद्ध केली त्यांतच इतर अस्सल लेखांचाहि समावेश झालेला आहे; व प्रस्तावनेंत अस्सल लेखांपेक्षां सदर गबाळ बखरीला जास्त महत्व दिलेलें आहे. सदर बखरीची योग्यता काय हें न कळल्यामुळें हा प्रकार झाला हें उघड आहे. रा० पारसनिसांच्या भारतवर्षांत अस्सल पत्रांपेक्षां बखरी व कैफियती ह्यांचाच भरणा जास्त आहे. पारसनिसांचा ब्रह्मेंद्राचा पत्रव्यवहार, व रा० खरे ह्यांचें पटवर्धनी दफ्तर हीं मात्र निर्भेळ अस्सल लेखांचीं भांडारें आहेत. मीं छापिलेलीं पहिलें, तिसरें, पांचवें व आठवें खंड हींहि ह्याच वर्गांत मोडतात. माझ्या दुसऱ्या व चवथ्या खंडांत दोन्ही प्रकारांची क्वचित् भेसळ आहे.

२. अलीकडील तीस वर्षांत छापिलेल्या ह्या दोन्ही प्रकारच्या साधनांत एक विशेष आहे. तो हा कीं, तीं जशीं सांपडलीं तशींच छापिलीं

जात असतात. त्यांत संक्षेप किंवा विस्तार करण्याची बुद्धि कोणाचीहि झाली नाहीं. ही बुद्धि जोंपर्यंत झाली नाहीं तोंपर्यंतच साधनांचें खरें स्वरूप कायम राहून, पुढें होणाऱ्या इतिहासचिकित्सकांना मराठ्यांच्या इतिहासाचा निःशंक अभ्यास करतां येणार आहे.

३. हीं साधनें लोकांपुढें मांडतांना निरनिराळ्या गृहस्थांनीं निरनिराळे मार्ग स्वीकारिलेले आहेत. कोणी ह्या साधनांना अर्थनिर्णायक टीपा देतात; कोणी लहानशी परिचायक प्रस्तावना लिहितात; व कोणी ह्यापैकीं कांहीं एक न करितां नुसतीं उघडींबोडकीं साधनेंच लोकांच्या सेवेस हजर करितात. कोणी ह्या तिघांच्याहि पुढें जाऊन ह्या साधनांपासून मिळणारी संगतवार हकीकत आपल्या पुस्तकाला जोडतात. कित्येक असेहि आहेत कीं जे वाटतील तीं निराधार विधानें ह्या हकीकतींत घुसडून देतात. सारांश, अव्यवस्थित रीतीनें मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांचें प्रकाशन, मंडण व संकलन आजपर्यंत होत आलें आहे. खरें पाहिलें तर, ह्या साधनांचें प्रकाशन बऱ्याच निराळ्या प्रकारानें झालें पाहिजे. केवळ उघडींबोडकीं साधनें लोकांपुढें मांडणें यद्यपि प्रकाशकाला अनेक तऱ्हांनीं सकृद्दर्शनीं निरुपद्रवी असतें, तत्रापि तें आस्थेनें अभ्यास करणाऱ्या मंडळीस अनेक कारणांनीं बराच वेळ फसवणुकेचें होतें व वरवर वाचून अनुमानें काढणाऱ्यांस तर कायमचें फसवतें. उदाहरणार्थ रा० वाड ह्यांनीं तयार केलेल्या व रा० पारसनीस ह्यांनीं नवीं छापिलेल्या शाहू महाराजांच्या रोजनिशींतील वेचे घ्या. ह्या पुस्तकाला सूचना, विनंति, उपोद्घात किंवा प्रस्तावना ह्यापैकीं कांहींच नसल्यामुळें, (१) मूळ रोजनिशी किती व कोण्या कारकुनांनीं लिहिली, (२) मूळ रोजनिशीचा आकार अथपासून इतिपर्यंत एकसारखा आहे किंवा लहानमोठा आहे, (३) मूळ रोजनिशी सुटी आहे किंवा बांधलेली आहे, (४) मूळ रोजनिशींतील कांहीं कागद गहाळ, फाटलेले अगर भिजलेले आहेत किंवा ती सबंद शाबूत आहे, (५) रोजनिशी मूळ आहे किंवा नक्कल आहे, वगैरे तपशील कळण्याला कांहींच मार्ग रहात नाहीं.

हा खुलासा झाला असता, म्हणजे ही रोजनिशी अत्यन्त महत्वाची आहे किंवा दुय्यम महत्वाची आहे हें ठरवितां आलें असतें. सदर रोजनिशी ज्या स्वरूपानें बाहेर आली आहे, त्यावरून ती अस्सल नसावी अशी शंका उत्पन्न होते. कां कीं, ह्या छापील रोजनिशींतील एकाच मुसुलमानी वर्षांतील पुष्कळ कलमें अनुक्रमवार लागलेलीं नाहींत. उदाहरणार्थ, १२ व्या पृष्ठापासून १९ व्या पृष्ठापर्यंत दिलेलें समान अशरीन मया व अलफ हें साल घेतों. ह्या सालचीं २९ पासून ४० पर्यंत व मुद्दां १२ कलमें दिलेलीं आहेत. समान अशरीन साल १४ सवालीं म्हणजे २९ मे १७२७स सुरूं झालें व २४ सवाल म्हणजे २३ मे १७२८स संपलें. अर्थात् ह्या सालांतील पहिलें कलम २९ न देतां ३९ दिलें पाहिजे; व मूळ रोजनिशींत तें तसेंच असेल ह्यांत संशय नाहीं. कारण २९ वें कलम इ. स. १७२७ च्या अक्टोबरांतील आहे व ३९ वें कलम १७२७ च्या जूनांतील आहे. महिन्यांच्या अनुक्रमानें पाहिलें म्हणजे मूळ रोजनिशींत छापील रोजनिशींतील २९ पासून ४० पर्यंतच्या कलमांचा अनुक्रम ३९, ३२, ४०, ३३, २९, ३०, ३१, ३४, ३५, ३६, ३७, ३८ असा असला पाहिजे. छापील रोजनिशींतील १०७ पृष्ठापासून ११९ पृष्ठापर्यंतच्या सलास खमसैन सालांतील कलमेंही अशींच उलट लागलेलीं आहेत. २४७ पासून २५९ पर्यंतचीं कलमें २२८ पासून २४६ पर्यंतच्या कलमांच्या अगोदर पाहिजेत. तेव्हां ज्या रोजनिशींत, तारखांचा अनुक्रम तर राहूंद्याच, परंतु महिन्यांचाहि अनुक्रम असा वाकडातिकडा झाला आहे ती रोजनिशी अस्सल कशी समजावयाची? मूळ रोजनिशी म्हटली म्हणजे तींत हा असला गवत्या गोंधळ कसा असूं शकेल? अर्थात् ज्या रोजनिशीवरून ही छापील रोजनिशी बनली गेली ती अस्सल नसून जुन्या अस्सलावरून व इतर माहितीवरून बनविलेली संक्षिप्त नक्कल असावी असा संशय येतो. हा संशय दुसऱ्या एका बाबीवरून दृढ होतो. ती बाब ही. अमात्यांची माहिती देतांना ७३ व्या पृष्ठाच्या प्रारंभीं हें वाक्य आहे:—"प्रतापसिंह महाराज यांचे खासगी दप्तरांत याद आहे त्यावरून दाखल केलें."

ह्या वाक्यावरून असें निष्पन्न होतें कीं इ. स. १८४८ त सातारचें राज्य गेल्यावर प्रतापसिंहाचें खासगी दफ्तर इनाम कमिशनाच्या हातीं आलें व त्यावरून ही रोजनिशी—जिच्यावरून छापील रोजनिशी छापिली गेली—बनली गेली. अर्थात्, वर्तमान छापील रोजनिशी शाहू महाराजांच्या मूळ अस्सल रोजनिशींतील वेचे घेऊन तयार केली असा जर कोणाचा विश्वास असेल तर त्याला बिलकूल आधार नाहीं हें स्पष्ट होतें व वर घेतलेला संशय निश्चयाच्या पदवीला पोहोंचण्याच्या लायकीचा होतो. खरा प्रकार बहुशः असा असावा कीं १८४८ नंतर इनाम कमिशनच्या दफ्तरांतून पेशव्यांच्या राशियतीची एक रोजनिशी बनविण्याचा मुंबई सरकारचा हुकूम सुटला असावा व त्या हुकमाबरहुकूम ही पंचवीस हजार लेखी पानांची रोजनिशी तयार झाली असावी. अशी ह्या रोजनिशीसंबंधानें कची हकीकत असावी, अथवा बहुशः आहे. ही रोजनिशी इनाम कमिशनच्या पुणें येथील दफ्तरांत तीस चाळीस वर्षे अज्ञात पडल्यावर तिच्याकडे कांहीं मंडळीची दृष्टि गेली व तिचें पुनरुज्जीवन होण्याची वेळ आली. अशी जरी ह्या रोजनिशीची कथा असावी असें वाटतें तत्रापि तींत बरीच अस्सल माहिती असावी अथवा आहे ह्यांत फारसा संशय नाहीं. तरी देखील, हा अस्सलपणा निर्भेळ आहे असें ह्मणतां येत नाहीं. कारण, प्रतापसिंहाच्या खासगी दफ्तरांतील बऱ्याच सटरफटर यादी ह्या रोजनिशींत घुसडल्या आहेत. ह्या यादींतील पुष्कळ कलमें अस्सल कागदपत्रांच्या आधारानें तयार केलेलीं नाहींत इतकेंच नव्हे तर कित्येकांना श्रुतीखेरीज दुसरा आधार नाहीं. कित्येक कलमें ग्रांट डफच्या इतिहासावरून घेतलीं आहेत. उदाहरणार्थ, ७७ व्या पृष्ठावरील जयसिंग जाधवाचें कलम पहा. "जयसिंग जाधव कधीं नेमले ती तारीख समजत नाहीं, परंतु सन १७०९ यांस सेनापति असें लिहिलें आहे." प्रतापसिंहाच्या यादींत इसवीसन यावा हें आधीं पहिलें आश्चर्य! जयसिंग जाधव व धनाजी जाधव ह्या दोन भिन्न व्यक्ति होत्या हें ह्या यादींत ह्मटलें आहे हें दुसरें आश्चर्य! आणि हें कलम विश्वासार्ह आहे असें रा. वाडांस वाटलें हें तिसरें

आश्चर्य! परंतु सर्वांत मोठें आश्चर्य हें कीं, शाहू राजाच्या रोजनिशींत अवांतर माहिती व तीहि चुकीची घालण्याची बुद्धि वाहांस व्हावी व आपण चूक करीत आहों हें ह्या विद्वानास न कळावें! येणेंप्रमाणें अस्सल कागदपत्र जसेच्या तसेच न छापतां त्यांत अवांतर माहिती घालून विस्तार करण्याची बुद्धि संपादकांना झाली हें ह्या रोजनिशींतील पहिलें व्यंग आहे. तसेंच ह्या रोजनिशींत संक्षेपाचेंही व्यंग आहे. (१) मूळ शाहू राजाची अस्सल रोजनिशी, (२) तीवरून तयार केलेली इनामकमिशनची रोजनिशी, (३) व तींतून वेंचून काढिलेली ही छापील रोजनिशी, अशी ही तीनदा पिळून काढलेली निःसत्व रोजनिशी आहे. ह्या निःसत्व रोजनिशींतहि संपादकांनी खेळखंडोबा थोडा-थोडका केलेला नाहीं. महिनेवार व तारीखवार तर कलमें छापिलीं नाहींतच. परंतु वेंचे काढतांना आपण ते कोणत्या धोरणावर काढतों ह्याचाही नियम राखिलेला नाहीं. अनेक कलमांचा कित्ता या शब्दानें प्रारंभ झाला आहे. परंतु हा कित्ता कोणत्या मूळाचा त्याचा पत्ता नाहीं. सर्व कलमें मूळांतल्याप्रमाणें दिलेलीं आहेत किंवा नाहीं ह्याचा खुलासा नाहीं. मूळ रोजनिशी केवळ जावक पत्रांची आहे, हें छापील रोजनिशींचीं सर्व कलमें तपासिलीं असतां स्पष्ट होतें. मूळपत्रांचा जावकांत कारकुनांनीं संक्षेप किती केला ह्याचा सापेक्ष तपशील संपादकांनीं दिला नाहीं. तसेंच मूळरोजनिशींतून व इनाम कमिशनाच्या रोजनिशींतून कोणतीं कलमें गाळलीं व तीं कोणत्या धोरणावर गाळलीं ह्याचाहि खुलासा झाला नाहीं. अशा नाना प्रकारच्या शंका ह्या रोजनिशी संबंधानें उद्भवतात. एकंदरींत ही रोजनिशी पाहून माझें असें मत झालें आहे कीं शाहू छत्रपतीची मूळ रोजनिशी जशीची तशीच छापिली असती व त्यांत संक्षेप किंवा विस्तार यत्किंचितहि केला नसता, तर फार उत्तम गोष्ट होती. जे जे कोणी ही छापील रोजनिशी साक्षेपानें वाचतील व इतरत्र उपलब्ध झालेल्या अस्सल माहितीशीं ती ताडून पाहतील त्यांना मूळ रोजनिशी जशीची तशी छापिली नाहीं ह्याबद्दल फार खेद वाटेल. ह्या रोजनिशीला अर्थनिर्णायक म्हणून एक कोश! दिला आहे. त्यांत

बऱ्याच शब्दांचे अर्थ चुकले आहेत * व खरोखर कठीण व दुर्बोध अशा शब्दांचा मुळीं उल्लेखच नाहीं. सारांश ऐतिहासिक लेख छापण्याचे बहुतेक सर्व जगन्मान्य नियम ह्या रोजनिशीनें मोडले आहेत.

---

* कोशांतील कित्येक चुकलेले शब्दार्थ व त्यांचा खरा अर्थ खालीं देतों.

शब्द.	चुकलेला अर्थ.	खरा अर्थ व शब्द.
वजारतमाहा	आमिरांची पदवी.	वजारतमाब, प्रधानस्थान. वजारतमाब ही पदवी इतर सरदारांनाहि असे.
माहोना	जासुदाचें नांव	महिन्याचा पगार.
कही	बिनी, सैन्याच्या आघाडीचे लोक	सैन्याला लागणाऱ्या सामानाच्या शोधार्थ हिंडणारी लष्करी मंडळी
लब	जासूद	निरोप घेऊन जाणारी, नेण्या-आणण्यास जाणारी मंडळी.
गाहा करणें	तयारी करणें	एका जागेवर असणें.
स्वस्ताक्षरपणीं	स्वतः लिहिलेला	स्वस्थपणें लिहिलेलें.
मजुरा	मजरा (?)	कृतार्थता.
गुजरात कुली	आणखी इसमांच्या	हुजरात कुली, सर्व हुजूरची फौज.
पैरवी	बंदोबस्त	पाठलाग, शोध.
आंगेजणी	पराक्रम	एकी करणें [आंगेख्तन्, to renew a confederacy].
दिंमत हुद्दे	दिंमत हुद्देकरी (?)	उंट जलदीनें चालवणें=हुद्दा.
मुजाहीम	अडथळा (नाम)	गैरसोईचें (विशेषण)
हरोल होऊन	मूळ अर्थ सैन्याची पिछाडी ! सामील होऊन.	जलदी करून.
धाराईत	उदक सोडून	धारादत्त.
निगादास्त	बंदोबस्त	राखण करणें.
विशदर्थे	रागानें	स्पष्टपणें.

४. ही रोजनिशी न्यायमूर्ती रानडे यांच्या अनुमतानें शास्त्री असें एकवांत आहे. न्यायमूर्तींनी ह्या रोजनिशीवर एक निबंधहि एशिआटिक सोसायटीपुढें वाचलेला प्रसिद्ध आहे. परंतु एवढ्यावरून ऐतिहासिक साधनें कोणत्या पद्धतीनें तयार करावीं व छापावीं ह्याचा तपशिलवार मसुदा त्यांनीं रा० वाड यांस करून दिला होता असें ह्मणणें मुष्किलीनें आहे. रा० वाड हे बऱ्याच वर्षांचे पदवीधर होते, तेव्हां हें काम ते चोख करतील, असा न्यायमूर्तींचा समज असावा. परंतु रा० वाड ह्यांना हा व्यासंग नसल्यामुळें ऐतिहासिक साधनांच्या व्याप्तीचा अंदाज करण्याची ताकत त्यांना आली असण्याचा संभव फारच थोडा होता. खरें ह्मटलें ह्मणजे शाहूमहाराजांची जी मूळ अस्सल रोजनिशी आहे ती

[मागील पृष्ठावरून]

अंगारक	आंग्रे	ताम्र, म्लेच्छ,
विजरे	पोर्तुगीज गवर्नर (?)	पोर्तुगीज व्हाइसराय.
बेदरका	बेदरकार असा शब्द असावा, याचा अर्थ माणसें वगैरे देऊन	वाटाघ्या.
बंद धरून नेणें	कैद करणें	गुलाम धरून नेणें.
गीर्दनवाई	चहूंकडचे (?)	सैन्याच्या भोवतालची जागा.
जराबाजरा	किरकोळ सामान	यत्किंचित्
आमरफ्ती	व्यापार	आमद्रफ्ती, येणें जाणें.
फरातग	विक्री करणें	फरोक्त.

कोशांतील असे शब्दार्थ आणीकहि चुकलेले आहेत. मूळांत तर वाचनाच्या इतक्या चुक्या आहेत कीं डेक्कन व्हर्नाक्युलर सोसायटीला हें पुस्तक, माझ्या मतें, कायमचें लांछन झालें आहे. शब्दांचे वाटतील ते अर्थ देणें ह्मणजे सोसायटींतील सभासद दुधखुळीं पोरें आहेत असेंच ठरविणें आहे! माहोना हें जासुदाचें नांव आहे हें विद्वद्वर्य रा० पारसनिस यांस कोणत्या कोशांत कळलें तें न कळे. इतका गचाळपणा ज्या सोसायटींत खपला जातो तिला एखाद्या भावी कवीच्या डन्शियाडांत अढळ पद खास मिळेल!

संक्षेप किंवा विस्तार न करतां जशीची तशीच छापिली पाहिजे होती. एखादें नांव चुकलें, एखादी तारीख वाकडी तिकडी पडली, तर केवढा घोटाळा होतो तो तज्ज्ञांना माहीत आहे. ह्या गोष्टीचा अंदाज घेऊन ट्रान्सलेशन सोसायटीचे अध्यक्ष जे डा० भांडारकर त्यांना उत्तमोत्तम होणार आहे. बारकाईनें प्राचीन लेख तपासण्याच्या व असल व नक्कल ह्यांच्यांत किती अंतर असतें हें पहाण्याच्या पद्धती त्यांना अवगत आहेत. त्यांच्या अध्यक्षतेखालीं चालणाऱ्या संस्थेच्या हातून असले गबाळ ग्रंथ बाहेर पडावे, ही मोठ्या खेदाची गोष्ट होय.

५. माझ्या मतें जुने ऐतिहासिक लेख येणेप्रमाणें छापावे. (१) प्रथम, लेख जसेचे तसे शुद्ध छापावे. (२) ते मिळाले कोठून, ते असल आहेत किंवा नक्कल आहेत, ते आहेत कोणत्या स्थितींत, वगैरे माहिती पूर्ण द्यावी. (३) त्यांतील कठिण व दुर्बोध एकोनएक शब्द व वाक्यें छानून तपासावीं व त्यांचा अर्थ द्यावा. (४) त्यांपासून अनुमानें काय निघतात तें मुद्देसूद लिहावें, (५) व शेवटीं त्यांपासून संगतवार वृत्तांत काय निघतो ते दाखवावें.

६. प्रस्तुत खंडांत छापिलेलीं बहुतेक पत्रें असल आहेत. तीं मिळालीं कोठून हें उपोद्घातांत सांगितलेलें आहे. आतां ह्या उपप्रस्तावनेंत दुर्बोध स्थलें विशद करण्याचा व पत्रांतील मजकुरापासून अनुमानें काय निघतात तें दाखविण्याचा मनोदय आहे; व शेवटीं त्यापासून संगतवार वृत्तांत काय निघतो तें पहावयाचें आहे. पैकीं शिवाजी, संभाजी, राजाराम व धाकटा शिवाजी ह्यांच्यासंबंधीं संगतवार वृत्तांत देण्याचा समय अद्याप आला नाहीं. आणीक एक दोन खंडांत ह्या कारकीर्दीसंबंधानें लेख यावयाचे आहेत ते आल्यावर संगतवार वृत्तांत मुख्य प्रस्तावनेंत देतां येईल. बाकी राहिलेल्या कोल्हापूरच्या संभाजीसंबंधानें व बावडेकरांच्यासंबंधानें मात्र संगतवार वृत्तांत येथें देण्यास हरकत नाहीं.

७. ह्या खंडांत शिवाजीचीं एकंदर ३६ पत्रें आहेत. त्यांच्यासंबंधानें पहिली विचार करण्यासारखी बाब म्हटली म्हणजे अक्षराची होय.

गोडी अक्षर प्रथम इ० स० १२६० पासून १३०९ पर्यंत महाराष्ट्रावर राज्य करणाऱ्या महादेव व रामदेव जाधव ह्यांच्या कारकीर्दीत दफ्तरदारीचें काम करणाऱ्या हेमाडपंतानें सुरू केलें, अशी एक फार दिवसांपासून चालत आलेली ऐतिहासिक कथा आहे; व ही कथा खरी आहे असें पुढील कारणावरून दिसतें. इ० स० १२६० सालापूर्वीचे एकोनएक लेख शिलांवर, ताम्रपटांवर किंवा ताडपत्रांवर लिहिलेले आढळतात. ह्या तिन्ही जिनसांवर प्रत्येक अक्षर हात थांबविल्यावाचून लिहितां येत नाहीं. अर्थात्, एका हातासरशी दहापांच अक्षरें जलद लिहिण्याची सोय आपल्या ह्या देशांत बाराव्या शतकापर्यंत माहीत होती असें दिसत नाहीं. त्यावेळीं व्यवहारांतील सामान्य पत्रें ताडपत्रांवर, भूर्जपत्रांवर, कातड्यावर व बऱ्याच वेळां कापडावर लिहून पाठवीत असत असें विधान करण्यास हवा तितका आधार आहे. मजजवळ पर्शराम पंडितानें केलेला भूपालवल्लभनामक ग्रंथाचा सारभूत पर्शरामोपदेश नावाचा एक यंत्रग्रंथ आहे. त्याच्या परिसमाप्तीचा श्लोक येणेप्रमाणें:—

श्रीशालिवाहनशकेष्टमुनिद्विचंद्र १२७८।
संख्ये गते सति च दुर्मुखनाम्नि वर्षे ॥
आषाढमाससितयुग्मतिथौ सुरेज्य- ।
धिष्ण्ये दिने व्यरचयद्द्विजपर्शरामः ॥ ३४ ॥

ह्या श्लोकावरून पर्शरामोपदेश हा ग्रंथ शक १२७८ त ह्मणजे इ० स० १३५६ त लिहिला गेला, असें होतें. ह्या ग्रंथांत प्रथम शक १२४८ पासून ह्मणजे इ० स० १३२६ पासून प्रभवादि संवत्सरांचीं फळें दिलीं आहेत, व नंतर शेकडो यंत्रांच्या आकृति कशा व कशावर काढाव्या तें सांगितलें आहे.

हरिद्रा तालकशिलामेषमूत्रसमन्विता।
कोकिकाख्यस्य लेखन्या नीलरक्तपटे लिखेत् ॥ ९६ ॥
कालेयरोचनाचंद्रैर्लुंगजालुगजवारिभिः।
मदनद्रुमलेखन्या यंत्रं भूर्जे लिखेदिदम् ॥ १०९ ॥

रोचनाकुंकुमाभ्यां तु भूर्जपत्रे सुशोभने ।
सुवर्णमयलेखन्या पद्ममष्टदलं लिखेत् ॥ १३२ ॥
व्रणहीने भूर्जपत्रे खरवाराश्वनोसृज: ।
वीतांगारेण संयुक्त : कृष्णोन्मत्तरसेन च ॥ १४२ ॥
विलिखेत् ॥ १४४ ॥
आनयेन्निर्व्रणं भूर्जं ग्रंथिहीनं सुशोभनं ॥ १७० ॥

पर्शरामोपदेशे भूपालवल्लभे मंत्रयंत्रप्रकरणम् ॥

हे श्लोक इ. स. १३२६ पासून १३५६ पर्यंतच्या तीस वर्षांत केव्हां तरी लिहिले आहेत. इ. स. १३१८ त मुसुलमानांचें राज्य महाराष्ट्रांत सुरू झालें. १३१८ च्या पूर्वीं २५ वर्षें ह्मणजे इ. स. १२९३ त अल्लाउद्दिन खिलजीनें यादवांच्या देवगिरीवर पहिली स्वारी केली. १२९३ वापूर्वीं बरोबर शंभर वर्षें ह्मणजे इ. स. ११९३ त शहाबुद्दिन घोरीनें दिल्लीच्या पृथ्वीराज चव्हाणाला जिंकिलें. इ. स. ११९३ त देवगिरीस ह्मणजे महाराष्ट्रांत यादववंशी जैत्रपाळराजा राज्य करीत होता. इ. सन ११९३ पासून १२९३ पर्यंत जैत्रपाळ, सिंघण, कृष्ण, महादेव व रामचंद्र असे पांच राजे देवगिरीस झाले. रामदेव १३०७ त व त्याचा मुलगा शंकरदेव १३१२ त मारला. १३१८ त रामचंद्राचा जावई हरपाळ याला सुलतान मुबारिकानें ठार मारिलें व देवगिरी कायमची घेतली. त्यानंतर आठ वर्षांनीं पर्शरामपंडितानें आपला पर्शरामोपदेश नांवाचा ग्रंथ लिहिला. ह्या ग्रंथांत भूर्जपत्रें व कापडाचे तुकडे यांवर यंत्रें लिहावीं असें अनेक ठिकाणीं ह्मटलें आहे.

ह्यावरून एवढें सिद्ध होतें कीं मंत्र व यंत्रें लिहिण्यास भूर्जपत्रें व वस्त्रपट ह्यांचा उपयोग इ. स. १३२६ च्या सुमारास व पूर्वीं लोक करीत असत. ज्ञानेश्वरींत चामावर ह्मणजे चर्मावर व कापडावर लिहिल्याचा उल्लेख आहे. कायमचीं दानपत्रें तांब्याच्या पत्र्यावर लिहिण्याचा प्रघात इ. स. १३२६ त होता ह्याला अनेक ताम्रपत्रांचा पुरावा आहे; इतकेंच नव्हे तर

१३२६ च्या पुढें तीन चारशें वर्षें ताम्रपत्रांवर लिहिण्याचा प्रघात चालू होता असें मुसुलमानांच्या व पेशव्यांच्या रियासतींतील बऱ्याच ताम्रपत्रांवरून उघड होतें. सारांश भूर्जपत्रें, ताडपत्रें, वस्त्रपट, ताम्रपत्रें व चर्मपत्रें, ह्यांवर १३२६ पर्यंत व क्वचित् प्रसंगीं पुढें बरीच वर्षें, लेख लिहिण्याचा महाराष्ट्रांत बराच प्रचार होता. परंतु ह्यासुमारास म्हणजे १३२६ च्या पन्नास साठ वर्षें अगोदर लिहिण्याकरितां दुसरा एक जिन्नस प्रचारांत येऊं लागला. तो जिन्नस कागद हा होय. ह्या कागदावर लिहिण्यासंबंधानें ज्ञानेश्वरींत कांहीं दूरचे उल्लेख आहेत.

हें बहू असो. पंडितू ।
धरूनु बाळकाचा हातू ।
वोळी लेहे वेगवंतू ।
आपणाचि. ॥ अध्याय १३, ओवी ३०७ ॥
सुखाची लिपि पूसिली. ॥ अध्याय ३, ओवी २४६ ॥
दोषांचीं लिहिलीं फाडीं. ॥ अध्याय ४, ओवी ९२ ॥
आखरें पूसिलेया न पुसे
अर्थ जैसा ॥ अध्याय ८, ओवी १७४ ॥

* ह्या उताऱ्यांत "सुखाची लिपि पूसिली" हें वाक्य मोठें अर्थप्रचुर आहे. भूर्जपत्रें, ताडपत्रें, ताम्रपत्रें व वस्त्रपट ह्यांवर काढिलेलीं अक्षरें पुसून टाकितां येत नाहींत, फार तर खोडून टाकितां येतात. ताम्रपत्रांवर लोखंडी लेखणीनें काढिलेलीं अक्षरें आडव्या रेघा मारून खोडून टाकितात. भूर्जपत्रें व ताडपत्रें ह्यांवर लोखंडी लेखणीनेंच लिहावें लागतें व तें लिहिणें पुसतां येत नाहीं. ह्यांच्यावरील लिहिणें नाहींसें करावयाचें असल्यास हरताळ वगैरे जिनसांचा उपयोग करावा लागतो. वस्त्रपटावरील लेखांनाहि हरताळाचाच लेप द्यावा लागतो. एकट्या कागदावरील ओल्या अक्षरांना मात्र "पुसून" टाकतां येतें. "दोषांचीं लिहिलीं फाडलीं" हेंहि वाक्य असेंच अर्थप्रचुर आहे. ताम्रपट तर मुदलांतच फाडितां येत नाहींत. भूर्जपत्रें व ताडपत्रें उभीं फाडतां येत नसल्यामुळें त्यावरची

* ह्या ओव्या मजजवळील लेखी पोथीतील आहेत.

लिखितें फाडून तुकडे करून टाकितां येत नाहींत. फार झालें, तर त्यांच्या आडव्या चिरफळ्या करतां येतात. आतां रहातां राहिले वस्त्रपट. वस्त्रपटांवरील लिखितें फाडतां येतील. परंतु, ज्ञानेश्वरींत ग्रंथ, पुस्तक वगैरे शब्द आलेले आहेत; व वस्त्रपटांचे ग्रंथ, किंवा पुस्तकें होणें अशक्य आहे. तेव्हां ज्ञानेश्वरांनीं उल्लेखिलेलीं " लिहिलीं " ह्मणजे कागदावरील लिखितें होत ह्यांत संशय नाहीं. शिवाय, वर दिलेल्या उताऱ्यांतील पहिल्या ओवींत, पंतोजी जलदीनें वोळी लिहितो, असें विधान केलें आहे. आतां, ताम्रपट, भूर्जपत्रें, ताडपत्रें किंवा वस्त्रपट, ह्यांवर जलदीनें वोळी लिहितां येणार नाहींत हें उघड आहे. तेव्हां जलदीनें लिहितां येण्यासारखा ज्ञानेश्वराला माहित असलेला जिन्नस ह्मटला ह्मणजे कागदच होय, ह्यांत संशय नाहीं. आतां इतकें खरें आहे कीं ज्ञानेश्वरींत कागद हा शब्द कोठेंहि आलेला नाहीं व येणें शक्यहि नाहीं. परंतु कागद ह्या अर्थी ज्ञानेश्वरानें दुसरा एक शब्द योजिलेला आहे. तो शब्द पाट हा होय.

पाटेयावरिलें आखरें ।
जैसीं पुसतां येतीं करें, ॥ अध्याय १८, ओवी १०९९.

येणेंप्रमाणें ज्ञानेश्वराच्या वेळेस लिहिण्याच्या कामीं कागद प्रचारांत येऊं लागले होते, हें स्पष्ट आहे. ही गोष्ट केवळ अनुमानानेंच सिद्ध आहे असें नाहीं. ज्ञानेश्वराचा समकालीन किंवा किंचित् प्राचीन जो मुकुंदराज त्याच्या विवेकसिंधूची मूळ अस्सल प्रत जोगाईच्या आंब्यास मुकुंदराजाच्या शिष्यशाखेकडे आहे व ती कागदावर लिहिलेली आहे. ह्या मूळ प्रतीवरील अक्षरें तेराव्या शतकांतील जाधवांच्या शिलालेखांतील अक्षरांप्रमाणें असून तीं मुकुंदराजाच्या सध्याच्या शिष्यांना, बाळबोध लिहिलीं असूनहि, वाचतां येत नाहींत, असें सांगतात. ह्यावरून इतकें सिद्ध होतें, कीं मुकुंदराज व ज्ञानेश्वर ह्यांच्यावेळीं लिहिण्याच्या कामीं कागदाचा अंशतः उपयोग लोक करूं लागले होते. ताडपत्रें, भूर्जपत्रें, व वस्त्रपट ह्यांचाहि उपयोग होत होताच. परंतु ह्या नवीन जिन्नसाकडे लोकांची प्रवृत्ति बरीच पडत चालली होती. ही प्रवृत्ति मुकुंदराज व

ज्ञानेश्वर ह्यांच्या पूर्वीं, इतकेंच नव्हे तर, हेमाडपंताच्याहि पूर्वी पांच-पंचवीस वर्षें, होत होती. अशावेळीं दफ्तरावरील मुख्याधिकारी जो हेमाडपंत त्यानें मोडी लिपी महाराष्ट्रांत नव्यानें सुरू केली. ह्या मोडी लिपीचाहि उल्लेख ज्ञानेश्वरानें वरील उताऱ्यांतील पहिल्या ओवींत केला आहे असें दिसतें. पंतोजी अक्षर वेगानें लिहिती, ह्या वाक्यांतील वेगानें हें पद विचारणीय आहे. बाळबोध अक्षर वेगानें लिहितां येत नाहीं. तेव्हां त्यासंबंधानें वेगवंत हा शब्द योजण्यांत कांहीं विशेष अर्थ नव्हता. तो मोडी अक्षराच्यासंबंधानें मात्र सार्थ आहे. ह्यावरून असें दिसतें कीं ज्ञानेश्वरीच्या पूर्वी मोडी अक्षर प्रचारांत आलें होतें. ज्ञानेश्वरी इ. स. १२९० ह्मणजे शके १२१२ त लिहिली गेली. त्यापूर्वीं तीस चाळीस वर्षें ह्मणजे इ. स. १२६० पासून पुढें हेमाद्रि जाधवांचा दफ्तरदार होता. हेमाद्रि दफ्तरदार होण्याच्या वेळीं उत्तर हिंदुस्थानांत मुसुलमानांचें राज्य होऊन ऐंशी नव्वद वर्षें झालीं होतीं. सिंघण राजानें माळवा वगैरे विंध्याद्रीच्या पलीकडील प्रांत जिंकले होते. तेव्हां मुसुलमानांची उर्फ म्लेंछांची ओळख मराठ्यांना झाली होती. ही ओळख होत असतांना, मुसुलमानांची कागद करण्याची कला महाराष्ट्रांत सुरू झाली व ही सुरू झाल्यावर मोडी लिहिण्याची पद्धत हेमाद्रीला सुचली. ही मोडी लिहिण्याची पद्धत हेमाद्रीनें मुसुलमानांच्या शिकस्ता नामक लेखन-पद्धतीवरून घेतली. फारशींत लिहिण्याच्या पद्धती अनेक आहेत. त्यांत नस्ख व शिकस्ता ह्या आपल्या इकडील बाळबोध व मोडी ह्यांच्याशीं जुळतात. नस्ख अक्षर बाळबोधीप्रमाणें स्पष्ट व सुव्यक्त असें लिहितात व शिकस्ता अक्षर मोडून लिहिलेलें असतें. फारशींत शिकस्तन् ह्या क्रियापदाचा अर्थ मोडणें असा होतो. जलदीनें लिहिण्यांत खडें अक्षर मोडून लिहिण्याचें जें वळण त्याला फारशींत शिकस्ता ह्मणतात. मोडी हा शब्द फारशी शिकस्ता ह्या शब्दाचें हुबेहुब मराठी भाषांतर आहे. मोडी ह्या अर्थाचा वाचक शब्द संस्कृतांत किंवा महाराष्ट्रींत नाहीं. हा शब्द हेमाडपंतानें फारशी शिकस्ता ह्या शब्दाच्या अर्थाकडे लक्ष देऊन मराठींत अक्षर लिहिण्याच्या एका

पद्धतीला नव्यानें लागू केला. हेमाडपंतानें अक्षर लिहिण्यांत ही नवी सुधारणा केली तोंपर्यंत महाराष्ट्रांत सर्व लेखी व्यवहार बाळबोध अक्षरांत होत असे. ह्या नवीन सुधारणेवरून ही एक गोष्ट ध्यानांत धरण्यासारखी आहे कीं महाराष्ट्रांतील विचारी पुढारी लोक परदेशस्थांची एखादी चांगली रीती उपयोगी असल्यास ती स्वीकारण्यास फार पुरातन काळापासून तयार असतात. इ. स. १२९० च्या अगोदर ह्मणजे हेमाद्रीच्या पूर्वी सुमारें शंभर दीडशें वर्षें महाराष्ट्राच्या उत्तरेस हिंदुस्थानांत मुसुलमान आले असतां त्यांच्या शिकस्ता लिहिण्याच्या तऱ्हेवरून ब्रज भाषा मोडीनें लिहिण्याचा प्रचार तिकडील विचारी पुरुषांनीं पाडलेला दिसत नाहीं. व महाराष्ट्रांत मोडी लिहिण्याचा प्रचात आज साडेसहाशें वर्षें चालू असतां भरतखंडांतील इतर कोणत्याही भाषेला हा प्रचात उचलण्याची अवश्यकता दिसली नाहीं. गुजराथी वगैरे इतर भाषांत पत्रें वगैरे रोजच्या व्यवहारांतील लिखाण किसबीड अशा मूळ बिनओळीच्या बाळबोध अक्षरांनींच करतात. मोडी हा शब्द फारशी शिकस्ता ह्या शब्दाचें भाषांतर आहे, ह्या प्रमाणाखेरीज फारशी मोडी अक्षरांवरून मराठी मोडी अक्षर घेतलें ह्याला दुसरें एक प्रमाण आहे. मराठी बाळबोध लिपींत प्रत्येक अक्षर निरनिराळें लिहितात, त्याप्रमाणें फारशींत नस्ख ह्मणून ठळठळीत अक्षर लिहिण्याची जी एक तऱ्हा आहे ती नवशिक्यांनाहि समजण्यासारखी असते. परंतु ती देखील मराठी बाळबोध अक्षरापेक्षां जास्त मोडलेली असते व तींत अनेक अक्षरें एकाच झटक्यासरशीं एकदम लिहिलीं जातात. तशांत उत्तम फारशी नस्ख अक्षर जातीनेंच मोडी वळणाचें असतें व त्याच्या मानानें शिकस्ता अक्षर तर अतीच मोडलेलें असून त्यांत नुक्त्यांचा बहुतेक लोप झालेला असतो. सारांश, फारशी अक्षरें लिहिण्याची पद्धत ज्यानें एकदा पाहिली त्याला देवनागरी बाळबोध अक्षरें एका झटक्यानें लिहिण्याची क्लृप्ति सुचण्याचा संभव विशेष आहे. कागदावर लिहिण्याचा प्रघात पडल्याबरोबर मोडी लिहिण्याचाहि प्रचात महाराष्ट्रांत लवकरच पडला व हा प्रचात पाडण्याचें प्रथम श्रेय

जाधवांचा दफ्तरदार जो हेमाद्रि त्यास विद्वत्तेच्या व अधिकाराच्या वजनावर सहजासहजीं घेतां आलें. आतां, कागदावर लिहिण्याचा प्रघात महाराष्ट्रांत पडल्यापासून मोडी लिहिण्याची चाल ह्या देशांत सुरू झाली अशी जर वस्तुस्थिति आहे, तर हेमाद्रीनें मोडी लिहिण्याची चाल लंकेहून आणिली अशी जी कथा आहे तींत कितपत अर्थ आहे तें पाहिलें पाहिजे. देवगिरीच्या जाधवांचें साम्राज्य सर्व दक्षिणभर कन्याकुमारीपर्यंत होतें हें प्रसिद्ध आहे. साम्राज्यांतील दफ्तरें तपासण्यास कन्याकुमारी किंवा रामेश्वर ह्या दक्षिणेकडील प्रांतांत जाऊन व कदाचित् लंकेची यात्रा करून परत आल्यावर सर्व दफ्तर मोडींत लिहिण्याचा वटहुकूम हेमाद्रीनें काढिला असावा असें दिसतें. लंकेहून परत येण्याला व हा नवा वटहुकूम काढण्याला एकच गाठ पडल्यामुळें, लंकेचा व मोडी अक्षराचा लोकांनीं विनोदानें संबंध जोडून दिला असेल असें वाटतें. बाकी लंकेंतील त्यावेळच्या सिंहली भाषेचा व मोडीचा कांहीं संबंध होता ह्याला बिलकुल प्रमाण नाहीं. सिंहली भाषेंत मोडीचा प्रचार अद्यापहि नाहीं व पूर्वीहि नव्हता. अर्थात्. मोडीचा प्रघात फारशी लिपी व फारशी कागद ह्यांच्या आगमनानें पडला ह्यांत फारसा संशय नाहीं. तशांत मोडी ह्मणजे देवनागरी लिपीहून भिन्न अशा तामीळ, तेलगु, कानडी किंवा सिंहली अक्षरमालिकेपासून घेतलेली आहे असाहि प्रकार नाहीं. मोडी अक्षर देवनागरी अक्षरें मोडून तयार केलेलें आहे हें चारपांचशें वर्षांचीं जुनीं पत्रें व महजर पाहिले ह्मणजे स्पष्ट दिसून येतें. मजजवळ इ० स० १४१६ पासून आतांपर्यंतचे अनेक जुने मोडी लेख आहेत. इ० स० १२५० पासून १४१६ पर्यंतचा मात्र एकहि मोडी लेख अद्याप पर्यंत उपलब्ध झाला नाहीं. १४१६ च्या पुढील कागदपत्रांवरील मोडी अक्षर देवनागरी अक्षराशीं ताडून पहातां, देवनागरी बाळबोध अक्षरें एका झटक्यासरशीं लिहिल्यानें मोडी अक्षर सिद्ध होतें हें नीट कळतें. प्रायः देवनागरी बाळबोध प्रत्येक अक्षर दोन तीनदां हात थांबविल्यावांचून लिहितांच येत नाहीं. उदाहरणार्थ, अ, इ, उ, क, वगैरे पाहिजे तें अक्षर घ्या. अ ला चारदां, इ ला दोनदां, उ ला दोनदां, क ला

तीनदां किंवा चारदां, हात थांबवावा लागतो. हींच अक्षरें हात न थांबवितां लिहिलीं ह्मणजे त्यांचीं मोडी रूपें सिद्ध झालीं. आतां जसजशी मोडी पद्धति जास्त प्रचारांत आली व तिचा दरबारांत जास्त प्रवेश झाला, तसतसें मोडी अक्षर जास्त वळणदार, डौलदार, सफाईदार झालें हें उघड आहे. ज्यांनीं मोडी अक्षराच्या ऐतिहासिक परंपरेकडे लक्ष्य दिलें नाहीं त्यांना मोडींतील कित्येक अक्षरें देवनागरी अक्षरांपासून निघालीं हें विधान बराच विचार केल्यावांचून व माहिती मिळविल्यावांचून खरेंहि वाटणार नाहीं. इतका मूळ देवनागरी अक्षरांत व त्यांच्या डौलदार व भपकेदार मोडींत फरक झालेला आहे. उदाहरणार्थ प्रस्तुतचें मोडी स हें अक्षर घ्या. ह्याला वरची पोकळ गाठ व मधलें गरगरीत ढेर कोठून आलें हें वरवर पहाणाऱ्याला सांगतां येणार नाहीं. परंतु इ. स. १४१६ पासून आतांपर्यंतच्या मोडी लेखांत स ह्या अक्षराची मोडी परंपरा कशी होत आली आहे हें पाहिलें ह्मणजे सध्याचा हा पोकळ गाठीचा व ढेरपोट्या स मूळ देवनागरी साचेंच रूपान्तर किंवा वेषान्तर आहे हें ओळखतां येतें. प्रथम, स मधील रचें खालचें शेपूट व र आणि त्याचा पहिला काना ह्यांजमधील आडवी रेघ एकदम लिहूं लागले. त्यामुळें, खालच्या शेपटाला व आडव्या रेघेला जोडणारी एक अर्धकंसाकार वक्र रेषा प्रथम नव्यानें उपयोगांत आली. इ. स. १४१६ पासून १५५० पर्यंतच्या लेखांत हा जोड नुसता साधा वक्रच आहे. पुढें वळणदार अक्षरचरणकांनीं ह्या वक्राला पुष्टी आणून त्याचें ढेर बनविलें, व ह्या ढेराला पेलण्यास वरती एक भली मोठी पोकळ गाठ तयार केली, आणि दोन्ही काने एकदम लिहिण्याची सफाई सुरू केली. येणेंप्रमाणें बनत बनत सध्याचा अगडबंब स बनला आहे. ह्या अगडबंब साचेंहि एक दुसरें रूपान्तर झालें आहे. गाठ काढून टाकून व काने पिरगाटून कांहींसा निडव्याप्रमाणें ळकारा सारखा एक स कार्दात असतात. ह्या सांत व ळत फरक इतकाच कीं ळचे दोन्ही जुवे घट्ट बसलेले असतात व साचे अगदीं उघडे असतात आणि ळची उभी रेघ सांत आडवी मारतात. हा दुपोटी स मूळ देवनागरी सापासून फारच रूपान्तरित आहे. परंतु हें रूपान्तर

एकाएकीं मात्र प्राप्त झालेलें नाहीं. ह्याला फार काळ व बरीच मेहनत पडलेली आहे. हें शेवटलें रूप बनवायाला सहाशें वर्षांचा अवधी व अनेक कलमबहाद्दरांची हातचलाखी लागलेली आहे! हाच प्रकार इतर अक्षरांचा आहे. इ. स. १४१६ पासून १८९० पर्यंतच्या पंचवीस तीस मोडी पत्रांचे फोटोझिंको देतां आले असते तर हें विवेचन जास्त स्पष्ट झालें असतें.

८. शिवाजीच्या पत्रांसंबंधानें दुसरी विचार करण्यासारखी बाब ह्मटली ह्मणजे भाषेसंबंधींची आहे. प्रस्तुत खंडांतील पहिला लेखांक विजापुरांतील सर्वश्रेष्ठ कारभारी जो दियानतराव त्यानें निळोपंत बहुतकर यांस पाठविलेला आहे. ह्या दियानतरावाचा उल्लेख काव्येतिहाससंग्रहान्तर्गत पत्रें यादींतील ४३८ व्या लेखांकांत ह्मणजे शहाजी महाराजाच्या कैफियतींत प्रारंभींच आला आहे. हा दियानतराव देशस्थ ब्राह्मण असून दियानतराव हा ह्याचा बहुशः किताब आहे. दियानत् ह्या फारशी शब्दाचा अर्थ धर्म. अर्थात् दियानतराव ह्मणजे धर्मराव किंवा धर्माजीराव. आतां धर्मराव किंवा धर्माजीराव ह्या शब्दाचा दियानतराव असा फारशींत सार्थ तर्जुमा होतो, तेव्हां दियानतराव हा किताब आहे किंवा हुएन्संग संस्कृत विशेषनामाचे जसे अर्थावरून चिनी तर्जुमे कधीं कधीं करतो त्याप्रमाणें मूळ मराठी नांवाचा हा फारशी तर्जुमा आहे, हें निश्चयात्मक सांगतां येत नाहीं. हा प्रकार कांहीं असो, इतकें मात्र स्पष्ट आहे कीं त्या काळीं ब्राह्मणहि फारशी नांवें स्वीकारण्यांत फुशारकी मानीत असत. सर्जेराव, बाजीराव, हैबतराव, जानराव, फिरंगोजीराव, शहाजीराव, सर्फोजीराव, दर्याजीराव, मलंगोजीराव, गुलबाई वगैरे फारशींतून आलेल्या मराठी नांवांप्रमाणेंच दियानतराव हेंहि मराठींत त्या काळीं रूढ झालेलें नांव होतें. हा खुलासा पत्र लिहिणाऱ्याच्या नांवासंबंधानें झाला. आतां ह्या पत्रांतील शब्द व प्रयोग ह्यांच्याविषयींचा खुलासा करतों. ह्या लेखांकांत एकंदर ९१ शब्द आहेत, त्यापैकीं बराबर ३० शब्द फारशी आहेत आणि एकंदर

वाक्यप्रयोग फारशी प्रयोगांच्या धर्तीवर आहेत. ९१ शब्दांपैकीं अस्सल फारशी ३० गाळले असतां बाकी जे ६१ शब्द राहतात त्यांतून दोन तीन शब्द खेरीजकरून बाकी सर्व शब्द फारशी शब्दांचे मराठी तर्जुमे आहेत. मायन्यांतील अखंडितलक्ष्मीप्रसन्न व परोपकारमूर्ति हे शब्द दामदौलतहू व मुषफिक्मेहेरबान् ह्या शब्दांचे हुबेहुब तर्जुमे आहेत; आणि राजमान्य, राजश्री, गोसावी, यांसी, हे चार शब्द शुद्ध मराठी आहेत व कोणत्याही फारशी मायन्यांतील शब्दांचे भाषान्तर नाहींत. आतां मायना सोडून देऊन खालील पत्राकडे वळूं. ह्या पत्रांत एकंदर दहा वाक्यें आहेत. पैकीं पहिल्या वाक्यांतील सेवक हा शब्द बंदा ह्या फारशी शब्दाचें भाषांतर आहे. संस्कृत नाटकांतनीं कांहीं पांच चार पत्रें सांपडतात त्यांतील मायन्यांत सेवक हा शब्द कोठें आलेला आढळत नाहीं. हेमाद्रीच्या वेळच्या मराठीतील किंवा त्याच्या पूर्वींच्या महाराष्ट्रांतील पत्रव्यवहाराचा एकहि मासला उपलब्ध नसल्यामुळें ह्मणजे मुसुलमानांचा प्रवेश महाराष्ट्रांत होण्याच्या पूर्वी मराठींत किंवा महाराष्ट्रींत पत्रांचे मायने कसे लिहीत असत तें नक्की सांगतां येत नसल्यामुळें, सेवक हा शब्द मायन्यांत योजण्याचा प्रघात जुन्या मराठीपासून किंवा तत्पूर्वींच्या महाराष्ट्रीपासून चालत आला किंवा नाही हें कांहींच ठरवितां येत नाहीं. बाकी फारशी दरबारी पत्रांतील मायन्यांत बंदा हा शब्द योजण्याची ज्या अर्थी फार पुरातनपासूनची चाल आहे त्याअर्थी प्रस्तुत वाक्यांतील सेवक हा शब्द बंदा ह्या शब्दाचें भाषान्तर आहे असेंच ह्मणणें वाजवी दिसतें. ह्या वाक्यांतील दियानतराऊ हा शब्द अर्धा फारशी व अर्धा मराठी आहे; बाकीचे शब्द शुद्ध संस्कृत आहेत. दुसऱ्या वाक्यांतील मौजे, किले, माहताजी, नूरखानास व रवान् हे शब्द फारशी आहेत आणि बाकीचे प्रायः सर्व शब्द व प्रयोग फारशी शब्दांचे व प्रयोगांचे तर्जुमे आहेत. एकटा 'गांव' हा शब्द तेवढा मराठी आहे. "मौजे उझार्डे किले वंदन माहताजी गांव चालत असतां," ह्या वाक्यांशाचा अर्थ येणेंप्रमाणें:— "ओझर्ड्याचें गांव किले वंदन ह्या प्रांताखालीं चालत असतां." ह्या वाक्यांत, मौजे

उझार्डे व किल्ले वंदन, ह्या दोन स्थळीं इजाफत ह्मणजे षष्ठीची इ आहे व ती तशीच मराठींत ठेविली आहे. मौजे उझार्डे = मौजा इ उझार्डे व किल्ले वंदन = किला इ वंदन; ह्मणजे ओझर्ड्यांचे गांव व वंदनचा किल्ला. शुद्ध मराठी लिहावयाचें ह्मटलें ह्मणजे ओझर्ड्यांचें गांव किंवा ओझर्डे गांव व वंदनचा किल्ला किंवा वंदन किल्ला असें लिहावयाला पाहिजे होतें. परंतु लेखकानें फारशीच पद्धत कायम ठेविली आहे व हीच पद्धत सध्याच्याही दफ्तरांत अशीच चालू आहे. माहताजी हा संयुक्त शब्द आहे. माह् ह्मणजे प्रांत व ताज् ह्मणजे चालणारा, धांवणारा. प्रांताखालीं चालणारा तो माहताज्. माहताज् ह्याची एक संख्या दाखवावयाची असली ह्मणजे ये प्रत्यय लावून माहताजी असें रूप करतात. तेव्हां माहताजी ह्मणजे प्रांताखालीं चालणारा एक. आतां मौजे उझार्डे किल्ले वंदन ह्या स्थलीं ही एक इजाफत आहे. मौजा इ उझार्डे इ किला इ वंदन = वंदन किल्याचें ओझर्डे गांव = वंदन किल्ल्याखालील ओझर्डे गांव. अर्थात्, 'मौजे उझार्डे किले वंदन माहाताजी गांव चालत असतां = वंदन किल्याखालील ओझर्डे गांव त्या प्रांताखालीं चालणारें एक गांव चालत असतां. येथें वाचकांच्या हें लक्षांत आलेंच असेल कीं उपान्त्य चालत हा शब्द ह्या वाक्यांशांत फाजील आहे. खरें ह्मटलें असतां, माहताजी ह्या शब्दाचा अर्थ प्रांताखालीं चालणारें एक असा असल्यामुळें, उपान्त्य चालत हा शब्द येथें नको होता. "मौजे उझार्डे किल्ले वंदन माहताजी गाव असतां" असा वाक्यांश वस्तुतः पाहिजे होता. परंतु दियानतरावासारख्या सर्वश्रेष्ठ अधिकाऱ्यानें ज्या अर्थी चालत हा फाजील शब्द योजिला आहे त्या अर्थी ह्या प्रयोगाची जास्त चिकित्सा करणें अवश्य आहे. "प्रांताखालीं किंवा प्रांतांत गांव चालणें," हा प्रयोग शुद्ध फारशी आहे. प्रांतांत गांव चालणें, ह्या प्रयोगाचा अर्थ प्रांतांत गांव असणें, असा आहे. ग्रामो गडप्रदेशे अंतर्भवति, असा प्रयोग संस्कृतांत होतो. ग्रामो गडप्रदेशे चलति किंवा चरति असा प्रयोग संस्कृतांत नाहीं. असणें ह्या अर्थीं चर् किंवा चल् ह्या धातूची शक्ति संस्कृतांत

नाहीं व जुन्या महाराष्ट्रींतहि नाहीं. आतां फारशींत असा प्रयोग होतो. देह नूरखानरा रवान् शूदा बूद, ह्मणजे गांव नूरखानाकडे चालू झाला होता, असा प्रयोग फारशींत करतात. रफ्तन्, चालणें, ह्याचें रवान्, चालत हें वर्तमानकालवाचक धातुसाधित रूप आहे. इंग्रजांच्या संसर्गानें सध्यां मराठी बोलण्यांत अशा तऱ्हा पुष्कळ येऊं लागल्या आहेत. तो गार्ड ही लाईन वर्क करीत असतो, असा प्रयोग रेलवेकडील लोक करतांना आढळतात. तो गार्ड ह्या रस्त्यावर काम करीत असतो, ह्या शुद्ध मराठी प्रयोगाच्याऐवजीं वरील प्रयोग रेलवेकडील नोकर लोक करतात. वर काम करणें ह्या अर्थी वर्क हें सकर्मक क्रियापद योजणें रास्त होईल. खरें पाहिलें तर हें वाक्य असें पाहिजे:– तो गार्ड ही लाईन वर्कतो. परंतु हा प्रयोग वेडाबागडा दिसतो अशी भावना असल्यामुळें, वर्क हें क्रियापद घालून शिवाय करणें ह्या मराठी क्रियापदाचा जोड देतात. हाच प्रकार मुसुलमानांच्या कारकीर्दींतहि चालू होता. माहताजी ह्मणजे प्रांताखालीं चालणारें असा अर्थ असतां, आणखी चालत हें क्रियापद त्यावेळीं योजीत असत. ही एवढी दुसऱ्या वाक्याची चिकित्सा झाली. आतां तिसऱ्या वाक्याकडे वळूं. ह्या वाक्यांत दहा शब्दांपैकीं सहा शब्द फारशी आहेत आणि मालूम होणें व मोकर्रर करणें हीं संयुक्त क्रियापदें मालूम शूदन् व मोकर्रर कर्दन् ह्या फारशी संयुक्त क्रियापदांचीं शब्दशः भाषांतरें आहेत. चवथ्या वाक्यांत तीनच शब्द शुद्ध मराठी आहेत, व दुंबाला कर्दन् (ह्मणजे–कडे देणें) हें फारशी संयुक्त क्रियापद योजिलें आहे. पांचव्या वाक्यांत, पहिल्यांदा ह्या अर्थी पहिलें हा शब्द योजिला आहे व तो फारशी अव्वल ह्या शब्दाप्रमाणें हुबेहुब योजिला आहे. पुढील पांचही वाक्यांची व्यवस्था अशीच आहे. ह्मणजे लिहिणाऱ्याच्या मनांत मूळ मजकूर प्रथम फारशी शब्दांच्या व प्रयोगांच्या रूपानें येतो व नंतर मूळ फारशी शब्दांपैकीं ठळकठळक शब्द जमेचे तसेच मराठी भाषांतरांत राहून, संयुक्त क्रियापदांचे, शब्दयोगी अव्ययांचे व निपातांचे प्रयोग फारशी प्रयोगांच्या धर्तीवर जातात.

दियानतराव विजापूरच्या आदिलशाहाचा दफ्तरदार असल्यामुळें त्याचें मराठी फारशीच्या धर्तीवर जातें अशी येथें शंका आणितां येईल. परंतु ह्याच वेळचीं शिवाजीचीं पत्रें पाहिलीं असतां ही शंका अवास्तव आहे असें दिसून येईल. प्रस्तुत खंडांतील ३६ वा लेखांक इ० स० १६७७त शिवाजीनें काढिलेलें एक आज्ञापत्र आहे. ह्या लेखांतील १ बिन, २ फिरंगोजी, ३ हवालदार, ४ इमारत, ५ मजकूर, ६ हवाला, ७ सरंजामी, ८ मजमूदार, ९ तैनात, १० तपशील, ११ खासा, १२ सालीना, १३ चाकर, १४ रिवाज, १५ हुजूर, १६ पोता, १७ असामी १८ नून, १९ बा, २० पा, २१ रास, २२ सदहू, २३ बाकी, २४ वजा, २५ वजावाटा, २६ बेरीज, २७ मजुरा, २८ सुरू, २९ सूद, ३० बार, ३१ व इतके शब्द फारशी आहेत व ह्यापैकीं कित्येक शब्द दोनदोनदा तिनतिनदा आले आहेत. हवालदार इ इमारत इ कोट इ उटलूर, हा प्रयोग शुद्ध फारशी आहे. केदारजी बिन फिरंगोजी, इमारतमजकूर, हवाला देणें, सरंजामी करणें, खासा तैनात सालीना, हुजूरपोतापैकीं, रास केले असेत, वजा करणें, वजावटा, बेरीज घेणें, मजुरा असे, सुरू सूद, बार, हे सर्व प्रयोग फारशी आहेत. लेखाच्या प्रारंभींचा मायना तेवढा शिवाजीनें संस्कृत बनविला आहे. परंतु त्यांतहि, यासि आज्ञा केली ऐसी जे, हें, ऊरा हुक्म फर्मूद के, ह्या फारशी शब्दांचें भाषांतर आहे. यासि आज्ञा करतो ह्याअर्थी अस्मै आज्ञां करोति, असा प्रयोग संस्कृतांत किंवा महाराष्ट्रींत होत नाहीं; एनं आज्ञापयति, असा होतो. आतां इतकें खरें आहे कीं दियानतरावाच्या पत्रांतल्यापेक्षां शिवाजीच्या पत्रांत मायन्यांतले शब्द बरेच संस्कृत आहेत. परंतु शिवाजीच्यापूर्वीं तीनशे वर्षे फारशी शब्दांचा व प्रयोगांचा जो बेसुमार भरणा मराठींत होत होता तो राजव्यवहारकोशादि साधनांनीं भाषा सुधारणाऱ्या ह्या शककर्त्यालाहि पदोपदीं स्पर्श केल्यावाचून राहिला नाहीं. शिवाजीच्या नंतर मराठ्यांचा व्याप सर्व हिंदुस्थानभर झाल्यामुळें व चोहोंदिशांनीं मुसुलमानी संस्थानांशींच व्यवहार करावयाचा असल्यामुळें मराठी भाषेंत रूढ झालेले फारशी शब्द कायम राहून, शिवाय

आणीक हजारो फारशी शब्द ह्या भाषेंत सारले शंभर वर्षें शिरत होते. परंतु अठराव्या शतकांत पेशव्यांच्या अमलांत झालेला हा फारशी शब्दांचा शिरकाव चौदाव्या, पंधराव्या व सोळाव्या शतकांतल्याप्रमाणें मराठीला मागें सारून होत नव्हता, तर मराठीची मर्जी संभाळून होत होता. हा प्रकार कसा होत होता ह्याच्या विशदीकरणार्थ शिवाजीच्या पूर्वीचा एक फारशी-—मराठी लेख देतों व नंतरचा पेशवाईतला एक देतों.

इ. स. १६२८ ला एक लेख.

अज् दीवाणे रस्तखाने खास बजानेबू कारकुनानी व देसमुखानी पा। पुणें व मुकामाईयानी व हुदेदारानी अजहती मुकासाई हाल व इस्तकबाल व मोकदमानी मौजे देउळगौ नजदीक आलेगौ कर्याती पाटस पा। मजकूर बिदानद. सु॥ सन तिसा असर अलफ. दामोधरभट बिन नारायनभट व रामेस्वरभट बिन नारायनभट साकिन आरवी मुद्रूळ बंदगी हजरती मालूम केले जे, आपाणियासी इनाम जमीन सेत खुद खासा दोरी सवा दर सवाद मौजे देउळगौ नजर्दीक आलेगौ कर्याती पाटस परगणे मजकूर बा। हुज्जती हैबतखान सलास अलफ आहे. येणेप्रमाणें फर्मान करूनु दणे ह्मणोन. रोखा मगलकत मदारी मलक अंबर एकूंदर इनामदारानी तिसा असर अलफ छ २० माहे सौवालु आहे. फर्मान मऱ्हामती होये. मालूम जालें. बा। ई आ॥ ती दिवाण खासा बराये ई रुके ७ देवविले. दामोधरभट बिन नारायनभट व रामेस्वरभट बिन नारायनभट साकिन आरवी मुद्रूळ यांसी इनाम जमीन सेत खुद खासा दोरी सवा दर सवाद मौजे देउळगौ ना। आलेगौ कर्याती पाटस पा। मजकूर बा। हुज्जती हैबतखान सलास अलफ दिधले आहे, तेणेप्रमाणें करार केले असे. ता। सवा असर अलफ जैसा भोगवटा व तसरुफाती चालत असेल तेणेप्रमाणें दुमाला कीजे. दर हर साल फर्मानाचा उजूर न कीजे. तालीक घेऊन असली फिराऊन दीजे. बा। रोखा गा। मा। मलक अंबर.

एकंदर इनामदारानी तिसा असर अव्वल छ २० सौवाल प्रा॥ दामोदर-भट व रामेस्वरभट सेत दोरी सवा बा॥ सवाद दफ्तर यास मोर्तब सूद. ।।

रुजू सूद. रुजू मुजमू. रुजू सुरनवीस.

तेरीख २७ माहे सफर समान इसरैन अव्वल.

पा॥ हुजूर.

सप्रसूद	सप्रसूद	सप्रसूद	सप्रसूद	सप्रसूद
मुश्रीफ	दफ्तरदार	मजमू	न्यावती	सुरनिवीस
बारसूद	बारसूद	बारसूद	बारसूद	बारसूद
तालीकसूद	तालीकसूद		तालीकसूद	तालीकसूद

हा लेख अहमदनगरच्या निजामशाहीतल्या शहाजी भोसल्यांच्या राजोपाध्यांना इनाम दिल्यासंबंधाचा आहे व तो साताऱ्यांतील भाऊसाहेब राजोपाध्ये ह्यांच्या दफ्तरांतील आहे. हा दोन भाषांत लिहिला आहे. प्रथम सर्व मजकूर फारशी व नंतर त्याच्या खालीं तोच मजकूर भाषांतर करून मराठींत दिला आहे. मराठी मजकूराची लिपी मोडी आहे. हा मराठी मजकूर जशाचा तसाच वर दिला आहे. हें मराठी सध्याच्या महाराष्ट्रांतील कोणा फारशी न जाणणाऱ्याला समजेल असें वाटत नाहीं. तरी इ० स० १६२८ त हें मराठी महाराष्ट्रांत सरकार दरबार करणाऱ्या लोकांना समजत असे असें दिसतें. ह्या लेखांत एकंदर २३६ शब्द आहेत. पैकीं विशेषनामें सोडून दिलीं असतां, फक्त ३४ शब्द मराठी आहेत, व तेहि प्रायः तदर्थवाचक फारशी शब्दांचे भाषांतर आहेत.

आतां ह्या इ० स० १६२८ तील लेखाशीं तुलना करावयास इ० स० १७२८ च्या सुमाराचा एक लेख देतों.

श्री. १२ मार्च १७२७

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५३ प्लवंग नाम संवत्सरे चैत्र शुद्ध प्रतिपदा रविवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी यांणीं राजश्री अंबाजी त्र्यंबक यांसी आज्ञा केली ऐसी जे:—मनसुब्याचा अर्थ सविस्तर राजश्री बाजीराव पंडित प्रधान यांस लिहिला आहे त्यावरून कळेल. तरी तुह्मीं पंडित मशारनिल्हेस चार गोष्टी विचाराच्या सांगोन अमित्राचे पिछावरी * * * कुयत फितूर तुटे तो अर्थ करणें. तुह्मीं स्वामीजवळ बोलोन गेला काय, करता काय, हा विचार कळत नाहीं. राजश्री प्रधानाचे व राजश्री सेनापतीचे चित्तीं विचार काय आहे हा तऱ्ही शोध घेऊन लेहून पाठवणें. त्यावरून स्वामी निश्चिंती मानतील. गुज काढावयाचा विचार चित्तांत येत नसेल तरी इलाज काय? वारंवार लिहावयाची सीमा झाली! परंतु कार्यभागाचा विचार दिसत नाहीं. याउपरि तरी गुज काढावें. फितूर तुटावा ऐसें चित्तांत असलें तरी पत्रदर्शनीं फौजेनिशी अमित्राचे पिछावर येऊन त्याची वाताह्यात करणें. बहुत काय लिहीन.

हें काव्येतिहाससंग्रहान्तर्गत पत्रें यादी वगैरेतील १६७वें पत्र आहे. ह्या पत्रांत १ शाहू, २ मनसुबा, ३ बाजीराव, ४ फितूर, ५ इलाज, ६ मशारनिल्हे, ७ फौज आणि ८ व, एवढे ८च शब्द कायते एकंदर १२७ शब्दांतून फारशी आहेत. ह्मणजे,

इ. स.	फारशी	मराठी	एकंदर	शेकडा मराठी शब्द
१६२८	२०२	३४	२३६	१४·४
१७२८	८	११९	१२७	९३·७

ह्या दोहोंशीं प्रस्तुत खंडांतील वर उल्लेख केलेल्या शिवाजीच्या २१व्या लेखांतील शब्दांची तुलना केली असतां पुढील फळ येतें:—

१६७७	५१	८४	१३५	६२·२

ह्याचा अर्थ असा झाला कीं दरबारी लिहिण्यांत, मुसुलमानांचें राज्य चालू असतां इ. स. १६२८ त शंभर शब्दांतून सरासरीच्या मानानें १४ शब्द मराठी येत, शिवाजीचें स्वराज्य चालू असतां इ. स. १६७७ त शेकडा ६२ शब्द मराठी येत, आणि शाहू राज्यावर असतां इ. स. १७२८ त शेंकडा ९३ शब्द मराठी येऊं लागले. परराज्याचा भाषेवरती केवढा परिणाम होतो त्याचा हा रोखठोक ताळा आहे!

इ. स. १६२८ पासून १७२८ पर्यंत मराठींतील दरबारी पत्रांत फारशीचा भरणा कोणत्या प्रमाणानें होत होता त्याचा हा तपशील आहे. १६२८ च्या पूर्वीं इ. स. १४१६ पर्यंतचे मजजवळ फारशी-मराठी लेख आहेत त्यांतहि १६२८ च्या लेखांतल्याप्रमाणेंच फारशी शब्दांचा भरणा अतोनात आहे. मुसुलमानांच्या राज्यांत दरबारी म्हणून जेवढें लिहिणें होतें त्या सगळ्यांत फारशी शब्दांचें व प्रयोगांचें प्राधान्य उत्कट असे. ह्या दरबारी लेखांपेक्षां तत्कालीन मराठी कवींच्या लेखांत फारशीचा भरणा अतिच कमी आहे. परंतु त्यांच्या देखील लेखांत फारशी शब्द अधूनमधून घुसल्यावाचून राहिले नाहींत. उदाहरणार्थ, इ. स. १५४८ पासून १६०९ पर्यंत असणाऱ्या एकनाथस्वामींच्या ग्रंथांतील एक उतारा देतों.

अर्जदास्त.

अर्जदास्त अर्जदार। बंदगी बंदेनवाज
अलेकं सलाम। साहेबांचे सेवेसी
बंदे शरीराकार। जीवाजी शेखदार
बुधाजी कारकून। प्रगणे शरीराबाद
किल्ले कायापुरी। सरकार साहेबांची

आज्ञा घेऊन स्वार जाहलों तो प्रगणे मजकुरीं येऊन सरकार काम करावयास लागलों. तो प्रगणे मजकूरचे जमेदार दंभाजी शेट्ये व कामाजी महाजन व मनीराम देशमुख व ममताई देशपांडी व क्रोधाजी

नाईकवाडी ऐसे हरामजादे फार आहेत ते सरकारकागाचा कयास चालू देत नाहींत. दंभाजी शेट्या कचेरीस येऊन जोम धरून बसतो. मनीराम देशमुख आपलें काम परभारें करून घेतो. ममताई देशपांडीण इणें तमाम प्रगणा जेरदस्त केला. क्रोधाजी नाईकवाडी याणें तमाम तफरका केला. तो साहेबांपासून जरासंध चोपदार आला. त्यानें खबर केली कीं मागून यमाजीपंताची तलब होणार. त्यास, त्या धास्तीनें तमाम प्रगणा वोस जाला. चितपशील कलम. डोळसवाडीस मात्र कांहीं रुई झुई वस्ती राहिली. ' कानगांव तो बंद जालें. दोन्ही वेशींचीं कवाडें लागलीं. नाकापुरास वहाव सुटले. तोंडापूर तो तफरका जालें. दंताळवाडी वोस पडली. दिवेलागणी देखील राहिली नाहीं. केसगावची पांढर जाली. शिरापूरचा लोक दरोबस्त थरथरा कापतो. हातगाव कसाल्यानें जर्जर आले. त्यांच्यानें आतां कांहीं लावणी होत नाहीं. पायगांवचीं मेटें बसलीं. ढोपरपूरचीं राहिलीं. चरणगाव चाली सरली. गांडापूर वाहूं लागलें. लिंगस्थान भ्रष्ट जालें, उठूं पळूं लागलें. धीर धरवेना. ऐसी प्रगण्यांत कीर्दी बुडाली. यावर सरकारकाम सुरू करीत होतों. तो यमाजीपंताची परवानगी आली कीं, हुजूर येणें, आपणास साहेबाचा आश्रय आहे. एका जनार्दन बंदा। बंदगी रोशन होय। हे अर्जदास्त.

ही अर्जदास्त एकनाथी भजनीभारुडांतील आहे. हींत किती फारशी शब्द आहेत त्याची गणती करण्याचें सोपें काम वाचकांकडेच सोंपवितों. एकनाथस्वामी इ० स० १५४८ त जन्मले. त्यानंतर सुमारें ४० वर्षांनीं त्यांनीं भजनीभारूड लिहिलें असें धरल्यास ही अर्जदास्त इ. स. १५८८ च्या सुमारचीं असावी असें दिसतें. आतां इ. स. १५४१ तील एक व १५९८ तील एक असे दोन जुने मराठी लेख देतों. हे लेख साताऱ्याजवळील निंब येथील ग्रामस्थांनीं एका गोसाव्याला दिलेलीं दान-पत्रें आहेत. तीं सातारा येथील रा. रा. तुकारामपंत ठाकूर वकील यांच्याद्वारा मिळालीं.

श्री.

श्री स्वस्ति श्री सकु १४६३ वरिखे प्लवंग संवत्सरे चैत्र सूध सप्तमी रविदिने तदीनि श्री सदानंद गोसावियाचे मठ मौजे निंब परगणे वाई तेथ अन्नदान प्रतीदिनि चालवावेया वृतीपत्र कंठगिरी गोसावी वा सदानंद गोसावी यांसी लिहुनि भीवोजी + + जी देसाई, व माया पाटेलु, व सेटीया बसव सेटी कसबे मजूकुर, व प्रसोजी आषाडा मौजे आखाडें, व माळ पाटेलु मूरुकुटा मौजे राहागौ हे मूख करूनि समस्त देसक परगणे कुडाळ लीहुनी दीलें ऐसें जे प्रति वरुशि देणें बीतपसीलु गळा कैली खंडी ४।३।

जोंधळ	गहू	तुरी
२॥४॥	०॥३।	०॥३।

भिवोजी व परसोजी
आखाड, निसबत किले
निंब.

कसबा —— ०।१

जोंधळ	तुरी	गहू
०।	८॥	८॥

माळ पाटेलु मुरकटा, राहागौ

८३

जोंधळ	तुरी	गहू
८२	८॥	८॥

ळींगो पाटेलु, आनेवाडी

८२

जोंधळ	तुरी	गहू
८१॥	८।	८।

गांगो पाटेलु, खरसी बुा

८२

जोंधळ	तुरी	गहू
८१॥	८।	८।

तुक सेटी, सायेगौ

८२

जोंधळ	तुरी	गहू
८१॥	८।	८।

भोज पाटेलु, दरे खुा

८१॥

जोंधळ	तुरी	गहू
८१	८।	८।

मौजे किणै, भीऊजी काठिकी

८२

जोंधळ	तुरी	गहू
८१॥	८।	८।

मौजे मोरघर, मुरकट काळ पाटेलु

ʗ१॥

जोंधळ	तुरी	गहूं
ʗ१	ʗ।	ʗ।

जाऊजी, बाळवडे

ʗ१॥

जोंधळ	तुरी	गहूं
ʗ१	ʗ।	ʗ।

सागोर्वी, बातगुडा

ʗ१।

जोंधळ	तुरी	गहूं
ʗ॥।	ʗ।	ʗ।

जाखोजी, दरें बुा

ʗ२

जोंधळ	तुरी	गहूं
ʗ१॥	ʗ।	ʗ।

मौजे करदी, काउजी बादमी

ʗ१॥

जोंधळ	तुरी	गहूं
ʗ१	ʗ।	ʗ।

मारुळी, धाकोजी

ʗ१।

जोंधळ	तुरी	गहूं
ʗ॥।	ʗ।	ʗ।

जैदी पाटेलु, आरडे

ʗ२

जोंधळ	तुरी	गहूं
ʗ१॥	ʗ।	ʗ।

सोनगौ, जैतोजी

ʗ१॥

जोंधळ	तुरी	गहूं
ʗ१	ʗ।	ʗ।

काजोसी, ळखमोजी व जाकोजी

ʗ२

जोंधळ	तुरी	गहूं
ʗ१॥	ʗ।	ʗ।

आळोडी, बाळोजी

ʗ१।

जोंधळ	तुरी	गहूं
ʗ॥।	ʗ।	ʗ।

मौजे राणीगेघार, ढकवणे

ʗ१।

जोंधळ	तुरी	गहूं
ʗ॥।	ʗ।	ʗ।

इंदवडी, माळोजी माळी

ʗ१।

जोंधळ	तुरी	गहूं
ʗ॥।	ʗ।	ʗ।

बाह्मणवाडी, कान्हो पाटेलु

८३

जोझळ	तुरी	गहू
८२	८॥	८॥

सनपनें, भाळेघरा बावाजी

८२॥

जोझळ	तुरी	गहू
८१॥	८॥	८॥

भोगवडी, राणोजी

८१।

जोझळ	तुरी	गहू
८॥।	८।	८।

साईघर, बाणुवाडा

८१

जोझळ	तुरी	गहू
८॥	८।	८।

पानई, खेळोजी गुंजर

८२

जोझळ	तुरी	गहू
८१॥	८।	८।

आहागणी, गाउडा हरी

८१।

जोझळ	तुरी	गहू
८॥।	८।	८।

अन्याडें, प्रसोजी

८३

जोझळ	गहू	तुरी
८२	८॥	८॥

आहेघर, वेदुळा

८१॥

जोझळ	तुरी	गहू
८१	८।	८।

भाळेघर, हरि पाटेलु

८१

जोझळ	तुरी	गहू
८॥	८।	८।

बातिगघर, गोळी भाई पाटेलु

८१

जोझळ	तुरी	गहू
८॥	८।	८।

वीवर, रकदेऊ

८१

जोझळ	तुरी	गहू
८॥	८।	८।

रोहीघर, सोनोजी

८१॥

जोझळ	तुरी	गहू
८१	८।	८।

काठवडी, भीउजी बोळ्ये

८१॥

जोंधळ	तुरी	गहू
८१	८।	८।

वाहागौ, मुधोजी

८१॥

जोंधळ	तुरी	गहू
८१	८।	८।

बारा मुऱ्हें, बाबूजी

८।

जोंधळ	तुरी	गहू
८८	८८=	८८=

पिपळी, तेटळा नगोजी

८१।

जोंधळ	तुरी	गहू
८॥।	८।	८।

बहुगौ, कळोजी बादकु

८३

जोंधळ	तुरी	गहू
८२	८॥	८॥

सेतें, गोईसेटी

८१॥

जोंधळ	तुरी	गहू
८१	८।	८।

राजाणी, जाउजी

८१॥

जोंधळ	तुरी	गहू
८१	८।	८।

माहुतर्डा, कानो पाटेलु

८१॥

जोंधळ	तुरी	गहू
८१	८।	८।

दापोडी, जानोजी हेवा

८१।

जोंधळ	तुरी	गहू
८॥।	८।	८।

वाळुनु, पोफळिया कुक पाटेलु

८३

जोंधळ	तुरी	गहू
८२	८॥	८॥

सोदनवाडी, आंबोजी

८२॥

जोंधळ	तुरी	गहू
८१॥	८॥	८॥

खैसवें, दानो पाटेलु

८२॥

जोंधळ	तुरी	गहू
८१॥	८॥	८॥

खरसी खुा, गाउडा	सरतळें, जगो पाटेलु
८२	८३

जोझळ	तुरी	गहू	जोंधळ	तुरी	गहू
८१	८॥	८॥	८२	८॥	८॥

ह्या लेखांत प्लव संवत्सराला प्लवंग ह्मटलें आहे. ही केवळ लेखकाची चूक आहे. लहान शब्दापेक्षां मोठा शब्द योजणें जास्त प्रौढ दिसतें अशा भ्रमानें ही चूक झाली आहे. ह्या लेखांत १ मौजे, २ व, ३ वा, ४ कसबे, ५ बितपसिल, ६ गल्ला, ७ कैली हे सात शब्द फारशी आहेत. षा हा शब्द व च्या बद्दल योजिला आहे. पाटेलु, बितपसीलु, सकु वगैरे शब्द ज्ञानेश्वरींतील उकारांत शब्दासारखे आहेत. ह्या पत्रांतील भाषेपेक्षां एकनाथाच्या भाषेंत उकारांत शब्द कमी व रामदास वगैरे पेष्तर ग्रंथकारांच्या ग्रंथांत तर त्याहून कमी येतात. ह्या पत्रापेक्षां इ० स० १५५८ तील खालील पत्रांत फारशी शब्द जास्त आहेत.

श्री.

स्वस्ति श्री (स) के १४७९ पिंगळ संवत्सरे माघु सुधु त्रयोदसि वारु मंगळु तर्दानी प्रीतीपत्र इनाम लिहिलें. लीखीते चांगो पाठीलु बीन गोंध पाटैलु मोकदम, व काळशेठी बीन रामसेटी गुठाकु चौगुळा, व एळबो पाटेलु सुपगुडा बीन परसा पाटेलु, खेळ पाटेलु बीन राघो पाटेलु जें लेकरूं, बाचसेठी बीन एकसेठी विगोवी, आपो पाटेलु बीन याको पाटेलु सुपगुडा, हीरो पाटेलु बीन भोया पाटेलु हागवणा, कुलुम सेठी बीन हरी सेठी काळोखा, कोयाजी बीन आल्होजी मोरीया, जान पाटेलु जाधव, व काळो पाटेलु सुपडा, व माद सेठी सेठिया, व वणगो माळी मेहतरी व चांगो मेहतरी साळी व समस्त मुजेरी प्रजा व बाजे मोहतर्फा व बलुते व आडाण मौजे निंब पा। वाई आत्मसुखें सदानंद गोसावी याचे सेवेस प्रीतीपत्र इनाम लिहूनु दिल्हें ऐसें जे, निमे चावराचा फाळा व पायपोसी व कारकुनु सारा व दमामा व उढभादा व तकदम सारा व बाजे नकददाती षीा।

ऐनू आवटु व साणेपाळु

व बीजे फरी व वेसळी व गांवखंडी व पाणीपासोडी वा तकसीमा ११ बाद ता। ३ बीा। दळें, आवाडी, फसोटे. बाकी तकसीम ८ तालुके, रयानी ८ बीा। ता। सुतळी, पान, मद, लोह, गवतकडबी, सीरडीचक्र ा, व आगतनिर्गत, वेठीवजे, सीवचिन्हाड दिल्हे आहे. हें पारंपार चालवूनु लेकुरांचा लेकुरीं आवळादी व आफळादी चालऊन हें सत्य. यास जो चुके तो सदानंद गोसाव्याचा द्रोही. चंद्रसूर्यो तपे तवबरी रवरवीं पचे. हा नीमु करुनु समर्पिलें. हें कार्या वाचामा जए सत्य.

ह्या इ. स. १५९० च्या सुमारच्या दोन लेखांत फारशी शब्द बरेच आहेत. परंतु दियानतरावाच्या पत्रांतल्याप्रमाणें मराठी प्रयोग फारशी प्रयोगांच्या धर्तीवर केले नाहींत. चुके, तपे, पचे, समर्पिलें, करुनु, वगैरे क्रियापदांचे प्रयोग शुद्ध जुने मराठी आहेत. वणगो, चांगो, आपो, हीरो, माघु, सकु, वारु, मंगळु, पाटेलु, वगैरे नामेंहि जुन्या मराठींतल्याप्रमाणें ओकारान्त व उकारान्त आहेत. इतकेंच नव्हे तर बीतपसीलु, ऐनु, कारकुनु वगैरे फारशी शब्द देखील उकारान्तच योजिले आहेत. हा लेख लिहिणाऱ्यांना फारशी येत नसल्यामुळें, व्यवहारांत रूढ झालेल्या फारशी शब्दांखेरीज जास्त फारशी शब्द किंवा प्रयोग त्यांनीं योजिले नाहींत हें उघड आहे. मराठीचें जुनें रूप ह्या दोन लेखांत बरेंच पहावयास सांपडतें.

इ. स. १५९० च्या अगोदरचे ह्मणजे इ. स. १४९९, १४७१, १४१६ वगैरे सालांतीलहि दरबारी फारशी-मराठी लेखांत फारशी शब्द बरेच आढळतात. जेथें जेथें ह्मणून मुसुलमानांचें राज्य कायम झालें होतें तेथें तेथें दरबारांतील सर्व मराठी लिहिण्यांत फारशी शब्दांचा भरणा विशेष असे. दरबारापासून दूर अशा गांवीं व सरकारी अधिकाऱ्यांचा जेथें संबंध नाहीं अशा गांवकीच्या किंवा धर्माच्या किंवा गोतकीच्या खटल्यांत जे कागदपत्र होत त्यांत फारशी शब्दांची संख्या कमी असे. परंतु त्यांतहि फारशी शब्द बिलकुल नसत अशी मात्र

गोष्ट नव्हती. इ. स. १४१६ च्या सुमारास मुसुलमानांचें राज्य महाराष्ट्रांत होऊन बराबर ९८ वर्षें झालीं होतीं व मुसुलमानी भाषेचा देशांत इतका प्रचंड संचार झाला होता कीं दरबारापासून अलिप्त राहणाऱ्या मनुष्याच्याहि बोलण्यांत व लिहिण्यांत फारशी शब्द नकळत येत. आतां मराठीचें बिनफारशी असें निर्मळ शुद्धरूप पाहिजे असल्यास, जेथें मुसुलमानांचा अंमल भासला नव्हता तेथील लेख पाहिले पाहिजेत. मुसुलमानांचा अंमल नव्हता असे इ. स. १४१६ च्या सुमारास नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत व पश्चिमसमुद्रापासून पूर्वसमुद्रापर्यंत महाराष्ट्रांत दहा पांच प्रांत होते. इ० स० १४०० च्या सुमारास उत्तर व दक्षिण कोकणांत राणे, दाणे, शिर्के, सावंत, वगैरे कांहीं मराठे स्वतंत्र राहिले होते. त्यांच्यापैकीं सावंत ह्यांच्या राज्यांतील एका गांवीं असलेला एक लेख देतों. वेंगुर्ल्यापासून चार मैलांवर मठ म्हणून एक गांव आहे. तेथें वाडीच्या सावंतांच्या पूर्वजांचीं देवळें आहेत. त्या देवळांतील देवाच्या प्रभावळीवर शके १३१९ त लिहिलेले तीन मराठी लेख आहेत. पैकीं एक लेख येणेप्रमाणें :—

स्वस्ति श्री सालीवान सकु कु १३१९ वरीसे चीत्रभानु संवत्सर आदीक बाहुळ ३ गुरुवारी चांदगडाङ्कुजीपती नऱ्यसी देवाचा दळवै यानें याचा पीता माम सावंतु तदोद्दीसी उपभोगासी देण वीडा धुणा तेला द्रेया उपभोगासी दत्त रौप्य टांके १४ आखेरतोपी टांके चौदा उपभोगासी देउळाच्य कामाया वेचू द्राम १९०० दळवैपणोचे जाले दीनु अर्थे एलंधर याची ला दीनु नीची वेचू द्राम १००० आखेरतोपी सासु उफरासी माम सावता वेळाचा दळवै यदोद्दीसी भूमी भऱ्यया २ महायी मेव ओंयू व्ययी मेरं नेयी मेर सडे खर्डाचे यी मेर आंभऱ्ययी.

ह्या लेखांत शके १३१९ ला चित्रभानु संवत्सर दिला आहे तो वर्तमान असून बार्हस्पत्य संवत्सरपद्धतीचा आहे. ह्या संवत्सराला अधिक मास पंचांगांत नाहीं. परंतु पुढील सुभानु संवत्सराला ज्येष्ठ अधिक आहे. तो अधिक

कदाचित् त्यावेळच्या कोंकणांतील ज्योतिषांनी चित्रभानु संवत्सराला आणिला असल्यास न कळे. मूळ लेखांतील शक कदाचित् १३१७ असाही वाचतां येईल. परंतु १३१७ ला विक्रम संवत्सर असून चित्रभानु नाहीं. लेखांतील संवत्सर कांहीं असो, साल १३१७ किंवा १३१९ ह्यापैकीं कोणतें तरी एक आहे ह्यांत संशय नाहीं. प्रस्तुत प्रसंगीं कालनिर्णयापेक्षां भाषा-स्वरूपाकडे विशेष लक्ष असल्यामुळें इ. स. १३९५ किंवा १३९७ च्या सुमारास मराठी भाषेचें स्वरूप काय होतें तें पहावयाचें आहे. ह्या लेखा-तील अक्षरें जाधवांच्या तेराव्या शतकांतील अक्षरांसारखीं आहेत. ह्या लेखांत सकु, सावंतु, दीलु, हे शब्द जुने मराठी धर्तीचे आहेत. दळवै [सेनापति], आखर [अक्षर], टाक, द्राम, वरीसें, हेहि शब्द जुने मराठी आहेत. ह्या लेखांत फारशी शब्द किंवा प्रयोग एकहि नाहीं. ह्यावरून शके १३१९ त ह्मणजे इ. स. १३९७ त दक्षिण कोंकणांत सावंतांच्या राज्यांत शुद्ध मराठी भाषा चालत होती असें दिसतें. आतां ह्या इ. स. १३९७ च्याहि मागें जाऊन इ. स. १३९६ तील एक मराठी लेख देतों. पूर्वीं पर्शरामपंडितकृत पर्शरामोपदेश नांवाच्या ग्रंथाचा उल्लेख केला होता. ह्या ग्रंथाच्या शेवटीं खालील मराठी वाक्यें आहेतः—

गत तिथि दुणा ॥
वारु चतुर्गुणा ॥
नक्षत्र मेळविजे ॥
ध्रुवक ४ मेळविजे ॥
तिंहिं भागु ॥
उरलेये शेषे लोह पाहिजे ॥
एकें जल ॥
दाहे स्थल ॥
शून्य आकाश ॥
स्थली साचली ॥

जळीं आडाउ ॥
आकाशीं सावळीये ॥
आडाउ तीर दार ॥
हे जयेति ॥
आड वार ॥
आदित्या पासौनु ॥
नक्षत्रें ९ उत्तमें ॥
दाहावें मध्यम ॥
तयापुढील २ उत्तमें ॥
वरिला तिंहिं खेळु पाडुं १७ उत्तमें ॥
वीसा ठायीं च लोह निर्वचैल ॥
२२॥ लोह होईल ॥
पूर्ण यश पाविजैल ॥
हातीयेरें सांडिती ॥
पळ होईल ॥
आदित्यवारी ॥
शनिवारी ॥
वृषभ, कन्या, मकर, मिथुन, तूळ, कुंभ हे खोचिति ॥
सोमवारिं, बृहस्पतवारिं मिथुन, तूळ कुंभा पडती ॥
कर्क, वृश्चिक, मीन हे खोंचती ॥
मंगळवारीं ॥
शुक्रवारीं ॥
कर्क, वृश्चिक, मीनु, धनु, सिंहु, मेषु हे सा ६ राशी मरती ॥
वृषभकन्यामकरु हे खोंचती ॥
बुधवारिं वृषभ, कन्या, मकर पडती ॥
मिथुन, तूळ, कुंभ हे खोंचती ॥
तिथिवारु जे दिशे यात्रा किजे ॥
ते दिशा येकत्र किजे ॥

तिंहिं भागु दिजे ॥
उरे शेष तो धृवक राशीचें जीव-- नक्षत्र ॥
२ ने गुणिजे ॥
ध्रुवक मेळविजे ॥
तिंहिं भागु दिजे ॥
शेष उरे तो ग्रहो जाणिजे ॥
जयाचे राशीवरि बुध, गुरु बैसती तिये राशिचेयांकरवी ॥
यात्रा कर्विजे ॥
दुर्गयात्रा बुध जया विये ॥
राशीवरि बैसे ॥
तया कर्वि कर्विजे ॥
आउ । नि । पू । वा । द । ई । प ।
सूर्योदयाचीये ठाउनु येणे क्रमें चौ घडिये भ्रमण जाणावें ॥
जयाचिये पाठि पडे तो जयो पावे ॥ ६ ॥
इति श्रीभूपाळवल्लभः ॥ समाप्तिमुपागमत् ॥

ह्या उताऱ्यांतील सर्व वाक्यें शुद्ध बावनकशी जुनीं मराठीं आहेत व त्यांना फारशीचा बिलकुल गंध नाहीं. ह्या वाक्यांची भाषा बहुतेक हुबेहुब ज्ञानेश्वरींतील भाषेसारखी आहे. बहुतेक ह्मणण्याचें कारण असें कीं इ. स. १२९० त लिहिलेल्या ज्ञानेश्वरीच्या भाषेंत व इ. स. १३९६ त लिहिलेल्या ह्या वाक्यांच्या भाषेंत साठ वर्षांचा अवधि गेल्यामुळें किंचित् फरक पडणें साहजिक आहे. तयापुढील व जयाचिये हे जे दोन शब्द ह्या वाक्यांत आले आहेत त्यांचीं ज्ञानेश्वरींत तेयापुढील व जेयाचिये अशीं रूपें सापडतात. तेयापुढील व जेयाचिये हीं रूपें एकनाथस्वामीनें शुद्ध केलेल्या प्रतीवरून झालेल्या लेखी किंवा छापील ज्ञानेश्वरींत सापडावयाचीं नाहींत. हीं रूपें एकनाथस्वामीच्या पूर्वीच्या ज्ञानेश्वरीच्या प्रतींत सांपडतात. बालेघाटावरील बीड शहरीं पाटांगण नांवाचें एक देवस्थान आहे, तेथील दफ्तर तपाशीत असतां

एकनाथस्वामीच्या पूर्वींची एक ज्ञानेश्वरीची प्रत मला मिळाली. कुंट्यांनीं छापिलेल्या ज्ञानेश्वरीतल्यापेक्षां ह्या ज्ञानेश्वरींत ओव्यांची संख्या बरीच कमी असून, हींतील भाषाहि कुंट्यांच्या प्रतींतल्याहून जुनी आहे. शिवाय, ह्या पाटांगणातील प्रतींतील अक्षरें तेराव्या किंवा चवदाव्या शतकांतील महाराष्ट्रांतील ताम्रपटांवरील अक्षरांसारखीं आहेत. वरील लेखांशीं ताडून पहाण्याकरितां व ज्ञानेश्वरीची मूळ खरी भाषा काय होती तें दाखविण्याकरितां ह्या प्रतींतील निरनिराळ्या प्रयोगांच्या ओव्या देतों.

(१) मातियेचा वीटु । घेउनि काइ करी घटु ।
केउते तांथू पटु । सांडतील ते ॥
अध्याय १८, श्लोक ११, ओवी १७.

(२) तैसा शरीराचेनि आभासे । नांदतु जवं असे ।
तवं कर्मत्यागाचें पिसें । काइसें तऱ्हीं ॥
अध्याय १८, श्लोक ११, ओ० २०.

(३) ऐसें व्यापक ज्ञान भलें । जेयांचेया ऱ्हृदया आलें ।
तेयांची समदृष्टि बोले । विशेषू काई ॥
अ० ५, श्लो० १६, ओ० ८७.

(४) मग मशकु हा गजु । कां श्वपचु हा द्विजु ।
पैल इतरु हा आत्मजु । हें उरैल कें ॥
अ. ५, श्लो. १८, ओ. ९२.

(५) जरि विषइं विषयो सांडिजैल । तरि महादोषिं कें वसिजैल ।
आणि हा संसारशब्दु नव्हैल । लटका जगीं ॥
अ. ५, श्लोक २२, ओ. २२.

(६) हे अष्टधा भिन्न कैसी । ऐसा ध्वनि धरिसी मानसीं ।
तरि तेंचि आतां परिसैं । विवंचना ॥
अ. ७, श्लो. ४, ओ. १७.

(७) किं तो पार्थु मनीं । आझुइं धणि न मनीं ।
अधिकाअधिक उतान्हीं । वाढवितु असे ॥

अ. १३, श्लो. ३४, ओ. ११३१.

(८) हे बहु असो. पंडितु । धरूनु बाळकाचा हातु ॥

अ. १३, श्लो. ७, ओ. २०७.

(९) नाहीं माझेनि पाडें वाडु । मी चि सर्वज्ञु एकु रूढु ।
ऐसा शिवमुष्टिगंडु । घेउनु ठाके ॥

अ. १३, श्लो. ११, ओ. ७०७.

(१०) रसु न्हव्हावा अतिमात्रु । हा घेता सिकेवि मंत्रु ।
तरि अवंतुनु शत्रु । कारितासि गा ! ॥

अ. १३, श्लो. ११, ओ. ६२९.

(११) किंबहुना पूंसा । पांजरेयामाझि जैसा ।
वेदाझेसि तैसा । भिउनु असे ॥

अ० १३, श्लो० ९, ओ० ९८८.

(१२) ह्मणे पूयगर्ते रिगाला । मूत्र-रंध्रौनि निघाला ।
कटारे मिया चाटिला । कुचस्वेदु ॥

अ० १३, श्लो० ८, ओ० ९३८.

(१३) तिये कडौनु येतु वारा । देखौनु धावे सामोरा ।
आडपडे ह्मणे घरा । बीजें कीजे ॥

अ० १३, श्लो० ७, ओ० ३७९.

(१४) ज्ञानदेओ ह्मणे, तुह्मीं । संत वोळगावेति, हें मी ।
पढविला स्वामीं । निवृत्तिनाथें. ॥

अ. १२ श्लो. २०, ओ. २४१.

(१५) तिये गीतेचा कळशु । संपूर्ण हा अष्टादशु ।
ह्मणे निवृत्तिदासु । ज्ञानदेवो ॥

अ. १८, श्लोक ७८, ओ. १७९०.

ह्या ओव्या कुंट्यांच्या प्रतींतील ओव्यांशीं व वर दिलेल्या भूपाळ-वल्लभांतील वाक्यांशीं ताडून पाहतां, बीड येथील पाटांगणांत सांपडलेल्या प्रतींतील ओव्या, नामें, क्रियापदें व शब्दयोगी अव्ययें यांच्यासंबंधानें, कुंट्यांच्या प्रतींतील ओव्यांपेक्षां भूपाळवल्लभांतील वाक्यांशीं जास्त जुळतात. व ही गोष्ट ह्या प्रतीच्या पुराणत्वाच्या सिद्धीला उत्तम प्रमाण आहे. इ. स. १२९० त लिहिलेल्या ज्ञानेश्वरीची भाषा १३२६पासून १३९६ पर्यंत लिहिलेल्या ग्रंथाच्या भाषेप्रमाणें असलीच पाहिजे, इतकेंच नव्हे तर ह्या ग्रंथाच्या भाषेहूनहि ती किंचित् जुनाट असली पाहिजे. उदाहरणार्थ, वर दिलेल्या ओव्यांतील तांथू हा शब्द घ्या. तंतू ह्या संस्कृत शब्दाचें हें जुनें मराठी रूप आहे. तांतू ह्मणजे अनंताचा दोरा, कोळी नांवाच्या प्राण्याच्या जाळ्याचा दोरा, बारीक दोऱ्यासारखे जंत, ह्या अर्थीं मराठींत अद्यापहि वापरतात. तसेंच, बकऱ्याचें आतडें पिरगाटून व वाळवून बनविलेल्या दोराला ह्या तांतूपासून निघालेला तांत शब्द लावतात. तेव्हां ज्ञानेश्वरींत हें जुनें रूप येणेंच रास्त आहे. तसेंच मृत्तिकेचा ह्याबद्दल मातियेचा हें रूप ज्ञानेश्वरींत इष्ट आहे. 'काय' बद्दल काइ हें रूप माझ्या ह्या पाटांगणांतील प्रतींत हमेश सापडतें. केउते तांथू पटु सांडतील ते, ह्या शुद्ध वाक्याच्या ऐवजीं कुंट्यांच्या प्रतींत—केउतें तंतू पट सांडील तो—असें अशुद्ध वाक्य आहे. केउतें ह्यांत मूळ शब्द केउत आहे. केउता, केउतें, केउती हीं ह्या शब्दाचीं तिन्ही लिंगी एकवचनीं रूपें आहेत. केउते, केउतें किंवा केउतीं, केउती हीं तिन्ही लिंगी अनेकवचनीं रूपें आहेत. ह्या वाक्यांत केउतें तंतूचें विशेषण आहे. तंतू पुल्लिंगी असल्यामुळें केउता असें विशेषणाचें रूप पाहिजे होतें. परंतु केउते हें पुल्लिंगीं अनेकवचनी रूप जुन्या प्रतींतून असलेले कुंट्यांच्या प्रतींत तसेंच ठेविलेलें आहे व त्याचा तंतू ह्या पुल्लिंगी एकवचनाशीं संबंध लागेना तेव्हां अनुस्वार देऊन क्रियाविशेषण बनविलें आहे. ते तांथू पटु केउते सांडतील, असा मूळ अन्वय होता. अशीच दुसऱ्या वाक्यांचीहि मीमांसा करतां येईल. परंतु ज्ञानेश्वरींतील भाषेची मीमांसा इतरत्र करण्याचा विचार

असल्या कारणानें येथें तत्संबंधीं विस्तार करीत नाहीं. येथें फक्त कुंट्यांच्या प्रतींत वर दिलेल्या ओव्यांतील कित्येक शब्दांचीं रूपें कशीं आहेत तें दाखवितों.

पाटांगण	कुंटे
नांदतु	नांदत
जवं	जंव
तवं	तंव
तऱ्हीं	तरी
जेयांचेया	जयांचिया
तेयांची	तयांची
बोले	बोलें
विशेषू	विशेषूं
उरैल	उरलें
विषइं	विषयीं
सांडिजैल	सांडिजेल
नव्हैल	नव्हेल
परिसैं	परियेसी
आझुइं	अझुनी
घणि	तृप्ती
वाढवितु	वाढवीत
धरुनु	धरूनि
मूत्ररंध्रौनि	मूत्ररंध्रें
कडौनु	कडोनि
कीजे	कीजो
स्वामीं	स्वामी.

कुंट्यांच्या प्रतींतील चवदावी ओवी तर अत्यंत अशुद्ध आहे. असो. प्रस्तुतचा मुख्य मुद्दा ज्ञानेश्वरींतील जुनी मराठी भाषा कशी

असते हें दाखविण्याचा आहे. ज्ञानेश्वरानें ज्ञानेश्वरी आपल्या वेळच्या मराठींत जशी लिहिली तशी सध्याच्या कोणत्याहि छापील पुस्तकांत ती उपलब्ध नाहीं हें स्पष्ट करण्याच्या हेतूनें—कोणती तरी छापील ज्ञानेश्वरी तुलनेला घ्यावयाचीच होती तेव्हां—कुंट्यांच्या प्रतीचा उल्लेख केला. दुसऱ्या कोणत्याहि छापील प्रतीचा उल्लेख केला असता तरी चाललें असतें. खरी गोष्ट अशी आहे कीं आज सहाशें वर्षे मराठी भाषेचीं जीं निरनिराळीं रूपें होत आहेत त्यांचा ठसा ज्ञानेश्वरीच्या त्या त्या वेळीं झालेल्या प्रतींत गोचर होत आहे. ज्ञानेश्वरींतील भाषा तेराव्या शतकांतील मराठी भाषा होय. एकनाथानें शके १५१२ त ह्मणजे बरावर तीनशें वर्षांनीं ज्ञानेश्वरीची पोथी शुद्ध केली; शुद्ध केली ह्मणजे आपल्या वेळच्या लोकांना समजेल अशी केली. मूळ ज्ञानेश्वरींतील जीं रूपें एकनाथाच्या वेळीं केवळ आर्ष भासूं लागलीं होतीं तीं एकनाथानें बहुशः गाळलीं; व त्याच्या नंतरच्या प्रती करणाऱ्यानीं तर तींत वाटतील ते बदल व अपपाठ घुसडून दिले. ही दशा एकट्या ज्ञानेश्वरीचीच झाली आहे असें नाहीं. चौदाव्या शतकांतला ज्यास आपण सध्यां समजतों त्या नामदेवाच्या अभंगाचीहि हीच व्यवस्था लागलेली आहे. चौदाव्या शतकांतलें मराठी कोणत्या प्रकारचें होतें तें भूपालवल्लभांतील वर दिलेल्या वाक्यांवरून सहज समजण्यासारखें आहे. नामदेवाच्या मूळ अभंगांतील शब्दांचीं रूपें ह्या वाक्यांतील शब्दांच्या रूपासारखीं असलीं पाहिजेत. परंतु सध्याच्या नामदेवाच्या छापील गाथेंतील शब्दांचीं व प्रयोगांचीं रूपें, फार झालें तर, सोळाव्या शतकांतल्या रूपांसारखीं दिसतात. ज्ञानेश्वराचे, सोपानदेवाचे व मुक्ताबाईचे ह्मणून जे अभंग सध्यां प्रचलित आहेत तेहि असेच अर्वाचीन दिसतात. नामदेवानें मराठींत भारत लिहिलें ह्मणून महिपति भक्तविजयाच्या प्रारंभीं ह्मणतो. हें नामदेवाचें भारत मजजवळ आहे व त्याची भाषा सोळाव्या शतकांतील आहे. नामदेवाचे अभंग तोंडीं ह्मणण्याची चाल फार असल्यामुळें त्यांत निरनिराळ्या काळीं ह्मणणाऱ्यांच्या रोजच्या बोलण्याच्या पद्धतीप्रमाणें न कळत बदल होण्याचा संभव आहे. परंतु, ह्या भारताच्या भाषेत

फारसा बदल होण्यासारखा नाहीं. कितीहि फेरबदल झाला तरी तो कोणत्याहि ग्रंथांत इतका होत नाहीं कीं चौदाव्या शतकांतील भाषा सोळाव्या शतकांतील भाषेसारखी हुबेहुब दिसावी. खुद्द ज्ञानेश्वरींतहि फेरफार झालेला आहे. कान्हा, मात्रा, उकाराबद्दल अकार, एकाराबद्दल एकार, ऐयाबद्दल इया, ओकाराबद्दल अकार, असे बरेच बदल ज्ञानेश्वरींत झालेले आहेत. परंतु ज्ञानेश्वरी दासबोधासारखी किंवा एकनाथी रामायणासारखी झालेली नाहीं. ह्यावरून अभंग रचणारे ज्ञानदेव, व नामदेव चौदाव्या शतकांतल्यापेक्षां पंधराव्या शतकाच्या शेवटीं व सोळाव्याच्या प्रारंभीं झाले असावे असा तर्क करावा लागतो. ह्या तर्काला तीन साधे पुरावे देतों. (१) ज्ञानेश्वरींत फारशी शब्द एकहि नाहीं; नामदेवाच्या गाथ्यांत बरेच आहेत. (२) ज्ञानेश्वरींत चतुर्थीचा किंवा द्वितीयेचा ला प्रत्यय बिलकुल नाहीं; नामदेवाच्या गाथ्यांत आहे. हा ला प्रत्यय फारशी द्वितीयेचा प्रत्यय जो रा त्यापासून आलेला आहे. (३) ज्ञानेश्वरींत व हें उभयान्वयी अव्यय नाहीं; नामदेवाच्या गाथ्यांत आहे. भिंगारकरांनीं आपल्या ज्ञानेश्वरीवरील लेखांत निशाण वगैरे शब्द फारशी आहेत असें म्हटलें आहे. पण तसा प्रकार नाहीं. हे सर्व शब्द अस्सल जुने मराठी आहेत.

असो. इ० स० १५४१ च्या व १४१६ च्या लेखांत फारशी शब्द सांपडतात. ह्या साळांच्या पाठीमागें वीस पंचवीस वर्षें गेलें म्हणजे सांवतांच्या राज्यांतील इ० स० १३९७ तील लेखांत, पर्शरामोपदेशांतील १३५६ तील लेखांत व १२९० तील ज्ञानेश्वरींत एकहि फारशी शब्द सांपडत नाहीं. येणेप्रमाणें, शिवाजीच्या वेळच्या दरबारी लेखांतील भाषेचें परीक्षण करतां करतां तींत फारशी शब्द व प्रयोग कसे व केव्हांपासून आले ह्या गोष्टीचा शोध लावण्याच्या मिषानें आपण ज्ञानेश्वरीपर्यंत येऊन ठेपलों. मराठी भाषेच्या शब्दरचनेंत व वाक्यरचनेंत फारशी भाषेचें कार्य कोणतें, हा प्रस्तुत विवेचनाचा विषय असल्यामुळें, ज्ञानेश्वरीच्या पलीकडे आपल्याला जाण्याची जरूर नाहीं. महाराष्ट्रीपासून ज्ञानेश्व-

राच्या वेळची मराठी कशी निघाली, ह्या प्रकरणाचा विचार प्रस्तुत कर्तव्य असता तर इ. स. सातशेपासून तेराशेपर्यंतचे मराठी लेख पहाणें जरूर होतें. ज्ञानेश्वरानें ज्याअर्थी मराठींत एवढा मोठा ग्रंथ १२९० त लिहिला त्याअर्थीं त्याच्यापूर्वीं मराठींत कांहीं तरी ग्रंथरचना झाली असली पाहिजे हें उघड आहे. विवेकसिंधु व विवेकामृत, असे दोन शब्द ज्ञानेश्वरींत सहजासहजी आलेले आहेत. त्यावरून मुकुंदराज ज्ञानेश्वराच्या समकालीन किंवा किंचित् अगोदर झाला असावा असें वाटतें. विवेकसिंधूच्या सध्याच्या ज्या छापील प्रती आहेत त्या जोगाईच्या आंब्यास असणाऱ्या दुर्बोध मूळप्रतीवरून साक्षात् केलेल्या नसून, विवेकसिंधूची वाचतां येण्यासारखी व अर्थात् अर्वाचीन लोकांस समजण्यासारखी दुसरी एक प्रत आंब्यास आहे तीवरून केलेल्या आहेत असें सांगतात. विवेकसिंधूखेरीज ज्ञानेश्वरापूर्वीं मराठींत दुसरी ग्रंथरचना झाली होती हें सिद्ध करण्यास एक साधन आहे. ज्ञानेश्वरानें निवृत्तिनाथ, गयणीनाथ, गोरखनाथ, मछेंद्रनाथ अशी आपली गुरुपरंपरा दिली आहे. पैकीं गोरखनाथाचीं गोरखमत ह्या मथळ्याखालीं कांहीं वाक्यें कित्येक पंचांगांत देत असतात. गोरखनाथाची एक शकुनवंतीहि प्रसिद्ध आहे. प्रत्येक गुरुशिष्यांत २९ वर्षांचें अंतर धरल्यास गोरखनाथ इ. स. ११००च्या सुमारास असावा असें होतें. ह्या ११०० च्या शंभर दीडशे वर्षें अगोदरचे मराठी ग्रंथ म्हटले म्हणजे मानभावांचे गुप्तलिपींत लिहिलेले कांहीं जुने ग्रंथ होत. मानभावी जुने ग्रंथ जसेचे तसे छापून बाहेर पडल्याशिवाय ज्ञानेश्वराच्या पूर्वींच्या मराठीसंबंधानें विशेष कांहीं लिहितां येणार नाहीं. मानभावांच्या अगोदर मराठींत कांहीं ग्रंथ होते कीं नव्हते वगैरे विधान करण्यास प्रस्तुत लेखकाला कांहींच आधार माहीत नाहीं.

शिवाजीच्या वेळेपासून ज्ञानेश्वराच्या वेळेपर्यंतचे जे हे लेख दिले त्यांपासून (१) १२९० पर्यंत सर्व महाराष्ट्रांत, व १३९९ पर्यंत, कदाचित् पुढेंहि कांहीं काळापावेतों, महाराष्ट्राच्या ज्या भागांत स्वराज्य होतें तेथें, शुद्ध निर्भेळ मराठी भाषा बोलण्यांत व लिहिण्यांत येत असे;

(२) १२९० पासून १६५६ पर्यंत, म्हणजे शिवाजीचा अंमल सुरू होईपर्यंत, फारशी शब्दांचें मराठींत प्राधान्य होतें; (३) १६५६ पासून १७२८ पर्यंत फारशी शब्द जलदीनें कमी होत गेले; आणि त्यापुढें (४) १७२८ पासून १८१८ पर्यंत मुसुलमान संस्थानांशीं झालेला पत्रव्यवहार व सरकारी दफ्तर ह्यांखेरीज इतरत्र फारशी शब्द फारसे उपयोगांत नव्हते; असे चार सिद्धान्त निष्पन्न झाले. पैकीं फारशीचा अप्रतिहत प्रवेश मराठी भाषेंत १२९० पासून १६५६ पर्यंतच्या काळांत जारीनें झाला. इ. स. १२९० पासून १३१८ पर्यंत महाराष्ट्रांत यादवांचेंच राज्य असल्यामुळें, फारशीचा प्रवेश मराठींत कांहींच झाला नसावा. १३१८ पासून मुसुलमानांकडे राज्याचीं सूत्रें गेल्यावर मात्र फारशी शब्द मराठींत येण्यास सुरुवात झाली. आणि ह्या आगमनाची अखेर इ. स. १६५६ त झाली. म्हणजे सुमारें ३३८ वर्षें फारशीचें मराठीला निकट सान्निध्य होतें. ह्या सान्निध्याच्या कचाटींत मराठी भाषेची हालहवाल कशी काय होती त्याचा वृत्तांत पुढें देतों.

इ. स. १३१८ पासून १३४७ पर्यंत महाराष्ट्राचा कारभार दिल्लीहून होत असे. १३४७ त दिल्लीशीं संबंध तोडून हसंग गांगो ब्राह्मणीनें दक्षिणेंत ब्राह्मणीराज्य स्थापन केलें तें इ. स. १४९२ पर्यंत बेदरास, १४८४ पर्यंत वऱ्हाडांत, १४८९ पर्यंत अहंमदनगरास, १४८९ पर्यंत विजापुरास, व १५१२ पर्यंत गोवळकोंड्यास चालू होतें. ह्या सालांनंतर दक्षिणेंत बरीदशाही, इमादशाही, निजामशाही, आदिलशाही व कुत्बशाही अशा निरनिराळ्या शाह्या १६५६, १५७२, १६३७, १६८६ व १६८७ पर्यंत अनुक्रमें चालिल्या. ह्या सालांनंतर किंवा ह्या सालांच्या सुमारास मराठ्यांनीं सर्व महाराष्ट्र आक्रमिण्याचा प्रयत्न केला. इ. स. १४५० च्या सुमारास खानदेशच्या बाऱ्यांत निकम, टाण्यास बिंबदेव राणे याचे वंशज, कोळवणांत कोळी, रामनगरास राणे, सोनगड व रायरी प्रांतांत तेथील राजे, शिरकाणांत शिरके, खेळण्यास शंकरदेव, वाडीस सावंत, बेळगावास

वर्णराज, मोरगिरीस मोऱ्य, असे अनेक लहान लहान मराठे संस्थानिक स्वतंत्रपणें राज्य करीत होते. ह्या लहान लहान संस्थानांत १४९० पर्यंत अस्सल मराठीचाच प्रचार असे. हे प्रांत सोडून बाकीच्या महाराष्ट्रांत फारशी शब्दांचा प्रचार अतोनात झाला. १४९० नंतर हीं लहान राज्यें समूळ नष्ट झालीं किंवा ब्राह्मणी पातशाहांच्या अंकित झालीं तेव्हांपासून शिवाजी स्वराज्यस्थापन करी तोंपर्यंत महाराष्ट्रांत सर्वत्र फारशी शब्दांचा प्रचार होता. येणेप्रमाणें काळ व स्थळ ह्यासंबंधानें फारशी शब्दांची व्याप्ति मराठींत व महाराष्ट्रांत कशी होत गेली त्याची हकीकत आहे.

आतां मराठींत कोणत्या प्रकारचे फारशी शब्द विशेष शिरले तें पाहूं. ब्राह्मणी राज्याच्या पहिल्या अमदानींत महाराष्ट्रांत मुसुलमान सरासरी एक लाखापेक्षां जास्त नसावे. देशांत शांतता राखण्याकरितां आणिलेलें सैन्य बहुतेक मुसुलमानांचेंच होतें. तसेंच काजी, मुन्सफ, कमावीसदार, दिवाण वगैरे दरबारी, मुलकी व दिवाणी हुद्देदार मुसुलमानच होते. शिवाय कांहीं निरनिराळ्या धंद्यांचे ह्मणजे तबीबी, सराफी, मुजावरी, वगैरे धंद्यांचेहि लोक मुसुलमानच होते. अशी ही मुसुलमानांची छावणी देशांतील राज्यकारभार चालविण्यास, शांतता ठेवण्यास व स्वकीयांच्या लहान मोठ्या गरजा भागविण्यास एक लाखा-पेक्षां फारशी जास्त नसावी.

ह्या एक लाख लोकांपैकीं सत्तर ऐंशी हजार आडमुठे शिपाई व खालच्या दर्जाचे सेवक वगळले ह्मणजे बाकी राहिलेले जे वीस पंचवीस हजार वरिष्ठ प्रतीचे संभावित मुसुलमान त्यांना महाराष्ट्रांत राज्य चाल-वावयाचें होतें. राज्य चालवावयाचें ह्मणजे जमीन व धंदे ह्यांच्यावरील कर गोळा करावयाचा, आणि तत्प्रीत्यर्थ न्याय द्यावयाचा व बंदोबस्त ठेवा-वयाचा होता. न्याय देणें व बंदोबस्त ठेवणें हीं दोन कामें कर उक-ळण्याच्या मुख्य कृत्याला केवळ आनुषंगिक होतीं. ह्या कर गोळा कर-ण्याच्या कृत्याशिवाय दुसरें मोठें कृत्य जें मुसुलमानांना करावयाचें होतें

व जें आपल्या येण्याचें तें मुख्य कारण सांगत—तें हिंदुलोकांना बाटविण्याचें होतें. ह्या व्यतिरिक्त तिसरें काम ह्या म्लेच्छ लोकांना कोणतेंच कर्तव्य नव्हतें. वस्तुस्थिति अशी होती कीं, त्यावेळच्या हिंदुलोकांची संस्कृति मुसुलमान लोकांच्या संस्कृतीहून श्रेष्ठ होती. मुसुलमान लोकांना माहीत नव्हते असे धंदे, कला, शास्त्रें, विद्या ह्या देशांत अनेक होत्या. आचारानें ह्या देशांतील लोक मुसुलमानांपेक्षां स्वच्छ व श्रेष्ठ होते. तर्कशास्त्र, ज्योतिषविद्या, वेदान्त, वगैरे विचाराच्या प्रदेशांतहि मुसुलमानांच्या वर मराठ्यांची कडी होती. फलज्योतिषावर मराठ्यांचा जितका विश्वास होता तितकाच मुसुलमानांचाहि होता. एका मात्र बाबींत मराठ्यांचा मोठा कमीपणा होता. यादवांच्या अमदानींत ह्मणजे इसवीच्या तेराव्या शतकाच्या उत्तरार्धांत मराठ्यांचें सर्व लक्ष परमार्थाच्या नांवावर, ऐहिक उपभोग घेण्याकडे लागलें होतें. तेराव्या शतकांतील अत्यंत मोठा असा मानिलेला ग्रंथ ह्मटला ह्मणजे हेमाद्रीचा चतुर्वर्गचिंतामणि हा होय. ह्या ग्रंथांत दर दिवसाला व दर तिथीला दहा दहा पांच पांच व्रतें सांगितलीं आहेत व त्या त्या व्रताला कोणत्या देवाची कोणतें पक्वान्न करून व किती ब्राह्मण घालून प्रीति संपादन करावी ह्याचा, स्मृति, श्रुति, व पुराणें ह्यांतून उतारे देऊन, गंभीरपणें निर्णय केला आहे. हेमाद्रीच्या व्रतखंडावरून पहातां वर्षाच्या ३६५ दिवसांचीं एकंदर २००० व्रतें व्हावीं असा अंदाज होतो. लोकांचीं व्रतें करण्याकडे, ब्राह्मणभोजनें घालण्याकडे, पक्वान्नें खाण्याकडे व तद्द्वारा मोक्ष मिळतो अशा मतांकडे अतोनात प्रवृत्ति असल्याविना हेमाद्रीनें हीं व्रतें, केवळ पांडित्य दाखविण्याकरितां किंवा करमणूक करण्याकरितां, सांगितलीं असतील हें संभवत नाहीं. तेव्हां व्रतें करणें व पक्वान्नें खाणें ह्या दोन गोष्टी लोकांच्या आंगवळणी त्याकालीं फार पडल्या होत्या हें निश्चित आहे. पक्वान्न आणि व्रत ह्यांची फारकत हेमाद्रीनें एकाहि ठिकाणीं केली नाहीं. एवढीं दोन हजार व्रतें ज्या ग्रंथांत सांगितलीं आहेत असा पृथ्वीवरील दुसऱ्या कोणत्याही भाषेंत कोणत्याहि कालीं एकहि ग्रंथ अद्यापपर्यंत निर्माण झाला नाहीं! व्रतें करण्याकडे ज्याअर्थी महाराष्ट्रांतील

लोकांनी तेराव्या शतकांत एवढी बेमुमार प्रवृत्ति झाली होती त्याअर्थी त्यापासून दोनच अनुमानें स्थूलमानानें काढणें रास्त आहे. एक, लोकांजवळ पैसा अतोनात झाला होता, व दुसरें, व्रतांप्रीत्यर्थ खर्चिण्यास लोकांजवळ मुबलक वेळ होता. ह्या दुसऱ्या अनुमानाचा अर्थ असा होतो कीं राष्ट्रांतील मुख्यवस्तू लोकांना व त्यांचें लहान प्रमाणावर अनुकरण करणाऱ्यांना कष्टप्रचुर असे मर्दुमकीचे, यातायातीचे, मेहनतीचे, छप्करी व इतर धंदे करण्यास फुरसत नव्हती. अशी वस्तुस्थिति असल्यावर, ह्मणजे परशत्रूपासून व अंतःशत्रूंपासून संरक्षण होण्यास कराव्या लागणाऱ्या मेहनतीपासून लोक परावृत्त झाल्यावर आणि अशा व्रतैकदृष्टि किंवा सुखैकदृष्टि लोकांच्या हातीं मुबलक पैसा असल्यावर, त्यांच्याकडे बुभुक्षु, मेहनती, साहसी, व निर्धन अशा लोकांचें लक्ष जावें ह्यांत अजब असें कांहींच नाहीं. ही अशी वस्तुस्थिति नसती, तर संस्कृतीनें कोणत्याहि प्रकारें श्रेष्ठ नसणाऱ्या मुसुलमानांना त्यावेळीं मराठ्यांना जिंकतांच आलें नसतें. मराठे जातीचे शूर नव्हते अशीहि स्थिति नव्हती. मराठ्यांच्याकडून माळव्यापासून रामेश्वरापर्यंतचे प्रांत इ० स० १२४०च्या सुमाराला सिंघणानें जिंकविले. सतराव्या शतकांत जसा शिवाजी तसा तेराव्या शतकांत हा सिंघण झाला. सिंघणाला मरून ५० वर्षे झालीं नाहींत, तों मुसुलमानांच्याकडून मराठ्यांचा पराजय होतो. अर्थात् हा असा चमत्कार होण्यास मराठ्यांच्या शीलांत व चालीरितींत कांहीं विलक्षण फरक पडला असला पाहिजे. हा फरक कोणता तें हेमाद्रीच्या व्रतखंडावरून स्पष्ट ओळखतां येतें. सिंघणादि वीरांच्या विजयानें लोक अत्यंत धनसंपन्न होऊन, व्रतें, उद्यापनें करण्याच्या मिषानें सुखैकपरायण व विलासनिमग्न झाले. मराठ्यांच्यापेक्षां मुसुलमानांजवळ कांहीं निराळीं हत्यारें होतीं किंवा मराठ्यांना माहीत नव्हत्या अशा व्यूहरचना मुसुलमान करीत असत, असें ह्मणण्यालाहि कांहीं एक प्रमाण नाहीं. दोघांहिजवळ सारखींच हत्यारें होतीं. अशी ज्याअर्थी स्थिति होती त्याअर्थी सुखैकपरायणता व विलासमग्नता हींच मराठ्यांच्या नाशाचीं

तराव्या शतकांत कारणें होतीं. परमार्थाच्या नांवाखालीं ही जी सुखैकपरायणवृत्ति नांदत होती तिचा फायदा घेऊन मुसुलमानांनीं मराठ्यांचा पराभव केला.

इ. स. १३१८ त अशी वस्तुस्थिति असल्यामुळें मुसुलमानांजवळ मराठ्यांना शिकविण्यासारखें कांहींच नव्हतें. ते राज्याधिकारी होते व त्यांची भाषा फारशी होती, तेव्हां व्यवहार चालण्याकरितां फारशीचा उपयोग दरबारांत होऊं लागला. पहिलीं पांच पन्नास वर्षे कोण्याहि ब्राह्मणानें, मराठ्यानें, किंवा कुणब्यानें ह्या मुसुलमान अधिकाऱ्यांची खासगी किंवा सरकारी कसलीही नोकरी केली नाहीं. मुसुलमानांची खासगी नोकरी चातुर्वर्ण्यांतील मनुष्याकडून होणें अशक्यच होतें. परंतु द्वेषानें व अभिमानानें सार्वजनिक नोकरीहि कोणी करीत नसत. ह्याचमुळें मुसुलमानी अमलांत वेठीची जुलमी पद्धत अमलांत आली. वाटेल तें सार्वजनिक काम पाहिजे तेव्हां हव्या त्या माणसाकडून जुलमानें करून घ्यावयाचें हा वेठ ह्या शब्दाचा अर्थ आहे. ही वेठ जेव्हां सुरू झाली तेव्हां संभावित ब्राह्मण व मराठे कालान्तरानें व निरुपायानें सरकारी नोकरी करूं लागले, व अर्थात् फारशी शब्दांचीहि ओळख करून घेऊं लागले. ह्यावेळीं महाराष्ट्रांतील तालुक्यांच्या कमाविसदारांजवळ दुभाषांचें काम हिंदुस्थानांतील कायस्थ लोक करीत. इ. स. १४१६ तील जे फारशी–मराठी कागद आहेत त्यांवर ह्या कायस्थ दुभाषांचीं नांवें आहेत. महाराष्ट्रांत हे मुसुलमान आले ते येथें कायमचे राहिले व त्यांनीं शंभर दीडशें वर्षांत बरेच लोक बाटवून मुसुलमान केले. शेवटीं ह्या बाटविण्याची मर्यादा इतकी वाढली कीं प्रत्येक खेडें, ओढा व डोंगराचें शिखर ह्याच्या आंत, जवळ किंवा वर मस्जीद, दर्गा किंवा पीर स्थापन झाला. हिंदूंचीं देऊळें व मुसुलमानांचे तकिये एकमेकाला येऊन भिडले. बाट्यांच्या, मुसुलमानी अधिकाऱ्यांच्या, व फकिरांच्या तोंडून निघालेले फारशी शब्द महाराष्ट्रांतील सर्व लहानमोठ्या जातींतील लोकांच्या कानावरून हमेश

जाऊं लागले व व्यवहारांत जिकडे तिकडे फारशी शब्दांचा सुळसुळाट झाला. शास्त्र, धर्म, नीति, आचार, इत्यादि महत्वाच्या प्रांतांत फारशी शब्द मुळींच शिरले नाहींत. बल्के, बाजार, दरबार, फौज, अदालत, सराफा, जमीन, जुमला, सावकारी, वगैरे कारभाराच्या जागीं बोलल्या जाणाऱ्या जबानींत फारशी शब्दांचा अंमल मामूर झाला. उदाहरणार्थ, घरासंबंधीचे कांहीं फारशी शब्द देतों. खाना, दार, सराई, इमारत, झनाना, दिल्ली दरवाजा, दरवाजा, दालन, हौद, दिवाणखाना, ओसरी, महाल, ऐनेमहाल, रंगमहाल, संदुकखाना, मुदबलखाना, आतषखाना, दिवाळ, देवळी, कप्पा, कप्पी, घुमट, जमीन, फरशी, तक्त, तक्तपोशी, हलका, कुलुप, खलबतखाना, किल्ली, छपर, आरक, घुसलखाना, तालीमखाना, तावदान, खजीना, अंबार, कारंजें, आबदारखाना, फवारा, बुरूज, गच्ची, चुनेगच्ची, पिंजरा, पलंग, खुर्ची, मेज, वगैरे. बाजार, दरबार, फौज, जमीन, वगैरेसंबंधानेंहि असेच शेंकडो फारशी शब्द देतां येतील. ते कोणच्याहि फारशी किंवा मराठी कोशांत सांपडण्यासारखे आहेत. मराठींत फारशी शब्द शिरले आहेत हें जगजाहीर आहे. परंतु ते कोणत्या बाबीसंबंधानें विशेष शिरले आहेत त्याचा तपशील वर दिला आहे.

फारशी बोलणाऱ्या मुसुलमानांचें राज्य महाराष्ट्रावर ३५० वर्षे होतें त्याअर्थी मराठींत फारशी शब्द यावे ही सामान्य गोष्ट आहे. फारशीच्या व मराठीच्या सान्निध्यांत विशेष जो आहे तो निराळाच आहे. तो विशेष हा. मराठींत बरेच विशिष्ट प्रयोग फारशीवरून आलेले आहेत. शफथ खाणें असा एक प्रयोग मराठींत करतात. शपथं गृह् असा प्रयोग संस्कृतांत आहे. शफथ घेणें असा मूळचा मराठी प्रयोग पूर्वी होता व सध्या चालू आहे. परंतु खाणें ह्या क्रियापदाचा शफथेशीं जोड देण्याची कल्पना फारशी प्रयोगावरून मराठींत आली आहे. फारशींत कसम् खुर्दन् असा प्रयोग असतो. कसम्=शफथ; खुर्दन=खाणें. हाक मारणें असा एक मराठी प्रयोग आहे. ह्याला जुन्या मराठींत

बोलावणें व संस्कृतांत निमंत्र् असे शब्द आहेत. उच्चैःनिमंत्रणं कृ असाहि संस्कृत प्रयोग होईल. परंतु निमंत्रणं मारयति किंवा प्रहरति असा प्रयोग संस्कृतांत नाहीं. बांग जदन् ह्मणून फारशींत प्रयोग आहे त्यावरून मराठींत हाक मारणें असा प्रयोग घेतलेला आहे. बांग=हाक किंवा आरोळी; जदन्=मारणें. तसेंच याद राखणें असें मराठी संयुक्त क्रियापद आहे. तें याद दाष्तन् ह्या फारशी प्रयोगापासून घेतलें आहे. याद्=आठवण; आणि दाष्तन्=राखणें. असे शेकडो प्रयोग फारशी-वरून मराठींत घेतलेले आहेत. उदाहरणार्थ खालीं कांहीं प्रयोग देतों.

रोग़न् मालीदन्= रोगण चोळणें.
खाली कर्दन्= (घर) खाली करणें.
राह् दादन्= रस्ता देणें.
माफ् कर्दन्= माफ करणें.
हल्ल कर्दन्= हल्ला करणें.
रद्द कर्दन्= रद्द करणें.
जमा शुदन्= जमा होणें.
सई कर्दन्= सई करणें, प्रयत्न करणें.
बाजू गिरफ्तन्= बाजू घेणें.
दोस्ती दाष्तन्= दोस्ती ठेवणें, मैत्री करणें.
तुहमत् जदन्= माथीं मारणें.
सुहबत् दाष्तन्= सोबत राखणें.
सुहबत् रफ्तन्= सोबत जाणें.
किलीद् दादन्= किल्ली देणें.
दूर कर्दन्= दूर करणें, काढणें.
तमाशा नमूदन्= तमाशा दाखविणें.
पुष्तक् बर्दाष्तन्= उडी टाकणें.
पुष्तक् जदन्= उडी मारणें.
हजीमत् कर्दन्= हजामत करणें, कडक बोलणें.

मना कर्दन्= मना करणें.
जेर कर्दन्= जेर करणें.
बमैदान आवर्दन्= मैदानांत आणणें, जाहीर करणें.
कमर बस्तन्= कंबर बांधणें.
दम् जदन्= दम मारणें.
नाखुन् गिरिफ्तन्= नखें काढणें.
जाहीर साख्तन्= जाहीर करणें.
जबर शूदन्= जबर होणें.
पेष आमदन्= पुढें येणें.
शबीना कष्तन्= छबीना काढणें.
दस्त् दादन्= हात देणें, मदत करणें.
दम दरकषीदन्= दम धरणें.

आणीक अशीं शेकडों उदाहरणें देतां येतील. फारशींतून सबंद प्रयोगाचे प्रयोग घेण्याव्यतिरिक्त मराठी व फारशी ह्यांच्या सान्निध्यांत दुसरा एक विशेष आहे. तो हा कीं कित्येक उद्गारवाचक शब्द, उभयान्वयी अव्ययें, शब्दयोगी अव्ययें, क्रियाविशेषणें व सर्वनामें मराठीनें फारशींतून घेतलीं आहेत.

उद्गारवाचक शब्द.

१ बस, २ हां, ३ अलबत, ४ बेशक, ५ लाशक, ६ खूप, ७ वाहवा, ८ छे, ९ छी, १० अफसोस, ११ शाबास, १२ खुश, १३ फू, १४ बेदाद

उभयान्वयी अव्ययें.

१ वा, २ व, ३ मगर, ४ अगर, ५ बल्के, ६ या, ७ कीं, ८ बाकीं, ९ चुनाचे, १० सबब, ११ लेकिन.

शब्दयोगी अव्ययें.

१ दर (दरदिवस, दररोज)
२ बे (बेदील)

३ देखील (देखील इनाम=इनामासुद्धां)

४ ते, (चाळीस ते पन्नास,)

५ गैर (गैरचाल)

६ सवाई { सवाई माधवराव=माधवरावाच्या योग्यतेचा
सवाई बाजीराव=बाजीरावाच्या योग्यतेचा
सवाई शिकंदर=शिकंदराच्या योग्यतेचा }

७ बाजद. (बाजद बरसात)

८ अज् (अज रखतखाने,)
(अज् तागाइत)

९ बमय (बमय फौज)

१० ला (लाइलाज)

११ बिला (बिलाकसूर)

हीं शब्दयोगीं अव्ययें शब्दाच्या पाठीमागें लागतात. शब्दांच्या पुढें येणारीं फारशी शब्दयोगी अव्ययांपैकीं कांहीं पुढें देतों.

१ बद्दल, २ ऐवजीं, ३ बराबर, ४ शिवाय, ५ नजदीक, ६ रूबरु, ७ माफक, ८ बरहुकूम, ९ बाबत, १० बमोजिब.

मराठींत फारशी क्रियाविशेषणें शेंकडो आहेत त्यांपैकीं दहा पांच पुढें देतों :—

हमेश, बिलकुल, वारंवार, एकवार, बेहत्तर, छान, बितपशील, जलद, शिताबीनें, दरवक्त, मुष्कील, हरवना, लाशक, अलाहिदा, वगैरे, पेष्तर, वापस, नवर्दागर, कुलीं, तमाम, गुदस्तां, यंदा, एकटा, दुकटा, कांहींच, नाहींच, अव्वल, दुय्यम, सिय्यम, देखील.

खालील सर्वनामें मराठींत फारशींतून आलीं आहेत :—

१ खुद (मी खुद तेथें आहे)

२ फलाणा (फलाणा माणूस)

३ हर (हर जिन्नस)

४ हरएक (हरएक माणूस)

५ कसचें (तें कसचें येतें?)
६ जण (सहा जणीं आया)
७ हरकसा (हरकसा,--कशी,--कसें)
८ चे (कसचें, कोणचें,)
९ दरएक (दरएक माणूस)

फारशीच्या व मराठीच्या सान्निध्याचा पहिला विशेष प्रयोगांच्या ग्रहणाचा आहे. ह्या विशेषानें कित्येक नामांना कित्येक क्रियापदें फारशीच्या धर्तीवर लावण्याचा प्रघात पडला. इंग्रजीच्या धर्तीवरहि आपण कित्येक प्रयोग सध्या असेच करूं लागलों आहों. To take advantage of ह्या इंग्रजी प्रयोगाचें मराठींत चा फायदा घेणें असें भाषान्तर करतात व हा प्रयोग मराठींत सध्यां रूढ झाला आहे. ह्या परदेशी प्रयोगांच्या मुळें भाषेच्या रूपांत तर फरक होतोच; परंतु मुख्य फरक कल्पनेच्या प्रांतांत होतो. उदाहरणार्थ, उडी मारणें, हा प्रयोग घेऊं. संस्कृतांत उड्डयते ह्या क्रियापदानें ह्या प्रयोगाचा अर्थ प्रदर्शित होतो. अगर, उड्डाणं कुरुत, असाहि संस्कृत प्रयोग होतो. जुन्या मराठींत उड्डाण करतो असा प्रयोग आहे. उडी घेणें असाहि मराठींत एक प्रयोग आहे. परंतु, उडी मारणें हा प्रयोग फारशीचें मराठीला सान्निध्य होईतों पर्यंत माहीत नव्हता. उडी ह्मणजे उड्डाण ह्या कर्माचा मारणें ह्मणजे प्रहार करणें ह्या क्रियेशीं संबंध जोडविण्याचा प्रघात फारशी प्रयोगांशीं परिचय होईतोंपर्यंत मराठींत नव्हता. तो फारशीवरून आपण मराठींत घेतला आहे. फारशींत हा प्रयोग कसा आला ह्या प्रश्नाचा शोध अलाहिदा असल्यामुळें, ह्यांत जास्त खोल शिरत नाहीं.

मराठी व फारशी ह्यांच्या सान्निध्याचा दुसरा विशेष उद्गारवाचक शब्द, उभयान्वयी अव्ययें, पाठीमागें व पुढें लागणारीं शब्दयोगी अव्ययें, क्रियाविशेषणें व सर्वनामें, ह्यांच्यासंबंधांचा आहे. ह्या विशेषानें भाषेच्या रूपांत वरच्याहिपेक्षां जास्त फरक झाला आहे. फारशींतून जे उद्गारवाचक शब्द मराठींत घेतले आहेत, त्यांनीं मराठींतील पूर्वींच्या

अबब, अहा, हरहर, धन्य, जी, इत्यादि उद्गारांत जास्त भर पडली आहे व त्यांच्यामुळें अनेक उद्गारांचे बारीक बारीक भेद पूर्वींपेक्षां जास्त सफाईनें व सूक्ष्मपणें प्रदर्शित करतां येतात. फारशी क्रियाविशेषणां-पासूनहि मराठीला हाच फायदा झाला आहे. परंतु नामांच्या पाठीमागें लागणाऱ्या फारशी शब्दयोगी अव्ययांच्यायोगानें मराठीभाषेच्या स्वभा-वांत बदल झाला आहे. दर साल दर सद्दे किंवा दर शेकडा पांच टक्के व्याज सुटतें, ह्या वाक्यांचा अर्थ सालांत शंभर रुपयांमागें पांच टक्के व्याज सुटतें, असा आहे. दर ह्मणजे आंत हें शब्दयोगी अव्यय फारशींत इतर शब्दयोग्यांप्रमाणें नामाच्या पाठीमागें लावतात. दर रोज ह्मणजे रोजीं; दर बाजार ह्मणजे बाजारीं; असा प्रयोग फारशींत होतो. दर रोज तीन आणे मजुरी देतों किंवा रोजीं तीन आणे मजुरी देतों, असे दोन्ही प्रयोग मराठींत होतात. दर रोज ह्याबद्दल संस्कृतांत, महाराष्ट्रींत व मराठींत दिवसे, दिसम्मि, दिवशीं असे प्रयोग होतात; ह्मणजे सप्त-मीचा प्रत्यय नामाच्या पुढें लागतो, मागें लागत नाहीं. इंग्रजींत किंवा फारशींत in किंवा दर हीं शब्दयोगी अव्ययें नामाच्या पाठीमागें लाग-तात. येणेंप्रमाणें, शब्दयोगी अव्ययें योजण्याची मराठींत जी सार्वत्रिक चाल आहे तिच्या विरुद्ध दर हें शब्दयोगी अव्यय मराठींत योजिलें जाऊं लागलें आहे. हीच कथा ता ह्या फारशी शब्दयोगी अव्ययाची आहे. ता ह्या शब्दयोगी अव्ययाचा अर्थ फारशींत पर्यंत असा होतो. अज् मुंबई ता पूना, ह्या फारशी शब्दांचा अर्थ, मुंबईपासून पुण्यापर्यंत, असा आहे. ह्या ताचें ते, तो अशीं रूपें मराठींत योजिलीं जातात. मुंबई ते पुणें पांच रुपये भाडें पडतें; ह्या पुस्तकाचे एक ते पांच भाग छापिले जातील; ह्या वाक्यांत ते ह्या शब्दयोग्याचा अर्थ पर्यंत असा आहे व तें ता ह्या फारशी शब्दयोग्यांचा अपभ्रंश असून, फारशींत-ल्याप्रमाणें नामाच्या मागें लागतें. फारशींतील बे चीहि अशीच तऱ्हा आहे. बेदिल, बेवकूब, बेभरंवशाचा, बेइमानी, बेअकली, ह्या शब्दांत बे हें शब्दयोगी त्या त्या शब्दांच्या मागें फारशींतल्याप्रमाणें येतें. तो मनुष्य सवाई शिकंदर आहे किंवा सवाई सिकंदर आहे, ह्या वाक्यांचा

अर्थ, तो मनुष्य शिकंदरासारखा किंवा बिलंदरासारखा आहे, असा होतो. येथें सवाई हें शब्दयोगी अव्यय फारशींतल्याप्रमाणें योजिलें आहे. देखील, बाजत्, बयम, गैर, ला, बिला, हीं अव्ययेंहि अशींच फारशींतल्याप्रमाणें जुन्या मराठी दरबारी लेखांत व सध्याहि योजितात. दर व ता ह्या पूर्वगामी अव्ययांचा मराठींत दुसऱ्या एका तऱ्हेनें फाजील उपयोग होत असतो. मी दर दिवशीं चार कोस चालतों, ह्या वाक्यांत दर हें पूर्वगामी अव्यय योजून शिवाय दिवस ह्या शब्दाची सप्तमी योजिली आहे. पुण्यापासून तो मिरजेपर्यंत अडीचशे मैल अंतर आहे, येथें तो हें पूर्वगामी व पर्यंत हें पश्चाद्गामी अशीं दोन्ही शब्दयोगी अव्ययें आलीं आहेत. ह्या ठिकाणीं तो व दर ह्या शब्दांची शक्ति काय आहे व त्यांचा मूळ प्रयोग कसा करीत असत, हें माहीत नसल्यामुळें बोलणारानें फारशी व मराठी अशीं दोन्ही अव्ययें योजिलीं आहेत. फारशी प्रयोग अत्यंत रूढ झाल्यानें तो सोडवेना व मूळ मराठींतल्याप्रमाणें बोलण्याचा स्वभाव सुटेना, असा चमत्कार ह्या फाजील प्रयोगांत झाला आहे. परंतु ह्या फाजील प्रयोगांत एक मोठें गूढ इंगित सांठलेलें आहे. तें हें कीं इंग्रजीप्रमाणें किंवा फारशी-प्रमाणें पूर्वगामी शब्दयोगी अव्ययांचा मराठीला जातीचाच कंटाळा आहे. शब्दाचें सामान्य रूप करून पश्चाद्गामी शब्दयोगी अव्यय त्या सामान्यरूपापुढें लटकावून देण्याचा मराठीचा आनुवंशिक स्वभाव आहे. परंतु ह्यालाहि एक अपवाद आहे. मराठींत भर ह्मणून एक शब्दयोगी अव्यय फारशींतून आलेलें आहे. फारशींत बर ह्मणून एक पूर्वगामी शब्दयोगी आहे त्यापासून हें मराठी भर अपभ्रंशानें आलें आहे. ह्या भर अव्ययाचा, शब्दाचें सामान्यरूप न होतां, उपयोग होतो. जसें घरभर, घुडगाभर, पायलीभर, हौदभर, इत्यादि.

मीं, तूं, तो, हा, असा, कसा, जसा, तितका, तेवढा, एवढा, जेवढा, केवढा, तितकाला, स्वतः, अमुक, आपण, काय, वगैरे सर्वनामें मराठींत

इतर कोणत्याहि भाषेपेक्षां जास्त आहेत. तशांत, वर दिलेल्या आणीक नउ दहा फारशी सर्वनामांची त्यांत भर पडल्यामुळें मराठींत सर्वनामांच्या योगानें जे नानाप्रकारचे बारीक बारीक सूक्ष्म भेद दाखवितां येतात ते इतर कोणत्याहि भाषेत एकेका शब्दानें दाखवितां येत नाहींत. तो कसचा येतो? केवढाले हे आंबे! वगैरे वाक्यांतील कसचा, केवढाले, ह्यांचीं इंग्रजींत एकेका सर्वनामानें भाषांतरें होत नाहींत. कसचा ह्याचें यथार्थ भाषांतर इंग्रजींत तर होत नाहींच, परंतु Is there any the smallest chance of his coming? अशा सारखा एखादा लांबच लांब प्रयोग करून इंग्रजीला हें काम कसेंबसें भागवून घ्यावें लागतें. खुद, फलाणा, हर, वगैरे फारशी सर्वनामासंबंधानें विशेष कांहीं सांगण्यासारखें नाहीं. परंतु कस व चे ह्या सर्वनामांना नुसतें जाऊं देतां कामा नये. चे हें फारशींत प्रश्नार्थक सर्वनाम आहे व त्याचा मराठींत कोठचें व कसचें ह्या संयुक्त सर्वनामांत उपयोग होतो. ज्ञानेश्वरींत कोठचें व कसचें हीं प्रश्नार्थक रूपें नाहींत. हरकसा हें रीतिदर्शक सर्वनाम् हर व कस ह्या दोन फारशी सर्वनामांचा जोड करून बनविलेलें आहे. हरकशाहि युक्तीनें ये, असा ह्या शब्दाचा प्रयोग होतो. दरएक हें हरएक ह्या सर्वनामाचें अनुकरण करून आणि हर व दर ह्या दोन फारशी शब्दांचा घोटाळा करून बनलेलें रूप आहे. हर हें सर्वनाम आहे व दर हें शब्दयोगी अव्यय आहे. हें मूळ प्रयोगकर्त्यांना माहीत नव्हतें. जण हें सर्वनाम जन् ह्या फारशी नामावरून घेतलें आहे. जन् ह्मणजे बायको. मराठींत किती जण, किती जणी, अशीं पुल्लिंगी व स्त्रिलिंगी रूपें योजितात. येथें कांहींच व नाहींच ह्या क्रियाविशेषणांविषयीं किंचित् उल्लेख करतों. हे दोन्ही शब्द फारशी कहींच व नहींच ह्या सकरणरूपी व अकरणरूपी क्रियाविशेषणांपासून आलेले आहेत. कहींच हें क्रियाविशेषण के आणि हींच व नहींच हें न आणि हींच ह्या दोन सर्वनामापासून झालेलें आहे. कहींच ह्मणजे कांहींहि आणि नहींच ह्मणजे न कांहीं असा अर्थ आहे. इंग्रजींत कहींच ह्मणजे some thing व नहींच ह्मणजे nothing असा अर्थ होतो. तो कांहींच बोलत नाहीं, तो नाहींच येत, असे प्रयोग ह्या शब्दांचे

होतात. एकटा व दुकटा हीं संख्यावाचक विशेषणें फारशींतील एकता, दुता ह्या विशेषणावरून आलेलीं आहेत.

सर्वनामाप्रमाणें फारशींतून मराठींत उभयान्वयी अव्ययेंहि बरींच आलीं आहेत. संस्कृतांतील च व इंग्रजींतील and ह्या उभयान्वयी अव्ययांच्या अर्थी मराठींत व व आणि अशीं दोन अव्ययें आहेत. कीं हें अव्यय फारशी के ह्या अव्ययावरून मराठींत घेतलें आहे. ज्ञानेश्वरींत नियमानें व ऐतिहासिक पत्रांत विकल्पानें जे हें रूप येतें.

मराठीच्या व फारशीच्या सान्निध्यासंबंधानें आतांपर्यंत जे हे विशेष सांगितले त्याहूनहि एक विशेष बराच संस्मरणीय असा फारशीच्या संसर्गानें मराठींत आला आहे. तो विशेष चतुर्थीच्या किंवा द्वितीयेच्या ला प्रत्ययासंबंधाचा आहे. हा प्रत्यय फारशी द्वितीयेचा प्रत्यय जो रा त्यापासून आला आहे. फारशींत राम ह्या शब्दाची द्वितीया राम्‌रा अशी होते. मराठींत राम ह्या शब्दाची द्वितीया ज्ञानेश्वराच्या वेळीं राम, रामा, रामासी, रामातें, रामाप्रति, अशी होत असे. पुढें फारशीच्या सान्निध्यानें रामाला अशी द्वितीया विकल्पानें होऊं लागली. राम्, राम्‌रा; राम, रामाला (राम + आ + ला). अहमद्‌नगर, अहमद्‌नगररा ह्या फारशी द्वितीयेबद्दल अहमदनगर, अहमद्‌नगरला किंवा अहमदनगराला अशी मराठी द्वितीया होऊं लागली. हा ला प्रत्यय कोठून आला, ह्याविषयीं, दादोबा पांडुरंग, कृष्णशास्त्री चिपळोणकर व कृष्णशास्त्री गोडबोले ह्यांना गूढ पडलें होतें (दादोकृत मोठें व्याकरण, दहावी आवृत्ति, पृष्ठ ६९ ; चिपळोणकरकृत व्याकरणावरील निबंध, पृष्ठ ७३, गोडबोलेकृत व्याकरण). ज्ञानेश्वरींत हा ला प्रत्यय नसतांना पुढें तो एकाएकीं कोठून आला? नामदेवाच्या अभंगांत हा ला प्रत्यय प्रथम आढळतो. ज्ञानेश्वर व नामदेव हे जर समकालीन होते, तर नामदेवाच्या ग्रंथांतच तेवढा ला प्रत्यय आढळावा आणि ज्ञानेश्वराच्या ग्रंथांत बिलकुल नसावा हें आश्चर्य आहे. खरा प्रकार असा आहे कीं ज्याचे अभंग आपण सध्यां वाचतों तो नामदेव सोळाव्या शतकांत होऊन गेला

व सोळाव्या शतकांत २०० वर्षांच्या वसटीनें ला प्रत्यय मराठींत रूढ होऊन नामदेवाच्या अभंगांत आला. आतां लग् धातूपासून निघालेल्या लागून, लागीं, लगीं, ह्या रूपांचा द्वितीयेचा ला प्रत्यय अपभ्रंश आहे असें प्रतिपादन कोणी ग्रंथकार करितात.

जॉन बीम्स् ह्यानें आपल्या Comparative Grammar नामक ग्रंथांत हेंच मत स्वीकारिलें आहे. लग् धातूपासून निघालेल्या लागी ह्या शब्दाची शेवटली गी लुप्त होऊन ला हा द्वितीयेचा प्रत्यय झाला असें बीम्स्चें ह्मणणें आहे. ह्या ह्मणण्याच्या पुष्ट्यर्थ तो असें कारण देतो कीं जुन्या मराठींत (?) लागीं व लागून अशीं रूपें होतीं तीं जाऊन हा ला प्रत्यय वर्तमान मराठींत राहिला आहे. परंतु बीम्स्चें हें ह्मणणें १२९० पासून १८९० पर्यंतची ऐतिहासिक परंपरा पाहिली असतां खरें आहे असें ह्मणतां येत नाहीं. आधीं जुन्या मराठींतील लागी व लागून हीं रूपें प्रस्तुत काळापर्यंत लुप्त झालीं नसून सध्यांहि चालू आहेत. उघाला मरून नुकतींच शंभर वर्षे झालीं त्या महिपतीनें हा शब्द योजिला आहे.

नक्र बोलला तुज लागोन । तुझें नाम पतितपावन ।
आणि माझा अव्हेर करून । जासी घेवोन गजेंद्रा ।

भक्तिविजय.

ज्ञानेश्वर (इ. स. १३००), मुंतोजी (१५५०), एकनाथ (१६००), नामदेव (१६००), मुक्तेश्वर (१६४०), वामन (१६६०), श्रीधर (१७००), मोरोपंत (१७७०), महीपति (१७९०), वगैरे ग्रंथकारांनीं आज सहाशें वर्षे हा शब्द योजण्याचा क्रम सारखा ठेविला आहे. तेव्हां हा शब्द अलीकडील काळांत केव्हांहि लुप्त झाला नाहीं हें उघड आहे. बीम्स्चें ह्मणणें खरें नसण्याला दुसरें कारण असें आहे कीं कोणच्याहि शब्दयोगी अव्ययाला विभक्तिप्रत्ययाचें रूप येण्याला, तें शब्दयोगी अव्यय लोकांच्या बोलण्यांतून व लिहिण्यांतून हळूहळू कमी झालें पाहिजे. ह्या नियमाप्रमाणें पाहिलें असतां ला हा द्वितीयेचा प्रत्यय ज्या मराठी ग्रंथकाराच्या लेखांत प्रथम दिसतो त्याच्या लेखांत लागीं, लागून

हीं रूपें क्वचित् आलीं पाहिजेत व त्याच्यानंतरच्या ग्रंथकारांच्या लेखांत मुळींच येतां कामा नाहींत. आतां नामदेवाच्या ग्रंथांत ला हा प्रत्यय प्रथम दृष्टीस पडतो; परंतु लागी हें शब्दयोगी अव्ययहि त्याच्या अभंगांत व भारतांत अनेक वेळां आलें आहे. तसेंच नामदेवाच्यानंतर झालेल्या एकनाथादि ग्रंथकारांच्या ग्रंथांतहि तें हमेशा येतें. तेव्हां बीम्सची क्लृप्ति खरी नाहीं असें ह्मणणें प्राप्त होतें. आतां मुसुलमानांच्या ऐन अमदानींत वाढलेल्या नामदेव, मुक्ताबाई वगैरेंच्या ग्रंथांत फारशी रा पासून निघालेला ला हा द्वितीयेचा प्रत्यय जसा कित्येक ठिकाणीं योजिलेला दृष्टीस पडतो तसा प्रस्तुत खंडांत छापिलेल्या शिवाजीच्या पत्रांत दिसत नाहीं. सह्याद्रीच्या पूर्वेकडील मावळांत व पश्चिमेकडील तळकोंकणांत फारशी भाषेचा संचार केव्हांहि फारसा नसल्यामुळें तेथील लोकांच्या बोलण्यांत फारशींतून घेतलेला द्वितीयेचा ला प्रत्यय बिलकुल येत नसून प्रायः स प्रत्यय येत असे. शिवाजीचे ब्राह्मण मुत्सद्दी एकोनएक मावळांतील किंवा तळकोंकणांतील होते व ते स प्रत्ययाचा हमेश उपयोग करीत. जर लागी किंवा लागून ह्या शब्दयोगी अव्ययापासून ला प्रत्यय निघाला असता, तर महाराष्ट्रांतील सर्व भागांत ह्या ला चा उपयोग, निदान नामदेवानंतर शंभर दीडशें वर्षांनीं तरी, सर्व महाराष्ट्रांत व्हावयाला पाहिजे होता. परंतु तसा प्रकार झालेला नाहीं. ला प्रत्यय शिवाजीच्या वेळेस मावळांत व तळकोंकणांत फारसा लावीत नसत हें तर काय, पण, दादोबा पांडुरंग व कृष्णशास्त्री चिपळोणकर ह्यांच्या वेळींहि ला प्रत्यय कोंकणांत फारसा योजीत नाहींत व देशांत हमेशा योजतात, असा भेद भासत होता (दादोकृत मोठें व्याकरण, दहावी आवृत्ति, पृष्ठ ६९ व चिपळोणकरांचे व्याकरणावरील निबंध, पृष्ठ ७३). येणेंप्रमाणें बीम्सची ही क्लृप्ति केवळ निराधार आहे असें मला वाटतें. ज्ञानेश्वरींत आ, स, सी, ते, हे द्वितीयेचे किंवा चतुर्थीचे प्रत्यय होते. लागीं, लागोनी, लाग, लागा, अशीं लाग ह्या नामाचीं व क्रियापदाचीं रूपें ज्ञानेश्वरींत व तिच्या पुढील सर्व ग्रंथांत येतात. हें घर माझ्या लागीं नाहीं, असा

वाक्यांत लाग शब्दाची जशी सप्तमी सध्या आपण योजतों तशीच ज्ञानेश्वरींतहि योजीत असत. ह्यासंबंधीं विशेष विवेचन ज्ञानेश्वरींतील भाषेचा विचार अन्यत्र करावयाचा आहे त्यावेळीं करतां येईल.

फारशींत कित्येक शब्दांचें अनेकवचन आन् हा प्रत्यय लाऊन करतात. त्याचें अनुकरण जुन्या ऐतिहासिक पत्रांत अनेक स्थलीं केलेलें दृष्टीस पडतें. उदाहरणार्थ, राजश्री वाड ह्यांच्या शाहू छत्रपतीच्या रोजनिशीच्या १८९ व्या पृष्ठावर मोकदमानि हा शब्द आलेला आहे. मूळ फारशी शब्द मोकदम व त्याचें अनेकवचन मोकदमान्. मोकदमान् ह्या रूपाला मौजा ह्या शब्दाशीं जोडण्याकरितां षष्ठीची फारशी ई जोडून मोकदमानी मौजा असा प्रयोग केला आहे. मोकदमान् ई मौजा ह्याचा अर्थ गावचे मोकदम असा होतो. हा षष्ठीचा ई प्रत्यय द्वितीयेच्या रा प्रत्ययाप्रमाणें मराठींत रूढ झाला नाहीं, फक्त मौजा, नजदीक वगैरे कांहीं शब्दांच्यापुढें मात्र सध्या आलेला आढळतो. ही षष्ठीची ई मराठींत रूढ न होण्याचें कारण असें आहे कीं ही ई ज्याची षष्ठी करावयाची त्या नामाच्या पूर्वी लागते. इंग्रजींत जसें of शब्दयोगी अव्यय नामाच्या पाठीमागें लागतें तशी ही फारशी ई नामाच्या पाठीमागें लागते. विभक्तीचा प्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यय नामाच्या मागें लावण्याचा मराठीचा स्वभाव नाहीं. तेव्हां ही षष्ठीची ई मराठींत टिकली नाहीं. परंतु रा हा द्वितीयेचा प्रत्यय फारशींत मराठीप्रमाणें नामाच्यापुढें लावतात. तेव्हां तो मराठीच्या स्वभावाला जुळण्यासारखा असल्यामुळें मराठी विभक्तिप्रत्ययांत कायम होऊन बसला आहे. इतकेंच कीं, द्वितीयेचा रा प्रत्यय लागतांना फारशींत नामाचें सामान्यरूप होत नाहीं, व मराठींत, त्या भाषेच्या नियमाप्रमाणें, होतें. उदाहरणार्थ, गोविंद ह्या नामाचें फारशी पद्धतीनें गोविंद्रा असें द्वितीयेचें रूप होईल; परंतु मराठींत गोविंदाला असें रूप होतें.

भाषेचें स्वरूप बदलणारा दुसरा एक फेरफार फारशीच्या संगतीनें मराठींत आला आहे. तो उच्चारासंबंधानें आहे. इंग्रजींतल्याप्रमाणें

फारशींत बरेच शब्द व्यंजनांत उच्चारतात. उदाहरणार्थ, रोवन्, माफ्, मुहब्बत्, इमारत्, दूर्, हकीगत्, मेहनत्, मैदान्, अल्बत्, खूप्, अफ्सोस् वगैरे फारशी शब्द घ्या. हे शब्द महाराष्ट्रांतील लोकहि मुसुलमानांप्रमाणेंच उच्चारूं लागले; व ह्या उच्चाराची ऊकव जातिवंत मराठी शब्दांनाहि ते नकळत लावूं लागले. उपयोग्, गड्बड्, सांगून्, ह्मण्तात्, आपूणास्, लांबचा, आठ्वण्, नांदत्, वगैरे मराठी शब्द येथें लिहिले आहेत त्याप्रमाणें व्यंजनान्त उच्चारण्याची संवय मराठ्यांनीं मुसुलमानापासून घेतली असें ह्मणण्याला कारणें आहेत. पैकीं एक हें कीं ज्ञानेश्वरींत नियमानें हे शब्द व्यंजनान्त उच्चारत नसून स्वरान्त उच्चारले जातात. दुसरें कारण असें आहे कीं मोरोपंताच्या कवितेंत स्वरान्त लिहिलेलें अक्षर व्यंजनान्त उच्चारिलेलें प्रायः माझ्या वाचण्यांत एकहि आलेलें नाहीं. जर व्यंजनान्त अक्षरें उच्चारण्याची पद्धती मराठींत शुद्ध व संस्कृत मानिलेली असती तर मात्रावृत्तें व गणवृत्तें बनविण्यास मराठी कवींना फार सोपें जातें. तिसरें कारण असें आहे कीं ज्ञानेश्वराच्या वेळीं व त्याच्या पूर्वीं प्रायः सर्वस्वीं सर्व वाक्यगत मराठी शब्द स्वरान्त असत व तो स्वर फारच थोड्या स्थलीं अ असे. उपयोग वगैरे वर जे मराठी शब्द दिले आहेत ते ज्ञानेश्वराच्या वेळीं उपेगु, गाडबड्य, सांगौनु, ह्मणती, आपणासी, लांबु, आठवणी, नांदतु, असे लिहीत व उच्चारीत असत. परंतु ह्या अंत्य इकारांचा व उकारांचा लोप होऊन हे शब्द प्रायः अकारान्त झाले व हें रूपान्तर होत असतांना त्यांना फारशीचा संसर्ग झाला. त्यामुळें त्यांचे उच्चारहि फारशीच्या धर्तीवरच होऊं लागले. अलीकडे इंग्रजीच्या संसर्गानेंहि असाच प्रकार होऊं लागला आहे. मी सर्कसूला गेलों होतों, प्रस्तुत मद्रासूनें आघाडी मारली आहे, ह्या वाक्यांतील सर्कसूला, मद्रासूनें वगैरे प्रयोग व उच्चार इंग्रजीच्या धर्तीवर आहेत. उच्चाराची हीच तऱ्हा मुसुलमानी अमलांत चालू होती. ती रूढ होऊन उच्चाराप्रमाणें लेखनहि व्यंजनान्तच प्रचारांत येतें कीं काय हें पुढील पांचशें वर्षांत कळून येईल.

फारशीच्या संसर्गानें मराठीला आणीक एक खोड लागली. ती ही कीं फारशींतील शब्दसिद्धीने प्रत्यय मराठी स्वीकारूं लागली. ये (उच्चार ई) प्रत्यय लागून फारशींत भाववाचक किंवा धंदावाचक नाम होतें, जसें, दोस्त, दोस्ती. ह्या धर्तीवर मराठींतील नामें अशीं होत:— वैद्यक, वैद्यकी; एक, एकी; दु, दुही; बेक, बेकी; मांत्रिक, मांत्रिकी; वैदिक, वैदिकी; मधुकर, माधुकरी; वगैरे. फारशी प्रत्यय शुद्ध मराठी शब्दांना लावल्याचीं उदाहरणें कांहीं देतों, म्हणजे हा प्रकार जास्त विशद होईल.

फारशी प्रत्यय.	फारशी उदाहरण.	मराठी उदाहरण.
गी	बंदा, बंद्गी	पोट, पोटगी; देणें देणगी.
वान्	फील्, फील्वान्	गाडी, गाडीवान.
दार्	सर्, सर्दार्	छडी, छडीदार; रूप, रूपदार.
बाज्	आतष्, आतषबाज्	रंडी, रंडीबाज.
जी	बोस्तान्, बोस्तान्जी	घड्याळ, घड्याळजी.
दान्	कलम्, कलम्दान्	धूप, धूपदान; दीप, दीपदान.
खाना	कार्, कारखाना	गाडी, गाडीखाना; हत्ती, हत्तीखाना.
यक	नीम्, नीम्यक्	नीमकें, सवाकें, पावकें, दीडकें.
बार	एक, एक्बार	एक, एकवार, दोन, दोनवार.
वार	उमेद, उमेद्वार	माणूस, माणूसवार.

फारशीवरून मराठींत दोन चार समास करण्याचाहि नवीन पद्धती आल्या. फारशींत दोन शब्दांच्यामध्यें अलीफ म्हणजे आ घेऊन एक

समास होतो; जसें बरोबर. ह्याच धर्तीवर मराठींत पटापट, सटासट, सरासर, धराधर वगैरे सामासिक शब्द होतात. फारशींत कित्येक शब्दांच्यामध्यें वाव ह्मणजे उ किंवा ओ येऊन समास होतो; जसें, दार् उ दार्, घर् उ घर्, रान् उ रान=दारोदार, घरोघर, रानोगन वगैरे. फारशी जेव्हां महाराष्ट्रांत सर्वत्र पसरली त्यावेळीं लोकांच्या तोंडांत एकाच अर्थाचे फारशी व मराठी असे दोन शब्द एकदम येऊं लागले. उदाहरणार्थ घरदार, चीजवस्त, कागदपत्र, शेतजमीन, देहगाव, दानधर्म, भेटमुलाकत, सरदारमानकरी, प्रांतमुलूख, वेळवखत वगैरे. येथें दार, चीज, कागद, जमीन, देह, दान, मुलाकत, सरदार, मुलूख व वखत ह्यांचा अर्थ घर, वस्तु, पत्र, शेत, गाव, धर्म, भेट, मानकरी, प्रांत व वेळ असा अनुक्रमें आहे. एकाच अर्थाचे दोन फारशी शब्द ह्याच वेळीं प्रचारांत आले; जसे, जमीनजुमला, शिपाईप्यादा, नक्दपैसा, बंदागुलाम, खबरअफ़वा, वगैरे. फारशी शिकतांना हे शब्द प्रथम कित्येकांच्या तोंडीं बसले व नित्य वापरण्यानें ते समाजांत प्रचलित झाले. हे मराठी–फारशी मिश्र शब्द पौन:पौन्य किंवा अतिशय किंवा जोरदारपणा दर्शवायाचा असल्यास मराठींत योजतात. हे चारी प्रकार ज्ञानेश्वरींत नाहींत हें सांगावयाला नकोच.

येथपर्यंत सांगितलेल्या विशेषांपेक्षांहि एक चमत्कारिक विशेष आतां सांगावयाचा आहे. तो विशेष फारशींतून मराठींत रूढ झालेल्या विशेषनामांसंबंधाचा आहे. सामान्यार्थवाचक शब्द परभाषेंतून घेण्यानें स्वभाषेंत थोडाथोडका बदल होतो असें नाहीं. परंतु परभाषेंतील विशेषनामें स्वभाषा स्वीकारूं लागली ह्मणजे ती बोलणाऱ्या लोकांच्या भ्रष्टपणाची कमाल झाली ह्मणून समजावें. अबा, बाबा, अबू, अमा, मामा, अमी, मामी, नाना, नानी, नवी, काका, काकी, चिच्या, वगैरे मराठींतील टोपण नांवें फारशी आहेत. तसेंच सुलतानराव, जानराव, बाजीराव, रुस्तुमराव, शहाजीराव, शाहू, फिरंगोजीराव, दियानतराव, सर्जेराव, हैबतराव, सर्फोजीराव, गुलबाई, दर्याजीराव, वगैरे विशेषनामेंहि मुसलमानी अमलांत

प्रचारांत आलीं. सौदागर, मुश्रीफ, सराफ, चिटणीस, फडणीस, पोतनीस, हेजीबराव, दिवाण, पेशवे, वाकनीस, दफ्तरदार, वगैरे फारशी आडनांवेंहि मराठींत रूढ झालीं. किंब ह्या फारशी शब्दानें पितापुत्रांचा संबंध दाखविण्यापर्यंत ज्या देशांतील भटाभिक्षुकांचीहि मजल जाऊन पोंहोचली त्या देशांतील भाषेच्या भ्रष्टपणाबद्दल जास्त काय लिहावयानें आहे?

मराठींत विशेषण प्रायः विशेष्याच्या आधीं येतें; फारशींत आधींहि येतें व मागूनहि येतें. विशेषण विशेष्याच्या पुढें घालण्याची चाल मराठीनें कित्येक स्थलीं फारशीपासून उचलली आहे. इसम मजकूर, पंडित मशारनिले, राव अजम, वडगाव बुद्रुक, नांदगाव खुर्द, बिरादर-बुजुर्ग, आंग्रे वजारतमाब, गायकवाड सेनाखासखेल, इंग्रज बहादर, इष्टूर फाकडा, शिकंदर सानी, सालगुदस्त, वतनदरोबस्त, हुजरात कुली, वगैरे प्रयोगांत विशेष्य आधीं व विशेषण मागून घालण्याची चाल मराठींत अगदीं रूढ होऊन गेली आहे. ती इतकी कीं, ह्या प्रयोगांत विभक्ति-प्रत्यय व सामान्यरूपाचें विकरण विशेष्यास न लागतां विशेषणास लागतात; जसें, इसम मजकुरास, सालगुदस्तां, इंग्रज बहादरास, वगैरे. ज्या दोन शब्दांच्या मध्यें षष्ठीची ई असते त्या दोन शब्दांस विभक्ति-प्रत्यय लावावयाचा असल्यास दुसऱ्या शब्दास तो लावला जातो. जसें, बंदर ई सुरत, बंदर सुरतेस; बंदर ई राजापूर, बंदर राजापुरीं; शहर ई पुणें, शहर पुण्यास; वगैरे.

मुसुलमान पातशहांच्या अमदानींत इ. स. १३१८ पासून इ. स १६९६ पर्यंत फारशी भाषेच्या संसर्गानें मराठी भाषेच्या रूपांत काय काय फेरफार झाले त्याचा वृत्तांत हा असा आहे. ह्या अवधींत व्यव-हारांतील शेकडो फारशी शब्दांनीं मराठींत कायमचें ठाणें दिलें. नामांचे व क्रियापदांचे जोड बनविण्याच्या ज्या फारशी पद्धती आहेत त्यांच्या धर्तीवर शेकडो प्रयोग मराठींत रूढ झाले. कित्येक फारशी सर्वनामें, क्रियाविशेषणें, उभयान्वयी अव्ययें व उद्गारवाचक शब्द मरा-ठीशीं एकजीव बनून गेले. जीं शब्दयोगी अव्ययें मराठींतील पश्चा-

द्वामी शब्दयोगी अव्ययाप्रमाणें योजतां येण्यासारखीं होतीं तीं मराठींत राजरोसपणें प्रविष्ट झालीं. तसेंच, जीं शब्दयोगी अव्ययें पूर्वगामी होतीं त्यांनाहि मराठीनें अद्यापि कांहीं संकुचित प्रदेशांत वावरण्याच्या बोलीवर, राहूं दिलें आहे. दोन फारशी विभक्त्या मराठींत येऊं पहात होत्या. पैकीं फारशी षष्ठीच्या ईला प्रायः कायमची गचांडी मिळाली असून, द्वितीयेच्या ला (रा) ला मराठीनें उदार आश्रय दिला आहे. शिवाय, व्यंजनान्त शब्द उच्चारण्याची दुष्ट खोडहि मराठीनें फारशीच्या संगतीनें उचलली आहे. आन् प्रत्यय लावून शब्दांचें अनेकवचन करण्याचाहि बेत मराठीचा होता. परंतु शिवाजी व रामदास यांनीं वेळींच दाबल्यामुळें, हें एक आणखी लचांड तिनें लावून घेतलें नाहीं. जर आणखी तीनशें वर्षें ह्मणजे इ० स० १९०० पर्यंत मुसुलमानांचें राज्य महाराष्ट्रांत रहातें, तर मराठी येथून तेथून सर्व फारशी पेहरावच करती ह्यांत संशय नाहीं. ह्या विधानाची सत्यता कोणाच्या हृदयाला कदाचित् जशी भासावी तशी भासणार नाहीं. ह्मणून साडेतीनशें वर्षांच्या अवधींत पृथ्वीवरील इतर कित्येक भाषांची परराज्याखालीं दैना काय झाली त्याची हकीकत देतों.

परराज्याखालीं भाषेची दैना काय होते हें पहावयाचें असल्यास फ़ार दूर जावयाला नको. इंग्लंडांत इसवीच्या दहाव्या शतकांत साक्सन लोक रहात होते; त्यांच्या भाषेला आंग्लोसाक्सन् असें नांव आहे. ह्या साक्सन लोकांना नार्मन लोकांनीं इ० स० १०६६ त जिंकिलें. नार्मन लोक फ्रेंच भाषा बोलत असत. इंग्लंडांत नार्मन लोकांचें राज्य झाल्यापासून सरकारदरबारांत फ्रेंच भाषा सुरू झाली. कायदे, कानू, वगैरे सर्व लिहिणें फ्रेंच भाषेंत होऊं लागलें व आंग्लो-साक्सन भाषा मागें पडली. इंग्लंडांत ह्या फ्रेंच भाषेचा अंमल तीनशें वर्षें होता. तेवढ्या अवधींत साक्सन भाषा अगदीं बदलून गेली. नार्मन शब्दांच्या दडपणाखालीं साक्सन भाषा केवळ दडपून गेली एवढेंच नव्हे, तर तिचें अंतःस्वरूपहि छिन्नभिन्न झालें. विभक्तिप्रत्यय प्रथम

नाहींसे होऊं लागले. नंतर अंत्य स्वरांनीं पोबारा केला. क्रियापदांचीं निरनिराळ्या काळांचीं रूपें नष्ट झालीं. साक्सन भाषेंत अंतःस्वर बदलून अनेकवचनें होत असत तीं तशीं व्हावयाचीं थांबलीं. विशेषणांवर विभक्तिकार्यें होइनासें झालें. is किंवा es प्रत्यय लावून षष्ठीचें एकवचन होत असे, तें नुसतें s लावून होऊं लागलें व त्याचेंहि बहुतेक सर्व कार्य of किंवा to ह्या शब्दयोगी अव्ययांच्या योगेंच साधण्याची पद्धति पडली. ene प्रत्यय लागून षष्ठीचें अनेकवचन पूर्वी होत असे, तें ह्या तीनशें वर्षांत अजीबात बंद झालें. लिंगवचनांत, उच्चारांत, वगैरे सर्व बाबींत जमीनअस्मानाचे फेरफार झाले. ते इतके कीं १०६६ च्या पूर्वींची साक्सन भाषा १३६६ त मुळीं राहिलीच नाहीं. तिच्या जागीं निराळीच साक्सन व फ्रेंच ह्या भाषांच्या मिश्रणानें बनलेली अशी इंग्लिश भाषा अस्तित्वांत आली. ह्या इंग्लिश भाषेंत साक्सन भाषेंतील कांहीं शब्द तेवढे राहिले आहेत. बाकी साक्सन भाषेंत व सध्यांच्या इंग्रजींत फारसें साम्य नाहीं. साक्सन शब्दहि इंग्रजींत फ्रेंच किंवा लाटिन शब्दांपेक्षां कमी आहेत. वेब्स्टर व राबर्टसन ह्यांच्या कोशांतील शब्द मोजून, रा० टोम्प्रेल ह्या गृहस्थानें असें सिद्ध केलें आहे कीं एकंदर ४३,५६६ शब्दांपैकीं २९,८५३ शब्द फ्रेंच किंवा लाटीन, व १३,२३० शब्द साक्सन, इंग्रजींत आहेत. ह्मणजे एक शब्द जर साक्सन असेल तर अडीच शब्द फ्रेंच किंवा लाटीन असतात. येणेंप्रमाणें नार्मन लोकांच्या दडपणाखालीं साक्सन भाषा अगदीं चिरडून गेली. ह्यासंबंधानें *Race and Language* ह्या पुस्तकांत M. Andre' Lefe'vre ह्मणतो :—

French was for nearly three hundred years (*i. e.* from 1066 A. D. to 1363 A. D.) the official language in England. William the Conqueror had conquered England not merely to govern the English, but to dispose of its wealth. He distributed land, offices, and honours to his (Norman) vassals, so systematically that the whole country was enveloped in a close net-work of which every knot represented a barony,

a county, a Norman domain. In each town, each rural district, the proprietor, the judge, the civil or military chief and his vassals constituted a French centre. Towards the end of the twelfth century the Saxon had accepted a few French words. In the fifty-eight thousand lines of Layamon's *Brut* there are eighty words of French origin. At the end of the thirteenth century we find a hundred (words) in the first five hundred lines of Robert of Gloucester. Nor is this all; The grammatical structure is modified. The case endings are beginning to disappear; the final vowels changed into *e* mute, are no longer pronounced. The conjugation loses a few more of its shades. The plural terminations of persons are dropped. The noun loses the plurals formed by the weakening of the vowel, as *foot, feet,* its genetive plural in *ene*. The genetive singular in *is, es,* soon reduced to *s*, alternates with the prepositions *of* and *to*. The adjective is still declined and often forms its plural in *e*, but the insignificance of this termination causes it to be soon lost &c. &c. In counting all the words in the dictionaries of Webster and Robertson, M. Thommerel has shown that out of 43,566 words, 29,853 come from the classical languages, 13,230 from the Teutonic.

नार्मन-फ्रेंच भाषेच्या दडपणाखालीं साक्सन भाषेची तीनशें वर्षांत काय दशा झाली त्याची ही अशी कथा आहे. फ्रेंच भाषेच्या दडपणाखालीं बास्क भाषा, किंवा रूसच्या दडपणाखालीं पोलीश भाषा, किंवा संस्कृत भाषेच्या दडपणाखालीं भिल्ल, खोंड वगैरेच्या भाषा, किंवा लाटिनच्या दडपणाखालीं एट्रुस्कन भाषा, ह्यांचाहि इतिहास वरच्याप्रमाणेंच आहे. ह्मणजे जिंकणाऱ्या लोकांच्या भाषेपुढें जिंकलेल्या लोकांची भाषा नष्टप्राय होते, असा जगांत इतरत्र कोठें कोठें अनुभव आहे. हा अनुभव मराठीला १३१८ पासून १६५६ पर्यंत येत होता. नुसते शब्द व प्रयोग जोंपर्यंत येत होते, तोंपर्यंत मराठीच्या अंतःस्वरूपाला फारसें भय नव्हतें. परंतु उभयान्वयी व शब्दप्रयोगी अव्ययें घेण्याचा आणि विभक्तिप्रत्यय व उच्चार फारशीच्या धर्तीवर बदलण्याचा जेव्हां मराठींत क्रम सुरू झाला, तेव्हांच तिचें अंतःस्वरूप बदलण्यास प्रारंभ झाला. हा

बद्दल सतराव्या शतकांत मराठ्यांनीं स्वातंत्र्यार्थ जे प्रयत्न केले त्यामुळें जास्त व्हावयाचा थांबला. नाहींपेक्षां, जर मराठ्यांची राज्यक्रांति न होती, तर थोड्याच दिवसांत मराठी उर्दू झाली असती. महाराष्ट्रांत जशी सतराव्या शतकांत क्रांति झाली तशी उत्तर हिंदुस्थानांत मुसुलमानी रियासतीच्या अव्वलीपासून अखेरीपर्यंत ह्मणजे १२ व्या शतकापासून १७व्या शतकाच्या अखेरपर्यंत केव्हांहि न झाल्यामुळें, हिंदी भाषेची उर्दू बनली. व्यवहाराकरतां उर्दू भाषा मुद्दाम बनविली असा कित्येकांचा समज आहे. परंतु तो खोटा आहे. मुद्दाम भाषा बनविणें व ती बनवून प्रचारांत आणणें ह्या गोष्टी मानवी इतिहासांत अशक्य आहेत. कोणतीहि भाषा आपोआप बनत जाते व ती बनण्याचीं कारणें तद्बाह्य असतात. आतां येथें कोणी असा प्रश्न करील कीं हिंदीची जर उर्दू बनली तर अद्याप हिंदी भाषा चालू कशी राहिली? तर त्याला उत्तर आहे. उर्दू भाषा बनत बनत जों जोमांत येते व हिंदी मागसत जाते तों मराठ्यांच्या राज्यक्रांतीनें मुसुलमानांच्या सत्तेला, संस्कृतीला व भाषेला जबरदस्त खो बसला व यच्चयावत् सर्व हिंदुस्थानांतील भाषा बंधमुक्त झाल्या. सिंधी, पंजाबी, हिंदी, मारवाडी, बंगाली, भोजपुरी, रांगडी, गुजराथी, मैथिली, ओढिया, वगैरे उत्तर हिंदुस्थानांतील भाषा मुसुलमानांचें राज्य जर आजपर्यंत रहातें तर निःसंशय मरणाच्या पंथास लागत्या. सारांश, मराठ्यांनीं जुलमी फारशी व उर्दू ह्यांना उखडून पाडल्यामुळें, हिंदुस्थानांतील देशी भाषांना जीवदान मिळालें.

मुसुलमानांच्या अमदानींत मराठी भाषेवरती केवढें घोर संकट आलें होतें त्याची यथार्थ कल्पना उतरण्यास एक अलीकडील प्रत्यंतर देतों. इंग्रजीचा मराठीला संसर्ग होऊन आज बरोबर पंचायशीं वर्षें झालीं. ह्या अवधींत मराठीनें इंग्रजी शब्द व प्रयोग बरेच घेतले. ह्या प्रतिग्रहानें मराठीचें अंतःस्वरूप अद्यापि बदललें नाहीं व तिच्या स्वभावांतहि बिलकुल फेर पडला नाहीं. परंतु समजा कीं, and व that हीं उभयान्वयी अव्ययें, किंवा of, to, for, वगैरे पूर्वगामी शब्दयोगी अव्ययें,

मराठींत योजिली जाऊं लागलीं, आणि इंग्रजी धर्तीवर मिशनरी लोकां-प्रमाणें वेडेवाकडे उच्चार व स्वर मराठी बोलण्यांत आपण आणूं लागलों. असा प्रकार अद्यापि झाला नाहीं व पुढेंहि होईल असें चिन्ह दिसत नाहीं. परंतु, समजा कीं दुर्दैवानें असा प्रकार झाला. तर मराठी भाषेची जी स्थिति होईल असें आपणास वाटतें, तीच मुसुलमानी अंमलांत साक्षात् होण्याची वेळ आली होती. of, to, for, by, हीं पूर्वगामी अव्ययें मराठी शब्दांच्या पाठीमागें योजावयाचीं ह्मणजे विभक्तिप्रत्ययांना फांटा दिला पाहिजे. विभक्तिप्रत्ययांना फांटा दिला ह्मणजे शब्दांचें सामान्य-रूप करण्याची जरूर राहिली नाहीं. सामान्यरूप लुप्त झालें व विभक्ति-प्रत्यय गमावले ह्मणजे वाक्यरचना व क्रियापदप्रयोगहि बदलले पाहिजेत. असे एक ना दोन, शेकडो बदल भाषेंत होऊन, मूळ भाषा कोणत्या थरावर जाईल ह्याचा पत्ताच राहणार नाहीं. जी दशा नार्मन-फ्रेंच भाषेच्या दपटशाखालीं साक्सन भाषेची झाली, ह्मणजे विभक्ति, वचन, लिंग, वगैरेंच्या प्रत्ययांचा लोप होऊन, सध्याची इंग्रजी जशी तुटक भाषा झाली, तशी मराठी होईल. सारांश असा प्रकार झाला असतां मराठीचा मराठीपणा जाईल व इंग्रजांच्या साक्सन भाषेची अधोगति तीस प्राप्त होईल. ही अधोगति चवदाव्या, पंधराव्या व सोळाव्या शतकांत मराठीला येत होती; व ती अनेक कारणांनीं टळली. ह्या कारणांचा निर्देश खालीं करितों.

(१) वर अनेक स्थलीं उल्लेख केल्याप्रमाणें फारशीच्या संसर्गानें होणारी मराठीची अधोगति सतराव्या शतकांत झालेल्या व सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धांत होऊं घातलेल्या राज्यक्रांतीनें टळली. मराठी भाषेवर येऊं घातलेल्या संकटांचीं जीं अनेक निवारक कारणें आहेत त्यांपैकीं हें कारण मोठें महत्वाचें असून शेवटचें होतें.

(२) फारशीची व्याप्ति मराठीवर होऊं लागली असतां, मराठीनेंहि आपली छाप फारशी शब्दांवर ठेवून दिली. वर इ० स० १५४१ व १५९८तील दोन लेख दिले आहेत. त्यांत बीतपसीलु, नीमु, ऐनु,

कारकुनु, अशीं मराठी रूपें मितप्मीलू, नीम्, ऐनू, कार्कून् ह्या फारशी शब्दांना दिलेलीं आहेत. फारशी व्यंजनान्त शब्दांना उ हा प्रत्यय महाराष्ट्रांतील लोक लावीत. उ हा प्रत्यय मराठींतून जसजसा जात चालला तसतसा अ हा प्रत्यय फारशींतील व्यंजनान्त शब्दांना मराठींत लागूं लागला. उदाहरणार्थ कार्कून् हा फारशी व्यंजनान्त शब्द, उ प्रत्ययाचा लोप झाल्यानंतर, कारकून असा लिहिण्याचा प्रघात पडला. कारकून हा शब्द अकारान्त आहे हें त्याला विभक्तिकार्य होत असतांना स्पष्ट होतें. जर कारकून हा शब्द मराठींत व्यंजनान्त असता तर त्याचें चतुर्थीचें रूप कारकुनाला असें न होतां कारकूनूला [रा] असें झालें असतें. इंग्रजींतील जे व्यंजनान्त शब्द मराठींत रूढ झाले आहेत त्यांनाहि मराठींत घेण्यापूर्वीं हा अ प्रत्ययाचा शिक्का मिळत असतो; जसें, बुक, बुकाला [बुकूला नव्हे].

(३) वर सांगितल्याप्रमाणें फारशी शब्द मराठींत घेतल्यावर, त्याला दुसराहि एक संस्कार घडत असे. स्त्रीपुरुषवाचक शब्दांखेरीज फारशींत इंग्रेजी किंवा कानडी ह्या भाषांप्रमाणें इतर शब्द नपुंसकलिंगी असतात. मराठीचा प्रकार जर्मन किंवा संस्कृत ह्या भाषांप्राणें फारशी-हून निराळा आहे. प्रत्येक शब्दाची प्रथम जात ठरवून, व त्याला स्त्रीलिंगी, पुल्लिंगी, किंवा नपुंसकलिंगी बनवून, नंतर त्याच्याशीं विभक्तीचा व्यवहार करावयाचा, असा मराठीचा कायदा आहे. फारशीं-तील नपुंसकलिंगी- हजामत्, सफर, नजर हे शब्द मराठींत स्त्रीलिंगी ठरवले गेले. तसेंच बाग, पायपोस, खुर्दा, वगैरे नपुंसकलिंगी फारशी शब्द मराठींत पुल्लिंगी बनविले गेले. हा दुसरा शिक्का मिळविल्यावर कोणताहि फारशी शब्द बहुतेक संव्यवहार्य झाला, अशी व्यवस्था होती.

(४) परंतु हे दोन शिक्के घेतल्यावर सगळेच शब्द संव्यवहार्य होत असें नसे. ज्या फारशी शब्दांत हय्, खय्, अयन्, घयन् व काफ ह्या अक्षरांचे कंठ्य उच्चार येत त्यांना देवनागरी ह, ख, अ, व घ

उच्चारांची दीक्षा देऊन मग मराठींत घेत. हलवाई, खरीफ, काफला, घारत, कत्तल, अयनेमहाल, ह्या फारशींतून मराठींत आलेल्या शब्दांत हय्, खय्, अयन्, घयन्, व काफ् ह्या अक्षरांचे उच्चार मूळ फारशी शब्दांतल्याप्रमाणें नाहींत. हीं अक्षरें फारशींत घशांतून उच्चारतात. मराठींत वर लिहिल्याप्रमाणें उच्चारीत. मीवह्, खर्बूजह् ह्या शब्दांचा मराठींत मेवा, खरबूज असा आकारान्त व अकारान्त उच्चार करीत; क्वचित् खरबुजि असाहि उच्चार होत असे.

(५) फारशींतील कित्येक भारदस्त शब्दांचा मान न राखतां वाटेल तसा उच्चार करून ते मराठींत घेत. पाच्छा, पैजार, माया [पैसा], अबळा, पैरण, खर्चवेच, तक्या, बबर्ची हे मराठी शब्द फारशी शब्दांच्या उच्चारांच्या हालअपेष्टा करून घेतले आहेत.

मराठीनें हे जे आपले संस्कार फारशी शब्दांवर चालविले त्यांच्यामुळें ह्या फारशी शब्दांचा नूर उतरून गेला व ते इतर मराठी शब्दांप्रमाणें वापरले जाऊं लागले. जिंकणाऱ्या लोकांची फारशी भाषा असतांहि मराठीचें माहात्म्य रहाण्याला मराठीचे व मराठ्यांचे कांहीं गुण कारण झाले. ते गुण येणेंप्रमाणें.

(१) मुसुलमानी अंमल सुरू झाला तेव्हां प्रथम कांहीं वर्षें सरकारी दफ्तर फारशींत लिहीत असत. परंतु गांवें, पुरुष, स्त्रिया, शेतें, वगैरेंचीं विशेषनामें फारशींत लिहिल्यानें त्यापासून फार घोटाळा होऊं लागला. फारशी अक्षरमालिका इंग्रजी अक्षरमालिकेप्रमाणेंच अत्यंत अपूर्ण आहे. तींत कांहीं उच्चारांना फाजील अक्षरें आहेत व बऱ्याच उच्चारांना अक्षरेंच नाहींत. शिवाय फारशींत हा एक मोठा दोष आहे कीं, तिच्या अक्षरमालिकेंत अ, इ, उ, ऋ, ऐ, वगैरे स्वरांना अक्षरें नाहींत. त्यामुळें फारशी शिकस्ता नावाच्या मोडी ह्मणजे जलद लिहिण्यांत कोणत्या अक्षराला कोणता स्वर लावावयाचा हें ठरवितां येत नाहीं. हा दोष परभाषेंतील विशेषनामें फारशींत लिहितांना तर फारच भासमान होतो. उदाहरणार्थ, सफर अशीं तीन अक्षरें जर फारशींत काढलीं

व त्याचा एक शब्द बनविला, तर त्याचे सफर, सिफर, सफिर, सुफर, सफुर, सिफिर, सुफिर, सिफुर, सुफुर, असे अनेक उच्चार होतील. ही अडचण मराठी विशेषनामें लिहिण्यांत फार येऊं लागल्यामुळें, दरबारी जाहीरनामे, पुरशिसा, चकनामे, निवाडे, दानपत्रें, वगैरे लिहिण्यांत वर फारशी व खालीं मराठी भाषेचा उपयोग होऊं लागला. मराठीची लिपि देवनागरी असल्याकारणानें, तिचें श्रेष्ठत्व फारशीहून जास्त भासूं लागलें; व दरबारी लिहिण्यांतहि मराठीचा प्रवेश झाला. दरबारी लिहिण्यांत मराठीचा प्रवेश झाल्यामुळें, तींत पुष्कळ फारशी शब्द शिरले हें खरें आहे. परंतु दरबारांत शिरल्यापासून तिला एक फायदा झाला. तो हा कीं, ती एकीकडे कुजत पडावयाची राहून, तिच्यांत केव्हां तरी उर्जित होण्याची शक्यता राहिली. शिवाय, दरबारांत शिरल्यापासून मराठीला दुसरा एक फायदा झाला. मराठ्यांनीं सतराव्या शतकांत स्वराज्य स्थापिलें व सर्वत्र मराठींत लिहिणें सुरू केलें. त्यावेळीं दरबारांतील सर्व लिहिणें मराठींत लिहितां येण्यास मुळींच अडचण पडली नाहीं. कारण, सर्व दरबारी शब्द व पद्धती सतराव्या शतकाच्या सुमाराला मराठींत रूढ झाल्या होत्या. दरबारी लिहिण्याचे शब्द मराठींत नाहींत अशी अडचण शिवाजीच्या वेळेस पडली नाहीं. तर फारशीच्या संसर्गानें मराठींत जे फारशी शब्द दुहेरी झाले होते ते काढून कसे टाकावे ही अडचण त्यावेळीं पडली. ही अडचण दूर करण्याकरितां राजव्यवहारकोश तयार करावा लागला.

(७) दरबारांत मराठी भाषा प्रचलित रहाण्याला दुसरें कारण देशस्थ ब्राह्मणांची फर्डी कारकुनी होय. प्रथम जेव्हां महाराष्ट्रांत मुसुलमानी झाली, तेव्हां जाधवांच्या राजवटींतील सर्व पद्धती मुसुलमान अधिकाऱ्यांना ब्राह्मण कारकुनांपासून शिकाव्या लागल्या. मजजवळ जमाखर्च लिहिण्याच्या व वसूलबाकीच्या यादीच्या कांहीं जुन्या हेमाडपंती पद्धती आहेत. त्या जुन्या मोडींत लिहिलेल्या आहेत. हें हेमाडपंताचें दफ्तर ब्राह्मण कारकुनांकडून मुसुलमान अधिकाऱ्यांना समजून

घ्यावें लागे. पुढें पुढें तर अशी स्थिति झाली कीं ही जुनी पद्धत समजून घेण्याची व हिशेब ठेवण्याची यातायात मुसुलमान अधिकाऱ्यांनीं ब्राह्मण कारकुनांकडेसच सोपविली. अहमदनगर व विजापूर येथील मुख्य दफ्तरदार ब्राह्मण होते. येणेंप्रमाणें फारशीच्या बरोबर मराठी भाषा दरबारांत अंशतः प्रचलित करण्यास ब्राह्मणांची फर्डी कारकुनी कारण झाली, ही महाराष्ट्रांतील कारकुन मंडळीला मोठी अभिमानाची गोष्ट आहे.

(८) फारशीनें मराठीला नेस्तनाबूत केलें नाहीं ह्याला तिसरें एक कारण झालें. महाराष्ट्रांतील कोट्यवधि लोकसंख्येंत राज्यकर्त्या मुसुलमानांचें प्रमाण शेंकडा एकहि नव्हतें. बाट्यांची संख्या वाढल्यावर हें प्रमाण किंचित् वाढलें. परंतु त्याबरोबर बाट्यांच्या बोलण्यांतील मराठी शब्दांच्या वैपुल्याचाहि परिणाम अस्सल मुसुलमानांवर झाला. ह्या परिणामाची मर्यादा पुढें पुढें तर इतकी वाढली कीं, दक्षिणेंतील मुसुलमान पादशाहा व त्यांचें अधिकारिमंडळ फारशी बोलावयाचें सोडून दक्षिणी उर्दू बोलूं लागलें. दक्षिणी उर्दू म्हणजे जींत मराठी शब्द पुष्कळ आहेत अशी उर्दू भाषा.

(९) फारशीच्या जबरदस्तीनें मराठी भाषा छिन्नभिन्न न होण्याला चवथें कारण म्हटलें म्हणजे चौदाव्या, पंधराव्या व सोळाव्या शतकांत झालेले मराठी ग्रंथकार होत. दरबारांत व व्यवहारांत जी मराठी भाषा चाले तींत यद्यपि फारशी शब्द व प्रयोग बेसुमार शिरले, तत्रापि मराठी ग्रंथकारांच्या ग्रंथांत जेवढे म्हणून कमी फारशी शब्द व प्रयोग येतील तितके आले आहेत. जो शब्द किंवा प्रयोग सामान्यजनसमूहाच्या वापरण्यानें अत्यंत रूढ होऊन गेला तोच तेवढा ह्या ग्रंथकारांनीं आपल्या ग्रंथांत येऊं दिला. आणि तोहि नियमानें येतच असे असा प्रकार नाहीं. ला हा फारशी प्रत्यय नामदेवाच्या ग्रंथांत कित्येक ठिकाणीं आलेला आहे; परंतु एकनाथाच्या ग्रंथांत ह्याचा प्रयोग क्वचितच होतो. मागें एकनाथाची अर्जदास्त दिली आहे, तींत अत्यंत रूढ झालेले

फारशी शब्द व प्रयोग आले आहेत हें वाचकांच्या लक्षांत येईल. शिवाय, नरदेहाच्या शक्त्यांवर रूपक करण्याच्या ओघांत, एकनाथानें तत्कालीन लहानमोठ्या मुसुलमान अधिकाऱ्यांचें स्वभाववर्णन केलेलें आहे व हें स्वभाववर्णन करतांना त्याला त्या त्या अधिकाऱ्याचें फारशी नांव आणणें जरूर पडलें. एकनाथाच्या भागवतांत किंवा रामायणांत त्याच्या अर्जदास्तींतल्याप्रमाणें फारशी शब्द नाहींत. दासोपंत, मुक्ताबाई, मुंतोजीबोवा, उद्धवचिद्घन, वगैरे तत्कालीन ग्रंथकारांच्याहि ग्रंथांत फारशी प्रयोग व शब्द अत्यंत कमी आहेत. ह्या सर्व ग्रंथकारांची भाषा जुनी मराठी आहे. आतां कालान्तरानें प्रत्येक भाषेंत सहजपणानें दर शंभर वर्षांत जो फेरफार होत जातो तो ह्या तीनशें वर्षांतील निरनिराळ्या काळीं झालेल्या ग्रंथकारांच्या ग्रंथांत झाला आहे. परंतु फारशीपासून जितकें अलिप्त रहावेल तितके हे ग्रंथकार राहिले आहेत. ह्याचा परिणाम असा झाला कीं मराठी भाषेंत आतल्याआंत दोन भाषा झाल्या; एक साधुग्रंथकारांची बिनफारशी भाषा व दुसरी व्यवहारांतील फारशीशब्दमिश्रित भाषा. उदाहरणार्थ, शिवाजीच्या वेळच्या किंवा पूर्वींच्या दरबारी पत्रांतील भाषा घ्या व ती तुकारामाच्या किंवा वामनाच्या किंवा रामदासाच्या भाषेशीं तोलून पहा, म्हणजे ही ग्रंथकारांची मराठी भाषा एक निराळीच होती हें लक्ष्यांत येईल. तत्कालीन मराठी ग्रंथकारांची भाषा दरबारी मराठी भाषेहून भिन्न होण्याचें कारण असें होतें कीं, ह्या ग्रंथकारांच्या ग्रंथांचे विषय, दरबारांतील किंवा व्यवहारांतील विषयाहून निराळे होते. ह्या ग्रंथकारांच्या ग्रंथांचे विषय प्रायः धर्म, वेदान्त व पुराणेतिहास; ह्यांपैकीं कोणता तरी एक किंवा सर्व असत. ह्या विषयांत फारशी शब्दांचा व प्रयोगांचा उपयोग करण्याची जरूर नसे. त्यांचें जगच निराळें असे. त्यामुळें ह्या ग्रंथकारांच्या ग्रंथांत मराठीचें मूळ, अस्सल व शुद्ध असें रूप कायम राहिलें. हे ग्रंथकार मुळीं झालेच नसते तर फारशी शब्दांचें व प्रयोगांचें जीत संख्याधिक्य आहे अशी मराठी राहिली असती. अशा मराठीस मराठी ही संज्ञा राहती किंवा नाहीं हाच प्रश्न आहे. साक्सनची फ्रेंचमुळें जशी इंग्रजी

बनली किंवा हिंदीची फारशीमुळें जशी उर्दू बनली तशी मराठीची एखादी निराळीच भाषा बनती. आणि निराळी भाषा बनल्यावर मराठ्यांचें राष्ट्र असे शब्द वापरतां आले नसते. इतकेंच नव्हे, तर हे ग्रंथकार न होते, तर सतराव्या शतकांत महाराष्ट्रांत झालेली स्पृहणीय राज्यक्रांति झालीच नसती.

मराठी भाषा फारशीच्या कचाटींतून शाबूत राहण्याला हे ग्रंथकार व त्यांच्या ग्रंथांतील विषय कारण झाले ह्मणून वर प्रतिपादन केलें आहे. हा प्रकार कसा झाला त्याचा पुढें खुलासा करतों. कोणत्याहि देशावर परराज्य आलें ह्मणजे त्या देशांतील लोकांचें चरित्र नानाप्रकारें संकुचित होतें. हा संकोच लौकिक ह्मणून जे सर्व व्यवहार आहेत त्यांत भासूं लागतो. सार्वजनिक बोलणें, सार्वजनिक लिहिणें, सार्वजनिक कृत्यें करणें ह्या सर्व बाबतींत राज्यकर्त्यांच्या भाषेचा व कृत्यांचा संचार होतो. तो इतका उत्कट होतो कीं देशी भाषेंत बोलणें व देशी तऱ्हेनें चालणें गौण, लाजिरवाणें व तिरस्करणीय आहे असें देशांतीलच लोकांपैकीं कांहींस वाटूं लागतें; व ते स्वदेशांतील चांगल्याहि संस्थांना वाईट समजूं लागतात. स्वदेशांतील पोषाकाची तऱ्हा, स्वदेशांतील घरें बांधण्याची तऱ्हा, स्वदेशांतील भाषेची तऱ्हा, स्वदेशांतील धर्माची तऱ्हा, स्वदेशांतील काव्यांची तऱ्हा, वगैरे सर्व गोष्टी त्यांना त्याज्य वाटतात व परकीय राज्यकर्त्यांच्या वाईट व चांगल्या अशा सर्वच तऱ्हा संग्राह्य भासूं लागतात. उघडच आहे, राज्यकर्त्यांनीं राज्य मिळविलेलें असतें, तेव्हां त्यांच्यांत चांगले गुण असल्यावांचून तें त्यांना मिळवितां आलें नसावें असा सिद्धान्त लोक सहज करतात. तसेंच, देशांतील लोकांनीं राज्य घालविलेलें असतें, तेव्हां त्यांच्यांत वाईट गुण असल्यावांचून तें त्यांनीं गमाविलें नसलें पाहिजे, असाहि दुसरा सिद्धान्त सहज उत्पन्न होतो. व ह्या दोन सिद्धान्तांची सांगड घालून देशांत कित्येक कुधारक निपजत असतात. ह्या कुधारकांचा समज असा असतो कीं राज्यकर्त्यांची भाषा, धर्म, पोषाक, व इतर संस्था स्वीकारल्या असतां, आपण राज्यकर्ते,

निदान राज्यकर्त्यांप्रमाणें तरी, होऊं. ह्या खोट्या समजावर वाहवत जाऊन, हे लोक देश, धर्म व भाषा ह्या तिहींची अवनति करण्यास कारण होतात. असले कुधारक ह्या देशांत इ० स० १३१८ पासून १६५६ पर्यंत बहुत निर्माण झाले. फारशी भाषा लिहिण्यांत व बोलण्यांत मुसुलमान लोकांनाहि ते मागें टाकूं लागले. मुसुलमानी धर्मांत मूर्तिपूजा नाहीं, चातुर्वर्ण्य नाहीं, अनेक दैवतें नाहींत, तेव्हां तीं आपल्या देशांतील धर्मांतहि नसावीं असें या लोकांस वाटूं लागलें व त्याप्रमाणें ते उपदेशहि करूं लागले. चातुर्वर्ण्य नाहींसें झालें पाहिजे, मूर्तिपूजा मोडिली पाहिजे व सर्वत्र एकेश्वरी मत प्रचलित झालें पाहिजे, ह्मणजे आपला हा देश वर येईल, असा टाहो त्यांनीं फारशी भाषेंत चालविला. आपला हा देश वर यावा, हा बोलण्याचा पेंच मात्र त्यांनीं कधीं सोडिला नाहीं; बाकी सर्व कृति त्यांनीं अशी ठेविली कीं, त्यानें भाषा, धर्म व आचार समूळ नष्ट व्हावे. स्वभाषेच्या, स्वधर्माच्या, व स्वाचाराच्या निंदेनें भरलेलीं भाषणें फारशींतून करण्यानें त्यांना एक वैयक्तिक फायदा असे. तो हा कीं मुसुलमान राज्यकर्त्यांना हे लोक आपल्या मताचे आहेत व कधीं काळीं आपल्या धर्माचेहि होतील, निदान आपल्या राज्याच्या चिरस्थायित्वाचे स्तंभ होतील, असा भ्रम पडे. आणि ह्या भ्रमावर ते त्यांना दरबारीं लहानमोठ्या नोकऱ्या देत. दरबारांत मानमान्यता झाल्यामुळें, देशांतील लोकांनाहि त्यांचा वचक वाटे. असले कांहीं चमत्कारिक कुधारक त्या काळीं फार पिकले होते. दादो नर्सो काळे, दियानतराव, गांगो बाहमणी, वगैरे नांवें ह्या तीनशें वर्षांत जीं मुसुलमानी कागदपत्रांतून व तवारिखांतून अधूनमधून चमकतात तीं ह्या कुधारकांचींच होत. फारशी पेहराव, फारशी शब्द, फारशी पीर, फारशी कल्पना, ह्यांचा जो प्रादुर्भाव महाराष्ट्रांत त्यावेळीं झाला त्याला ह्या कुधारकांची मदत बरीच झाली. परंतु, कुधारकांच्या ह्या मेहनतीनें देश वर यावयाचा तो दिवसेंदिवस खालीच जाऊं लागला. पडता काळ आला असतां राष्ट्रत्वाचीं प्रधान अंगें जी स्वभाषा, स्वधर्म व स्वाचार त्यांचें संगोपन व वर्धन करणें हेंच परराज्याखालीं राष्ट्रत्वाचीं

चीजें कायम रुजत ठेवण्याचें मुख्य इंगित आहे. स्वभाषा, स्वधर्म व स्वाचार ह्यांच्या पवित्र नांवाखालीं लोकांत जो सुखैकप्रियतेचा, आळस्याचा, विभक्ततेचा व देशकार्यपराङ्मुखतेचा संचार झालेला असतो व ज्याच्यामुळें देश प्रथम हातचा गेलेला असतो त्या संचाराला तोडगा करणें सर्वथा योग्य व इष्ट आहे. परंतु संचाराला तोडगा न करतां मूळ धर्माला व आचाराला दुखापत करणें केव्हांहि गुणकारक नसतें. त्यावेळच्या कुधारकांचा व राज्यकर्त्यांचा, मूळ धर्माला, मूळ भाषेला व मूळ आचाराला नष्ट करण्याचा विचार होता. तो महाराष्ट्रांतील सुधारकांनीं, साधूंनीं व ग्रंथकारांनीं हाणून पाडिला. मूर्ति ह्मणजे ईश्वराच्या प्रतिमा आहेत, चातुर्वर्ण्यांतील सर्व लोक देव आणि धर्म ह्यांच्यापुढें सारखे आहेत, एकच ब्रह्म सर्वत्र पसरलें आहे, ह्या तीन सिद्धांतांचें निरूपण ह्या सुधारक साधूंनीं व ग्रंथकारांनीं योग्य तऱ्हेनें केलें. हे तिन्ही सिद्धान्त आपल्या हिंदुधर्माचे मुख्य स्तंभ आहेत, हें त्यांनीं नानाप्रकारांनीं लोकांच्या मनावर बिंबविलें. जात मोडून सबगोलंकार करावा, मूर्ति फोडून भुगारून द्याव्या, देवळें जमीनदोस्त करावीं, वगैरे वात्रट विचार त्यांच्या लेखांत कोठेंहि नाहींत. जात मोडून टाकावी, दगडाचे देव फेकून द्यावे, महाराशीं ब्राह्मणांनीं अन्नव्यवहार करावा, वगैरे अपसिद्धान्तांचे आरोप ह्या साधूंवर कैलासवासी म० गो० रानडे यांनीं आपल्या इतिहासांत केले आहेत. परंतु ह्या वेळची सामाजिक, धार्मिक वगैरे स्थिति रानड्यांस जशी कळावी तशी प्रायः कळली नव्हती. ह्या साधूंचे ग्रंथ मी लक्ष्यपूर्वक वाचले आहेत. हिंदुधर्माला सोडण्याचा त्यांचा विचार होता, असें त्यांच्या ग्रंथांवरून दिसत नाहीं. दगड ह्मणून दगडाला भजणें, किंवा महार ह्मणून माणसाला छळणें, किंवा ब्राह्मण ह्मणून इतर वर्णांचा धिःकार करणें, मनुष्यमात्राला सर्वथा लाजिरवाणें आहे, असें ह्या ग्रंथकारांनीं इतर संस्कृत ग्रंथकारांप्रमाणेंच ह्मटलें आहे. परंतु रानडे ह्मणतात तसली सुधारणा त्यांच्या ग्रंथांत कोठें दिसत नाहीं. ह्या साधूंना देव, धर्म, देवळें, जाती, व स्वभाषा, हीं बिलकुल सोडावयाचीं नव्हतीं.

व प्रस्तुतच्या कित्येक विद्वान् देशाभिमान्यांप्रमाणें परभाषेंत ग्रंथ व भाषणें करून स्वदेश वर नेण्याचें ढोंगहि करावयाचें नव्हतें. रानड्यांच्या ग्रंथांतील हें संतावरील विवेचन अगदीं निराधार व शोधकपणास अयोग्य असें झालेलें आहे; महाराष्ट्रधर्माचा खरा अर्थहि त्यांच्या ध्यानांत आला नाहीं; व संतांच्या स्वप्नींहि नव्हते ते विचार त्यांच्यावर लादले गेले आहेत. संतांचे मूळ ग्रंथ विचारी लोक जसजसे सखोल बुद्धीनें वाचतील तसतसें माझ्यासारखेंच त्यांचेंहि मत होईल अशी माझी खात्री आहे.

ह्या साधु व ग्रंथकार सुधारकांनीं तत्कालीन राज्यकर्त्यांचे व कुधारकांचे विचार हाणून पाडण्यास खालील मार्ग स्वीकारले. मुसुलमानांच्या करड्या अमलाखालीं राजकीय लेख लिहिण्याची किंवा राजकीय कृत्यें करण्याची सोयच नव्हती. पूर्वींचे जे जाधव राजे त्यांचे इतिहास व बखरीहि लिहून काम भागण्यासारखें नव्हतें. जाधवांचें राज्य मुसुलमानांच्या हातीं गेलें तें राष्ट्रांत सुखैकपरायणता, आलस्य, मत्सर, हलगर्जीपणा, बेसावधपणा, वगैरे दुर्गुणांचा प्रादुर्भाव झाला असल्याविना गेलें नाहीं हें उघड आहे. जाधवांच्या राजवटीच्या शेवटल्या पाचपन्नास वर्षांचा इतिहास यथातथ्य लिहावयाचा म्हणजे हे सर्व दोष उघड करून दाखविले पाहिजेत. आणि हे दोष उघड करून दाखविले म्हणजे त्या उघडकीनें शहाणपणा शिकावयाचा सोडून देशांत कित्येक प्राणी असे असतात कीं अन्योन्य द्वेष करण्यासच त्या उघडकीचा त्यांना उपयोग होतो. स्वदेशाच्या इतिहासाचें सूक्ष्मपणें मनन करून व त्यांत दाखविलेल्या गुणदोषांतून गुणांचें ग्रहण व दोषांचा त्याग करून, स्वदेशाच्या कल्याणाचा मार्ग न स्वीकारितां, दोषांकडेच तेवढी दृष्टि देऊन, आपले पूर्वज मूर्ख होते व ते एकमेकांचा मत्सर करीत होते, तेव्हां आपणहि हाच मत्सर असाच पुढें चालविला पाहिजे, अशी कुढी व देशबुडवी भावना कित्येक कलिपुरुषांच्या मनांत प्रादुर्भूत होते. तेव्हां जाधवांच्या बखरी किंवा चरित्रें लिहिण्याच्याहि भरीस ते प्रायः पडले

नाहींत. राज्यकर्त्यांत व आपणांत जातिसंबंधानें व आचारासंबंधानें ज्या बाबींत विशेष भेद मूळापासूनच होता त्या धर्माची कास ह्या साधुग्रंथकारांनीं धरली. आचारानें व धर्मानें राज्यकर्त्यांसारखे होऊन व त्यांच्याशीं तादात्म्य पावून राष्ट्रत्व नष्ट होतें हें ते पक्केपणीं जाणत होते. तेव्हां धर्माच्या बाबतींत जित व जेते ह्यांत मुळचा जमीनअस्मानाचा भेद होताच, तो त्यांनीं आपल्या ग्रंथांत आणून स्वराष्ट्रत्व कायम ठेविलें. इ. स. १३१८ पासून १६५६ पर्यंतच्या ग्रंथकारांनीं धर्मसंबंधीं ग्रंथरचना मराठींत कां केली त्याचें हें रहस्य आहे. तसेंच बखरी व इतिहास न लिहितां त्यांनीं भारत, भागवत व रामायण ह्यांचेच अनेक अनुवाद केले. त्याचें कारण असें आहे कीं त्यापासून राष्ट्रांतील कुधारकांना परस्पर उखाळ्यापाखाळ्या काढण्यास तर संधि मिळत नाहीं आणि इतिहासाच्या अध्ययनापासून जो नैतिक फायदा व्हावयाचा तो तर बराच होतो. महाराष्ट्रांत १६५६च्या पुढें बखरी निर्माण कां झाल्या व त्याच्या आधीं भारत व रामायण ह्यांतील कथाच मराठींत प्रचलित कां होत्या, त्याचें कारण हें आहे. भारत, रामायण व धर्म ह्यांवर झालेले मराठी ग्रंथ महाराष्ट्रांत गांवोगांव वाचीत आणि त्यांतील भाषा व्यवहारांतील फारशीमिश्रित मराठी भाषेला आवरून धरी. सारांश, साधुसंताचे ग्रंथ ह्मणजे त्यावेळच्या फारशीमिश्रित धेडगुजरी मराठी बडबडीवर केवळ रामबाण औषध होतें.

(१०) फारशीच्या संसर्गानें बिघडण्यापासून मराठी भाषेला हिंदुधर्मानेंहि राखिलें. जेजुरी, पंढरपूर, तुळजापूर येथील गोंधळी, बाळसंतोष, भाट, चित्रकथी, व भुत्ये, तसेंच गांवोगांवचे पुराणीक, हरदास, व ललितकार, ह्यांची भाषा शुद्ध मराठी असे. महाराष्ट्रांतील खालच्या प्रतीच्या रंगेल लोकांची एकच वाङ्मयात्मक करमणूक ह्मटली ह्मणजे शृंगारिक व भेदिक लावण्या ह्मणण्याची व ऐकण्याची. त्यांचीहि भाषा त्यावेळीं शुद्ध मराठी असे. बायकांच्या कहाण्या

व पुरुषांच्या भूपाळ्या ह्यांच्यासारखा शुद्ध मराठी तर दुसऱ्या कोठेंच नाहीं. संभावित लोक व वारकरी लोक अभंग व पदें ह्मणत व तीं बरींच शुद्ध असत. सामान्य लोकांचें धार्मिक व इतर वाङ्मय हें असें शुद्ध जुन्या मराठींत सांठलें गेल्यामुळें, व्यवहारांत जो त्यांच्या तोंडाला फारशीचा विटाळ होत असे तो बराच धुतला जाई.

इ. स. १३१८ पासून १६९६ पर्यंत फारशीच्या सान्निध्यानें मराठी भाषेंत जे फेरफार झाले त्यासंबंधीं येथपर्यंत चार शब्द सांगितले. आतां, ह्या सान्निध्यापासून मराठीला तोटा झाला किंवा नफा झाला हें पाहणें फार हिताचें आहे. कारण दैवगतीनें मराठीची सध्यां एका यूरोपियन भाषेशीं गांठ पडली आहे. तेव्हां त्या गांठींतून रूपभंग न होतां ती कशी निभावून नेतां येईल ह्याचा अंदाज ह्या पहाण्यापासून थोडाबहुत होणार आहे.

फारशीच्या सान्निध्यापासून मराठीला तोटा झाला किंवा नफा झाला हें पहावयाचें ह्मटलें ह्मणजे, ह्या दोन भाषांच्या मूळ स्वभावाची परीक्षा केली पाहिजे; इ. स. १३१८ पासून १६९६ पर्यंतच्या काळांत ह्या दोन्ही भाषा, भाषांच्या प्रगतीचे जे चार वर्ग आहेत, त्यांपैकीं कोणत्या वर्गांत होत्या हें पाहिलें पाहिजे; आणि ह्या दोन्ही भाषा बोलणाऱ्या लोकांची संस्कृति कोणत्या दर्जाची होती हीहि बाब हिशेबांत घेतली पाहिजे.

भाषांच्या प्रगतीच्या चार पायऱ्या भाषाशास्त्रज्ञांनीं स्थूलमानानें ठरविलेल्या आहेत; (१) विश्लिष्टाक्षरात्मक, (२) श्लिष्टाक्षरात्मक, (३) विकृतिक्षम व (४) त्यक्तविकृति. ह्यांना (१) Monosyllabic, (२) agglutinative, (३) inflected, आणि (४) analytical, अशीं अनुक्रमिक नांवें युरोपियन लोकांनीं दिलेलीं आहेत. विश्लिष्टाक्षरात्मक भाषांत सर्व शब्द एकाक्षरी (monosyllabic) असतात. उदाहरणार्थ, चिनी भाषा. श्लिष्टाक्षरात्मक भाषांत अनेक एकाक्षरी शब्द दोन एकाक्षरी शब्दांच्या मध्यें घालून एक शब्द बनविला

जातो. जशी, तुर्की भाषा. ह्या भाषांत शब्दांना विकृति किंवा प्रत्यय लागत नाहींत. सबंद शब्दांना प्रत्ययाप्रमाणें उपयोग होतो. विकृतिक्षम भाषांत मूळ शब्दांस अनेक विकृति करण्याचा व शब्दांच्या अन्त्याक्षरांचा लोप होऊन बनलेल्या प्रत्ययांचा उपयोग करण्याचा प्रचात असतो; जशा संस्कृत, आरबी, लाटीन, ग्रीक वगैरे. ह्या विकृतींचा आस्ते आस्ते त्याग करण्याकडे कित्येक भाषांची प्रवृत्ति असते. उदाहरणार्थ, फारशी, मराठी, इंग्रजी, फ्रेंच, हिंदी, बंगाली वगैरे. ह्या चवथ्या वर्गांतील ज्या भाषा सांगितल्या त्यांनीं शब्दांना विकृति करण्याचें अजीबात सोडून दिलें आहे असें नाहीं. त्यक्तविकृति अशी संज्ञा ह्या भाषांना देण्यांत मतलब इतकाच आहे कीं, विकृतिकार्य सोडण्याकडे ह्या भाषांची आस्ते आस्ते प्रवृत्ति होत आहे. ह्या त्यक्तविकृति भाषांपैकीं कित्येक भाषा विकृतित्यागाच्या कामीं बऱ्याच पुढें गेल्या आहेत व कित्येक तितक्या पुढें गेल्या नाहींत. उदाहरणार्थ, मराठींत अद्यापि सात विकृत विभक्त्या आहेत, फारशींत चारच आहेत, आणि इंग्रजींत विकृति होऊन होणारी विभक्ति ह्मटली ह्मणजे s प्रत्यय लावून होणारी षष्ठीच कायती एक उरली आहे व तिचेंहि बहुतेक कार्य अलीकडे of, to वगैरे शब्दयोगी अव्ययेंच करतात. उदाहरणार्थ, राम ह्या शब्दाच्या विभक्त्या तिन्ही भाषांत चालवून दाखवितों:—

	मराठी.	फारशी.	इंग्रजी.
प्रथमा	राम	राम्	राम्
द्वितीया	रामाला, राम.	राम्रा	(to) राम्
तृतीया	रामानें	(अज्) राम्	(by) राम्
चतुर्थी	रामातें	बराम्	(to) राम्
पंचमी	रामाहून	(अज्) राम्	(from) राम्
षष्ठी	रामाचें	इराम्	(of) राम् or राम्'s
सप्तमी	रामांत	(दर) राम्	(in) राम
संबोधन	(अरे) राम, रामा	(अयू) रामा	(oh) राम्

येथें मराठींत प्रथमेला बिलकुल विकृति झाली नाहीं; व अविकृत असें द्वितीयेचें व संबोधनाचें राम रूप होतें. बाकीच्या सर्व विभक्त्यांत राम हा शब्द विकृत होतो. फारशींत, राम्‌रा, बराम्, इराम् व रामा अशीं द्वितीया, चतुर्थी, षष्ठी व संबोधन, ह्या चार विभक्त्यांत विकृत रूपें होतात. आणि इंग्रजींत राम् s असें षष्ठीचें एकच विकृत रूप आहे व तेंहि क्वचित्च उपयोग करतात. ह्यावरून विकृतीचा त्याग करण्यांत इंग्रजीचा पहिला, फारशीचा दुसरा व मराठीचा तिसरा, असे नंबर लागतात. जुन्या मराठींत रामु किंवा रामो अशीं विकृत रूपें होत असत, तीं अर्वाचीन मराठीनें सध्यां सोडून दिलीं आहेत.

आतां वर्तमानकालीं तिन्ही भाषांत एकार्थक क्रियापदें चालवितों.

अनिश्चितार्थी, पुसणें (मराठी), पुर्सीदन् (फारशी), to ask (इंग्रजी).

	मराठी.	फारशी.	इंग्रजी.
प्रथम पुरुष	मी पुसतों–तें–तें	मीपुर्सम्	ask.
	आह्मीं पुसतों	मीपुर्सेम्	ask.
द्वितीय पुरुष	तूं पुसतोस–तेस–तेंस	मीपुर्सी	askest.
	तुह्मीं पुसतां	मीपुर्सेद	ask.
तृतीय पुरुष	तो पुसतो–ते–तें	मीपुर्सद	asks.
	ते पुसतात	मीपुर्संद	ask.

येथें मराठींत पुस धातूला तिन्ही पुरुषांत, दोन्ही वचनांत व तिन्ही लिंगांत विकृति होते. फारशींत तिन्ही पुरुषांत व दोन्हीं वचनांत विकृति होते, लिंगांत होत नाहीं. इंग्रजींत द्वितीय पुरुषीं एकवचनीं व तृतीय पुरुषीं एकवचनीं मात्र विकृति होते, बाकी पुरुषांत, वचनांत व लिंगांत होत नाहीं. येथेंहि विकृतीचा त्याग करण्यांत इंग्रजीचा पहिला, फारशीचा दुसरा व मराठीचा तिसरा नंबर लागतो.

ह्याच क्रियापदांचीं भूतकालीं रूपें अशीं होतात.

	मराठी.	फारशी.	इंग्रजी.
प्रथम पुरुष	म्यां पुसलें–ला–ली	पुर्सीदम्	asked.
	आह्मीं पुसलें–ला–ली	पुर्सीदेम्	asked.

द्वितीय पुरुष	त्वां पुसलें–ला–ली	पुर्सीदी	askedst.
	तुह्मीं पुसलें–ला–ली	पुर्सीदेद्	asked.
तृतीय पुरुष.	त्यानें पुसलें–ला–ली	पुर्सीद्	asked.
	त्यांनीं पुसलें–ला–ली	पुर्सीदंद्	asked.

येथें तीन्ही भाषांत क्रियापदांना विकृति झाली आहे. मराठींत पुस धातूला लें प्रत्यय लागण्यापलीकडे पुरुष व वचन ह्यासंबंधानें जास्त विकृति झाली नाहीं; लिंगासंबंधानें मात्र झाली आहे. फारशी पुरुष व वचन ह्या दोन्हींसंबंधानें विकृति झाली आहे. आणि इंग्रजींत ed प्रत्यय लागून द्वितीय पुरुषी एकवचनीं st प्रत्यय आणीक लागलेला आहे. येणेंप्रमाणें तिन्हीं भाषांत मूळ क्रियापदाला भूतकाळीं विकृति होते. येथें विकृतिराहित्याच्या बाबींत अमुक भाषा पहिली व अमुक दुसरी अशी नंबरवारी लावतां येत नाहीं.

येणेंप्रमाणें मराठी, फारशी व इंग्रजी ह्या तिन्ही भाषा विकृतीला सोडून चालण्याच्या विचारांत आहेत. त्यांत इंग्रजीनें विकृतीला बरेंच सोडिलें आहे. तिच्या खालोखाल फारशीचा नंबर लागतो. व मराठीनेंहि विकृतीपासून दूर रहाण्याचा कांहींसा अभ्यास केला आहे. परंतु फारशी किंवा इंग्रजी ह्यांच्या इतकी सरकसीतारामी अद्यापि तिनें पत्करिली नाहीं. आतां, १३१८ पासून १६९९ पर्यंत मराठीची फारशीशीं गाठ पडली होती त्या अवधींत विकृति सोडण्याच्या कामीं फारशीची मराठीला कांहीं मदत झाली कीं काय तें पहावयाचें आहे. द्वितीयेचा ला प्रत्यय, किंवा षष्ठीचा ई उपसर्ग, किंवा अनेक वचनाचा आन् प्रत्यय मराठीला फारशीनें देण्याचा घाट घातला तेव्हां जास्त विकृति मात्र मराठीला फारशीपासून प्राप्त झाली. ह्या पलीकडे अविकृत होण्याला फारशीची मराठीला बिलकुल मदत झाली नाहीं. मराठींतील लिंगें, वचनें, पुरुष ह्यांच्या रूपावर फारशीचा काडीइतकाहि परिणाम झाला नाहीं. ह्याचें कारण असें कीं फारशींतील पूर्वगामी शब्दयोगी अव्ययें मराठींत रुजून तिचें स्वरूप बदलण्याला सतराव्या शतकांतील राज्यक्रांतीनें वेळ राहिला नाहीं. फारशींतील ग्रंथसमूह व शास्त्रेंहि

अशीं नव्हतीं कीं त्यांच्यापुढें तत्कालीन मराठी वाङ्मयानें दिपून व हतप्रभ होऊन मरून जावें. शिवाय मराठीला त्या तीन शतकांत असे कांहीं कट्टे ग्रंथकर्ते मिळाले कीं त्यांना, कवडीचीहि अपेक्षा न करितां, केवळ कर्तव्य ह्मणून मराठींत ग्रंथरचना करणें अगत्याचें वाटलें. ह्या अनेक कारणांनीं फारशीला मराठी भाषेचें अंतःस्वरूप प्रायः बदलतां आलें नाहीं. ज्ञानेश्वरापासून आतांपर्यंत ह्मणजे १२९० पासून १९०३ पर्यंत मराठी भाषा हळूहळू विकृतीपासून परावृत्त होत आहे, परंतु ती तशी आपल्याच छंदानें होत आहे. ज्ञानेश्वरीसंबंधानें विवेचन करतांना ह्या स्वच्छंदवृद्धीचा वृत्तान्त देण्याचा विचार आहे.

वरील उद्घाटनावरून एवढें निष्पन्न झालें कीं, फारशी भाषेच्या अंतःस्वरूपाचा मराठी भाषेच्या अंतःस्वरूपावर ह्मणण्यासारखा परिणाम घडला नाहीं. तीनशें वर्षांच्या जबरदस्तीनें मराठीचें अंतःस्वरूप वस्तुतः बदलावयाचें; परंतु हा बदल होण्याचा ओघ चार कारणांनीं थांबला. (१) मराठी भाषेचा स्वतःचा स्वभाव, (२) मराठी ग्रंथकारांचे प्रयत्न, (३) महाराष्ट्रांतील हिंदुधर्म, व (४) मराठ्यांनीं सतराव्या शतकांत केलेली राज्यक्रांति. आतां यद्यपि मराठीचें अंतःस्वरूप फारशीच्या सान्निध्यानें बदललें नाहीं, तत्रापि तिच्या बहिःस्वरूपावर ह्या सान्निध्याचा बराच परिणाम झालेला आहे. उभयान्वयी अव्ययें, शब्दयोगी अव्ययें, उद्गारवाचक अव्ययें, सर्वनामें, विशेषनामें, क्रियाविशेषणें, विभक्तिप्रत्यय, इतर हजारो शब्द आणि प्रयोग, फारशींतून मराठींत आले आहेत. हा परिणाम फारशी संस्कृतीचा मराठी संस्कृतीवर ठळक असा झाला आहे. मुसुलमान लोकांची संस्कृति महाराष्ट्रांतील लोकांच्या संस्कृतीहून त्यावेळीं बरीच कमी दर्जाची होती. त्यामुळें धर्म, शास्त्रें, कायदे, कविता, साहित्य, वगैरे सरस्वतीच्या प्रांतांत फारशीचा शिरकाव ह्मणण्यासारखा झाला नाहीं. व्यवहारांत मात्र फारशी शब्दांचा भरणा फार झाला. व त्याचा ठसा मराठीवर इतका बेमालूम बसला आहे कीं जोंपर्यंत मराठी भाषा ह्या भूमंडळावर बोलली जाईल, तोंपर्यंत मुसुलमानांचें राज्य महाराष्ट्रावर कांहीं शतकें होतें, हें तींतील फारशी शब्द, प्रयोग व विभक्तिप्रत्यय ह्यांवरून कळून येईल.

ह्या तीनशें वर्षांच्या गुलामगिरीनें मराठीला फायदा काय झाला? एकंदर विचार केला असतां ह्मणण्यासारखा फायदा कांहींच झाला नाहीं. मराठीत एकाच अर्थाचे अनेक शब्द आले आणि तिची अर्थप्रदर्शक शक्ति व्यवहाराच्या प्रांतांत जास्त वाढली. ह्यापलीकडे मराठी भाषेला फारशीच्या सान्निध्यानें जास्त फायदा कांहीं एक झाला नाहीं. मोडी लिहिण्याची पद्धति हेमाडपंतानें मुसुलमानांचें राज्य महाराष्ट्रांत होण्याच्यापूर्वींच सुरू केली होती आणि बखरी लिहिण्याची पद्धति मुसुलमानांचें राज्य अस्तंगत झाल्यानंतर ह्मणजे १६९६ नंतर प्रचारांत आली. खुद्द मुसुलमानांचें राज्य असतांना ह्या दोन्ही पद्धती अस्तित्वांत आल्या नाहींत. तेव्हां त्यांचें श्रेय मुसुलमानांना देतां येत नाहीं.

आतां इंग्रजी भाषेच्या सान्निध्यानें मराठी भाषेची काय स्थिति झाली आहे व होईल तें पाहूं.

केवळ ह्या दोन भाषांच्या अंतःस्वभावाकडे पाहिलें असतां, इंग्रजीपेक्षां मराठी विकृतिक्षम जास्त आहे व पूर्वगामी शब्दयोगी अव्ययें योजण्याची पद्धति तिच्या स्वभावाच्या विरुद्ध आहे. तेव्हां ह्या दोन भाषांचा गुण्यागोविंदानें जोड बनणें प्रायः अशक्य आहे. इंग्रजीच्या सान्निध्यानें मराठींत इंग्रजी शब्द व प्रयोग येतील एवढेंच. ह्मणजे मराठींत इंग्रजी शब्दांचें व प्रयोगांचें मिश्रण होईल.

परंतु इंग्रजीच्या सान्निध्यानें मराठींत इंग्रजी शब्द व प्रयोग ह्यांचें मिश्रण होईल, ही गोष्ट फारशी उद्वेगजनक नाहीं. ह्या बाबतींत काळजी निराळ्याच तऱ्हेची आहे. ती ही कीं ह्या देशांत इंग्रजीची व्याप्ति इतकी भयंकर होत चालली आहे कीं मराठी मिश्र होण्यापेक्षां नष्ट होण्याचा संभव जास्त आहे.

गेल्या शतकांत ग्वालेरीपासून तंजावरापर्यंत मराठी भाषा प्रचलित होती. नाना फडणिसांचीं हैदर व टिप्पू यांस पत्रें मराठींत जात व महादजी शिंद्याचा रजपूत राजांशीं व्यवहार मराठींत होई. तसेंच

ग्वाल्हेरीपासून तंजावरापर्यंत खासगी व सार्वजनिक दफ्तरें मोडींत व मराठींत लिहिलीं जात. मराठीची ही व्याप्ति जाऊन तिची जागा आतां इंग्रजीनें घेतली आहे. आतां निव्वळ महाराष्ट्राखेरीज मराठी इतरत्र कोठें चालत नाहीं. ह्मणजे मराठीच्या व्याप्तीचा महाराष्ट्राच्या बाहेर संकोच झाला आहे.

मराठीचा संकोच महाराष्ट्राच्या बाहेर तर झालाच आहे. परंतु खुद्द महाराष्ट्रांतहि मराठीचा संकोच अतोनात होत आहे. गेल्या शतकांत महाराष्ट्रांत सरकारीं व दरबारीं मराठी भाषा विराजत होती. आतां तिच्या जागीं सर्वत्र इंग्रजी झाली आहे.

सरकारीं दरबारीं मराठीला मज्जाव झाला ही तर लांछनाची गोष्ट आहेच. परंतु उच्च व मध्यम प्रतीच्या शाळा व पाठशाळा ह्यांतूनहि मराठीचें निष्कासन झालें आहे.

आतां शाळा व पाठशाळा परकीय सरकाराच्या ताब्यांत असल्यामुळें तेथें मराठीचा रिघाव नसल्यास कोणाचा उपाय नाहीं. परंतु, सार्वजनिक सभा, खासगी सभा, पुस्तकालयें, प्रांतिक सभा, पेढ्या, ह्यांचेंहि सर्व लिहिणें इंग्रजींतच होऊं लागलें आहे. ह्या ठिकाणीं कोणी मराठींत लिहूं व बोलूं नये असा कोणाचा प्रतिबंध नाहीं. पण देशहिताच्या कल्पना सध्यां इतक्या विपरीत झाल्या आहेत कीं त्याचें स्वरूप काय असतें ह्याचाहि विसर सर्वत्र पडल्यासारखा दिसतो.

पेढ्या, सभा, व पुस्तकालयें सार्वजनिक संस्था पडल्याकारणानें तेथें कोणाचा पायपोस कोणाच्याहि पायांत नाहीं अशी स्थिति असते व इंग्रजी लिहिण्याचा व बोलण्याचा सहजासहजी प्रघात त्या ठिकाणीं पडत गेला असतो, अशी समजूत कोणी काढील. परंतु भाऊबहीण, बापलेक, स्नेहीसोबती ह्यांच्यांतील खासगी पत्रव्यवहारही इंग्रजींतच चालतो. ह्या स्थलीं सार्वजनिक सबब आणतां येणार नाहीं. परंतु इतकें मात्र कदाचित् ह्मणतां येईल कीं, ह्या लोकांना विचारी लोकांत गणतां येत नाहीं; इंग्रजी लिहिण्याचें ह्या अज्ञ लोकांना कौतुक वाटतें व राष्ट्रहित कशांत आहे हें कळण्याची त्यांना ऐपत नसते, ह्मणून असा प्रकार होतो.

परंतु राष्ट्रहित कशांत आहे हें ज्यांस कळतें अशी आपली कल्पना आहे तेहि विद्वान् लोक इंग्रजीच लिहितात व बोलतात. इंग्रजांशीं किंवा सरकाराशीं व्यवहार करण्यांत हे लोक इंग्रजींत बोलून थांबते तर ती गोष्ट केवळ न्यायाची होती. पण आश्चर्य हें कीं स्वजनांशीं व्यवहार करतांनाहि हे लोक इंग्रजीच वापरतात. डा. भांडारकरांना स्वधर्माविषयीं किंवा सामाजिक सुधारणेविषयीं मुंबईंत बोलावयाचें असलें, किंवा न्यायमूर्ति रानड्यांना बकलच्या इतिहासावर नगरास व्याख्यान द्यावयाचें असलें किंवा रा. कुंट्यांना स्वदेशाभिमानाविषयीं खुद्द पुण्यांत भाषण करावयाचें असलें, किंवा प्रो. गोखल्यांना कोल्हापुरच्या मराठ्यांपुढें इंग्लंडची हकीकत सांगावयाची असली, कीं इंग्रजीचा आश्रय केल्याविना बोलण्यास त्यांना उमेदच येत नाहीं.

परंतु, बोलणें हें क्षणिक व तात्पुरतें असतें, तेव्हां तपेच्या तपें जिचा व्यासंग केला ती इंग्रजी समयीं जिव्हाग्रावर नाचूं लागली, तर त्यासंबंधी नांवें ठेवूं नयेत, अशी ह्या मंडळीच्या तर्फेनें कोणी विनंति करील. तेव्हां ह्या विनंतीला मान देणें सभ्यपणाला अनुचित होणार नाहीं. पण, ज्यांची रचना करण्यास अनेक वर्षांचा अवधि लागतो व ते कोणत्या भाषेंत लिहावे हें ठरविण्यास हवा तितका वेळ असतो, ते ग्रंथ किंवा निबंध लिहिण्याच्या कामीं इंग्रजीचा उपयोग देशाभिमानी विद्वान् लोक करूं लागले ह्मणजे त्यांनाहि देशाभिमानाची व राष्ट्रत्वाची व्याप्ति कोठपर्यंत असते हें कळत नाहीं असें विधान करणें प्राप्त होतें. असें नसतें, तर त्यांनीं आपले ग्रंथ देशी भाषांत लिहिले असते. भाषा विचाराचें साधन आहे. तेव्हां स्वभाषा स्वदेशांतील विचारी पुरुषांच्या विचाराचें साधन असावें हें उचित होय. हे विचारी लोक परभाषेंत आपले विचार प्रकट करूं लागले तर त्यांनीं स्वभाषेचा मोठा अक्षम्य अन्याय केला असें होतें. घरच्या गरीब माणसांची उपासमार करून बाहेरच्या श्रीमंतांना मेजवानी करणारा इसम स्वकीयांच्या व परकीयांच्या उपहासास मात्र कारण होतो. असे गृहस्थ आपल्या देशांत गेल्या पंचायशी वर्षांत बरेच झाले. पैकीं कित्येकांची नांवनिशी त्यांनीं केलेल्या कांहीं ग्रंथ व निबंध यांसह पुढील पिढ्यांच्या स्मरणार्थ येथें देतों:—

नांव.	इंग्रजी ग्रंथ व लेख.	मराठी ग्रंथ व लेख.
१ बाळशास्त्री जांभेकर	दोन तीन ताम्रपटांवर निबंध.	ल्हान मराठी व्याकरण, इतिहासाचें भाषांतर, वगैरे.
२ दादोबा पांडुरंग	स्वीडनबुर्गच्या मतांवर विचार.	मोठें व्याकरण व त्याची पूरणिका.
३ विश्वनाथ नारायण मंडलिक	पौराणिक विषयांवर इंग्रजी निबंध.	सवईवर मराठी निबंध, एल्फिन्स्टनच्या इतिहासाचें भाषांतर.
४ महादेव मोरेश्वर कुंटे	आर्य संस्कृतीचीं स्थित्यंतरें, ऋषि, पूर्वमीमांसेचें भाषांतर, एक इंग्रजी वर्तमानपत्र व अनेक व्याख्यानें.	पूर्वमीमांसेचें भाषान्तर, शिवाजी काव्य व व्याख्यानें.
५ शंकर पांडुरंग पंडित	वेदाचें भाषान्तर, नाटकांवर टीपा, दोन चार ताम्रपटांवर निबंध.	तुकारामावर निबंध, वेदाचें भाषान्तर.
६ काशिनाथ त्र्यंबक तेलंग	ताम्रपटांवर निबंध, रामायणावर निबंध, गीतेचीं गद्य व पद्य भाषांतरें, अर्थशास्त्रावर निबंध, पौराणिक विषयांवर निबंध, राजकीय व सामाजिक व्याख्यानें, मराठ्यांच्या इतिहासावर निबंध.	शहाणा नेथन (भाषान्तर), इतर एक दोन व्याख्यानें व भाषान्तरें.

७ महादेव गोविंद रानडे	राजकीय, धार्मिक, सामाजिक, नैतिक, व इतर विषयांवर व प्रसंगांवर शेकडो व्याख्यानें व निबंध. मराठ्यांचा इतिहास.	शेकडों व्याख्यानें.
८ डा० भांडारकर	दख्खनचा निबंधवजा इतिहास, ताम्रपटांवर निबंध, पतंजलीवर निबंध, महाराष्ट्री व मराठी भाषांवर निबंध, धार्मिक व सामाजिक व्याख्यानें.	प्रार्थनासमाजांतील प्रार्थना व कीर्तनें.
९ रा. बाळ गंगाधर टिळक	अग्रहायण व आर्यांचें मूलस्थान मराठा वर्तमान पत्रांतील कांहीं क्षणिक किंमतीचे निबंध व व्याख्यानें.	केसरींतील लेख व व्याख्यानें.
१० पंडिता रमाबाई	हिंदू विधवा, वगैरे दोन चार लहान मोठीं मध्यम पुस्तकें.	एक दोन मराठी पुस्तकें.
११ दिवाण रघुनाथराव	धार्मिक, सामाजिक व राजकीय टिपणें.	कांहीं क्षुल्लक मराठी कविता व वाक्यें.
१२ सर त्रावणकोर माधवराव	सामाजिक धार्मिक व राजकीय टिपणें.	कांहीं आर्या.
१३ महाराज सयाजीराव गायकवाड.	गिबनच्या इतिहासाचा सारांश, कांहीं निबंध व व्याख्यानें.	आज्ञेनें झालेले शेकडो मराठी लहान मोठे ग्रंथ.
१४ डा. रणछोड कीर्तिकर	वनस्पतीवर एक दोन निबंध.	काव्यें व निबंध.

वर दिलेल्या सर्व गृहस्थांची जगांतील कोणत्याहि देशांत विचारवंतांत गणना होईल व एकदोघांची तर कदाचित् प्रतिभासंपन्न पुरुषांत गणना करावी लागेल. ह्या गृहस्थांनीं मराठींत ग्रंथरचना किंवा विचारप्रदर्शन काय केलें व इंग्रजींत काय केलें, हें पाहिलें असतां, मराठीपेक्षां इंग्रजीकडेच ह्यांचा कल विशेष आहे हें दिसून येईल. ह्या सर्व गृहस्थांच्या लेखांत ग्रंथ ह्या संज्ञेस अंशतः पात्र अशीं चारच पुस्तकें आहेत; (१) कुंट्यांचीं आर्य संस्कृतीचीं स्थित्यंतरें, (२) रानड्यांचा मराठ्यांचा इतिहास, (३) डा० भांडारकरांचा दख्खनचा इतिहास, व (४) रा० टिळकांचें आर्यांचें मूलस्थान. ह्या चारी पुस्तकांत विचार व कल्पना ह्यांचें बरेंच प्रदर्शन झालें आहे. आतां, इतकें खरें आहे कीं त्या त्या शाखेंत यूरोपांत जे पहिल्या प्रतीचे उत्तमोत्तम ग्रंथ झाले आहेत त्यांच्याशीं ह्या ग्रंथांच्यानें बरोबरी करवणार नाहीं. परंतु त्या त्या शाखेंतील बऱ्या ग्रंथांत ह्यांची गणना करावी लागेल हें उघड आहे. उदाहरणार्थ, डा० भांडारकरांचा दख्खनचा इतिहास घ्या. ह्या इतिहासाची योग्यता डा० फ्लीट्कृत कर्नाटकांतील राजघराणीं ह्या पुस्तकापेक्षां किंचित् जास्त आहे. डा० भांडारकरांचें पुस्तक ताम्रपटें व शिलालेख ह्यांच्याशीं ज्याचा परिचय झाला आहे असा कोणीही गृहस्थ लिहिता. एक दोन क्लृप्त्या मात्र डा० भांडारकरांनीं ह्या पुस्तकांत नवीन काढिलेल्या आहेत. टॉलेमीचा Baleoeuros व कोल्हापूरचा विळिवायकुर हे एकच पुरुष होत, ही डाक्टरांची कल्पना मोठी अपूर्व आहे व तिचें सर्व श्रेय त्यांनाच आहे. अशा स्वतंत्र कल्पना व कोट्या ह्या चारी पुस्तकांत आहेत. परंतु ह्या कल्पना व कोट्या ह्या देशांतील भाषेस काय होत? हे चारी ग्रंथ इंग्रजींत लिहिलेले आहेत व ह्यांचा उपयोग महाराष्ट्रांतील लोकांपेक्षां यूरोपांतील लोकांना जास्त होणार आहे. हेच ग्रंथ ह्या लोकांनीं मराठींत लिहिले असते, तर त्यांच्या अपूर्वतेमुळें परकी लोकांना ते भाषान्तर करून समजून घ्यावे लागते व मराठी भाषेंत चार विचारप्रचुर ग्रंथांची भर पडती. मराठींत लिहिले जाते तर हे ग्रंथ यूरोपांतील विद्वानांना कळावयास अवधि लागता इतकेंच.

ह्यापेक्षां मराठींत लिहिण्यापासून जास्त तोटा नव्हता. परंतु, मराठीचा संकोच होण्याची चोहोकडून जर सध्यां वेळ आलेली आहे, तर त्याच्या आड ह्या पुढारी मंडळीनें तरी काय ह्मणून यावें? आर्य संस्कृतीचीं स्थित्यंतरें, हा ग्रंथ बक्षिसाकरितां लिहिला होता, अशी कुढ्यांच्या तर्फेनें सबब आणतां येईल. परंतु ऋषि हें काव्य व इंग्रजी वर्तमानपत्र कुढ्यांनीं इंग्रजींत कशाकरतां लिहिलें तें समजत नाहीं. तसेंच, महाराज सयाजीराव गायकवाड ह्यांनीं गिबनचा सारांश इंग्रजींत लिहिल्यानें, त्यांना स्वतःला इंग्रजी लिहिण्याचा चांगला सराव झाला, ह्यापलीकडे इंग्रजांच्या किंवा मराठ्यांच्या- विचारावरती ह्या सारांशाचा कांहीं परिणाम झाला आहे असें दिसत नाहीं. टिळकांनीं आपले दोन्ही ग्रंथ मराठींत लिहिले असते तर काय बिघडतें? ह्या ग्रंथांना जर कांहीं किंमत असती–व ती आहे ह्यांत संशय नाहीं—तर कांहीं युरोपियन लोकांना जरूर असल्यास कदाचित् मराठी शिकावें लागतें इतकेंच. हीच टीका इतर गृहस्थांच्याहि इंग्रजी लेखांसंबंधानें करतां येईल. ह्या सर्व लोकांना काय भुरळ पडलें असेल तें असो. इंग्रजींत लिहिणें ह्मणजे कांहीं अजब चमत्कार करणें आहे असें ह्यांना निःसंशय वाटत असावें असें दिसतें. खरें ह्मटलें असतां इंग्रजी लिहिण्यापासून ह्यांना वरकरणी फायदा किती असला तरी वस्तुतः कांहीं फायदा आहे असें वाटत नाहीं. श्रेष्ठ इंग्रज ग्रंथकारांप्रमाणें आंग्लभाषाप्रभुत्व ह्यांच्यापैकीं एकालाहि येणें दुरापास्त आहे. तेव्हां विलायती सरस्वती-पुत्रांत ह्यांना उत्तम इंग्लिश ग्रंथकार ह्मणून कोणी मान देतो असा बिलकुल प्रकार नाहीं. एकप्रकारचें तकलादू व बटबटीत इंग्रजी हे लोक लिहितात, असाच अभिप्राय ह्यांच्या इंग्रजीवर इंग्रज टीकाकारांकडून प्रायः पडला जातो. जिवापाड मेहनत करून परभाषेंत लिहावें आणि तत्रस्थ लोकांनीं फार तर Intelligent ह्मणून सर्टिफिकेट द्यावें, ह्यांत ह्यांना काय अभिमान वाटत असेल न कळे! हें ह्या लोकांच्या इंग्रजी भाषेसंबंधानें झालें. ह्यांच्या ग्रंथांतील विचारासंबंधानें पहातां, यूरोपांतील मोठमोठ्या पट्टीच्या शास्त्रज्ञांच्या विचारांच्या तोडीचे सिद्धान्त ह्यांच्या-

कडून निर्माण झाले आहेत असें क्वचितच ह्मणतां येईल. केन, ब्राडला, वगैरेंचे विचार जितपत प्रगल्भ व खोल असतात तितपतच ह्या लोकांचे असतात. ग्लाडस्टन, हक्स्ले, बन्सेन, मूलर, हंबोल्ट, ह्यांच्यापासून केन, व ब्राडला, जितके दूर आहेत त्यापेक्षां आपल्या इकडील ही पुढारी मंडळी वरील मंडळीच्या फारशी जवळ नाहींत. येणेप्रमाणें भाषाप्रभुत्व किंवा विचारसामर्थ्य वस्तुतः इतर राष्ट्रांतील लोकांना थक्क करून टाकण्यासारखें नसतांना, परभाषेंत लिहून तींतील लहानमोठ्या ग्रंथांच्या व चोपड्यांच्या गर्दींत गडप होऊन जाण्यांत काय पुरुषार्थ असेल तो असो! ही कृति केवळ तळ्याच्या पाण्यांत पडणाऱ्या धुळीच्या कणाच्या „मासल्याची दिसते! कीटश्च कीटायते! परंतु जेथें सर्वत्र उलटा प्रकार झालेला दिसत आहे, तेथें राष्ट्रांतील पुढारी ह्मणून नावाजली जाणारी मंडळीहि कांहींशी भांबावत जावी, ही सरळच गोष्ट आहे. सध्याच्या काळाचा महिमाच असा आहे कीं स्वधर्म टाकावा, स्वदेश सोडावा व स्वभाषा विसरावी असें विचारवंतांना व देशाभिमान्यांनाहि वाटावें!

असा मराठीचा संकोच सध्या चोहोकडून होऊं लागला आहे. सरकार परदेशी पडल्यामुळें तें ह्या भाषेला वाऱ्यालाहि उभें राहूं देत नाहीं. व एतद्देशीय विद्वान् लोकांच्या स्वदेशाभिमानाच्या कल्पना कांहीं अपूर्व झाल्यामुळें, गंभीर ग्रंथरचनेच्या कामीं इंग्रजी भाषा वापरल्यानें मराठीचा आपण कांहीं गुन्हा करतों, हें त्यांच्या गावींहि नसतें. येणेप्रमाणें इंग्रजांच्या अमलाखालील महाराष्ट्रांत मराठीचा संकोच अत्यंत झालेला आहे. दहा पांच मोठीं मराठी संस्थानें आहेत, तेथीलहि दरबारी भाषा अलीकडे इंग्रजीच बनत चालली आहे. अशीच स्थिति शंभर दीडशें वर्षें चालली, तर मराठी निःसंशय—मिश्र नव्हे—भ्रष्ट नव्हे—तर अजीबात नष्ट होईल.

मुसुलमानांची संस्कृति मराठ्यांच्या संस्कृतीहून कनिष्ठ असतां व फारशी ग्रंथसमूह मराठींतल्यापेक्षां संपन्न नसतां, आणि मराठींतील

ग्रंथकारांनीं स्वभाषेला उचलून धरिली असतां, तीनशे वर्षांत फारशीनें मराठीला गिळंकृत करण्याचा जर घाट घातलेला आपण इतिहासावरून पहातों, तर जेथें राज्यकर्त्यांची संस्कृति मराठ्यांच्या संस्कृतीहून कांहीं बाबतींत निःसंशय श्रेष्ठ आहे, जेथें इंग्रजी ग्रंथ-समूह मराठी ग्रंथसमूहाहून सहस्रपट मोठा आहे व जेथें देशांतील विद्वानांनींहि स्वभाषेला सोडल्यासारखीच आहे, तेथें तीनशेंच्या ऐवजीं शंभर दीडशें वर्षांतच स्वभाषेचा अंत झाल्यास नवल कसचें? मी ह्मणतों ह्या विधानांत अतिशयोक्ति बिलकुल नाहीं. चालली आहे अशीच जर स्थिति शंभर दीडशें वर्षे चालेल तर मराठी भाषेचें दुसरें तिसरें काय होईल?

आणि स्वभाषा नष्ट होणें ह्मणजे देशावर केवढी घोर आपत्ति येणें आहे! गेलीं पंचायशीं वर्षे तर आपण बहुतेक फुकट घालविलीं. त्या सगळ्या अवधींत ज्याला प्रतिभासंपन्न ह्मणतां येईल असा मराठींत एकच ग्रंथकार उदयास आला आणि तोहि दहा पांच निबंध लिहून भर तारुण्यांत मावळून गेला. ह्यापुढें गमाविली गोष्ट पुनः साधावयाची असेल व बुडालों आहों त्याहून जास्त बुडावयाचें नसेल, तर स्वभाषेला, ह्मणजे स्वतंत्र विचाराला, ह्मणजे स्वदेशाला, कायेनें, वाचेनें व मनानें आपण शब्दशः वाहून घेतलें पाहिजे. नाहीं तर, प्रसंग कठिण आहे!

फारशी भाषेचें साम्राज्य झालें असतां, मराठी वाचविण्याला व वाढविण्याला जे उपाय पूर्वी योजिले गेले तेच उपाय सध्यांहि योजिले पाहिजेत. भाषेचा संकोच ह्मणजे आपल्या हालचालींचा संकोच, हें लक्षांत घेतलें पाहिजे. जसजशा आपल्या हालचाली संकुचित मर्यादेंत येऊं लागल्या तसतसा मराठी भाषेचा संकोच झाला. तेव्हां मराठी भाषेचा विकास करण्याला आपल्या राष्ट्रीय हालचाली वाढविल्या पाहिजेत. हालचाली न वाढवितां भाषेचा विकास करूं पहाणें ह्मणजे तद्बाह्य शक्ति न लावितां एखादी वस्तू हालवूं जाण्यासारखें आहे.

धार्मिक, सामाजिक, व्यापारिक, राजकीय, राष्ट्रीय, लौकिक, शास्त्रीय, वगैरे सर्व प्रांतांत पुनः नव्यानें जेव्हां आपण जोरानें हालचाल करावयास लागूं तेव्हां त्या त्या प्रांतांत मराठी भाषेचा उपयोगहि आपल्याला सहजगत्या करावा लागेल. भाषेंत शास्त्रीय ग्रंथसंपत्ति व्हावी ह्या सदिच्छेनें कोणी प्राणिशास्त्राच्या गूढ सिद्धान्ताचें प्रणयन मराठींत केलें, तर तो त्याचा प्रयत्न व्यर्थ जाईल. कारण राष्ट्रीय हालचालींची मर्यादा प्राणिशास्त्राच्या सिद्धान्ताचें प्रणयन अवश्य वाटण्यापर्यंत गेलेली नाहीं. मनुष्याची कर्तबगारी नमूद करण्याचें साधन भाषा होय. जेथें कर्तबगारी नाहीं तेथें भाषेनें नमूद तरी काय करावें? मुसुलमानी अमलांत मराठ्यांच्या सर्व राजकीय चालचाली बंद झाल्या. त्याबरोबर राजकीय वाङ्मयहि मराठींत व्हावयाचें बंद झालें. अशा अडचणीच्या प्रसंगीं महाराष्ट्रांतील साधुसंतांनीं हालचालींचें एक निराळेंच स्थान उत्पन्न केलें. तें स्थान धर्म व भक्ति ह्यांचें होतें. ह्या स्थानांत राष्ट्रांतील सर्व लोकांचें एकीकरण करण्याचा त्यांनीं प्रचंड उद्योग केला; व हा उद्योग लोकांना समजून देण्याकरितां मराठी भाषेचा उपयोग केला म्हणजे मराठींत ग्रंथरचना केली. पंचवीस वर्षांपूर्वीं विष्णुशास्त्री चिपळोण-करांनींहि हाच मार्ग स्वीकारला. विष्णुशास्त्री हालचाल करणारा मनुष्य होता; व जी हालचाल करण्याचा त्याचा मनोदय होता ती समजून देण्याकरितां मराठींत लिहिणें त्याला जरूर वाटलें. मराठी भाषेला उर्जित दशेला आणणें ह्या प्रयोगाचा अर्थ कांहीतरी राष्ट्रहिताची हाल-चाल करणें हा आहे; दुसरा कांहीं नाहीं. जेव्हां आपल्याइकडील कोणी गृहस्थ इंग्रजींत लिहितो किंवा बोलतो तेव्हां स्वदेशाच्या हालचालीशीं त्या बोलण्याचा किंवा लिहिण्याचा साक्षात् संबंध नसतो किंवा असल्यास फारच दूरचा असतो, असें म्हणणें ओघास येतें. रा. टिळकांनीं आर्यांचें मूलस्थान हें पुस्तक इंग्रजींत लिहिलें ह्याचा अर्थ असा होतो कीं ह्या पुस्तकांतील विषयाचा उपयोग इकडील लोकांना नसून तिकडील लोकांना आहे. म्हणजे हें पुस्तक तिकडील हालचालींच्या हितार्थ लिहिलेलें आहे, हें

उघड आहे. रानड्यांनीं मराठ्यांचा इतिहास इंग्रजींत लिहिला ह्याचाहि अर्थ हाच आहे; व इंग्लिश लोकांचीं मतें महाराष्ट्रासंबंधानें नीट करण्याकरितां हें पुस्तक आपण लिहितों असें त्यांनीं स्पष्ट ह्मटलेंहि आहे. तेव्हां स्वदेशाचें हित व स्वभाषेचा उपयोग हे समानार्थक शब्द होत हें स्पष्ट आहे. जेथें स्वदेशाचें हित नाहीं तेथें प्रायः स्वभाषेचेंहि हित नाहींच. ह्यासंबंधानें येथें आतां जास्त पाल्हाळ करावयाला वेळ नाहीं. हें प्रकरण एखाद्या स्वतंत्र निबंधाचाच विषय होण्याच्या योग्यतेचें आहे.

(९) शिवाजीच्या पत्रांच्या अनुषंगानें मोडी अक्षर व फारशीच्या सान्निध्यानें मराठी भाषेचें स्थित्यंतर, ह्या दोन बाबींचा येथपर्यंत ऊहापोह झाला. आतां शिवाजीच्या पत्रांसंबंधानें तिसरी विचार करण्यासारखी बाब ह्मटली ह्मणजे स्त्रीपुरुषांच्या नांवांची होय.

इ० स० १२९० पासून १६९६ पर्यंत महाराष्ट्रांत चातुर्वर्ण्यांतील निरनिराळ्या वर्णांच्या नांवांपुढें निरनिराळे विशिष्ट शब्द येतात. राजांच्या नांवांपुढें देव किंवा राज, राऊ, राव, असे शब्द येतात; जसें, सिंघणदेव, कृष्णदेव, रामदेव, बिंबदेव, वगैरे. कधीं कधीं हे दोन्ही शब्द नांवापुढें जोडले जात, जसें रामदेवराव. क्षत्रियांच्या नांवांपुढें सिंग, राऊ किंवा जी हे प्रत्यय लागत; जसें, मानसिंग, विकटराऊ, अमृतराऊ, धनाजी, शिवाजी, शहाजी, वगैरे. कधीं कधीं हे दोन्ही प्रत्यय लागले जात; जसें शिवाजीराऊ, धनाजीराऊ. ब्राह्मणांच्या नांवांपुढें गृहस्थ असल्यास देव, पंत, पंडित किंवा जी असे प्रत्यय लागत; जसें, ज्ञानदेव, मोरोपंडित, नारोपंत किंवा नारोजी, ब्राह्मण भिक्षुक असल्यास, त्याच्या नांवापुढें भट्ट हें पद लागे; रामभट, गुंडभट वगैरे. वैद्य, शास्त्री किंवा ज्योतिषी असल्यास, नांवापुढें तदर्थवाचक शब्द लागत; जसें, बाळज्योतिषी, नरसिंहवैद्य, कृष्णशास्त्री, रामाचार्य, इत्यादि. सामान्य ब्राह्मणांना हे प्रत्यय लावीत नसत; जसें मोरो त्रिमळ, केसो नारायण, काशी त्रिमळ, विसा मोरो, दादो नर्सो, वगैरे. वैश्यांना

सेठी, देव हीं उपपदें लावीत; जसें, नामदेऊ, दागासेठी, रामसेठी, हरिसेठी, वगैरे. शूद्रांस नुसत्या सौम्य नांवानें ओळखत व अतिशूद्रांस आ किंवा या प्रत्यय लावून हाका मारीत; जसें, हन्या मांग, राम्या महार, वगैरे. स्त्रियांस देवी, बाई, आऊ, अवा, ई, वगैरे प्रत्यय लागले जात; जसें, देवळदेवी, चांगुणाबाई, रमाऊ, रमाव्वा, रमाई, रमी, इत्यादि. ब्राह्मणांचीं एकेरी नांवें जुन्या मराठींतल्याप्रमाणें प्रायः ओकारान्त असत; जसें, केसो, रावो, मोरो, वगैरे. गायेच्या बोलण्यांत हीं नांवें उकारान्त होत, जसें केसु, रावु, मोरु, शाहु, शिऊ, वगैरे. ह्या नांवांना बहुमानार्थी बा हा प्रत्यय लागत असे, जसें केसोबा, ज्ञानोबा, तुकोबा, इत्यादि. क्षत्रियांच्या नांवांना बहुमानार्थी जी हा प्रत्यय ओकारान्त, अकारान्त, आकारान्त किंवा उकारान्त मूळ नांवांपुढें लागे; जसें, ह्मादोजी, ह्मादजी, महादाजी, ह्मादूजी. हा जी प्रत्यय संस्कृत आर्य, महाराष्ट्री अज्ज, पासून आला आहे. महादेवार्य, महादाज्ज, महादाजी, महादोजी, महादजी, महादूजी. उत्तरादाखल इंग्रजी sir ह्या अर्थी जी शब्द महाराष्ट्रांत उच्चारतात तो आर्य, अज्ज, जी अशा परंपरेनें बनला आहे. नायकिणींच्या नांवांपुढें जी प्रत्यय येतो तो अज्जा नामक प्राकृत शब्दापासून आला आहे. स्त्रियांच्या नांवांपुढील आऊ, आई, आवा, हे प्रत्यय अयि, अव्वा, वगैरे प्राकृत शब्दांपासून निघाले आहेत.

ह्या मराठी नांवांत कांहीं शब्द (१) शुद्ध संस्कृत आहेत, (२) कांहीं महाराष्ट्रींतून जुन्या मराठींत आले आहेत, (३) कांहीं शुद्ध देशी आहेत, (४) कांहीं फारशींतून आले आहेत, (५) व कांहीं तेलंगी, कानडी वगैरे द्राविड भाषांतून आले आहेत. (१) नारायण, (२) कान्होजी, (३) दगडू, (४) फिरंगोजी, व (५) तिमाजी, हीं ह्यांचीं अनुक्रमें उदाहरणें होत. आडनांवांचाहि असाच पंचविध प्रकार आहे. पिंगळे, सावंत, मराठे, काळे, शिर्के, गोरे, साळुंके, भोसले,

फर्जंद, पटवर्धन, पैसास, महाराव, यादव, जाधव, निंबाळकर, पोवार, मोहिते, चिटणीस, पोतनीस, आचार्य, वगैरे आडनांवांत संस्कृत, महाराष्ट्री, देशी, फारशी व कानडी तऱ्हेचीं आडनांवें आहेत. ह्या आडनांवांपैकीं संस्कृत शिलालेखांतील व ताम्रपटांतील आडनांवांव्यतिरिक्त जुन्यांत जुनें असें मराठी लेखांतील आडनांव ह्मटलें ह्मणजे वाडीकर सावंत यांचें होय. मठ येथील देवालयांतील इ. स. १३९७ तील लेखांत नऱ्यसीदेव व मामसावंत अशीं सावंतांचीं दोन नांवें आलीं आहेत. नऱ्यसीदेव ज्याअर्थी इ. स. १३९७ त हयात होता व त्यानें ज्याअर्थी आपला बाप मामसावंत ह्याच्याप्रीत्यर्थ मठ येथील देऊळ बांधिलें त्याअर्थी १३९७ च्या आधीं दोन चार वर्षे मामसावंत वारला असावा. ह्मणजे मामसावंताची हयात इ. स. १३६० पासून १३९७ पर्यंत सरासरी असावी. सावंतांचें मूळ आडनांव भोसले. मामसावंताचें आडनांव सावंत होण्यास त्याच्यापूर्वीं दोन चार पिढ्या त्याचे पूर्वज कोणातरी चक्रवर्ती राजाचे मांडलिक असले पाहिजेत. त्याशिवाय भोसले हें आडनांव जाऊन सावंत हें आडनांव पडावयाचें नाहीं. अर्थात्, १३६० च्या पूर्वीं शंभर वर्षे सावंतांचें कूळ कोंकणांत सावंत ह्या नांवानें मशहूर होतें असें दिसतें. ह्मणजे इ. स. १२६० च्या सुमारास हे भोसले आडनांवाचे सावंत हयात होते हें उघड आहे. ह्याचा अर्थ असा होतो कीं इ. स. १२६० मध्यें भोसले हें आडनांव कोंकणांत प्रसिद्ध होतें. हे सावंतवाडीचे भोसले सातारकर भोसल्यांचे संबंधी आहेत. ह्याला पुरावा प्रस्तुत खंडांतील १३८ वा व ६२ वा लेखांक यांचा आहे. १३८ व्या लेखांकांत मनाबाई सरदेसाईणीनें कोल्हापुरच्या संभाजी महाराजांस काका ह्या शब्दानें गौरविलें आहे. व ६२ व्या लेखांकांत दुसऱ्या शिवाजीनें सावंताना भोसले हें आडनांव लाविलें आहे. तेव्हां हें भोसल्यांचें कुळ इ. स. १२६० पासून महाराष्ट्रांत आहे हें पूर्णपणें सिद्ध आहे. आतां साताराचे छत्रपति भोसले चितोडच्या वंशापैकीं आहेत अशी जी गप्प आहे तिच्याशीं ह्या सिद्धीचा कितपत मेळ बसतो तो पाहूं. साताराची बनावट वंशावळ येणेंप्रमाणें:—

राणा लक्ष्मणसिंह चितोडकर (इ. स. १२७५–१३०३).

|

अजयसिंह

|

सुजनसिंह

(हा सन १३१० च्या सुमारास चितोडच्या दक्षिणेस सोंधवाड्यास आला).

|

दिलीपसिंह

|

भोसाजी

(ह्याच्या नांवावरून भोसावंत उर्फ भोसले हें नांव निघालें)

|

देवराजजी

(हा प्रथम दक्षिणेंत आला).

|

इंद्रसेनजी

|

शुभकृष्णजी

|

रूपसिंहजी

|

भूमींद्रजी

|

धापजी

|

बरहजी

|

संभाजी खेळोजी

|

बाबजी (जन्म इ. स. १५३३)

|

माळोजी (१५५०–१६१९)

|

शहाजी (१५९४–१६६४)

|

शिवाजी (१६२७–१६८०)

ह्या वंशावळींत देवराजजी प्रथम दक्षिणेंत आला असें ह्मटलें आहे. ज्याअर्थी राणा लक्ष्मणसिंह चितोडकर इ० स० १२७५-१३०३ पर्यंत हयात होता व देवराजजी त्याच्यापासून सहावा पुरुष होता, त्याअर्थी दर पिढीस २२ वर्षें धरिल्यास, देवराजजी इ० स० १४१३ पासून १४३५ पर्यंत हयात होता असें दिसतें. ह्मणजे सातारकर भोसल्यांचे पूर्वज इ० स० १४१३ पासून १४३५ च्या अवधींत केव्हां तरी दक्षिणेंत आले असें होतें. 'परंतु साताऱ्च्या घराण्याशीं संबद्ध असलेल्या सावंतवाडीच्या सावंतापैकीं नऱ्यसी देव इ० स० १३९७ त व मामसावंत १३६० पासून १३९७ पर्यंत हयात होते व त्यांचे पूर्वज इ० स० १२६० च्या सुमारास कोंकणांत होते असें वर सिद्ध केलें आहे. तेव्हां राणा लक्ष्मणसिंह चितोडकराच्या पूर्वीं सावंतवाडीकर भोसले कोंकणांत प्रसिद्ध होते असा ह्या सिद्धीचा अर्थ होतो. ह्मणजे भोसले हें आडनांव लक्ष्मणसिंहाच्या अगोदरचें आहे असें ह्मणावें लागतें; परंतु साताऱ्च्या बनावट वंशावळींत भोसाजीपासून भोसले हें आडनांव पडलें असें ह्मटलें आहे. ह्मणजे भोसले हें आडनांव इ० स० १३९० पासून १४१३ पर्यंतच्या अवधींत केव्हां तरी पडलें असा ह्या विधानाचा अर्थ होतो. परंतु इ० स० १३६० पासून १३९५ पर्यंत राज्य करणाऱ्या सावंतवाडीच्या मामसावंताचें आडनांवहि भोसलेच होतें. ह्मणजे भोसले हें आडनांव ज्या काळीं पडलें असें बनावट वंशावळ सांगते त्याच्या अगोदर तीस वर्षें भोसले हें आडनांव सावंतवाडीकरांना लावीत होते अशी निष्पत्ति होते. अर्थात् ह्या दोहोंपैकीं कोणतें तरी एक विधान खोटें असलें पाहिजे. येथें कोणतें विधान खरें असावें ह्यासंबंधीं वादाला जागाच नाहीं. मठ येथील शिलालेखापेक्षां बनावट वंशावळींतील मजकूर अविश्वसनीय असावा असेंच ह्मणणें भाग पडतें.

सातारकर भोसल्यांची ह्मणून जी वंशावळ प्रसिद्ध झाली आहे ती बनावट आहे, हें मठ येथील ह्या शिलालेखावरून उत्तम सिद्ध होतें. भोसले हें आडनांव शिर्के, मोहिते, मोरे, जाधव, वगैरे आडनांवांप्रमाणें

महाराष्ट्रांत फार जुनें आहे. तसेंच शिर्के, मोरे ह्यांच्याप्रमाणेंच भोसल्यांचें कुळ महाराष्ट्रांतील अस्सल आहे. त्याचा संबंध चितोडच्या रजपुतांशीं लावूं जाणें अशास्त्र आहे. शहाण्णव कुळींतील मराठे ज्यांना ह्मणतात ते जातिवंत क्षत्रिय होत. व ह्यांनाच मी मराठा किंवा महाराष्ट्र क्षत्रिय असें विशेषण मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांच्या चवथ्या खंडाच्या प्रस्तावनेंत दिलें आहे. ज्याप्रमाणें मराठा ब्राह्मण ह्मणजे महाराष्ट्रांतील ब्राह्मण त्याप्रमाणेंच मराठा क्षत्रिय ह्मणजे महाराष्ट्रांतील क्षत्रिय, असा अर्थ समजावा. ह्या महाराष्ट्र क्षत्रियांनीं रजपुतान्यांतील रजपुतांशीं संबंध जोडण्यास धावूं नये. कारण जातिनिर्णायक असे जे संस्कृत ग्रंथ आहेत त्यांत रजपूत ह्मणजे क्षत्रियांची एक कनिष्ठ प्रकारची जात आहे असें ह्मटलें आहे. तेव्हां त्यांच्याशीं तादात्म्य पावण्याची उत्कंठा इकडील कांहीं महाराष्ट्र क्षत्रियांनीं यद्यपि दाखविली व उपजातींचें एकीकरण करण्याचा स्तुत्य प्रयत्न केला तत्रापि त्यानें भोसल्यांचें कुळ चितोडच्या घराण्यापासून निपजलें ह्या ह्मणण्याला आश्रय मिळणें ऐतिहासिक रीत्या दुरापास्त आहे. शिवाय चितोडच्या घराण्याचें गोत्र, कुळदैवत, वगैरे पुष्कळ बाबी भोसल्यांच्याहून भिन्न आहेत ही कथा निराळीच आहे.

महाराष्ट्रांतील बहुतेक सर्व आडनांवें (१) धंद्यावरून, (२) खोडीवरून किंवा लकबीवरून, व (३) गांवावरून पडलीं आहेत. कित्येक आडनांवें गोत्रावरूनहि पडलीं आहेत. शिवाजीच्या वेळेस जे लाखो नवीन धंदे देशांतील लोकांना मिळाले त्यावरून मराठी, संस्कृत व फारशी नवीं व जुनीं आडनांवें प्रचारांत आलीं. मंत्री, डबीर, झुंझार, वगैरे आडनांवें शिवाजीच्या वेळेपासून नवीन घराण्यांना पडलीं आहेत. मागें इ० स० १५४१ व १५५८तील दोन लेख दिले आहेत त्यांत खालील नांवें व आडनांवें येतात:—

१ माळ पाटेलु मुरकुटा	३० बाबूजी
२ गांगो पाटेलु	३१ नगोजी
३ भोज पाटेलु	३२ कलोजी
४ ळिंगो पाटेलु	३३ गाईसेठी

५ तुक सेठी
६ भिउजी कातिकी
७ काळ पाटेलु मुंग्कट
८ जाउजी + + +
९ + + + बातगुडा
१० नाखोजी
११ काउजी
१२ धाकोजी
१३ कान्हो पाटेलु
१४ बाबाजी भाळघरा
१५ राणोजी
१६ + + + बाणुवाडा
१७ खेळोजी गुजर
१८ हरि गाउडा
१९ जैद्री पाटेलु
२० जैतोजी
२१ लखमोजी
२२ बाळोजी
२३ + + + डकवणे
२४ मालोजी
२५ प्रसोजी
२६ भाई पाटेलु
२७ रकदेऊ
२८ सोनोजी
२९ मुधोजी
३४ जानोजी हेवा
३५ कुक पाटेलु पोफळिया
३६ आंबोजी
३७ दानो पाटेलु
३८ जगो पाटेलु
३९ नागो पाटेलु
४० गोंद्य पाटेलु
४१ काळ सेठी
४२ राम सेठी गुडाळु
४३ एळनो पाटेलु मुगगुडा
४४ परसा पाटेलु
४५ खेळ पाटेलु
४६ रामो पाटेलु
४७ बाबसेठी
४८ एकसेठी विगोवी
४९ आपो पाटेलु
५० पाको पाटेलु
५१ हीरो पाटेलु
५२ भोया पाटेलु
५३ कुलम सेठी काळोखा
५४ कोयाजी
५५ आलोजी मोरिया
५६ जान पाटेलु जाधव
५७ काळो पाटेलु सुपडा
५८ माद सेठी सेठिया
५९ वणगो माळी मेहतरी

हीं याद ब्राह्मणेतर लोकांच्या नांवांची झाली. पुढील याद ब्राह्मणांच्या नांवांची आहे.

श्री

श्रीमद्गुरु बाळकृष्णस्वामी प्रसन्न ॥ श्रीसत्यपूर्णगुरुभ्यो नमः ॥ अथ मूळपुरुषविचारः ॥ तालील ॥ श्रीमूळपुरुष लक्ष्मीधरभट्ट ॥ गोत्र उपमन्य वसिष्ठ ॥ कुळदेवता भैराळलिंग मंगसोळी ॥ कोल्हापूर महालक्ष्मी ॥ वरदेवता भुवनेश्वरी ॥ आराधि देवता सिद्धविडेश ॥ मंडपदेवता शमी ॥ पुरोहित मंचभट्टी अन्योन्य ॥ स्थळदेवता रामलिंग ॥ मिर्जला परमेश्वरी ॥ श्रीशमनामीर ग्रामदेवता ॥ अडीशेरी कोठीस ॥ लक्ष्मीधर त्याचा पुत्र मंचिभट्ट ॥ त्यासि पुत्र २ दोघ ॥ मूळवृत्ति ॥ तास १ बेडग ज्योतिष अष्टाधिकारी ॥ २ तार्हाळ, ३ तंदलगे, ४ कुळकरण देश हुकेरी ॥ वज्र-चंडे पटेलकी देश मुर्तजाबाद ॥ एकवाटा ॥ दुसरा वाटा ॥ ज्योतिष्य अष्टाधिकारी मुर्तजाबाद ॥ हवेली खेडीं १० ॥ गृहस्ताचीं घरें ॥ इनामें ॥ आतां वाटा ॥ वडील पुत्र बिडंभट्ट त्यासि मृगनहळ्ळीस ठेविलें ॥ त्याचा वाटा पुरातन जाहला असे ॥ मृगनहळ्ळी ज्योतिष ॥ हवेली ज्योतिष ॥ इनामें गृहस्ताचीं घरें ॥ इतुका वाटा ॥ अथ यादि पुरुष ॥

	दुसरा वांटा.
१ लक्ष्मीधरभट्ट	१ लक्ष्मीधरभट्ट
२ मंचभट्ट	२ मंचभट्ट
३ बिडाडिभट्ट	३ कायभट्ट
४ पद्मनाभिभट्ट	४ भैरंभट्ट
५ महिपतिभट्ट	५ मायभट्ट
६ शिद्दिभट्ट गोरे	६ बापोबा

७ मल्लिभट्ट वृद्ध ७०
|
८ पिल्लंभट्ट
|
९ महिपतिभट्ट
|
१० शिद्धिभट्ट
|
११ नर्शिभट्ट
|
१२ नामदेभट्ट
|
१३ तिंमणभट्ट
|
१४ नामदेवभट्ट
|
१५ रघुनाथभट्ट
|
१६ हरिभट्ट
|
१७ रघुभट्ट

७ कायभट्ट
|
८ मायभट्ट
|
९ भैरंभट्ट
|
१० मायभट्ट
|
११ गिरिभट्ट
|
१२ तिंमणभट्ट
|
१३ रुक्माजी
|
१४ मानु
|
१५ तिमप्पा
|
१६ नंदोबा
|
१७ डोंगरोबा
|
१८ साबाजी
|
१९ माणिकभट्ट
|
२० रायभट्ट

रघुनाथभट्ट बिन नामदेवभट्ट यानें सुलतान महंमद पातशाह सदर मेहर्वानी केली ॥ हक्क ॥ ०।० जमीन पाव चावर ॥ फरकी ॥ तल ॥ नमक ॥ तसरीफ ॥ गुढा व दिवाली प्रताप तनखा चावडी रोज पैसे ४ चवुतरा कोतवाली ॥ पंचोत्री पैसे २ ॥

ही याद इ० स० १६२७पासून १६५६ पर्यंत राज्य करणाऱ्या सुलतान महंमद आदिलशहाच्या वेळची आहे. त्यावेळीं रघुनाथभट्ट बिन नामदेवभट्ट, ज्योतिषी मिरजकर, हयात होता व त्याची मूळपुरुषापासून पंधरावी पिढी होती. ह्मणजे रघुनाथभट्टाचा मूळपुरुष, २२ वर्षे दर पिढीस धरिलीं असतां, इ० स० १३००च्या सुमारास हयात होता असें दिसतें. त्यावेळेपासून १६५६ पर्यंतचीं ब्राह्मणांचीं कांहीं नांवें ह्या यादींत आहेत. ह्या यादींत (१) संस्कृत लक्ष्मीधर, (२) महाराष्ट्री पिलंभट, (३) देशी डोंगरोबा, व (४) कानडी तिमप्पा, हीं नांवें आलीं आहेत.

महाराष्ट्रांतील मराठ्यांचीं व ब्राह्मणांचीं नांवें १३०० पासून १६५६ पर्यंत कशीं होतीं त्याचा मासला वरील दोन यादींवरून पहातां येतो. त्यावरून असें दिसतें कीं ब्राह्मणांचीं नांवें ह्या तीन साडेतीनशें वर्षांत आंतर रूपानें फारशीं बदललीं नाहींत, बाह्य रूपानें मात्र किंचित् बदललीं आहेत. गांगो पाटेलु, राघो पाटेलु ह्याऐवजीं सध्यां आपण गंगू पाटील, राघू पाटील असें ह्मणतों. गांगो व राघो ह्या जुन्या रूपांचीं भाषेतील इतर शब्दांप्रमाणें गंगू व राघू अशीं रूपें सध्यां झालीं आहेत. मोरो, विसाजी, वगैरे रूपें अद्यापहि प्रचलित आहेत. तेव्हां विशेषनामांची परंपरा १३०० पासून आजपर्यंत बिनतूट चालत आली आहे हें स्पष्ट आहे.

आतां इ. स. १३०० च्या पाठीमागें विशेषनामांची परंपरा अशीच बिनतूट आहे कीं काय तें पाहूं. एतदर्थ मुसुलमानांच्या पूर्वी महाराष्ट्रावर राज्य करणाऱ्या जाधवांच्या वंशावळींतील नांवें खालीं देतों व त्यांची मुसुलमानी अमलाच्या वेळच्या नांवांशीं तुलना करतों.

जाधवांची वंशावळ.

दृढप्रहार [इ. स. ८

सेवणचंद्र

१ धाडियप्पा

१ भिल्लम

राजगी ऊर्फ श्रीराज

१ वाड्डुगि ऊर्फ वड्डिग

२ धाडियप्पा — २ भिल्लम [शक ९२२, इसवी १०००]

(२ भिल्लम याचा वंश:)

१ वेसुगि

३ भिल्लम [शक ९४८, इसवी १०२६]

२ वाड्डुगि

२ वेसुगि

४ भिल्लम

२ सेवणचंद्र [शक ९९१, इ. १०६९]

परम्मदेव — १ सिंघण

मल्लुगि

अमरगांगेय — गोविंदराज

अमरमल्लुगि — बल्लाळ

५ भिल्लम [शक ११११३ ; इ. ११९१]

[५ भिल्लम]

१ जैत्रपाळ ऊर्फ जैतुगि [इ. स. ११९१--१२१०]

२ सिंघण [इ. स. १२१०--१२४७]

२ जैत्रपाळ ऊर्फ जैतुगि

कृष्ण ऊर्फ कन्हार ऊर्फ कंधार [१२४७-१२६०]

रामचंद्र ऊर्फ रामदेव [१२७१--१३०९]

शंकर [१३०९--१३१२]

मेहुणा हरपाळ [१३१२-१३१८]

महादेव (१२६०--१२७१)

आमण

ह्यापैकीं रामचंद्र, शंकर, महादेव, गोविंद, बल्लाळ हीं नांवें अद्यापहि चालतात. जैत्रपाळ ह्याचें र्‍हस्व जैतु, जैतुगि वर दिलेल्या मराठ्यांच्या नांवांपैकीं विसावें नांव जें जैतोजी त्याच्याशीं जुळतें. जैतोजी हें जैतो ह्या नांवाचें बहुमानार्थीरूप आहे. जैतुगि ह्या शब्दांतील गि हा, जी बद्दल अपपाठ नसल्यास, बहुमानार्थी प्रत्यय तर खास आहे. प्रस्तुत खंडांतील पहिल्या लेखांकांतील कोनेरी हें नांव व ह्या वंशावळींतील कन्हार हें नांव एकच आहेत. ब्राह्मणांच्या नांवांच्या यादींतील सातवें नांव मल्लिभट्ट व यादवांच्या वंशावळींतील मल्लुगि हे दोन्ही शब्द मल्ल,

मल्लो, मल्लूपासून निघाले आहेत. राजगि हें अर्वाचीन रायजी, राजजी, राजाजी, ह्यांचें प्राचीनरूप आहे. वेमुगि व वाडुगि हीं वेमु व वाडु ह्यांचीं बहुमानार्थी रूपें आहेत. ह्यांचीं येसूजी व वाडोजी अशीं अर्वाचीनरूपें व चा य होऊन होतात. गांगेय ह्याचें गांगो हें रूप प्रसिद्ध आहे. सिंघण, सेउण, धाडियप्पा, परम्मदेव व भिल्लम ह्या शब्दांचीं अर्वाचीनरूपें मात्र फारशी सध्या प्रचलित नाहींत. ब्राह्मणांच्या यादींत बिडाडि हें नांव आलें आहे. तें बीडाद्रि ह्या नांवाचें प्राकृतरूप आहे. हेमाद्रि ह्या शब्दाचें जसें हेमाडि, हेमाड, असें रूप होतें तसेंच हेंहि होतें. मराठ्यांच्या यादींतील चांगो व तेराव्या शतकांतील चांगदेव हीं नांवें एकच आहेत. सारांश, महाराष्ट्रांतील विशेषनामांची परंपरा नवव्या शतकापर्यंत जाऊं शकेल. रामदासस्वामीची वंशावळ नवव्या शतकापर्यंत गेलेली प्रसिद्ध आहे. तसेंच पटवर्धन, वैसास, वगैरे आडनांवेंहि अशींच जुनीं आहेत. तेव्हां विशेषनामांच्या प्रदेशांत मराठ्यांच्या इतिहासाचा प्रवाह आज एक हजार वर्षे सारखा अप्रतिहत चालत आला आहे. मुसुलमानी अमलांत मेहरबान्, अजम, वगैरे उपपदें ब्राह्मण व मराठे ह्यांच्या नांवांपाठीमागें लागत, परंतु मराठशाही पुनः झाल्यावर राजश्री, राजमान्य, हे जुने मायने पुन्हां उदयास आले. प्रस्तुतकाळीं मिस्टर, सर, वगैरे शब्द महाराष्ट्रांतील लोकांच्या नांवांमागें हमेश लागलेले दिसतात. कांहीं फ़ारशी विशेषनामें घेण्यापलीकडे विशेषनामाच्या प्रदेशांत मुसुलमानी अमलांत ह्मणण्यासारखी ढवळाढवळ झाली नाहीं. परंतु कांहीं फारशी नांवें प्रचारांत आलीं ही कांहीं लहानसान गोष्ट नव्हे. उद्यां एखाद्या भटानें आपल्या मुलाचें नांव टॉमस किंवा वुइल्यम ठेवेलें तर तें जितकें विलक्षण दिसेल तितकींच फिरंगु, दर्याजी, वगैरे नांवें प्रथम ठेवतांना दिसलीं असतील. हीच टीका आडनांवांनांहि अशीच लागू करतां येईल.

(१०) प्रस्तुत खंडांत छापिलेल्या पत्रांसंबंधानें चवथी विचार करण्यासारखी बाब ह्मटली ह्मणजे गांवें, खेडीं, प्रदेश, नद्या, प्रांत, तालुके,

इलाखे, थडी, देश, ह्यांच्या नांवांची आहे. मुसुलमानांच्या पूर्वी व वेळीं ह्यांचीं नांवें कशीं होतीं व ह्यांच्या हद्दी कोठवर होत्या, ह्याचा विचार इतका महत्वाचा आहे कीं महाराष्ट्राचा मध्ययुगीन व शिवकालीन इतिहास त्याच्याशिवाय दुर्बोध राहील. परंतु, पुढील एक दोन खंडांत कांहीं फारशी लेख यावयाचे आहेत ते छापून झाल्यावर ह्या मनोरंजक व बोधप्रद प्रकरणावर खुलाशानें लिहिण्यास सोईचें पडेल.

(११) शिवकालीन पत्रव्यवहारासंबंधीं सामान्य विचार येथपर्यंत झाला. आतां ह्यापुढें प्रस्तुत खंडांत छापिलेल्या शिवाजीच्या प्रत्येक पत्रासंबंधानें बाकीच्या कांहीं बाबीविषयीं विशेष माहिती नमूद करितों.

(लेखांक १ व २). हे दोन्ही लेखांक अस्सल आहेत. ह्या दोहोंतहि शिक्का व मोर्तब फारशी आहेत. षाहनूरगादअली दियानतराव असा शिक्क्याचा पाठ मी छापील पत्रांत दिला आहे, परंतु तो चुकला आहे. खरा पाठ दियानतराव बंदेह् ईआली आदिलशाह् असा आहे. ह्या दुसऱ्या पाठाचा अर्थ आली आदिलशाहाचा सेवक दियानतराव असा होतो. मुसुलमानांची ही शिक्क्याची फारशी पद्धत शिवाजीनें उचलली. शिवाजी व त्याचे कामगार ह्यांनीं फारशीच्या ऐवजीं मराठी व संस्कृत भाषा वापरली इतकेंच. महंमद आदिलशहा १९ नोव्हेंबर १६५६त वारला व त्याचा मुलगा आली आदिलशहा गादीवर आला. ह्या दोघांच्या कारकीर्दींत दियानतराव विजापुरास दफ्तरदारीच्या कामावर होता. ह्याची जन्मभूमि चंदन किल्ल्याजवळील ओझर्डें गांव होतें. हें गांव महंमद आदिलशहानें आपल्या मर्जीतला जो नूरखान त्यास दिलें. तें चंद्रराव मोरे ह्याचें राज्य घेतल्यावर शिवाजीनें चंद्ररावाच्या राज्यांतील गांव ह्मणून काबीज केलें. ही खबर दियानतरावास कळतांच त्यानें हें गांव आपलें वतनस्थळ आहे ह्मणून निळो सोनदेवास पत्रें लिहिलीं. हीं पत्रें १६५६ च्या नोव्हेंबरांत महंमदशहा वारल्यावर लिहिलीं. ह्यावरून चंद्रराव मोऱ्याचें राज्य शिवाजीनें घेऊन १६५६ च्या नोव्हेंबरांत थोडेच महिने झाले होते असें दिसतें. चवथ्या खंडाच्या प्रस्ता-

वर्नेत चंद्रराव मोऱ्यावर शिवाजीनें १६५५ च्या एप्रिलपासून १६५६ च्या मार्चपर्यंत केव्हांतरी स्वारी केली, असें मी लिहिलें आहे. आतां ह्या पत्रांवरून असें नक्की ह्मणतां येतें कीं १६५६ च्या मार्चांत शिवाजीनें चंद्ररावाचें राज्य घेतलें. १६५५ च्या नोव्हेंबरापर्यंत महाबळेश्वरास सडकून पाऊस असतो व त्यासुमारास तें स्थान मोहीम करण्यास अशक्य असतें. १६५५ च्या नोव्हेंबरानंतर उघाड झाल्यावर शिवाजीनें मोऱ्यावर स्वारी केली व त्याचा सर्व प्रांत १६५६ च्या मार्च एप्रिलपर्यंत काबीज केला. येणेप्रमाणें ह्या पत्रांवरून शिवाजीच्या एका मोहिमेचा काळ पक्का ठरला.

महंमद आदिलशाहा ४ नोव्हेंबर १६५६ त वारला, असें डफ ह्मणतो. परंतु ज्याअर्थी तो २६ मोहरम १०६७ हिजरीस वारला त्याअर्थी १५ नोव्हेंबर १६५६ हीच त्याच्या मरणाची खरी तारीख समजली पाहिजे. ग्रांट डफनें २६ मोहरम बद्दल १६ मोहरम तवारिखेंत वाचलें असें दिसतें.

ह्या पत्रांवरून विजापूरचे आदिलशाहा, जावळीचा चंद्रराय मोरे व शिवाजी राजे भोसले, ह्या तिघांचा १६५६ त कोणत्या प्रकारचा संबंध होता तें समजतें. जावळीचा चंद्रराय मोरे वस्तुतः विजापूरच्या आदिलशाहांचा मांडलिक होता. शिवाजी राजे भोसले हा आदिलशाहांचा सरदार जो शहाजी राजे भोसले त्याचा मुलगा असून, ह्यानें इ. स. १६४३ पासून १६५६ पर्यंत घाटमाथ्यावर स्वतंत्र सत्ता स्थापण्याचा उपक्रम केला होता. ही सत्ता पुण्यापासून रोहिडखोऱ्यापर्यंत स्थापिल्यावर शिवाजीच्या प्रांतांची हद्द चंद्रराय मोऱ्याच्या राज्याच्या हद्दीला येऊन भिडली. चंद्रराय मोरे दिसण्याला यद्यपि आदिलशाहांचा मांडलिक होता, तत्रापि अलीकडील दहा पांच वर्षांत शिवाजीचें व इतर बंडखोरांचें अनुकरण करून तोहि स्वतंत्रपणेंच वागूं लागला होता. चंद्ररायाचें हें स्वतंत्र वागणेंच त्याच्या नाशाला कारण झालें. शिवाजी

बोलूनचालून स्वतंत्र बंडखोर बनला होता आणि त्याच्या प्रांताला सिद्दून दर्शनी परतंत्र व वस्तुतः स्वतंत्र अशा चंद्ररायाचा प्रांत होता. स्वतंत्रपणें वागण्याचा उपक्रम केल्यामुळें व आदिलशाहीशीं संबंध अजीबात तोडून न टाकल्यामुळें चंद्ररायाची स्थिति अगदीं निराश्रित अशी झाली होती. अशा निराश्रित स्वातंत्र्येच्छु संस्थानिकाची शिवाजीशीं गाठ पडून, विजापुरांतील बलिष्ठ सत्तेचा आश्रय तुटल्यामुळें, चंद्ररायाचा नाश झाला. त्यामुळें विजापुरांतील आदिलशाहांना राग किंवा दुःख बिलकुल झालें नाहीं. उलटें, एक शिरजोर स्वातंत्र्येच्छु संस्थानिक नष्ट झाला हें पाहून त्यांना प्रायः समाधानच वाटलें. नाहीं तर विजापुरांतील सर्वश्रेष्ठ कारभारी जो दियानतराव तो शिवाजीला चंद्ररायासंबंधानें असें शांततेचें पत्र न लिहिता. विजापुरचा मांडलिक व संस्थानिक जो चंद्रराय मोरे त्याचा प्रांत शिवाजीनें घेतला, ह्या कृत्याचा अर्थ विजापुरच्या पातशाहीवर शिवाजीनें हल्ला केला असा वस्तुतः होतो. हा हल्ला झाला असतां, विजापुरानें शिवाजीवर चालून जाऊन त्याला नेस्तनाबूद करावयाचें. परंतु तसें कांहीं एक न करतां, चंद्ररायाचा नाश झाला असतां, शिवाजीनें घेतलेल्या प्रांतांतील कोणते गांव चंद्ररायाचे व कोणते विजापुरकरांचे ह्याविषयीं विजापुरचा सर्वश्रेष्ठ मुत्सद्दी जो दियानतराव तो शिवाजीचा मुजुमदार जो निळो सोनदेव त्याशीं वाटाघाट करतो. ह्या सामोपचाराच्या वाटा-घाटीवरून असें अनुमान निघतें कीं शिवाजीची स्वतंत्र सत्ता विजापुर-करांना ह्यावेळीं मान्य झाली होती व विजापुरच्या शिरजोर संस्थानिकांना शिवाजीनें मारिलें असतां विजापुरकरांना त्याचें कांहींच वाटत नसे. ते शिवाजीच्या हालचालीकडे लक्ष एवढ्यापुरतेंच देत कीं त्यानें आपल्या प्रांतांत कांहीं गडबड करूं नये. १६५६ पर्यंत शिवाजीनें मावळांत व कोंकणांत जी धामधूम चालविली होती ती बंद करण्याला विजापूरकरांनीं ह्मणण्यासारखी कांहींच खटपट कां केली नाहीं त्याचें बिंग हें आहे. अहमदनगरची निजामशाही बुडाल्यावर तिची वांटणी दिल्ली व विजापूर येथील पातशाहांनीं केली. पैकीं विजापूरच्या वांटणीस मावळांतील व कोंकणांतील जो नवीन प्रांत आला त्यांत १६५६ पर्यंत

शिवाजीनें खबडब चालविली होती. ह्या प्रांतावर विजापूरचा जसा अम्मल बसावा तसा बसला नव्हता व तेथील संस्थानिक व अधिकारी विजापूरच्या अंकित जसे व्हावे तसे झाले नव्हते. ह्या बेबंद संस्थानिकांना, किल्लेदारांना व अधिकाऱ्यांना शिवाजीनें नेस्तनाबूद केलें, हें विजापूरच्या मुत्सद्यांना एका प्रकारें इष्टच वाटलें. बेबंद व शिरजोर संस्थानिकांचा व किल्लेदारांचा शिवाजीनें नाश केल्यावर, शिवाजीची व्यवस्था लावतां येईल असा ह्या मुत्सद्यांचा अंतस्थ हेतू होता. ह्यामुळें १६५६ पर्यंत शिवाजीच्या विरुद्ध मोहीम करण्याचा उपक्रम विजापूरच्या मुत्सद्यांनीं केला नाहीं. परंतु १६५६ नंतर विजापूरच्या मूळच्या वाई, कऱ्हाड वगैरे प्रांतांत जेव्हां शिवाजी शिरूं लागला, तेव्हां अफजलखानाला शिवाजीवर पाठविणें विजापूरकरांना अवश्य झालें. अफजलखानाच्या मोहिमेचा काय परिणाम झाला हें सर्वत्र प्रसिद्धच आहे. ह्या १६५६ पर्यंतच्या हालचालीवरून असें दिसतें कीं विजापूरच्या मुत्सद्यांचीं मनें शिवाजीनें उत्तमोत्तम पारखिलीं होतीं.

(लेखांक ३, ४, ५, ६, ७, १४, १५, १६, १७, ५४, ५५, ५६, ५७, ७७, ७८, ७९, ८०). शहाजी, शिवाजी व शाहू ह्यांस पाठविलेलीं हीं पत्रें अस्सल नाहींत; नक्कल आहेत व मूळ नसून भाषांतर आहेत. हीं भाषांतरें शिवाजीच्या वेळेस केलेलीं नसून, अलीकडे कोणी तरी केलेलीं आहेत हें ह्या पत्रांच्या भाषेवरून स्पष्टच होतें. शिवाय मूळ फारशीचीं हीं बरोबर भाषांतरें आहेत असेंहि नाहीं. मुसुलमानधर्मरक्षक हें विशेषण भाषांतरकारानें शिवाजी व शाहू यांस दिलें आहे. परंतु तें वस्तुतः दिल्लीच्या पातशाहांचें विशेषण आहे. भाषांतरकारांस ही गोष्ट समजली नव्हती. कारण हा भाषांतरकार प्रायः इसवीच्या एकोणिसाव्या शतकांतला असून, तो विशेष चिकित्सक नव्हता. ह्या सर्व पत्रांत दिलेल्या जुलुसी सनांवर व तारखांवर माझा यत्किंचित्‌हि भरंवसा नाहीं. तेव्हां ह्या पत्रांसंबंधानें येथें जास्त कांहीं लिहीत नाहीं. मूळ फारशी पत्रें साताऱ्यास आहेत ह्मणून कळतें. तीं उपलब्ध झाल्यावर त्यांच्यासंबंधीं जें बोलावयाचें तें बोलावें हें इष्ट आहे.

(लेखांक ८) हें पत्र अस्सल आहे. हें १६६८ नंतर लिहिलें आहे. कारण, सुरतेस फ्रेंच लोकांनीं आपली पहिली वखार १६६८ त स्थापिली. शिवाजीनें १६७० त सुरतेवर स्वारी केल्यानंतर ह्मणजे १६७० च्या अक्टोबरानंतर १९ रबिलावलीं ह्मणजे १६७१ च्या जुलईत हें पत्र लिहिलें आहे. मुशे डुरो ह्मणजे Monsieur Duroc ह्यावेळीं सुरतेच्या फ्रेंच वखारीचा मुख्य एजंट होता. ह्या पत्रावरून असें दिसतें कीं त्या वेळचे फ्रेंच व्यापारी शिवाजीशीं सलोख्यानें वागत. ह्याच कारणास्तव सुरतेच्या स्वारींत शिवाजीनें फ्रेंच लोकांना स्नेहानें वागविलें व फ्रेंचांनींहि शिवाजीच्या लोकांशीं स्नेहाचें वर्तन केलें. फ्रेंच लोकांनीं शिवाजीच्या लोकांशीं उद्धटपणा केला नाहीं ह्याबद्दल ग्रांट डफ फ्रेंचांना दोष देतो. "The French purchased an ignominious neutrality, by permitting Sivajee's troops to pass through their factory," (Duff, Chap. VIII.) शिवाजीचा फ्रेंच लोकांना आश्रय होता ह्मणून फ्रेंचांनीं शिवाजीच्या बाजारबुणग्यांशीं व सैनिकांशीं तक्रार केली नाहीं, ही गोष्ट डफला माहीत नव्हती. शिवाय हिंदुस्थानासारख्या परराष्ट्रांत येऊन फ्रेंचांनीं मराठ्यांशीं भांडलें पाहिजे होतें, असा जो डफनें ध्वनि काढला आहे त्याला कोणत्याहि नीतीचा आधार डफनें दिला नाहीं. एकंदरींत न्याय आणि नीति ह्यांना सोडून डफनें हें विधान केलें आहे हें उघड आहे. डफनें मराठ्यांचा इतिहास निःपक्षपातानें लिहिला आहे, असें समजणाऱ्यांनीं ह्या विधानाचा विचार करावा.

फ्रेंच कंपनीचीं ह्यावेळचीं दफ्तरें मराठ्यांच्या इतिहासाला कांहींशीं उपयोगी पडतील. पारिसांत मराठ्यांच्यासंबंधींचे कागदपत्र आहेत असें कळतें.

ह्या लेखांत, (१) अज् जाबती कप्तानें फ्रांशेश्, (२) मुक्काम पेठ रायबाग, (३) बंदर (ई) राजपुरीं व (४) बंदर (ई) सुरतेसी, हे शब्दप्रयोग (१) फ्रेंच कप्तानाच्या अधिकाराखालीं असणारा

१.शल, (२) रायबागच्या पेठेंत रहाणारा, (३) राजापूरच्या बंदरांत, व (४) सुरतेच्या बंदरास ह्यांबद्दल योजिले आहेत. तसेंच, सराफराजनामा व वर्तणूक हीं नामें नपुंसकलिंगी योजिलीं आहेत. साहेब वैभव लेहावया आज्ञा केली पाहिजे हें फारशीचें हुबेहुब भाषांतर आहे व साहेब हा प्रथमांत कर्ता फारशींतल्याप्रमाणेंच योजिला आहे. (१) शीरदीदे ठेवणें, (२) सराफराज होणें, (३) रवाना करणें, (४) आरीफ असणें, हे प्रयोगहि फारशी आहेत. सातव्या पृष्ठाच्या पहिल्या ओळींतील पहिले हा शब्द पूर्वीं ह्याअर्थीं अव्वल ह्या फारशी शब्दाबद्दल घातला आहे.

पहिल्या व दुसऱ्या लेखांचें मोडी अक्षर जाड ढोबळ आहे. फारशी दफ्तरांत मराठी मोडी अक्षर असेंच ढोबळ लिहीत. ह्या आठव्या लेखांकाचें मोडी, कानडी लोक मराठी मोडी लिहीत त्या प्रकारचें आहे. हें मोडी ढोबळ नसून वेलांट्यांच्या फरफाट्या ह्यांत अतोनात आहेत. ह्या पत्रांत ह्मणोनु, होऊनु वगैरे शब्द आहेत. ह्या पत्रावर रुपेरी बेगडीचे ठिपके आहेत. ह्या पत्रांतील साक्षीं सोमनाथपंत डबीर ह्याचा मुलगा निळो सोमनाथ डबीरीवर होता असें दिसतें.

(लेखांक ९) हें पत्र अस्सल आहे. अक्षर पहिल्या लेखांकांतल्यासारखें जाड घोसदार आहे. निळो सोनदेउ व रखमाजी शिवदेऊ शिवाजीला साहेब ह्या शब्दानें संबोधतात, त्याअर्थीं व इतर पत्रांत हाच शब्द योजिला असल्यानें, शिवाजीचे कारभारी शिवाजीस साहेब या संज्ञेनें संबोधीत असत हें उघड आहे. साहेब ह्मणजे His Majesty.

ह्या लेखांकाची तारीख ठरविणें बरेंच घोटाळ्याचें आहे. ह्यासंबंधीं विस्तारानें विवेचन मुख्य प्रस्तावनेंत करावयाचें आहे. हें पत्र खबरनविसाच्या दफ्तरांतील आहे.

(लेखांक १०) हें पत्र अस्सल आहे. हें पत्र सरंजामी ह्मणजे ज्याला सध्यां रेव्हेन्यू ह्मणतात त्या दफ्तरांतील आहे. अफजलखान

व फाजलखान ह्यांना पराजित केल्याच्या सुमारास शिवाजीनें नवे कारभारी केले. त्याचवेळीं निळो सोनदेवास मजमूदार नेमिलें.

१६६० च्या नोव्हेंबराच्या पूर्वी मोरोपंत पेशवे त्रिंबक व शिवनेर हे अवरंगझेबाचे किल्ले घेण्यांत गुंतला होता. तसेंच, ह्या सुमारास सुरगिरी म्हणजे देवगिरी ह्मणजे दौलताबाद ह्मणजे औरंगाबाद घेण्याचा शिवाजीचा विचार होता.

हें पत्र चावंडेकरांच्या दफ्तरांतील अत्यंत महत्वाचें आहे. निळो सोनदेव यास मजमूदार नेमिल्याचा हा तह ह्मणजे निश्चयलेख आहे. डफ आपल्या इतिहासाच्या सातव्या भागांत अबाजी सोनदेव यास मजमूदिली ह्मणून ह्मणतो. परंतु तें ह्या पत्रावरून निराधार आहे असें दिसतें.

(लेखांक ११) हें पत्र अस्सल आहे. ह्यांत अफजलखान अशीं अक्षरें स्पष्ट आहेत. अबदुल, अबदुला वगैरे अफजलखानाचीं नांवें बखरींतून व पवाड्यांतून आढळतात तीं अपभ्रष्ट आहेत.

हिंदू व मुसुलमान ह्यांचीं इनामें जशींचीं तशीं चालवावीं असें ह्या पत्रांत ह्मटलें आहे. ह्यावरून जिंकलेल्या प्रांतांतील हिंदूंच्याप्रमाणेंच मुसुलमानांचीं इनामें शिवाजी चालवी असें दिसतें.

हें पत्र सरंजामीपैकीं आहे. ह्यावर श्रीकार नाहीं.

(लेखांक १२) हें पत्र अस्सल आहे. मशरुल हजरती=मशहूर् अल्हजरत्. मशर=प्रसिद्ध, मान्य. अल्=चा. हजरत्=राजा स्वामी, साहेब. मशहुरल हजरत=राजमान्य. येणेंप्रमाणें ह्या पत्रांत राजमान्य हा अर्थ एकदा मराठींत व एकदा फारशींत असा दोनदा व्यक्त झाला आहे, मराठींतील राजमान्य राजश्रीप्रमाणें मशहुरल हजरत् हा फारशींतील मायना आहे. तो तीन साडेतीनशें वर्षे प्रचारांत असल्यामुळें, मराठी राजमान्य हीं अक्षरें घालून शिवाय तोही घालीत असत. ह्या शब्दांचा अर्थ प्रायःसर्व लोकांना कळत नसे. शब्द योजण्याचा मात्र सर्वत्र परिपाठ होता.

१६६३ च्या एप्रिलांत शाहिस्तेखान चाकण घेऊन पुण्यास येऊन राहिला होता. पुण्यास आल्यावर शाहिस्तेखानानें सिंहगडास फितुर केला. ही बातमी शिवाजीस कळतांच, त्यानें मोरोपंत पेशवे व निळो-पंत मुजुमदार ह्यांस राजगडाहून सिंहगडास जाण्यास हुकूम केला व बराबर तान्हाजी मालुसऱ्यास नेण्यास सांगितलें. नंतर थोडक्याच दिवसांत शिवाजीनें शाहिस्तेखानावर पुण्यांत छापा घातला. शाहिस्ते-खान पुण्यांत येण्याच्या पूर्वी शिवाजी कोकणांत नामदारखानावर जाणार होता. परंतु सिंहगडी फितवा झाल्यामुळें तो बेत तकूब करावा लागला.

ह्या पत्राला जी टीप दिलेली आहे ती बावडेकरांच्या एका जुन्या पिढीजाद कारकुनानें मूळ पत्राच्या पाठीवर लिहिली आहे. तींत ह्या पत्राचें अक्षर निळोपंताचें असावें असें ह्मटलें आहे. परंतु, निळोपंताला शिवाजीनें पाठविलेलें पत्र निळोपंताच्या हातचें कसें असूं शकेल? निळोपंताच्या वळणावर दुसरें कोणाचें अक्षर असेल.

(लेखांक १३) पत्र अस्सल आहे. ह्या पत्राच्या सहाव्या ओळींत "पाठवणें" ह्या शब्दाच्यापुढें "व आणखी कांहीं नवल अपूर्व वर्त-मान असेल तेंहि लेहोनु पाठवणें," हें वाक्य घालावें.

जगन्नाथपंत व त्रिंबक वेंकटेश हे हुजूरचे कारकून होते. जगन्ना-थपंताचें नांव शिवाजीच्या बखरींत एक दोन स्थळीं आलेलें आहे.

हें पत्र दिल्लीस जाण्याच्या अगोदर लिहिलें आहे. (शिवापट्टण ह्मणजे पुण्याजवळचें शिवापूर.) मिर्झा राजा जयसिंग पुरंधराखालीं होता व त्याच्या पश्चिमेस शिवाजी (शिवापुरास) होता.

शिवापूर नव्हे. राजगडाखालील साजीदेवपाळी हें गाव होय.

पत्राला श्रीकार नाहीं.

(लेखांक १८) हें पत्र अस्सल आहे. शिवाजी विठ्ठल दत्तो सुभेदारास "दंडवत" लिहितो, रामराम लिहित नाहीं. सरनोबत= सेनापति. पत्राला श्रीकार नाहीं.

(लेखांक १९) लेख अस्सल आहे. श्रीकार नाहीं. दिवाळ= भिंत. चिंतामणी=गणपति. जो कोट घेण्याचा ह्या पत्रांत तह केला आहे

त्याचें नाव दिलें नाहीं. गणपतीचे देवळास व कुणबिणींच्या घरांस भिंती व कोनाडे करून कोट घेऊन द्यावा, असा पत्राचा आशय आहे. परंतु कोटाच्या नांवाचा उल्लेख केला नाहीं.

(लेखांक २०) हें पत्र अस्सल आहे. ह्यावर जिजाबाईचा फारशी शिक्का आहे, तो बहुशः " जिजाआऊ वालिदा इ राजा सीवाजी, " असा असावा.

(लेखांक २१) पत्र अस्सल आहे. दस्तूर निळो सोनदेवाचें आहे. शिक्का अष्टकोनी असून त्यांत कोठेंहि चंद्रसूर्य नाहींत. शिक्याच्या ओळीं पाच आहेत व अक्षरें अगदीं स्पष्ट आहेत. जाबिता तह = आज्ञापत्र.

(लेखांक २२) वरीलप्रमाणें.

(लेखांक २३) पत्र अस्सल आहे. कृष्णाजी त्रिमळ, काशी त्रिमळ, विसाजी त्रिमळ व ह्या त्रिवर्गांची मातुश्री ह्यांच्याजवळ आग्र्याच्यापुढें मथुरेस शिवाजीनें संभाजीस ठेविलें. कृष्णाजी त्रिमळ शिवाजीबरोबर आधींच आला. काशी त्रिमळ व त्याची आई संभाजीला घेऊन आली. आणि विसाजी मथुरेसच राहिला. विश्वासराऊ हा किताब कृष्णाजी-पंताला शिवाजीनें दिला असें दिसतें. बखरींत एक लाख होन बक्षीस दिले ह्मणून ह्मटलें आहे तें अतिशयोक्त आहे. वर्क सनद बक्षीस रक्ष-खाना = खजीन्यांतून पैशाचें बक्षीस देण्याची सनद. श्रीकार नाहीं.

(लेखांक २४) लेख अस्सल आहे. मध्यें कित्येक ठिकाणीं फाटला आहे. श्रीकार नाहीं.

(लेखांक २५) लेख अस्सल आहे. फाटला आहे. श्रीकार नाहीं.

(लेखांक २६) लेख अस्सल आहे. शिवाजीनें नारळ व सुपारी ह्यांचा मक्ता केलेला होता असें दिसतें. श्रीकार नाहीं.

(लेखांक २७) लेख अस्सल आहे. शिवाजीच्यावेळीं मिठाचा सरकारी मक्ता होता. ह्या पत्राच्या पाठीवर खालील पद बाळबोधींत आहे:—

दारें आडकुनीं गौळनी । विकु गेली सांजवणी ।
मागें कृष्णाची करणी । काये करीता जाला ?
सर्वे दोनी चारी मुलें । त्यासी हळुहळु बोले ।
लोनी खाल तरी यारे मज सांगातें ।
यैसें विचारुन हरी । प्रवेसला येके घरीं ।
नेणो कवणिये कुसीभीतरीं । संचरला ।
द्वारें तैसीचि कवाडें आपण भीतर लेकडे ।
धुंडाळीतु असे डेरे खाई गोरसाचे ।
कृष्ण चोरटा गे माये चोरटा गो ।
ऐसा चोरटा श्रीपति । जो नकळे वेदा श्रुती ।
तो म्या लोनी खाता निऊता देखिला सये ॥ १ ॥
पायी होत्या घागरिया । सोडुनिया ठेविल्या ।
अद्गु वरुते केले । वाजती ह्मणुनी हळुचि घालिती पाउलें ।
कवणु कवणासी नो बोले । लोनियाचे माथुले ।
आणिती पाठे वाटी । तूप होतें अळसलें ।
दूध पीती विरजलें । ठेविती झाकुनि । आजि बरवें फावलें ।
बहुता दिसी पोट धाले । अवघे कृष्णासी मानवलें ।
तुझा बरवा सगु कृष्णु ! ॥ २ ॥
शिंका होतिया घागरिया । त्या ठेविल्या माजघरीं ।
जेथ आळमाळु अंधारी तेथ ठेवितातु ।
दयावरील स्वीळरी । हळुचि काढिती कुसरी ।
तें घालिती कृष्णाकरी । हरि स्वीकारी जो ।
मग बैसोनि येकवटा । काये बोलले सुभट ।
घास घेती मटमटा । खदखदा हासती ।
अजी बरवें फावलें । बहुता दिसीं पोट धालें ।
अवघे कृष्णासी मानवलें । तुझा बरवा सगु ! ॥ ३ ॥
मग तें अळी । झडकारुनी हाकारिलीया ।
गौळणी माते येस्वदा धावोनि पाचारिलें तेथें ।

तुं जर ह्मणसी लटिकें । आपुले पुताचे कौतुकें ।
अजी बहुतेका दिसा । हरि सापडले ।
सर्वे वडजा वाकुडा । पेंदा सुदामा रोकडा ।
वाळो दोंदिल बोबडा । आणि आठवा कृष्णु ।
ऐसे बोलिली गौळणी । ते अइकिलें चक्रपाणी ।
साता ज़णा तेथ घेऊनी । गेला कवणीकडे ॥ ४ ॥

मग तीं कुलुपें उघडुनि । भीतर आलिया गौळणी ।
भोवते पहाती भवनी । तेथ तव न दीसे कृष्णु ।
खांबीं पुसिले हात । तेथें लागलें नवनीत ।
येरी ऱ्हुदयीं विस्मित । चमत्कारु जाहाला ।
मग ती बोलिली येस्वदा । कोठें देखिलें गोविंदा ।
येरी भ्याली तिच्या शब्दा । कांहीं उत्तर नेदी ॥ ५ ॥
बोलिली गौळणी बाळा । प्रौढ साजणी त्या वो ह्मणती ।
राजनि! लोनी न समाये तुझे उतरडी ।
हांडोरी ती मली । तोंडवरी पानियाच्या घागरी । तेथें नवनीत।
पानी तावनार डेरा । तो वा सांडतो सामोरा ।
तयावरील दुसरा । त्यासी जतन करी ।
तुझे अंगणीचा आडू । क्षीरसागराचा पाडू ।
तो अंमृताहूनि गोडू । दुधें भरला असे । कृष्णु चोर ॥ ६ ॥
मग त्या बोलिल्या चतुरा । दैव आलें तुझ्या घरा ।
कैसा येक सरा । केला वाउगाचि । तुझी नांदणुक पैसी ।
चोरटे केले गे कृष्णासी । सांगे वेडिये नेणसी ।
तुज ह्मणो वो काये? ! जेव्हां हरिमुखीं अर्पिलें ।
ह्मणुनि बहुत विस्तारलें । इतुकें कशानें साचलें ।
हें तु विचारी सये ॥

कमळाकराचा दातारु । ने घे कवणाचा आभारु ।
कोटी शतगुणे विस्तारु । देतु असे ॥ ७ ॥

ह्या पदाचा कर्ता कोणी कमळाकर कवि आहे व ह्याची भाषा पंध-राव्या शतकांतील किंवा सोळाव्याच्या पूर्वार्धांतील दिसते.

(लेखांक २८) लेख नक्कल आहे. परंतु शुद्ध आहे. मशरुल अनाम=लोकमान्य. मशहुरल हजरत=राजमान्य.

(लेखांक २९) लेख नक्कल आहे व अविश्वसनीयहि आहे.

(लेखांक ३०) लेख नक्कल आहे.

(लेखांक ३१) नक्कल आहे, शुद्ध आहे. ग्रांट डफ ज्याला दर्या सागर ह्मणतो त्याचें खरें नांव दर्या सारंग होतें.

(लेखांक ३२) अस्सल आहे.

(लेखांक ३३, ३४, ३५, ३६) अस्सल आहेत. ३४व्या लेखांकांत यशवंतराऊ शहाजी हें नांव आलें आहे. यशवंतराव शिवाजीच्या समकालीन होता व त्याच्या बापाचें नांव शिवाजीच्या बापाप्रमाणेंच शहाजी होतें. शहाजी हें फारशी–मराठी नांव सतराव्या शतकांत महाराष्ट्रांत रूढ झालें होतें.

शिवाजीनें पाठविलेल्या व शिवाजीला पाठविलेल्या ह्या ३६ पत्रांपैकीं लेखांक २८ अत्यंत महत्वाचा आहे. ह्या लेखांकांतील सर्व शब्द शिवाजीच्या तोंडचे आहेत. हें पत्र शिवाजीनें सांगितलें व बाळाजी आवजीनें लिहिलें. ह्या पत्राची भाषा कारकुनी नसून साहेबी आहे. शिपाई लोकांनीं अमुक रीतीनें कां वागावें व अमुक रीतीनें कां वागू नये ह्याची फोड शिवाजीनें शिपायास करून दाखविली आहे. हें पत्र केवळ आज्ञापत्र नाहीं. पत्रांत जरब अतोनात दाखविली आहे. परंतु ती शिपायांच्या हिताची आहे असें आंतील मजकूर वाचून शिपायांनाहि वाटावें असा ह्या पत्राचा रोख आहे. हा हुकूम कारकुनाचा नसून खुद्द साहेबाचा ह्मणजे शिवाजीचा असल्यामुळें, सैनिकांच्या आदरास तो विशेष पात्र झाला असेल हें उघड आहे. ह्या पत्रांत मराठा व कुणबी असा भेद केला आहे.

(लेखांक ३७) नक्कल. कयाळनिशी=मापाऱ्याची कारकुनी.

(लेखांक ४०) नकल. अस्सलांत प्रधानांचे शिक्के आहेत. शिवाजीचा जसा भूखणकवी होता तसा संभाजीचा महेसदास होता. छंदोगामात्य ही पदवी संभाजीनें ज्या इसमास दिली होती त्याचें मूळ नांव कविकलस होतें. छंदोगामात्य ह्या शब्दाबद्दल ग्रांट डफ छंदगौमात्य असें लिहितो व ह्या शब्दाचा अर्थ expounder of the Vedas, असा टीपेंत करितो. परंतु ह्या दोन्ही गोष्टी चूक आहेत. शुद्ध शब्द छंदोगामात्य आहे व त्याचा अर्थ सामवेदाध्यायी प्रधान असा आहे. छंदोगामात्य ह्मणजे सामवेदी ब्राह्मणांची व्यवस्था करणारा अधिकारी. छंदोगामात्य ह्मणजे expounder of the Vedas हा अर्थ डफनें कोठून आणिला ईश्वर जाणे! ह्या जाड्या विद्वानांना अडचण ह्मणून कोठेंच पडत नाहीं. ह्या इसमाची दुसरी पदवी कविकलश होती असें डफ ह्मणतो. ह्या शब्दांतील कलश ह्या शब्दावरून तत्कालीन मराठ्यांनीं कलुशा हें प्रख्यात विशेषनाम निर्माण केलें. फारशींत व उर्दूंत कलुशा ह्मणजे कुंटण असा अर्थ आहे. कविकलश ह्या नांवांतील कवि ही अक्षरें गाळून कलश ह्या शब्दाचा कलुशा असा उच्चार थट्टेखोर व मत्सरग्रस्त लोक करूं लागले. कविकलस हा काश्मीरी ब्राह्मण होता. विक्रमांकदेवचरितांत बिल्हणानें आपल्या पूर्वजांची राजकलस, ज्येष्ठकलस, मुक्तिकलस अशीं नांवें दिलेलीं आहेत. त्याच धर्तीचें हें कविकलस नांव आहे. डफ ह्मणतो त्याप्रमाणें ही पदवी नाहीं. येणेंप्रमाणें कविकलस व छंदोगामात्य ह्या दोन्हींसंबंधानें डफचीं विधानें निराधार व अज्ञानव्यंजक आहेत. कविकलसाला पंडितराई दिली ह्मणून डफ ह्मणतो तेंहि निराधार आहे. कारण ह्या लेखांकाच्या खालील पहिली सही मोरेश्वर पंडितरायाची आहे. ह्या पत्रांत बाटविला हा शब्द आला आहे. भ्रष्ट=बाट्ट=बाट अशा परंपरेनें बाट हा शब्द मराठींत आला.

(लेखांक ४२) पत्र अस्सल आहे. १६९१ त संताजी घोरपडे सेनापति होता, मानसिंग मोरे हफ्त हजारी होता. धनाजी जाधव व हंबीरराव मोहिते हेहि सैन्यांत बड्या हुद्यावर होते. मल्हार दादाजी

सरसुभेदार हें नांव मराठ्यांच्या इतिहासांत प्रसिद्ध आहे. अमृतराव बिन तुकोराम निंबाळकर शिवाजीचा नातू होय. विठ्ठल गोपाळ सुभेदार प्रांत जाऊळी, हा पुरुष त्यावेळेच्या कुशल मुत्सद्यांत गणला जात असे. ह्याच्या शिक्क्यांत विठ्ठलस्य महाबुद्धेः अशीं अक्षरें आहेत.

(लेखांक ४९) याद नक्कल आहे. ह्या यादींतील हिंदु व मुसुलमान राजांचीं नांवें हव्या त्या अनुक्रमानें, हव्या त्या प्रांतांतील, हवीं तितक्या वर्षांचीं दिलेलीं आहेत. युधिष्ठिरापासून १७०७ पर्यंत कशी तरी याद आणून भिडविली आहे. मोगल बादशाहांची–बाबरापासून अवरंगझेबापर्यंतची–याद बिनचूक आहे, परंतु भोगवट्याचीं वर्षं चुकलीं आहेत. ह्या यादीच्या शेवटीं अवरंगझेबाचें राज्य जाणार असें भाकीत त्यावेळीं हिंदुस्थानांत प्रचलित झालें होतें तें नमूद केलें आहे. ह्या लेखांकांतील हा भाग इतिहासकाराला अत्यंत महत्वाचा आहे.

(लेखांक ५३) १७०५ त धनाजी जाधव सेनापति, हंबीरराव मोहिते सरलष्कर, खंडोजी निकम समशेरबहाद्दर, संताजी पांढरे शरफन्मुलूख व नेमाजी शिंदे, असे सैन्यांतील बडे हुद्देदार होते. लेख अस्सल आहे.

(लेखांक ६०–६६) हे सात लेखांक अस्सल असून ह्यांत दुसऱ्या शिवाजीनें शाहूराजाच्या फितव्याचा प्रतिरोध करण्याची खटपट कशी केली तें लिहिलें आहे.

(लेखांक ७१) ह्या लेखांकांत जातिवंत मराठ्यांचीं कुळें प्रारंभीं दिलीं आहेत. ह्या कुळांतील लोक आपल्या नांवापुढें राजे ही पदवी लावतात.

(लेखांक १६९, १७०, १७१) ह्या अस्सल लेखांत रामराजाची हकीकत आहे.

इतर लेखांविषयीं सध्यां विशेष कांहीं लिहिण्यासारखें नाहीं. त्यांचा उपयोग संकलित वृत्तांत लिहितांना व इतर स्थलीं होणार आहे.

(१२) लेखांची विशेष माहिती दिल्यावर, आतां बावडेकरांची कुळकथा द्यावयाची. परंतु हें काम बावडे येथील मराठी शाळेचे हेड-मास्तर रा० गोरे हे विस्तारानें स्वतंत्र पुस्तकाच्या रूपानें करणार असल्यामुळें, तें येथें न करणें हेंच इष्ट आहे.

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें.

खंड ८ वा.

उपोद्घात.

आतांपर्यंत 'मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांचे' पांच खंड छापून प्रसिद्ध झाले. १८९८ सालीं पहिला खंड मी स्वतःच्या खर्चानेंच छापून काढिला. पुढें लवकरच पुणें येथील चित्रशाळेच्या मालकांनीं चवथा खंड छापून प्रसिद्ध केला. मध्यंतरीं ग्रंथमाला मासिकपुस्तकांतून दुसरा व तिसरा असे दोन खंड प्रसिद्ध झाले, व ते संपूर्ण झाल्यावर पांचवा खंडही नुकताच पुरा झाला. आतां ह्या अंकापासून ८ व्या खंडास प्रारंभ करावयाचें योजिलें आहे. मधले दोन खंड ह्मणजे सहावा व सातवा--दोघा तिघा सद्गृहस्थांनीं स्वतःच्या खर्चानें छापून प्रसिद्ध करण्याचें काम अंगावर घेतलें आहे. सहावा खंड श्रीमंत माधवराव विनायक किबेसाहेब व रा. रा. श्री. वि. आठल्ये ह्या दोन गृहस्थांनीं प्रसिद्ध करण्याचें योजिलें आहे व सातवा खंड प्रोफेसर चिंतामण गंगाधर भानू याणीं हातीं घेतला आहे. सहाव्या खंडांत इ. स. १७६१ पासून १७९६ पर्यंतचे व सातव्या खंडांत इ. स. १७४० पासून १७६१ पर्यंतचे लेख प्रसिद्ध होतील. हे सात खंड प्रसिद्ध झाले ह्मणजे मराठ्यांच्या इतिहासांतील १७२८ पासून १७९६ पर्यंतचा भाग बराच व्यवस्थित झाला असें ह्मणतां येईल. बाकी ह्या अवधींतील मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांची यथासांग पूर्तता होण्यास बराच काल लागेल हें उघड आहे. रा. रा. वासुदेवशास्त्री खरे ह्यांनीं लाविलेलीं मिरज मळ्यांतलि पत्रें अद्याप बरींच छापून निघावयाचीं आहेत. तसेंच पुण्यांतील इनाम कमिटीच्या दप्तरांतील रा. ब. वाड यांनीं काढलेले वेंचे अजून बाहेर पडावयाचे आहेत. शिवाय मेणवली येथील नाना फडणीस यांचें दप्तर अद्याप जसेंच्या

तसेंच अस्पृष्ट आहे. सारांश, १७२८ पासून १७९६ पर्यंतचा मराठ्यांचा इतिहास निःशंकपणें समाधानानें लिहितां येण्यास अद्यापि बरीच सामग्री जगापुढें आणण्याची तजवीज केली पाहिजे. ही सामग्री बरीच, इतकेंच नव्हें तर, सडकून आहे हें तर सर्वश्रुत आहे. तसेंच, सामग्रीच्या वैपुल्याच्या मानानें तिच्या प्रसिद्धीकरणाचें मान फारच कोतें आहे हेंही तितकेंच सर्वश्रुत आहे. १८९८ पासून १९०२ पर्यंतच्या अवधींत मराठ्यांच्या इतिहासाच्या अश्रुतपूर्व साधनांचे एकंदर दहा भाग प्रसिद्ध झालेः—रा. रा. खरे यांचे माधवराव बल्लाळाच्या कारकीर्दीसंबंधाचे चार भाग; रा. रा पारसनिस यांच्या ब्रह्मेंद्रस्वामीच्या पत्रव्यवहाराचा एक भाग; व मी छापिलेले पांच खंड. सबंद पांच वर्षांत इतकी थोडी सामग्री बाहेर यावी ही कांहीं समाधानकारक स्थिति नाहीं. अज्ञात सामग्रीचे निदान पंचवीस तीस भाग तरी प्रसिद्ध झाले असते ह्मणजे इतिहासजिज्ञासूंचे कांहींसें समाधान झालें असतें. आतां इतकें खरें आहे कीं लिहिणें सोपें असतें व करणें तितकेंच कठिण असतें. ग्रंथ छापून काढावयाचे ह्मणजे पैसे लागतात, व ग्रंथाची छपाईदेखील निघण्यापुरते ग्राहक मिळत नाहींत, ही मुख्य ओरड आहे. व ही ओरड सर्वस्वी खरी आहे. परंतु ही ओरड हजार पांचशें वर्षांत मिटेल असा संभव क्वचित् दिसतो. इतिहासाच्या सामग्रीचे ग्रंथ कोणत्याही देशांत हजारोंनें किंवा लाखोंनें खपले आहेत असा प्रकार माझ्या तरी ऐकण्यांत किंवा वाचण्यांत कोठें आला नाहीं. तेव्हां आपलें हें महाराष्ट्रच तेवढें ह्या महासिद्धान्ताला अपवादक होत नाहीं ह्मणून मनाला वृथा शीण करून घेण्यांत अर्थ कोणता? मराठ्यांचा इतिहास सशास्त्र बनला पाहिजे हा जर मुख्य हेतू आहे, तर तो साध्य करून घेतांना कोणतीही अडचण जुमानतां कामा नये. पैसे नाहींत, गिऱ्हाईक नाहींत, गुणग्राहक नाहींत, अशी वस्तुस्थिति यद्यपि असली तत्रापि साध्य हेतूच्या आड ती कां यावी हा प्रश्नच आहे. सबंद महाराष्ट्रांत ऐतिहासिक साधनांचे भोक्ते जर दोन तीनशेंच आहेत, तर तेवढ्यापुरत्याच तीनशें प्रती काढल्या ह्मणजे विशेष खर्चांतही येण्याचें कारण

नाहीं. तात्पर्य, कसेंहीकरून व वाटेल ती तजवीज योजून मराठ्यांच्या इतिहासाची सामग्री होईल तितकी लवकर प्रसिद्ध झाली पाहिजे.

ह्या सर्व गोष्टी लक्षांत आणून प्रो. विजापूरकर यांणीं मराठ्यांच्या इतिहासाचीहीं साधनें प्रसिद्ध करण्याचें काम अंगावर घेतलें आहे. आतापर्यंत इ. स. १७२८ च्या पुढील काळचीं साधनें थोडींबहुत लोकांपुढें मांडिलीं. यापुढें हजार पांचशें पृष्ठें इ. स. १७२८ च्या पाठीमागील काळच्या ह्मणजे शहाजी, शिवाजी, संभाजी, राजाराम व दुसरा शिवाजी ह्यांच्या कारकीर्दीसंबंधींच्या माहितीनें भरून काढण्याचा मनोदय आहे. इ. स. १६६० पासून १७२८ पर्यंतच्या अवधींतील जेवढे ह्मणून इतिहासोपयोगी लेख जमा झाले तेवढे सर्व पुढील दोन तीन खंडांत छापून काढावयाचे आहेत. १७२८ च्या पुढील काळच्या इतिहाससंबंधीं शंभर लेख मिळविण्यास जितकी मेहनत लागते तितकी किंवा त्याहूनही जास्त मेहनत १७२८ च्या पूर्वीच्या इतिहासाच्यासंबंधाचें एक एक चिटोरें मिळविण्यास पुरेशी होत नाहीं. हीं चिटोरीं फार अस्ताव्यस्त पसरलीं असून त्यांच्यावर इतर आधुनिक दप्तरांचीं अनेक दडपणें बसलीं आहेत. कृष्णेच्या पूर्वेस व उत्तरेस औरंगाबादेपासून हरिहर व रायचूर या स्थानांच्या दिशेनें थेट तंजावरापर्यंत शाहाजी महाराजासंबंधींचे कागदपत्र फारशी व मराठी असे सांपडतात. कृष्णेच्या पूर्वेस, पश्चिमेस, उत्तरेस व दक्षिणेस, देशांत, मावळांत व कोंकणांत शिवाजी महाराजासंबंधीं कागदपत्र आढळतात. १७२८ च्या पूर्वीच्या बाकींच्या छत्रपतींचेही लेख थोडे फार अनेक ठिकाणीं आहेत. हे लेख व्यवस्थितपणें शोधून काढण्यास द्रव्यसाहाय्य व अंगमेहनत सध्यांपेक्षा बरीच जास्त असण्याची अपेक्षा आहे.

प्रस्तुत खंडांत श्रीमंत गगनबावडेकर यांच्या दप्तरांतील इ. स. १७२८ पर्यंतचे लेख येतील. पैकीं कांहीं लेख थोरले शिवाजी महाराज ह्यांच्या कारकीर्दींतील आहेत. बावडेकर यांचे पूर्वज सोनोपंत,

निळो सोनदेव व रामचंद्र नीळकंठ ह्या तिघांच्या हयातींत शहाजी, शिवाजी, संभाजी, राजाराम, दुसरा शिवाजी व कोल्हापूरचा संभाजी इतक्या पुरुषांच्या कारकीर्दी येतात; व ह्या तिघांनीं ह्या सर्व छत्रपतींच्या अमदानींत मोठमोठीं हुद्यांचीं व जोखमींचीं कामें केलेलीं आहेत. तेव्हां श्रीमंत बावडेकर ह्यांचें दप्तर मुळचें मोठें महत्वाचें असेल ह्यांत संशय नाहीं. परंतु इतरत्र जो प्रकार पहाण्यांत येतो त्याला अनुसरूनच ह्या दप्तरांतीलही बहुत किंवा बहुतेक जुने कागदपत्र अजीबात गहाळ होऊन गेलेले आहेत. त्यांतून जे कांहीं थोडेसे शाबूत राहिले होते ते सध्यां प्रसिद्ध होत आहेत. प्रसिद्ध होत असलेल्या ह्या पत्रांत महदानंदाची गोष्ट इतकीच कीं, शिवाजी महाराजांचीं कांहीं अस्सल पत्रें प्रथमतःच जगापुढें आणण्याचें श्रेय ह्या आपल्या पिढीला मिळत आहे. आजपर्यंत शिवछत्रपतींचीं दोन तीन पत्रेंच काय तीं छापलीं गेलीं होतीं. त्यामुळें बखरींतून व मुसलमानी तवारिखांतून दिलेलें शिवाजीचें चरित्र अजमावून व पडताळून पहाण्यास बहुतेक कांहींच साधन नव्हतें. श्रीमंत बावडेकर ह्यांच्या दप्तरांतील पत्रांवरून व इतरत्र मिळालेल्या लेखांवरून हें साधन आतां–संपूर्ण किंवा समाधानकारक तर नव्हेच–परंतु थोडेंबहुत सिद्ध होण्याच्या रंगास आलें आहे. ह्या खंडांतील हीं पत्रें व पुढील एक दोन खंडांतील पत्रें मिळून शिवकालीन राज्यपद्धतीवर व लोकस्थितीवर बराच प्रकाश पडेल असा अजमास आहे. ह्या पत्रांचे जर फोटोझिंको काढता आले असते तर सतराव्या शतकांतील मोडी लिहिण्याचाही मासला वाचकांना पहावयास मिळता; व हेमाडपंतानें महाराष्ट्रांत मोडी लिहिण्याचा प्रघात मूळ पाडला तेव्हांपासून आतापर्यंत ह्या लिहिण्यांत काय काय फेरबदल होत आले तेंही कळण्यास मार्ग झाला असता. परंतु अनेक गोष्टींच्या अभावामुळें तसें सध्यां करतां येत नाहीं. हा व पुढील एक दोन खंड ह्यांची मिळून एकच प्रस्तावना लिहिण्याचा संकल्प केला असल्याकारणानें प्रस्तुत खंडांतील पत्रांना अर्थनिर्णायक, प्रसंगविवेचक व अवांतर टीपा देण्याच्या भानगडींतही सध्यां पडत नाहीं. मुख्य प्रस्तावनेंतच एकंदर सर्वप्रकारच्या

उलगडा करण्याचा मनोदय आहे. कां कीं प्रस्तुत छापिलीं जाणारीं पत्रें आतांपर्यंत छापिलेल्या इतर पत्रांहून फारच निराळ्या प्रकारचीं आहेत. ज्या काळीं महाराष्ट्राच्या आधुनिक इतिहासाला प्रारंभ झाला, शिवस्वरूपी प्रौढप्रतापदिनकराच्या तेजानें हा देश दैदीप्यमान झाला, आणि श्रीमत् समर्थादि थोर विभूतींच्या अरुणोदयानें ह्या देशांतील सर्व समाज खडबडून जागा झाला, त्या काळच्या पत्रव्यवहाराचा परिचय मोठ्या पूज्यभावानें व अदबीनें केला पाहिजे. मनुष्यप्राण्याच्या इतिहासांत अत्यंत जुने ग्रंथ ह्मटले ह्मणजे वेद हे होत. त्याप्रमाणेंच महाराष्ट्राच्या आधुनिक राजकीय इतिहासाचे अत्यंत जुने व महत्वाचे दाखले ह्मटले ह्मणजे प्रस्तुतचे हे लेख होत. अर्वाचीन महाराष्ट्राच्या संस्कृतीचें सर्व बीज ह्या लेखांच्या मार्मिक अध्ययनापासून कळणारें आहे. तेव्हां ह्या लेखासंबंधीं किंवा ह्या लेखांवरती जें कांहीं व्याख्यान करावयाचें असेल तें, मिळण्यासारखी जेवढी ह्मणून माहिती मिळवितां येईल तेवढी सर्व एकत्र संकलित केल्यानंतर, अत्यंत दक्षतेनें व जपून करणें जरूर आहे. केवळ दहा पांच तुटक लेख घेऊन त्यावर टीपा देण्यानें प्रस्तुत प्रसंगीं काम भागणार नाहीं. भाषा, व्यवहार, राजकारण, विद्या, कला, कारखाने, दरबार, पद्धती, मायने, किल्ले, लष्कर, लढाया, तह वगैरे अनेक बाबींसंबंधीं ह्या पत्रांवरून किती अनुमानें निघतील, किती शंका उद्भवतील व कदाचित् किती वाद माजतील ह्याचा अंदाज सध्यांच करतां येत नाहीं. तेव्हां हीं पत्रें व पुढील एक दोन खंडांतील पत्रें प्रसिद्ध होऊन मर्मज्ञ टीकाकारांचें त्यांवर काय ह्मणणें पडतें हें पाहिल्यानंतर त्यासंबंधीं जें कांहीं व्याख्यान करावयाचें तें करावें असा बेत आहे. निरनिराळ्या ठिकाणांहून मिळालेले निरनिराळे लेख स्वतंत्र छापावयाचे आहेत. अर्थात् दर एक ठिकाणचीं पत्रें कालानुक्रमानें निराळ्या संचानें छापिलीं जातील.

मराठ्यांच्या इतिसाहाचीं साधनें.

खंड ८ वा.

पत्रें, यादी वगैरे.

[१] श्री.

अखंडित लक्ष्मी प्रसन्न परोपकारमूर्ती राजमान्य राजश्री निळोपंत गोसावी यासीः—

॥ छ सेवक दियानतराऊ नमस्कार विनंति उपरी. मौजे उझार्डे किल्ले वंदन माहताजी गात्र चालत असतां सांप्रत नूरखानास खा जाहाला होता. यावरी हुजूर मालूम होऊन माहालीचे देहे माहालास मोकरर केले असे. तरी मौजे मा। किल्लेचे किल्लेस दुंबाला केले पाहिजे. पहिलें, नूरखानाचेविषयीं लिहिलें होतें. त्यावरी नत्र जातां किल्लेमजकुरास दुंबाला करणें. पुढें, नूरखानाचेविषयीं लिहिलेया त्यास दुंबाला न करणें—माहताजी गावाविषयीं विनाजी कोनेरीपंत सांगतील त्यासारिखें पारपत्य देखील (केलें) पाहिजे. किल्ले वंदन आमचें वतनस्थळ आहे. त्याचे मदत करायास अंतर पडो न देणें. बहुत लिहिणें नलगे. (मोर्तबसूद)

(षाहनूरगाद अली)

(दयानतराव *)

---

[२] श्री.

अखंडित लक्ष्मी प्रसन्न परोपकारमूर्ती राजमान्य राजश्री निळोपंत गोसावी यासीः—

सेवक दियानतराऊ नमस्कार विनंति उपरी. मौजे उझार्डे किल्ले वंदन हा गांव पूर्वीपासून किल्लेचे माहाताजीच चालत असे. सांप्रत,

---

* दीयानतराऊ ह्मणजे अली इदलशहाचे वेळेस विजापूरचा सर्वश्रेष्ठ कारभारी.

गोसावियांचे लोकांनीं कबज केलें आहे. जे चंद्ररायाचे ईस्तमत जाउली-खालील गांव ह्मणोन. तरी मौजे मजकूर चंद्ररायें दिलें नाहीं व जाउलीखालें नव्हतें हें आह्मांस पूर्ण कळलें. तरी गोसावी यानीं राजे अजमास सांगोन तो गांव सोडवून किल्ले खाले बा। साबीका बेकुसूर चाले ऐसे केलें पाहिजे. हरएक विषयीं मजकूरास मदत करीत जाणें व रा। विनाजी कोनेरीपंत हेजीबराऊ + + पाठविले असेती. देहाय माहाताज किलेमजकूर याचेविषयीं आहे ती अंतःकरणीं धरून पारपत्य केलें पाहिजे. किल्ले मजकुरीं (चा अंमल) सोडून देवींजे. विशेष लिहिणें नलगे. (मोर्तब)

(सूद)

(षाह नूरगादअली)
(दीयानतराव)

१५७) फार्सी-२६ ७

---

[३] अलीफ. ३० नोव्हेंबर १६४९.

उमरावीं सरदारीच्या योग्यतेचे, शूर पराक्रमी, दौलतीचे उत्तम अभीष्टचिंतक, राजनिष्ठशिरोमणी, महत्कृपेस पात्र शाहाजी भोसले यांणीं बादशाही कृपेस आपला सत्कार जाणोन समजावें कीं तुमचे पुत्र शिवाजी यांणीं अर्जदास्त हुजूर येण्याविशीं पाठविली. ती पावून कृपेस कारण जालें. पेशजीच्या गोष्टी मनांत न आणितां तुमची मोकळीक करण्याविषयीं लिहिलें आहे. त्यास हालीं आह्मीं दिल्ली-कडे जात आहों. परंतु तुह्मांस खुषखबर देतों कीं तुह्मीं सर्व प्रकारें खातरजमा ठेवावी. जे आह्मीं हुजूर पावलियावरी तुमचे मजकुराविषयीं अर्ज करून बंदोबस्त करून देऊं. परंतु तुह्मीं आपला एक वकील इतबारी पाठवून द्यावा. ह्मणजे त्यासमागमें फर्मान कौलाचे पंज्याचे निशाणसुद्धां पाठविण्यांत येईल. आणि तुमचे चिरंजीव संभाजी वगैरे सरकारकृपेस पात्र होऊन पेशजीप्रमाणें मनसबा व नूतन सरफराज पावतील. इकडील स्नेहांत व इकडील लक्षांत वागणें हें

सर्व आपले मनोरथ पूर्ण करून घेण्यास कारण आहे. ह्मणोन तसें वागोन खातरजमा ठेवावी. आणि तुह्मांकरितां पोषाख पाठविला हा घेऊन आपणावर पूर्ण लोभ आहे असें मनांत आणावें. छ ९ माहे जिल्हेज, सन २३ जुलूस, सन १०५९ हिजरी.

---

[४] अलीफ. ३० नोव्हेंबर १६४९.

नानाप्रकारच्या स्नेहकृपेस योग्य, महत्कृपेचें पात्र, उत्तम उमदेपणास लायक, शिवाजी भोसले यांणीं बादशाही कृपेची इच्छा करून जाणावें कीं तुमचें पत्र राघोपंत याजबराबर पाठविलें, तें पावलें, आणि बादशाही कृपेस कारण जालें. जुन्नर व अमदानगर येथील देशमुखीविषयीं लिहिलें. त्यास, आह्मीं हुजूर गेल्यानंतर हा मजकूर घडोन येईल. खातरजमा ठेवावी. परंतु आपणाकडील एक वकील पाठवून द्यावा. ह्मणजे मजकूर समजून घेऊन अमलांत येईल. व वकीलास जो मजकूर विचारूं त्याचें उत्तर द्यावें, ह्मणजे काम होण्यास दिरंग लागणार नाहीं. जाणोन उद्योग करावा आणि लोभ पूर्ण जाणावा. छ ९ जिल्हेज, सन २३ जुलूस, सन १०५९ हिजरी.

---

[५] अलीफ. २३ एप्रिल १६५७.

सर्व उमरावांत श्रेष्ठ, आपले बराबरीचे मंडळींत थोर, नाना प्रकारचे कृपेस पात्र, शिवाजी भोसले, बादशाही कृपेस पात्र, कृतकृत्यता पावून जाणोत कीं तुमची अर्जदास्त इकडील पंज्याचे निशाणाचे फर्मान पोहोचल्यानंतर चिठ्ठी पावली. हरएकाविषयीं जें सांगणें तें तुह्मांकडील वकील सोनाजी यांजपाशीं सांगितलें. त्याणीं तुह्मांसी बोलोन खातरजमा केलीच असेल—सांप्रत जे किल्ले व मुलूक विजापूरकरांकडील तुमचे हातीं होते ते पेशजीप्रमाणें होऊन तुमचे मनोगताअन्वयें बंदर दाभोळ व त्याजखालील मुलूख तुह्मांस दिल्हा असे. ऐशीयास, इकडील दौलतीची किफायत मदत जी करणें असेल तिचा समय हाच आहे, जाणोन

करण्यांत आणावें, आणि हुजूर भेटीस यावे. याखेरीज जे मतलब तुमचे मनांत असतील ते सर्व घडोन येतील. हालीं तुमचे वकील यांस परत जाण्याची जलदी होती, सबब निरोप दिल्हा आहे. त्यांचे जबानीं इकडील लक्ष दिसोन दिवस तुमचा उत्कर्षाचा करण्याचा वगैरे सर्व ध्यानांत येईल. याजकरितां इकडील दौलतीचे लहान मोठे कामाकाजाची तर्तूज आपले ऊर्जिताचें कारण समजून करीत जावी व वारंवार इकडील कृपेचें इच्छित असावें. सांप्रत ईश्वरकृपा व आमचें दैवशालित्व व फौजेचे शेरपणा यांनीं इकडील वाईट इच्छिणार नाहींसे जाले. दिवसानुदिवस इकडे जय येत चालला. तो असा कीं, किल्ला बेदर हा मोठा मजबूत, आजपावेतों त्यास कोणींच सर केला नव्हता, व कोणाचे मनांत कल्याणदेखील सर करावयाची येत नव्हतीं, तो एकंदर दक्षण व कर्नाटक देशाचा दरवाजा, तो एक दिवसांत हस्तगत जाला. इतरांसी वर्षांचीं वर्षेंही वश जाला नाहीं. ईश्वराचें सर्व कृत्य! इकडील प्रतापशूरांचे शौर्यामुळें तुह्मीं येविषयींचा संतोष मानून, वरचेवर जसे आमचे जय होतील तसे त्या संतोषाचे वर्तमानावर कान ठेवीत जाणें, आणि आमचा लोभ पूर्ण आहे असें मानीत जाणें. छ १८ रजब सन ३१ जुलूस, सन १०६७ हिजरी.

१६५८ फाल्गु॰ शु॰ २

[६] अलीफ. २४ फेब्रूवारी १६५८.

आपले बराबरीचे मंडळींत श्रेष्ठ, सर्व उमराव लोकांत श्रेष्ठ, महत्कृपेस पात्र, बादशाही कृपेस योग्य, शिवाजी भोसले बादशाही कृपेस आपला सत्कार मनांत आणून समजोत कीं:—तुमची अर्जदास्त कृष्णाजी भास्कर पंडित यांच पत्रांसुद्धां रघुनाथपंत वकील यांबरोबर पाठवून (दिलेली पाहून) मजकूर ध्यानास आला. यद्यपि तुमच्या पेशजीच्या गोष्टी विसरावयाजोग्या नाहींत, तथापि तुह्मीं आपले कृतकृत्यांचा पश्चात्ताप केला आणि हा दरबार उपेक्षेचा नाहीं जाणोन, वडिलांचें लक्ष निभ्रांत इकडे आहे असें समजोन, तुमचें पूर्वकृत्य मनांत आणीत नाहीं,

येविषयींचा संतोष मानून, इकडील दौलतीविषयीं कोशीस करीत जावी. आपले वतनी माहाल, किल्ले व कोकण देशमुद्धां नगरवाले खेरीज विजापूरकर आदिलखानाचे इलारुयांत जे आहेत ते त्यांजकडून मुल्क हस्तगत जाल्यानंतर बंदोबस्त होण्याविषयीं वचन असावें, ह्मणजे सोनोपंत यांस हुजूर पाठवितों आणि इकडील लक्षांत वागून सरकारी मुलुकाची सरहद्द रक्षण करून कामदाराशीं षरीक होतो कीं ज्यायोगें बंड वगैरे बखेडे न होवोत, ह्मणोन लिहिलें. त्यास, तुह्मीं लिहिल्या अन्वयें वर्तून हा फर्मान पाहातांच आपले मजकुराची अर्जी लेहून सोनोपंताबरोबर पाठवून देणें. ह्मणजे त्याप्रमाणें केलें जाईल. जाणोन लक्षांत वागोन आमचे लोभाची पूर्णता समजावी. छ १ माहे जमादिलाखर, सन १०६८ हिजरी.

ताजा कलमः—महाराज जसवंतसिंग व कासमखान हे उभयता इकडील फौज आलीशी समजोन उज्जनीहून सहा कोस पुढें लढाईचे इराद्यानें आले होते. परंतु ईश्वरकृपेनें इकडील शूर असल लौकिकी सहा सात हजार स्वार त्यांजकडील कामास येऊन शेवटीं पळूं लागले. त्यांजकडीस खजीना व तोफखाना व हत्ती वगैरे बहुत कारखाने लुटले गेले. ईश्वरें अशा तऱ्हेनें आमची फत्ते करविली. पुढें आणखी नाना प्रकारचें जे सर्वांस संतोषदायक व शत्रूस पादाक्रांति देणार असें सत्वरच होईल. तुह्मीं याविषयींचा संतोष मानून इकडील लक्षांत राहून कल्याणाचे उमेदवार असावें. रा छ मजकूर.

---

[७] अलीफ. १४ जुलै १६५९.

आपले बराबरीचे राजांत श्रेष्ठ, सर्व उमरावांत थोर, महत्कृपेस पात्र, मुसलमान धर्मरक्षक शिवाजी यांणीं पादशाही कृपेचे उमेदवार होऊन जाणावें कीं:–इश्वरें, धर्मवृद्धि व न्याय यथास्थित होण्याबद्दल व जुलूम पृथ्वींतून नष्ट होण्याबद्दल आह्मांस जय होऊन, जे शत्रू धर्म व दौलत याविषयीं उदासीन होते त्यांस पादाक्रांत करून, छ २४

रमजान रोज रविवार या दिवशीं आह्मांस सिंहासनाधीश्वर केलें. त्या प्रभूचा बहुत उपकार मानितों. तुमची अर्जदास्त अशा संतोष समयांत पावून मजकूर ध्यानांत आला. ऐशियास तुह्मीं इकडील लक्षांत वागतच आहां, त्याअन्वयें वागून खैरखाही करीत जाणें. हालीं दक्षिणेकडील सुभ्याचे कामावर उमदेतुलमुल्क अमीरुलउमराव ह्मणोन जावयाची योजना करून तेथील सर्व लोकांचा बंदोबस्त त्यांजकडे सांगितला आहे. तरी तुह्मींही त्याचे सल्लेंत वागून, वारंवार कोशीस करून जसें पूर्वीचें बोलणें त्याप्रमाणें अमलांत आणावें. या काळीं ईश्वरकृपेनें जे मनोरथ होते ते मुलूक व दौलत येविषयींचे सिद्ध होऊन कोणतीही इच्छा राहिली नाहीं. जे जे शत्रू इकडील अपकर्षणाची वासना धरीत होते, ते ते आपले केलेले कर्माचें शासन पावून शेवटीं मुलाबाळासुद्धां बाहेकाराचे सरहद्दींत हस्तगत जाले. ते लवकरच शिक्षाही पावतील. तुह्मीं इकडील लोभ आपणावर पूर्ण आहे असें जाणून लक्षांत वागोन कृपेचे इच्छीत असावें. तुह्मांकरितां येथून पोषाख पाठविला आहे हा घ्यावा. छ. ४ जिल्काद, सन १ जुलूस, सन १०६९ हिजरी.

---

[८] अलीफ.

श्री राऊ प्रौढप्रताप दिनकर राजाधिराज महाराज राजश्री शिवाजी राजे महाराज स्वामी गोसावी यांचे सेवेसीः—

छ किंकरें तापीदास दलाल अज् जाबती कपीतानें फुरशीस मो पेंठ रायबाग रामराम विनंति येथील क्षेम महाराजांचे कृपेस्तव जाणोन महाराज साहेब आपलें सामराज वेळवेळ लिहाया आज्ञा केली पाहिजे. याउपरि—महाराजांनीं सेवकावरी अमृतवृष्टी करून पत्र पाठविलें तें छ १९ माहे रबिलाबल उत्तम समयीं पावून बहुत संतोष होऊन शिरसा वंदून सनाथ जाहालों. वा इजत रफअत दृशागाहः मुशा दुरो साहेबासी सराफराजनामा पाठविले होते तेंहि शीरदादे ठेवून बहुत संतोष जाहाले. आज्ञा केली होती जे दाभोळ बंदरास तुह्मीं येऊन, सौदा-

गरी करून सराफराज होणें. म्हणोन तरी पहिले आह्मीं बंदर राजापुरीं असतां राजश्री निळो सोमनाथपंतांनीं आह्मासी किफायतीयाचें लिहिलें होतें. त्यांचें तालीक लेहून बंदर सुरतासी आपल साहेबापासी पाठविलें होतें. त्याची जबाब अजुनी आली नाहीं. आतांही महाराज साहेबीं लिहिलेवरून त्यां लिहिलेचें तालीक लेहून, तें आपलेतर्फेनें बहुत कांहीं लेहून, मुद्दाम अदमी करून त्याबराबरी बंदर सुरतेसी रवाना करितों. तेथून जैसा रजा सादीर होईल त्याप्रमाणें वर्तणूक केलें जाईल. विशेष लेहावें तरी महाराज साहेब आरीफ असेती. सेवकावरी निरंतर अमृतवृष्टी असो दिल्हे पाहिजे. हे विनंति. खामा वेक तापीदास तवाहीदास.

[९] राजश्री—साहेब.

खबर—राजश्री—सेवेस निळो सोनदेव व रखमाजी शिवदेऊ सेवेस खबर + + + + + माहे जगादिलाखर साहेबाचे कृपादृष्टीकरून वर्तमान कल्याण असे:—

७ केसो नारायण सबनीस किल्ले राजगड याची वर्तणूक पहिलेपासून पाहतां, कारभार माकूल नाहीं. ऐसीयासी, पहिलेच भलते गोष्टीचे तहकीक करावे तरी कितेक गोष्टीकरितां करितां येत नसे. त्याउपरि, साहेब राजगडीहून मिर्जा राजाचे भेटीस गेलियावर राजगडीं हवालदार नाहीं, अगर पद्मावतीस सरनोबत नाहीं. राजगडचा कारभार केसोपंताचे शिरीं आला त्यावरी आह्मीं बारीक नजरेनें पाहतां, राजगडचे तनखापैकीं लारी ३००० तीन हजार अबाजीपंताकरन व रावोपंताकरन आलियासी, केसोपंतीं तीन हजार लारीपैकीं लारी १४०० चौदाशें गोविंद राउताचे हवाला केली. आणि उरली लारी १६०० सोळाशें आपल्या हवालगिरापाशीं ठेविली. त्यावरी घालमेली करून या प्यादियापासून त्यापाशीं, त्यापासून आणिका प्यादियापाशीं, ऐसे दोघा चौघाजवळी देती. ऐसे पंधरा रोज घालमेली करून सोळाशें लारीपैकीं सोळाचे लारीपैकीं सासे लारी तोडाविली, आणि हजार लाहारी एका

८ मराठ्यांच्या इतिहासांची साधनें.

नाईकवाडियापाशीं ठेविली. यावरी आह्मांस घुणघुण कळो आली कीं, तीन हजार लारी आगी होती, यापैकीं चौदाशें लारी चौदाशें लारी गोविंद राउताचे माहालीं दिधली आणि सोळाशें लाहारी काय केली तें कळत नाहीं. ऐसी खबर आह्मास लागतांच, आह्मीं रखमाजीपंतास सांगितलें कीं, तहशिलेस कोण गेले होते ते नाईकवाडियासी बोलावून आणणें. त्यावरी, रखमाजीपंतीं नाईकवाडियाचा नाईकवाडी बोलावून, कोण तहशिलेस गेले होते, कोणापाशीं कांहीं पैके ठेविले आहेत कीं नाहींत, ऐसे मनास आणितां, त्यापासून त्यापासीं ऐसें करितां, प्यादे कोण्ही हजीर, कोण्ही मसालियासी गेले. खबर घेतां घेतां दादजी नाईकवाडी, गुंडा नाईकवाडी यापाशीं हजार लारी ठेविली ते आडळली. त्यास खबर घेतां व चौकशी करितां बहुत घालमेली केली. त्यावरी आह्मीं नाईकवाडियासी सांगितलें कीं, हजार लारी तुजपाशीं आहे ते आमचे बगररजा खर्च न करणें. ऐसें केलें तों प्यादियापाशीं तहकिकी केली. हे खबर केसो नारायणास कळली. *

---

[१०] श्रीवरदमूर्तिर्जयति. २९ नोव्हेंबर १६६०.

सरंजामी. छ रविलाखर, सुा इहिदे सितैन अलफ.

राजश्री निळोपंत मजमूदार यास वतनीचा कारभार करावयास ठेविलें. माहोलीपासून भीमगडपावेतों व इंदपूर, पुणें, चाकण कदीम वतनीचा कारभार करावा. यासी, पंडित मा। इलेनें साहेबासी अर्ज केला कीं:—आजी कागाचे दिवस आहेत. वतनीचा कारभार आणिक कोण्हास सांगावा. आपण बराबरी येऊन दाहा लोक कामें करितील तैसी करून देऊन गड घेणें पडिलें तरी घेऊन देऊन. ऐसा अर्ज केला. त्यास साहेबीं उत्तर दिधलें कीं:—वतनी राहाणें

---

* हे खबर बहुत काळाची, राजश्री पंतीं व रखमाजी शिवदेऊ ह्मणजे किल्ले ह्मायचा हुजुरी सरसुभेदार बहुत मातबर होता त्यानें मिळोन यजमान स्वामींस लिहिली होती.

होंहि काम थोर आहे. वतनी राहाणें. येथें तुह्मांस बकशीस इमारतीस पैके पावतील त्यास दर सदे होन २ दोनीप्रमाणें पावतील. ऐसे साहेब बोलिलियावरी पंडित मा। इले बोलिले कीं:—जरी वतनीचेंहि काम थोर आहे तरी बहुत बरें. एकानें सिद्ध संरक्षण करावें. एकानें साध्य करावें. दोन्ही कामें साहेब बराबरीनें मानिताती तरी आपण वतनीं राहोन. परंतु इमारतीचे पैके पाववून बकशीस घेणार नाहीं. मोरोपंत त्रिंबक व शिवनेर येथें पाठविले आहेत ते गड घेतील व मुलूक घेतील, कामें करितील. साहेब थोर कामास जाताती तें काम श्रीचे कृपेनें होऊन येईल. त्यास राजश्री मोरोपंतास मेहेरबानीनें पंचवीस फुलें दिधलीं तरी आह्मांसहि वीस फुलें द्यावीं. ऐसा साहेबीं निश्चय केला पाहिजे. त्यावरी साहेबीं ऐसाच तह दिधला कीं:—वतनीं राहोन कारभार करावा. इमारतीचे पैके पाववून बकशीस न घ्यावें. राजश्री मोरोपंत काम करितील, गड घेतील, पैके मि (ळ) वितील, सुरागिरीचा प्रयत्न करून घेतील. त्यास, मेहेरबान होऊन, पेशवे आहेत याकारितां पंचवीस फुलें दिधलीं तरी, तुह्मांस मजमूच्या काइदियानें, वतनीचें काम तें काम बराबरी ऐसें समजोन, त्यास द्यावीं तेच वरुतीं तुह्मांसहि २० वीस फुलें पाठवावीं. या हिसेबा (नें) जैसें त्यास पावेल तैसें तुह्मांस देऊन. ऐसा साहेबीं निश्चय करून पंडित मा। ईलेस वतनीचा कारभार करावयास ठेविलें असे. पंडित मा। ईलेनेहि सदरहूप्रमाणें मान्य केलें असे. मोर्तब सूद. (मर्यादेयं)
(विराजते)

कित्ता एक. रदबदल राजश्री निळोपंतीं केली कीं:—

साहेब वतनी कारभारास ठेवीत आहेत. यास, कोण्ही कैसा वर्तेल, कोण्ही कैसा वर्तेल. यास, आपणास जे गोष्टी दखल होईल ते गोष्टीची वाजीखुसी करून. जे दखल नव्हे आणि साहेबास कळेल ते ते साहेबीं आपणास सांगावी. आपण वाजीखुसी करून. परंतु

लोक गैरमाकुल आह्मांस नकळत वर्तले तरी त्याची बदलामी आपणा-वरी न ठेवावी. आपण खुतुत गैरमाकुल सहसा वर्तणार नाहीं. कार-भारमुळें दाहा लोकांसीं बरें वाईट बोलावें लागत आहे. एखादियानें लटकेंच कांहीं सांगितलें तरी ते गोष्टीची खरी चौकशी करावी. सांगि-तलियावरूनच मनांत गैरमेहेरवानी न धरावी. बाजी खुसी करिता नेगस्त खुतुत तमा आढळिली तरी मग जे नामेहेरवानी करणें ते करावी. लोक गैरमाकुल वर्तले तरी जो जैसें करील तो तैसा पावेल. त्याची बदलामी आपणावरी नाहीं. येणेंप्रमाणें साहेबीं मान्य केलें असे. मोर्तब सूद. (मर्यादेयं)

(विराजते)

कित्ता एक. रदबदल कीं वतनीचा कारभार साहेबीं आपणास सांगि-तला आहे. यासी, काय गैरमाकुल कारभार होईल त्याची मुनसीफी साहेबीं करावी, किंवा आमची आह्मावरी टाकावी. अनाजीपंताचे सांभाळीं न करावी. ऐसे बोलिलियावरी साहेबीं मान्य केलें असे. मोर्तब सूद. (मर्यादेयं)

(विराजते)

कित्ता एक कलम. पंडित मा। इलेनें अर्ज केला कीं:—आपण कार-भार करणें तो ऐसा करून कीं जैसा आपले घरींचा खुतुत कारभार. ज्यान फाइदा समजोन करीजेत आहे (त) तैसा करून साहेबीं मेहेरवानी मात्र असो द्यावी. मोर्तब सूद. (मर्यादेयं)

(विराजते)

येणेप्रमाणें सदरहू कलमांचा तह साहेबीं दिधला असे. मोर्तब सूद. (मर्यादेयं)

(विराजते)

---

[११] १५८२ मार्ग-व-११ १८ डिसेंबर १६६०

सरंजामी. छ २४ रबिलाखर, सन इहिदे सितैन अलफ. पुणें, व इंदापूर व चाकण, सुपें, बारामती, ऐसे इनाम हिंदू व मुसलमान यांसी

इनाम आहेत. त्यास, पेशजी आपणास मुकासा असतां, अफजलखाना आधीं जेणेंप्रमाणें तसलमती ज्यास जें पावत असेल त्यास तेणेप्रमाणें देणें. ऐसा तह केला असे. मोर्तब सूद. (मर्यादेयं)
(विराजते)

---

[१२] श्री. १२ एप्रिल १६६३.

मसुरल हजरती राजमान्य राजश्री मोरो त्रिमळ पेशवे व राजश्री निळो सोनदेऊ मजमूदार प्रती राजश्री शिवाजी राजे दंडवत–उपरि. साहेबीं कोंकणांत नेमदार खानावरी जाण्याचा तह केला होता. ऐसीयासी, हालीं किल्ले सिंहगडाहून समाचार आला आहे कीं गडावरी कांहीं फितवा जाला आहे. याबद्दल तूर्त कोंकणांत जाण्याचा तह राहिला. तरी तुम्हीं लष्करी लोकांनसीं व खासखेली हशमानसीं कागद देखतांच स्वार होऊन किल्ले सिंहगडास जाणें आणि किल्लियावरच हुशार खबरदार असणें. फितवा कोण कोण लोकीं केला होता हे खबर घेऊन हुजूर लेहून पाठवणें. मा। तान्हाजी नाईक व कोंडाजी नाईक व ++ ++ हडे व कमळोजी नाईक व दरेकर व रुमाजी अहिरा व गोंदजी पांढरा हे बराबरी घेऊन सिंहगडास जाऊन सिंहगडीं अलगो अलगानीं बहुत खबरदार असणें. जे लोक किल्लियावरी मेदांत असतील ते हे आपल्या बराबरील लोक अलगेस ठेवणें. छ ४, माहे रमजान, सन सलास सितैन. पा। हुजूर. *

(मर्यादेयं)
(विराजते)

---

* हें अक्षर राजश्री पंतांचे अक्षरासारिखेंच दिसतें. होय नव्हे हा संदेह कागदांतील मकसूद पाहतां होतो.

[१३] १५८३ कार्तिक शु. ८

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री जगन्नाथपंत व त्रिंबक वेंकटेश गोसावी यांसी. मोरो त्रिमळ व निळो सोनदेऊ नमस्कार. उपरि. राजेसाहेब शिवापट्टणीं मुक्काम किती दिवस करणार, व लोहगडतर्फेनें इमारती पाहावयास जाणार, तिकडे जातील किंवा न च जात, रोहेडियाकडून पांडवगड पाहोन येणार होते ते तिकडे जातील किंवा न च जातील, हें कांहीं वर्तमान लिहिलें नाहीं. तरी सविस्तर वर्तमान लेहून पाठवणें. व चिरंजीव राजश्री राजारामाचे + + + + राजश्री साहेबास खबर लिहिली आहे ते श्रुत करून खबर सत्वर पाठवून देणें. बहुत लिहिणें न लगे. छ ३ माहे रजब. मुंडीचें वर्तमान लिहिणें. पा। हुजूर.

मोर्तब

सूद.

—————— १५८७ भाद्रप. शु. ७

[१४] अलीफ. ~~२९ आगष्ट १६६६.~~ ५ सप्टें. १६६५

आपले बराबरीचे राजांत श्रेष्ठ, सर्व उमरावांत थोर, काबील कुल महत्कृपेचें पात्र, मुसलमानी धर्मरक्षक, शिवाजी राजे यांणीं बादशाही कृपेचे उमेदवार होऊन जाणावें कीं:—सांप्रत तुमचें पत्र बहुत नरमाईचें राजे जैसिंग यांचे भेटीबद्दल कळलें. कृत्य माफ व्हावें ह्मणोन घेतलेयाचें पाहून गोड ध्यानास आला. यापूर्वी तुमचे मनांतील हाशील सरकार कामगारांनीं समजाविलें होतें कीं, तुह्मीं आपले कृत्यांचा पश्चात्ताप करून, या दौलतीचे आश्रयास येऊन, तीस किल्ले आपणाकडील इकडील कामगारांचे स्वाधीन करून, बारा किल्ले व त्यांजखालील मुलूक एक लक्ष होनांचा निजामशाहीचे किल्ले व मुलूक पैकीं, त्याचप्रकारें आणखी चार लक्ष होनांचा मुलूक तळकोंकणांतील विजापूरकरांचे इलाख्याचा जो हालीं तुह्माकडे चालू आहे, व पांच लक्ष होनांचा मुलूक बालेघाटपैकीं, विजापूरचे इलाख्यापैकीं, येणेंप्रमाणें एकंदराचा

फर्मान बादशाही मागता व चाळीस लक्ष होन दरसाल तीन लक्षप्रमाणें पेशकसीबद्दल देऊं ह्मणता. ऐशीयास, तुमच्या गोष्टी ज्या तुह्मीं तूट अंदेशा न पाहतां केल्या त्या माफीजोग्या नाहींत. तथापि राजे जैसिंग यांणीं लिहिल्यावरून तें सर्व माफ करून तुमच्या मनोरथाप्रमाणें बारा केले (देतों) त्याचा त्यांचा तपशील खालीं लिहिला आहे. व त्यांच्या खालचा मुलूक देऊन आणखी हुकूम केला आहे कीं, जो मुलूक नऊ लक्ष होनांचा त्यापैकीं चार लक्ष होनांचा तळकोंकणपैकीं विजापूरकरांचे इलाख्यापैकीं हालीं तुह्मांकडे चालत आहे तो बंदोबस्ताकरितां इकडील सरकारांत आला. सबब, बालेघाटीं पांच लक्षांचा मुलूक, विजापूर आमचे हातीं येईल त्या आधीं तुह्मीं त्यांजकडून घेतल्यास व चांगले फौजेसुद्धां राजे जैसिंग यांस मिळोन बादशाही कामांत याचे मर्जीप्रमाणें कोशीस केल्यास, विजापूर फत्ते जाल्यानंतर तुह्मीं पेशकसीचे ऐवजाचा भरणा केल्यास, तुह्माकडे बहाल ठेवूं. हालीं आमचे चिरंजीवास पांच हजारी मनसब व पांच हजार स्वार—कीं एकएकाचीं दोन दोन तीन घोडीं असावीं—याप्रमाणें देऊन, तुह्माकरितां पोषाख पाठवून, हा फर्मान आपले पंज्याच्या चिन्हांसुद्धां पाठविला आहे. तरी तुह्मीं इकडील लक्षांत वागोन, बादशाही काम लहान मोठेंसुद्धां करून, हें सर्व आपले ऊजिताचीच गोष्ट असें समजत जावें. छ ९ रबिलावल, सन ८ जुलूस, मुा सन १०७५ हिजरी. ६

किल्ल्यांचा तपशील राजे जैसिंग यांचें लिहिल्याप्रमाणें :—

१ राजगड.	१ तोरणा.	१ लिंगणगड.
१ मोरप.	१ तळेगड.	१ महाडगड.
१ घोसाळा.	१ अळवारी.	१ पाळ.
१ उभेदुर्ग.	१ रायरी.	१ कुंवारी.

[१९] अलीफ.

आपले बराबरीचे राजांत श्रेष्ठ, सर्व उमरावांत थोर, महत्कृपेस पात्र, मुसुलमानी धर्मरक्षक, शिवाजी यांणें बादशाही कृपेंत आपला सत्कार

जाणोन समजावें कीं:-तुह्मीं फौजसुद्धां बादशाही लष्करांत आहांत, आणि ताथवडा फलटण हे किल्ले विजापूरकरांकडील होते, ते घेऊन त्यांची फौज तळकोंकण प्रांतीं होती तेथें रात्रीं पोहोचविली, ह्मणोन राजे जैसिंग याणें लिहिल्यावरून तुमचे शाबासकीस कारण जालें. सबब तुह्माकरितां उत्तम पोषाख व जडावाची कट्यार पाठविली आहे. या लाभाचा संतोष मानून इत:पर या स्वारींत जितके कोशीस कराल तितकें पहिल्यापेक्षां अधिक लोभास कारण होईल. छ ७ रबिलोवल, मुा सन १०७६ हिजरी.

---

[१६] अलीफ. मार्च १६६८.

आपले बराबरीचे राजांत श्रेष्ठ, सर्व उमरावांत श्रेष्ठ, महत्कृपेस पात्र, मुसुलमानी धर्मरक्षक, शिवाजी याणें बादशाही कृपेचें उमेदवार होऊन जाणावें कीं:—तुमचें पत्र मिर्जा राजे जैसिंग याणीं ठरविल्याप्रमाणें इकडील प्रांतीं रवाना जालें तें पावून बहुत संतोष जाला. ऐशीयास, इकडील लोभ तुह्मावर पूर्ण आहे ह्मणोन अवकार न करितां खातरजमेनें मजलदरमजल निघोन यावें. ह्मणजे भेटींअंतीं बहुत सत्कार पावून माघारे जाण्याविशींचा निरोप दिल्हा जाईल. सांप्रत तुह्मांकरितां पोषाख पाठविला आहे तो घ्यावा. रा छ १० माहे सवाल, सन ९ जुलूस, सन १०७८ हिजरी.

---

[१७] अलीफ. २४ फेब्रुवारी १६७०.

आपले बराबरीचे राजांत श्रेष्ठ, सर्व उमरावांत थोर, स्नेह व विश्वास यांस योग्य, महत्कृपेस पात्र, पूर्ण लोभांत घेतलेले, राजे शिवाजी याणीं जाणावें कीं:—आमचा बहुत लोभ तुह्मांवर आहे. याजकरितां तुमचा सर्व मजकूर हुजूर लिहिल्यावरून तुह्मांस राजेपणाचा किताब दिल्हा असे. या गोष्टीचा सत्कार मानून, पेशजीपेक्षां अधिक काम करून दाखवावें. ह्मणजे सर्व मनोरथ पूर्ण होतील. तुमचे कार्याविशीं विनंति लिहिली

आहे तोही बंदोबस्त यथास्थित घडोन येईल. खातरजमा ठेवावी आणि बादशाही लोभ आपणावरी आहे असें समजावें. छ ९ माहे सवाल सन ११ जुलूस, मुा सन १०८० हिजरी.

---

[१८] ~~४ आगस्ट १६७०.~~

मशहूरल हजरत राजश्री विठ्ठल दत्तो सुभेदार व कारकून ता जाउली प्रती शिवाजी राजे दंडवत. सुहुरसन इसन्ने सबैन अलफ राजश्री प्रतापराऊ सरनोबताकडे हुजरून दहा हजार रुपये ऐवज पाठविला आहे. तरी सदरहूस वोमील इतबारी नफर १० दहा देणें. मजुरास मजुरी रास देऊन सीताब वरच्यावरी रवाना करणें. छ २७ रबिलावल. मोर्तब सूद.

---

[१९] ~~६ डिसेंबर १६७०.~~

तह. छ १९ जिल्काद, सुहुरसन इहिदे सबैन अलफ. बाबाजी सावंत याणें तरतूद करून, चिंतामणीस दिवाळ व कुणबीणस दिवाळ या करून, कोट पारखा करवून, कोटास दिवाळा करून, पारखा करवून, देववा (वा). येणेंप्रमाणें पारखा कोट करून आपणास कोट घेऊन द्या. म्हणजे सरंजाम करून येणेंप्रमाणें चालवावें:—

बाबाजी सावंत यास पाचाशा घोडियाचे जितरब घ्यावें.	चिंतामणीस दिवाळ व कुणमणीस दिवाळ यास इनाम आरधा कोटांतील द्यावा व पचां गांव चालवावे.

येणेंप्रमाणें चालवावें. ऐसा तह केला असे. मोर्तब सूद. (मर्यादेयं)
(विराजते.)

---

[२०] १६७०।१६७१.

अज् रखतखाने राजश्री जिजाआऊसाहेब दाइमदौलतहू ता मा, नारो त्रिमळ हुद्देदार व मोकद्दमानी व रयानी मौजे किवाड तर्फ खेडबारें मालूम दानद सुा इहिदे सबैन अलफ. हरी गोविंद याचा इनाम मौजे

मजकुरीं चावर १ एक आहे. कारकीर्दी दर कारकीर्दी भोगवटाबद्दल फर्मान चालत आलें आहे. आपलेंहि कारकीर्दीस चालिलें आहे. चिरंजीवाचा कागद आहे. तरी तुह्मीं भोगवटा मनास आणून, राजश्री निळो सोनदेऊ यांचे बाप सोनाजी नारायण येहीं इनाम कीर्दी करून भोगवटा चालिला आहे. हें तुह्मीं देशमुख व मोकदम यांस लिहोन सालाबाद चाललेंत आलें आहे तैसें चालवणें. दरम्यान कितेक दिवस फितवतीकरितां भोगवटा जाला नसेल, त्याचा उजूर न करणें. साला-बाद भोगवटें प्रो मनास आणून, राजश्री निळो सोनदेऊ यांचे दुमाले इनाम शेत चावर एक करून चालवीत जाणें. उजूर न करणें. तुह्मीं ताळीक लेहून घेऊन अस्सली खुद खत मा इलेपासीं फिरावून देणें. पा हुजूर चावर सदरहूचें थळ नायगावीचे शिवेचा पाणलोट नजीक पिंपरी शेतांत देहीं आंबे ठेवताती. आंबे आहे ते यांचे दुमाल करणें, आणि चालवींत जाणें.

श. १५८३

[२१] १६७१ । १६७२.

(प्रतिपच्चंद्र)
(लेखेव वर्धिष्णु र्वि-)
(श्ववंदिता ॥ शाहसू-)
(नोः शिवस्येषा मुद्रा)
(भद्राय राजते)

आबिता तह. सन इसन्ने कारणें राजश्री साहेबीं तह केला कीं:— जो आपला वतन मुलूक आहे त्यापैकीं माहालोमाहालींहून खजाना करा-वयास पैके आणावे. त्याचा खजानाच करून ठेवावा. जे वख्तीं मोगलांशीं झगडा सुरू होईल आणि मोगल येऊन गडांस वेढा घालतील त्याचे मदतीस जरूर. आणिकी करून ऐवज जुडेना तरीच खजानाचे पैके खर्च करावे. नाहीं तरी एऱ्हवीं राज्यभागास सर्वेही खर्च न करावा. ऐसा साहेबीं तह केला असे. आणि खजाना करावयाची मोईन केली होन:—

१,२५०००.
मा। एक लाख पंचवीस
हजार होन रास.

२००००	कुडाळ.
२००००	राजापूर.
२००००	कोळें.
१५०००	दाभोळ.
१३०००	पुणें.
१००००	नागोजी गोविंद.
५०००	जाउली.
५०००	कल्याण.
५०००	भिवंडी.
५०००	इंदापूर.
२०००	सुपें.
५०००	कृष्णाजी भास्कर.
१२५०००	

येणें प्रमाणें एक लाख पंचवीस हजार होन खजाना करावयाचा तह केला असे. मोर्तब सूद *

(मर्यादेयं)
(विराजते)

३१-१५८३

[२२] (प्रतिपच्चंद्र) १६७१।१६७२
(लेखेव वर्धिष्णु र्वि)
(श्ववंदिता ॥ शाहसू-)
(नोः शिवस्येषा मुद्रा)
(भद्राय राजते ॥)

* दस्तूर पंताचें.

जाबिता तह इमारती करणें. सन इसन्नेकारणें इमारती करावयाचा तह केला असे कीं गन्नाळ हुन्नरवंद लावून पैका पावत नाहीं, हुन्नरवंद गवगवा करितां काम करीत नाहींत, याबद्दल तह केला कीं नेमस्तत्र इमारती करावी.——होन:

१,७५०००

मा एक लाख पंचाहत्तरी
हजार होन रास.

५०००० . . . . ——रायगड.

३५००० दिा घरें.

२०००० तळीं २
१०००० गच्ची
५००० किल्ले

३५०००

१५००० तट

५००००

१००००	सिंहगड.
१००००	सिंधुदुर्ग.
१००००	विजयदुर्ग.
१००००	सुवर्णदुर्ग.
१००००	प्रतापगड.
१००००	पुरंधर.
१००००	राजगड.
५०००	प्रचंडगड. = तोरणा
५०००	प्रसिद्धगड.
५०००	विशाळगड.

९०००	महीपतगड.
९०००	सुधागड.
९०००	लोहगड.
९०००	सबळगड.
९०००	श्रीवर्धनगड व मनरंजन.
३०००	कोरीगड.
२०००	सारसगड.
२०००	महीधरगड.
१०००	मनोहरगड.
७०००	किरकोळ.
१,७५,०००	

येणेप्रमाणें एक लाख पंचाहत्तरी हजार होन खर्च करणें. मोर्तब सूद *

(मर्यादेयं)
(विराजते.)

---

[२३] १६७१।१६७२.

वर्के सनद बकषीस रक्षखाना राजश्री शिवाजी राजे साहेब दामदौलतहू शहुरसन इसन्ने सबैन व अलफ. साहेब अगराहून निघालेयाउपारि चिरंजीव राजश्री संभाजी राजे यांस राजश्री कृष्णाजी विश्वासराऊ यांचे सांभाळी केलें. मानइले चिरंजीवास सुखरूप किल्ले राजगडास घेऊन आले. मानइलेची मातुःश्री आईजी + बंधिली. मा काशी तिमळ हेहि बराबरी आलियाबद्दल मेहेरबानीनें बकषीस द्यावयाचा तह केला रुपये.

९००००

---

* दस्तूर राजश्री पंत ह्मणून संग्रह केला.

मो पन्नास हजार रुपये रास.

मातुःश्री आईजी	मा। काशी त्रिमळ
२५०००	२५०००

येणेप्रमाणें पाववीत पाववावे.

मोर्तब सूद *

---

[२४] ८ सप्तंबर १६७१.

मशहुरल हजरत राजश्री तुकोराम सुबेदार व कारकून सुभे मामले प्रभावळी प्रती राजश्री शिवाजी राजे दंडवत. शहुरसन इसन्ने सबैन व अलफ. उपरि सबनीस सुबे मजकूर यावरी बाद + + + + तगारा नाईकवाडी + + बापूजी नलवडा याणें कल्हावती करून तरवारेचा हात टाकिला आणि अखेर आपलेच पोटांत सुरी मारून घेऊन जीव दिल्हा. हें वर्तमान होऊन गेलें. तुह्मीं कांहीं हुजूर लिहिलें नाहीं. मराठा होऊन ब्राह्मणावरी तरवार केली, याचा नतीजा तोच पावला. हालीं बापूजी नलवडा व कोंडाजी चांदरा व संताजी जामदार हरबकसा करून सबनिसास दटावितात कीं + + + + + होतें तेंच तुमचे उपरि उचलो + + + + +— वर्तमान कळों आलें. तरी ब्राह्मणास + + + + तील त्याची खबर घेणें जरूर आहे. तुह्मीं + + + + घेत नाहींत. इतकियाउपरि त्यास ताकीद करून हालखुद ठेवणें कीं सबनिसाचे वाटे न च जात. जरी कांहीं सबनिसासी कथळा करायावरी ख + + + ल हालखुद माकुलपणें असतील तरी हुजूर लिहिणें. ह्मणजे तहकीक आहे कीं सबनीस मारायावरी आले होते याबद्दल साहेब त्यांस दस्त करून हुजूर आणवितील आणि खबर घेतील. तुह्मीं ऐसे बेकैद लोकांस होऊं न देणें. हालखुद ठेवून रवेशवार चाकरी घेत जाणें कीं कोण्ही

---

* दस्तूर बाळप्रभूचें असे. महलग निशाण पंतमहाराजांचें असे. ह्मणून संग्रह असे.

बेढंग न वर्ते. मुलाहिजा न धरणें. छ १४ जमादिलावल.
मोर्तब सूद.

---

[२५] १९ सप्तंबर १६७१.

शहरुल हजरत राजश्री धारराव निंबाळकर सुबेदार यांसी राजश्री शिवाजी राजे शहुरसन इसन्ने सबैन व अलफ. मा माहादाजी यमाजी यासी मु + + + + + + + + + + + + + + काम फर्मावून पाठविले + + + + + + + + + + दरबार करीत जाणें + + + + + + + + + तिसालींना होन्न पा। १०० एकसे रास पादशाही मोकरर केले असेती. इस्तकबिल पंचम पासून वजा वटाऊ रवेशप्रमाणें करीत जाऊन बाकी बेरीज माहे दर माहे आदा करीत जाणें. यारिदी व कागद बाहे लिहिणियामाफिक व शाही सिरें देत जाणें. बारगीर, घोडे व हवालगीर व दिवटीदार निसबत बाजे हजारी सुबाचे मजमदाराचे तहप्रमाणें चालवणें. मा। नइले हुजूर चिरंजीव संभाजी राजे याकडे वाकेनिविसीचे मुतालिकीस होते. देणें फाजील कांहीं नाहीं. मोर्तब सूद.

तेरीख छ २५ जमादिलोवल.

---

[२६] २४ सप्तंबर १६७१.

मशहुरल हजरत राजश्री तुकोराम सुबेदार व कारकून सुबे मामले प्रभावळी प्रति राजश्री शिवाजीराजे दंडवत. शहुरसन इसन्ने सबैन व अलफ. मामले दाभोळ विलायतीस नारेळ दर सद्दे लारी ४ व रोठा-देखील जकात दर खंडीस लारी १२५ सवाशेंप्रमाणें विकत आहे. आणि नेवरें व बाजे तुह्माकडील माहालीं ऐन जिन्नस बटाई दिवाणांत उसूल देताती. व रयत वांसा खरीदी करितात. ऐसें असतां, कमनिर्खें नारेळ सुपारी विकते, ऐसी खबर कळों आली आहे. तरी हा अंमल कैसा आहे? ऐन जिनसांनी गीर्दवरी कैसी करता? आणि कमनिर्खें

कोण विकितात? हे खबर घेणें आणि ताकीद करणें. पेस्तर ऐसे नव्हे, ऐन जिनसाची गीर्दवरी बरी व्हो. आणि जो तह तुह्मांकडे आहे (त्या निखें विक्री कर) णें. कम निखें विकिलिया इकडे धक्का बसतो आणि अलग नुकसान येऊं पाहातें. त्याची बदनामी तुह्मांस, ऐसें जाणून, खरी खबर घेऊन, चौकशी व गीर्दवरी करून, ऐन जिन्नस तहप्रमाणेंच दिवाणांतून विकीत जाणें. छ ३०, जमादिलावल.

---

[२७] ६ डिसेंबर १६७१. श्री. (श्री)

न.१ मार्ग १५९३ (सीव चरणीं तत्पर)

(त्रिंबकसुत मोरेश्वर)

मशहुरल हजरत राजश्री नरहरी आनंदराऊ सरसुभेदार ता। कुडाळ प्रती राजश्री शिवाजी राजे दंडवत. सुहुरसन इसन्ने सबैन अलफ. साहेबीं प्रभावळीपासून तहद कल्याण भिवंडींपावेतों मिठाचा जबर निरखाचा तह दिल्हा आहे. ऐसीयासी, बारदेशांत मीठबंदरें आहेत तेथून मीठ खरीद करून उदमी नेत आहेत. ऐसीयासी, हालीं आपणाकडे मिठाचा पाड जबर जाला, हे गोष्टी ऐकोन उदमी खळक कूल बारदेशाकडे जातील. तरी तुह्मी घाटीं जकाती जबर बैसवणें. बारदेशांत मीठ विकतें त्याचा हिशेबें, प्रभावळीकडे संगमेश्वराकडे मीठ विकतें, त्याणें कितेक जबर पडतें, तें मनास आणून त्या अजमासें जकाती जबर बैसवण कीं संगमेश्वरीं विकतें आणि घाटपावेतों जे बेरीज पडेल त्या हिशेबें बारदेशीच्या मिठास जकाती घेवणें. संगमेश्वराहून बारदेशीचें मीठ माहागच पडे ऐसा जकातीचा तह देणें. जरी जबर जकातीचा तह नेदा, मुलाहिजा कराल, ह्मणजे कुल उदमी खळक बारदेशाकडे वोहडेल. आपलीं कुल बंदरें पडतील. ऐसी गोष्टी आहे. तरी रोखा पावेल तेच घटिकेस कुल घाटीं जकाती जबर करणें. संगमेश्वराहून बारदेशीच्या मिठास जबर निरख पडे ती गोष्ट करणें. ये गोष्टीचा एक जरा उजूर न करणें. ये गोष्टींत साहेबाना बहुत फायदा आहे. जरी

जबर किमती केली आहे त्या हिशेबें बारदेशींच्या मिठास जबरच पडे ती गोष्ट करणें. व तुह्मांकडे ल्हान मीठ आहे त्याचा तह आहे त्याखेरीज हाली जाजती दर मणें टंकसाळी रुके ॥ बारा रासप्रमाणें तह देणें. मुलाहिजा न करणें. मिठाचा मामला हजाराहीबद्दल कर्द लाख रुपये यावयाचा मामला आहे. तरी लिहिलेप्रमाणें अंमल करणें. या कामाबद्दल पाठविले असती त्यांसी मसाला होन नीा ४.

रामाजी बांदे हरकारा	संताजी गिरजोजी अपातप
रा होन नीा ३	होन १

पाठवले असत. यांसीं मसाला होन नीा ४ होन, पा कुडाळपैकीं आदा करणें. रास आदा करणें. छ १४ साबान. पा हुजूर.

पौ छ २९ साबान (मर्यादेयं)

मुद्दे कुडाळ, बराबर रामाजी बार सूद. (विराजते)

बांदे हरकारा. सुरू सूद.

---

[२८] श्रीभवानी शंकर. ~~१९ मे १६७३~~.

मशरुल अनाम राजश्री जुमलेदारानीं व हवालदारानीं व कारकुनानीं दिमत पायगो मुक्काम मौजे हलवर्णे ता चिपळूण मामले दाभोळ प्रति राजश्री शिवाजी राजे सुा अर्बा सबैन व अलफ. कसबे चिपळुणीं साहेबीं लष्कराची विले केली आणि याउपरि घाटावरी कटक जावें ऐसा मान नाहीं. ह्मणून एव्हां छावणीस रवाना केलें. ऐसीयास, चिपळुणी कटकाचा मुक्काम होता याकरितां दाभोळच्या सुबेयांत पावसाळ्याकारणें पागेस सामान्य दाणा व वरकड केला होता तो कितेक खर्च होऊन गेला. व चिपळुणाआसपास विलातीत लष्कराची तसवीस व गवताची व वरकड हरएक बाब लागली. त्याकरितां हाल कांहीं उरला नाहीं. ऐसें असतां वैशाखाचे वीस दिवस, उनाळा, हेहीं पागेस अधिक. बैठी पडली. परंतु जरूर जालें त्या करितां कारकुनाकडून व गडोगडीं गल्ला असेल तो देववून जैसी तैसी पागेची बेगमी केली आहे. त्यास, तुह्मीं मनास ऐसा दाणा, रातीब,

गवत मागाल, असेल तोंवरी धुंदी करून चाराल, नाहींसें जालें ह्मणजे मग कांहीं पडल्या पावसांत मिळणार नाहीं, उपास पडतील, घोडी मरायास लागतील. ह्मणजे घोडीं तुह्मींच मारिलीं ऐसें होईल, व विलातीस तसवीस देऊं लागाल. ऐशास, लोक जातील, कोण्ही कुणब्याचेथील दाणे आणील, कोण्ही भाकर, कोण्ही गवत, कोण्ही फाटें, कोण्ही भाजी, कोण्ही पाले. ''ऐसें करूं लागलेंत ह्मणजे जीं कुणबीं घर धरून जीवमात घेऊन राहिले आहेत तेहि जाऊं लागतील. कितेक उपाशीं मराया लागतील. ह्मणजे त्याला ऐसें होईल कीं मोगल मुलकांत आले त्याहूनहि अधिक तुह्मीं! ऐसा तळतळाट होईल! तेव्हां रयतीची व घोडियांची सारी बदनामी तुह्मावरी येईल. हें तुह्मी बरें जाणून,| सिपाही हो अगर पात्तखलक हो, बहुत यादी धरून वर्तणूक करणें. कोण्ही पागेस अगर मुलकांत गांवोगांव राहिले असाल त्याणीं रयतेस काडीचा अजार द्यावया गरज नाहीं. आपल्या राहिला जागाहून बाहीर पाय घालाया गरज नाहीं.\ साहेबीं खजानांतून वाटणिया पदरीं घातलिया आहेती. ज्याला जें पाहिजे, दाणा हो अगर गुरेंढोरें वागवीत असाल त्यांस गवत हो, अगर फाटें, भाजीपाले व वरकड विकावया येईल तें, रास घ्यावें, बाजारास जावें, रास विकत आणावें. कोण्हावरी जुलूम अगर ज्याजती अगर कोण्हासी कळागती करावयाची गरज नाहीं. | व पागेस सामा केला आहे तो पावसाळा पुरला पाहिजे. ऐसे तजविजीनें दाणा रातीब कारकून देत जातील तेणेंप्रमाणेंच घेत जाणें, कीं उपास न पडतां रोजबरोज खायाला सांपडे आणि होत होत घोडीं तवाना होत ऐसें करणें. नसतीच कारकुनासी धसपस कराया, अगर अमकेंच द्या तमकेंच द्या ऐसें ह्मणाया, धुंदी करून खासदारकोठींत, कोठारांत शिरून लुटाया गरज नाहीं. व हालीं उनाळ्याला आहे तईसें खलक पागेचे आहेत, खण धरून राहिले असतील व राहातील, कोण्ही आगट्या करितील, कोण्ही भलतेच जागा चुली, रंधनाळा करितील, कोण्ही तंबाकूला आगी घेतील, गवत पडिलें आहे ऐसें अगर वारें लागलें आहे ऐसें मनास ना आणिता ह्मणजे अविस्वाच एखादा दगा होईल. एका खणास आगी लागली ह्मणजे सारे

खण जळोन जातील. गवताच्या लहल्यांस कोणीकडून तरी विस्तो जाऊन पडला ह्मणजे सारें गवत व लहल्या आहेत तितक्या एकेएक जाळों जातील. तेव्हां मग कांहीं कुणबियांच्या गर्दना मारल्या अगर कारकुनांस ताकीद करावी तैसी केली तऱ्ही कांहीं खण कराया एक लाकूड मिळणार नाहीं, एक खण होणार नाहीं. हें तो अवघियाला कळतें. या कारणें, बरी ताकीद करून, खासेखासे असाल ते हमेषा फिरत जाऊन, रंधनें करिता, आगट्या जाळिता, अगर रात्रीस दिवा घरांत असेल, अविस्राच उंदीर वात नेईल, ते गोष्टी न हो. आगीचा दगा न हो. खण, गवत वांचेल तें करणें. ह्मणजे पावसाळा घोडीं वाचलीं. नाहीं तर मग, घोडीं बांधावीं नलगेत, खायास घालावें नलगे, पागाच बुडाली !!! तुह्मीं निसूर जालेत !!! ऐसें होईल. याकारणें तपशिलें तुह्मांस लिहिलें असे. जितके खासे खासे जुमलेवार, हवालदार, कारकून आहा तितके हा रोखा तपशिलें ऐकणें, आण हुशार राहाणें. वरचेवरी, रोजाचारोज, खबर घेऊन, ताकीद करून, येणेंप्रमाणें वर्तणूक करितां ज्यापासून अंतर पडेल, ज्याचा गुन्हा होईल, बदनामी ज्यावर येईल, त्यास,—मराठियाची तो इज्जत वाचणार नाहीं, मग रोजगार कैसा?—खळक समजों जास्ती केल्यावेगळ सोडणार नाहीं. हें बरें ह्मणून वर्तणूक करणें. | छ १२ सफर.

३१५८६

[२९] ११७४

शिवाजी महाराज व इंग्रेज कंपनी यांचा तह.

१ इराणचा पातशाहा व हिंदुस्थानांतील मोगल पादशाहा यांचा व इंग्रेजांचा तह जाला. त्यांचे देशांत इंग्रेजाचा व्यापार चालत आहे.

२ व्यापार माल येईल त्याजवरी जकात घेऊं नये. महाराजाचे राज्यांत व्यापार चालावया अडथळा होऊं नये.

३ इंग्रेजाचे शिक्याचे रुपये व मोहोरा व पैसे महाराजाचे राज्यांत चालावे.

४ महाराजाचे मुलकांत दर्याचे कांठीं इंग्रेजांचीं जाहाजें मोडून फुटून किनारियास लागलीं तर त्यातील माल आमचा आह्मास द्यावा.

एकूण चार कलमें. पैकीं महाराजांनीं ठराव केला तीं कलमें:—

१ महाराजांचे राज्यांत तुह्मीं व्यापार करावा.

१ माल येईल जाईल त्याची जकात माफ केली असे.

गैरमजुरा कलमें:—

१ इंग्रेजाचे शिंक्याचे रुपये व पैसे व मोरा या मुलकांत चालणार नाहींत.

१ महाराजाचे मुलकांत दर्याचे किनारियास जहाजें मोडून फुटून किनारियास लागल्यास माल देणार नाहींत.

---

[३०] श्री. १६७३.

प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ॥
शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ॥

अज् रख्तखाने राजश्री शिवाजी राजे दामदौलेतहू. ता। बकाजी फर्जंद–सुहुरसन अर्बा सबैन व अलफ. मौजे नांदेडे तर्फ खडकंवासलें येथील मोकदमी राजवडियाची होती. त्याणें सदोजी पोळ यासी निमे तक्षीम नावनांगराची विकिली. निमे तक्षीम कीर्दीची ग्रुळियासी विकिली. त्यास सदोजी पोळापासून निमे नावनांगराची तक्षीम साहेबीं पैके देऊन विकत घेतली होती. ते हालीं तुह्मांस मेहेरबान होऊन शंभरा होनास विकत दिधली. निमे तक्षिमेचा हक्कलाजिमा व इनामचावर जें उत्पन्न असेल तें खाऊन नावनांगराची निमे पाटिलकीचा कारभार करीत जाणें. पाटिलकीची निमे तक्षीम तुज दिधली असे. लेकराचे लेकरीं औलाद अफलाद तुवा खाणें. अर्थाअर्थी कोणास संबंध नाहीं. साहेबीं निमे तक्षीम तुज दिधली असे. निमे काळी व पांढरी असे निमे तक्षीम आहे. ते तुझे तुज असे. मोर्तब सूद.

रुजू सुरनवीस.

---

[३१] श्रीशंकर प्रसन्न. १८ जानेवारी १६७५.

मशहुरुल हजरत राजश्री जिवाजी विनायक सुभेदार व कारकून सुभे मामले प्रभावळी प्रती राजश्री शिवाजी राजे दंडवत सुहुरसन खमस सबैन व अलफ दौलतखान व दरिया सारंग यांसी ऐवज व गल्ला राजश्री मोरोपंत पेशवे यांणीं वराता सुभे मजकुरावरी दिधल्या. त्यांस तुह्मीं कांहीं पावले नाहीं, ह्मणोन कळों आलें. त्यावरून अजब वाटलें कीं ऐसे नादान थोडे असतील!!! तुह्मांस समजलें असेल कीं याला ऐवज कोठें तरी ऐवज खजाना रसद पाठविलिया मजरा होईल ह्मणत असाल. तरी पद्मदुर्ग वसवून राजपुरीच्या उरावरी दुसरी राजपुरी केली आहे. त्याची मदत व्हावी, पाणी फाटी आदिकरून सामान पावावें, या कामास आरमार बेगीनें पावावें, तें नाहीं. पद्मदुर्ग हबशी फौजा चौफेर जेर करीत असतील. आणि तुह्मीं ऐवज न पाववून, आरमार खोळंबून पाडाल! एवढी हरामखोरी तुह्मीं कराल. आणि रसद पाठवून मजरा करूं ह्मणाल, त्यावरी साहेब रिझतील कीं काय? हे गोष्ट घडायाची तऱ्हीं होय न कळे कीं हबशियांनीं कांहीं देऊन आपले चाकर तुह्मांला केले असतील! त्याकरितां ऐसी बुद्धी केली असेल! तरी ऐशा चाकरांस ठीकेठीक केले पाहिजेत! ब्राह्मण ह्मणून कोण मुलाहिजा करूं पाहतो? याउपरि तऱ्हीं त्यांला ऐवज व गल्ला राजश्री मोरोपंतीं देविला असे तो देवितील. तो खजाना रसद पावलियाहून अधिक जाणून तेणेप्रमाणें आदा करणें कीं ते तुमची फिर्याद न करीत व त्यांचे पोटास पावोन आरमार घेऊन पद्मदुर्गाचे मदतीस राहात तें करणें. याउपरि बोभाट आलियाउपरि तुमचा मुलाहिजा करणार नाहीं. गनीमाचे चाकर, गनीम जालेस, ऐसें जाणून बरा नतीजा तुह्मास पावेल. ताकीद असे. रवाना छ २ जिल्काद. ऐतिहासिक १८४३ पृ. १३३.

---

[३२] श्री. ३१ मे १६७५.

मा। अनाम शामजी आवजी हवालदार व कारकून तर्फ जाळगाऊ मालूम दानद. सु॥ सीत सबैन अलफ. सूर्याजी ढुंडुसकर, जुमला हसम

पावलोक, वस्ती मौजे पालघर तर्फ मजकूर, याच्या चाकराची बाईल किल्ले रायगडास मजुरीस खपावया इमारतीकडे आली होती. ऐसियासी तिणें कांहीं बदमल इमारतीस मजुरी करीत असतां केला होता. ऐसियासी, नरहरी बाबाजी तर्फदार तर्फ मजकूर यासी हे हकीकत कळलियावरी ते बाइकोपासून सत्तावन घ्यावे ये गोष्टीचे तसवीस लाऊन, सूर्याजी दुंदुसकर याचे घरीं मोकळदार बैसविले कीं सत्तावन देणें. ह्मणून तर्फदार मारीं तसवीस लाविली आहे ह्मणून हुजूर कळों आलें. तरी ज्याचा चाकर तोच येथें चाकराचा धनी आहे. जे काय हकीकत असेल ते हुजूर लेहून पाठवणें. त्याची विरहे हुजूर होईल. तुह्मीं सूर्याजी दुंदुसकर याचे घरांचे मोकळदार उठवणें, आणि सूर्याजी मजकुरास तेविशी तोशिस न लावणें. हें खत, कागद कुल हकीकत हुजूर लेहून पाठवणें. छ १६ रबिलोवल. मोर्तब सूद.

---

[३३] श्री. ३० जुलै १६७७.

१५९९ श्रावण २३ ११

श्री

शिवचरणीं तत्पर

त्र्यंबकसुत मोरेश्वर

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक ४ पिंगलनाम संवत्सरे श्रावण शुद्ध एकादशी इंदुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शिव छत्रपति यांणीं नागोजी भोसले मुद्राधारी कोट उटळूर यांसी आज्ञा केली ऐसी जे:—स्वामी तुह्मावरी कृपाळू होऊन कोटमजकुरीचा हवाला देऊन सरंजामी केली व एक मराठी नाईकवाडीहि देऊन सरंजामी केली. येणेंप्रमाणें बितपशिल:—

खासा तुह्मी नागोजी भोसले हवालदार कोटमजकूर सालीना तैनात वराह पादशाही १५०
एक खासा चाकर दोन एकूण
१२५ २५

कृष्णाजी सुरेवंशी पेशजी चाकर रा। हालीं कोटमजकुरीची सरनोबती देऊन तैनात सालीना होन पा। १००
—छग—०—

एकूण असामी ३ तीन रास. यांसी तैनात वराह पा। सालीना होन अडीचशे दो रास. व दर माहे तैनात वराह पा। तीन रास. इा। पैवस्तगी-पासून वजा वाटा उरवेधी वजा करून बाकी बेरीज माहे दर माहे आदा करीत जाणें. व याखेरीज तुह्मांस हुजूर पोता वाटणी पावली तितपशील:—

खासा हवालदार वाटणी बेरीज
होन कावेरी फुलम
पाक होन चंजावरी
११ २०

सोनजी रायाजी चव्हाण नाई-कवाडी वाटणी माहे दोनी
एकूण कावेरी पाक
होन ६

कृष्णाजी सुरेवंशी सरनोबत यासी वाटणी कावेरपाक वराही ८ लग

एकूण वराह कावेरीपाकी पंचवीस रास व फुलम वीस रास पावले असेत. बाकी वजा करणें. मजुरा असे. लेखनसीमा.

मर्यादेयं
विराजते

१८८८ श्राव. शु. ७.

[३४] श्री. २६ जुलै १६७७.

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक ४ पिंगल संवत्सरे श्रावण शुद्ध ७ सप्तमी गुरुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शिव छत्रपति यांणीं यशवंतराऊ शाहाजी कदम नामजाद कोट वालगुडानूर यासी आज्ञा केली ऐसी जे:— कोट मजकुरीं हसमें नामजाद आहे व एक जिन्नसही शिलक थोडाबहुत आहे. ऐसियासी, त्याच्या लिहिणियासी लिहिणार पाहिजे ह्मणून. त्यावरी तिमाजी नारायण यासी जमा करून पाठविलें आहे. तैनात दरमाहे होन प्रा। ३ तीन रास केले असेत. इा। प्रोपासून वजावाटा उरवेसी-प्रो। वजा करून बाकी बेरीज माहे दर माहे आदा करीत जाणें, आणि

त्याचे हातें कूटमजकुरीं लिहिणियाचें काम घेत जाणें. कागद बात लिहिणियामाफक देत जाणें. मजुरा असे. लेखनसीमा.

श्रीशिवचरणीं तत्पर त्र्यंबकसुत मोरेश्वर. — मर्यादेयं विराजते.

---

[३१] श्री. ३० जुलै १६७७.

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक ४ पिंगल नाम संवत्सरे श्रावण शुद्ध एकादशी इंदुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शिवछत्रपति यांणीं नागोजी भोसले मुद्राधारी कोट उटळूर यासी आज्ञा केली ऐसी जे:—कोट मजकुरास तटसरनोबत व बारगीर पाहिजे ह्मणून. त्याजवरून येणेप्रमाणें सरंजामी करून पाठविले बितपशील:—

सरनोबत तटाचे

असामी	तैनात होन	पा	वा काबेरी-पाक होन.
हरिदास बिन केदार दास, तटसरनोबत.	१	४	८
एसाजी लखमाजी जाधव, सरनोबत.	१	४	८
माणकोजी पवार, तटसरनोबत.	१	४	८
अनाजी वाळके, सरनोबत.	१	४	८
	४	१६	३२

लग ०

बारगीर शिपाई लोक

असामी	तैनात		वा काबेरी-पाकी होन.
कानोजी जाऊजी सांवत, बारगीर.	१	३	६
नरसाजी हणवंतराऊ, महारावर.	१	३	६
चाहूजी कान्होजी गायकवाड.	१	३	६
रायाजी बजाजी जाधव.	१	३	६
पोसजी तुकाजी जाधव.	१	३	६
तुकाजी संताजी सोमवंशी.	१	३	६
तुकाजी पवार.	१	३	६
	७	२१	४२

एकूण सरनोबत ४ चार व बारगीर सात. यांसी तैनात वराही सत-तीस पा रास व वाटणी हुजूर पोतापैकीं होन कावेरीपाक होन ७४ चवराहत्तरी रास पावले असेत. ही वजा करणें. मजुरा असे. आणि इा पैवस्तीपासून वजा वाटाऊ रीतीप्रा वजा करून बाकी बेरीज माहे दर माहे आदा करीत जाणें. मजुरा असे. लेखनसीमा.

मर्यादेयं
विराजते.

सुरू सूद बार.

[३६] श्री. ३० जुलै १६७७.

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक ४ पिंगल नाम संवत्सरे श्रावण शुद्ध एकादशी इंदुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शिवछत्रपती याणीं केदारजी जाधव बिन फिरंगोजी हवालदार इमारत कोट उटळूर यासी आज्ञा केली ऐसी जे:—स्वामी कृपाळू होऊन इमारत मजकुरीचा तुज हवाला देऊन सरंजामी करून व मजमूदार देऊन ठेविलें. तैनात ता

खासा तैनात साळीना होन १२५.

यासी चाकर रा प्रा चाळवणें व हुजूर पोतापैकीं वा नून पा होन कावेरीपाकी १०.

लक्ष्माजी मादरस मजमूदार, इमारत मजकूर, तैनात साळीना होन ३६.

यासी वा हुजूर पोतापैकीं होन कावेरी पाक होन ३.

एकूण असामी २ यासी तैनात होन साळीना एकशे एकसष्टी रास केले असेत. इमारत काम चालते होईल ते दिवसापासून घेत जाणें. व सदर्हू होन तेरा बाकी वजा करणें. व तैनातेस वजा वाटा उचिती-प्रमाणें वजा करून बाकी बेरीज घेत जाणें. मजुरा असे. लेखनसीमा.

मर्यादेयं
विराजते.

सुरू सूद बार.

श्री
शिवचरणीं तत्पर
त्र्यंबक सुत मोरेश्वर.

[३७]

हकीकत अदकार तपे सोनवळ वतन राजश्री रामचंद्र नीळकंठ भारद्वाज गोत्री यांचे मूळपुरुष:—

निळो नारायण १	त्याचा पुत्र नारोपंत २
नारोपंताचा पुत्र सोनाजीपंत ३	सोनाजीपंताचा पुत्र निळोपंत ४
निळोपंताचे पुत्र राजश्री रामचंद्रपंत ५	

करीना वतनाचा. बेदरीं पातशाहा होते. तेथें निळोपंत कयाळनिशी करीत होते. त्यांस पातशाहांनीं तपेमजकूरची ठाणेदारी व मजमू दिल्ही. महालास येऊन वरीस दोन वरसें अंमल केला. त्यास, तपेमजकूरचा अदकारी महाद परभू होता. त्यावर कसाळा पडला. याकरितां वतन विकावया गेला. मग कोणी न घेत. तेव्हां निळोपंतीं शालिवाहन शके १४४५ चवदाशे पंचेचाळिसावे शकीं नख्त टके १३००० तेरा हजार देऊन वतन खरेदी केलें. वतनाचा अंमल चालविला. त्यास, मागती हुजूर मोसबा घेऊन येणें ह्मणून हुजरून हुकूम आला. त्यास, येतेसमयीं कळोपंत बिन नागोजीपंत भारद्वाज गोत्री ह्मणून ब्राह्मण होता. बरा, लिहिणार ह्मणोन यारेदी सांगून ठेविला होता. त्यास, आपण हुजूर गेले ते समयीं वतनाची देखरेख यासी सांगितली. त्याचा वंश पुरूष:—

कळोपंत बिन नागोजीपंत यारेदी ठेविला. १	कळोपंताचा पुत्र सोमाजीपंत. २

सोमाजीपंताचा पुत्र मुरारी. ३	मुरारीस संतान नाहीं. मग सोमाजी कळो याचा भाऊ गोविंद होता त्याचा पुत्र रामाजी गोविंद, परंतु पिढी १.
रामाजीचा लेक मुरारपंत ४	मुरारीचा लेक भानजी ५

कळोपंत दफ्तरदार आपले वोढीचा ह्मणोन वतनाची देखरेख सांगितली, आणि निळोपंत हुजूर गेले. त्यांस तेथें मोसबियास दोन वर्षे लागलीं. मोसबा वारून वतनावरी यावें तों पातशाहा मेहेरबान होऊन आणिकी ठाणेदारी सांगितली. तिकडे सात आठ वर्षे राहिले. तेथून पुन्हां वतनावरी आले. येते समयीं महालची सरखोती दिवाणातून करून आले, आणि अंमल चालवूं लागले. त्यास, कळोपंत यारिदी याणें दिवाणची पाठी करून निळोपंतासी कलह मांडिला. याउपरि कितेका दिवसांनीं मुरार सोमाजी कळोपंताचा नातू याणें मारेकरी घेऊन येऊन मौजे भादाणें येथें निळोपंत होते त्यांस व बायका, मुलें, चाकर, बटिकीं देखिल निळोपंत व त्यांचे पुत्र नारोपंत मारिले. त्यांत उरतां नारोपंताची स्त्री उरली. ते तान्हे मुल घेऊन, सोनाजीपंत आपले आजे, पळोन घेऊन पुणियासी आली. त्यावर सोनाजीपंत परवरदा जाले. परंतु वतनावर गेले नाहींत. आपले तीर्थरूप राजश्री छत्रपतीची सेवा करूं लागले. यामुळें वतनावर न गेले, परंतु वृत्तीचा कथळा मांडिलाच होता. त्यास भानजी मुरारीचा आपला कथळा मांडला आहे. परंतु त्याणें फौजदाराची व काकाजीची पाठी केली. तथापि आपला मुतालीक जुनदअली सुभा कल्याणी आहे त्याजवळी उभे राहून वेव्हार सांगितला. अवघे गोत सुभा मेळवून, करीना मनास आणवून, आमचे वतनसें खरें जाहालें, गोही साक्षीनसी. यांसी इनाम गांव पूर्वापार आहेत.

मौजे भादाणें.	मौजे कुकसें.
१	१

याखेरीज हक्क गांव व इनाम व मानपान पेसजीप्रमाणें. येविसी पत्रें करून द्यावीं.

आपल्या नांवें फर्मान	मुम्यास पत्र
१	१
कल्याणच्या फौजदारास पत्र	
१	

---

[३८]

यादी पत्रें सुमारे ८.

कित्ता:—

२. राजश्री खेमसांवत सरदेसाई, कुडाळ, यांसी, शिवाजी राजे यांचीं.

१. संताजी घोरपडे यांचें पत्र.

३

मातुःश्री ताराबाई यांचें पत्र १.

राजश्री चंद्रसेन जाधवराव यांची चिठ्ठी १.

राजश्री परशरामपंत यांचीं पत्रें २, बंद ३:—

राजश्री शिवाजी राजे यांचें पत्र राजश्री जयसिंग जाधवराऊ यांसी पत्र १.

---

[३९]

श्री राजाराम रघुवीर प्रसन्न. कदीम पद्धत महाराज सिंहासनारूढ जालेयावर मान विडे व नारळ:—

प्रथम विडा:—

कुलगुरु उपाध्ये.	देव प्रथम.
पंडितराऊ.	मातापिता.

जोशीराऊ.
आश्रित.
गोत्रपुरुष.
वडिल मान्यपुरुष.
सोइरे लोक.

ग्रामदेवता.
मुतालीक.
फडणीस.
चिटणीस.
कारकून.
सभासद.
सननीस.

राजनीति पद्धत.

प्रधान प्रथम विडा.
मजमदार त्याजमार्गे.
सुरनिवीस.
वाकेनीस मंत्री.
न्यायाधीश.

दबीर.
सेनापती.
सेनाखासखेलसरदार.
मोहतापी बारगीर.
पागा शिलेदार.
हत्ती महाल.

अठरा कारखाने.
हवालदार.
म्यानबंक.
दौलतबंक
वाडिया मूळ.
हुद्देकरी.
सराफखाना.

साठी.
शंभर.
चाळीस.
खासखेल.

अलीकडे नवे जाले.

प्रतिनिधी.
राजाज्ञा.
ममलकतमदार.
हिमतबहादर.
सरखेल.

देवडी.
बक्षी.
दिवाण.

श्रीमहालक्ष्म्यैनमः १५८८ चैत्र शु२

[४०] श्रीत्र्यंबकेश्वर. १६ मार्च १६८६.

॥ श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री देशमुख देशपांडे व ज्योतिषी व उपाध्ये व समस्त वेदमूर्ती, वस्ती कसबे हरसूळ, प्रांत अवरंगाबाद व समस्त महाराष्ट्र कोंकण देशस्थ विद्वद्वैदिक गृहस्थ गोसावी यांसी :—

पौष्य उपाध्ये व मोरेश्वर पंडितराव आशीर्वाद अनुक्रमें नमस्कार. उपरि. गंगाधर रंगनाथ कुळकरणी कसबे हरसूळ हा ब्राह्मण मोंगलापाशीं सेवेसी होता. कित्येक दिवस चाकरी करीत असतां मोंगलीं यावरी बलात्कार करून बाटविला. भ्रष्ट करून यास तीन महिने बंदखानीं निर्बंध ठेविला होता. तेथें यवनासीं अन्नोदकसंसर्ग घडला. त्यानंतर यास भाग्य अडीचसद्दी मनसब देऊन चाकर करून ठेविला. पांच वर्षे चाकरी करीत होता. स्नानसंध्यादिक कर्मे करितां नये, यास्तव राहिले. पांचा वर्षांत अन्नोदकसंसर्ग केला नाहीं. दौलत करीत असतां भाग्याचें सुख टाकून, अंतःकरणीं अनुताप मानून, आपले जातींत यावें यास्तव दौलत संपत्ती सर्व टाकून, अनुतापास्तव राजश्री छत्रपती स्वामीपाशीं रायगडास येऊन, एक वर्ष गंगाधर रंगनाथ दरबारीं आपणास प्रायश्चित्त द्या ह्मणऊन सरकारकून व न्यायाधीश व उपाध्ये व दानाध्यक्ष व भलेभले ब्राह्मण व समस्त आपले ज्ञातीस शरण येऊन, प्रायश्चित्त मागत होता. त्याउपरि राजश्री समस्तराजकार्यधुरंधर वर्णाश्रमधर्मप्रतिपालक राजश्री छंदोगामात्य स्वामी यांस सर्व वर्तमान विदित जालें. त्यानंतर त्यांहीं ब्राह्मणाचे कष्ट व अनुताप बहुत देखोनी राजश्री छत्रपती स्वामीस याचा वृत्तांत विदित केला. छत्रपती कृपाळू होऊन प्रायश्चित्त द्यावयासी आज्ञा दिल्ही. त्याउपरि आह्मीं राजश्री छंदोगामात्य यांचे सभेसी समस्त विद्वद्वैदिक ब्राह्मणांचे संमतीनें मिताक्षरादि निबंध पाहोन, प्रायश्चित्त निर्वाह करून, गंगाधर रंगनाथ यासी प्रायश्चित्त संकल्प सांगोन, श्रीयात्रेस पाठविला. तेथें श्रीगिरिप्रदक्षिणा तीनशें साठी व यात्रा दोनी

इतुकें चतुर्विंशत्यब्द प्रायश्चित्त पूर्वोत्तरांगसहित गंगाधरें केलें. यथाशास्त्र प्रायश्चित्त विध्युक्त प्रकारें केलें. श्रीक्षेत्रीं समस्त धर्माधिकारी आदिकरून ब्राह्मणसंमतीनें तीर्थविधि करून, ब्राह्मणभोजन करून, अन्नप्रसादपंक्तीस घेतला. शुद्धिभोजनें व प्रायश्चित्तप्रदक्षणा यथाविधि केला, ह्मणऊन श्रीक्षेत्रींच्या ब्राह्मणांचीं पत्रें व देशाधिकारी यांचीं पत्रें घेऊन आह्मापाशीं आला. पत्रें आह्मासी दिलीं. उपरि यथाविधि प्रायश्चित्त पूर्वोत्तरांगसहित निर्गमिलें. ऐसें वर्तमान राजश्री छंदोगामात्य गोसावी यांसी विदित केलें. त्यांहीं पत्रें मनास आणून समस्त कारकून व न्यायाधीश यांच्या अनुमतें आह्मास आज्ञा केली जे गंगाधर रंगनाथ यास आपले पंक्तीस भोजन देऊन शुद्धिपत्र देणें ह्मणऊन. त्यावरून आह्मी आपले पंक्तीस भोजन देऊन यासी शुद्धिपत्र दिलें. हा ब्राह्मण शुद्ध जाला, संव्यवहार्य जाहाला. याउपरि यासी तुह्मी अन्नोदकादि व्यवहार यथापूर्व करीत जाणें. जो कोण्ही याचा ब्राह्मण्याविषयीं संदेह मानील तो देवब्राह्मणद्रोही महापातकी जाणिजे. शके १६०८ सोळा शतें आठ, क्षय संवत्सर, चैत्र शुद्ध द्वितीया, भौमवार. हे विज्ञप्ती. मोर्तब.

मोरेश्वर पंडितराय. दानाध्यक्ष.
कविराज महेसदास. संमतं केशव पंडितस्य.
नरसिंह वैद्य.
येसभट्ट थटे पुणेकर.
गणेश भट्ट.
शेषाचार्य वार्यीकर.
भीमाचार्य वार्यीकर.
शंकर भट्ट हुकेरी.

१ राजश्री नारो रघुनाथ अमात्य मुद्रासहित.
१ राजश्री गोपाळ अनंत मुद्रासहित.
१ राजश्री केसो त्रिमळ पिंगळे.
१ राजश्री त्रिकटराऊ हेजीब.
१ हरजी महाडीक.
१ राजश्री यादव नामदेऊ.
१ राजश्री कवीकलश छंदोगामात्य शिक्केसहित.

रामचंद्र भट्ट हुकेरी.

सोमनाथ भट्ट.

दशग्रंथी संगमेश्वरकर.

अंतोपाध्ये धर्माधिकारी संगमेश्वर.

बाळ ज्योतिषी.

कृष्णाचार्य अष्टपुत्रे.

१ राजश्री गंगाधर मोरेश्वर प्रधान मुद्रेसहित.

१ राजश्री प्रल्हाद निराजी न्यायाधीश मुद्रासहित.

१ राजश्री रघुनाथ कोर्डे.

---

[४१] श्रीः ~~११ मे १६९०.~~

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके २९ प्रमोदूतनाम संवत्सरे वैशाख शुद्ध चतुर्दशी भौमवासरे क्षत्रियकुळावतंस श्री राजाराम छत्रपति याणीं समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री नारोपंडित यांस आज्ञा केली ऐसी जे :— तुह्मीं स्वामीच्या दर्शनाकारणें येत आहां. प्रस्तुत प्रभावळीस आलेस ह्मणोन कळों आलें. ऐसियास तुह्मीं स्वामीचे दर्शनास आलेस उत्तम गोष्टी केली. तुमची स्वामीची भेटी सुमुहुर्तें व्हावी लागते. त्यास, उदईक दिनशुद्धी नाहीं आणि स्वामीही राजापुरास जाणेंकारणें प्रतिपदेस स्वार होऊन येत आहेत. तरी तुह्मीं तेथेंच राहाणें. स्वामीही येतील. तुमची व स्वामीची भेटी प्रभावळीसच होईल. तुह्मीं यावयाची त्वरा न करणें. बहुत लिहिणें तरी तुह्मीं सुज्ञ असा.

मर्यादेयं
विराजते.

---

[४२] श्रीभवानीशंकर. ४ अक्टोबर १६९१.

नेमपत्र हजीर मजालसीयानी, मुकाम किले सातारा, सुा इसने तिसैन अलफ. बतेरीख छ २१ माहे मोहोरम, आश्विन वदि अष्टमी रविवासरे प्रजापति नाम संछरे बेहुजूर शके १६१३ प्रजापति नाम छंवछरे कार्तिक सुध त्रयोदशी मंदवार :—

राजश्री संताजी घोरपडे सेनापति रा। मौजे जाधव नाहवी सा। कोरेगाऊ प्रा। वाई.

०श्री
राजाराम भूपाळ—
भक्तसेनापतेः शुभा॥
संताजी घोरपडे तस्य
मुद्रा भाति जय
प्रदा॥

राजश्री धनाजी जाधवराऊ हफ्त हजारी मोकदम मौजे माजगाऊ व दरोगा ता। सातारा.

श्रीसीव—
चरणीं तत्पर
धनाजी जाधव
किंकर.

राजश्री हंबीरराऊ मोहिते देसमुख पा। खेड.

अमृतराऊ बीन तुकोराम निंबाळकर देसमुख पा। फलटण का। खानापूर व का। सारवडे.

अमृतराव निं
बाळकर १ सी-
क्का खानापूर. नांगर.

मल्हार दादाजी सरसुभेदार प्रा। मोगलाई, कुलकर्णी मौजे गुपारडी : पा। सुपे बारामती.

श्रीसीवचरणी
तत्पर मल्हार दादाजी
सुभेदार.

अवधूत तुबाजी सरसुभेदार प्रा। भागानगर देसकुलकर्णी प्रा। माण.

श्री
अवधूतराव
तुबाजी

मानसिंग मोरे हफ्त हजारी देसमुख प्रा। वरुण.

श्रीराजारामा—
ख्यभूमींद्रस्यैषाव
धितसंपदा॥ श्रीमोरे
मानसिंहस्य मुद्रा भाति
जयप्रदा.

विठल गोपाल सुभेदार
प्रांत जाउली

श्रीगंगेव श्रु
द्वितीं प्राप्ता जनसा-
गरनंदिनी॥विठ्ठल-
स्य महाबुद्धेर्मुद्रा
भद्राय राजते

यमाजी नागनाथ कुळकर्णी
मौजे किणई सा। कोरगाऊ प्र[redacted]

त्र्यंबक गोपाळ देशकुल-
कर्णी पा। कुडाळ.
बाळोजी जाधव मोकदम,
मौजे दहीवडी ता। मलवडी.
नांगर.

पुंडलीक शामराज चांदकीर
कुलकर्णी पा। नीवासे.
जोती गोविंद कुलकर्णी मौ[redacted]
पिंपरी पा। वाई.

रंगोजी पाटील हवाले मोकदमी
मौजे सिंगणापूर.
नांगर.

सुभानजी भाडवळकर हवाल-
दार किल्ले सातारा व मोकदम
मौजे अंधळी मा। मलवडी.
श्रीशंभु
चरणीं तत्पर
सुभानजी रामोजी
भाडवळकर.

त्र्यंबक गोमाजी सबनीस
किल्ले सातारा, कुलकर्णी
मौजे चांदे पा। नीवासे. १

लक्ष्मण विश्वनाथ सुभेदार
किल्लेहाय प्रांत सातारा.
श्रीशंभु
चरणीं तत्पर लक्ष्मण
विस्वनाथ नीरंतर.

सुभानजी काटकर
सरनोबत किल्लेहाय

श्रीशंभु
चरणीं तत्पर
सुभानजी काटकर.

अंबाजी जाधव पा। मौजे परंचे
पा। पुणें.

जगन्नाथ आनंद कुळकर्णी
का। पेठ नेरळे का। बाजे ता। कोडोली
किल्ले पनाळा.

विठोजी पाटील का।
रहिमतपूर.

नांगर.

हरि[illegible] व माणकोराम
कुळकर्णी [illegible] पाली
परगणे [illegible].

मोरेश्वरभट्ट कुळकर्णी ज्योतिषी
कसबे मसूर. पत्रप्रमाणें साक्ष
असे.

नरसोजी बिन नेताजी
व पदाजी बिन अंबाजी
यादव देसमुख का। अउंद.

नांगर.

कृष्णाजी बिन बाजी पटेल घाडिगे
मोकदम मौजे कळंबी का। अउंद.

नांगर.

तिमाजी बिन नरसोजी
जाधव व बहिरजी बिन लख-
मोजी जाधव पाटील मोकदम
का। उंबरज पा। कऱ्हाड.

नांगर.

मेरु अनंत भोळे जोशी व कुळ-
कर्णी मौजे पुसेसावळी, मौजे क-
ळंबी, व मौजे वडीळ, व मौजे
सिमळी का। अउंद.

कृष्णाजी लिंगो कुळकर्णी
का। उंबरज व मौजे सिवडे,
कुळकर्णी व जोतिषी पा। कऱ्हाड.

[illegible] ऊ.

रताजी पाटील का। कळढोण.

निशाण मऊ.

साबाजी मोहिते देसमुख का तल-
बीड का वांगी व का कळढोण.

संकराजी पोवार पाटील मौजे
निराड ता सातारा

कृष्णाजी नारायण शाळग्राम
पुणेकर कुलकर्णी मौजे
तारुळा व कुमुर ता कोळे
सुभा कऱ्हाड.

नांगर

श्रीसंक-
राजी महा
देव

बाजी भोसले मोकदम
मौजे वेळू व मौजे पिंपरी
व सुरळी सा कोरेगाऊ
पा वाई.

नांगर.

या विद्‌मानें लेहून दिल्हें नेमपत्र ऐसे जे. राजश्री रामचंद्र नीळकंठ गोसावी यासी कृष्णाजी बुलगो व मल्हारजी बुलगो व गोमाजी बुलगो व बावाजी शिवदेव व राघो शिवदेव व मल्हार शिवदेव देसकुलकर्णी व गावकुलकर्णी व जोतिषी पा खटाऊ, सु॥ इसन्ने तिसैन अलफ. आपले वडील पुरातन मिरासीदार पिढी दर पिढी खात असतां, दरम्यान कथळा करून विसाजी काशी व विठ्ठल होणाजी अथर्वण यानें कथळा करून कृत्रमी कागदपत्र करून वतनास खलेल करितो. दोनी चारी वेळा झाडाझाडी करून खोटा ऐसे खळकास वा हक्कदामशाह यांसी जाहीर असतां लाच देऊन जोरावारी करितो. आपण बेतकवी, खावयास नाहीं, भाऊ बंद तमाम माणसें दुकाळेनें अर्थली जाहाली; व गनीम मोगल वरजोर ठाणें देऊन पामजकुरी बैसला. त्यास माहादाजी निंबाळकर याचे कारकीर्दीस आह्मीं पांढरीवरी हजीर जाहालों. हरदोजणांचा निवाडा

जाहाला. अथर्वण खोटा जाहीरला, आणि कथळा करितो, ऐसे निर्वाह सर्वांच्या मुखीं जाहाला. कागदपंत होवे, जमानिता कराव्या, पेस्तर बिलाहरकत न व्होवी, ऐसा तह जाहाला, तो अगदीं टाकून, अथर्वण विजापुरास जाऊन, लाच देऊन, लुस्पत देऊन, अगदींच आह्मास मारावें, नांव कुळीं ध्यावयास नाहीं, ऐसे कागदपत्र करून पामजकुरास आला. आह्मास धरावें ऐसा विचार पुरता केला. तो आह्मास कळला. व माहादाजी निंबाळकरास ही पादशाह याचें तलब रोखा आला. आह्मास कोणाचा असीरा नाहीं. हुजूर पादशाहानजीक जावें तरी आपण बेतकवेदार, आणि अथर्वणांनीं हुजूर भाविलें जे, राजश्री छत्रपती स्वामीचे दरबारीं मल्हार बुलगो व बावाजी सोंवदेव यांस पंचहजारिया सांगितल्या आहेती, परगणे मजकुरावरी चाली करिताती, वतन आपलें बळेंच ह्मणताती. ऐसे किताका रवेसीनें हुजूर गोष्टी भाविल्या आहेती. याकरितां आमचे पोटीं धास्ती पडिली. व गाठोळीच्या बळें व गवसाळा करून, हुजूर पादशाह यानजीक जाऊन आपलें वर्तमान वतनाचें साकल्य जाहीर करावें तरी आपण गैरमहसरदार. याकरितां गनीमाचे दिवाणांत जावेना. मग, वतन अथर्वणमजकूर जोरीनें खातो, गोतांत न ये, गनीमाची पाठीवर जोर केली, आपणास कोठें टिकों देईनातसारखें जाहालें. मग आपण डोईत धुळीं घालून स्वामीपाशीं आलों. ऐसियास, आपली व स्वामीची भेटी न व्हे, आपण निराश्रि (त), असीरा नाहीं, ऐसें चिंतन करीत दरबारीं बैसलों होतों. तों काशीराम कुलकर्णी, मौजे कांभेरी, किल्ले परळी यानीं आपणास विचारिलें जे, तुह्मी कोणे गोष्टीअस्तव विशाळगडास का आला? मग आपण त्यास बोलिलों जे, आपलें वतन अथर्वण बळें खाताती, भाऊबंद बेतकवी पडले, दावा दद न चले, यास्तव आपले वतनास व आपल्या जीवास कोणी तऱ्ही धणी कासीपतो जाहालियावेगळे जीव वाचत नाहीं, वडिलाचें वतन सुटेना, ऐसा विचार आपला आहे, याकरितां दरबारास आलों. ऐसियास, काशीराम आपणास बोलिले जे, तुह्मीं भेऊ नका, परमेश्वर बरेंच करील, आजी उदियांत राजश्री पंत अमात्य स्वामीची भेटी करून देऊन, मग

तुमचा उदित काळ असल तरी बरेच होईल. ऐसें बोलोन ते आपले बिराडास गेले. आपण ही बिराडास गेलों. दुसरे दिवशीं काशीराम यानीं स्वामी (स) विदित केलें. आपल्या वतनाचा करीना सांगितला. त्यावरून स्वामीनें आपणास हुजूर बोलाविलें, वर्तमान साकल्य विचारिलें. त्यास, आपण बुनादीपासून आपलें वतनाचें वर्तमान व कागदपत्र तमाम दाखविलें. त्यावरून राजश्री पंतीं व सभानाईकीं मनास आणून हा वतनदार खरा, परंतु बेतकवी, यासी हर कोणाचा आधार जाहालियावेगळा हा सावरेना, ऐसें सभानाईक बोलिले. त्यास आपण बोलिलों जे, आपले पदरीं एका दिवसाचें खावयास नाहीं, उगेंच मरावें. याकरितां वडिलाचे कागदपत्र आपणापासो आहेती ते घेऊन, दरबारास जाऊन, कोण्ही तऱ्ही वतनास वा आपणास धणी जाहाला, तरी वाचोन. नाहीं तरी आपले प्रालब्धीं असेल तें होईल. ऐसें आपलें बोलणें सभानाइकीं ऐकिलें. मग सभानाईक बोलिले जे :—वतनदार खरा, कोणे गोष्टीस खता नाहीं. मग सभानाईक व कासीराम कुलकर्णी, मौजे कांभेरी, यांनीं विचार करून राजश्री रामचंद्र नीळकंठ यांसी बोलिले जे, स्वामीनें या गोष्टीस मन घालून निमे देसकुळकरण व गांवकुळकरण व ज्योतिष ऐसें द्यावें. ऐसा तह जाहाला. गांवकुळकर्ण देहाय १८ पैकीं वजा :—

रामाजी अनंत व नरहरी अनंत व गोपाळ अनंत ठकार वशिष्ठ गोत्री यांसी गावकुळकर्ण व ज्योतिष, मौजे दरुण, पा। मजकूर.

कासीराम अंगापूरकर खुर्द कुळकर्णी, मौजे कांभेरी, किल्ले परळी, यासीं गांवकुळकर्ण व ज्योतिष, मौजे विसापूर, पा। मजकूर.

बाकी गावकुळकर्णें व ज्योतिर्षे खेरीज जोतीस मौजा कुरोळी देहाय १६ तपशील :—

१ मौजे नेर.	१ मौजे नायगाव.	१ मौजे अंभेरी.
१ मौजे कोकराळ.	१ मौजे रामेश्वर.	१ मौजे दरजाय.
१ मौजे पळसगाऊ.	१ मौजे येळनारवाडी.	१ मौजे उंबरमळई.

१ मौजे दऱ्हवडी	१ मौजे बनपुरी.	१ मौजे कुरोळी खेरीज ज्योतिष.
१ मौजे पुसेगाऊ.	१ मौजे कोट उर्वी.	१ मौजे मोसरे.
१ मौजे वडूर.		

एकून देहाय १६; गांवकुळकर्णें व ज्योतिषें पंधरा व देशकुळकर्ण पा। मजकूर; हे निमे आपले संतोषें देतों. आपली पाठी व साहेता पुरवावी. जे जे वेळेस जैसा प्रसंग पडेल तैसा आपण जीवानसी उभा. आणि स्वामीनें सर्वस्वें वित्तदतेसी आपली पाठी पुरवावी. ऐसें कृष्णाजी बुळगो, व मल्हार बुळगो, व गोमाजी बुळगो, व बावाजी शिवदेव, व राव्रो शिवदेव, व मल्हार शिवदेव व समस्त पांच पोर ऋग्वेदी बोलिले. हे गोष्टीस राजश्री रामचंद्र नीळकंठ यानीं मान्य केलें जे, तुह्मांस पांच पोर देशकुळकर्णी व गांवकुळकर्णी व ज्योतिषी ऋग्वेदी, पा। मजकूर, हे आपण पदरीं घेतले, आनीपासून हे आपले भाऊ, यांनीं व आपण अथर्वेण मजकूर देवमुखें व गोतमुखें व दामशाही मिराशीदार यांच्या विद्यमानें मारून काहाडावे, सदर्हू निमें वतन खावें, वडीलपण कृष्णाजी बुळगो व मल्हार बुळगो व बावाजी शिवदेव, व राव्रो शिवदेव यांसीं आधीं तश्रीफ व पानें, त्यामागें रामचंद्र नीळकंठ यांनीं घ्यावी. बाजे हक्क, लाजिमा, सेव, धार व राबिता माहार दो ठायीं घ्यावें. हक्क जुने व नवे जें उत्पन्न होईल तें दो ठायीं खावें. यासी जो कोण्ही चुकेल त्यास श्री कृष्णवेणी साक्ष व वडिलाचे आण असे; व मात्रागमनाचें पाप असे; व काशीस गाईब्राह्मणवध केलियाचें पाप असे. हे नेमपत्र सही.

---

[४३] श्री. १३ मे १६९२.

श्री राजाराम नरपति
हर्षनिदान ॥ मोरेश्वरसुत
नीळकंठ मुख्य प्रधान.

श्री नृहरि-
प्रीत्या मुद्रा नीराजि
जन्मनः ॥ राजराम-
प्रतिनिधेः प्रल्हादस्य
विराजते.

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक १८, अंगिरा नाम संवत्सर, ज्येष्ठ शुा सप्तमी, गुरुवासर, क्षत्रियकुळावतंस श्री राजाराम छत्रपति यांणीं जाऊळकर व दरेकर व मावळे लोकानी व कासुर्डे व गोळे व समस्त लोकानी पदाती यांसीं आज्ञा केली ऐसी जे:—पूर्वीं कैलासवासी स्वामींचे वेळेस तुह्मीं लोकीं कष्ट मेहनत करून थोर थोर कामें करून दिल्हीं आहेत. सांप्रत रायगड हस्तगत करून घेणें हें कार्य बहुतच थोर आहे. येविसीं राजश्री रामचंद्र पंडित अमात्य यांणीं तुह्मांस सांगितलें आहे, त्यावरून तुह्मीं गड हस्तगत करून घ्यावयाच्या यत्नांत आहां. सांप्रत स्वामींनीं राजश्री आबाजी सोनदेव यांसी पाठविलें आहे. रायगड हस्तगत करून घ्यावयाची आज्ञा त्यास केली आहे. हे जाऊन राजकारण जें करावयाचें तसें करितील. तरी तुह्मी कुळ लोक अनुकूल होऊन रायगडाची हरी करणें. सक्ती करून तें स्थळ हस्तगत करून फतेचें वर्तमान स्वामीस लिहिणें. ह्मणजे स्वामी तुमचें विशेष ऊर्जित करितील. तुह्मास देण्याघेण्याचा तहरह जो करणें तो मशारनिले करितील. त्यास गड हस्तगत झाला ह्मणजे स्वामी तेणेंचप्रमाणें चालवितील. आपले दिलासे असों देऊन एवढें कार्य अविलंबेंकरून स्वामीस संतोषी करणेंविसीं राजश्री रामचंद्रपंतास लिहिलें आहे. तेही जे बेगमी करावयाची ती करितील. जाणिजे. निदेश समक्ष.

मर्यादेयं
विराजते.
रुजू

सुरु सुद बार.

---

[४४] श्री. २६ मे १६९३.

७ मा। अनाम यादो शिवदेऊ नाडगौडे ता। खानापूर यासी रामचंद्र नीळकंठ अमात्य सु॥ आर्बा तिसैन अलफ. नाडगौडकी ता। मजकूर बा। सेरणी होन पा। पांचशे पैकीं बद्दल देणें ऐवज सुभा राजश्री संताजी घोरपडे सेनापती यांकडे होन पा। ३०० तीनशें तसर देविले असेत.

आदा करणें. सदर्हू ऐवज कर्नाटकचे रवानगीस देविला असे. चिलाकुसूर पावणें. उजूर न करणें. जाणिजे. छ १० शौवल. निदेश समक्ष.

लेखनसीमा
समुल्लसति

---

[४९] श्री. ४ आगस्ट १६९३.

० ৺

श्रीमच्छत्रपतेः शंभोः
शासनं शासतः सदा ।
अनंतसूनो रामस्य चिरं
मुद्रा विराजते ॥

अज् सरसुभा राजश्री रामाजी अनंत सरसुभेदार व कारकून सुभा प्रा राजापूर ताहा कमावीसदार व कुळकर्णी व गांवकर व रयानीं मौजे त्रिंबक ता साळशी सुहुरसन अर्बा तिसैन व अलफ. राजश्री छत्रपति स्वामींचें आज्ञापत्र, छ २९ साबान, पैा छ २२ जिल्हेज, सादर जाहालें. तेथें आज्ञा कीं :— ता साळशी या माहालीची सरदेशमुखी पूर्वीं अदलशाहानें जानतराव यासी वतन दिल्हें होतें. परंतु भोगवटा जाहाला नाहीं. धा वतन दिवाणांत अमानतच आहे. हें वतन राजश्री रामचंद्र नीलकंठ यास अजरामऱ्हामत वतन करून दिल्हें असे. साळशी महालीच्या सरदेशमुखीचें वतन यांचे सांभाळीं करून यांस हकलवाजिमा इनाम मौजे चिंदर व मौजे त्रिंबक देह २ दोन कुलबाब कुलकानू चालवावयाची आज्ञा केली असे. तरी येणेंप्रा हकलाजिमा इनाम यांस यांचे पुत्रपौत्रादिवंशपरंपरेनें चालवणें. ह्मणून आज्ञा. त्यावरून मानिलेस ता मारची सरदेशमुखी वतन स्वाधीन करून वतनास हकलवाजिमा व इनाम चिंदर व मौजे त्रिंबक उभळ केलें आहे. तरी सदर्हू सरदेशमुखीच्या कार्यभागास मानुयाची रा अंताजी जनार्दन यास मुतालिकी देऊन पाठविले आहेत. याचे

आज्ञेंत राहोन मौजे मजकूरचा वसूलबासूल कुलबाब कुलकानू समेवेत मानिलेकडे देत जाणें. छ २२ जिल्हेज. मोर्तब सूद.

विलसति
लेखनावधि
मुद्रा.

---

[४९] श्री. ८ जानेवारी ११९४.

अखंडितलक्ष्मीअलंकृत राज्यमान्य राजश्री रामचंद्र नीलकंठ देशकुळकर्णी ता। अजिरें गोसावी यांसी:—

छ सेवक लिंबकजी कानोजी सरदेसाई व कानोजीराऊ सरमोकदम देसाई व रखळोजी कानोजी देसाई व येळोजी तातोजी देसाई व रामजी विठोजी देसाई ता। अजिरें दंडवत विनंति सु॥ अर्बा तिसैन अलफ. ता। मजकूर येथील देशकुळकरण देहें ९७ हें पूर्वी सिद्धांचें होतें. त्याची सेवा विठ शेणवी यांचे वडिलांनीं बहुता प्रकारें केली. त्यावरून सिद्धांनीं कृपाळू होऊन यांचे वडिलासीं देशकुळकरण मिरास दिल्हेवरी त्याचे वडील देशकुळकरण ता। मजकुरींचे पुरातन वतनदार होऊन पीढ दर पीढ मिरासभोग करित आले. पूर्वी यांचे वडिलांचे वेळीं आपणास तगादा लागलें पाहून, मळ शेणवी याचे वडील मुखवस्ती आगंतुक होता यापासून कर्जेपैकीं घेऊन कर्ज फिटेपावेतों देशकुळकरण मिरासपैकीं तिसरें तकसीम गहाण ठेविलें. पैका पावलेवरी सदरहू तकसीम सोडून देणें. त्यांसीं तेहि बहुत दिवस तिसरा वांटा खात आले. गहाण ठेविलेपैकीं एकासीं तीन चार हिस्से पावून गेले. त्यास वतनांशीं संबंध नाहीं. मळ शेणवीचे वडील तिसरे वांटा खातां, मिराशीमधें व्याप करून, वृत्तिसंबंधें साजीस करून, महजर सनदपत्र कांहीं करविलें असतां, स्वगोत्रीं ऐसेहि इलाखा लावूं लागले. ऐशियांस, मळ शेणवी कांहीं विठ शेणवींचे अउलियादिमधील नव्हे. त्याणें जें काय आपले स्वार्थामुळें महजर सनदपत्र केलें असेल तें कुलीं बातील आहेती. विठ शेणवींचे वडील

वृत्तिभोग करित आले. त्याचे पीढनपीढ विठ शेणवीपावेतों चालिले. विठ शेणव्यास मिराशीमुळें दगा करून जिवें मारिलें. मृत्यु पावला. विठ शेणवीचे पीढनपीढ संतति फार वाढली नाहीं. एकाचें पोटीं एक ऐसेची होत आले. त्यावरी हा मृत्यु पावला. याचें पोटीं लेंकरूं जाहलें नाहीं. निपुत्रिक जाहला. पुढें मिराशीस खावंद कोणी नाहींसें जालें. निपुत्रिकाचें मिरास ते दिवाणाचें. त्यावरी महाराज साहेबासीं हें वर्तमान विदित जाहालेवरी साहेबीं मेहेरवान होऊन तुह्मांस ता। मजकूरींचें देशकुळकरण शेरणीं माथा ठेऊन अजरामऱ्हामत करून दिल्हें असे. देशकुळकरण ता। मजकूर देहे ९७ सत्त्याण्णव लेंकराचें लेंकरीं वंशपरंपरा भोग करून सुखरूप असणें. विठ शेणवियाचे कोण्हीं गोत्रज अगर वंशज कोण्ही नाहीं, हें सत्य असें. देशकुळकरणाचें हक्क लाजिमा, पानमान, इनामती व इसाफती व बाजेकानूनाती देशकुळकरणाचें असेल तें आपलें चालवून घेणें. हें गोष्टीस आह्मांपासून अन्तर पडणार नाहीं. आपले वृत्ति बरावरी चालविण्यास अंतर होईल तरी यास आपलें वडिलांचें इमान असे. छ २१ जमादिलोवल.

लेख-
न आलं-
कार ॥

---

[४७] श्री. ११९९.

राजश्री पंत अमात्य स्वामींचे सेवेसीः—

७ सकळगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित संताजी घोरपडे सेनापती जप्तनमुल्क दंडवत. विनंति. येथील कुशल तो प्रताप स्वामीचा जाणऊन स्वानंदवैभवलेखन केलें पाहिजे. विशेष. स्वामींनीं राजश्री सखोजी बरगे व बाजी शिंदे याजबराबरी कितेक बुद्धिवाद सांगोन पाठविला कीं:—आपली भेट घेतली नाहीं. परस्पर निघोन गेलेत. ह्मणून शब्द लाविला. ऐसियास, स्वामीची आमची क्रिया

ऐसी नाहीं जे स्वामीसी द्वैतभाव धरावा. आह्मीं त्याप्रांतें असतां दहाविसांचे साक्षीनसी ऐकिलें कीं संताजी घोरपडे यास त्याप्रांतें ठेवून राजश्री धनाजी जाधवराऊ यांस पाठवून देणें. ह्मणवून पत्रें राजश्रीस लिहिलीं. त्यावरूनच द्वैतप्रकार दिसून आला. स्वामीचे आज्ञेवितरिक्त आह्मीं कांहींच नव्हतों. विश्वासाची जाती ह्मणावी तरी स्वामीचे आमचे शफत तुळशीबेलाचे श्रीवरील आहे. स्वामीचे मांडीवरी आह्मी उसें ठेवून निजावें, आमचे मांडीवरी स्वामींनीं ठेवावें, शरीर मात्र भिन्न, आत्मा एक, ऐसें असतां ही गोष्ट द्वैताची होऊन आली. ह्मणूनच वीतरागें येणें जालें. गत वर्षापासून श्रमाची जाती ह्मणावी तर कागदीं लिहितां पुरवत नाहीं. बरें ! जे गोष्टी जाहाली ते जाहाली. याउपरि तऱ्ही राज्यांत डोहणा न होय तो पदार्थ केला पाहिजे. द्वैतभाव दिसोन आला होता ह्मणऊनच येणें जाहालें होतें. त्यास, राजश्री सेखोजी बरगे व बाजी शिंदे यांजपाशीं स्वमुखें सांगितलें कीं, आपण कांहीं संताजीस ठेवून घेऊन धनाजी जाधवराऊ यास पाठवणें, ऐसें लिहिलें नाहीं. ह्मणऊन शफतपूर्वक सांगितलें. त्यावरून बाजी शिंद्याचे साक्षीनसी मशारनईलेनीं आह्मांस सांगितलें. वरकडहि कितेक भावार्थ व मानाजी मोऱ्यार्चे वर्तमान व आणिखी स्नेहाचीं उत्तरें सांगोन पाठविलीं. त्यावरून द्वैताची गोष्टी होती ते स्वामींचेच वचनावरून दूर केली. आह्मीं लोकांचे बळें द्वैत धरिलें होतें तें आह्मापासूनच अंतर पडलें. आपणहि त्या गोष्टीचा कांहीं मनांत विकल्प धरिला न पाहिजे. आणखी स्वामींनीं एक शब्द लाविला कीं, राजश्री छत्रपति स्वामीची भेटी जाहाली ते समयीं बहुमान जाहाला, तेव्हां आमचा मान काढिला नाहीं. ह्मणऊन शब्द लाविला. ऐसियासी, राजश्री छत्रपति स्वामीचीं व आमचीं जीं वचनें स्वामीचे सीहुरसीचीं जाहालीं. काय काय चाकरी केली असेल ते एक श्री जाणें. कोणे गोष्टीस अंतर पाडिलें नाहीं. आह्मीं ऐसे सेवक नव्हे जे, स्वामीचें स्मरण न करितां आधीं आपला बहुमान घेऊन. याचा पर्याय कागदीं काय ह्मणऊन लिहावा? भेटी अंतीं कळों येईल. तुह्मीं आपलें स्मरण राजश्रीपाशीं घेतलें नाहीं. परंतु

अल्लीगदीखान घेतला ह्मणऊन ऐकिलें. विजयी वस्त्रें पाठविलीं ह्मणऊन लिहिलें. त्यावरून अपूर्व वाटलें! स्वामी वडील. हें यश येतें तें स्वामीचेंच पुण्येकडून येतें. आमचा अभिमान सर्व गोष्टींचा स्वामीस. पूर्वींपासूनहि आह्मास स्वामींनेंच गौरविलें. तेथें वस्त्राचेंच कार्य ह्मणऊन आह्मीं ल्याहावें? पूर्वींपासून अंगीकार आमचा स्वामींनीं केला आणि बंधू ह्मणविलें. तोच सिद्धी पाविला पाहिजे. वरकड विस्तारें ल्याहावें तरी लिहिजेसारखा पदार्थ नाहीं. राजश्री सखोजी बरगे व बाजी शिंदे मुखवचनें सांगतील तीं वचनें आमचींच ऐसें जाणून, श्रीशिवनाथ देव कृष्णेपाशीं आहे, तेथें आपण आलें पाहिजे. आह्मीं येऊन स्वामीची आमची भेटी होऊन श्रीचे व कृष्णेचे साक्षीनसी बेल तुळशी होतील. मग जो विचार करणें तो केला जाईल. स्वामीवितरिक्त आह्मीं कांहीं नाहीं. जैसी पूर्वीं आज्ञेप्रमाणेंच वर्तणूक केली तैसीच करू. कळलें पाहिजे.

श्रीराजारामचरणीं विलसति
तत्पर । संताजी लेखनावधिः
घोरपडे निरंतर.

---

[४८] श्री ३ एप्रील १६९७.

राजश्री आवाजी सोनदेव भारद्वाज गोत्री गोसावी यांसीः—

॥ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य सेवक रामचंद्र नीळकंठ अमात्य हुकुमतपन्हा नमस्कार. सुहुरसन सबा तिसैन अलफ. तुह्मीं हुजूर विदित केलें कीं, आपले आजेसासरे पोसो बहिरव यांचें पतक बाजारदरवाजा, कसबे पाटगाउं, येथील वतन होतें. तें त्यांहीं लग्नामध्यें आपणास आंदण धारादत्त दिलें. त्याचीं अर्पण पत्रें आह्मांपाशीं होतीं. त्या पत्रांवरून तेथें जाऊन पतकाची कमावीश करावी तों, धामधूम झाली. त्या प्रसंगांत अनुकूल पडलें नाहीं. याउपरी आपण कर्नाटक प्रांतास गेलों. मार्गीं जातां उपसर्ग झाला. यास्तव पत्रें होतीं तीं गेलीं. कांहींएक दिवस कर्णाटक प्रांतीं

होतों. तेथून राज्य सुगम झालें. राजश्री छत्रपति स्वामीची आज्ञा होऊन या प्रांतास आलों. पतकाची कमाविश करावी तों, राजश्री शामराऊ मुरुंबकर याणीं पतकमजकुरास कोणी खावंद नाहीं; याकरितां आपणास पतकमजकूर वतन करून द्यावें, ऐसा गैरवाका स्वामीस सांगितला. त्यावरून स्वामीनें त्यास सिर्णी होन पा। ५० पन्नास रास घेऊन वतन करून दिलें असे. ये गोष्टीस सा, सात वर्षे झालीं. पुरातन आपले आजेसासरे यांचें वतन त्याणीं आपल्या मनोदयें करून दिलें. त्यांचीं पत्रें होतीं तीं गेलीं. परंतु ये गोष्टीतें साक्ष बहुतजण आहेत. आपलें वतन आपलें स्वाधीन करून वतनाची सेवा घेतली पाहिजे. ह्मणून. त्यावरून ये गोष्टीची चौकसी करून मनास आणितां, हमशाही वतनदार आहेत, त्यापाशीं ये गोष्टीची गोही साक्ष मनास आणितां, तुमचे आजेसासरे पोसो बहिरव यांणीं आपलें वतन आंदण धारादत्त दिल्हें, हें सत्य जालें. याकरितां बाजारदरवाजा, कसबें पाटगाउं, येथील पतक तुमचें, असें खरेंखुरें झालें. यास्तव, शामराऊ मुरुंबकर याणें पहिलें पतकास कोणी खावंद नाहीं ऐसा गैरवाका सांगितला, आणि वतन करून घेतलें. तें त्याचें वतन दूर करून, त्यास सदरहू वृत्तीचीं पत्रें दिल्हीं होतीं, ते कुलीं रद्द केलीं; आणि त्यास सदरहू वृत्तीशीं संबंध नाहीं ऐसें केलें असे. तुमचा सदरहू वतनाचा भोगवटा चालिला नाहीं याबद्दल तुमच्या माथां सिर्णी होन पादशाही १०० एकसें रास ठेविले. आणि त्याचा वसूल हुजूर घेऊन, तुह्मावरी कृपाळू होऊन, सदरहू वतन पतक बाजारदरवाजा, कसबें पाटगांवीचें, अजरामरामत करून राजश्री अंताजी विठ्ठल देशाधिकारी प्रांत कुडाळ यांच्या नांवें सनद सादर केली असे. ते तुमचे दुमाले करून चालवितील. तुह्मीं पुत्रपौत्रीं वंशपरंपरेस अनुभवून सुखरूप पतकमजकुराची कमाविश करीत जाणें. या वतनास हक्क लवाजिमा महतकदम चालिला असेल त्याप्रमाणें तुह्मास करार केला असे. तुह्मीं घेत जाणें. जाणिजे. छ २० रमजान. निदेश समक्ष.

---

[४९] श्री. १६९७.

पूर्वी राजे थोर थोर जाहाले; त्याची नांवनिशी यादी जाविता. पादशहा झाले त्याचा तपशील. पुरुष १७३ एकूण मुदती वर्षे त्रितपशील. ता। शके १६१९ ईश्वर नाम संवत्सरपर्यंत कली गतकली. बेरीज. वर्षे ४७७९ तपशील.

महाराष्ट्र राजे पुरुष १२०. एकूण मुदती वर्षे सुमार ३६७२

मुसलमान पातशहा पुरुष ५३ त्रीपन एकूण मुदती वर्षे देखील औरंगशहा शके १६१९ ईश्वर नाम संवत्सरपर्यंत वर्षे ११०७.

तपशील.

राजा युधिष्ठिर व त्यांच्या घराणियांतील राजे पुरुष ३० तीस एकूण मुदती वर्षे बेरीज माहिने दिवस

वर्षे बेरीज	माहिने	दिवस
१८५३	११	८

तपशील.

	पुरुष	वर्षे	महिने	दिवस.
खासा युधिष्ठिर	१	३३	८	२५
राजा परिक्षिति	२	६०	१	०
राजा जन्मेजय	३	८४	७	२७
राजा अश्वमेध	४	८२	८	२४
राजा धर्म	५	८८	२	८
राजा मनजित	६	८१	११	२४
राजा जसरथ	७	७५	८	८
राजा दीपपाळ	८	७५	१०	१८
राजा उग्रसेन	९	७७	७	२४
राजा सूरसेन	१०	७९	८	६
राजा भूपति	११	६१	५	२
राजा रणजित	१२	६५	१०	२९

	पुरुष	वर्षे	महिने	दिवस
राजा वीराजित	१३	६४	७	३
राजा भीमसेन	१४	५५	८	२९
राजा शुकमल्लदेव	१५	६२	०	३
राजा नरहरिदेव	१६	६१	१०	४
राजा सूजितरथ	१७	७२	११	३
राजा शूर	१८	५८	०	८
राजा पर्वत	१९	५०	८	२१
राजा मधुकरशाहा	२०	५२	४	७
राजा तोडरमल्ल	२१	४८	१०	२९
राजा भीष्मदेव	२२	४७	१०	२९
राजा नरहरिरथ	२३	४७	११	०
राजा पूर्णमल	२४	४४	८	१७
राजा सारंगदेव	२५	५६	०	०
राजा रूप	२६	५४	१०	२
राजा अभिमन्य	२७	५१	११	८
राजा धनपाळ	२८	४८	७	४
राजा भीम	२९	५८	५	१५
राजा लखमीदेव	३०	४८	११	२१
	३०	१८३५	२१४	३९८

एकूण जमा बेरीज वर्षे, मास व दिवस :—

वर्षे बेरीज,	मास,	दिवस.
१८५३	११	८

याउपरी लखमीदेवाचा वजीर वीरशेन होता. त्याणें लखमीदेवास मारून आपण राज्य केलें. पुरुष १०. एकूण मुदती वर्षे महिने दिवस.

वर्षे,	महिने,	दिवस :—
३४७	९	२६

	पुरुष	वर्षे	महिने	दिवस.
खासा वीरसेन	१	१७	७	०
राजा सूरसेन	२	३२	८	११
राजा अनंतशाहा	३	३७	८	२३
राजा वीरशाहा	४	३२	१०	७
राजा हरिरूप	५	३५	९	१७
राजा सुलोचन	६	४३	१	४
राजा पर्वत	७	४२	९	२४
राजा सुरपाळ	८	३८	२	५
राजा कुप	९	३५	४	१४
राजा पृथ्वीपाळ	१०	३१	८	११
	१०	३४२	६६	११६

एकूण जमा बेरीज:—

वर्षे,	महिने,	दिवस.
३४७	९	२६

याउपर पृथ्वीपाळाचा वजीर नरहरीनाथ होता. त्याणें पृथ्वीपाळास मारून त्याचें राज्य आपण केलें. पुरुष १६. एकूण मुदती: —

वर्षे,	महिने,	दिवस:—
३८९	६	८

	पुरुष	वर्षे	महिने	दिवस.
खासा नरहरीनाथ	१	१५	१०	८
राजा जेतसिंग	२	२७	७	१५
राजा बैरामगत	३	२१	२	१३
राजा दीपपाळ	४	३५	४	१
राजा महाबळ	५	३५	८	७
राजा अमृतपाळ	६	२८	८	१०

	पुरुष	वर्षे	महिने	दिवस.
राजा जेतपाळ	७	२८	११	१०
राजा माणिकचंद	८	२९	७	२१
राजा कामचंद	९	३२	५	१०
राजा हरगौण	१०	१७	०	११
राजा जीवनगौण	११	२३	९	२७
राजा रीम्यवंग	१२	१३	७	२९
राजा त्रिविक्रम	१३	१०	२	१०
राजा भारमल	१४	२३	११	२४
राजा भूपति	१५	१०	२	२
राजा उदितकंठ	१६	३५	२	२०
	१६	३८१	९५	२१८

एकूण जमा बेरीज :—

वर्षे,	मास,	दिवस.
३८९	६	८

याउपरी उदितकंठाचा मंत्री होता. त्याणें उदितकंठास मारून आपण राज्य घेतलें. तें राज्य केलें पुरुष १६. एकूण मुदती :—

	पुरुष	वर्षे	महिने	दिवस.
खासा मंत्री	१	२४	२	०
राजा चंद्रपाल	२	१६	९	२४
राजा सुंदरपाल	३	२१	४	१८
राजा देशपाळ	४	१९	१	११
राजा रसिकपाळ	५	१८	०	१२
राजा अनंतपाळ	६	१८	०	२२
राजा रामपाळ	७	३७	११	१२
राजा गोविंदपाळ	८	२८	७	२७

	पुरुष	वर्षें	महिने	दिवस.
राजा भीमपाळ	९	१६	१०	१३
राजा अमृतपाळ	१०	१६	७	१९
राजा हाळपाळ	११	१२	५	२७
राजा भूपपाळ	१२	१४	९	२२
राजा हरिपाळ	१३	१३	८	४
राजा मदनपाळ	१४	१७	७	१९
राजा कर्मपाळ	१५	१५	२	२५
राजा विक्रमपाळ	१६	१९	११	१३
	१६	३०३	९३	२६८

एकूण मुदती वर्षें महिने दिवसः—

वर्षें,	महिने,	दिवस.
३११	५	८

याउपरी धामधूम झाली. १६ सोळाजणीं दिल्लीचें राज्य केलें. पुरुष १६ एकूणः—

वर्षें,	महिने,	दिवस.
२२५	३	५

	पुरुष	वर्षें	महिने	दिवस.
विक्रमपाल याचा वजीर सादत ह्मणून होता. त्याणें विक्रमपालास मारून आपण राज्य केलें. राजा एक.	१	२४	०	०
सादतास विक्रमजितें मारून राज्य केलें.	२	३१	०	०

	पुरुष	वर्षें	महिने	दिवस.
विक्रमजितास मलुकचंदे मारून राज्य केलें.	३	०	२	२
राजा विक्रमचंद	४	१२	७	१९
राजा कुळचंद	५	०	२	२
राजा रामचंद	६	१३	११	७
राजा कल्याणचंद	७	१०	५	४
राजा श्रीचंद	८	१४	९	१४
राजा सूरचंद	९	२६	३	२१
राजा भीमचंद	१०	१६	३	१
राजा गोविंदचंद	११	२१	७	१२
भावति गोविंदचंदाची स्त्री. तिणें राज्य केलें.	१२	१	०	०
राजा प्रतिमल, भावतिउपरी राजा झाला.	१३	७	५	१९
राजा गोविंद	१४	२०	२	१७
राजा पूर्णप्रेम	१५	७	७	१९
राजा महानंद	१६	१५	७	१८
	१६	२१९	७०	१५५

एकूण देखील वर्षें व महिने दिवसः—

वर्षें,	महिने,	दिवस.
२२५	३	५

याउपरी जैसिंग बंगाळीयाहून आला. त्याणें महानंदास मारून आपण राज्य केलें. पुरुष १२. एकूण मुदतीः—

वर्षें,	महिने,	दिवस.
१३२	८	१८

	पुरुष	वर्षे,	मास,	दिवस.
खासा जयसिंग	१	१८	५	२१
मलुसेन राजा	२	१२	४	१२
राजा सूरसेन	३	१५	७	१२
राजा माधवसेन	४	११	३	१३
राजा देवसेन	५	१०	१	५
राजा भूसेन	६	५	१०	५
राजा कल्याणसेन	७	४	८	२१
राजा हरिसेन	८	१२	०	२५
राजा ब्रह्मसेन	९	८	११	५
राजा नारायणसेन	१०	५	२	१८
राजा लखमीसेन	११	१६	७	१५
राजा दामोदरसेन	१२	११	५	१६
राजा झाला.				
	१२	१२७	६३	१६८

एकूण जमा मुद्दती :—

वर्षे,	महिने,	दिवस.
१३२	८	१८

याउपरी दामोदरसेनास मारून माधवसिंग उत्तरेहून आला. त्याणें राज्य केलें, पुरुष ६ सहा, एकूण मुद्दती :—

वर्षे,	मास,	दिवस.
८८	४	०

	पुरुष	वर्षे,	महिने,	दिवस.
खासा माधवसिंग	१	१७	१०	६
राजा दीलसेन	२	१४	५	०
राजा राजसिंग	३	१२	३	२४

	पुरुष	वर्षें,	महिने,	दिवस.
राजा शेरसिंग	४	१०	८	११
राजा वीरसिंग	५	२५	०	१५
राजा नृपसिंग	६	८	०	४
	६	८६	२६	६०

एकूण जमा बेरीज :—

वर्षें,	मास.
८८	४

याउपरी नृपसिंगास धिरंधर राजे याणें मारून राज्य केलें, पुरुष ९ एकूण मुदती :—

वर्षें,	महिने,	दिवस.
२२७	५	२९

	पुरुष	वर्षें,	महिने,	दिवस.
खासा धिरंधर	१	२२	७	०
राजा सेन	२	३५	१०	९
राजा लालजी	३	३५	२	८
राजा महानु	४	२०	३	९
राजा वीरनाथ	५	२८	५	२५
राजा जीवन	६	२२	२	२५
राजा उदयसिंग	७	२७	४	२९
राजा कुळानंद	८	२२	३	८
राजा राजपाळ	९	१३	२	६
	९	२२४	३८	११९

एकूण जमा बेरीज :—

वर्षें,	महिने,	दिवस.
२२७	५	२९

याउपरी राजपाळ पृथ्वीपाळ पूर्वेहून आला. त्याणें राज्य केलें, पुरुष ५ पांच, एकूण बेरीज :—

वर्षें,	महिने,	दिवस.
९५	४	२८

	पुरुष	वर्षें,	मास,	दिवस.
खासा पृथ्वीपाळ	१	१४	७	१७
राजा उजनपाळ	२	११	६	१३
राजा उदयपाळ	३	१३	७	१४
राजा चैनपाळ	४	१९	२	१९
राजा पिठोरा थोर राजा झाला होता.	५	३६	४	२५
	५	९३	२६	८८

एकूण जमा बेरीज :—

वर्षें,	महिने,	दिवस.
९५	४	२८

याउपरी राजा पिठोरा यास मारून मुसलमान पादशाहा झाले, पुरुष ५२ बावन्न, देखील औरंगशाहा, मुदती तागाईत शके १६१९ ईश्वर नाम संवत्सर वर्षें :—

११०७

तपशील.

	पातशाहा	वर्षें,	महिने,	दिवस.
सुलतान रुकनदीन	१	५३	९	८
सुलतान बाहवदीन	२	३५	०	१०
सुलतान शामसदीन	३	३९	४	१२
सुलतान कुतुबदीन	४	३७	७	०
सुलतान शाहाबदीन	५	१०	४	२१

	पातशाहा	वर्षे,	महिने,	दिवस.
त्रिर्वानें पातशाही केली	६	७	२	२२
सुल्तान नसर्दी गोरी	७	१८	५	२९
सुलतान गयासदीन गोरी	८	२१	३	२२
सुलतान मोइनदीन	९	२३	७	१२
शहा हुसेन गोरी	१०	१४	३	१०
सुलतान जलाउदीन गोरी.	११	१६	४	०
सुलतान फतबदीन गोरी	१२	२०	९	०
याकुब शाहा गोरी	१३	१५	१०	६
शाहा शमसद्दीन	१४	१३	९	९
सुलतान अलाउदीन	१५	२७	७	१३
सुलतान कुतुबदीन	१६	४	५	१३
सुलतान गयासदीन	१७	५	१	९
सुलतान सरमस्त गोरी	१८	७	९	१३
सुलतान शाहा गोरी	१९	२७	०	७
फेरोजशाहा खतम	२०	४१	५	०
महंमद शाहाबीन फेरोज	२१	१७	०	११
शाहा कुलीबीन फेरोज	२२	५	७	९
सुलतान तगलुशा यांणीं गड मुस्तेद केले.	२३	३१	९	२१
तुरूमशाहा गोरी	२४	५	७	१५
महंमद नसरदीन	२५	६	४	१२
सरफ सदीन	२६	१०	७	१५
मलूशाहा.	२७	१७	५	७
तोडरशाहा	२८	३३	५	७
मुबारकशाहा	२९	१९	७	१३

	पातशहा	वर्षें,	महिने,	दिवस.
अल्लादीन पठाण बिन महंमद तुंजी.	३०	१६	११	२७
हुसेनशाहा पठाण लोदी.	३१	१५	११	२७
बहलोलखान पठाण	३२	४२	७	२०
शाहा शिकंदर बिन बहलोलखान लोदी.	३३	२९	७	१३
इभराईमशाहा बिन सिकंदर.	३४	१६	११	२७
सिंधुक्षेत्रीं हरामखोर	३५	९	०	१५
गाजीशाहा बिन मुबारकशाहा पातशाहा.	३६	१२	७	१०
शाहा महंमद तुंजी	३७	७	७	१०
सुलतान तैमूर बारस्याला चकते झाले.	३८	७	७	०
सुलतान बाबर	३९	३४	९	१५
सुलतान हुमाऊ	४०	२०	४	९
शेरशाहा पठाण	४१	२१	२	१०
सिलिमशाहा बिन सेरशाहा.	४२	२८	९	१५
फेरोजशाहा बिन सिलिमशा.	४३	३३	०	०
महंमद खानगाजी	४४	३	२	१८
इबराईमखान फिसादी	४५	१५	०	७
हेमूबकाल सिकंदरशाहाचा वजीर होता त्याणें राज्य केलें.	४६	०	८	०

	पातशाहा	वर्षे,	महिने,	दिवस.
हुमाऊनें दुसऱ्यानें राज्य केलें.	४७	२०	०	७
सुलतान अकबर पातशाहा गाजी.	४८	५१	९	११
सुलतान नुरदीन पातशाहा जाहांगीर.	४९	४२	१०	२०
सुलतान शाहारयार बिन जहांगीर.	५०	०	०	१४
सुलतान बाबर बिन सुलतान अशरू.	५१	१९	३	१९
शाहाजहां पातशाहा याचें नांव कुरुंम, औरंगशाहाचा बाप. याचे बेटे. १ दाराशाहा. १ शाहासुजा. १ मुराद बक्श. १ औरंगशाहा. —— ४	५२	३२	१	१४
त्यास, औरंगशाहा उपजला, शके १५४० पंधराशे चाळीस, काळयुक्त संवत्सर. त्यास चाळीस वर्षांची उमर होयतों शाहाजां जवळी चाकरी करीत	५३	४०	०	०

होता. त्याउपर पातशाही आपले हिंमतीनें करितो. शके १६१९ ईश्वर नाम संवत्सरे, एकूण मुदती भोगवटाः--

५३	१०८२	२७९	६३०

एकूण जमा वर्षें बेरीज:--

११०७

तेरीज:---एकंदर राजे व पातशाहा पुरुष १७३, एकूण मुदती शके १६१९, ईश्वर नाम संवत्सरे वर्षें:--

४७७९

महाराष्ट्र राजे १२० एकूण बेरीजः---

	पुरुष	वर्षें,	महिने,	दिवस.
युधिष्ठिर पांड-- यांचे पुरुष.	३०	१८५३	११	८
वीरसेन पुरुष	१०	३४७	९	२६
नरहरिनाथ पुरुष	१६	३८९	६	८
मंत्री उदितकंठाचा	१६	३११	५	२८
धामधुम फुट राजे	१६	२२५	३	५
जैसिंग पुरुष	१२	१३२	८	१८
माधवसिंग	६	८८	४	०
धिरंधरराजे पुरुष	९	२२७	५	२९
पृथ्वीपाळ पुरुष	५	९५	४	२८
	१२०	३६६७	५५	१५०

एकूण जमा वर्षे :—

३६६७ ऐन वर्षे.

५ मास ५१ व दिवस १५०.

एकूण माहे ५ एकूण ६०.

माहे एकूण वर्षे.

३६७२

मुसलमान पातशाहा पुरुष ५३.

समेत औरंगशा चालती मुदती

समेत मोगलटा बेरीज वर्षे ११०७.

यासीं, तांत्राचें भविष्य त्यांच्या महजबे शास्त्रप्रमाण कीं:— दिल्लीस मागतीं हिंदू राजे छत्र धरणार. गेरासें गेरा सन येतां दिल्ली हातींची जाईल. त्याप्रमाणें वर्षे ४ चारी व चालतें वर्ष एकूण रमारमीं पांच वर्षें उरलीं आहेत. व ईश्वर संवत्सरीं दिल्लीचा राजा यासीं परम पीडा होईल. औरंगशाहाचा पुत्र हल्लीं दिल्लीस आहे, तो रजपुतणीचे पोटींचा, त्यास हिंदूचा अभिमान असे, त्या फिसातीनें भाऊ भाऊ झगडोन हिंदू दिल्लीस जातील, प्रयागीं ३ वर्षे छावणी करतील, फिरोज पठाण व मोगल जमाव करून दिल्लीहून हिंदूस काढितील. पुढें नर्मदेची सरद पडेल. या वर्षापासून भीमा दक्षण प्रांत सोड पडेल. भीमा उत्तर प्रांत तहद प्रयाग २४॥ साडेचोवीस वर्षे राजीक घ्राटेल, हें भविष्य असें. यांत कलिराजा चालतो. युगाची संख्या आहे. घडेल तें प्रमाण. परंतु भल्यांचें सदरहू भविष्य आहे.

याची तालीक चित्रभानु संवत्सरीं श्रावणमासीं शुक्लपक्षीं तृतीया गुरुवासरीं लिहिली असे. शके १६२४. दस्तूर राजश्री रावो व्यंकटेश दफतरदार, दिा मजमू, कुलकर्णी, काा भोर, तर्फ रोहिडखोरे, सुभा मावळ. सुा सलास मया अलफ, छ २९ सफर.

ताजाकलम--

औरंगशा पादशाही करीत असतां, शके १६२८, व्यय-नाम संवत्सरे, माघ बहुल अमावास्या, छ २८, [अठ्ठावीस असून सत्तावीस केलेला दिसत आहे तेव्हां खरें कोणतें तें समजत नाहीं.] जिल्काद सन सबागध्यें, दोन प्रहरा मृत्यु पावले.

शाहा अलम दिल्ली प्रांतीं होता त्यावरी अजमतारा चालोन गेला त्याचें याचें झूंझ चंबळ नदीजवळी झालें. छ

ते भांडणीं. अजमतारा रणास पुत्र नातूसहवर्तमान येऊन मृत्यु पावले. हालीं शाहाअलम तक्त कबज करून पादशाही करूं लागला. शके १६२९ सर्व-जित् संवत्सरे.

सुलतान तारा औरंगशाहाचा लेक छ १ जिल्हेज सन सबा फाल्गुन शुद्ध द्वितीया रविवासरीं पादशाही करूं लागला.

---

[९०] ११ आक्टोबर १६९८.

अमीलानी हाल व इस्तकहाल व देसमुखानी व देसपांड्यानी ताा हाय पाा कोल्हापूर चिदानंद सुहुर सन तिसा तिसैन अलफ, सन ११०८ फसली. दरींविला, यादव शिवदेऊ नाडगौंडा पाा मार हुजूर येऊन इलतमेस केला जे :--आपणास पाा मजकुरीं जुजबी इनाम आहे. त्यानें आपला अवकाती चालत नाहीं. साहेबीं मेहेरबान होऊन परगणे मज-कुरीं गांवगन्ना इनाम मऱ्हामत केलिया पेस्तरसालाची लावणी करून परगणे आबाद करून, ह्मणोन अर्ज केला. बराय अर्ज खातरेस आणून

पा मारीं तुह्मांस तर्फहायपैकीं अजन्हामन्हामत इनाम जमीन मन्हामत केली असे. छ २७ रबिलाखर.

मोर्तब सूद.

[९१] श्री. १६९९.

राजश्री भगवंतराऊ रामचंद्र सरदेसाई ता। साळसी गोसावी यांसी —

छ अखंडितलक्ष्मीअलंकृतराजमान्य सेवक परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी नमस्कार सु॥ तिसा तिसैन व अलफ. मौजे चिंदर ता। मजकूर येथें हत्तीतोड व खोदमिराबाग कारकीर्द आदलशाई येहीं नवजिकीर बाग लावणी केली आहे. ते अजिवरी खाली. सा सालें दिवाणांत कमावीस चालत होती. सांप्रत राजश्री रामचंद्र पंडित अमात्य येहीं मौजे मजकूरचे कुळकर्णी राम शेणवी व गुण शेणवी यांचे स्वाधीन केले होते. सन सलासापासून सालमजकुरातागाईत त्याणीं कमाविस करून उपभोग केला. याकरितां त्यांचे बापभाऊ उभे राहून कथळा कराया लागले. पुढें कुळकर्णी यांकडे बाग असिल्यानें कथळा वारत नाहीं. व अवघे वतनदार हुजूर विशाळगडचे मुकामीं आले होते. त्यांचे विद्यमानें मनास आणितां सदरहू दोन्ही भाग त्याकडून दूर करावे असा निर्वाह जाहला. त्यावरून राम शेणवी व गुण शेणवी कुळकर्णी चिंदर यांकडून दोन्ही बाग दूर करून हत्तीतोड व खोदमिरा दोन्ही ठिकाणीं बागाईत यांचे माथा शेरणी दाभोळी लारी १००० एक हजार करार करून तुह्मास दिले असे.

[९२] श्री. १७००.

यादी. चंदीच्या मुक्कामाहून धर्मादाय व इनामती व इसाफती व नूतन वतनें कारकीर्द महाराज राजश्री छत्रपति साहेबानीं दिलीं होतीं. त्यांचा विचार मनास आणितां राज्याचा बंदोबस्त न होतां ऐशा सनदा येऊन दाखल जाहाल्या. तेसमयीं श्रीमन्महाराज मातुश्री तारा आईसाहेब व सर्व राजमंडळ मिळोन निर्णय केला, येणेंप्रमाणें, बितपशील. सु॥ इहिदे अलफ.

ज्याणीं शंभर लारीची सनद घेतली असेल, त्याप्रमाणें निमेप्रमाणें द्यावें. कलम १.

फरमान पातशाहाकडे प्रांत असतां फरमान दिलें नाहींत. कलम १.

प्रांतांत फरमान भोगवटियासी दाखवूं लागले तेव्हां दरखोरी करितां फरमानाचा निवाडा येणेंप्रमाणें:—

महाल.

१ खारापाटण महाल.
१ संवदळ महाल.
१ राजापूर महाल.
१ लांझे महाल.
१ संगमेश्वर महाल.
१ साळसी महाल.

———

६

येकूण महाल सहा. या महालांतील अंमल अदिलशाहा पातशाहा याचा उठून गेला. ते समयीं इकडील लोक तिकडेस चाकरीस होते. ते समयीं आपले घरास यावयास लागले. तैनाता पावल्या नाहींत. त्यावेळेस एकंदर लोकांनीं आदिलशहास अर्ज केला कीं, आह्मीं आपल्या प्रांतास

ज्याणीं जमिनीची सनद घेतली असेल त्यास निमेप्रमाणें द्यावी. कलम १.

ज्याणीं गांव मुकासे घावयाच्या सनदा आणिल्या त्याचा प्रकार. ज्यास गांवसेर सारिखे असतील त्यासच द्यावे. वरकडास ऐवज मात्र द्यावा. कार्यभाग जाणून. कलम १.

खारापाटण महालांतील चौकशी मनास आणितां इदलशहाचे फरमान व थोरले शिवाजी महाराज यांचीं पत्रें भोगवटियासीं घेऊन वतनदार ह्मणवीत होते. त्यांची दरखोरी करितां:—

१ रामाजी हरी कुलकर्णी पोंभुर्लें यांच्या वडिलांनीं खारेपाटण महालचीं देसगतचीं राजपत्रें व फर्मान घेतलें; परंतु याचा भोगवटा अव्याहत नाहीं. वर्षें तूट जहालीं. सबब पत्रें खोटीं. कलम १

जबानीई सुबाजी बिन हुसनजी नीाा मुखरी दाखल मुखरी मुकादम याचें नकल जाहलें. त्यास वर्षें ६२ बासष्ट झालीं. इतकेंत मालेराई जाहाली. तेव्हां कोणी वतनदार गांवीं नाहींत. जो भेटेल तोच वतन-

जातो, आह्मांस पैका पावला नाहीं. पुढें आह्मीं काय करावें? आपलीं ठाणीं उठोन आलीं. त्या प्रांतीं साहेबाचा नक्षा राहे ऐसें द्यावें. तेव्हां ज्यास जे गोष्टीचें अगत्य त्याप्रमाणें फरमान मागितलें. त्याप्रमाणें दिलें. फरमानाचा कर हातास येणेचा. मुनसीस सांगावें कीं, फरमान अमुक कार्यास पाहिजे. त्याप्रमाणें मुनसीनें अर्जबेगास सांगावें कीं, फलाणा गृहस्थ फलाण्या कार्यास फरमान मागतो. अर्जबेगानें आदिलशहा पाछाहास अर्ज करावा कीं, अमुक जमादार आपले घरीं जात आहे, पैका पावला नाहीं, आणि साहेबाचीं ठाणीं प्रांतांतील उठोन आलीं, पैका न दिलें याकरितां अफाट शिरपाव मागतात, साहेबीं द्यावें, ह्मणजे प्रांतांत साहेबाचा नक्षा राहील. हें जाणून सर्वांस मागितलेंप्रमाणें फरमान देविलें. फरमानाचा चक लहान कार्य असल्यास येणेप्रमाणें.

सिरस्ता :—

मुनसी	अर्जबेग	नजर
२	२	५

दार ह्मणून मारीत आणावे. वसूल घेत. रोखा पोखा कौल करार त्याच्याच नांवचा. वतनदाराचा उजूर नाहीं. ते समयीं दादन मुखरीच्या निसबतीनें सेवा केली. ते वेळचीं पत्रें माझे नांवचीं आहेत. ऐशी हे राजगत भोगली आहे. पत्रें रूप करणार धणी समर्थ आहेत. पत्रें भोगवटीचीं. मीं वतनदार नव्हे; परंतु मुखरीचा ऐसा ह्मणवीत आलों आहे. याचा हें सुबाजी व मुखरीचा गुमस्ता ह्मणोन पत्र करून दिल्हें आहे. कलम १.

थोर कार्य असल्यास रुा १६, नजर पातशाह १०, मुनसी ३, अर्जबेग ३.

याप्रमाणें फरमाचा बंद शिवशाईंत जाहला आहे. कलम १.

[९३] श्री. ६ नोव्हेंबर १७०५.

राज्याभिषेकात्र शालिवान शके १६२७ पार्थिव नाम संवत्सरे मार्गसीर शुद्ध द्वितीया बुधवार, दर जागा किले प्रसिद्धगड उर्फ रांगणा, हजीर मजालस बेहुजूर:—

दिवाण लोक राजमुद्रा.

राजश्री जयसिंग जाधवराऊ सेनापति.

श्री ०

राजारामचरणीं दृढभाव। सेनापति धनाजी जाधवराव॥

श्री पत्याचार्य.

राजश्री हंबीर राऊ मोहिते सरलष्कर.

श्री

शिवचरणीं दृढभाव। सरलष्कर मोहिते हंबीरराव॥

राजश्री बिचाजी पाळकर मुद्राधारी किले प्रसिद्धगड

श्री ०

राजश्री बाराजी मोहिते नामजाद जंजिरे सिंधुदुर्ग.

श्री ०

राजाराम नरपतेस्तस्य सेवक बराणजी मोहिते.

राजश्री खंडोजी निकम समशेरबहादर.

राजश्री संताजी पांढरे शरफन मुलूक.

श्री ०

पाळकी॥ शिवचरणीं तत्पर। संताजी पांढरे निरंतर॥

राजश्री बजाजी नाईक देशमुख पा। फलटण.

बजाजी नाईक देसमूक निंबाळकर.

राजश्री नेमाजी सिंदे.

शिवचरणीं वंदे नेमाजी शिंदे.

देकोजी खांडे व कारकून
कर्यात कापशी.

महालहाय:——————————————

तर्फ खारेपाटण

विठ्ठल विष्णु ठाकूर
देसाई ता। मा।.

रामाजी आपाजी देशकुल-
कर्णी ता। मजकूर.

गोविंद विश्वनाथ प्रभू बंदर-
निवीस व जाहाजनिवीस
ता। मा।.

तर्फ साळसी

खंडो नानदेऊ जानीब
सरदेसाई तर्फ साळसी.

अनंत प्रभू देसाई ता।
साळसी.

माहाद सावंत भोसले
नाईकवाडी ता। मजकूर.
कट्यार.

सुर्याजी साटम नाईकवाडी
तर्फ मजकूर.
कट्यार.

मामले परंडे

शाहामलिक पा। मोकदम
मौजे सेंदरी बि॥ राघो
भिवाजी कुलकर्णी.
नांगर.

सुभानजी पा। मोकदम
मौजे नाळगांव.
नांगर.

तर्फ तारळें.

राघो हरी कुलकर्णी ता।
येमघोल मेनघोल देहाय ३२.

तर्फ चांदगड.

पांडुरंग भिमाजी देशकुळकर्णी।
व गांवकुळकर्णी ता। मा।.

तर्फ अजिरें.

देसकानी.

कानोजी नाडवर
नामोद्दीन आमद.
शिक्का.

त्रिंबकजी कानोजी सरदेसाई.

खवळोजी कानोजी देसाई.
शिक्का.

संभाजी खंडोजी देसाई.

नरसोजी रामजी देसाई.

शामराऊ मल्हारी नाडगौडा ता। मजकूर.

हरजी निकम पाटील निमे
मौजे उतूर.

रोवळोजी बिन भेनोजी
बंडगा पाटेल मौजे हरली
बु॥.

नेमाजी बिन सोमाजी
ठिका पाटेल
कि नी----

सुभा परगणे कुडाळ
पुंडलिक राम नाडकर्णी
पा। मजकूर.

अंताजी राम कुलकर्णी
मौजे माणगांव ता। माणगाऊ.

गोपाळ बाबाजी कुलकर्णी
मौजे परंडले.

नारो राम कुलकर्णी मौजे
काबरे ता। पाट.

नारो बाबाजी कुलकर्णी
मौजे धामापूर ता। वराड.

कर्यात कापशी.

मदार बुदरुक देसाई का।
मजकूर.

तिमाजी निळकंठ
व वेंकाजी कृष्ण
देशकुलकर्णी
का। मा।र
नि॥ डी.

यादो सिवदेऊ
नाडगौडा का।
मजकूर.

प्रा। वांई ——————

यमाजी नागनाथ कुल-
कर्णी मौजे किणई सा।
कोरेगाऊ.

हुजीर मजालसी समस्ता हुजूर रामाजी विठ्ठल शेणवी व कृष्णाजी बाव शेणवी व अंताजी मल्हार शेणवी देशकुळकर्णी व गांवकुळकर्णी देहाय तर्फ अजिरें यांनीं राजश्री रामचंद्र नीळकंठ भारद्वाजगोत्री देशकुळकर्णी व गांवकुळकर्णी तर्फ अजिरें यांस लिहून दिलें पत्र ऐसें जे:— तर्फ मजकूरचें देशकुळकर्ण व गांवकुळकर्ण बुन्यादी विठ्ठल माद शेणवी याचें होतें. त्याच्या वडिलापासून आपल्या वडिलांनीं तिसरी तकसीम देशकुळकर्ण व गांवकुळकर्ण विकत घेतलें. गांवहि विभागाप्रमाणें तिसरे तकषिमेचे वाटून दिले. त्याप्रमाणें आपले वाडवडील परंपरा खात आले. विठ्ठल माद शेणवीहि आपले परंपरेनें दोनी तकषिमा देशकुळकर्ण व गांवकुळकर्ण खात आले. ईश्वरगतीनें विठ्ठल माद शेणवी मृत्य पावला. त्याचे पोटीं कोणी संतान नाहीं. अगर त्यास कोणी दाईज गोत्रज नाहीं. नकल जाहालें. वृत्ती दिवाणची देखोन महाराज राजश्री साहेबीं तुगासीं अमरामऱ्हामत करून देतां सारें वतन विठ्ठल माद शेणवी याचें समजोन अर्बा तिसैनच्या सालीं स्वामीनीं आपला मुतालीक तिमाजी गोविंद वतनावरी पाठविला. तो महालासी जाऊन तर्फमजकूरचें देशकुळकर्ण व गांवकुळकर्ण अनभवूं लागला. धणी चंदीस दूर प्रांतें असतां हा करीना कोणास सांगावयाकरितां आपण बाहीर पडोन देशावरी गेलों. वडिलापासोन तिसरी तकषीम आपला भोगवटा, त्यास विक्षेप जाहला देखोन, बेळगांवीं राहोन कथळा केला. त्यावरी सन अर्बा मयामध्यें महाराज राजश्री छत्रपतिसाहेबाची स्वारी प्रसिद्धगड उर्फ रांगणा या जागा जाहाली. ते प्रसंगीं राजश्री त्र्यंबकजी कानोजी सरदेसाई व खलोजी कानोजी देसाई व संभाजी रामाजी देसाई व शामराऊ मल्हार नाडगौडा तर्फ मजकूर हे राजश्री साहेबाच्या दर्शनास आले. त्याबराबरी कृष्णाजी बाव शेणवीही आले. त्यांणीं तुमची भेटी घेतली. ते प्रसंगीं देशकास तुह्मीं विचारिलें कीं, रामाजी विठ्ठल शेणवी हे बेळगांवास जाऊन आमच्या वतनास कथळा करिताती ह्मणोन. त्यास त्याणीं सांगितलें जे, देशकुळकर्ण व गांवकुळकर्ण तर्फ मजकूर येथील तिसरी तकपीम त्याची, त्याचा भोगवटा चालत आला आहे, त्याप्रमाणें त्याची तकपीम त्यास

द्यावी, आणि त्यास तुह्मी समाधानरूप राहोन तकसीमप्रमाणें वतन अनभवून असावें, ऐसें आमच्या विचारें आहे, ऐशियास, शफतपूर्वक वतन द्याल तरी रामाजी विठ्ठल शेणवी यासी बेळगांवींहोऊन भेटीस घेऊन येऊन ह्मणोन. त्यावरून तुह्मीं देशकाची गोष्टी मान्य करून देशमुखास व कृष्णाजी बाब शेणवी यासी शफतपूर्वक सांगितलें कीं, रामाजी विठ्ठल शेणवी यास घेऊन येणें. त्यावरी देशक व कृष्णाजी बाब शेणवी महालास गेलेयाउपरी रामाजी विठ्ठल शेणवी यास बेळगांवींहोऊन आणून छ १६ रजब सन सीत मया ये दिवशीं राजश्री त्रिंबकजी कानोजी सरदेसाई व रवळोजी कानोजी देसाई व संभाजी खंडोजी देसाई व शामराऊ मल्हार नाडगौडा आह्मास भेटीस घेऊन आले. आमच्या तुमच्या भेटी जाहाल्या. तेसमयीं आह्मा समक्ष देसाई तर्फ मजकूर यास विचारिलें कीं, रामाजी विठ्ठल शेणवी व कृष्णाजी बाब शेणवी व अंताजी मल्हार शेणवी यांची देशकुळकर्णाची व गांवकुळकर्णाची तिसरी तकषीम आहे ह्मणतात ते कशी आहे ते आपले बेताळीस स्मरोन सांगा, तुह्मीं देशमूख, आह्मांस व त्यास वडील आहा, जें सांगाल त्यास आह्मीं मान्य आहों. ऐसें ह्मणितलें. त्यावरी देशकांनीं सत्य स्मरोन वृत्तीचा करीना सांगितला कीं, तर्फ मजकूरचें वतन देशकुळकर्ण व गांवकुळकर्ण पूर्वीं विठ्ठल माद शेणवी याची, त्यास त्याच्या वडिलावरी पूर्वीं दिवाणचा कसाला पडिला. तेव्हां रामाजी विठ्ठल शेणवी व कृष्णाजी बाब शेणवी व अंताजी मल्हार शेणवी यांच्या वडिलांनीं देशकुळकर्णाची व गांवकुळकर्णाची तिसरी तकषीम विकत घेतली. त्या दिवसापासून तिसरे तकषिमेचा भोगवटा त्यांचा चालत आला आहे, त्यास विठ्ठल माद शेणवी मृत्य पावला, त्याचे पोटीं कोणी संतान नाहीं, अथवा त्यास कोणी दाईज गोत्रज नाहीं, नकल, वृत्ती दिवाणची, धणियानें तुमास दिली, तरी दोनी तकषिमा विठ्ठल माद शेणवी याच्या देशकुळकर्ण व गांवकुळकर्ण तुह्मीं अनभवणें, एक तकषीम देशकुळकर्ण व गांवकुळकर्ण विठ्ठल माद शेणवी याच्या वडिलीं रामाजी विठ्ठल शेणवी व कृष्णाजी बाब शेणवी व अंताजी मल्हार शेणवी यांच्या

वडिलास विकत दिली, त्याप्रमाणें त्रिभागाचे गांवहि पूर्वींच वाटले आहेती ऐसें सांगितलें. तें मनास आणून, त्याउपरि देशक तर्फ मजकूर व गोत बसवून आह्मांस वतनाचा करीना पुसतां आह्मीं सांगितला कीं, तर्फ मजकूरचें देशकुळकर्ण व गांवकुळकर्ण विठ्ठल माद शेणवी याच्या वडिलाचीं असतां त्याच्यापासून आपल्या वडिलीं देशकुळकर्णाची व गांवकुळकर्णाची तिसरी तकसीम विकत घेतली. तदारभ्य आमचा भोगवटा तिसरे तक्षिमेचा चालत आला आहे, आह्मीं कांहीं विठ्ठल माद शेणवी याचे दाईज गोत्रज नव्हे, तुह्मास महाराज राजश्री साहेबीं, विठ्ठल माद शेणवी निपुत्रिक, त्याचे वौशीं कोणी नाहीं, वृत्ती दिवाणची ह्मणोन तर्फ मजकूरचें वतन विठ्ठल माद शेणवी याचें, ऐसें समजोन दिल्हें, त्याउपरि तुह्मीं आपला मुतालीक तिमाजी गोविंद वतनावरी पाठविला, ता वतनाचा कारभार करूं लागला, त्याची आमची कटकट जाहाली, धणी चंदीस दूर प्रांतें असतां हा करीना आह्मीं कोणास सांगावा, याकरितां आह्मीं बाहीर पडोन देशावरी गेलों होतों, ऐशियास विठ्ठल माद शेणवी याच्या दोनी तक्षिमा देशकुळकर्ण व गांवकुळकर्ण, आमची तिसरी तक्षीम देशकुळकर्ण व गांवकुळकर्ण येणेप्रमाणें पूर्वापार भोगवटा आहे, त्याप्रमाणें तुह्मीं आपल्या दोनी तक्षिमा वतन अनुभवावें, आमची तिसरी तक्षीम आह्मांस द्यावी, ह्मणजे तुह्मीं आह्मीं समाधानरूप असोन आपल्या विभागाप्रमाणें वर्तावें. ऐसें आह्मीं सांगितलें. त्यावरून देशक तर्फ मजकूर व समस्त गोत यांनीं करीना मनास आणून तुह्मांस सांगितलें कीं, यांच्या वडिलीं तिसरी तक्षीम विकत घेतलें आहे, त्याप्रमाणें भोगवटाही चालला आहे, तिसरी तक्षीम देशकुळकर्ण व गांवकुळकर्ण पूर्वीं विभागही जाहाला आहे, त्याप्रमाणें याचा यास देऊन तुह्मीं उभयतांनीं समजावें. त्यावरून आमच्या वडिलीं वतन विकत घेतलें, भोगवटाही पूर्वींपासून चालत आला आहे, याकरितां आमची तिसरी तक्षीम आह्मांस देशकुळकर्ण व गांवकुळकर्ण तर्फ मजकूरची पूर्वील वाट्याप्रमाणें दिली. आह्मीं आपली तिसरी तक्षीम अनुभवून सुखरूप असावें. तुमच्या दोनी तक्षिमा वृत्ती देशकुळकर्ण व गांवकुळकर्ण तुह्मीं अनुभवून

असावें. याप्रमाणें तुह्मीं आह्मीं समाधानें असावें. याउपरि तुह्मां आह्मां-मध्यें कथळा नाहीं. ऐसें करून तुह्मीं आपलें पत्र आह्मांस लिहून दिलें, आह्मीं हें आपलें पत्र तुह्मांस लिहून दिलें. याउपरि ज्याकडोन अंतर पडेल तो गोताचा अन्यायी. पान, मान, तश्रीफ, आधीं तुमची, दुसरी आमची. देशकुळकर्णाचा कारभार तुह्मीं आह्मीं दिवाणांत करावा. दफ्तर तुमचे घरीं असावें. दिवाणांतून पुढें वतनमुळें तुमा आमांस गोडीमोडी होईल तें तक्सिमेप्रमाणें वाटोन घ्यावें.. सदरहू लिहिलेंयाप्रमाणें देशक तर्फ मजकूर व गोत यांच्या विद्यमानें तुमी आमी समजलों आणि आपले रजावंदीनें एकमेकास पत्रें लिहून दिलीं असेती. त्यास अन्यथा नाहीं. हें पत्र. सही. छ १ माहे शाबान, सुा सीत मया व अलफ. वळी पत्रलेखन, सुमार १३३, एकशे तेत्तीस. याखेरीज सदर वळी ३ तीन.

---

[९४] अलीफ. ११ मे १७०७.

सर्व राजांत श्रेष्ठ, सर्व उमरावांत थोर, मुसलमानी धर्मरक्षक, राजे शाहू याणीं बादशाही सरकारास संतोष मानून समजावें कीं, महंमद अजीम मारिला जाऊन इकडील फत्ते झाल्यानंतर काय मा। झाले ते लिहिण्यांत येत आहे कीं, खुजस्ते बखतर याचें दैव फिरल्यामुळें त्याणें आपले कामगाराचें सांगणें ऐकून इकडील लोभावर लक्ष न ठेवितां लढाईस आला होता. तो छ १० सफर रोज सोमवारीं आपले पुत्रा-सुद्धां मारला गेला व कितेक लोक कांहीं कामास आले. ऐशियास तुह्मीं या गोष्टीचा संतोष मानून अशी ताकीद ठेवावी कीं, तुमचे फौजे पैा। कोणी पादशाही मुलखांत पैगामा करूं नये आणि रयतेस इनाम देऊन हे सर्वकाळ इकडील लोभास आपले उद्योगाचें कारण समजत जावें. छ १९ सफर, सन १ जुलूस.

---

[९५] अलीफ. १९ मे १७०७.

राजे शाहू याणीं बादशाही कृपेचे उमेदवार होऊन जाणावें कीं, तुमचें पत्र पावून लोभास कारण झालें. तुह्मास मनसब व दहा हजारी

स्वाराची सरदारी दिली असे. व बाकांचे व तुमचे सर्व मा। सैद अब-दुल्लखान बहादुर कुतुबुलमुलुख याजकडे सांगितलें आहे त्याप्रों अमलांत आणावें आणि आपला वकील एक तुमचे येणें येथें होई त्यापूर्वी पाठवून द्यावा, ह्मणजे मनसबेच्या सनदा सरकारांतून तयार करविल्या जातील. छ २७ सफर, सन १ जुलूस.

---

[९६] अलीफ. २३ जून १७०७.

सर्व शूरांत श्रेष्ठ, सर्व उमरावांत थोर, इस्लामीधर्मरक्षकाचे पुत्र, राजे शाहू याणीं पातशाही कृपेतें संतोषी होऊन जाणावें कीं :— तुह्माकडील रायभान वकील याणीं विनंति केली जे, तुह्मी आपले जहागिरीचे महालीं ताराबाई! आल्यानंतर इकडे यावयाचा इरादा केला आहे, याजकरितां राणीनें जमीदारीचा फर्मान मिळावा ह्मणोन कृत्रिमानें अर्जी लिहिली होती. तिला कोल्हापूरकर व तिचे चिरंजीवास कपटी समजोन त्याचें उत्तर दिल्हें नाहीं. कारण ना शिवाजी! कीं, आमचे मुलकांतील राज्य व जमीदारी तुह्मांकडे असावी आणि तुह्मी आपले वडिलांप्रमाणें तेथें कायम रहावें. नंतर जे किल्ले थोरले पातशाहींतील त्या वेळेस हातीं आले नउते तेहि फौज पाठवून ध्यावे. जाणोन तुह्मी आत्मिक असें समजोन हा फर्मान पंज्यासुद्धां लिहिला आहे. तरी तुह्मीं आपले फौजेसुद्धां जलद येथें येऊन पोहोचणें. ह्मणजे तुह्मावरी कृपा आणि लोभ वारंवार उत्कृष्ट होईल. छ ४ माहे रबिलाखर, सन १ जुलूस.

---

[९७] अलीफ. १९ आगस्ट १७०७.

सर्व राजांत श्रेष्ठ, सर्व उमरावांत थोर, मुसलमानी धर्मरक्षक, राजे शाहू याणीं बादशाही कृपेचे उमेदवार होऊन जाणावें कीं, सांप्रत ईश्वर कृपेंकरून आमची फत्ते होऊन सिंहासनाधिरूढ झालो. तुमचे निष्ठेविशींचा मजकूर अमीरुलउमराव याणीं समजाविला. ऐशीयास तुह्मीं पेशजी प्रों इकडील लक्षांत वागवोन मशारनिल्हे लिहितील तशी वर्तणूक करीत जावी. छ २ जमादिलाखर, सन १ जुलूस.

---

[९८] श्री. ५ अक्टोबर १७०७.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३४ सर्वजित् संवत्सरे कार्तिक बहुल सप्तमी सौम्यवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शिव छत्रपति याणीं राजमान्य राजश्री सदाशिव परशराम यांसी आज्ञा केली ऐसी जेः—राजश्री नारो पंडित स्वामीच्या दर्शनास आले होते. हालीं आज्ञा घेऊन विजयदुर्गी रहावयास आले आहेत. ऐशास, यांचा घरटाव जिभीमध्यें आहे. बहुत दिवस तेथें राहात आहेत. प्रस्तुत ते जागां राहातील. तरी तुह्मीं हरएकविशी परामर्ष करून सुखरूप राहात असे करणें. नोबती दोवेजण पहिलेपासून याकडे होते तसे देणें. प्रयोजन प्रसंगीं सुतार गौडा मागतील तो जंजिऱ्याकडून देववित जाणें. याकडील माणसांशी परवानगी रसानगीविषयीं व वरकड कोण्हेविशीं कटकट होऊं न देणें. यांचें कर्जवाम कोणीं देणें असेल तें रास्ती घेतील. तेविषयीं इस्कीलकी कथळा न करणें. बहुत काय लिहिणें.

मर्यादेयं
विराजते.

---

[९९] श्री. ७ अक्टोबर १७०७.

श्रीशिवनरपति हर्षनिदान । मोरे- श्वरसुत नीळकंठ प्रधान.	श्रीआईआदिपुरुष श्रीराजाशिवछत्रपति स्वामी कृपानिधि । तस्य परशुराम त्र्यंबक प्रतिनिधि.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३४ सर्वजित् संवत्सरे कार्तिक बहुल नवमी भृगुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शिवछत्रपति याणीं राजश्री सूर्याजी इंगळे मुद्राधारी जंजिरे विजयदुर्ग यासी आज्ञा केली ऐसी जे :—जंजिरे मजकुरीं जिभीमधें राजश्री नारो पंडित यांचा वाडा आहे. तेथें

त्याणीं आपले कारभारी वेदमुर्ति रघुनाथभट्ट ठेविले आहेत. ऐशियास, तुह्मी त्यास ह्मणता जे, तुह्मी आणखे ठाई राहणें, तें घर नामजाद लोकांस रहावयास देणें. तरी ऐसी गोष्ट ह्मणायास तुह्मांस प्रयोजन काय आहे? पंडित मशारानिल्हे हुजूर दर्शनास आले होते. यां स्वामीनीं मागती जंजिरे मजकुरास जावयाची आज्ञा केली आहे. हे येऊन आपल्या वाडियांत राहतील. यांच्या परामर्षास अंतर पडो न देणें. याकडे पहिलेपासून जंजिरे मजकुरपैकीं नोबती दोघेजण होते, तैसे पुढें यांकडे असों देणें. पंडित मशानिल्हे आपल्या वाडियाच्या जाग्यावरी श्रीचें देवालय लहानसें बांधणार आहेत. त्यास अलिगौडा देवालय बांधायाच्या कामास नेहमीं यांकडे देविला असे. तरी देवालय मुस्तेद होय तोंवरी अलिगौडा यांकडे देणें. त्याचा रोजमुरा जंजिरे मजकुरपैकीं पावतो तैसा पाववीत जाणें. जंजिरे मजकुरीं आगत्यागत्य कार्य प्रजोजनास गौडा पाहिजे. तरी पंडित मशानिल्हेस सांगोन पाठवीत जाणें. हे पाठवून देत जातील. व यांच्या दोन बागा आहेत. त्यास कांहीं कोणाचा उपसर्ग लागो न देणें. बागाखालील जमीन जे आहे त्यांत कोणी शेत पोत करील तरी यांचे आज्ञेखेरीज करूं न देणें. लेखनालंकार.

मर्यादेयं विराजते.

---

[९०] **श्री आई आदिपुरुष.** १७०८.

विनंति उपरी. स्वामीनीं लिहिलें कीं, कितेक विचार सुचत जाईल, तो लिहून पाठवीत जाणें. ह्मणून लिहिलें कीं, स्वामी वडील आहेत. दया करून जें लिहिलें तें मनांत दयाच येऊन लिहिलें. श्री स्वामीस सुचला विचार आह्मीं ल्याहावा हें आह्मांस अधिकारच आहे. स्वामीच्या यशें राजियाचें कल्याण. त्यामुळें आह्मीं अवघे सुखी. आज्ञेप्रमाणें कितेक विचार सुचला, तो त्रिवर्गापाशीं सांगितला आहे; ते निवेदन करितील. त्यामधें जो उपेगाचा असेल तो मनास आणावा. नसेल तो राहूं द्यावा. शामळासी सख्य कोणे

रीतीनीं करावें ह्मणून लिहिलें. तरी शामळ सलियास तूर्त येतो, हें तो दिसत नाहीं. कदाचित् आलाच तरी चौथाई देऊं करावी, आणि तह करावा, याहीमध्यें प्रसंग पाहून जें कर्तव्य तें करावें. कबिला सिंहगडीहून आणावा, कीं तूर्त न आणावा ह्मणून लिहिलें. तरी सिंहगड आपले हातीं असेल तरी चार दिवस कबिला आणूं नये. एक स्वारी मात्र आणावी. पुढें वेळ पडेल त्यासारिखें करावें. राजश्री नरहरिपंत देखील तेथेंच असों देऊन ते जागा आपल्या हातीं असो द्यावा. कुल अवघें वळण त्यातोंडें पडणार. गनीम विशाळगडास यंदा येतो, यास संदेह नाहीं. तेथवा दुसरा जागा सरदारी करावा ऐसा नाहीं. याजकरितां हा विचार स्वामींनीं मनांत आणून जें कर्तव्य तें करावें. आह्मांस सुचल्यासारिखें लिहिलें आहे. कृपा असो दीजे. हें विनंती, स्वामींनीं चिरंजीव आपाची बेडी तोडविली ह्मणून लिहिलें तरी सर्व संकट स्वामीसच आहे. चिरंजीव माधवरायाचीही बेडी तोडविली स्वामींनीं असेल. सकळही मान अपमान आमचा स्वामीस आहे. विशेष काय लिहिणें. हे विनंति.

---

[६१] **श्री आई आदिपुरुष.** १७०८.

विनंति उपरि. स्वामींनीं दया करून राजश्री नरसिंहपंत व त्रिमाजीपंत व धनाजी घाटगा याजसमागमें पत्र पाठविलें. कितेक स्वमुखें निरोप सांगोन पाठविला आहे. तें केवळ आपलीं वचनें हे सांगतील ते ह्मणून स्वामींनीं लिहिलें. पत्रार्थ व निरोप एकोन बहुत समाधान झालें. स्वामीच्या निरोपाचें प्रतिउत्तर त्रिंबगोजवळ सांग सांगितलें आहे, तें निवेदन करितां चित्तारूढ होईल. स्वामींनीं आज्ञा सांगोन पाठविली तदनुरूप श्रीवरील पुष्पें व रोटी ऐसी शपथ पाठविली आहे. स्वामींनीं एक तिळतुल्य चित्तांत आनसारिखी गोष्टी येऊं न द्यावी. आमचें चित्त निखालस स्वामीच्या पायाशीं आहे. परिणामींही कळों येईल. हें जीवित आहे तें केवळ स्वामीच्या अन्नाचें आहे. त्याहीमध्यें ह्या प्रसंगीं केवळ आमच्या जीवाचेंच आदान होतें. परंतु स्वामी प्रसंगीं होते.

स्वामीनीं दया करून प्राण वांचविला. हे गोष्टीचा कृतोपकार आहे. जोंवरी आयुष्य असेल तों विसार पडणार नाहीं. स्वामीनीं आमचा सर्वस्व अभिमान धरिला तरी जें आमचें वंशजपण असेल तदनुरूप उत्तीर्ण होऊन श्री करील तरी स्वामीची कीर्ति दिगंतरीं प्रसार व्हावी ऐमात्र अर्थ होईल. हें स्वामीस पूर्ण भरंवसा असावा. याउपरी स्वामीनीं कांहीं मनांत संदेह येऊं नेदून पत्रीं संदेहास्पद लिहित न जावें. स्वामीचें उत्तमपण आहे, तें स्वामी करितात. आह्मीं अधम कृति चित्तीं आणिली तीं इहलोकीं निंद्य. परलोकीं तो विश्वासघातकातें, नरो नरकं याति यावत् चंद्र दिवाकरौ, हा प्रसंग जो अधमपणा करील त्याचे पदरीं पडेल. स्वामीनीं विमलहस्तें श्री पूजिला आहे तावत्कालपावेतों अभिमान आहेच. ऐसा प्रसंग आहे. याविसीं विशद लेखन करावें तरी पत्रार्थ विशेष वाढतो. राजश्री रायमानजी राजे व आपण हे गोष्टी अंगीकार केला आहे, यामुळें बहुतांचें द्वेष पडतात पदरीं ह्मणून स्वामीनीं लिहिलें; तरी राजश्री रायमानजी राजे आणि स्वामी ऐसे आह्मी दोन्ही लक्षीत नाहीं. त्याहीमध्यें या प्रसंगीं त्याहीं दया केली. याहून उत्तम तें काय आहे? उभयतांनीं हे गोष्टी अंगिकारिली. स्वामीस ऐसें पुरतें चित्तांत येऊं द्यावें कीं, या गोष्टींनीं स्वामीची व त्यांची कीर्ति बहुत होते. आणि स्वामीनीं आपला पाठिंबा उभा केला, ऐसें चित्तांत येऊं द्यावें. वरकडीचे द्वेष पदरीं पडतात, ह्मणून लिहिलें तरी श्री समर्थ आहे. स्वामी आह्मीं आणि राजश्री रायमानजी राजे ऐसे एकचित्त असतां जरी आभाळ पडत असेल त्यास हात देऊं. तेथें वरकड प्रसंग ते काय आहेत? स्वामीस काय न कळेसा प्रसंग आहे तो विशद लेखन करूं! स्वामीनीं तो तैकल आमचेविशीं केलेंच आहे. त्यास श्रीस्वामीस उत्तर काय? यश पदरीं घालेत ऐसा पुरता भरंवसा असो दिला पाहिजे. आपण स्वामीस मल्हारराऊ सेना घेऊन चिपळुणास येणार. याजनिमित्य जातो. तुह्मी आहां तेथें आठ पंधरा दिवस असणें, बहुतसा राबिता होऊं न देणें, या दोनीच्या विचारें असिलें पाहिजे, ह्मणून स्वामीनीं

लिहिलें. तरी, स्वामींनी पूर्वी जे रीतीनें ठेविलें त्या रीतीनें दोन मास क्रमिले. याउपरी जे रीतीनें आज्ञा केली तदनुरूप रहाटी करून. परंतु स्वामींची दया जालियाउपरी किंचित् भाग राहिला तो राहूं देणें हें उचित नाहीं. वरकडाचे उपरोध स्वामींनीं किमपि चित्तांत येऊं न द्यावें. याहींमध्यें जे स्वामी आज्ञा करितील तद्नुरूप रहाटी केली जाईल. स्वामींनीं लिहिलें कीं, आठ पंधरा दिवस. त्यास हें पत्र स्वामीपाशीं पावे, तों आठ दिवस जाले. एका शब्दाचा तो नियत वारला. दुसरे शब्दास आठ दिवस अवकाश रहातो. यामधें स्वामीस श्री प्रेरील तें करावें; परंतु आतां उचित आहे कीं, आमचा श्रम परिहार सत्वर करावा. हें उचित आहे. स्वामींनीं लिहिलें कीं, भोजन करून खुशाल असणें. तरी, स्वामीची दया जाली तेधवां खुशालच आहों. भोजन श्रीचे आणि स्वामीचे पाय पाहूं तेधवा होईल. फराळ घेतों. खुशाल स्वामींचें पत्र पाहून आहों. वरकड साकल्य वर्तमान त्रिवर्ग सांगतां कळों येईल, कृपा असो दीजे. हें विनंति.

---

[६२] श्री. २८ फेब्रूवारि १७०८.

राजश्री खेमसावंत भोसले सरदेसाई पा। कुडाळ व महालानिहाय गोसावी यांसी :—

५ अखंडितलक्ष्मीअलंकृतराजमान्य प्रतिराजश्री राजा शिवछत्रपति. उपरि. सांप्रत राजश्री शाहूराजे यांचा फितवा निर्माण होऊन राज्यांत डोहणा जाहला. कितेक सेवकलोकीं अवक्रिया करून जाऊन, त्यास मिळोन, अनसारिली वर्तणूक आरंभिली आहे. या प्रसंगें तुह्मीं स्वामीशीं निष्ठा धरून, निर्व्याजत्वें, एकरूप निष्ठेनें वर्तणूक केली. व राजश्री विश्राम अनंत व जीवाजीराम यांस कितेक आपले निष्ठेचा अर्थे ऱ्हद्गत सांगोन पाठविलें कीं, आपण त्रिकर्णशुद्धीनें स्वामीशीं निष्ठेनें वर्तणूक करून, शाहूराजे यांकडे अनुसंधान लावणार नाहीं. सर्व प्रकारें स्वामीची सेवा करून प्रयोजनप्रसंगीं स्वामीचे आज्ञेप्रमाणें आपणाकडील हशमांचा जमाव स्वामीचे सेवेसी देऊन, आणि त्यांचा पराजय करून,

सर्वस्वें स्वामीची सेवा करून, स्वामीस संतोष पाववून, स्वामींनीं कृपाळू होऊन आपणाकडे पा। कुडाळ व बांदे व डिचोळी व सांखळी व मणेरी व पेंडणें, हे सहा महाल वतनदाखल मुकासा चालवावे, ह्मणोन विनंति सांगोन पाठविली. ते या उभयतांनीं हुजूर येऊन निवेदन केली. त्यावरून स्वामींनीं तुमचे प्रामाणिकतेचा व एकनिष्ठेचा अर्थ चित्तांत आणून राजश्री रामचंद्र नीळकंठ अमात्य हुकमतपन्हा यांस व राजश्री गिरजोजी यादव यांस आज्ञा केली. याचे भेटीस तुह्मीं माणगांवीचे मुक्कामीं येऊन भेटी घेतली आणि आपलें वृत्त यांस निवेदन केलें कीं, आपण राजश्री स्वामीसीं एकनिष्ठेनें वर्तत आहों, पुढेंही स्वामीची सेवा एकरूप निष्ठेनें करून शाहूराजे यांकडे अनुसंधान लावणार नाहीं, त्यांसीं विरुद्धाचरणें वर्तोन, ये गोष्टीस अंतर पडणार नाहीं. ह्मणून, एकान्तः-करणें, आपल्या आराध्य देवाची क्रिया करून वर्तावयाचा निर्वाह केला. तो अर्थ विशदकरून यांहीं स्वामीस श्रुत करून तुमचें चालवायाविशीं विनंति केली. त्यावरून मनास आणितां तुह्मीं ह्मणजे वंशज घराणदार, प्रामाणिक, एकवचनी आहां. सदरहू लिहिल्याप्रमाणें अकृत्रिमभावें स्वामीची सेवा करून स्वामीस संतोष पाववाल, क्रियेस अंतर करणार नाहीं, हा अर्थ दृढतर चित्तारूढ जाला. आणि स्वामी संतोषी होऊन तुमचें मनोभीष्ट सिद्धीस पाववावें हें अगत्य जाणून पा। कुडाळ व बांदे व डुचोळी व पेंडणें व सांखळी व मणेरी या महालीं देवाब्राह्मणांचें इनाम सर्वमान्य स्वामीचे सनदेनें आहे तें व वतनदारांचें इनाम खेरीज करून व वरकड गडाकिल्लियांचा व जंजिरियांचा तनहा व हशमांचा दुमाला सालाबाद तागायत सालगुदस्ता चालत आला असेल तो पुढेंही साल दर साल पाववीत जावा आणि सदरहू माहाल तुह्माकडे वतनादाखल चालवावे, ऐसी आज्ञा करून सनद निराळी सादर केली आहे, त्याप्रमाणें स्वामी तुमचे चालवितील. हालीं स्वामींनें तुह्मांकारणें हत्ती १, घोडा १, उरानडाव १, गुस्त १, येणेप्रमाणें पाठविलें आहे. घेणें. आणि लिहिलेप्रमाणें स्वामीसीं निष्ठेनें वर्तणूक करीत जाणें. स्वामी तुमचें चालवाया अंतर करणार नाहीं.

सुहुरसन समान गया व अल्फ, छ १७ माहे जिल्हेज. बहुत काय लिहिणें.

मर्यादेयं
विराजते.

---

[६३] श्रीरामोजयति. २९ मार्च १७०८.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शक ३४ सर्वधारी संवत्सरे चैत्रबहुल पंचमी भोमवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शाहूछत्रपति स्वामी याणीं समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री नारो पंडित यासी आज्ञा केली ऐसी जे:—तुह्मीं आपलें वृत्त विस्तारें रा॥ गीरजोजी पिसाळ यास लिहून पाठविलें होतें तें पत्र बजिन्नस त्यांणीं स्वामीचे सेवेसी पाठविली. यावरून लिहिला आशय विदित जाहला. त्याचा सारांश हाच कीं, आपणास बंधूचा आग्रह सिंधुदुर्गास जावें, व तेथून आमंत्रणही साक्षेपयुक्त आलें आहे. त्यास, आपण निश्चय स्वामीसमीप यावें. याकरितां लोकांची स्वारी पाठऊन घेऊन जाणें ह्मणून लिहिलें. त्यावरून तुमचे निष्ठेचा अर्थ कळोन स्वामी संतोषी जाहले. तुह्मीं पुरातन लोक, स्वामीचे ठायीं आर्त धरितां, तुमचा संग्रह करून चालवावें, यापेक्षां स्वामीस आवश्यक तें काय आहे? प्रस्तुत, हें पत्र तुह्मांस लिहिलें असे. तरी गिरजोजी पिसाळ याजकडील लोक तुह्मांस बलावण्यास पाठविले आहेत. तुह्मी स्वार होऊन अविलंबें दर्शनास येणें. तुमचे बहुमान गौरवास अंतर होणार नाहीं. प्रयोजन प्रसंगाचा अर्थ तुह्मीं कितीक लिहिला होता. तरी तुह्मीं कार्यभाग करावे, आणि स्वामीस संतोषी करावें, हें उचित आहे. तदनुरूप दर्शनास येऊन स्वामीस संतोषी करून आपला मनोदय सिद्धीस पाववून घेणें. जाणिजे. बहुत लिहिणें तर तुह्मीं सुज्ञ असा.

मर्यादेयं राजते.

---

[६४] श्री. २३ मे १७०८.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शक ३५ सर्वधारी संवत्सरे, ज्येष्ठशुद्ध चतुर्दशी मंदवासर क्षत्रियकुलावतंस श्री राजा शिवछत्रपति यांणीं समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री परशराम पंडित प्रतिनिधि यास आज्ञा केली ऐसी जेः—तुमचेविसीं कितिएक राजश्री रामचंद्र पंडित अमात्य याणीं विनंती केली. ऐसियास, तुह्मीं स्वामींचे, हितकृतकर्मे, विश्वासू सेवक आहां. तुमचें सर्व प्रकारें चालवणें स्वामीस अगत्य आहे. याकरितां तुह्मीं कांहीं संदेह न धरितां व कांहीं अनमान न करितां पत्रदर्शनीं स्वार होऊन संतुबा यासह वर्तमान निघून स्वामीसंनिध दर्शनास येणें. स्वामी तुमचें पूर्ववत् चालवितील. येविशीं आनसारिखें कांहीं न मानितां सत्वर येणें. येविशीं पंडित मजकूरनिल्हेनीं लिहिलें आहे, त्यावरून कळों येईल. बहुत लिहिणें. सुज्ञ असा.

मर्यादेयं
विराजते.

---

[६५] श्री. २३ मे १७०८.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३५ सर्वधारी संवत्सरे ज्येष्ठशुद्ध चतुर्दशी मंदवासर क्षत्रियकुलातंस श्री राजा शिवछत्रपति यांणीं समस्त सेनाधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री जयसिंग जाधवराऊ सेनापति जप्तनमुलुख यास आज्ञा केली ऐसी जेः—तुमचेविशीं कित्येक राजश्री रामचंद्र पंडित अमात्य यांणीं विनंति केली त्यावरून विदित जाहालें. ऐसियास, तुह्मी स्वामींचे एकनिष्ठ, विश्वासू, कार्यकर्ते, सेवक आहां. तुमची ही निष्ठा स्वामीच्या पायाशीं आहे. याकरितां सर्व प्रकारें तुमचें चालवणें स्वामीस अगत्य आहे. तरी तुह्मी सर्व प्रकारें आपलें समाधान असो देऊन कांहीं अनमान न करितां व कांहीं संदेह न धरितां तेथून निघोन संतुबा यासहवर्तमान स्वामींसंनिध दर्शनास येणें. स्वामी

तुमचें पूर्ववत् विशेषात्कारें चालवितील. येविशीं सविस्तर पंडित मशार-निल्हेनीं लिहिलें आहे. त्यावरून कळों येईल. बहुत लिहिणें. सुज्ञ असा.

मर्यादेयं
विराजते.

---

[१६] श्री. २३ मे १७०८.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शक ३५ सर्वधारी संवत्सरे ज्येष्ठशुद्ध चतुर्दशी मंदवासर क्षत्रियकुलावतंस श्री राजा शिवछत्रपति यांणीं राज-मान्य राजश्री खंडप्रभू चिटनवीस यांस आज्ञा केली ऐसी जे:—तुमचेविशीं कित्येक राजश्री रामचंद्र पंडित अमात्य यांणीं विनंति केली त्यावरून कळों आलें. ऐसियास, तुह्मी स्वामीचे कदीम विश्वासू सेवक आहां. तुमचे हातें सेवा घेऊन तुमचें चालवणें स्वामीस अगत्य आहे. याकरितां कांहीं संदेह न धरितां, व अनमान न करितां, विलंब न लावितां, तेथून स्वार होऊन स्वामीसंनिध दर्शनास येणें. स्वामी तुमचें पूर्ववत् चाल-वितील. येविशीं आनसारिखें न मानितां सिताब स्वार होऊन येणें. येविशीं सविस्तर पंडित मशारनिल्हेनीं लिहिलें आहे त्यावरून कळों येईल. जाणिजे. बहुत काय लिहिणें.

मर्यादेयं
विराजते.

---

[१७] श्री. १४ अक्टोबर १७१०.

छ मा। अनाम. देशमुख व देशकुलकर्णी का। ठाण सुभा प्रा। पनाळे यांसी —

रामचंद्र नीळकंठ अमात्य हुकमतपन्हा सु॥ इहिदे अशर मया अलफ. वेदमूर्ती राजश्री बाळंभट बिन विश्वनाथभट, जोतिषी उपनांव वडणगेकर, सूत्र आश्वलायन, गोत्र गार्ग्य, हालीं वास्तव्य कसबे कोल्हापूर हे बहुत थोर, योग्य, शिष्ट, जोतिष विद्येंत निपुण, सिद्धांतावगत आहेत. जोशी

यासी: कुडाळकर सांवत याणें राजश्री छत्रपती स्वामीच्यापासीं दुर्बुद्धि धरून दुष्टाचरण आरंभिलें होतें. त्यास नतिज्या पावायानिमित्य आंगेज केला. ते प्रसंगीं याणीं मुहूर्त पाहोन दिला. त्या मुहूर्ते वाडीवरी चालोन घेऊन वाडी घेतली. फत्ते झाली. यास्तव यावरी संतोषी होऊन यास नूतन इनाम कर्यात गार पो विसी पांढाच्या बिघियानें अव्वल तुमसीम तिन्ही प्रतीची जमीन चावर एक बितपशील:—

मौजे वडणग अर्धा चावर ०॥०

मौजे भुये तीस बिघे ०।०

मौजे निगवे तीस बिघे ०।०

येणेंप्रमाणें एक चावर सदर्हूप्रमाणें जमीन दिली आहे. यापो एक तक्षिमा किर्दी व तीन तक्षिमा पडी, कुलबाब, कुलकानू, हालीपट्टी, व पेस्तरपट्टी सहित खेरीज हकदार इनामदार करून, दिल्ही असे. तरी सदर्हू जागा मोजून चतुःसीमा करून देऊन यास व याचे पुत्रपौत्रीं वंशपरंपरेस उत्तरोत्तर चालवीत जाणें. नव्या पत्राचा आक्षेप न करणें. या पत्राची तालीक लिहून असलपत्र परतून भोगवटियास वो जवळ देणें. सदर्हू जागा इनाम देविली आहे. ये विषयीं अलाहिदा देशाधिकारी यांच्या नावें सादर आहे. त्याप्रमाणें ते दुमाले करून देऊन चालवितील. जाणिजे. छ २ रमजान. निदेश समक्ष.

बार.

---

[६८] श्रीरमाकांत. २७ फेब्रुवारी १७११.

राजश्री रामचंद्र पंडित अमात्य यांसी:—

प्रति श्रीमंत मातुश्री ताराबाई. उपरि. तुह्मी पत्रें पुरवणिया ३ तीन पाठविल्या त्या प्रविष्ट झाल्या. त्यामध्यें लिहिलें कीं, सातारियास राजश्री केसो त्रिमल आहेत, त्यांकडे राजकारण करून खल करून पहावा. याकरितां राजश्री हिंदुराव व राजश्री गिरजाजी यादव यांचे बिद्यमानें पत्र पाठविलें आहे, कीं तुह्मी मातुश्री साहेबांचे पायांसी निष्ठा

धरून ज्या स्थळीं आहां तें स्थळ हस्तवश करून देणें, आणि आपला मजुरा करून घेणें. येविषयीं कार्य संपादिलियावर तुमचे नातु, निळोपंताचे स्त्रीचे पदरीं घातले आहेत, त्यास पेशवाई द्यावी. तुह्मी सर्वस्वें कारभार करावा. येविषयीं आह्मी धण्याजवळी विनंती करून अभीष्ट सिद्धीस पावितों ह्मणून विशदर्थें पत्र पाठविलें आहे. त्यांचे पुत्र राजश्री बापूराव केशव याकरवीं लेहविलें आहे. जरी साहेबाचे पुण्येंकरून तिहीं हात दिल्हा तरी मातबर स्थळ हस्तगत होतें, फिरोन मनसबाच उभा राहतो, याकरितां पत्रें पाठविलीं आहेत ह्मणून लिहिलें तें अक्षरशा विदित जालें. तुह्मी जो खल अगर श्रम कराल तो आमच्या स्वहिताचाच कराल, यदर्थी सर्वविषयीं भरोसा तुमचा मानिला आहे. याकरितां तुह्मीं जीं पत्रें पाठविलीं तीं उत्तम पाठविलीं. त्याणीं निष्ठा धरून कार्यसिद्धि केली. यावरी त्याचें अभीष्ट तुमचें वचनाप्रमाणें सिद्धीस पाविलें जाईल. राजश्री त्र्यंबक शिवदेऊ मुतालीक दिमत सचीव, याचें अनुसंधान राजश्री केसो महादेव व रामचंद्र महादेव यांणीं सांगोन पाठविलें, कीं त्र्यंबकपंतीं स्वामीच्या पायासी निष्ठा धरिली आहे, कीं सांप्रत सैन्यांत आहेत, येथून आपल्या जिल्हेस जावें आणि स्वामीचे पदरीं पडावें; गड किल्ले आदिकरून हस्तवश करून घ्यावे. ये गोष्टीस गड किल्ले तूर्त नातवान पडिले आहेत. त्यांचे बेगमीस दहा हजार रुपये द्यावे, आणि आपणास सरकारकुनीचा हुद्दा दबीरी अगर वाकेनिसी द्यावी ह्मणून व येविषयीं खासा त्याचें पत्र संकलितार्थें आलें त्यावरून राजश्री हिंदुराव व राजश्री गिरजाजी यादव ऐसे बसोन ये गोष्टीचा विचार करून त्र्यंबक शिवदेऊ यासी समाधानाचें पत्र पाठविलें. द्रव्य द्यावें, त्यास चार सहस्र रुपयांची हुंडी महादाजी कृष्ण याजकडे करून पाठविली. राहिलें द्रव्य कार्य सिद्ध होतांच द्यावें ऐसा निर्वा शफतपूर्वक करून दिला. सरकारकुनीचा हुद्दा साहेबाचे आज्ञेवेगळा मात्र कारितां नये. याकरितां उभयतांनीं आग्रह केला कीं, हातीचें राजकारण जाऊं देऊं नये. याकरितां तुह्मी वाकेनिसी देतों ऐसें पत्र शफतपूर्वक तुळसी ऐसे पाठवणें. हुद्याविषयीं मातुश्री साहेबास आह्मी उभयता अर्जे

पंताजीपंत ... सोमणयांचे बंधू

पारसनीस जोशी

पारसनीस जोशी

करवून देऊं ह्मणून. त्यावरून याप्रमाणें पत्रें पाठविलीं. जरी साहेबांचे पुण्येंकरून हे गोष्टी संपादिली ह्मणजे थोर कार्य जालें. शाहूराजेयाची कमरच मोडोन हतप्रभ होऊन जाताती. ह्मणून विशदर्थे लिहिलें, कीं हुद्याविषयीं व द्रव्याविषयीं वचन गुंतलें आहे, खरें करावें लागेल ह्मणून. तरी, जी गोष्टी तुह्मीं योजिली, ते उत्तम आहे. आमचें राज्य सुरक्षित जालें. ज्यांणीं या समयांत सेवा केली त्याचें गोमटें न करावें तरी कोणाचें करावें? त्यामध्यें तुह्मा-सारिखे लोक मध्यस्त असतां तुमचें वचन गुंतलें तेंच आमचें वचन. ये गोष्टीस अन्यथा होतें ऐसें नाहीं. त्र्यंबक शिवदेऊ याणें लिहिल्या-प्रमाणें कार्यसिद्धि अविलंबें केली, गडकिल्ले हस्तवश करून दिले, ह्मणजे तुमच्या वचनाप्रमाणें बाकेनिसीचा हुद्दा सांगितला जाईल, व द्रव्याची अनुकूलता केली जाईल. परंतु करितां कार्य त्वरेनें करावें. जों लष्कर प्रसिद्धगडा खालें आहे तों कार्य जाल्यानें पायेबंद बसोन बाजू सावरते. याकारणें त्वरा होय ऐसी गोष्ट करणें. रायाजी मल्हार याचे मनांत पश्चात्ताप येऊन सांप्रत त्याचें अनुसंधान आलें कीं, आपणा-वरी मातुश्री साहेब दया करितील, पूर्ववत् आपल्या हातें सेवा घेतील, तरी आपण सुभानजी आचेले यासहवर्तमान निघोन त्या प्रांतें जातों, आपल्याकडे दिवाणची हमी आहे ते माफ करावी, व वरातदाराचे गैरादे आहेत त्याचें त्वष्ट न लावावें, पुढें मनःपूर्वक दया करून सेवा घ्यावी, ये गोष्टीचा निर्वाह जालिया लिहिल्याप्रमाणें कार्य करितों ह्मणून. त्यावरून त्याच्या मुद्याप्रमाणें मान्य करून समाधानपत्रें त्याकडे पाठविलीं आहेत. परंतु जालें वर्तमान साहेबास विदित व्हावें ह्मणून लिहिलें आहे, ह्मणून लिहिलें तें विदित जालें. राजश्री रायाजी मल्हार यास समाधान पत्रें पाठविलीं, उत्तम केलें. ते आचेले देखील निघान जाऊन निष्ठेनें सेवा करूं लागले, तरी सर्व प्रकारें त्याचें चालविलें जाईल. परंतु आतां येवढ्या आठ चौ दिवसांत गेल्यानें कार्याचें. पुढें छावणीस लष्कर जाईल ते समयीं जातों ऐसें ह्मटलियानें लटिकें अनुसंधान ऐसें दिसोन येतें. याकरितां ज्यांणीं राजकारणें लाविलीं आहेत त्यांणीं, जोंवरी

तुह्मीं शाहूराजा रांगणेयाखाले गोऊन पाडिला आहे या संधीमध्यें ज्यांणीं निष्ठा धरिली आहे, त्यांणीं कार्यें करून द्यावीं, ह्मणजे तुमच्या प्रयोजनाचीं आहेत. पुढें तुह्मीं शाहूस पराभवातें पाविलियावरी कोण येक शरण येईना. याकरितां तुह्मीं ये गोष्टीची चौकशी करून, ज्यास जें सांगून पाठविणें तें पाठवून त्वरा होय तें करणें. परकी माणूस राजकारणास येईल ते गडावरी घेत नच जाणें. कोणाचे हुनर कैसे असतात हें कळत नाहीं. याकरितां वरचेवरी गडाखालेंच जाबसाल देऊन वजा करीत जाणें. वरकड तुह्मीं आपल्याविषयींचा अर्थ कितेक राजश्री बाळाजी माहादेव यासी लिहिला तो सविस्तर विदित जाला. घोड्याकरितां मातुश्रीची दया निदर्शनास आली, ह्मणून लिहिलें, तरी आमची दया अगर लोभ तुमचे ठायीं आहे तो घोड्यावरून अगर वस्त्रपात्रावरून तुमचे निदर्शनास यावा ऐसी गोष्ट नाहीं. तुह्मापेक्षां घोडी अगर आणखी प्रसंग विशेष आहे ऐसें नाहीं. ऐसें असतां तुह्मी घडी घडी मनांत संदेह करावा, हे गोष्टी उचित नाहीं. येविषयीं साहेबीं उदंड सांगितलें अगर लिहिलें तें तुह्मांस प्रमाण वाटतें ऐसें नाहीं. जे गोष्टी निदर्शनास येईल ते करणें. याउपरि तऱ्ही निःसंदेह होऊन राज्याभिवृद्धीस प्रवर्तले आहा, त्याप्रमाणें प्रवर्तोन संतोष पावणें. आह्मांस तुह्मापेक्षां दुसरें वश्यक आहे ऐसें नाहीं. सर्व राज्यभार तुह्मांवरी टाकिला आहे. श्रीदयेनें तुह्मांस यश येतच आहे. जाणिजे. छ १९ मोहरम. बहुत लिहिणें तरी तुह्मीं सुज्ञ असा.

लेखन

शुध.

---

[१९] श्री. ६ जून १७१३.

राजश्री सोनजी घोरपडे नामजाद व कारकून कोट कोल्हापूर गोसावीं यासीः—

॥ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री रामचंद्र नीळकंठ हुकमतपन्हा आशीर्वाद व अनुक्रमें नमस्कार. सु॥ अर्बा अशर मया

अलफ. राजश्री यादवराव शिवदेऊ नाडगौडा हवेली कोल्हापूर यांणीं विनंति केली कीं, हम गांवगन्ना मोईनप्रमाणें चालत आहे. परंतु गांवगन्ना इनाम व विश्वा जकातीचा धामधुमेकरितां चालत नाहीं. तरी चालविला पाहिजे ह्मणोन विनंति केली. त्यावरून मनास आणून पेशजी चालत होतें त्याप्रमाणें करार करून दिलें असे. वितपशील:—

जकातीस विश्वा दर बैली रुका एक ८१.	गांवगन्ना दर चावरी बिघा एक ८१.

एकूण दर बैली रुका एक व चावरी बिघा एकप्रमाणें मोईन करून दिल्ही असे. सदरहूप्रमाणें कळवीत जाणें. हक्क पेशजी पावत आहे त्याप्रमाणें पावणें. सालदरसाल ताजा सनदेचा उजूर न करणें. तालिक लिहून घेऊन अस्सल पत्र भोगवटियास परतून देणें. जाणिजे. छ २४ जमादिलावल. निदेश समक्ष.

बार सुरु सुत बार.

---

[७०] श्रीराम. ८ आक्टोबर १७१२.

राजश्री सोनजी घोरपडे हवालदार व कारकून, कोट कोल्हापूर, गोसावी यांसी:—

छ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो रामचंद्र नीळकंठ हुकमतपन्हा आशीर्वाद व नमस्कार. सुहुरसन अरबा अशर मया व अलफ. शंकरगिरी गोसावी जटाधारी परंपरा दुर्गानाथ हे बहुत भले, परमेश्वरपरायण. यांणें विनंति केली जे, मौजे बहिरेश्वर कसबा हवेली परगणे मजकूर येथें जलशयनस्थल रमणीय आहे, तेथें मठ बांधोन राहावें, पुष्पवाटिका लावून जपतप करून असावें, असा हेत आहे, ऐशास, अतीत अभ्यागत येतील त्यांची व्यवस्था लागेल ये गोष्टीच्या सिद्धीस इनाम दिल्यानें राजश्री छत्रपति स्वामीस व स्वामीच्या राज्यास अभिवृद्धि चिंतून असो, ह्मणून. त्यावरून मनास आणितां गोसावी गुरुभक्त निस्पृहवृत्तीनें असतात. यांची मठस्थापना करून

दिल्यानें श्रेयस्कर. अतीत अभ्यागतास अन्न पावेल. तेणेंकरून राज्याचे अभिवृद्धीस कारण आहे. यांस मौजे मजकुरीं अर्धा चावर जमीन इनाम देणें. सन इसनेमध्यें आम्हीं व राजश्री हिंदूराव पन्हाळयास स्वारीस आलों ते प्रसंगीं मौजे मजकुरास मुकाम जाहला. तेव्हां श्रींचें दर्शन घेतलें. बहुत जागृत स्थल आहे. पूर्वीं राजश्री थोरले कैलासवासी स्वामींचे वेळेस श्रीचे पूजेस नैवेद्य नंदादीप यांची बेगमी होऊन ऊर्जा चालत होती, अलीकडे चालत नाहीं. ऐशास, हे सनद दिली आहे. जाणिजे. चंद्र २९ रमजान. निदेश समक्ष.

---

[७१] श्री. १७१४.

पूर्वीं मोंगलाई पादशाही प्रबळ असतां अवघे यवनकर्में या भूमंडळीं होत होतीं. देव, ब्राह्मण, गाई यांचे उच्छेद जाले. तेव्हां श्री देवास संकट पडोन शहाण्णव कुळचे मराठे होते त्यांत जातिवंत मराठे पाहून भोसले, जाधव, निंबाळकर, मोहिते, घाटगे, घोरपडे, पाळकर, गुजर, अहीरराव, शिरके, माहाडिक, कांकडे, माडवळकर, कांटे, ऐसे एकवीस कुळ आईचे व एकवीस कुळ बापाचे निवड करून हिंदुपत सूर्यवंशी व सोमवंशी नेमून राजपदवी दिली. त्यामध्यें ईश्वराचे भजनीं तत्पर, गाईब्राह्मण यांचे प्रतिपालक, अभिमानी, निरंतर भावरत, साधू, सज्जन, भले, रयत प्रतिपालक, दुष्टांचा निःपात करणार, ऐसे योजून, ईश्वरें राजश्री मालोजी राजे भोसले यासी स्वप्नीं अभय देऊन, प्रत्यक्ष गोसावियाचे रूपें येऊन, दर्शन शिखरीं देऊन, भजनास लाविलें. त्यांची स्त्री मातुःश्री उमाव्वा, साठे यांची कन्या होती. उभयतांचें निष्ठाकर्म पाहोन सत्तावीस पिढ्यांचे भोसले यांचे वंशीं राज्यपद दिलें. मालोजी राजे यांनीं शिखरीं तळें बांधिलें, जीवन केलें, जनयात्रा येऊं लागली, इमारती केल्या, व राजश्री लिंगोपंत ब्राह्मण होते, त्यांस देव वरद होऊन त्यांणीं बारव पाडिली. ईश्वर संतोषी होऊन मालोजी राजे यांचे वंशीं पुत्रसंतान दिलें. राजश्री शहाजी राजे भोसले व राजश्री स्वरूपजी राजे भोसले उभयता बंधूः—

राजश्री शहाजी राजे यांच्या स्त्रिया. जिजावा जाधवाची कन्या यांचे पुत्र.

१ रा० शिवाजी राजे.
१ संभाजी राजे.
२

शिवाजी राजे यांच्या स्त्रिया.
१ सावित्रीबाई.
१ सईबाई.
२

यांचे पुत्र.
१ संभाजी राजे यांची आई सावित्रीबाई.
१ राजाराम यांची आई सईबाई.
२

राजाराम यांच्या स्त्रिया.
१ ताराबाईसाहेब.
१ राजसबाई घाटगे.
२

यांचे पुत्र.
१ शिवाजी राजे.
१ संभाजी राजे.
२

शिवाजी राजे यांच्या स्त्रिया.
१ पार्वतीबाई.
१ भवानीबाई.
१ दुर्गाबाई.
३

यांचे पुत्र.

तुकाऊ इंगळे अमदापूरकर यांचे पुत्र एकोजी राजे चंदावरास गेले.

संभाजी राजे यांच्या स्त्रिया.

यांचे पुत्र उमाजी राजे नकल जाले.
१

संभाजी राजे यांच्या स्त्रिया.

यांचे पुत्र शाहू राजे यांच्या स्त्रिया.

स्वरूपजी राजे भोसले याची स्त्री गंगाव्वा यांचे पुत्र.

महादजी राजे यांच्या स्त्रिया रखमाऊ यांचे पुत्र.
१ विठोजी राजे यांची स्त्री राजसबाई.
१ खेळोजी राजे यांची स्त्री गोदूबाई.
१ सेखोजी राजे यांची स्त्री सखूबाई.
३

त्रिंबकजी राजे यांच्या स्त्रिया.

संभाजी राजे यांच्या स्त्रिया.			
१ उमाबाई.			
१ आनंदीबाई.			
१ जिजाबाई.			
१ ————			
१ ————			
५			

---

[७२] श्री. १० जुलै १७१४.

श्रीरामचरण
नीलकंठ सोनदेव
शरण.

आज्ञापत्र समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री रामचंद्र पंडित हुकमतपन्हा ताहा कमाविसदार मौजे नांदवडे ता। खारा-पाटण सुहूर सन खमस अशर मया अलफ. वेदमुर्ती राजश्री अनंत-भट्ट बिन महादेवभट्ट उपनाम मुंडले, गोत्र नैधृत्य, सूत्र आश्वलायन, हे भले सत्पात्र आहेत. यांच्या कुटुंबाचा योगक्षेम चालिला पाहिजे. ह्मणून यांसी पूर्वी मौजे मजकूरपैकीं वृत्ती दाभोळी करी ६० साठची दिल्ही आहे. त्या खेरीज हालीं राजश्री छत्रपति स्वामींनीं राजश्री अनाजींपंताच्या धारियानें दाभोळी करी २५ पंचवीसाची पड जमीन देविली आहे. त्यावरून हें आज्ञापत्र सादर केलें आहे. तरी सदर्हू पंचवीस करीची जमीन राजश्री अनाजीपंताच्या धारियानें पड जमीन अवल दूम, सीम, तिन्ही प्रतींची मोजून देविली आहे. येविषयीं किल्ल्याच्या कारकुनास अलाहिदा पत्र आहे. त्याप्रमाणें ते पडी जमीन खेरीज हकदार करून मोजून देवितील. त्याप्रमाणें वतनदारांचें ठिकाण खेरीजकरून देऊन यास व यांचे पुत्र-पौत्रीं वंशपरंपरेस उत्तरोत्तर चालवणें. नवीन पत्राचा आक्षेप न करणें.

या पत्राची तालीक लेहून घेऊन असलपत्र परतून मोगवटियास वेदमुर्तीजवळी देणें. छ ४ जमादिलाखर. निदेश समक्ष.

लेखनसीमा.

समुल्लसति.

बार सुरुसुद बार.

---

[७३] श्री. १ सप्टेंबर १७१९.

श्रीरामचंद्र
चरण । नीळकंठ
सोनदेव शरण.

राजश्री यादोजी पडवळ नामजाद व कारकून, किले गगनगड गोसावी यासी :—

छ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री रामचंद्र नीलकंठ आशिर्वाद व नमस्कार सुा सित अशरन मया अलफ. माा कान्होजीराऊ व बापूजीराऊ राणे हे अजिरे प्रांतीं होते. त्यांस पूर्वीं पत्रें तुह्मीं पाठविलीं होतीं व हुजरूनही पाठविलीं होतीं. त्यास, यांणीं किल्लयाचे गांवीं व वरकड गांवीं उपद्रव केला होता. याकरितां संकोच धरीत होते. व चांदजीनें यास बुद्धि देऊन नेले. त्यावरी वतनी प्रसंग आहे तो अवघियांनीं विभागें घ्यावा. तोही होऊन न ये याकरितां बाहेर राहिले. त्यास सांप्रत देहावर येऊन निष्ठेनें वर्तावें ह्मणून चित्तीं धरून विनंतीपत्र पाठविलें. त्यावरी सर्व अन्याय क्षमा करून अभयपत्र पाठविलें. त्यावरून भूधरगडचे मुकामीं भेटीस आले. भेटी जाली. राजदर्शन केलें. त्यास रत्नागिरीहून लोकांविशीं लिहिलें. त्यावरून कान्होजीराव खासा व उभयतांचे लोक पंचवीस रवाना केले, ते स्वार होऊन गेले. त्यास, यांचा सरंजाम याप्रों लोक असे. याप्रमाणें चालवणें :—

मौजे सागुळवाडी मोकासा जमातास उभयतांच्या दिली. राजपत्र सादर आहे. तुह्मीं याकडे चालवणें. तेथें उपद्रव किरकोळ यास एकंदर लागो न देणें. १

जमीन इनाम पेशजी देविली होती ते चालत नाहीं ह्मणोन विनंति केली. त्यास, तूर्त रत्नागिरीस रवाना केलें. ह्मणोन मेहेरबान होऊन इनाम जमीन भात पडिपैकी देविली, बिघे:—

८९ नांदवडे.
८९ नांदणे.
८२ सेरपे.

———

८१२

हें तुह्मीं नेमून देऊन बिलाकुसूर चालवणें.

खारापाटण तर्फेचे गोविंद टिपसोडी व घाट बावडा येथें चोरघे आहे. त्यास चांदजीच खातो. हे ते चुलत भाऊ. तक्षिम देत नाहीं. याकरितां यांणीं विनंति केली कीं, निमे, त्याचें निमे आपलें उभयतांचें वतन आहे तें चालवावें. त्यावरून आज्ञापत्र सादर केलें आहे. तरी याचे विभाग असतील त्याप्रमाणें तुह्मीं गावगन्ना व जकात्यास सांगोन देवणें. चांदजीराव इस्किल करील तर त्यासही माकुल करून सांगणें. हर्शामर्श याचा त्याचा वाढो न देणें. १

याप्रमाणें बिलाकुसूर चालवणें. तूर्त कबिले पाउसाचे आणितां नयेत. याकरितां राहिले. पुढें कबिले घेऊन येतील. आपल्या वतनावरी राहतील. तुह्मीं सर्वाविशीं यांचें चालवीत जाणें. छ २४ रमजान. बहुत काय लिहिणें.

लेखनसीमा
समुल्लसति.

सुर सुद.

[७४] श्री. १३ सप्टे[illegible] १७१९.

राजश्री यादोजी पडवळ नामजाद व कारकून, किल्ले गगनग[illegible] गोसावी यासी:—

छ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित रामचंद्र नीळकंठ आशिर्वाद व नमस्कार. सुा सीत अशर मया व अलफ. आर्जोजी कुसुरकर परागंदा होऊन आजरे विलातीस गेला होता. त्यास अभय देऊन आणिला आणि गांवावर पाठविला आहे. तुह्मीं याचें चालवून याच्या वतनाची सेवा गांवावरी घेऊन, गांवाची किर्दी महामुरी होऊन, ऐवज किल्यास पावेतों करणें. याणें विनंति केली कीं, आपण वतनदार आहे, पूर्वीपासून आपला विस्वा व गांवीं जमीन चालत होती ते चालवावया आज्ञा करावी. त्यावरून आज्ञापत्र सादर केलें आहे. बीा

विस्वा जकाती मोंगल शहाआलम कोंकणांत उतरला तोपावेतों चालला, त्या अलीकडे चालत नाहीं, तरी स्वामींनीं चालवावा, ह्मणोन. त्यावरून पत्र सादर केलें. तरी पेशजी चालत होतें त्याप्रमाणें चालवणें. १.	जमीन मौजे कुसुर १ पावाची भाटी. १ बसकेची भाटी. १ दखल ठिकाण. — ३ ——जमीन बिघे ९ हे पेशजी चालली असेल त्याप्रमाणें चालवणें. १.

याप्रमाणें याचे मनास आणून चालवणें. आर्जोजी खरा माणूस आहे. यापासून अंतर पडलें असेल, तें क्षमा करून अभयपत्र सादर करून आणून पाठविला आहे. तुह्मीं याचे चालवावया अंतर न करणें. गांवची कीर्दी माहामुरी याचे हातून बरी करवणें. याचे चालवावया अंतर न करणें. छ २४ रमजान. बहुत काय लिहिणें.

सुरुसुद.

[७९] श्री. २१ मार्च १७१६.

श्रीमंत महाराज राजश्री पंत स्वामीचे सेवेसीः—

विनंति सेवक गोविंद रंगनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. स्वामीचे कृपावलोकनेकरून चैत्र शुद्ध नवमी शुक्रवारपर्यंत सेवकांचें वर्तमान मु॥ कल्याणीं यथास्थित असे. विशेष. महाराजांचे दर्शनास वेदमूर्ती राजश्री कान्हो पाध्ये औरंगाबादेहून आले. त्याबरोबरीं आह्मीं आपल्या वर्तीनें प्रसंगाचें वर्तमान स्वामीचे सेवेसी लिहोन पाठविलें होतें, त्यावरून विदित जाहलें असेल. व स्वमुखें उपाध्येबावांनीं निवेदन केलें. त्याप्रमाणें अभ्यंतरगत अवगत जाहलें असेल. परंतु त्याप्रमाणें पारिपत्य होऊन आलें नाहीं. आह्मीं अवघ्र एक मासपर्यंत मार्ग लक्षिला. त्याउपर आह्मीं निजामउन्मुल्ख व तुरुकताजखान यांची आज्ञा घेऊन स्वार होऊन गेलों. तेव्हां तेथल्या कर्जदारांनीं अडविलें. त्यांची निशा करावयास अवघ्र पंधरा दिवस लागले. शेवट रुपयास जमान गणेश विश्वनाथ आमचे जावाई यांस ठेऊन स्वामीकडे यावयास तयार जाहलों. तों संगमनेरीहून खान अजम महमद उमरखान सुभेदार प्रांत संगमनेर व नाशिक व कल्याणभिवडी यांचें पत्र तुरुकताजखान यांसी व आह्मांस आलें कीं, गोविंद पंडित वकील यांसि पाठविणें, वतनाचा अमल देऊन. त्याजवरून आह्मीं छ १९ मोहरमीं स्वार होऊन संगमनेरास आलों, तों उमरखान बागलाणांत मौजे अभोणें नजीक करेलीमोरेली येथें जाऊन वेढा घालून बैसले होते. तेथें आह्मीं जाऊन त्यांची भेट घेतली. स्वामीचे तर्फेनें त्यास पत्र व अष्ट-गोळी सल्ला दिधला. बहुत समाधान पावला. त्यांजवर अंमलाचे जफ्त-चिठी मागितली. ते ह्मणों लागले कीं, आह्मांस सेरणी काय देतां? तेव्हां आह्मीं बहुत प्रकारें रदबदली केली. परंतु हे मोंगली लोक, त्यांहीं-मधें पठाणतरीन, आपला हेका न टाकित! दुसरी गोष्ट. पूर्वील कारभारी, जे नुटअल्लीखानापाशीं होते, ते हल्लीं याजपाशीं आहेत. त्यांणीं पूर्वील कबुलायतीची हकिगत त्यांस जाहीर केली. त्याप्रमाणें मागों लागला. तेव्हां आह्मीं बोलिलों कीं, दरबारीं औरंगाबादेस खर्च आह्मांस बहुत

लागला. याकरितां आह्मांस पांच हजार रुपये देवत नाहीं. तेव्हां निदान प्रसंग जाणोन आह्मांशीं शामजी महादेव व रामाजी गोविंद दिवाण यांसी खानानें रदबदलीस घालून पांच हजार रुपये करार केले आहे. याखेरीज त्याचे नायब कल्याणींचे अजम कालेखान व पातशाही दिवाण शरीफ अलीखान व चौधरी व कारभारी व किरकोळी लोक ऐसे मिळोन दोन हजार रुपये पाहिजेत. वग हजर करावयास कापड हजारा रुप-यांचें पाहिजे. एकूण सहा हजार रुपये खर्च करावे, तेव्हां तो सोनवळाच्या अदकाराचा अंमल दरोबस्त हातास येतो आणि मुरळीत धंदा चालतो. त्यास ऐवज तो मिळत नाहीं अगर सावकारही मिळत नाहीं. या प्रांतीं काळ बहुत विषम पडला आहे. याकरितां रुपयांस कोण्ही बघत नाहीं. वतनाचें कार्य तो महत् कष्टेकरून कळसास आणिलें आहे; परंतु सहा हजारांकरितां तटोन पडलें आहे. महाराजांस असत्य वाटेल, याकरितां कोणे जातीनें रुपये खर्च होतील त्याची नांवनिसीची याद अलाहिदा पाठविली आहे, त्यावरून विदित होईल व महाराजांस उमरखान यांनीं पत्र लिहिलें आहे त्याजवरून श्रुत होईल. त्यास, स्वामी ह्मणतील कीं, तुह्मांस ऐवज देविला होता, तो आणवून कार्यसिद्धि करावी होती. तरी, स्वामीनें रायाजी प्रभूकडे पांच सहस्र रुपये देविले. त्यांत आज ता। हजार रुपये पावले. त्याचा खर्च कैसा जाहला ह्मणिजेल तरी, रा। काशीपंत बुंदखानी याचे गुजारतीचे कर्ज रुपये ४९२ फारीख केले. तेव्हां ते गेले. त्याजवर निजामन्मुलुख आले. त्यांची भेट घेतली. तेव्हां त्याचे दरबारी खर्च जाहला. एकंदर जाहला रुपये २०४।. बाकी राहिले रुपये, त्यांपैकीं उमरखानास शेला व किरकोळी नजर व चोपदार व खिजमतगार मिळोन खर्च जाहला रुपये ५४॥. बाकी निवळ ऐवज राहिला तो लोकांदेखील आमच्या पोटास खर्च जाहाला, रुपये २४९।. ऐसे हजार रुपये खर्च जाहले. त्याखेरीज आपणास कर्ज रुपये ८३७ जाहलें आहे. बाकी रुपये रायाजी प्रभूकडे चार हजार राहिले. त्याबद्दल अवरंगाबादेहून त्याजकडे चार वेळां पत्रें

व मनुष्यें पाठविलीं. परंतु त्याजपासून एक रुपया प्राप्त नव्हे. हालीं बाळाजी विश्वनाथ यांच्यां कमाविसदारांनीं रायाजी प्रभूचा प्रांत बळकाविला; आणि प्रभूचे कमाविसदार होते ते पळोन रायाजी प्रभूपाशीं गेले. धामधूम बहुत गंगथडीस जाली ते पत्रीं काय ह्मणोन लेहावी? हें वृत्त सविस्तर रा० कानो पाध्ये यांस श्रुत आहे, त्यांस स्वामींनें विचारिलें पाहिजे. आतां तरी खंडेराव दाभाडा व रायाजी प्रभु व नरसोजी मोऱ्या व राजजी थोरात ऐसे एकत्र होऊन, गंगाजी त्रिंबक याचे फौजेस सामील होऊन, त्यासगवेत फौजेनसी येवलें प्रांतें खंडेराव दाभाडे याच्या लेकी दोन व सासू व मेहुणा ऐशीं माणसें सह्या अंबोजी देशमुख यांणीं धरिलीं आहेत. तरी सोडवावयास आले आहेत. कोणाचे चाकर हाहि निर्वा कळत नाहीं, ऐसा प्रसंग जाला आहे. याउपर आह्मांस रायाजी प्रभु कोठून रुपये देऊं पाहातो? स्वामीच्या वतनाचें कार्य तो रुपयावीण अटकलें आहे. आह्मीं तो रुपयांचे तरतुदेबद्दल उमरखानाचा निरोप घेऊन फाल्गुन वदि दशमीस कल्याणास आलों. मागाहून खानही येणार आहेत. रुपयांकरितां स्वामीचे शेवेसी विनंती पत्र लिहिलें असे. तरी, कृपाळू होऊन सध्यां पोतांतून वतनाच्या अमलाबद्दल ऐवज तूर्त रुपये १००० पाठविले पाहिजेत. या उपर अनमान करावयाचा प्रसंग नव्हे. नाहीं तर अपकीर्ति होते. विशेष लेहावें तरी स्वामी धनी आहेत. सेवेसी श्रुत होय.

---

[७१] श्री. १७१६.

श्रीआईआदिपुरुष
श्रीराजा शिवछत्रपति कृपानिधि। तस्य परशराम
त्र्यंबक प्रतिनिधि.

यादी वतनी मजमू श्रीपाद स्वामी सत्यपूर्ण पन्हाळ्याच्या मुक्कामीं

सन खमसांत माघ बहुल चतुर्दशी शिवरात्रीचे दिवशीं आले. ते समयीं आपली वतनी मजमू दिली होती. त्याचें पत्र सालमजकुरीं सन सीतामध्यें पाठवून दिलें तें जमा वतनी मजमू पत्र १.

शिक्का शिक्का

वतनी पत्र मजमू सत्यपूर्ण श्रीपाद स्वामी या कडील करून दिल्हें तें जमा पत्र १.

---

[७७] अलीफ. २० फेब्रुवारी १७१९.

सांप्रत अर्ज जाला कीं राजश्रेष्ठ राजे शाहू इकडील लक्षांत वागोन पंधरा हजार स्वारांनसी दक्षिणेचे सुभ्याची कुमक राखितील. त्याजवरून सहा सुभे दक्षिणेचे, त्यांची चौथाई सदरहू स्वारांचे खर्चाबद्दल घेत जावी असें ठरलें. ऐसियास, किल्लेदार, मामलतदार, जहागीरदार व करोडे वगैरे वर्तमान व भावी याणीं सुभेमजकूरची चौथाई त्यांस देत जावी. ताकीद. छ २२ रबिलाखर, सन १ जुलूस, सुा सन ११३१ हिजरी.

---

[७८] अलीफ.

सर्व शूरांत श्रेष्ठ, सर्व उमरावांत थोर, इस्लामाचे रक्षक, शाहू राजे यांणीं बादशाही कृपेस आपला सत्कार समजोन जाणावें कीं:—सांप्रत अमीरुलउमराव याणीं अर्ज केल्यावरून तुमचे कदीम राज्यांतून दहा लक्ष रुपये पेपकषी द्यावयाचें मुकरर करून हा फर्मान तुह्मास लिहून दिल्हा असे. तरी पेपकषीचा ऐवज, चौथाई रोख घेऊन, बाकी किस्तीप्रमाणें द्यावा. आणि सदोदित इकडील लक्षांत वागोन मुलकाची आबादी व मुफसरांस तंबी पोहोचवीत जावी. व इकडील दौलतीची किफायत करण्यांत आपलें कल्याणाचें कारण जाणावें. छ ४ जुमादिलोवल, सन १ जुलूस, सुा सन ११३१ हिजरी. १४ मार्च १७१९

अलीफ.

यादी महाराज यांजकडे महालेराजेकदीम पेशजीप्रमाणें राजे शाहूकडे दिल्हे. त्याची पेषकष दहा लक्ष रुपये ठरविली. त्याप्रमाणें चौथाई हस्तगत जाल्यावर द्यावी, आणि बाकी ऐवज किस्ती बाकीप्रमाणें. त्याप्रमाणें सरकार आज्ञा जाहाली ते महाल सदतीस.

(१)

बालेघाटावरील महाल.

प्रांत पुणें व वांई दुतर्फा एकूण.

१ हवेली.	२ नीरथडी.	३ कडेपठार.
४ सांडस.	५ पाटस.	६ सासवड.
७ बारामती.	८ इंदापूर.	९ वांईतर्फ.
१० हवेली.	११ लिंब.	१२ वाघोली.
१३ कोरेगांव.	१४ सुपें.	

(२)

मावळे तर्फा १२.

१ कर्यात् मावळ.	२ कानपखोरें.	३ खेडेबरें.
४ गुंजणमावळ.	५ नाणेमावळ.	६ भोरखोरें.
७ जुने मावळ.	८ मुठेखोरें.	९ सावडखोरें.
१० हिरडसमावळ.	११ शिरवळ.	१२ रोहिडखोरें.

(३)

प्रांत सातारा तर्फा ६.

१ हवेली.	२ परळी.	३ तारगांव.
४ उंबरज.	५ कुडाळ.	६ वंदन.

(४)

प्रा। कराड तर्फा ९.

१ हवेली.	२ मारुळ.	३ बरसाळें.

४ ताराळें.	५ कोळें.	६ मरळी.
७ नाणें वाळें.	८ पाटण.	९ निंग.

(५)

प्रा। खटाव तर्फा ११.

१ हवेली.	२ मलवडी.	३ वांगी.
४ निंब.	५ मायणी.	६ अळगुंडे.
७ औंद.	८ विटें.	९ माळवणी.
१० खानापूर.	११ कळेढोण.	

(६)

प्रा। माणदेश तर्फा ६.

१ दहीगांव.	२ वेळापूर.	३ ह्मसवड.
४ आटपाडी.	५ फलटण.	६———

(७)

प्रा। मलकापूर तर्फा ४.

१ हवेली.	२ वारुण.	३ कासेगांव.
४ शिराळें.		

(८)

प्रा। तारळें तर्फा ५.

१ हवेली.	२ असवली.	३ अरळें.
४ खानापूर.	५ घोळ.	

(९)

प्रा। पन्हाळा तर्फा १०.

१ गळचोर.	२ कोडोली.	३ सातवें.
४ ठाणें.	५ बोरगांव.	६ आह्रो.
७ अळतें.	८ रुकडी.	९ वाळवें.
१० वडगांव.		

(१०)

प्रा अजरें तर्फा ११.

१ हवेली.	२ अंभेरी.	३ गणेगांव.
४ करटोळी.	५ अंबोली.	६ महागांव.
७ येळोशी.	८ कापशी.	९ खानापूर.
१० लोणी.	११ नितळी.	

(११)

प्रा जुन्नर तर्फा १३.

१ खेड.	२ नारायणगांव.	३ निवोज.
४ हिंदुरे.	५ येळगांव.	६ मदेखोरें.
७ महाळुंगें.	८ वेरुळ.	९ चाकणखोरें.
१० वाकेरी.	११ मनथर.	१२ पावळ.
१३ अशेरी.		

(१२)

प्रा कोल्हापूर तर्फा ९.

१ हवेली.	२ कागल.	३ रायबाग.
४ साठगांव.	५ शिवलिंग.	६ भळम.
७ वाहळ.	८ भेगळे.	९ ——

मलकापूर सरहद्दींत सहा प्रगणे जे खालीं लिहिले आहेत, त्यांचे सरहद्दींत सहा किल्ले राजे शाहू यांचे हातीं आहेत. राजे महसुफ इकडील लक्षांत वागतात त्यापेक्षां या किल्ल्यांचे किल्लेदारांस मनसबा वगैरे नाहींत. यांजला एक हजार रुपये सालीना दर किल्ल्यास बारा हजार रुपये खर्च आहे. परंतु मरुत्यार्चे जें जमावयाचें तें किल्ल्याकडे खर्ची मिळून.

१ किल्ले महीपतगड.	२ किल्ले भुजंगगड ऊर्फ राजदुर्ग.
३ किल्ले कागल.	४ किल्ले महीपाळगड.

५ किल्ले सुरगड. ६ किल्ले बहादूरगड.

यांचे खर्चास महाल सरकारांतून द्यावे.

१३ प्रा मळगाव. १४ प्रा सुप्रेगाव. १५ प्रा गदग.

१६ प्रा लखमेश्वर १७ प्रा भुजंगगड. १८ प्रा कोप्पळ.

१९ प्रा हरयाळ. २० प्रा नरगुंद.

(२१)

तळकोंकण.

प्रा रामनगर घनदेवीसुद्धां तर्फा—६.

१ चिपळोण. २ नागनाथ. ३ अमरधार.

४ वकुर्ते. ५ असामती. ६ माळे.

(२२)

प्रा भीमगड तर्फा ५.

१ मांडे. २ पारणें. ३ मकरें.

४ सांगली. ५ हरोळी.

(२३)

प्रा भिवडी तर्फा १२ कसबे ५ सुद्धां १७.

१ सुरत. २ दासुद्री. ३ मुरळी.

४ नानारे. ५ गुरेघर. ६ तडे.

७ आगटी. ८ अकुर्ते. ९ राहुडे.

१० खेड. ११ घाग. १२ दुर्गा.

१३ अतूण. १४ इमारताळ. १५ माळे.

१६ असेगांव. १७ चंद्रवाडी.

(२४)

प्रा कल्याण तर्फा २०

१ कल्याण. २ अमरनाथ. ३ वाखळ.

४ सोरटी. ५ शेर. ६ वाडा.

७ कोथळेखडाळें	८ कांचळी.	९ वासें.
१० अरुथ.	११ ओंकारडंग.	१२ बरानपूर.
१३ मलुठण.	१४ वाशी.	१५ पोळी.
१६ झटवळी.	१७ निसाखळ.	१८ मोठे.
१९ वासे.	२० चांदे.	

(२५)

प्रा महाड तर्फा १२.

१ मोरगांव.	२ गोवेळ.	३ मोत्रे.
४ दिठे.	५ श्रीवर्धन.	६ ह्रासवें.
७ निजामळ.	८ बीरवाडी.	९ मांडगांव.
१० मोहरे.	११ मांडवी.	१२ मोळें.

(२६)

प्रा जावळी तर्फा १८.

१ बीरवाडी.	२ सोमेश्वर.	३ वासें.
४ खोरें.	५ बळें.	६ वेहळें.
७ कोंडवी.	८ चांदेश्वर.	९ त्रिजावळी.
१० आठेगांव.	११ माद्रणी.	१२ माहुली.
१३ होर्ते.	१४ मेढेखोरें.	१५ जोरखोरें.
१६ साळवें.	१७ बाळेखोरें.	१८ घरठाण.

(२७)

प्रा राजापूर तर्फा १८.

१ खारेपाटण.	२ सहस्रे.	३ सौंदळ.
४ राकापूर.	५ अक्कोळे.	६ देवरथ.
७ इतघाणे.	८ हडकरी.	९ भूवळकोट.
१० देवळे.	११ खळतगांव.	१२ ढेणशी.
१३ मारुशी.	१४ शाखंबरी.	१५ गडघळे.
१६ संगमेश्वर.	१७ प्रभावळी.	१८ घामणशी.

(२८)

प्रा कोळे तर्फ ५.

१ हवेली.	२ शिवनेर.	३ कडूर.
४ कण्हेरखेड.	५ कडत.	

(२९)

प्रा कुडाळ तर्फ १५.

१ हवेली.	२ ह्मसवड.	३ ढवळें.
४ अस्मारे.	५ बुसरलें.	६ निगोती.
७ नायगांव.	८ हेळपूर.	९ मारुळ.
१० पइरी.	११ पाट.	१२ माकडी.
१३ बेरडें.	१४ करनोळी.	१५ माणगांव.

इतर ६ प्रा आहेत.

एकूण ३५.

---

[७९] अलीफ. ३० जून १७१९.

राजे शाहू याणीं बादशाही कृपेस आपला सत्कार जाणोन समजावें कीं, सांप्रत थोरले बादशाह याणीं कैलासवास करण्यापूर्वी तीन चार दिवस आह्मीं दौलतीचा अधिकार करावा असें सांगितलें. त्याजवरून छ २० रजब सन ११३१ रोज शनिवार तक्तनिसीन जाहालों आणि खजिना व हुकूम शिक्का वगैरे स्वाधीन जाला. याजकरितां तुह्मास हा फर्मान लिहिला आहे. तरी तुह्मीं एकिशीचा संतोष मानून पूर्ववत् लक्षांत वागण्यांत आपलें कल्याण जाणावें. आणि अलमअलीखान वजीर व त्याजकडील कामगार व ठाणेदार यासी मदत देऊन असा बंदोबस्त राखावा कीं, बादशाही मुलखांत बंडें वगैरे कोणतेही रीतीनें खराब न करीत. छ० २७ रजब, सन १ जुलूस.

[८०] अलीफ. २२ सप्टेंबर १७१९.

राजे शाहू याणीं बादशाही कृपेस आपला सत्कार समजोन जाणावें कीं, सांप्रत थोरले बादशाह यांस तापाचा आजार होऊन कैलासवासी जाले आणि ईश्वरकृपेनें आह्मीं राज्याधिकारी जालों. सा तुह्मास फर्मान लिहिला आहे. तरी तुह्मींही येविशींचा संतोष मानून पेशजी प्रो इकडील लक्षांत. वागवण्यांत आपले बढतीचें कारण समजोन अलीखान वजीर व त्याजकडील उमराव यांसी सख्य राखून सुभेदार व ठाणेदार यास मदत देत जावी आणि असा बंदोबस्त राखावा कीं, कोणीही मुफसद बादशाही मुलखांत बंड न करूं शके. छ १९ जिलकाद, सन १ जुलूस.

---

[८१] श्रीरामचंद्र. १७२०.

यादी. पहिले बोली आहे जेः--

सातारियापासून जिला घ्यावा, गडकिल्ले कोट स्वाधीन करून देऊं, ऐसें महाराज राजश्रींचें वचन आहे. स्वहस्तें यादी आहे. शपथ देऊन आणिलें. त्यास, येथें धणियास विचार पडला. समर्थ लोकीं वचन दिलें तें सत्य करावें, हें उत्तम आहे. पुढें राज्य सुटेल. सेवा घ्यावी. याचें संकटच पडलें असेल, तर निदानी :—

जिल्हे	किल्ले कोट तावीन करावे.
१ कऱ्हाड सुभा.	१ वसंतगड.
१ मिरज सुभा.	१ महीमंतगड.
१ पन्हाळा सुभा.	——
१ मलकापूर सुभा.	——
१ तारळे सुभा.	——
१ आजरें सुभा.	——
१ बेळगांव सुभा.	कोट वडगांव.
१ हुकेरी सुभा.	कोट इसलामपूर.

या प्रांतें आमचीं वतनें व इनाम गांव आहेत. मु॥ या यादीप्रमाणें पत्रें करून द्यावीं.

मुतालिकाचा सरंजाम बोली-प्रमाणें बहुमान हत्ती, घोडे, भूषणें.

साहित्य पत्रें.

सरदारास व काटकास देशक सनदा व ताकीद पत्रें.

कोट अष्टे.

कोट शिराळें.

याचा बळें पुढें राज्य सोडवूं. धणियाचें पुण्य, आमचे कष्ट.

मदतीस सरंजामी फौज

२ हुजूर पथकें.

१ रायाजी जाधव.

१ ————

---

१ शिदोजी थोरात.

२ सेनापतीकडील फौज पथकें दोन हजार.

६

आह्माकडील नी॥ चाकर व कारकून, ब्राह्मण यांचीं गांव वतनें पत्रें करून द्यावीं.

येणेंप्रमाणें द्यावें. धणियाची क्रिया सत्य होईल. आह्मीं एकनिष्ठेनें सेवा करूं. नाहींतर शेवटीं निरोप द्यावा. छ.

---

[८२] श्री. १७२२.

श्री राजा शंभु-
छत्रपति चरणीं
तत्पर । बहिरजीसुत
रखमोजी साळोंखे
निरंतर.

अज दिवाण कोट कोल्हापूर ता। मोकदमानी वहिरेश्वर कर्यात हवेली सुहूरसन आर्बा अशरैन मया अल्फ. मौजे मजकुरीं शंकरगिरी गोसावी हे बहुत थोर अतीत त्यास श्री देवाची भक्त्युत्तमविशिष्ठ ऐसे जाणोन महाराज राजश्री स्वामींनीं पेशजी पड जमीन इनाम ०॥० निम चावर दिला आहे. त्यापैकीं कांहीं कीर्दी जाहली आहे. कांहीं जमीन कीर्दी होणें आहे. त्यास गोसावीबावास जमीन सदरहूप्रमाणें कुल अवची नेमून देणें आणि त्यांचें इनाम अविछिन्न चालवणें. जमिनीस खलेल एकंदर न करणें. या पत्राची प्रती लिहोन घेऊन असल पत्र भोगवटियास गोसावी यापाशीं लिहून परतून देणें. जाणिजे. रवाना. मोर्तब सुद.

मोर्तब
सूद.

---

[८३] श्री. १ जानेवारी १७२३.

श्री

राजा शंभुछत्रपति हर्ष-
निधान। रघुनाथसुत
तिमाजी पंडित मुख्य
प्रधान.

श्री आई आदिपुरुष श्रीराजा
शंभुछत्रपति स्वामी कृपानिधि।
तस्य कृष्णाजी परशुराम
प्रतिनिधि.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५० शोभकृत्‌नाम संवत्सरे पौष बहुल द्वितीया सौम्यवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभुछत्रपति स्वामी याणीं राजश्री देशाधिकारी व कारकून वर्तमान व भावी सुभा प्रा। तारळे यांसी आज्ञा केली ऐसी जे:—रा० गोविंद नरहरी गोत्र भारद्वाज राशिवडेकर हे बहुत भले मौजे राशिवडे येथें राहतात. श्रीभजनीं तत्पर श्रीज्ञानेश्वरी-पारायण कारितात. कुटुंबवत्सल. यांचे योगक्षेमाची अनुकूलता केलियानें कल्याणावह, याकरितां स्वामी कृपाळू होऊन यास नूतन इनाम कुलबाव कुलकानू, खेरीज हक्कदार व इनामदार करून, मौजे कुरकुली ता। तारळे

प्रा मा येथें भात जमीन बिघा ८१ एक बिघा रास इनाम करून दिल्हा असे. तरी तुह्मीं सदरहू जमीन यास मोजून चतुःसीमा करून देऊन वंशपरंपरेनें चालवणें. ये सनदेची तालीक घेऊन अस्सल परतोन देणें. लेखनालंकार.

मर्यादेयं विराजते.

रुजू सुरनवीस.

तेरीख १६,

रबिलाखर, सुा आर्बा अशरीन.

बार सुरू सूद बार.

---

[८४] श्री. २ जानेवारी १७२३.

प्रधान शिक्का. प्रतिनिधि शिक्का.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५० शोभकृत्‌नाम संवत्सरे पौषबहुल चतुर्थी भृगुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभुछत्रपति स्वामी याणीं रा० रखमाजी साळोखी मुद्राधारी व कारकून कोट कोल्हापूर यासी आज्ञा केली ऐसी जे :—रा० रवळो नरहर हे उमेदवार होते. स्वामिकार्याचे देखोन यांची असामी सभासदांत घालून पाठविले आहेत. यांचें चालवणें, हें स्वामीस परम आवश्यक आहे. तरी तुह्मीं यांचे हातें स्वामिकार्य घेत जाणें. यास वेतन साळीना देखील चाकर होन पा। ५०० पांचशे रास केले असत. ह्या पैवस्तगी पासून वजावाटाऊ दंडकप्रों। वजा करून उरलें वेतन शिरस्तेप्रमाणें पावीत जाणें. यास जमान— तुह्मीं कोट मजकूर घेणें. जमान कतबा हुजूर पाठवणें.

लेखनालंकार.

मर्यादेयं विराजते.

रुजू सुरनिवीस.

तेरीख १७,
रविलाखर, सुा आर्बा अशरीन.

बार सुरु सूद बार.

---

[८९] श्री. २ जानेवारी १७२३.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५० शोभकृत्नाम संवत्सरे पौष बहुल चतुर्थी भृगुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभुछत्रपति स्वामी याणीं राजमान्य राजश्री आपाजी पंडित व रामराव बाळाजी यासी आज्ञा केली ऐसी जे:—राजश्री भगवंतराव अमात्य हुकमतपन्हा यासी कीतेक स्वामिकार्याची आज्ञा करून त्या प्रांतें रवाना केले आहेत. हे स्वामिकार्याविषयीं तुह्मास लिहितील व सांगोन पाठवितील. तरी तुह्मीं आपल्या जमावानसी यास सामील होऊन यांचे आज्ञेप्रमाणें स्वामीकार्य करीत जाणें. बहुत काय लिहिणें. लेखनालंकार.

मर्यादेयं विराजते.

सुरु सूद बार.

---

[८१] श्री. ३ जानेवारी १७२३.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५० शोभकृत्नाम संवत्सरे पौष बहुल चतुर्थी मंदवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभुछत्रपति स्वामी याणीं देशमुख व देशपांडे तर्फ तारळे यांसी आज्ञा केली ऐसी जे:—राजश्री भगवंतराऊ अमात्य हुकमतपन्हा यांसी त्या प्रांतें रवाना केलें आहे. तरी तुह्मीं जमावानसी यांचे आज्ञेंत राहोन स्वामिकार्य करीत जाणें. आणि आपले सेवेचा मुजरा करून घेऊन स्वामीस संतोष पावणें. जाणिजे. लेखनालंकार.

मर्यादेयं विराजते.
रुजू सुरनिवीस.
सुरु सूद बार.

---

[८७] श्री. ६ जानेवारी १७२३.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५० शोभकृत्‌नाम संवत्सरे पौष बहुल अष्टमी भौमवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभुछत्रपति स्वामी याणीं राजमान्य राजश्री बाबाजी सिगाडे यासी आज्ञा केली ऐसी जे:—राजश्री भगवंतराव अमात्य हुकमतपन्हा यांसी या प्रांतें रवाना केले आहेत. हे स्वामिकार्याविषयीं तुह्मांस लिहितील व सांगोन पाठवितील. तरी तुह्मीं आपले फौजेनसी यासी सामील होऊन यांचे आज्ञेप्रमाणें स्वामिकार्य करणें. बहुत काय लिहिणें.

मर्यादेयं विराजते.

सुरु सूद बार.

---

[८८] श्री. ३१ आगष्ट १७२४.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शक ५१ क्रोधीनाम संवत्सरे भाद्रपद बहुल अष्टमी भानुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शंभूछत्रपति स्वामी याणीं राजमान्य राजश्री यशवंतराव गोपाळ व दामाजी हरी यासी आज्ञा केली ऐसी जे:—

राजश्री रामराव दादाजी हे स्वामीच्या राज्यांतील पुरातन एकनिष्ठ सेवक स्वामीच्या पायांशीं त्रिकर्णशुद्धीनें निष्ठा धरून सेवा करीत होते. यांचें चालवणें हें स्वामीस परम अवश्यक, याकरितां स्वामी यावरी कृपाळू होऊन यांस नूतन इनाम कुलबाव कुलकानू हालीपट्टी पेस्तरपट्टी-सहित, खेरीज हकदार व इनामदार करून, मौजे सोलंकुर ता। तारळें हा गांव इनाम अजरामरहामत करून दिल्हा असे. मौजे मजकूर मा।-निले वंशपरंपरेनें इनाम अनभवितील. तुह्मीं मौजे मजकुरास तोसीस तगादा लागो न देणें. जाणिजे. बहुत काय लिहिणें.

मर्यादेयं
विराजते.

सुर सुद बार.

[८९] श्री. ८ सप्टेंबर १७२४.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५१ क्रोधी नाम संवत्सरे आश्विन शुा। प्रतिपदा इंदुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शंभुछत्रपती स्वामी याणीं कमाविसदारान व लोकान दिमत पंचोत्रा यासी आज्ञा

० श्री ॅ
राजाशंभुछत्रपति
हर्षनिदान। रघुना
थसुततिमाजीपंडि
तमुख्यप्रधान

ॅ ०
श्रीआईआदि
पुरुषश्रीराजा
शिवछत्रपतीस्वामि
कृपानिधितस्य
परशुरामत्र्यंबक
प्रतिनिधि

केली ऐसी जे:—
मौजे सोलंकूर ताा तारले हा गांव राजश्री रामराव दादाजी यासी स्वामींनीं इनाम दिल्हा आहे. पंचोत्राही देऊन तुह्मांस हें आज्ञापत्र सादर केलें असे. तरी तुह्मी हें जाणून मौजे मजकुरास पंचोत्र्याचा तगादा न लावणें. निदेश समक्ष.

मर्यादेयं
विराजते

सुरसुदबार

---

[९०] जलसेन श्री. ७ सप्टेंबर १७२९.

० श्री ॅ
राजाशिवसेवेसीतत्पर
संताजीसुतपिराजी
घोरपडे निरंतर

आज्ञापत्र समस्तसेनाधुंरधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री पिराजी घोरपडे ताा मोकदमानी, मौजे बहिरेश्वर, हवेली कोल्हापूर,

सुा सन सित् अशैन मया अलफ:--मौजे मजकुरीं श्री थोर देवस्थान आहे. तेथील पूर्वी उत्साह नंदादीप नैवेद्य पूजा पुरस्कार चालत होती. अलीकडे धामधुमीमुळें राहिली होती. ऐशियास, तुज राजश्री रामचंद्र पंडित, हुकुमतपन्हा यांहीं इनाम जमीन सनदा करून दिल्या आहेत.

श्री देवास जमीन चावर ०॥०	शंकरगीर परंपरा दुर्गानाथगीर गोसावी ते मठ बांधून राहतील. यास भंडाऱ्याकारणें जमीन ०॥०

येकूण एक चावर जमीन दिली आहे. त्याप्रों बिलाकुसूर चालवणें कोणीं हिला हरकत करील त्यास ताकीद होईल. श्रीचा देवद्रोह लागेल थोर देवस्थान आहे. यास खलेल कोण्हीं करावयास गरज नाहीं. सुरळीत चालवणें. जाणिजे. छ १९ रबिलाखर.

बार लेखन
सीमा.

[९१] श्रीरामचंद्र समर्थ. ९ जून १२७.

श्रीरामचंद्रचरण
नीलकंठसोनदेव
शरण

नेमणूक सनदा गल्ला सरदारी किल्ले गगनगड सुमासमान अशरीन मया अलफ गल्ला देसरी सोळुखें मापें नागली वरिया भात.

कारकून व आश्रित एकूण देसरी सोळुखें	लोकानी गल्ला देसरी सोा मापें नागली, वरीया भात खंडी
२ अपाजी गोपाळ	०॥२
१।० सातो गोविंद	१ रवळोजी शिंदे
१ नारो शिवदेऊ	०।४ रायाजी मोऱ्ये

२ इंद्रा पाध्ये
०।२ ब्राह्मण पूजा
६॥२
खासगत चाकर गल्ला सो॥
०॥= येसू आगवी
०॥२ नरा
०॥२ अवटा
०॥= कमला
०॥= अर्थ

किता लोक पथकें
एकूण गल्ला देसरी सो॥
२ दिमत शिद सावंत
१ खासा
१ आ॥ ४
२
२॥० दिमत विठोजी सावंत
१ खासा
१॥ लोक ९
२॥
४॥

१॥ जदीद असामी ६
दर पावप्रमाणें
६

०॥२ सोनजी दळवी
०।४ खंडोजी पोवार
०॥२ भोजजी जाधऊ
०॥२ भानजी कदम
०॥० घावजी पवार
०॥० माहादजी साळवी
०।१ त्राबजी सांवळ
०।१ संभाजी सावत
०।१ संताजी जाधव
०।१ रुद्राजी काळे
०।१ माणकोजी तरळ
०।१ कृष्णाजी माळकर
०।१ संभाजी शिंदा
०।१ दादजी पवार.
०।४ रायाजी संगपाळ
०।१ मोतजी काऊर
०।१ बहिरजी शिंदा
०।१ केदारजी खाणकर
०।० रवळ सावंत
०।० भिकाजी धोंड
०॥२ सवा सुतार
०।२ मेघोजी मोरे
०।० नागोजी टोणा
०।० पिलजी तावरे
०।० पोसजी कर्णकार
०।० तुकोजी शिंदा
०।१ भिकाजी जाधव
०।१ बयाजी सूर्यवंशी

तेरीज गल्ला	०।१ संताजी घाटगा
६॥३	
३	
६	०॥२ अली मुराद
१३८१	
२८॥४	१३८१

एकूण गल्ला देसरी सोळुखें मापें साडेअठावीस खंडी चार मण रास चाकरी माफीक देणें. जाणीजे. छ १ जिलकाद. निदेश समक्ष.

लेखन सीमा
समुल्लसति

[९२] श्री. १७२८.

राजमान्य राजश्री भगवंतराव रामचंद्र यांसी:—

आज्ञा केली ऐसी जे:— तुम्हीं विनंतिपत्र पाठविलें, तें प्रविष्ट झालें. लिहिला अभिप्राय सर्व कळों आला. व गोविंद वेंकटाद्री पाठविलें याणीं तुमचा भाव मर्म विदित केला. ऐशास, तुम्हीं राज्यांतील पुरातन सेवक. वडील परंपरेनें सेवा करीत आला आहां. ज्यामधें धण्याची रजावंदी त्याप्रों वर्तावें, उचित. ऐसें असतां अवलंबिला प्रसंग तुम्हां योग्य आहे ऐसें नाहीं. अैशानें कोणाचे परिणाम लागले आहेत? या उपरी तऱ्हीं धण्यासी निष्ठा धरून आज्ञेप्रमाणें वर्तणूक करणें. आपल्या कदीमाईस बोल न लागे तो विचार करणें. तेही तुमचे पूर्ववतप्रों सर्वस्वें चालवीतील. सूज्ञ असा.

[९३] श्रीगोपाल. १७२८.

राजश्री पंतआमात्य हुकुमतपन्हा गोसावी यांसीं—

ध. सकल गुण अलंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो. उदाजी चवाण हिंमतबहादर ममलकतमदार कृतानेक दंडवत विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशललेखनाज्ञा केली पाहिजे. यानंतर

रा० रामराऊ यांजबरोबर कितेक अर्थ मुखोत्तरें व पत्रीं लिहून पाठविलें. पाहोन सकल अर्थ अवगत झाला. ऐशास आह्मीं पुरातन तुमचे. दुसरा अर्थ किमपि नाहीं. दूरस्थ असिलों तरी चित्तवृत्ती आपलेठायीं ...कल्पवृत्तीनें असे. तेथें इतर पदार्थ कल्पना नाहीं. आह्मीं आपले ...ल्यास मैत्रीस अंतर सहसा न घडे. एतद्विशींचा प्रसंग ...ो रामराऊ यांसीं सांगितला आहे. सांगतां विदित होय. बावतीच्या अमलाचा चौका बसवावा, याविशीं सिरोळ अकीवाट दोहीं स्थळीं अधिकारी ठेविले आहेत. त्यास आज्ञा करणें ती केली आहे. यथाशक्त्या चाकरीस अंतर करणार नाहींत. वरकड प्रसंगास आह्मीं कोठेंहि असलों तरी समीपच आहों, ये रीतीनें चित्तांत असों द्यावें. प्रसंगास चुकतों असें नाहीं. विशेष काय लिहावें. कृपा असो. हे विनंती.

---

[९४] श्री. २४ फेब्रुवारी १७२८.

राजमान्य राजश्री भगवंतराव अमात्य हुकमतपन्हा यांस आज्ञा केली ऐसी जेः— नारायण हरकारा याजबरोबर तुह्मीं सांगोन पाठविलियाप्रमाणें अक्षरशा विदित केरितां श्रुत झालें व शफतपूर्वक निष्ठापूर्वक सेवकपणाचा अर्थ सांगोन पाठविला त्यावरून बहुत संतोष जाहला. तरी याच अन्वयें दिवसेंदिवस तुह्मीं सेवा करून ममता संपादावी आणि स्वामींनीं अकृत्रिमपणें तुमचे मनोदयानुरूप चालवावें हेंच अवश्यकता आहे. दुसरा अर्थ नाहीं. तुमचे वडिलांनीं या राज्यांत श्रम साहस करून राज्य रक्षिलें. त्यांचे पुत्र तुह्मीं आहां. त्यांचे प्रमाणेंच सर्व भाराभार तुह्मांवर देऊन सेवा घेऊन चालवावें हेंच उत्तम आहे. ऐशास. स्वामी तीन वर्षें स्वारीस होते. प्रस्तुत आगमन जाहलें. तुह्मीं दर्शनास येऊन संतोषी करावें हें चित्तांत आहे. त्यास, श्रीचा उत्साव रामनवमीचा आला आहे. येथें येऊन संपादावा हें स्वामींचे चित्तांत विशेषें-करून आहे. तुह्मीं चित्तांत कांहीं संदेह न मानितां स्वामीवर भार

घालून यावें. उत्सावप्रसंगीं कर्जवाम होईल तर श्रीकृपेनें कर्ज फारीक होईल. तुह्मीं मागील जाले गोष्टीचा खेद चित्तांत न आणावा. स्वामीचा तो चित्तांत कोणे येक गोष्टीचा संशय नाहीं. मध्यस्ताचा विचार तर, या उपरी तुह्मीं आपलें यश अपेश धन्यावर घालोन दृढतर विचार करून यावयाचें करणें. सर्व मान अपमान व तुह्मांस बरें गोष्टीस खासा स्वामीच मध्यस्त धनी आहेत. तुह्मीं या संदेह न मानितां यावयाचें करणें. रा० गोपाळ रामराऊ यासी दर्शनास नाईक चालवावयाविसी सांगोन पाठविलें. येवरून आज मंदवारीं प्रातःकाळीं दर्शनास आणून समाधान करून वस्त्र दिल्हें. ज्याचे वडिलांनीं राज्यांत सेवा केली त्याचें चालवावें हेंच अवश्यक. ऐशास तुमचे आगमनानंतर तुमचे विचारें जो प्रसंग करणें तो केला जाईल. तुमचे येण्याचे प्रसंगास येथून कोणास पाठवावयाचें ते लिहून पाठवावें. त्याप्रमाणें रवाना करून पाठवूं. येविसी तपशिलें सुबजी भोसले वा। मूळ व नारायण हरकारा यासि आज्ञा केली असे. आज्ञे प्रमाणें सांगतां कळेल. तदनुरूप उत्तर सत्वर पाठवावें. सकलादेविशीं सांगोन पाठविले. सकलाद न मिळे यास्तव स्वामीचा फर्गोल पांचरता पाठविला असे. घेवणे. जाणिजे. रवाना चंद्र २४ माहे रज्जब. सुज्ञ असा.

---

[९९] श्री. १७ एप्रिल १७२८.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५४ कीलकनाम संवत्सरे अधिक वद्य पंचमी सौम्यवासरे क्षत्रिय कुलावतंस श्रीराजा शंभु छत्रपति स्वामी यांणीं समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री भगवंतराऊ अमात्य हुकमतपन्हा यांसी आज्ञा केली ऐसी जे:—तुह्मीं चित्तांत एक प्रकार आणून तेथें श्रीमंत मातुश्री साहेबापाशीं आज्ञा मागता ह्मणोन वर्तमान विदित जालें. तरी तुह्मीं स्वामीचे यखतियारी सेवक आणि साहेबाची ममता विशेषाकारें तुमचे ठायीं हें पत्रीं विस्तारें लिहावें तर मनोमन साक्ष असे. तुमचा हेत स्वामीचे ठायीं व स्वामीची ममता

तुह्मांवर असे. स्वामी सेवक एक, ऐसे असोन कोणी सांगणारांनीं काय सांगोन तुमचें चित्ताचा विपर्यास केला हें न कळे! या उपर कोणेक प्रसंग चित्तांत न मानितां समाधान असो देणें. राजश्री पंतीं या राज्यांत श्रम साहास करून कीर्त संपादिली. त्याचे पुत्र तुह्मीं आहां. पंताचे घराशीं स्वामीचा द्वैत विचार नाहीं, हा निशा असो देणें. या उपर चित्तांत संदेह मानाल तरी तुह्मांस पंताची व श्री रामचंद्राची व स्वामीचे पायाची शपथ असे. समाधान असो देणें. उदईक साहेबाचा मुक्काम गड मुडसिंगी येथें असे. तुह्मीं तेथें जमावानिसी स्वामीचे दर्शनास येणें. दर्शनांतीं सर्व चित्ताचा खुलासा होईल. समागमें राजश्री कोंडाजी सुभेदार यांसी घेऊन येणें. वरकड वृत्त शेख महंमद आज्ञेप्रमाणें सांगतां कळेल. सारांश गोष्ट जे, साहेबाचा तुह्मांस भरवंसा असिला तर दुसरा अर्थ न समजतां दर्शनास येणें. जाणिजे. किमपी लक्ष प्रकारें चित्तांत संदेह न मानितां मुडशिंगीचे मुक्कामीं दर्शनास येणें. जाणिजे. सुज्ञ असा.

---

[९६] श्री. १७२८.

राजश्री भगवंतराऊ अमात्य हुकुमतपन्हा यांसी:—

श्रीमंत मातुःश्री राजसबाईसाहेब उपरी सुहुर सन तिसा आश्विन मया अलफ. तुह्मीं विनंतीपत्र जिवाजी शिवदेऊ यासमागमें पाठविलें तें येऊन प्रविष्ट जालें. पत्रार्थ सविस्तर निवेदन जाला. धण्यांहीं इमान क्रियापुरस्कर राजश्री उपाध्ये व राजाजी वैद्य व शिवाजीपंत व राजश्री हिंमतबहाद्दर पाठविले. त्यावरून आपण हाजीर जालों. धण्यांहीं आश्वासन जतन करून उर्जित करावें. बहुमानें चालवावें. जिवाभ्य एकरूप निष्ठेनें सेवा करून. आपण लेकरें आहों. अन्याय असले, तथापि धणी मायबाप, क्षमा करावी. हेंही रूप धण्याचें आहे. दया करून चालवावें. ह्मणऊन तपसिलें तुह्मीं विनंति पत्रीं लिहिल्यावरून अक्षरशः विदित होऊन संतोष जाला. ऐशास, तुह्मीं

वंशपरंपरागत साहेबांचे धुरंधर सेवक. सर्वहितविषयीं क्षमा करून तुमचें चालवावें हेंच चिरंजीव राजश्रीस व साहेबांस अवश्यक आहे. अतःपर याविषयीं तुह्मीं आपल्या चित्तांत अणुमात्र संशय न धरितां आपलें समाधान असो देऊन याउपरी दर्शनाची त्वरा करणें. साहेबांचे आज्ञेवरून व राजश्री हिंमतबहादूर यांचे वचनें चिरंजीव राजश्री शिवरामपंतास आणविलें, उत्तम गोष्ट केली. चिरंजीव राजश्रीनेंही पत्रें व आज्ञा सांगोन पाठविणें ते त्यांणीं तुह्मांस सांगोन व लिहोन पाठविलीच आहे. त्या वचनास सर्वथा अन्यथा होणें नाहीं. साहेबांसही तुह्मांपेक्षां दुसरें अधिकोत्तर नाहीं. साभिमानयुक्त तुमचें गोमटें करून चालवावें, तुमच्या हातें महत्कार्य प्रयोजनें सिद्धीस नेऊन उत्तमपणाचेंच परिणाम करणें, हेंच अगत्य आहे. याविषयीं राजश्री उदाजी चव्हाण हिंमतबहादर यांसी आज्ञा केल्यावरून लिहितां कळेल. बहुत लिहिणें तरी तुह्मीं सुज्ञ असा.

विलसति लेखनावधि

---

[९७] श्री. २९ एप्रिल १७२८.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५४ कीलक नाम संवत्सरे वैशाख शुा द्वितीया इंदुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपती स्वामी यांणीं समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री भगवंतराव अमात्य हुकमत पन्हा यांसीं—

आज्ञा केली ऐसी जे :—तुह्मीं विनंतिपत्र पाठविलें तें प्रविष्ट जालें. व शेख महंमद या बरोबर कितेक सांगोन पाठविलें तें यांणीं सविस्तर सांगितलें. त्यावरून विदित जालें. त्याप्रमाणें सौभाग्यवती गोदूबाई व राजश्री धोंडो भास्कर, व नारो हणमंतराव, बाळाजी महादेव, याजवळ स्वामीनीं आज्ञा करून यांचा निशा केला आहे, त्याप्रमाणें हे तुह्मांस लिहितील. व सौभाग्यवती गोदूबाई आली आहे तेंही सांगतील. त्यावरून कळेल. तरी तुह्मीं कोण्हेविषयीं दुसरा विचार चित्तांत न

आणितां स्वामी संनिध येणें. अतःपर तुमच्या चित्तांत कांहीं संशय असेल, तर ज्यास तुह्मीं पाठवा ह्मणाल ते लेहून पाठविणें. स्वामी त्यास पाठवून देतील. बहुत लिहिणें तरी सुज्ञ असा.

मर्यादेयं विराजते.

---

[९८] श्री. ३१ मे १७२८

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५४ कीलकनाम संवत्सरे जेष्ट शु ॥ चतुर्थी भृगुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शंभुछत्रपति स्वामी याणीं समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजेश्री भगवंतराव अमात्य हुकमतपन्हा यासी आज्ञा केली ऐसी जेः—तुह्मी विनंतिपत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहालें. पूर्वे पद्धतीप्रमाणें सेवा घेऊन ऊर्जित केल्यास हाजीर आहों ह्मणून कितेक लिहिलें व राजश्री बाळाजी महादेव व नारो हणमंत यांणींही लिहून पाठविलें त्यावरून विदित झालें. ऐशास, तुह्मीं स्वामींचे परंपरागत सेवक आहां. तुमचें पूर्वपद्धती-पेक्षांही स्वामी विशेषाकारें ऊर्जित करून चालवितील. येविशीं तुह्मी समाधान असो देणें. सविस्तर उभयतां बरोबर अगोदर सांगोन पाठविलेंच आहे. हालीं राजश्री शिवाजी शंकर यांस पाठविले आहेत. आज्ञेप्रमाणें सांगतां कळेल व रा उदाजी चव्हाण हिंमतबहादर याजकडील शिवाजी शिवदेव यास ही पाठविलें आहे. याउपरी स्वामीचे दर्शनाचा प्रसंग सत्वर होऊन ये तें करणें. बहुत लिहिणें तरी सुज्ञ असा.

मर्यादेयं विराजते.

---

[९९] श्री. १७२८.

राजश्री पंतअमात्य हुकुमतपन्हा स्वामीचे सेवेसीं.

७ श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री द्वारकोजी यादव कृतानेक साष्टांग दंडवत विनंति उपरी येथील कुशल

जाणून स्वाम्योदये कुशललेखनपरामर्ष करीत असावें. यानंतर आपण वार्तिकासमवेत श्रीमंत सकलसौभाग्यादिसंपन्न मातुःश्री बयासाहेबास पाठविलें तें विदित करून अक्षरशः श्रवण केलें. आह्मांस पत्र पाठविलें, तेंही प्रविष्ट होऊन सविस्तर वर्तमान कळों आलें. पेशजी आपलीं पत्रें आलीं व हालींही तुमचीं पत्रें आलीं. कितेक विस्तारें लिहिलें. त्यांत मायेममतेचा अर्थ काय लिहिला न लिहिला हें तुमचें तुह्मांस दखल आहे. आह्मां सामान्य लोकास दरम्यान मध्यस्तीस घालावें आणि ऐसें स्वामीनीं लिहित जावें, यांस महत्वास भूषार्ह आहेसा अर्थ नाहीं. या राज्यांत थोरले महाराज राजश्री यांणीं आह्मां लोकांचीं घरें वाढविलीं. तीर्थरूप राजश्री निळोपंत आजे, राजश्री रामचंद्रपंत बाप, त्यामागें आह्मीं सेवा केली. काळ साह्य होता, तों धणी यांनीं वाढविलें. आजी ता। चालत आलें. तीन पिढ्या सेवा केली, त्याचें सार्थक जालें! ज्याणीं दिलें त्याणीं घेतलें, हा दंडक कोठेंही नव्हता! या राज्यांत पाहिला! विश्वासू कारकून पाठवावा तरी कोणीं पाय घेईनात. ऐसें कितेक पर्यायें लिहिलें. तरी तुह्मीं सरकारकून, परंपरागत या राज्यांतील सेवक, सर्वांनीं तुह्मां जवळून सिकोन जावें, असें असोन तुह्मीं धण्यासी माया ममता न दर्शवितां इतराच्या दुर्बुद्धी ऐकोन, धण्याचे पायाशीं अमर्यादा होऊन, लोकोत्तर इतकेंच पदरीं पडले! धण्यास कितेक शब्दारोप ठेऊन लिहिलें तरी धण्यासी तुह्मीं अथवा कोणीं शब्द ठेवावा ऐसें नाहीं. कोणें एकाचे चालविलें नाहीं. आबालवृद्धापर्यंत धण्यांनीं लोभ करून, अंतरें महदंतरें पडलीं तरी क्षमा करून, सर्वापराध पोटांत घालून चालविलें. लहानाचे थोर केलें. पुढें त्यांचीं महत्वें विशेष वाढवावीं हेंच चित्तीं सर्वात्मना आहे. तुह्मीं किल्ले पनाळा असतां धण्यास नाना प्रकारचे संकटांमध्यें प्रसंग प्राप्त केले. किंबहुना, अरिवर्ग असतील त्यांच्यानेंही ऐशीं अमानुष कर्मे होणार नाहींत. ऐसें असोन तुह्मीं आपले आचरणास चुकला नाहीं. तत्रापि इतकेंही धण्यानीं पोटांत घालावयासी कारण कीं, तुह्मीं परंपरागत सेवक, तुमचे वडिलांनीं

या राज्यांत श्रम साहस आपले जिवाभ्य करून, ऐशास पात्र जाले. त्यामागें तुमचें चालवावें, तुमचे हातून महत्कार्यें घ्यावीं, असें चित्तांत असता, ईा पासून निग्रही वल्गनायुक्त आचरणें होता राहिलीं नाहींत. तुमचे तीर्थरूप राजश्री रामचंद्र पंडित यांणीं थोरले महाराजासंन्निध कोणे रीतीनें वर्तणूक केली हे लोकांत कीर्ती प्रख्यात आहे. महाराज राजश्री या प्रांतीहून चंजीप्रांतें जाणें जाले तत्समई संपूर्ण राज्य व लोक लोकपाळ स्वामित्व राजश्री पंडितमाारनिले यांचे गळा घालोन खासा स्वामींनीं चंजी प्रांतें स्वारी केली. त्या मागें सकळ रिपुवर्ग यांचा उद्भव जाहला. तत्समई यवन उन्मत्त होते. त्यास इत्यादि अमर्यादकांस शासनें करून, त्यांचा संव्हार करून, दमसर्द केलें. राज्य शर्थीनें राखिलें. तदोत्तर महाराज राजश्रीचें आगमन चंजीहून या प्रांते जालें. तेव्हां पंडितमशारनिलें यांणीं बहुत विशेषाकारें नम्रता धरून जाते समई, राज्य व लोक लोकपाळ व गड किल्ले स्वाधीन केलें होतें, त्याप्रमाणें धण्याचे धण्यासंन्निध वोपून आपण विनीत प्रकारें होऊन, पुढें सेवकास आज्ञा कर्तव्य काय? ह्मणून पंडित माारनिले याणीं विनंती केली. हें किमर्थ कीं आपण ब्राह्मणलोक, परंपरागत सेवक, जीवित हें क्षणभंगुर आहे, ज्या धणियाचे कृपांजळें हें पद प्राप्त जालें, त्यासी निमकहराम न होता कल्याणाभिवृद्धि इच्छिस्यानें आपल्यास श्रेयस्कर, येणें करून धर्म, अर्थ, काम, मोक्ष, चतुर्विध पुरुषार्थ प्राप्त होतात. मागें पुढें कोणी दूषण ठेवीना. ऐसे अभ्यंतःकरणें विवेक वर्तत आले जे, हे श्रीचे वरदीराज्य, यासी दिल्लीश्वरादि कोणी स्वधर्मकर्तव्यतेस प्रवर्तले त्यांचा गर्व हत होऊन पराभव पावते जाले. याकरितां धण्यासी मर्यादेनें असावें. ऐसे चित्तांत आणून तुमचे वडील चालत आले. तुह्मांसही पंडितमाानिले याणीं सकळकळाविद्यासंपन्न केलेच होतें. प्रस्तुत त्यामागें आपण प्रतिदिनीं पुराणश्रवण देवब्राह्मणाचे ठायीं भक्ति धरिली. धर्मशास्त्र इत्यादि सर्वही. नीत तुह्मांस करतळामळ. तेव्हां सर्व अर्थ तुह्मांस नकळेसा काय? असें असोन, कोणेक गोष्टीचा युक्त विचार नाहीं. सितोळे घोरपडे यांचा कजिया लागोन कलह वाढला,

आणि निरपराधें आह्मावरी जुलूम होऊन सर्वस्वें अपहार केला, ह्मणून लिहिलें. तरी घोरपडियाचें अथवा तुमचें तरी धण्यांनीं काय वाईट केलें होतें? सोबतीच्या लघु मनुष्यांच्या बुद्धीस लागोन नसती कल्पना वाढवून धण्याचा मनसबा नामोहरम केला. स्वामिद्रोह मात्र पदरीं घेतला! तुमचे वडील पंडितमाारनिले कोणे रीतीनें वर्तले, त्यांचे वर्तणुकीचे निदर्शन तुह्मीं स्वल्पकाळेंच दाखविलें. राणोजी घोरपडियाची व आपाजी सितोळयाची स्पर्धा वाढली, ह्मणोन लिहिलें. तरी तें जालें तरी मराठे माणूस, तुह्मीं सरकारकून, तुमचे वक्रानें त्याणीं वर्तावें, कोणीं बदराह वर्ततील तरी तुह्मां लोकांनीं बुद्धिवाद सांगावा जे, धण्यासी हे अमर्यादा कार्याची नव्हे, परिणाम लागणार नाहीं. असें सांगावें. ऐसें तुह्मां लोकांच्या नीति असोन, हे एकीकडे ठेऊन, ते आपण एक होऊन, धन्यासी बळी बांधिली. वल्गनाही मनःपूत केल्या. प्रांतांत उपद्राप केला. हाच मुलूक मारिला. रयत देशांतरास उठोन गेली. जवळचे चार हुजरे होते त्यांचे गांवखेडियांचे निसंतान केलें. धण्यासी केवळ प्रतिमल्लतेचाच प्रसंग जाहल्यावरी वरकडांनीं चित्तांत आणावेसें काय? तथापि सेवक जवळचे ह्मणजे लेंकरें, यांस क्लेश जाहल्यावरी धण्यास ये गोष्टीचें वैषम्य न वाटेसें काय? तत्रापि धण्यांनीं इतकेंही किमपी चित्तांत न आणितां मागती तुह्मांवरी दया करावी, इतके दिवस वर्तणूक जाली ती क्षमा करावी, या अर्थे एकवेळ रामजी संकपाळ पाठविले. त्या बोलीचा परिणाम काय लाविला? त्याउपरी सोनजी तांबट पाठविले. तेव्हांही तुमचें चित्त सपक जालें नव्हतें. तदुत्तर चिकोडीचे मोकामीं असतां तुह्मांस संकट कोणेंप्रकारचें प्राप्त जालें होतें अथवा नव्हतें, हें तुमचे तुह्मीं चित्तांत विचारून पाहणें. ऐसा तुमचा संकटाचा प्रसंग धण्यानीं पाहून, तुमचे अमर्यादेचा प्रसंग किमपी न आणितां, कृपाळू होऊन, राजश्री बहिरो व्यंकाजी व रघोजी जाधव या उभयतांस तुह्मांकडे पाठवून, हुजूर आणावें या अर्थे उभयतागाारनिलेस तुह्मांकडेस पाठविले. त्यांणीं तुह्मांस घेऊन आले, ते परस्परें बावड्यास गेला. ते समयीं धण्यासन्निध येता तरी तुह्मांस हें श्लाघ्यच होतें; परंतु हा विचार न

पाहतां बावड्यास राहिला. तेथेंही मागती तुह्मांकडील कोणी भला माणूस आणवून बोलीचाली करावी याकरितां तुह्मीं राम ठाकूर व भगवंतराव पिंगळे ऐसे उभयतास येथें बोलाचालीस पाठविले. बोलीचाली लागली असतां तुह्मीं परमारें साळवणावरी स्वारी करून दंगा केला. बोलीस भला माणूस पाठवून ऐसे दंगे करिता, कोठे ऐकिलें आहे कीं काय? किंबहुना हेंही तुह्मांपासून घडलें, तेव्हां धणियांनीं क्षमा कोठपर्यंत करीत यावें? ये गोष्टीचा विचार स्वहिताहित ज्याचा त्याणें चित्तांत आणावा तरीच बरें. सांगितले गोष्टीचा परिणाम लागणें नाहीं. प्रस्तुत तुह्मीं पत्रें दिवाणांत लिहिलीं, त्यांत निर्भत्सना करून लिहिलें. यांत तुह्मां लोकांस भूषण कोणतें? पद्दें कागदींपत्रीं लिहावीं, हे सामान्याची कमई! तुह्मांस योग्य नव्हे. जीं पत्रें येतात त्यांत किमपि तुमचे निष्ठार्थ नाहीं. जे लिहिणें तें विडंबर लिहितां. यावरून तुह्मांविशीं धण्यास अर्ज करणारानें कसा काय करावा! धण्यास तरी कृपा कशी उपजेल? या राज्यांत विवेक, विचार, शहाणे लोक, सभ्य, चतुर, विद्यावंत नाहींत, राजश्री शाहूराजे यांचे राज्यांत सरकारकून लक्षाचे लक्ष जिल्हे मामले खाऊन सुखरूप आहेत, ह्मणून लिहिलें. तरी तिकडील सरकारकुनानें अथवा सरदारानें धण्यासी अमर्यादा केलीसी नाहीं. धण्यासी निष्ठेनें वर्तोन, आपलें नंगानें राहोन, कीर्ति संपादून घेतल्या. यद्यपि कोणी अमर्यादी वर्तणूकेस प्रवर्तले तरी तत्क्षणीं त्यास शिक्षा होईल, या भयेंकरून जे जे आहेत ते बहुत मर्यादेनें असतात. धणीही त्यांचे निष्ठेप्रमाणें भूषणें वाढवितात. जिल्हे मामले देतात. त्याजला स्वामिसेवेवितरिक्त दुसरे नाहीं. सुखरूप दौलता खाऊन आहेत. त्यांची साक्षी उपसाक्षी देऊन तुह्मीं लिहिलियानें साम्यतेस येणार नाहीं. तुह्मांसही धण्यानीं सरंजाम दिलाच आहे. त्यामध्यें तुह्मीं आपले पदाप्रमाणें वर्तोन, धण्याची सेवा करून, कृपा संपादून घ्यावी. तुह्मांवरीं धण्यांनीं दया करावी असेंच उभयपक्षीं उचित आहे. असा प्रसंग असता तुमचे इस्तकबिलीपासून एकही सुप्रयुक्त वर्तणूक नाहीं. धण्यासच आरोप ठेवून लिहिता, यामध्यें तुह्मास कोणतें

उचित असे? आह्मां सारिख्यांनीं लिहिलें तरी तुह्मांस विषादावह वाटेल; परंतु तुह्मांजवळने कारकून भले माणूस आहेत. त्यासच ये गोष्टीचा पर्याय विचारणें. तेच तुह्मांस काय ह्मणतील, हे गोष्टीचा प्रत्यय पाहणें. हा आपले जागीं विचार न पाहतां, ज्या मर्जी मरिता त्या मर्जी मरोन कागदपत्र लिहिता, यांत स्वार्थ कोणता? घोरपडे, सितोळे यांजेच मर्जी मरोन अव्यवस्थित वर्तणूक करून तप्त केलें. असें असतां तुह्मीं लिहिलें जे, आपले आज्याचे लग्नास लक्ष दोन लक्ष रुपये खर्च करून लग्नें केलीं, सरकारकुन्या दिल्या, ऐसें तीन पिढ्या चाललें, आणि आपल्यावरीच निकर्ष धण्याचा! ह्मणोन लिहिलें. तरी स्वामिद्रोहपणाची वर्तणूक. तुमच्या त्रिपूर्वजांत ऐसें कोणांपासून तरी कर्म अवलंबिलें होतें काय? धण्यानीं लक्ष दोन लक्ष रुपये लाऊन लग्नें केलीं, पदें दिल्हीं, याणीं सेवा केली, त्याचें सार्थक निदर्शनास आणिलें. ते वडिल चालत आले त्यांच्या वर्तणुकीप्रमाणें तुह्मीं वर्तावें, राज्याचा बंदोबस्त करावा, लोकांत कीर्त संपादावी, हें तुमच्या वांट्यास न येता, मनस्वी लोकांच्या बुद्धी ऐकोन त्याचें निदर्शन जे खवारी जाली, दुराचरणाचें निदर्शन तुह्मास आलें. याउपरी तरी तुह्मीं सर्व अर्थ चित्तांत आणून, एकाग्र चित्तें धण्याचे पायाशीं लक्ष लावून, धण्याची कृपा संपादून घ्यावी. आपण आह्मांस लिहिलेसारखें यश आह्मास द्यावें. असें मनःपूर्वक आपलें चित्तीं बेकिलाफानें संदेह न धरितां चित्तीं असेल तरी त्याप्रमाणें जो विचार कर्तव्य उपयुक्त असेल तें करावें. सारांश, सुमतीस दुर्मतीस तफावत फार आहे! सुबुद्धिदुर्बुद्धीचीं फळें नारदमुनीस व मार्कंडेयासी प्रत्यय आला, हें कथापुराणान्तराश्रयें आपण ऐकिलींच असेल. आपलीं पदें महत्वें भारी आहेत. याकरितां दुसरियाच्या सांगितल्या बुद्धीवरी जाऊं नये, यांत श्रेयस्कर आहे. आपल्यास हें पत्र विस्तारें लिहिलें आहे. जें उपयुक्त असेल तें चित्तांत आणावें. एक भला माणूस येथें निःसंशयरूपें पाठवून धण्याशीं सख्य करून घ्यावें, यांत उत्तम आहे. तरी आपण अगत्यरूपें भला माणूस पाठवून गोष्टीचा विचार करावा. येविशीं विलंबावरी न घालतां गुप्तरूपें सत्वर पाठवावा. विदित जालें पाहिजे. हे विनंति.

[१००] श्री. ६ मे १७२८.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५४ कीलक नाम संवत्सरे वैशाख. शुद्ध अष्टमी इंदुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभूछत्रपति स्वामी यांणीं राजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री भगवंतराव अमात्य हुकुमतपन्हा यांसी आज्ञा केली ऐसी जेः —

तुह्मांस दोन पत्रें स्वामीनीं यावयाविषयीं पाठविलीं. तुमचेविषयीं स्वामीचे चित्तीं कांहीं संशय असेल तर श्रीची शपथ असे, तुह्मासही श्रीची शपथ असे, ह्मणोन लिहिलें व सांगोन पाठविलें. परंतु तुह्मीं चित्तांतील संदेह दूर केला नाहीं. तरी स्वामिसंनिध यावयास अनमान केला हें तुह्मांस उचित नव्हे. स्वामीस तुह्मांपेक्षां दुसरा अर्थ कांहीं विशेष आहे, ऐसे नाहीं. तुह्मीं मात्र निष्ठुरता धरीत आहे. हें स्वामी हृद्गत तुह्मांस कळावें, व तुमचेही स्वामीस विदित व्हावें, या करितां हालीं राजश्री लक्ष्मणराव शामजी व अंताजी बल्लाळ यांसी आज्ञा करून पाठविले आहेत. हे स्वामीचे आज्ञेप्रमाणें तुह्मांस सांगतील, तें चित्तांत आणून याउपर कोणेविषयीं संदेह न धरणें आणि आपलें हृद्गत सांगोन पाठविणें. तुमचें ठायीं ज्याचा विश्वास असेल, त्यांस सांगोन पाठविणें. स्वामी त्यांस तुह्मांकडे पाठवितील. समाधान असो देणें. बहुत लिहिणें तरी सुज्ञ असा.

मर्यादेयं विराजते.

---

[१०१] श्रीशिवायनमः १३ आगस्ट १७२८.

यादीदास्त राजश्री भगवंतराऊ अमात्य याणीं मुकसुद लेहून पाठविलें त्याचें उत्तर सुा तिसा अशरीन मया अलफ:—

पूर्वापार अकृत्रिम रुणानुबंध, चालत आला आहे. त्यापेक्षां अधिकोत्तर ममता करून सर्व	कोकणप्रांतें वतन व इनाम व मुकासे गांव आहेत. त्यास कांहीं उपसर्ग लागो न द्यावा ह्मणोन

प्रकारें परामृश करावा ह्मणोन लिहिलें. तरी यापेक्षां विशेष काय आहे? सर्व प्रकारें परामृशास अंतर होणार नाहीं. शपथ असे.

किल्ले गगनगडचे व खासगत गांवींची हबसीपट्टी माफ करावी ह्मणोन लिहिलें. तरी तें बाब हबशाची आहे. आह्मास रुपये भरून द्यावे लागतात. यास्तव हबशीपट्टी दूर होत नाहीं.

मोजे उपळें व मौजे तारळें हे दोन गांव हिरसांवत याजकडेस मुकासा चालवावयासी लिहिले, तरी हरदूगांव जंजिरे विजयदुर्गेचे तनखे-यांचे आहेत. याकारिता त्याज-कडे चालणार नाहींत.

सांवतास तुह्मीं आह्मीं मिळोन नतिज्या द्यावा, मुलुख सुटेल तो निमा तुमचा व निमा आमचा, ह्मणोन लिहिलें. तरी सांवतास नतिज्या द्यावयाविशीं समर्थक अर्थ कळलियावरी विचार होणें तो होईल.

तो सोमाळे येथील देशमुखी सुरळीत चालवावयाविशीं लिहिलें. तरी येविशीं प्रस्तुत लिहावें ऐसें काय आहे? याचा निवाडा होणें लिहिलें. तरी त्या प्रांतींचें कार्य-पुरुषास आज्ञा करून पत्रें सादर केलीं आहेत. उपद्रव लागणार नाहीं.

रत्नागिरीच्यासी बाडा व लोक सोडून द्यावयासी लिहिले. तरी केल्या नेमाप्रमाणें वर्तावें, गैररहा वर्तणूक न करावी, ये विशींचा अर्थ पूर्वीं तुह्मांस लिहिला होता. हे गोष्टीस मध्यस्थ जाहल्यास लोक व सिबाडीस निरोप होईल. प्रस्तुत तें स्थळ तुमच्या हुकुमा-खेरीज जाहलें आहे हे मोष्टीचा निश्चय करून लिहून पाठविल्या-नंतर लोकांची मुक्तता होईल. रत्नागिरी आपले हातीं खातरी करून देऊं.

श्रीच्या उत्साहास वार्षिक-प्रमाणें अनुकुलतेविशीं लिहिलें. तरी समयीं अनुकूल व्हावयास अंतर होणार नाहीं.

आह्मांकडील कारकून व आश्रित यांचीं घरें कोकणांत आहेत. ते याजला द्यावयाविशीं लिहिलें. तरी तुमचे आश्रित व कारकून कोणे गावीं नाहीं ऐसें नसे. जे आहेत ते कारकून आश्रित तुम-

तो पूर्वीच होऊन गेला असे. | चेच आहेत. ऐसियास आगत्यागत्य मनास आणून ज्यास द्याव-याचें त्यास देऊं.

याप्रमाणें लिहिलें, याचें उत्तर लिहिलें आहे. छ १८ मोहरम.

मोर्तब सूद.

---

[१०२] श्री. १९ नोव्हेंबर १७२८.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५५ कीलकनाम संवत्सरे कार्तिक बहुल दशमी भृगुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शंभूछत्रपति स्वामी यांणीं समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री भगवंतराव अमात्य हुकुमतपन्हा यांसीं—

आज्ञा केली ऐसी जेः— तुह्मीं विनंतिपत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. कितेक निष्ठापूर्वक व श्लोकयुक्त लिहिलें. व राजश्री नरसो तिमाजी व राजश्री रघुराव व तुकोजी खांड्या या समागमें सांगोन पाठविलें. तेणेंप्रमाणें यांणीं निवेदन केल्यावरून विदित जाहलें. ऐशास स्वाभिमानपूर्वक स्वामीस तुमचें अगत्य आहे. त्याप्रमाणें तुमचें चालवायास स्वामी अंतराय करणार नाहींत. हा अर्थ वारंवार लिहावा असें नाहीं. हालीं तुह्मांकडून उभयता आले, याजवळ सांगितलें आहे. सांगतां कळेल. सर्वप्रकारें समाधान असों देणें. व राजश्री शिवराम रामचंद्र यांचा उजूर स्वामीचे दर्शनास धरिला. तरी स्वामीचें दर्शन त्वरित तुह्मांस व्हावें, हें स्वामीस बहुत अगत्य. या कारितां सत्वर स्वामीचें दर्शन तुह्मांस होय तें करणें. व राजश्री श्रीनिवास शिवदेव यांकडील गांवचीं पत्रें द्यावीं, ह्मणून तुह्मीं लिहिलें. त्यावरून मशारनिल्हेकडील गांवांस ताकीदपत्रें दिलीं आहेत. बहुत लिहिणें तरी सुज्ञ असा.

मर्यादेयं
विराजते.

---

[१०३] श्री. १७२९.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५९ कीलक नाम संवत्सरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शाहूछत्रपति स्वामी यांणीं राजश्री भगवंतराऊ रामचंद्र व मोरेश्वर रामचंद्र व शिवराम रामचंद्र अधिकारी ता। सोनवळें प्रांत भिवंडी यांसी आज्ञा केली ऐसी जे :—

तुह्मीं हुजूर सातारियाचे मुकामीं येऊन विनंती केली कीं, ता। सोनवळें प्रांत मजकूर येथील अदकारपणाचें वतन कदीम आहे. परंतु मुरार मानजी गोवज यांच्या वडिलीं आमच्या वडलाचा मारा मौजे भादाणे ता। मजकूर येथें केला. आणि जबरदस्तीनें वतन खात होता. तेव्हां आपले तीर्थरूप राजश्री रामचंद्र निलकंठ यांणीं पत्रें लेहोन गोविंद रंगनाथ मुताळीक कल्याणास अजम जेनुद अल्लीखान व काकाजी नाईक दिवाण यांजकडे पाठविला. त्याणें तेथें जाऊन पत्रें देऊन हकीकत श्रुत केली. त्यावरून हकिमांनीं कल्याण भिवडीचे जमीदार आणवून गोतमुखें उभयताचा निवाडा करविला. जुन्या हकीकती गोतानें मनांस आणून गोतमुखें मुरार मानजी खोटा जाला. ता। मजकूरच्या वतनास लागत नाहीं, ऐसें खरें जालें. तेव्हां हें वर्तमान लेहोन तेथून अवरंगाबादेस गेले. तेथें दाउदखान वंनी, किलिजखान, व ह्यानदखान दिवाण यांणीं मनास आणून परवाने करून दिधले. ते परवाने दिल्लीस पाठविले. तेथें बाहादूरशाहा पातशहाजीस जुल्पुकारीखा दिवाण यांणीं श्रुत करून पातशाही फरमान करून दिधला. तो व परवाने मनास आणून आपलें वतन आपले दुमाले करून चालवावयाची आज्ञा केली पाहिजे, ह्मणोन विदित केलें. त्याप्रमाणें मनास आणून तुह्मांवरी स्वामी कृपाळू होऊन ता। मजकूरचें अदकारपणाचें वतन तुमचे दुमाले करून हें वतनपत्र दिलें असे. तरी तुह्मीं या वतनाची सेवा करून पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें वतन अनभवून सुखरूप राहणें. या वतनास हक लाजिमा व इनाम इसाफत गाव सुदामत चालत आले आहेत वगैरे तपसील.

इनायतीचे गाव कदीम दस्ताप्रा
१ मौजे भादाणें
१ मौजे कुळासे

——

२

इनाम गावगन्नाचे व बांधणें कदीम चालत आलें आहे त्याप्रमाणें चालवणें कलम १ व इसाफती वतनी वाडे व झाडझाडोरा व रावते महार सुदामत प्रमाणें १

ताा मजकूरचे देखील कसबे देहे ८४ येथील हक्क लाजिमा सुदामत प्रमाणें कलम १ बंदर व रहदारी दर गोणीस हक्क पक्के पैसे.

ताा मजकुरीं पेठ व बाजार आहेत, तेथे शेव व घार व दसकी सुदामत प्रमाणें कलम १

येणें प्रमाणें हक्क लाजिमा करार केला असे. तो घेऊन वतनाची सेवा करून सुखरूप राहणें. जाणिजे.

---

[१०४] श्री. तारीख ८ डिसेंबर १७२८.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५५ किलक संवत्सर मार्गशीर्ष बहुल तृतीया रविवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शाहूछत्रपति स्वामी यांणीं चौधरी व देशकुलर्णी व शेटे माहाजन व पाटील व खोत ताा सोनवळें प्रांा भिवंडी यांसी आज्ञा केली ऐसी जेः— राजश्री भगवंतराऊ रामचंद्र व मोरेश्वर रामचंद्र व शिवराम रामचंद्र यांनीं सातारियाचे मुक्कामीं हुजूर येऊन स्वामीसंनिध विनंति केली कीं, ताा मारीचे अदकारपणाचें वतन कदीम आपलें आहे, व या वतनास हक्क व लाजिमा व इसापती गांव पेशजी चालत आले आहेत, त्याप्रों चालावयासी आज्ञा केली पाहिजे ह्मणून. त्यावरून हें आज्ञापत्र सादर केलें आहे. तरी तुह्मीं ताा मारीचे अदकारपणाचें वतन यांचें यास चालवणें व हक्कलाजिमा व इसापतीचे गांव इनाम शेतें बांधाणें सुदामत चालत आलें आहे त्याप्रमाणें यांस व यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें चालवणें. या पत्राची प्रती लेहोन घेऊन अस्सल पत्र भोगवटियास परतोन देणें. जाणिजे.

---

[१०९] श्री. १८ डिसेंबर १७२८.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५५ कीलकनाम संवत्सरे मार्गशीर्ष बहुल चतुर्दशी सौम्यवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शंभूछत्रपति स्वामी यांणीं समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री भगवंतराव अमात्य हुकुमतपन्हा यांसीं आज्ञा केली ऐसी जेः— तुह्मीं बावडियाहून उत्तरेकडेस स्वार होऊन गेला. तेव्हां स्वामीस विनंतिपत्र पाठविलें कीं, चिरंजीव राजश्री आप्पाजीराव स्वामिसन्निध आहेत, साहेबीं हुद्दा मामला सांगोन उर्जित करावें, वडिलीं या राज्यांत सेवा चाकरी केली आहे. ऐसे कितेक विशदें लिहिलें. ऐशास, तुह्मीं परपक्ष अवलंब करून गेला. आपाजीराव स्वामीसंनिध राहिले. याकरितां मजमूचा हुद्दा व जिल्हा मामला पूर्ववत्प्रमाणें त्यास सांगोन जंजिरे रत्नागिरीस रवाना केलें. जंजिऱ्याचा नातवानीचा प्रसंग. त्यामध्यें राजश्री कान्होजी आंगरे सरखेल यांचा शह. लोकांस भक्षावयास नाहीं. तेव्हां स्वामीनीं यांसी जिल्हे, मामले, गांव, खेडीं यांचा ऐवज बेगमी करून यांणीं कर्जवाम करून ऐवज दिला. स्थळ रक्षण केलें. ऐसें असतां तुह्मीं रासिवडे, सांगरुळचा मोबदला ह्मणून पोंबुर्लेवर रोखा करून दीडशें रुपये घेतले. याकरितां त्यांणीं चिदरत्रिंबकावरी मोबद-लियाचा रोखा केला. मात्र निमित्य ठेवून तुह्मीं मोऱ्हस केली व नंदगांव व नाडगौडी ता। तारळें येथें रोखे केले, कीं मौजे मजकूरचा ऐवज दुसरियाकडे एकंदर वसूल न देणें, ह्मणून वरातदारास सांगोन धुंभ केली. यामुळें गांव परांगदा जाहले. ऐशास, स्वामीचे आज्ञेप्रमाणें यांणीं खेडियांचा वसूल थोडाबहुत घेतला असतां तुह्मी येविषयींचा कथळा करार करावा ऐसें नाहीं. आपाजीराव यांसी स्वामींनीं लिहिलें आहे. याउपरी तुमचे खेडियांवरी रोखे करणार नाहीं. व तुह्मी यांच्या खेडियांवरी व नाडगौडीवर केले ते मना करणें. आपाजीरायाकडील खासगत गांवपैकीं जो ऐवज घेतला असेल तो परतोन देणें. या कामास नारोराव हरकारे पाठविले आहेत. बहुत लिहिणें तर तुह्मी सुज्ञ असा.

मर्यादेयं
विराजते.

[१०६] श्री. २ जानेवारी १७२९.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५५ कीलक नाम संवत्सरे पौष शुा चतुर्दशी गुरुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभुछत्रपति स्वामी यांणी समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री भगवंतराऊ अमात्य हुकुमतपन्हा यांसी आज्ञा केली ऐसी जे:—

तुह्मीं विनंतीपत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. व राजश्री नारो हणमंत व बाळाजी महादेव यांसमागमें सांगोन पाठविलें तेणेप्रमाणें यांणीं सांगितल्यावरून कळों आलें. ऐशास, स्वामीचे तुमचे दर्शनास बहुत दिवस जाहले, यानिमित्य त्वरेनें तुह्मीं येऊन दर्शन घ्यावें, हें स्वामीस अगत्य. त्यास, राजश्री शिवराम रामचंद्र याकडील गुंता सांगोन पाठविला तरी त्याकडील उजूर धरावा लागला आहे, हे गोष्ट उचितच आहे. त्यास, तेविशींही बहुतसा साक्षेप करून याउपरी स्वामीचे तुमचे दर्शनास दिवसगत न लागे तें करणें. रत्नागिरीकडील प्रसंग लिहिला. तरी जें होणें तें राजश्री गोपाळ रामराव यांचे अमर्यादेमुळेंच जालें. व धनसंपदा लटिकी, सर्व अर्थ दो दिवसाचे आहेत, ह्मणून कितेक परमार्थ युक्तीनें लिहिलें. तरी जें तुह्मीं लिहिलें तें उचितच. परंतु हे मार्ग हे तुह्मां लोकांस बोलिले आहेतसें नाहीं. अजरामरवत्प्राज्ञो विद्यामर्थं च साधयेत्, ऐसें आहे. स्वामिकार्यनिष्ठा चतुर्विध अर्थ घडतच आहेत. तुह्मांस कांहीं न कळेसें नाहीं. वरकड त्रिवर्ग लिहितां कळेल. व मल्हारजी सूर्यवंशी यासमागमें तुह्मीं सांगोन पाठविलें तेणें विदित केलें. हालीं यांजवळ आज्ञा जाली आहे. सांगेल. बहुत लिहिणें तरी सुज्ञ असा.

मर्यादेयं.
विराजिते.

---

[१०७] श्री. १७ फेब्रूवारी. १७२९.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५५ कीलकनाम संवत्सरे फाल्गुन शुद्ध प्रतिपदा इंदुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शंभुछत्रपति स्वामी

याणीं समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री भगवंतराव अमात्य हुकुमतपन्हा यांसी आज्ञा केली ऐसी जे:—

तुह्मीं विनंतीपत्र पाठविलें तें प्रविष्ट जालें. पूर्वीं राजश्री रामचंद्र पंडित यांवरी धण्यांनीं दया केली. त्याणींही निष्ठेनें राज्यांत सेवा केली. आपणही स्वामीचे सेवेसी अंतर केलें नाहीं. याकारितां स्वामींनीं आपला अभिमान असेल तरी चालवावें. घरफुट झाली आहे. राजश्री आपाजी-राव याणीं आपल्या बारगीरवस्ता रत्नागिरीस होत्या त्या आटोपिल्या आहेत. त्या त्यास आज्ञा करून देववाव्या. ह्मणून कितेक आद्यंत विस्तारेकरून लिहिलें तें अक्षरशः विदित जालें. ऐशास, तुह्मीं जें लिहिलें तें अवघें यथार्थच लिहिलें. त्यांत कांहीं अन्यथा आहे ऐसें नाहीं. तुमचे वडिलीं सेवा केली त्याप्रमाणें तुह्मींही सेवा करावी. स्वामींनीं तुह्मांवरी कृपा करून चालवावें. तुमचें जगनामोश तुमचें वडिलाप्रमाणें व्हावें, हेंच स्वामीस अगत्य. त्याप्रमाणें स्वामींनीं तुमचें चालवायास अंतर केलें ऐसें नाहीं. आणि पुढेंही स्वामीस तुमचें चाल-वावें ये गोष्टीचा अभिमान अगत्य आहे. ऐसें असोन तुह्मीं इतकें पाल्हाळयुक्त ल्याहावेंसें काय आहे? घरफुटीचा प्रसंग तर हा विचार तुमचे घरचा आहे. यास स्वामींनीं काय करावें. वरकड तुमचे हुद्दा मामला बहुमान यास स्वामीकडून अंतर जालें नाहीं, पुढेंही होणार नाहीं. येविशीं समाधान असो देणें. मल्हारजी सूर्यवंशी याजवळ आज्ञा केली आहे. सांगतां कळेल. बहुत लिहितों तरी तुह्मीं सुज्ञ असा.

मर्यादेयं
विराजते.

---

[१०८] श्री. २७ फेब्रुवारी १७२९.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५५ कीलक नाम संवत्सरे फाल्गुन शुद्ध दशमी गुरुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शंभुछत्रपति स्वामी याणीं समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री भगवंत-राऊ अमात्य हुकमतपन्हा यांसी आज्ञा केली ऐसी जे:—

तुह्मीं विनंतिपत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. राजश्री मोरेश्वरराव यांणीं मागती खटला आरंभिला. वस्तमाव ओळखिली आहे, ते देत नाहीं. स्वामीनीं न्यायतः त्यांस आज्ञा करावी. अंगानिराळे टाकिलें, ऐसें सत्य असलिया आपण पाहून घेऊं, ह्मणून कितेक तपसील लिहिलें तें विदित जाहलें. ऐशास, तुमचे घरगुती प्रसंग घरचेघरीं त्यांणीं तुह्मी समजावें. स्वामीकडे या गोष्टीचा कांहीं गुंता आहे, ऐसें नाहीं. ह्मणून पाहिलेंच तुह्मांस लिहिलें. तथापि तेंच तें तुह्मी लिहितां. स्वामीनीं अंगानिराळें टाकिलेंसें सत्य असलिया पाहून घेऊं ह्मणून लिहिलें. तरी मोरेश्वररायाचें अगत्य धरून तुमचा प्रसंग अंगानिराळा टाकिला, ऐसें तो कांहीं जालें नाहीं. न्यायतः सांगावें, त्यास, तुह्मी उभयतांहि सन्निध नाहीं. सन्निध आल्यानंतर न्यायताही सांगणें तसें सांगितलें जाईल. गांजिलें पत्रें, नवाजिलें मरें! साहेबीं पायीं लोटूं नये ह्मणून कितेक लिहिलें. तरी ऐसें लिहावेंसें काय जालें आहे? सर्व प्रकारें तुमचें चालवावयास स्वामीपासून अंतराय कांहीं होत नाहीं. यलकेचीसाल व बाघ्याच्या शेंगा व काठ्या पाठविल्याप्रमाणें प्रविष्ट जाहल्या. वरकड मल्हारजी सांगतां कळेल. बहुत लिहिणें तरी सुज्ञ असा.

मर्यादेयं
विराजते.

---

[१०९] श्री. ३ एप्रिल १७२९.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५५ सौम्य नाम संवत्सरे चैत्र बहुल प्रतिपदा गुरुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शंभुछत्रपति स्वामी याणीं समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री भगवंतराऊ अमात्य हुकुमतपन्हा यांसी आज्ञा केली ऐसी जे:—

तुह्मीं विनंतिपत्र तुकोजी खाडे व मल्हारजी सूर्यवंशी यां समागमें पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. आपण स्वामीचे हुकुमबारदार सेवक,

स्वामीचे आज्ञेपेक्षां विशेष आपणांस कांहीं नाहीं, धनसंपदा सर्व स्वामींचे आहे, आपण साहेबांचीं लाविलीं झाडें आहों, आपला अभिमान स्वामीस आहे, उतपेगातपे चाकर नव्हों, ह्मणून कितेक तपसिलें निष्ठापूर्वक लिहिलें तें सविस्तर विदित जालें. व तुह्मांकडील हरदू जणांनींही केलें. ऐशास तुह्मीं जें लिहिलें तें यथार्थ आहे. तुह्मांस स्वामीचे आज्ञेपेक्षां कांहीं विशेष आहे किंवा तुह्मांजवळ जे धनसंपदा आहे ते स्वामीची, एतद्‍र्थी कांहीं अन्यथा आहे ऐसें नाहीं. जो स्वामीचा मनोदय तेंच तुह्मांस परमावश्यक आहे. तेथें उतपेगातपेपणाची संभूति ही तुह्मांकडे येणें नाहीं. स्वामींचीं लाविलीं झाडें ह्मणविता तद्वतच स्वामींस पूर्ण तुमचा अभिमान आहे. त्याप्रमाणें तुमचें साभिमानपणें चालवायास स्वामी अंतराय कदापि होऊं देणार नाहींत. येविशीं हल्लीं जोत्याजी दळवी वा। मुल तुह्मांकडील एकजण यासमागमें बेलरोटी पाठविली आहे. येविशीं विशदेंकरून ल्याहावें तरी मनोमन साक्ष आहे. तत्रापि दर्शनानंतरही कळेल. हालीं पाठविले आहेत हे आज्ञेप्रमाणें जबानी सांगतां कळेल व गांवांविशीं लिहिलें तरी राजश्री नारो हणमंत तुह्मांकडे गेले आहेत. त्यास त्या गांवचा प्रसंग ठाउका आहे. तथापि ते हुजूर आल्यावरी त्याजवळ आज्ञा केली जाईल. वरकड कोणेविशीं संदेह धरावासें नाहीं. जें जें स्वामी बोलिले आहेत त्यास सर्वात्मना तफावत होणार नाहीं. येविशीं राजश्री नानाजी वैद्य व राजश्री केशव त्र्यंबक लिहितां कळेल. जाणिजे. मुज्ञ असा.

---

[११०] श्री. ६ एप्रिल १७२९.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५९ सौम्यनाम संवत्सरे चैत्र बहुल चतुर्थी रविवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभुछत्रपति स्वामी याणीं समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री भगवंतराऊ अमात्य हुकुमतपन्हा यासी आज्ञा केली ऐसी जे:—

तुह्मीं हालीं विनंतिपत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लिहिलें वृत्त विदित जालें. ऐशास रत्नागिरीबाबत हत्ती आपण स्वामीस नजर करून

रत्नागिरीचा प्रसंग आपले स्वाधीन जाल्यावरी आधीं हे गोष्ट कर्तव्य, आपण कांहीं आपाजीराव नव्हों, ह्मणून तुह्मीं कितेक नारोराम हरकारा व मल्हारजी सूर्यवंशी यांसमागमें सांगोन पाठविलेंत, त्यावरून यदर्थी अपूर्व कार्य आहे कीं, तुह्मीं सेवक असेच आहा! वडीलवडिलापासून स्वामिकार्यप्रसंगें धण्यास संतोषी करून आपली नामना संपादित आलेस, तेथें वरकड गोष्टींचें अगाध आहे ऐसें नाहीं. त्यास, तुह्मीं रत्नागिरीचा प्रसंग उत्तर लिहून हातीं घेऊन चावड्यास आलेस; हत्ती स्वामीस देणार, ऐसें वर्तमान परस्पर व तुह्मांकडील येथें आले गेले त्यांनींही सांगितलें. तेव्हां तुह्मींही बोलिले होतेस तदनुरूपच हे चर्चा आहे, ऐसें स्वामींनीं मनांत आणून जोत्याजी दळवी यासमागमें हत्ती पाठवून द्यावयाविशीं लिहिलें. त्यावरी तुह्मीं जोत्याजी दळवी व सूर्याजी खाडे व मल्हारजी सूर्यवंशी यांसमागमें सांगोन पाठविलें कीं, हत्ती नजर करीतच आहों, त्यास गोपाळराव यांचे समजाविसीस स्वामींनीं एक हत्ती द्यावा व आपला अभिमान धण्यास असावा, ये गोष्टीचें अभय शपथपूर्वक आपणास असावें. ह्मणून सांगून पाठविलेंत. त्यावरून स्वामींनीं तुह्मास बेलरोटी, पत्र पाठविलें. गोपाळरायास एक हत्ती द्यावयाची गोष्ट ती सामान्य केली. आणि तुह्मांकडील आले होते त्यांजवळ राजश्री नानाजी वैद्य व केशव त्र्यंबक यांचे विद्यमानें निश्चयपूर्वक होऊन जोत्याजी दळवी व तुकोजी व मल्हारजी यास तुह्मांकडे पाठवून दिले. प्रस्तुत तुह्मीं हुजूरचे पत्रीं लिहिलें कीं, नानाजी वैद्य व केशव त्र्यंबक यांस लिहिलें आहे ते विदित करितील. त्यावरून त्यास तुह्मीं काय लिहिलें ह्मणून मनास आणितां, जें तुह्मीं लिहिलें तें अव्यवस्थच लिहिलें! तरी हे चर्चा कांहीं स्वामींनीं केली नसतां, तुह्मीं ऐसें काल्पनिक ल्याहावें हें उचित नव्हे. तुह्मीं होऊन बोलिलेस आणि स्वामीस सांगोन देखील पाठविलें कीं, आपण आपाजीराऊ नव्हों. त्यास, गोपाळरायाचे समजाविसीची ही गोष्ट स्वामींनीं मान्य केली होती. किंबहुना, गोपाळराव स्वामीची आज्ञा घेऊन जाऊं लागले तेव्हां त्याणींही विनंति केली ते समईं त्यासही स्वामींनीं सांगितलें कीं, भगवंतराव यांचें दर्शन जाहल्यावरी तुमचेंही

समाधान स्वामी करितील; परंतु तुह्मीं शेवट ऐशी गोष्ट केली. त्यास, क्षुद्र मनुष्याचे बोलें वर्तता! आजवरी क्षुद्राचे विचारें जें जालें तें तुमचें तुह्मांस ठाउकें आहे. पुढेंही प्रत्ययास येईल. वरकड स्वामींनीं क्रियापूर्वक तुमचें चालवूं ह्मटल्यास स्वामीकडून अंतर होणेंच नाहीं. परंतु तुमचें तुह्मांसच अनुभवास येईल. वरकड हत्तीचा विषय बहुतसा नाहीं. स्वामींनीं हत्ती बहुत मिळविले, बहुत पाळिले, आणखीही पाहिजेत ते मिळतील. परंतु तुह्मीही होऊन सांगोन देखील पाठविलेंत त्याचा परिणाम लवकर कळला हें बरेंच जालें. आपाजीराव आपण नव्हों ह्मटलेंत. त्यास, आपाजीरायानीं करायाचें तें केलें. स्वामीस कांहीं हत्तीचें अगत्य आहेसें नाहीं. हत्ती तुह्मांस असो देणें आणि आपलें समाधान असो देणें. स्वामीस हत्ती मिळतील. कांहीं चिंता नाहीं. तुमचें समाधान राहिलें, ह्मणजे सर्व झालें. येविशीं जोत्याजी दळवी यास आज्ञा केली, सांगतां कळेल. सुज्ञ असा.

---

[१११] श्री. १७३०.

राजश्री भगवंतराव पंडित अमात्य हुकुमतपन्हा गोसावी यांसी:—

छ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्ने॥ फत्तेसिंग भोसले दंडवत विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लेखन केलें पाहिजे. विशेष. पत्र पाठविलें प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत झाला व कितेक वर्तमान रा॰ गोविंद व्यंकटाद्रि यांनीं निवेदन केलेवरून कळलें. ऐसियास राजश्री स्वामींनीं तीर्थरूप राजश्री काकासोहबांस आणावयास राजश्री नारबा यास व राजश्रीं प्रतिनिधीस रवाना केलें आहे. ते लौकरीच दर्शनास येतील आणि आपल्याकडेही राजश्री भवानीशंकर यांस पाठविलें आहे. आपण आलियावरी त्यांचें व तुमचें सौरस्य आपल्या मनोदयानुरूप करून द्यावें, कदाचित् मनोदयानुरूप गोष्टी घडो न ये तरी आपल्या स्थळास आपल्यास आज्ञा देऊन पाठवावें, ऐसा निश्चय करून आपल्यास पत्र

लिहिलें आहे. तरी राजश्री स्वामीच्या पत्राचा अर्थ मनांत आणून आपण अविलंबें दर्शनास आलें पाहिजे. दर्शनानंतर ज्या गोष्टी आपले चित्तीं आहेत त्या होऊन येतील. तरी कोणेविशीं चित्तांत संदेह न आणितां अविलंबें दर्शनास आलें पाहिजे. रवाना छ १९ जिल्हेज. बहुत काय लिहिणें. लोभ असो दीजे. हे विनंति.

लेखनावधिमुद्रा.

श्रीशिवशंभुस्वामिनि
शाहूभूपेशपार्थिवोत्तंसे ॥
परिणतचेतोवृत्तेः फतेसिं-
हस्य मुद्रेयम् ॥

---

[११२] श्री. १७२०.

राजमान्य राजश्री भगवंतराव पंडित यांसी आज्ञा केली ऐसी जेः— तुह्मीं विनंतिपत्र पाठविलें तें प्रविष्ट झालें. लेखनार्थ अक्षरशा अवगत झाला. तुह्मांकडून गोविंद व्यंकटाद्रि आले, यांणीं विनंति केली त्याजवरून सविस्तर कळों आलें. ऐसियास, चिरंजीव राजश्री संभाजी राजे यांसी भेटीस आणावयाबद्दल चिरंजीव राजश्री फत्तेसिंग भोंसले व राजश्री श्रीनिवास पंडित प्रतिनिधि व राजश्री नारो रामचंद्र मंत्री व राजश्री बाळाजी बाजीराऊ रवाना केले आहेत. हे चिरंजीव राजश्री यास घेऊन येतील. तुह्मांसही हुजूर दर्शनास यावयाची आज्ञा करून राजश्री भवानीशंकर मोरेश्वर यास पाठविलें आहे. हे स्वामींचीं आज्ञावचनें सांगतील. तरी तुह्मीं कोणेविशींचा संदेह चित्तांत न आणितां पत्रदर्शनीं स्वार होऊन हुजूर दर्शनास येणें. तुमचे मनोदयानुरूप विवेक करून दिल्हा जाईल. कदाचित् बनाव न बसे तरी तुह्मांस तुमचे स्थळास याल तैसे पोहोंचाऊन दिल्हें जाईल. निःसंदेहरूप पत्र पावेल ते क्षणीं स्वार होऊन येणें. विलंबावरी न घालणें. कितेक

आज्ञा करणें ते गोविंद व्यंकटाद्रि यांस केली आहे. सांगतील त्यावरून कळों येईल. जाणिजे. सुज्ञ असा.

---

[११३] श्री. १७३०.

श्रीमंत राजश्री पंत अमात्य हुकमतपन्हा स्वामीचे सेवेसीः— विनंति सेवक द्वारकोजी यादव कृतानेक विज्ञापना विनंति स्वामीचे दयेनें वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें श्रीमंत सकळसौभाग्यादिसंपन्न मातुश्री बाईसाहेबांस विदित केलें. त्याचें प्रत्युत्तर पाठविलें आहे. त्यावरून अभिप्राय कळों येईल. मुख्य गोष्ट स्वामी थोर आहेत, आणि आह्मीं सामान्य सेवक, असें असोन आह्मांस खोल पाण्यांत घालावयाचें नव्हतें. यद्यपि हीं थोरपणें स्वामीचींच आहेत त्याचें निदर्शन कीं, आपला कोणी भला माणूस कारकून विश्वासूक इमानीइतबारी व विनंतिपत्र ऐसें हुजूर पाठवून द्यावें. येथील मर्जीमाफक स्वामींनीं वर्तणूक करावी. बोलल्या वचनाप्रमाणें कार्यभाग घडोन हें यश स्वामींनीं आह्मांस द्यावें, नाहीं तरी वारंवार स्वामीकडील पत्रें येतच आहेत. एकवेळ मल्हारी आला. दुसरे खेपेस दुसरा माणूस पाठविला, असें असतां धन्यास तरी कोणप्रकारें अर्ज करावे? मुख्य गोष्ट, धन्याचे पायाशीं निष्ठा धरून आणि आपलेंसें करून घ्यावें यांतच उत्तम, लौकिकहि बराच आहे. याउपरि स्वामींनीं दुसरें तिसरें कांहीं ह्मणों नये. धन्याचे पायाशीं दृढ निश्चयें मिठी घालावी. त्याणीं तुमचें सर्वप्रकारें चालवावें, येणेंकरून उभयपक्षींही बरें दिसतें. नाहींतरी तुमचें विनंतिपत्र हुजूर येणें तें आह्मां लघु मनुष्यास स्वामींनीं गौरव दिल्हासारिखा आह्मांस यश द्यावें. कारकून विश्वासू इमानीइतबारी ऐसा सत्वर पाठवावा. विलंबावरी घातल्यानें एक प्रकारें दिसतें. इतके दिवस झालें तें झालें. याउपरि स्वामींनीं विलंबावरी घालावें ऐसें नाहीं. स्वामीचें वचन ह्मणजे शापादपि शरादपि ऐसें आहे. आह्मांस यश देऊन धन्याची तुमची गोडी होय

तो अर्थ करावा. विशेष लिहावें तरी स्वामीस मानमार्ग न कळेसा काय आहे? जेणेंकरून लोकोत्तर यशकीर्ति आह्मां लघु मनुष्यास सांगितल्यास सांगितल्यासारिखें घडावें हे उत्कंठा आहे. यश दिल्हें पाहिजे. हे विज्ञापना. याउपरी जें पूर्वीं झालें तें उत्तमच झालें. जरीकरितां आपले विचारें गोडी करावी असें असलें तरी पत्राचें उत्तर व कारकून ऐसें सत्वर पाठवावें, नाहीं तैसें पत्राचें उत्तर पाठवावें; ह्मणजे आह्मासारखाची स्थित राहील. आधींच आपची इज्जत थोडकी ते रक्षिलियानें बरें. यास्तव साफ जाब सत्वर पाठवावा. दिवसगत लावावीशी नाहीं. तथापि हा विचार न होय तरी, आपण सरकारकून, हे धनीच आहेत, तेथें आह्मीं काय ल्याहावें? हे विज्ञापना.

---

[११४] श्री. १७३०

विनंति उपरि. येथील कुशल आषाढ बहुल चतुर्दशीपावेतों यथास्थित असे. विशेष. आपण लिंगो रघुनाथ यासमागमें पत्र पाठविलें तें पावलें. त्याउपरि त्याची रवानगी करावी तों स्वामीकडे अगोदर आह्माकडील राजश्री आनंदराव पाठविले होते ते व आपणाकडील रा० रामाजी शिवदेऊ पत्रें घेऊन आले. अनुक्रमें दोनही पत्रांवरून व मानिल्हेच्या मुखांतरावरून आद्यंत कळोन समाधान झालें. ऐशास, आपण राज्यांतील धुरंधर, धन्यानीं दिवसेंदिवस कृपा करावी, हेंच उचित आहे. प्रसंगोपात्त जें होणार त्यास ईश्वरइच्छा; तथापि आपणानिराळे कोणी नाहींत. प्रस्तुत सविस्तर अर्थ माहाराज राजश्री स्वामीचे सेवेसी विदित करून उभयतांस दर्शन करविलें. याजकडूनही जो अर्ज करवणें तो करवून अवघा अर्थ श्रवण झाला. त्यास, सारांश गोष्ट, स्वामीकडून सभ्य मनुष्य येऊन बोलीचाली व्हावी, याकरितां धन्यास विनंति केली. त्यावरून राजश्री नारो केशव यास आणावयाविशीं हुजुरून आज्ञा झाली आहे व उभयतांसही धन्यानीं स्वमुखें आज्ञा केली असे. तरी कोणेविशीं संदेह न धरितां नारोपंतास येथवरी पाठवून द्यावें. बोलीचालीमुळें बनाव होऊन

आल्यास मग कांहीं चिंतान नाहीं. हे गोष्ट न व्हे तेपक्षीं नारोपंतास निश्चयात्मक पावून देऊन मागील प्रसंगाकरितां कोणी पाय घेत नाहीं ह्मणून लिहिलें. तरी तो विचार आणिला होता. आतां आह्मीं आहों. आमची रीत आपणास न कळे ऐसें नाहीं. तरी सत्वर मानिल्हेस पाठविलें पाहिजे. येविशीं सविस्तर मानिल्हे सांगतां कळो येईल. मुख्य धनी यांची दया संपादून घ्यावी, यांत सर्वही स्वामींचें स्वहित आहे. येविशीं मानिल्हे सांगतां कळो येईल. बहुत काय लिहिणें. कृपावर्भमान केली पाहिजे. हे विनंति.

---

[११५] श्री. १७३०.

राजमान्य राजश्री भगवंतराऊ अमात्य हुकमतपन्हा यासी आज्ञा केली ऐसी जे:—तुह्मीं नारायण हरकारा यासमागमें तपशिलें विनंति सांगोन पाठविली याप्रमाणें विदित करितां श्रुत झाली. ऐशास, स्वामीस तुह्मापेक्षां दुसरें अधिकोत्तर कांहीं आहे ऐसें नाहीं. तुह्मीं चाकरी करावी आणि दिवसेदिवस उर्जित करून चालवावें हेंच अवश्यक आहे. तुह्मास पेशजी क्रिया दिली तेच आहे. दुसरें कांहीं नाहीं. रा० गोपाळ रामराऊ याचा प्रसंग सांगोन पाठविला तर उत्तम. ते धण्याचे चाकर. त्यांचें चालवावें हें आवश्यक. येविशीं ता। मल्हारजी सांगतां कळेल. याउपरि येथील प्रसंगास तुह्मीं चित्तांत संशय मानावा ऐसें नाहीं. स्वामीचें आगमन बहुतां दिवशीं झालें, दर्शनास येऊन संतोषी करणें येविशीं स्वमुखें मल्हारजीस आज्ञा केली असे. नारायणास सत्वरीच पाठवितों. सुज्ञ असा.

---

[११६] श्री. १७३०.

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री भगवंतराव पंडित स्वामी गोसावी यांसी:—

पोष्य बाजीराव बल्लाळ कृतानेक नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष. आपण

पत्र पाठविलें तें पावोन संतोष जाहला. राज्यांतील विचार प्रसंग व थोरपण संरक्षण व्हावयाचा व कितेक वरकड विचार विस्तारें लेख केला. व राा संभाजी पडवळ आले याणीं मुख वचनें निवेदन केलें. त्याजवरून साकल्य अर्थ कळला. ऐशास, आमचा विचार आपणासी आणिका सारखा आहे असें नाहीं. कायावाङ्मनसा आपले अभीष्ट असेल तेंच करावें हें अत्यावश्यक आहे. परंतु राज्यांतील विचार प्रसंग प्रस्तुत कोणे प्रकारचा जाहला आहे, तो आपणास न कळेसा काय? सारांश, आह्मीं उत्तरप्रांतें गेलों होतों ते आलों. राजश्री स्वामींचे दर्शनास जाऊन तेथें आपला प्रसंग सविस्तर राजश्री स्वामीस विनंति करून आपले साहित्यास सर्वथा आह्मांपासून अंतर होणार नाहीं. आह्मीं आपणाखेरीज नाहीं. एतद्विषयींचा कितेक अर्थ रा० संभाजी पडवळ यांस सांगितला आहे. हे आपणास निवेदन करतील. याजवरून कळों येईल. बहुत काय लिहिणें. लोभ असो दीजे. हे विनंति. आह्मीं सातारियास आल्यावरी माारनिलेस आह्माजवळ पाठवून दीजे. हे विनंति.

---

[११७] श्री. १७३०.

राजश्री भगवंतराव पंडित अमात्य यांसीः—

प्रति सौभाग्यादि संपन्न उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहिणें. यानंतर तुह्मी पत्र पाठविलें तें पावोन लेखनार्थ अवगत जाला. आह्मास बंधु ह्मणविलें त्याचा अभिमान धरून उर्जित करावें ह्मणून कितेक तपशिलें लिहिलें व स्वमुखें रा० शिवाजी मल्हार याणीं मुखवचनें अर्थ निवेदन केला. ऐशास, तुह्मीं पुरातन राज्याचीं संरक्षणें करून यशें विशेषात्कारें संपादिलीं. त्यांतून विशेष सेवा करून दाखवून मजुरा करून घ्याल हा पूर्ण निशा आहे. बंधु ह्मणविलें त्याचाही पूर्ण अभिमान आह्मांस आहे. कोणेविशीं अंतराय होणार नाहीं. समाधान असो देणें. वरकड सविस्तर माानिल्हे यास आज्ञा केली

आहे. हे मुखवचनें सांगतां कळों येईल. जाणिजे. छ ९ रमजान. बहुत लिहिणें तर सुज्ञ असा.

---

[११८] श्रीबालकृष्ण. १७३०.

राजश्री भगवंतराव पंडित अमात्य हुकमतपन्हा यासी:—

प्रति सौभाग्यादि संपन्न बाईसाहेब उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन करणें. विशेष. शिवाजी मल्हार याजसमागमें विनंतिपत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लेखनाभिप्राय अक्षरशा अवगत जाहला. दर्शनास यावयाचा मजकूर लेख केला. ऐशास येविशीं राजश्री स्वामीस विनंति करून पेस्तर आज्ञापत्र सादर केलें जाईल. तुमचें सर्वप्रकारें साहेबास आवश्यक आहे. तुह्मास वस्त्रें पाठविलीं आहेत, त्यांची यादी अलाहिदा आहे, तेणेंप्रमाणें घेऊन उत्तर पाठवावें. तुह्मीं जिनस पाठविला तो प्रविष्ट जाहला, व मागाहून मोहे नारळ सुमार ७ सात पाठविले तेही प्रविष्ट जाहले. जाणिजे. छ ९ रमजान. बहुत काय लिहिणें. लेखनसीमा.

रुजु सही.

---

[११९] श्री. १७३०.

राजमान्य राजेश्री सेखोजी आंगरे सरखेल यासी आज्ञा केली ऐसी जे:—जंजिरे रत्नागिरी येथें तुह्माकडील उपसर्ग लागतो, येणेकरून उस्तवारी होत नाहीं, ह्मणून हुजूर विदित झालें. ऐशास, राजश्री भगवंतराऊ पंडित स्वामी संनिध आले. आपले निष्ठेचा अर्थ निवेदन केला. त्याचे सर्व प्रकार अभिमान धरून चालवणें व जंजिरेयाची उस्तवारी करणें स्वामीस आवश्यक. असे असतां तुह्मीं उपद्रव करावा हे गोष्ट उत्तम नव्हे. तुह्मीं तेथील साहित्य करावें, उपसर्ग न द्यावा, हें उचित आहे. हाली हें आज्ञापत्र सादर केलें आहे. तरी जंजिरे मजकुरास कोणेविशीं उपद्रव लागो न देणें. सर्व प्रकारें साहित्य करून जंजिरे माची उस्तवारी होय, स्वामी संतोष पावत, तो अर्थ संपादणें.

वरकड कितेक श्रीनिवास शिवदेऊ तुह्मांस लिहितील त्याप्रमाणें साहित्यास अंतर न करणें. सुज्ञ असा.

---

[१२०] श्री.

छत्रपति

राजश्री चिटकोबा गोसावी यासी :—

॥ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्ने॥ गुजाजी गाईकवाड सरखवास रामराम विनंति उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. तुह्मीं पत्र पा॥ तें पावोन लिहिला मजकूर कळों आला. वे॥ राजश्री केशवभट्ट गोटखिंडीकर याचा मजकूर लिहिला तो कळला. ऐसियासी येविशीं श्रीमन्महाराज राजश्री स्वामीचे सेवेसी अर्ज करून आज्ञा होईल त्याप्रों मागाहून लिहिलें जाईल. बावडेस रवाना करणेचे लाखोटे दोन पा॥ आहेत. येऊन पोहोंचतील. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[१२१] श्री. १७३०.

राजमान्य राजश्री भगवंतराव अमात्य हुकमतपन्हा यासी :—

आज्ञा केली ऐसी जे :—तुह्मीं याउपरि कोणेविशीं संशय न धरितां स्वार होऊन स्वामिसंनिध येणें. तुमचेविशीं स्वामीचे मनांत कांहीं संदेह असेल तरी श्रीची शपथ असे, व तुह्मींही संदेह धराल तरी तुह्मांस शपथ असे. परिवारसहवर्तमान सत्वर येणें. सुज्ञ असा.

---

[१२२] श्री. १७३१.

सरंजाम राजश्री रामचंद्र पंडित अमात्य वारणेचा उत्तरभाग.

किता सरंजाम देहाय प्रांतहाय

१० प्रां॥ पन्हाळा.

१ मौजे आईतवडे लोकांचें ता॥ कोडोली.

किता.

३ पा॥ पुणें.

१ मौजे बोपेगांव ता॥ कऱ्हेपठार.

१ मौजे भिवंडी ता॥ कऱ्हे-

१ मौजे चिकुर्डे ता। कोडोली.
१ मौजे पेट नजीक नेरलें ता। कोडोली.
१ कसबा कासेगांव ता। मजकूर.
१ मौजे आंकलखोप ता। बाजेकर्यात.
४ ता। वाळवें.
१ कसबा वाळवें.
१ मौजे येळूर.
१ मौजे गोटखेंडी.
१ मौजे बाहे.
—
४
१ मौजे कुरडुप पा। कोल्हापूर.
—
१०
६ ता। वारुण.
१ मौजे चांडोली.
१ मौजे उखळु.
२ धनगरमहाल.
१ मळा.
१ पांचगणी.
—
२
१ कसबा चारण.
१ मौजे आरळें.
—
६

पठार.
१ मौजे पाटळून ता। पाटस.
—
३
७ प्रांतकडे वळीत.
१ मौजे खंडाळें ता। मांडोगण.
१ मौजे बांबुरडी ता। पेडगांव.
१ मौजे जेऊर ता। नगर.
१ मौजे सेंडी ता। नगर.
१ मौजे पारगांव ता। चांभारगोंदें.
१ मौजे पिंपळगांव माळी ता। नगर हवेली.
१ मौजे आकुळनेर देखील वाड्या ता। नगर हवेली.
—
७
८ ता। कर्डे रांजणगांव.
१ मौजे तांदळी नजीक काष्टी.
१ रांजणगांव सांडस.
१ मौजे हिवरें.
१ वाडगव्हान.
१ मौजे मोंसें.
१ मौजे टांकळी.
१ मौजे न्हावरें.
१ दहीठणें.
—
८

८ ता। शिराळें.
१ मौजे वाटेगांव.
१ मौजे कानंदें.
१ मौजे ईंगरूळ.
१ मौजे चिखली.
१ मौजे कणदूर.
१ मौजे गुजगांव.
१ मौजे देवर्डें.
१ मौजे नांद्गांव.
—
८
१२ प्रांत कऱ्हाड.
१ कसबा मसूर.
१ मौजे तांबवें.
१ मौजे नेरळें.
१ मौजे वेहें.
१ मौजे त्रिपुटी ता। पाटण.
१ मौजे कोकिसरें ता। मरळी.
१ मौजे मारुळ.
१ मौजे बतुळें.
१ कसबा कोळें.
१ मौजे उंबरखचण ता। कोळें.
१ मौजे वडगांव ता। हवेली.
१ कसबा तारगांव.
—
१२
१ मौजे बुरली कर्यात दिगरज पा। कागल.
१ कसबा अमनापूर ता। मजकूर प्रांत रायबाग.

५ सरकार जुन्नर.
१ कसबा नारायणगांऊ.
१ मौजे कासारें ता। आळें.
१ मौजे वगकुटे ता। बेल्हें.
—
३
२ ता। आळें.
१ पिंपळवडी.
१ मौजे सुरवरी.
—
२
—
५
प्रांत तळकोंकण.
४ ता। सावर्डें सुभा दाभोळ.
१ मौजे नांद्गांव.
१ मौजे निवळी.
१ मौजे पालवण.
१ मौजे कळंबुसी.
—
४
१ मौजे अडरें ता। चिपळूण प्रांत दाभोळ.
१ मौजे गोंवळ ता। चिपळूण प्रांत दाभोळ.
६ ता। संगमेश्वर प्रांत राजापूर.
१ मौजे बुरबाड.
१ मौजे कडवई.
१ मौजे तुरर.
१ मौजे सरंद.
१ मौजे कळबस्ते.

६ प्रांत वाई.
१ कसबा वाई.
१ पाटखन समत निंब.
१ वडुथ समत निंब.
१ मौजे लासूरणें—समत कोरेगांव.
१ येकंबें संमत कोरेगांव.
१ मौजे सिरादोण संमत कोरेगांव.

६
१ कसबा गेर्दे ता मजकूर.
७ सरकार संगमनेर.
१ कसबा वामोरी ता राहुरी.
१ मौजे पिंपळगांवबसवंत पा चांदवड.
३ पा आकोलें.
१ मौजे सोनारी.
१ मौजे डुबेरें.
१ मौजे फटोलें.

२
१ हवेली संगमनेर.
१ तळेगांव.
१ निर्मळपिंपरी.

२

७
४ प्रांत सातारा.
१ मौजे पाडळी.
१ मौजे कुरंघोडें.

६
४ ता हवेली राजापूर.
१ मौजे आडिवरें.
१ मौजे नाटें.
१ मौजे गोठणेंदोनिवडें.
१ मौजे कसेळी.

४
२ ता पांवस प्रांत राजापूर.
१ मौजे गोळप.
१ मौजे काळंबे देखील बाग सरदेसाई.

२
१ कसबा प्रभावळी ता मजकूर प्रांत राजापूर.
३ ता नेवरें.
१ कसबा नेवरें.
१ मौजे पुसाळें.
१ मौजे कोतवडें.

३
२ ता देवरुख.
१ कसबा देवरुख.
१ मुरादपूर.

२
२ तर्फ हरचेरी.
१ कसबा दो बंदर.

१ मौजे जिहें.
१ कसबा तारगांव ता मजकूर.
१ मौजे अतीत ता तारगांव.
—
४
८ कसबा भिळवडी प्रा मिरज.
१ कसबा सांगली.
७ कसबा भिळवडी.
१ कसबा भिळवडी.
१ ताकारी.
१ तुफरी.
१ दुधारी.
१ नागराळें.
१ घोगारी.
१ ———
—
७
—
८
३ पा पागरी सरकार परांडे.
१ मौजे कारी.
१ मौजे नारी.
१ मौजे भातंबरे.
—
३
२ ता परळी प्रा सातारा.
१ मौजे आलवडी.
१ पाटेघर.
—
२

१ सोमेश्वर.
—
२
४ ता हातखंबें.
१ आसोडें.
१ मौजे निवसर.
१ मौजे केळेंकेळें.
१ मौजे माजगांव.
० ता
—
४
२ ता खारापाटण.
१ मौजे तिथवली.
१ मौजे दिंगस.
—
२
४ ता लांजे.
१ मौजे हरचें.
१ मौजे जाडें.
१ मौजे सावड.
१ मौजे गव्हाणें.
—
४
४ ता संवदल.
१ मौजे डोंगर.
१ मौजे कळंबोली.
१ मौजे आगलें.
१ मौजे गोरोसी.
—
४
—
४०

२ पा खटाव.
  १ मौजे कातरखटाव देखील-
    वाड्या.
  १ वडूज.
  ——
  २
१ मौजे साहली ता मेंढें
  कुरणास गांव द्यावें.

वेंकटराऊ रामचंद्र यांचा
सरंजाम.

१ पा सावदें फैजपूर सा
  आशेरी सुभे खानदेश.
६ सरकार बागलाणचारी.
२ सरकार जुन्नर ता.
  १ ता आळें.
  १ ता वाडें.
  ——
  २

---

[१२३] श्री. २० आगस्ट १७३१.

राजश्री भगवंतराऊ पंडित अमात्य हुकमतपन्हा गोसावी यासी :—

छ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री फत्तेसिंग भोसले दंडवत विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करीत जाणें. विशेष. पत्र पाठविलें प्रविष्ट होऊन लेखनार्थ कळों आला. उभयता यजमानांची भेटी जाली. ते समयीं आपलें अगत्य करून त्यांचें आपलें सौरश करून दिलें नाहीं. आपला तो किमपि तिळप्राय अंतराय नसतां विपर्यास चित्तांत येऊन नानाप्रकारचीं दुर्निमित्यें

आपल्यावरी आणलीं आहेत. हरएकविशीं थोरले महाराजांनीं आपणास बेलभंडारा दिल्हा आहे. ऐसा कितेक अर्थ तपशिलें लिहिला. ऐसियास, भेटी जालियानंतर राजश्री स्वामींनीं आपलें स्मरण एक दोन वेळां केलें. तें समयीं आपलें आगमन जालें असतें तरी गोसावी यांच्या मनोगतानरूप सौरश होऊन येतें; परंतु आपणांस यावयास + + + + + + + अंतर होणार नाहीं. प्रसंगोचित मजकूर कळों जाईल. प्रस्तुत येथील कितेक अर्थ राजश्री लिंगो रघुनाथ सांगतां कळों येईल. जाणिजे. छ २७ सफर. बहुत काय लिहिणें. लोभ असो दिल्हा पाहिजे. हे विनंति. लेखनावधिमुद्रा.

श्रीशिवशंभुस्वामिनि
शाहूभूपेशपार्थिवोत्तंसे ।
परिणतचेतोवृत्तेः फतेसिं-
हस्य मुद्रेयम् ॥

---

[१२४] श्री. १७११.

राजश्री भगवंतराऊ अमात्य पंत साहेब:—

॥छ

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री नामाजी पा दोस मौजे तांदळी दंडवत उपरि. तुह्मीं पत्र पाठविलें वर्तमान अवगत जालें. त्यांसी राजश्री राऊ पंतप्रधान यांचेंही आज्ञापत्र आलें आहे. त्यासी, आपल्या शरिरास सावकाश वाटत नाहीं. त्यासी सीमाउल्लंघन जालियावर आपण पुणियासी जातों. तेथें गेलियाउपर जे हकीकत होईल ते सेवेसी लेहून पाठवूं. बहुत काय लिहिणें. हे विनंति. महादाजी इंगवळे जबानी सांगतां कळों येईल.

---

[१२५] श्री. २ मे १७३१.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५७ विरोधकृत् नाम संवत्सरे वैशाख शुा सप्तमी रविवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभूछत्रपति स्वामी यांणीं देशमुख व देशपांडे ताा तारळे यासी आज्ञा केली ऐसी जे:—

श्री ० राजाशंभुछत्र-पतिहर्षनिदान। त्र्यंबकसुत केशव-राव मुख्य प्रधान.

श्री आई आदिपुरुष श्री राजाशिवछत्र-पतिस्वामिकृ-पानिधि॥ तस्य परशुराम त्र्यंब-क प्रतिनिधि.

राजश्री शिवाजी शंकर गोत्र शांडिल्य उपनाम गुप्तचुप हे स्वामीच्या राज्यांतील पुरातन एकनिष्ठ सेवक यासी पूर्वी अरळगुंडी ताा कापसी हा गांव इनाम दिल्हा होता. तो दूर करून हालीं त्याचा मुबादला मौजे आंवळी बुा ताा मजकूर हा गांव पेशजीच्या मुकासियाकडून दूर करून यासी इनाम कुलबाब कुलकानू हालीपट्टी व पेस्तर पट्टी जलतरूतृणपाषाणनिधिनिक्षेपसहित, खेरीज हकदार व इनामदार, देह १ एक रास इनाम आजरामरहामत करून दिल्हा असे. तरी तुह्मीं पूर्वमर्यादेप्रमाणें याचे स्वाधीन करणें. प्रतिवर्षीं नवीन पत्राचा उजूर न करणें. आणि मौजेमजकूर यांसी यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम सुरळीत चालवणें. या पत्राची प्रती लेहून घेऊन असल पत्र याजवळ भोगवटियासी परतोन देणें. निदेश समक्ष.

मर्यादेयं
विराजते.
रुजू समस्त
मंत्री.

---

[१२६] श्रीरघुवीर. १७३१.

राजश्री रघुनाथ देव यांसी आज्ञा केली ऐसी जे:—

शिवराम नामकासमागमें येथून रकारनामक व मकारनामक पाठविला

आहे. याबरोबर कितेक लग्ननिश्चयाचा निर्वाह सांगोन पाठविला आहे. तो वित्तांत ऐकोन त्याप्रमाणें तुम्हीं निर्वाहरूप याबराबरी सांगोन पाठविणें. रकार व मकारनामक येथें येऊन सांगतील ह्मणजे आह्मांस शरीरसंबंध जाला ऐसें कळेल. मकारनामकाबरोबर विरुपत्र पाठविलें आहे तें घेणें. माणूस पाठविलें आहे हें सांगतां कळेल. बहुत काय लिहिणें. आपण सुज्ञ असत ११११

---

[१२७] श्रीशंकर प्रसन्न. १७३१.

राजमान्य राजश्री भगवंतराव पंडित यास आज्ञा केली ऐसी जे:—
तुह्मांकडे राजश्री रामाजीपंत व विठ्ठलपंत पाठविले आहेत. ते जें सांगतील तें स्वामीनीं वचनें जाणोन त्याप्रमाणें मान करून स्वामीच्या दर्शनास मजल दरमजल येणें. नारिंग व केळें पाठविलीं आहेत तें घेणें. बहुत काय लिहीन. सुज्ञ असा.

---

[१२८] श्री पुरवणी. १७३१.

राजमान्य राजश्री रघुनाथ देव यास आज्ञा केली ऐसी जे:—
कागलास परिघ पडला आहे. त्यास अस्मादिकांस हेंच आवश्यक आहे कीं, कागलकरास उपसर्ग न लागावा, टकापैका त्यास न पडावा, सुखरूप असावा. ऐसें जरूर आहे. तरी तुह्मीं एक करणें कीं, तेथील परिघ निघेल व टकापैका न पडे तें करणें. येविशीं अनमान न करणें. लिहिल्याप्रमाणें वर्तन करणें.

---

[१२९] श्री. १७३१.

रा० रघुनाथ देवासी. उपरि. तुह्मीं नारो दीक्षितास व उभयतांस पत्रें पाठविलीं ते पावलीं. तर तुह्मीं आह्मांपाशीं आलियावर तुमची मजमू व तुमचा जिल्हा व तुमचें मानमहत्व चालवूं. यास अंतर करूं तर श्रीची व आवाची आण असे. तुह्मीं वडील आहां. सही.

---

[१३०] श्री. १७३१.

राजश्री रघुनाथ देव याप्रति आज्ञा जे:—

तुह्मीं उभयतांसमागमें प्रेषिलें तें प्रविष्ट जालें. सकल अर्थ चित्तांत आणून समाधान पावलों. तरी याउपरि अविलंबेंच आगमनार्थ होय तें करणें, यदर्थीं तुमच्या शारदानीं व मातुःश्रीनें लिहिलें असेल. आह्मांपासून तुमचें चालवायास तिळतुल्य अंतर होणार नाहीं. येविशीं नारो दीक्षित व धोंडापंतीं लिहिलें आहे त्याप्रमाणें कार्य सिद्धीस पावणें. उभयतां आचार्य सांगतां कळों येईल. सर्व धंदा तुमचा आहे. हें पत्र सहस्र पत्रांचे ठायीं मानून सत्वर कार्यसिद्धि करणें. पुनः मागतीं उत्तर प्रत्युत्तराचें प्रयोजन नाहीं. अस्मादिकांकडील एकच वचन कीं, निर्वाह केला त्यास अंतर नाहीं. हें पूर्ण चित्तीं धरून कांहीं मीनमेष न करितां आगमन करणें. आपण प्रयाण सत्वर करणें. बहुत काय लिहिणें. सुज्ञ असा.

---

[१३१] श्री. १७३१.

आज्ञा केली ऐसी जे:—

तुह्मीं विनंतिपत्र पाठविलें तें पावलें. अक्षरशः वृत्त विदित होऊन स्वामी संतोषी जाले. तुह्मीं यादी पाठविली ती चित्तारूढ करून करार केली आहे. राजश्री गोंदजी गायकवाड आले. तुह्मीं लिहिल्याप्रमाणें त्यांनें समाधान करून पुनः तुह्मांकडे पाठविले आहे. कितेक वृत्त शपथपुरःसर कार्यकर्तव्यतेचा अर्थ यांसी आज्ञा केली आहे. हे व विठ्ठल कृष्ण व तुकोजी खांडे ऐसे तुह्मांपाशीं पाठविले आहेत. हे आज्ञेप्रमाणें सांगतील तें मनाशीं आणून अविलंबें कार्य सिद्ध करून महद्यश घेतलें पाहिजे. अतःपर सर्व प्रकारें तुमच्या भरोशावरी स्वामी निश्चिंत आहेत. सविस्तर वृत्त राजश्री गोंदजी गायकवाड व उभयतां सांगतील त्यावरून कळों येईल. रा। रामाजीपंत व रा। गोंदजी गायकवाड व तुकोजी खांडे व विठ्ठल कृष्ण जे सांगतील ते आमचीं वचनें जाणोन कार्य सिद्धीस पावणें.

विलंबावर न घालणें. हें पत्र लक्षपत्रांचे जागा मानून सिद्धीस पावणें. दुसरिया पत्राचा मार्ग न पाहणें. बहुत काय लिहीन. सुज्ञ असा.

---

[१३२] श्री. १७३१.

रा। रघुनाथ देवास. उपर. उद्धवसुत येथें आले. तुमचें वर्तमान सांगितलें. तें परिसोन समाधान जालें. याउपर सत्वर तुमची व आमची भेट लवकर होय ते करन. जे ठायीं राहातां तो ठाव आनीक येक दोन ठाव हाताखालीं घालण. दुसरा विचार न करण. केल कार्य सिद्धीस पावन. तुमचा अभिमान आमास असे. तुमचे उतर यताच दीक्षितास कवविरास पाठवितो. चकारपूर्वक मातुःश्रीच्या दरसनास येतो. तर तुह्मीं बुद्धीस धका न खान. बहुत काय लिहिन. आपन सुदन असा.*

---

[१३३] श्री. १७३२.

राजश्री उदाजीराव चव्हाण हिंमतबहादर गोसावी यासी :—

छ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित केशव त्र्यंबक रामराम विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करीत गेलें पाहिजे. विशेष. गोसावी यांनीं पत्र पाठविलें तें पावलें. तेथें लिहिलें कीं, उत्तरेकडील तहपैकीं राजश्री पंतअमात्य यांकडील खामगत खेडीं व गगनगडच्या तनखियाच्या लेख्यावरी काय पट्टी घातली तें लिहून पाठवणें. पैकियाचा निशा आह्मांकडे झाला. पट्टी लेहून पाठवणें. पैका पाठवून देऊन, राशिवडे, सांगरूळ खेरीज करून बरातदार पाठविले असतील ते आणवणें. ह्मणोन लिहिलें. त्यावरून बरातदार पाठविले होते ते उठवून आणविले. मनारोखे पाठविले आहेत. आपल्या लिहिल्यापेक्षां अधिक काय आहे? गांवगन्नांची पट्टी पाठवणें तरी राजश्री दामाजीपंत गोसावी याकडे चौथाईच्या तहाकरितां पाठविले आहेत. ते तह करून आल्यानंतर त्याप्रों पट्टी करून

---

* हें पत्र खुद्द शंभुमहाराज यांच्या हातचें असे.

गांवगन्ना आपणाकडे लेहून पाठवून राशिवड्याचे व सांगरूळचे रोख गोसावी याकडे दिल्हेच आहेत. बहुत काय लिहिणें. कृपा असो दिल्ही पाहिजे. हे विनंति.

---

[१३४] श्री. १७३२.

श्रीराजाशंभुछत्र-
पतिस्वामिचरणीं तत्पर ।
उदाजी चव्हाण हिंमतबहादर
ममलकतमदार निरंतर.

राजश्री देवराऊ गोसावी यासी :—

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो उदाजी-राव चव्हाण हिंमतबहादर ममलकतमदार रामराम विनंति उपरि. राजश्री पंतअमात्य हुकमतपन्हा यांचा आमचा स्नेह जो आहे तो अद्वैतभावें आहे. त्यास त्याकडील महाल.

पंचगंगेअलीकडील महाल.	पलीकडील महाल.
१ काा वडगांव.	१ काा जुगुळ.
१ काा अळतें.	१ काा लाट.
१ काा रुकडी.	१ काा सावगांऊ.
——	१ काा सदलगें.
३	१ काा एकसंबें.
	१ काा रायबाग.
	१ काा नेज.
	——
	७

येथील बाबती येणें. त्यास रयत हरामजादगी करून अमल सुरळीत देत नाहीं. याजकरितां त्यांजकडून राजश्री रामराऊ आह्माकडे आले. त्यास, त्यांची आमची बोली होऊन करारमदार झाला कीं, त्यांचा अंमल

समजावा. ऐसें होऊन हें पत्र तह्मास लिहिलें आहे. तरी त्यांजकडील एक कारकून ठाणें मजकुरीं येथितील त्यास ठेवून घेऊन, रुकडी, अळतें, वडगांव या तीन महालांचा अमल चिटीचपाटीनें होऊन जें उत्पन्न होईल त्यांपैकीं दोन तक्षिमा राजश्री पंतअमात्य घेतील, एक तक्षिम तुह्मीं घेणें. स्वारी शिकारीमुळें जें उत्पन्न होईल त्यापैकीं निमें तुह्मीं घेणें. ऐवज त्यांस देणें. हुकेरीप्रांत व रायबाग कर्यातींत सात कर्याती आहेत. त्यास तुमचा जबरदस्तीनें हात पावोन आणि जें उत्पन्न होईल तें निमें तुह्मीं घेणें व निमें ऐवज राजश्री पंतअमात्य याजकडे पावणें. यास तफावत एकजरा न करणें. येविशीं राजश्री येसाजी शिंदे यासीही लिहिलें आहे. तुमच्या त्यांच्या विचारें जबरदस्तीनें साधतां साधेल त्यास अंतर न करणें. बहुत काय लिहिणें. हें विनंति.

---

[१३९] श्री. २० जून १७३२.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५९ परिधावी नाम संवत्सरे आषाढ शुद्ध नवमी सौम्यवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शंभुछत्रपति स्वामी यांणीं समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री भगवंतराव अमात्य हुकुमतपन्हा यासी आज्ञा केली ऐसी जे:—

तुह्मीं स्वामिसन्निध यावें. कितेक विचारें मनसुबा होणें तो व्हावा लागतो. या दिवसामध्यें स्वामीनिराळें तुह्मीं रहावें ऐसें नाहीं. येविशीं पहिलेही तुह्मांस लेहून व सांगोन पाठविलें. त्यास राजश्री बाळाजी महादेव व राजश्री नारो हणमंत यांस पाठवून यावें ह्मणून लिहिलें. उभयतांनीं हे विनंति केली. त्यावरून अगत्यरूप तुह्मीं स्वार होऊन यावें येविशींची आज्ञा उभयता जवळ करून पाठविले आहेत. सांगतील त्यावरून कळेल. तरी तुह्मीं याउपरि कोणेविशीं विचारांतर न करतां स्वार होऊन स्वामीचे दर्शनास येणें. याउपरि विलंब न करणें. व फोंड सावंतानें बोलवण घोणसरीचा डोंगर बांधावयास जमाव पाठविला, त्यास तुह्मीं जमाव पाठवून डोंगर धरिला, सांव-

ताचेही लोक डोंगराखाले नजीक आहेत, वरचेवरी उपराळा व्हावा लागतो, ह्मणून लिहिलें तें विदित जालें. सिताबीनें तुह्मीं जमाव पाठवून डोंगर धरिला, उत्तम गोष्ट केली. सांवताचा जमाव नजीक आहे यास्तव डोंगर मजबुतीनें राखावा लागतो. त्यास तेथें लोक पाठविले आहेत, त्यांची बेगमी करून त्याणीं आणविलेप्रमाणें सामान पाठविणें. रांगणा, भूधरगड व बाळाजी देसाई व सरवडे आदिकरून गांवीगांवचा जमाव पत्रें पाठवून रवाना करविला आहे. सांवताकडील जमाव नामोहरम होऊन गेल्याउपरी, डोंगर धरिला आहे त्याचा विचार विचारेंकरून स्वामी करणें तो करतील. खडावा जोड व वहाणांचे जुते पा। ते हुजूर प्रविष्ट जाहले. बहुत लिहिणें तरी तुह्मीं सुज्ञ असा.

मर्यादेयं
विराजते.

बार.

---

[१३६] श्री. ६ सप्टेंबर १७३२.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५९ परिधावी नाम संवत्सरे भाद्रपद बहुल चतुर्दशी सौम्यवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शंभुछत्रपति स्वामी याणीं राजमान्य राजश्री गोपाळ रामराव मुतालीक दिंमत अमात्य यांसी आज्ञा केली ऐसी जे:—तुह्मीं हुजूर विनंतिपत्र पाठविलें, व राजश्री बाळाजी माणको याजवळ कितेक अर्थ सांगोन पाठविला. विनंतिपत्रावरून व यांचे मुखोत्तरें सविस्तर विदित जाहलें. सारांश, लिहिलें कीं, फोंडसांवतांनीं सदानंदगडास अपाय करावया विचारावरी येऊन हावभर जाहला होता. हें वर्तमान स्वामीस हुजूर विदित जाहलें, तेच समयीं स्वामींनीं राजश्री भगवंतराव अमात्य हुकुमतपन्हा यांस आज्ञा केली. तेसमयीं तुह्मीं जमावानिसी जाऊन सांवतास ठाई ठेऊन जागा हस्तगत करून बळकटीनें आहा. पुढें त्या जागियावरून साहेबकाम करून आपले सेवेचा मजुरा करून घ्यावा, ह्मणून निष्ठापूर्वक लिहिलें, व बाळाजी

माणको यांणीही तपशिलेकरून सांगितलें. त्यावरून स्वामी तुह्मांवरी बहुत संतोषी जाहले. तरी तुह्मीं अंगेजाचे, मर्दाने, स्वामिकार्यकर्ते, सेवक तैसेच आहा! तुमचे वडिलीही स्वामिसेवा सामान्य केली आहे ऐसें नाहीं. तुमचें सर्वा गोष्टींनें उर्जित करून चालवणें यापरतें स्वामीस दुसरें अधिकोत्तर तें काय? तुह्मीं आपले सर्वा गोष्टींनीं चित्तास समाधान असो देणें. किल्ला नवा वसविला आहे तेथील बेगमी जाहलियानें जागा जतन होतो, ह्मणून लिहिलें तें कळलें. ऐशास, तेथील बेगमी करणें हें स्वामीस परम आवश्यक जाणून किल्याचे बेगमीस तां साळसीचीं खेडीं सुमारें ९ नऊ व तां खारापाटण व तां संवदळ या दो माहालांत रुपये २००० दोन हजार दिले आहेत. ते राजश्री सखोजी आंगरे सरखेल व संभाजी आंगरे सरसुभेदार आरमार यांस आज्ञापत्रें सादर केलीं आहेत. तरी तुह्मीं सदरहू दोन हजार रुपये वसूल करून घेणें. जागा जतन करून राहणें. वरकड मजकूर मा। सांगतां कळेल. बहुत लिहिणें सुज्ञ असा.

मर्यादेयं विराजते.

सुरू सुद बार.

---

[१३७] श्री.

श्री
सामंतकुलेशोभानु-
र्मंगलाख्यमहेश्वरः ।
नागसामंतमुद्रेयं जन-
भूत्यै विराजते ॥

राजश्री पंत अमात्य गोसावी यासी :—

७ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्ने॥ नागसावंत भोसले सरदेसाई प्रांत कुडाळ व महालनिहाय रामराम येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे. विशेष. आपण पत्र

पाठविलें पावोन बहुत संतोष जाहला. व रा० धोंडोपंत व रा० नरसिंगराऊ जाधव हे उभयतां आले त्याणींही कित्येक ममतायुक्त आपलीं वचनें सांगितलीं. त्यावरून चित्ताचे ठायीं हर्षोत्कर्ष जाहला ते पत्रीं लिहितां पुरवत नाहीं. आपला आमचा स्नेह अकृत्रिम चालत आला, त्याची वृद्धि होऊन दिवसेंदिवस स्नेह अधिक चाले तो अर्थ केला पाहिजे. यानंतर मनसबेचा अर्थ चित्तांत आणून आपल्या पत्रावरून आवाडेहून कूच करून हेरेस आलों तों आपलीं पत्रें आलीं. त्यामध्यें दिरंग दिसोन आला. त्याउपर मनसबा योजावा तर प्रजन्य समीप येऊन दिवस थोडके राहिले. तेव्हां सहजच प्रस्तुत कालें मनसबेचा अर्थ राहिला. त्यांतून उभयपक्षींच्या भेटीही राहिल्या. बरें! जेव्हां उभयपक्षीं चित्ताचे ठायीं दुसरा अर्थ कदाप नाहीं तेव्हां समयोचित भेटीही होतील. मुख्य गोष्ट चातुर्मास प्रजन्य काळ. तो जातच आहे. त्याउपर दुसरें कारणें उभयपक्षीं भेटी होऊन जो मनसबा करणें तो पोख्ताच करावा यदर्थीचा कितेक मजकूर रा० पंत मा॥ यास स्वमुखें सांगितला असे. ते अनुक्रमें आपणास निवेदन करितील. त्यावरून कळो येईल. राजश्री संभाजी आंगरे सरखेल याजकडे आह्माकडील भला माणूस व पत्रें पाठवावीं ह्मणोन आपण सांगोन पाठविलें. त्यावरून हालीं पत्रें पाठविलीं आहेत. पुढां आपले विचारें रवाना करून दिलीं पाहिजे. मुख्य गोष्ट, आपण आह्मांस कोणही प्रसंग अनकूल करून द्यावा ऐसें चित्तीं जाहलें. तेव्हां सर्व भरीभार आमचा आपणाचवर आहे. त्यास पत्रें लिहिलीं आहेत. त्याचें समर्पक उत्तर आलेनंतर येथून भला माणूसही पाठवून देऊं. घडीघडी पत्र पाठवीत असावें. वरकड कितेक मजकूर पंतमशारानिलेजवळ सांगितला असे. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

विलसति

लेखनसीमा.

[१३८] श्री.

तीर्थस्वरूप राजश्री काका वडिलांप्रति प्रीतिपूर्वक सकल सौभाग्यादिसंपन्न गनाबाई सरदेसाईण प्रांत कुडाळ व माहाल्लानिहाय दंडवत विनंति येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे. विशेष. बहुतां दिवशीं आशीर्वाद पत्र पाठविलें प्रविष्ट होऊन बहुत समाधान झालें. याचप्रकारें सर्वदां पत्र पाठवून स्नेहाची अभिवृद्धि जाली पाहिजे. यानंतर पत्रीं कितेक स्नेहभाव आणून वडीलपणें बुद्धिवाद लिहिला तो यथार्थच आहे. आह्मींही आपणाठाईं किमपि दुसरा अर्थ धरीत नाहीं. आपले स्नेहाची जोडी केली ते दिवसेंदिवस वृद्धीतें पावोन विशेषाकारें व्हावी हेंच आह्मांस आवश्यक. यांत दुसरा पदार्थ नाहीं. मातुःश्री आह्मांठायीं स्नेह धरीत होती तैसा तुह्मीं धरावा ह्मणून विशदार्थें लिहिलें. तरी वडिलांठाईं आह्मीं आपणास मानितों. हरयेकविशीं आपणच प्रीति संपादोन स्नेह वर्धमान करावा हें उचित. वरकड भेटीचा मजकूर लिहिला यापेक्षां अधिकोत्तर आणिक काय आहे? असते पदार्थ तुमचे स्नेहाची जोडी केली आहे. येविशीं मुख्यांसही परम आवश्यक आहे. तो विस्तार लिहितां पुरवत नाहीं. हालीं तुह्मीं भाद्रपदमासीं भेटीचा निश्चय लिहिला तो येथूनही करार करून आपणास पत्रें पाठविलीं आहेत. भेटीच्या प्रसंगास एक महिना आवध राहिली आहे. याउपरि अविलंबेंच भेटी होऊन उभयपक्षीं जो कर्तव्यार्थ करणें तो आपले चित्तानुरूप होईल. आह्मीं अपत्यासमान, निरंतर पत्रीं परामर्ष करून स्नेह वर्धमान करवीत असावें. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[१३९] श्रीविठ्ठल.

० श्री ०

सामंतकुलशोभानु-
मंगलाख्यमहेश्वरः ।
श्रीनागसामंतमुद्रेयं
जनभूत्यै विराजते ॥

राजश्री पंत अमात्य हुकमतपन्हा
गोसावी यांसीः—

७ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो॥ नाग सावंत भोसले सरदेसाई प्रां॥ कुडाळ व महालानिहाय रामराम विनंति येथील कुशल जाणून स्वकीयानंद लिहित असलें पाहिजे. विशेष. बहुत दिवस क्रमोन पत्र पाठविलें. आदरें परसोन श्रवणें चित्त संतोषातें पावून समाधान वाटलें. याचप्रमाणें प्रतिक्षणीं साकल्य वृत्त लिहून संतोषाभिवृद्धि केली पाहिजे. यानंतर महाराज राजश्री स्वामींनीं उभयतांकडील सैरस्याचा मजकूर लिहिला. अक्षरशा श्रुत जाहाला. त्या कर्तव्यें एकसा विचारें जे आपणाकडील विवेक होऊन आला नाहीं हेंच आह्मांस अयुक्त वाटलें. बरें! आपण राज्यभारी, कर्ते असा. तोही प्रसंग आपले चित्तानुरूप होऊन येईल. ते गोष्टीचे अगाध काय असे? रा० संभाजी आंगरे यांची व आपली भेटी जाहाली. बोली-चाली व्हावी ते पूर्वीं सुचविलेप्रमाणें जाहाली असली तर बहुत उत्तम गोष्ट घडली. जो विचार आमचे चित्तीं आवश्यक होता तो संपादिला ते युक्तच गोष्ट केली. बोलीचा मजकूर तरी—आपण सुज्ञ लोक आहा, तेथें सांगणें अगर लिहिणेंसे काय आहे? मुख्य गोष्ट जे, उभय पक्षीं विवेक जाहाला. तेव्हां सर्वही मामला उत्तम होऊन येईल. इवाजी-बेग यांकडील काय वर्तमान लिहावें ह्मणून लिहिलें. तर निजामनमुल्काकडून बेळगांऊचे किलेदारीस फौजदार होऊन जागा येऊन दाखल जाहाले. आह्मासही स्नेहभावयुक्त येतांच पत्रें आलीं होतीं. चातुर्मास क्रमलेनंतर त्यांची कितेक मनसबे करायाची उमेद आहे. अगोदर फौजेचीही तरतूद करीत आहेत. मालवणकर याकडील विचार लि॥ त्यास त्या ह्यामध्यें कटकट मांडिली आहे. किलेस रा॥ शिवाजी-पंत कारकून मस्तसर आहेत. त्यांचीं आह्मांस पत्रें आलीं कीं, तुह्मीं आह्मीं मिळून मनसबा करावा, प्रस्तुत जमाऊ पाठवणें. ह्मणून लि॥ त्यावरून तेथें जमाऊ पाठविला आहे. हमेशा स्वारी शिकारी करून

पायचंद लागला आहे. महादाजी अनंताचा मजकूर लि॥. बरें! त्याचें अगत्य कोणतें आहे! उभय पक्षीं भेटी होतील तेव्हां त्याचेंही पारपत्य केलें जाईल. भेटीचे प्रसंगाबद्दल अगोदर भाद्रपदमासीं रा॥ माद पाध्ये यास पाठवितों असें लि॥. बहुत बरें! सर्वही एकीकडेस ठेऊन आधीं भेटी व्हावी हाच इत्यर्थ आहे. एतद्विषयीं दुसरा विचार किमपि नाहीं. भाद्रपदमासीं त्यास आधीं पाठवावें. तैसेंच आपले भेटीचा अभ होऊन पुढील कर्तव्यता जे करणें ते आपले विचारें केली जाईल. प्रस्तुत घुळाजी यास पाठविले. सांगतां कळों येईल. मागून भला मनुष्य पाठवितों. आपले विचारास येईल तरी समागमें मजुरा देऊन पुढें आंग्रेकडे रवाना करावे. मुख्य गोष्ट आपली भेटी व्हावी हा हेत आमच्या चित्तीं. भेटी होऊन येई तेव्हां मनाची निशा होऊन स्वस्थता दिसेल. बहुत काय लिहावें. विनंति.

विलसती
लेखनावधि.

---

[१४०] श्री.

श्री

सामंतकुलेशोभानु-
र्मोगलाख्यमहेश्वरः ।
श्रीनागसामंतमुद्रेयं
जनभूत्यै विराजते ॥

राजश्री पंतअमात्य
गोसावी यांसी :—

छ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो॥ नाग सावंत भोसले सरदेसाई पा॥ कुडाळ व माहाल॥निहाय रामराम विनंति येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित असावें. विशेष. बहुत दिवस जाहले; परंतु स्मरणपूर्वक पत्र पाठवून परामृश केला नाहीं.

येणेंकरून स्नेहास युक्त नव्हे. समयोचित कर्तव्यानुरूप आठवण झाली नसल. याउपरि सर्वकाळ स्वानंद वृत्त लिहून संतोषाभिवृद्धि केली पाहिजे. यानंतर आह्माकडील वृत्त पर्त्री लिहितां पुरवत नाहीं. सविस्तर वृत्त राजेश्री धोंडोपंत मुखता सांगतां विदित होईल. बहुत काय लिहिणें.

विशेष. बहुता दिवशीं स्मरण करून तुह्मीं रा० धोंडो त्रिमळ याज-बराबर पत्र पा॥ तें उत्तम समयीं प्रविष्ट झालें. बहुत संतोष झाला. पत्र पाठवीत नाहीं ह्मणून ओल ठेऊन लेख केला. तर आह्मीच एक दोन पत्रें तुह्मास पा. परंतु मनावर धरून स्नेहाची जोडी केली नाहीं. स्वार्थावर दृष्टि ते समयीं धरिली होती. हल्लीं आह्मां लोकांचें अगत्य धरिलें तर यापेक्षां उत्तम तें काय आहे? तुह्मांविरीज आह्मांस दुसरी जोडी काय आहे? हें घर श्रीदेवब्राह्मणांचें आहे. तुमचे वडील परंपरागत कैलासवासी राजश्री खेमसावंत भोसले सरदेसाई यांणीं देवाब्राह्मणांचे ठायीं निष्ठा धरून देवाब्राह्मणांची स्थापना करीत आले आहेत. तुह्मीं देवा-ब्राह्मणांची भक्ति करितां ऐसें ऐकिलें, त्याजवरून बहुत समाधान वाटलें. आह्मां लोकांचा आगत्यवाद मनःपूर्वक कायावाचामनसा निश्चय-रूप असेल तर हें पत्र पावलें ते क्षणीं दर्शनाचा योग घडे तो अर्थ केला पाहिजे. इमान खरें, वचन सत्य असावें. हे जागे व आह्मीं आपले पदरांचे आहों. दुसरा अर्थ नाहीं. सविस्तर वेदमूर्ति व रा० धोंडो त्रिमळ सांगतां कळेल. पर्जन्यकाळ समीप आला. त्वरा करावी. दर्शनांतीं सविस्तर अर्थ उभयपक्षीं कळेल. चिरंजीव राजश्री आपाजीराऊ तेथें तुह्मांजवळी हरघडी आहेत. त्यास व जागा जतन होय तें करावें.

---

[१४१] श्री.

राजमान्य राजश्री गंगाधर पंडित प्रतिनिधि यासी आज्ञा केली ऐसी जे:— तुह्मीं व सावंत व राजश्री भगवंतराव पंडित अमात्य ऐसे एकत्र होऊन आंगरे याच्या पारपत्याचा विचार अविलंबिला आहे, ह्मणून हुजूर विदित राजश्री यशवंतराव महाडिक खासनिवीस यांणीं केलें, त्याजवरून स्वामी

बहुत संतोष पावले. त्याचें पारपत्य करणें स्वामीस जरूर. तेच गोष्टी तुह्मीं अवलंबिलीत, फार उत्तम केलेंत. याउपरि भारीपणें मनसबा करून क्षात्रनिक्षेप त्याचें पारपत्य होऊन हालखुद वर्तेत तें करणें. गुद्स्तांप्रमाणें एकांत एक न मिळतां पुर्ता उपमर्द होऊन आला नाहीं तैसें न करणें. त्रिवर्ग एका विचारें वर्तोन फौजेचा गाहा करे वजनें चालोन जे गोष्टीनें त्याचें पारपत्य होऊन तुमचे सेवेचा मजुरा होय तें करणें. तेणेंकरून स्वामीस संतोष असे. सुज्ञ असा.

---

[१४२] श्री. १७३२.

० श्री ८

सामंतकुलशोभानु-
मांगल्याख्यमहेश्वरः ।
श्रीनागसामंतमुद्रयं
जनभूत्यै विराजते ॥

राजश्री पंतअमात्य गोसावी यांसीः—

छ श्री सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित नाग सावंत भोंसले सरदेसाई पा। कुडाळ व महालानिहाय रामराम येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे. विशेष. बहुता दिवशीं पत्रें पाठविलीं, पावलीं. व वेदमूर्ति राजश्री भाद पाध्ये व राजश्री धोंडोपंत यांकडे कितीएक मुलता सांगोन पाठविलें तें सविस्तर श्रवण होऊन बहुत संतोषातिशय जाहला. तथ सारांश भावार्थ जे आपले आमचे भेटीचा योग होऊन उभयपक्षी जो मनसबा करणें तो एकमतें करावा असें मानस आहे. ह्मणून कितेक विस्तारें लिहिलें व उभयतांसही सांगितलें. तरी बहु उत्तम. यापरतें विशेष काय आहे? मुख्य गोष्टी जे, आपली व आमची भेटी व्हावी, त्यामुळें लक्षशा मनसबे घडतील. आह्मांस कार्यानिमित्त आगमनकरून आपली भेटी व्हावी हेंच बहु अवश्यक आहे. याउपरि आह्मी आवाडचे मुक्कामीहून

बुधवारीं कुच करून मजल दरमजल येउसी येतों. एतद्विशींचें वर्तमान वेदमूर्ति राजश्री उपाध्याहीं लिहिलें आहे व राजश्री धोंडोपंत आले आहेत ते मुखता सांगतां कळों येईल. बहुत काय लिहावें. लोभ असो दिल्हा पाहिजे. आह्मांला आपणापेक्षां दुसरी जोड नाहीं. आह्माठायीं एवढी आवड आहे. तेव्हां जिवानसी षरीक आहों. बहुत काय लिहिणें.

विलसति लेखनावधि.

---

[१४३] श्री. १९ नोव्हेंबर १७३२.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५९ परिधावीनाम संवत्सरे मार्गशीर्ष शुद्ध त्रयोदशी रविवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभुछत्रपति स्वामी याणीं समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री भगवंतराव अमात्य हुकुमतपन्हा यासी आज्ञा केली ऐसी जे :—

तुह्मीं विनंतिपत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. खर्चाची अनुकूलता नाहीं, वरकड कितेक कसालियाचा अर्थ जमाव पाठविला आहे, ह्मणून लिहिलें तें विदित जाहालें. स्वार व जमाव पाठविला उत्तम केलें. तुमचा अस्तिनास्तीचा प्रसंग लिहिला तो यथार्थच आहे. स्वामीस नकळेसें काय आहे? राजश्री बाळाजी महादेव व राजश्री नारो हणमंत वरचेवर स्वामीस विनंति करावयाची ते करीतच आहेत. स्वामीस तुमचें अगत्य आहे. समाधान असो देणें, वरकड वर्तमान तर राजश्री फत्तेसिंग भोंसले दादा व राजश्री श्रीनिवास पंडित प्रतिनिधि आले. काल त्रयोदशी मंदवारीं त्याणीं स्वामीचें दर्शन घेतलें. पौर्णिमा जाहल्यावर तृतिया गुरुवारीं स्वामीस करविराहून निघावयास मुहूर्त आहे. या मुहूर्तें स्वामी तीर्थरूप राजश्री आबासाहेब यांच्या दर्शनास सातारियास जात आहेत. हें वर्तमान तुह्मांस कळावें ह्मणून लिहिलें असे. मागाहून तुह्मीं आणखी प्यादे पाठविले तेहि पावले. वरकड उभयतां मशारनिले तुह्मांस

लिहितील त्यावरून कळेल. जाणिजे. बहुत लिहिणें तर तुह्मीं सुज्ञ असा.

मर्यादेयं
विराजते.

बार बार.

---

[१४४] श्री. २६ जुलै १७३३.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ६० प्रमादी नाम संवत्सरे आषाढ बहुल द्वादशी गुरुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शंभुछत्रपति स्वामी यांणीं समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री भगवंतराऊ अमात्य हुकमतपन्हा यासी आज्ञा केली ऐसी जे:—

राजश्री सदाशिव बावा उपाध्ये यासी तुह्मीं पत्र पाठविलें तें त्याणीं विदित केलें. त्यावरून सविस्तर कळों आलें. ऐशास, तुह्मीं स्वामीचे यख्तयारी ममतेचे. तुह्मांवरी कृपा करून तुमचें विषेशें विशेष चालवणें हें स्वामीस आवश्यक आहे. कोंकणचे महालचीं पत्रें तुह्मीं आणविलेप्रमाणें पाठविलीं आहेत. स्वामीची सेवा करून स्वामीस संतोष पावणें. पक्ष व नवरात्र उत्साह समीप येणार. व श्रावण मासींचा खर्च आहे. येविशीं स्वामींनीं लिहावेसें काय आहे ? येप्रसंगीं पोख्ती अनुकूलता करून पाठवून स्वामीस संतोषी करणें. वरकड सदाशिव बावा उपाध्ये यांजवळ आज्ञा केली आहे. तुह्मांस लिहितील त्यावरून कळेल. बहुत लिहिणें तर तुह्मी सुज्ञ असा.

मर्यादेयं
विराजते.

बार बार.

---

[१४५] श्री. तालीक

२९ नोव्हेंबर १७३५.

राजश्री बाळाजी खंडेराव मुतालिक सरदेसाई ता। साळसी गोसावी यांसीः—

छ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो संभाजी आंगरे सरखेल रामराम सुा सित सलासिन मया अलफ. राजश्री भगवंतराऊ अमात्य यांणीं तुह्मांस आंचेर येथें येऊन वतनी अमलाची सेवा तुमचे हातें घ्यावी ह्मणून लिहून पाठविलें. त्यावरून हें आज्ञापत्र सादर केलें असे. तरी आंचेरे यास कबिलासुद्धां येऊन राहणें. आणि पूर्ववत् वतनी अंमल चालवीत जाणें. माहालास ताकीदपत्र सादर केलें असे. जाणिजे. रा। छ २४ रजब.

---

[१४६] श्री. १७३६.

श्रीशाहूनृपहर्षेण
कान्होजीतनुजन्मनः ।
आंगरेसरखेलस्यशंभो-
र्मुद्रा विराजते ॥

राजश्री भगवंतराव अमात्य हुकमतपन्हा गोसावी यांसी:—

छ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो संभाजी आंगरे सरखेल रामराम विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. आपण रा। एस ठाकूर व मल्हारजी सूर्यवंशी यांजबरोबर पत्रें पाठविलीं व रा। सुभानजी गाटे व उभयतां मानिलेह यांणीं कितेक आपल्या स्नेहभावाचा अर्थ निवेदन केला. ऐशास, आपला आमचा स्नेह अविनाभावें पूर्वार्जित चालत आला होता त्याची दृढता होऊन परस्पर कार्यप्रयोजनप्रसंगीं यश जय रास सर्व साहित्यानिशीं अनुकूल होऊन योजिले मनोरथ सिद्धीतें पावे हा चित्तापासून संकल्प करून सुभानजी गाटे यास आपल्याकडस पाठविला. तदनुरूप गोसावी यांहीं मान्य करून विजयदुर्ग तैसाच बावडा ऐसें मानोंन, ह्मणून कित्येक विशदें लेख केला व मुखवचनीं सांगोन पाठविलें, तेणेंकरून समाधान जाहालें. प्रस्तुतचें कार्यभाग योजावा तरी राजश्री स्वामीचा आमचा विवेक होऊन येत असे. त्याची दृढता होऊन

आलियानंतर कार्यभाग सिद्धीतें पाववून ह्मणून. तरी राजश्री स्वामींचा विवेक होऊन येणें तो होऊनं आलाच असेल. किंबहुना सत्वर कालेंच उरकून घ्यावा. तदोत्तर इकडील मजकूर पेशजीपासून आपण मान्य केला आहे त्याचें समर्पक उत्तर द्यावें. आह्मीं त्याजप्रमाणें तरतूद करूनं उत्तर पाठवून देऊं. याचें उत्तर शीघ्र कालेंच पाठवून द्यावें. याउपरि दुसरा विचार किमपि नाहीं, हा आपला निशा असों द्यावा, व आह्मीं आपल्या पत्राचा मार्ग लक्षून बेफिकीर असों. रा छ ९ रजब. बहुत काय लिहिणें. लोभ कीजे. हे विनंति.

लेखनसीमा.

---

[१४७] श्री.

श्री

श्रीमत्कान्होजीसंभूत
शंभोः शत्रूञ्जिगीषतः ।
वर्धिष्णू राजरेखेव मुद्रा
भद्रा विराजते ॥

राजश्री नारो पंडित गोसावी यांसीः—

७ सकलगुणालंकरणं अखंडितलक्ष्मी राजमान्य स्नो संभाजी आंगरे सरसुभेदार आरमार रामराम विनंति उपरि येथील कुशल जांणून स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे. विशेष. रा भास्करराऊ याजबराबरी पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लेखनार्थ-श्रवणें समाधान जाहालें. सारांश वर्षासनपत्राविशीं लेख केला. तरी पत्र तें अगोदरच लिहून ठेविलें होतें. आपणाकडेस पाठवावें तों भास्करराऊ कागद घेऊन आले. याजवळ हलीं पत्र पाठविलें असे. केल्या वचनास अंतर सर्वथैव होणार नाहीं. वरकड श्रीस मंदिल व देवीस सोंवळ्याविशीं लिा तरी प्रस्तुत तें अनुकूल न पडे. पुढें अनुकूल करणार श्री समर्थ असे. बराबरील समुदायास वस्त्राविशीं लिा

तरी पांच श्रीवेष्टनें व साडीचोळी पाठविली असे. श्रीच्या देवळास फणसाचीं झाडें देविलीं असेत. धान्याविशीं लि॥ तरी प्रस्तुत धान्याची चणचण बहुतच असे. मासपक्षानें अनुकूलता खामखा करून पाठविली जाईल. कळलें पाहिजे. रा॥ छ ७ माहे सफर. हे विनंति.

मोर्तबसूद.

---

[१४८] श्री.

श्री

श्रीमत्कान्होजीसंभूत-
शंभोः शत्रूञ्जिगीषतः ।
वर्धिष्णू राजरेखेव मुद्रा
भद्रा विराजते ॥

राजश्री नारो पंडित गोसावी यासीः—

७ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो॥ संभाजी आंगरे सरसुभेदार आरमार रामराम विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे. विशेष. स्वामींनीं पत्र पाठविलें प्रविष्ट होऊन संतोष जाला. बहुमानयुक्त आपला गौरव करावा आणि तसेंच सौरस्य चालवणें असेल तरी शिबिका पाठवावी ह्मणून लेख केला. तरी आपला पैशारोख्याचा विषय काय आहे? याउपरि चित्तांत कांहींएक न आणितां यावयाचें करणें. पालखी घोडे पांच पाठविले आहेत. पत्र पावतांच स्वार होऊन यावें. अनमान न करावा. आपली आमची भेटी झालियावरी इष्टापूर्तींचीं भाषणें होऊन परस्पर संतोष होईल. बहुत ल्याहावें तों आपण सर्वज्ञ आहेत. कृपा वर्धमान करावी. हे विनंति. रा॥ कृष्णाजी अनंत पाठविले आहेत. जबानी सांगतील. लौकर आलें पाहिजे. हे विनंति.

मोर्तबसूद.

---

[१४९] श्री. १७३६

राजश्री भगवंतराव अमात्य हुकुमतपन्हा गोसावी यांसी:—

छ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो। संभाजी आंगरे सरखेल रामराम विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे. विशेष. आपला आमचा हर्शामर्श बसला आहे. त्यास आपली आमची गोष्टी होऊन पूर्व स्नेहाप्रमाणें आपण आह्मीं वर्तावें हेविषयीं राजश्री गोविंद शेट याणीं विनंति केली, त्यावरून आपणास हें पत्र लिहिलें आहे. तरी प्रेमाची अभिवृद्धि होऊन दिन प्रतिदिन स्नेह चाले तो अर्थ चित्तास आला तरी करावा. चित्तास न ये तरी तसेंच उत्तर पाठवावें. श्रीकृपेनें होतां होईल तें होईल. जाणिजे. रा। छ २९ माहे जमादिलावल. बहुत काय लिहिणें. लोभ असो देणें. हे विनंति.

मोर्तबसूद

श्री

श्रीमत्कान्होजी
संभूतशंभोः शत्रु
जिगीषतः॥ वर्धिष्णु
राजरेखेव मुद्रा भद्रा
विराजते॥

---

[१५०] श्री.

श्री

श्रीमत्कान्होजीसंभूत-
शंभोः शत्रुजिगीषतः।
वर्धिष्णूराजरेखेव मुद्रा
भद्रा विराजते॥

राजश्री नारो पंडित गोसावी यांसी:—

छ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो संभाजी आंगरे सरसुभेदार आरमार रामराम विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे. आमची स्वारी रामदुर्गीं होणार आहे ते समयीं श्रीची व आपली भेटी होईल. वरकड आपणाजवळ दक्षिणावर्ती शंख आहे ह्मणोन आइकतों. ऐशास, आपले आशीर्वादाची एक वस्त आह्माजवळ असावी, त्याजकरितां हें पत्र आपणास लेहून माहादो बावाजी पाठविला आहे. तरी स्वामींनीं सदय होऊन आशीर्वादक शंख अगत्यरूप पाठविला पाहिजे. आपण तपस्वी, थोर. आपले हातींची वस्त आह्मांजवळ असावी. तेणेंकरून सदासर्वकाळ स्वामीचें स्मरण राहील याजकरितां प्रसादात्मक पाठवावी. सदासर्वकाळ पूजा करून नमस्कार करू, तेव्हां आपलें स्मरण दिन प्रतिदिन होईल तें केलें पाहिजे. सुज्ञाप्रति विशेष काय ल्याहावें. कृपा वर्धमान करावी. हे विनंति.

मोर्तबसूद.

---

[१९१] श्री. १७३६.

राजश्री भगवंतराव पंडित अमात्य हुकुमतपन्हा गोसावी यासी :—

छ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो संभाजी आंगरे सरखेल रामराम विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. आपण बावाजी करवडा व विठोजी पाटणकर यांजसमागमें मुखवचनीं कितेक एकात्म(ते)च्या व पुढें मनसवा कर्तव्य पदार्थ सांगोन पाठविला. त्याप्रमाणें हरदू-जणांनीं अक्षरशाहा आह्मापाशीं निवेदन केलें. ऐशास, आपला आमचा स्नेह अकृत्रिम होऊन आला व भेटीही जाहल्या. तेसमयीं कितेक इष्टापूर्तीचीं भाषणें जाहलीं. फेरो न ये. राजकार्यप्रयोगप्रसंगीं सामील व्हावें. साभिमान अनकूलता करावी. ऐशीं कितेक पदार्थें भाषणें जाहलीं. त्याचअन्वयें हालीं आपण सांगोन पाठविलें. तरी याहून विशेष काय

आहे? आपला व आमचा एक हात निश्चयेंकरून जाहाला. तरी वरकड पदार्थें शत्रूचा पराभव व्हावया अगाध काय आहे? परंतु एकात्मता पुर्ती चित्तापासून असावी. कां ह्मणजेल? तरी, राजश्री बाजीराव पंडित प्रधान यांणीं बेलभाकर पाठविली व आह्मींही त्यांस पाठविली. तथाप तो अर्थ एकीकडेस ठेवून, मुडा बसवून, इमानास खता केली. व इमानरोटी देवून मुडकरी यांणीं बेइमान केली. ऐसा विचार तुमचा आमचा नसावा. जो स्नेह कार्य मनसबा बंधुत्व संपादणें तें कार्य खामखा करावेंच करावें. बंधुत्व तो कितेकांनीं विपर्यास लहान मनुष्यानें अथवा थोरानें घातलें तरी परस्पर चित्तारूढ करूं नये. सहोदर बंधुपणाची पदार्थ चालोन एकानें सामील व्हावें. साहित्य करावें. ऐसें आपल्या चित्तापासून असलेयास किमोन तफावत न पाडावी ऐसें पुर्तें आपलें मन शोधून पाहावें. आणि आह्मीं माणसें पाठविलीं आहेत, यासमागमें आपल्या जिवाळ्याचा माणूस बरा शहाणा असेल तो पाठवून द्यावा. हे बोलीस अंतर न पाडूं ह्मणून श्रीरघुवीराचा बेल व भाकर पाठवून द्यावी. ह्मणजे, आह्मींही आपलेकडील भला माणूस श्रीकानोबाचा बेल भाकर पाठवून देवून आणि आपला आमचा एक हात करून आपले व आमचे योजिले मनसबे सिद्धीस न्यावे. याउपरि दुसरा विचार आमचे चित्तीं नाहीं. एवढें लिहण्यास कारण कां ह्मणिजेल? तरी पूर्वीं एका दोहींकडून बेलभाकरीचा अन्वय जाहला तो प्रसिद्ध आपणास कळलाच आहे. रघुनाथ प्रभू याणेंही दोन वेळां बेल काढून दिला. आणि बेइमानी करून खादल्या अन्नाचा निस्तरा देतो आहे. याचाही परिणाम श्रीकृपेनें होईल, तो आपल्यास कळोन येईल. आपला आमचा स्नेह आजीकालीचा नाहीं. पूर्वीं कैलासवासी तीर्थरूप यांचा व आपल्या तीर्थरूपाचा स्नेह कोणे रीतीनें चालिला, व त्यांणीं कोणे कोणे प्रसंगीं साहित्य केलें, एक एकास तें न चुकले. त्यांचे पुत्र तुह्मीं आह्मीं एकात्मतेनें वर्तावें, शत्रूस पादाक्रांत करावे, घरोब्यानें चालोन दुसऱ्याचा हात शिरीं देऊं नये, उचित असे. सर्व अर्थ आह्मीं आपले चित्तापासून लिहून पाठविले आहेत. सविस्तर चित्तारूढ करून आपणही

यात अन्वयें आपल्या चित्ताची प्रशंसता करून फिरोन यास अंतर न पडे ऐसें करून, सदर्हू लिहिल्याप्रमाणें भला माणूस वेळभाकर पाठवून द्यावी. तदनुरूप येथूनही पाठवून देवून. यास अंतर सहसा होणार नाहीं. याउपरि आपल्या थोरपणास योग्य असेल तें करावें. रा छ. ३ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें. लोभ असो द्यावा. हे विनंति.

लेखनसीमा.

श्री शाहूनृप-
हर्षेण कानोजीत-
नुजन्मनः आंगरे-
सरखेलस्य शंभोर्मुद्रा
विराजते.

---

[१९२] श्री.

श्री ०
श्रीमत्कान्होजीसंभूत-
शंभोः शत्रूञ्जिगीषतः ।
वर्धिष्णू राजरेखेव मुद्रा
भद्रा विराजते ॥

राजश्री भगवंतराऊ अमात्य हुकमतपन्हा गोसावी यासीः—

७ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो॥ संभाजी आंगरे सरसुभेदार आरमार विनंति येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत गेलें पाहिजे. विशेष. राजश्री यादोपंत यांज बराबरी पत्र पाठविलें त्यावरून व मानिल्हे याणीं जबानी सांगितल्या-वरून सविस्तर अर्थ कळों आला. सारांश, तीर्थरूप श्रीकुणकेश्वरीं बहुत काल राहिले होते. त्यांचा प्रतिपाल राजश्री कैलासवासी सरखेल

याणीं करून नियत करून दिल्हा होता. त्याप्रों किंबहुना तदाधिक्य तुह्मीं अंतर केलें नाहीं. प्रस्तुत तीर्थरूपास वैकुंठवास जाहला. मागें श्रीस्थलीं त्यांचीं मुलेंमाणसें व अधिष्ठान आहे. त्यांचें सर्वाविशीं पूर्वापार व हालीं नियताप्रों चालवावयास अंतराय न करावा, ह्मणोन कितेक तपशिलें लिहिलें. तरी तीर्थरूप कैलासवासी याणीं जो नियत करून दिल्हा होता त्यास आह्मांपासून अंतर आजिपावेतों जाहलें नाहीं. पुढेंही होणार नाहीं. नूतन पत्राचा विचार लिहिला तरी पत्राप्रों साल-गुदस्तां गुंता ठेविला ऐसें नाहीं. पेस्तरही राहणार नाहीं. पत्राप्रों निर्वाह करावाच लागेल. वरकड मोईनपैकीं कांहीं गल्ला राहिला आहे तो ह्माडेयानसी देवावा ह्मणोन लिहिलें. तरी हिशेबप्रों गल्ला बाकी राहिला असेल तो गलबतावरून देवगडास पाठवून मनुष्यास प्रविष्ट करून टांकण तीर्थरूपांनीं जिनगेबद्दल ठेविला आहे तो पाठवावा ह्मणोन लिहिलें. तरी टांकण सरकारांत ठेविला नाहीं. सरकारांत असता तरी पाठविला जाता. त्याचें वृत्त रा० भास्कर गोसावी यास ठाऊक आहे. आपणास श्रवण करितील. त्यावरून कळेल. बहुत ल्याहावें तरी आपण सुज्ञ आहेत. हे विनंति.

मोर्तबसूद.

---

[१९३] श्री. १९ अक्टोबर १७३७.

यादी. राजश्री भगवंतराव अमात्य हुकुमतपन्हा याजकडील बोली येणेंप्रमाणें करार. सुहूर सन समान सलासीन मया अलफ, माहे रजब:—

बाबतीचा वसूल हुजूर साल-मजकुरीं जाहला आहे. तो तुह्मीं हुजूर ऐवज द्यावया केला आहे. त्यांत मजुरा देऊं. वरकड राहिला ऐवज हुजूरचा तुह्मीं द्यावा. जिल्हेबाबतचा मामला

पूर्ववत् तुमचीं खेडीं व वतनें आहेत. त्यास सावगांव खेरी-जकरून तुमचीं तुह्मांस करार केलीं असत. कलम १.

मजमूचा हुद्दा तुमचा तुह्मांस करार. कलम १.

पूर्ववत् चालत आहे. त्याप्रमाणें तुमचा तुह्मांस करार. कलम १.

तुमच्या इजतीमाफक समया-नरूप बहुमान करूं. कलम १.

अळतें, रुकडी येथील बाबती व मौजे हातकणंगलें हें द्यावें ह्मटलें, तर तुह्मीं धणी, अर्जवून घेऊन संतोषी केल्या-वर स्वामी कृपाळू होऊन देतील. कलम १.

तुमचे कारकून व चाकर जि-रहेनिसबत व बाजे जे असतील ते तुमच्या ताबिनात करूं. कलम १

तुमच्या चाकरापासून कतबे घेतले आहेत कीं, तुह्मांकडे चाकरीस जाऊं नये. त्यास ते कतबे तुमचे तुह्मांस देऊं. चाकर ताबिनांत करावे. कलम १.

येणेंप्रमाणें सात कलमें करार केलीं आहेत. यांत कांहीं लढा नाहीं. याप्रमाणें स्वामी चालवितील. तुह्मीं दिनं प्रतिदिनीं अकृत्रिम मनोभावें एकनिष्ठेनें सेवा करावी. स्वामी कृपाळू होऊन तुमचें दिनप्रतिदिनीं ऊर्जित करितील. तुह्मीं निष्ठेनें सेवा करून स्वामीस संतोषवावें. सर्व प्रकारें स्वामी चालवितील. छ १ रजब.

लेखनसीमा.

---

[१९४] श्री. १७३९.

राजमान्य राजश्री भगवंतराव पंडित अमात्य यासी आज्ञा केली ऐसीं जेः—राजश्री तुळाजी आंगरे सरखेल यांच्या पारपत्याविशीं तुह्मास पेशजी आज्ञा केली व वरचेवर राजश्री यशवंतराव महादेव खासनिवीस लिहित गेले. त्यावरून तुह्मी अंगेज करून राजश्री गंगाधर पंडित प्रति-निधि व सामंत यास सामील करून घेऊन आंगरियाच्या मुलकांत स्वारी केली आहे. आजिपर्यंत मुलूख मारिला ह्मणून खासनिवीस यांनीं विनंति केली व परस्परेंही वर्तमान विदित जाहलें; त्यावरून स्वामी संतोषी जाहले. तुह्मी कार्यकर्ते सेवक, स्वामीच्या मनोदयानुरूप मनसबा कराल, हा स्वामीचा निशाच आहे. तरी योजिला मनसुबा पोक्ता करून,

जागा जागा दम धरून, गोवळकोट, अंजनवेल, विजेदुर्गपर्यंत मुलूख मारून, दोन चार स्थळें मातबर हस्तगत होऊन, सरखेल देहावर येऊन, सावताचे किल्ले व मुडाडोंगर व सरकारचे गोवळकोट, अंजनवेल, बाणकोट, मंडणगड व शामळाचें तसिमेचा ऐवज स्वामीस देत, पेशजी स्वामींनीं त्यास दिल्हें आहे तें घेऊन आज्ञेप्रमाणें वर्तत, ते गोष्ट करणें. ज्या गोष्टीनें स्वामीच्या मनोदयानरुप कार्य घडे ऐसें जालियानें स्वामी तुमचें उर्जित करावयास अंतर करणार नाहींत. केवळ उभे धावेनें चार महाल आलियानें त्याचें पारिपत्य जाहलें ऐसें नाहीं. दोन महिनेपर्यंत मुलुखांत राहून, बंदरकिनारादेखील मुलूख मारून, दोन चार जागे हातास येत, ऐसा विचार करणें. गोवळकोटपर्यंत फौज आली ह्मणजे हुजुरूनही साहित्य होईल. राजश्री तुळाजी आंगरे सरखेल यांच्या समाधानार्थ येथून हरकोणाचीं पत्रें गेलीं तरी ते गोष्ट न जाणणें. आंगरे यांचें पारपत्य करावें हा हेत स्वामीचा पूर्ण आहे. स्वामीचे आज्ञेप्रमाणें मनसुबा जाहलियावर सावताचा बहुमान करणें तो स्वामी तुमच्या मनोदयाप्रमाणेंच करितील. येविशीं त्यांचेंही मनोधारण करून प्रारंभिला कार्यभाग स्वामीचे आज्ञेप्रमाणें सिद्धीतें पाववून स्वामी संतोषी होत, आंगरियाचें पारपत्य होऊन हालखुद वर्तत, ते गोष्ट करणें. ह्मणजे सेवेचा मजुरा होऊन तुमचें उर्जित करावयास स्वामी सहसा अंतर करणार नाहींत. सुज्ञ असा.

---

[१९९] श्री.

राजमान्य राजश्री तुळाजी आंगरे सरखेल यासी आज्ञा केली ऐसी जेः—

सुभा प्रांत राजापूर व सुभा प्रांत दाभोळ हे दोन्ही प्रांतांचा जिल्हा हुजुरून राजश्री गोविंदजी भोंसले याजकडे आहे. त्यास हरदू सुभ्यांचा अंमल हुजुरून राजश्री भगवंतराऊ पंडित अमात्य यासी सांगितला आहे. हे दोन्ही प्रांतांत एकंदर आकार होईल त्याची निमे शामळाबाबत ऐवज वसूल घेतील. तुह्मीं मुताबीक होऊन आमलास खलेल कराल

तरी न करणें. येविशीचें अवश्यक स्वामीस आहे. तुह्मीं जाणतच आहा. तुमचे तर्फेनें अमलास तिळप्राय खलेल झालिया स्वामीस मानणार नाहीं, ऐसें जाणून मानिल्हेकडे सुरळीत अमल चालो देणें. हुजूर बोभाट न ये ते गोष्टी करणें. सुज्ञ असा.

---

[१९६] श्री. तालीक.

राजश्री तुळाजी आंगरे सरखेल गोसावी यासीः—

छ सकलगुणालंकरणअखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो बाळाजी बाजीराव प्रधान आशीर्वाद विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित गेलें पाहिजे. विशेष. राजश्री कृष्णराऊ पंडित अमात्य याजकडील गांव खेडीं पुरातन इनाम आहेत व किल्ले गगनगडचे घेऱ्यांचे गांव वगैरे यांचीं वतनें त्या प्रांतीं आहेत. त्यांचा वसूल तुह्मां-कडे जात होता. त्यावरून येथून पत्र आपणास पाठविलें कीं, यांच्या ताल्लुक्यास उपद्रव करावा ऐसें नाहीं. ह्मणून लिहिलें त्यावरून याच्या दुमाला वतनें सालमजकुरीं केलीं ऐसें असोन हल्लीं नानाप्रकारें उपद्रव आरंभिला, हबशीपट्टी ह्मणोन रोखे केले आहेत, ह्मणोन लोक आले. तरी पुरातन कान्होजी आंगरे याणीं यांच्या ताल्लुक्यास तिळतुल्य उपसर्ग किल्याच्या तनख्यास देखील केला नाहीं व हबशीपट्टीही घेतली नाहीं. ऐसें असतां तुह्मीं हरएक निमित्य ठेवून उपद्रव करावा हे गोष्ट उचित नाहीं. हालीं हें पत्र आपणास लिहिलें असे. तरी रोखे केले असतील ते मना करून पंडितमशारनिल्हेच्या निसबतीस कोणेविशीं उपसर्ग जाहाल्याचा बोभाट वारंवार न ये ते गोष्ट केली पाहिजे. रा। छ २० मोहरम. बहुत लिहिणें तरी सुज्ञ असा.

---

[१९७] श्री. १७३८.

राजमान्य राजश्री भगवंतराव पंडित यासी आज्ञा केली ऐसी जे :—

तुह्मीं विनंतिपत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहालें. राजश्री तुळाजी आंगरे यांच्या पारपत्यास सेवकाकडून अंतर होईल ऐसें नाहीं, स्वामींनीं दृढ

अभिमानें सर्व प्रकारें साहित्य करावें, मुलास अन्नवस्त्र द्यावें, ह्मणोन विशदें लिहिलें. ऐशास, तुह्मीं राज्यांतील पुरातन सेवक, तुमचें सर्व प्रकारें अवश्यक. तुमचे हातें सेवा घेऊन उर्जित करावें, हेंच स्वामींचें मानस आहे. तरी तुह्मीं योजिला मनसुबा सिद्धीस पावणें. ह्मणजे तुमचें चालवावयास स्वामीपासून अंतर होईल ऐसें नाहीं. सविस्तर अर्थ राजश्री यशवंतराव महादेव खासनिवीस लिहितील त्याजवरून कळेल. नारळ व पानें पाठविलीं तीं यादीप्रमाणें प्रविष्ट जालीं. सुज्ञ असा.

---

[१९८] श्री श्रीविठोबा.

रघुवीर. ९ एप्रिल १७३८.

राजश्री भगवंतराऊ रामचंद्र, भारद्वाज गोत्र, आश्वलायन शाखा, गोसावी यांसी:—

छ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री नागसावंत भोंसले सरदेसाई पा। कुडाळ व माहालानिहाय दंडवत विनंति उपरि, शालिवाहन शके १६६० कालयुक्त नाम संवत्सरे चैत्र बहुल त्रयोदशी सौम्यवासर सु॥ समान सलासीन मया अलफ, दिल्हें वतनपत्र ऐसाजे. आपली व आमची किल्ले गगनगडच्या मुकामीं भेट समारंभें करून जाहाली. ऐशास, कैलासवासी राजश्री रामचंद्र नीलकंठ यांचा व तीर्थस्वरूपांचा राजश्री खेमसावंत भोंसले सरदेसाई यांचा ऋणानबंध विशेषाकारें चालत आला त्याप्रमाणें उभयपक्षीं चालत आहे. अभिवृद्धीनें ऋणानुबंध चालावा, आमचें साहित्य आपण करावें, आपलें साहित्य सर्व प्रकारें आह्मीं करावें, वंशपरंपरेनें अकृत्रिमतेंत कांहीं न्यूनता पडों न द्यावी, येविशीं श्रीसंनिध शपथपूर्वक बोलीचाली जाहली आहे. त्यास, आह्मांकडून किमपिहि तफावत पडणार नाहीं. आपल्याकडून तफावत न पडावी. घरोब्यानें ऐक्यतेनें उभयपक्षीं सुधामत चालावा. यास अंतर पडणार नाहीं. आपली आमची भेट प्रथमत: जाहली. आमचे चित्तास बहुत संतोष वह जाहाला.

यावरून तुह्मांस आह्मीं आपले आत्मसंतोषें होऊन प्रांत कुडाळ येथील देशकुळकर्ण्याची वतन देहाय कर्याती देखील जकायती दिल्हें असे. यास वतनी बाहबी ता।.

इनामगांव दरोबस्त.	हक्कदरसदेहोन निमे.	बीमयेत इनाम ठिकाण.
१		
	जकात दर बैली.	

लाजमा पानमानपद्धत प्रा। कलम १.

येणेप्रमाणें दिल्हें असे. तुह्मी व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें देशकुळकर्ण्याचें वतन अनुभवून भोगवटा करून सुखरूप राहणें. सदर सरदेशकुळकर्ण्याचीं वतनें आहे तीं कूलीं तुह्मांस देऊं.

स्वदत्तां परदत्तां वा यो हरेच्च वसुंधराम् ।
षष्टीवर्षसहस्राणि विष्ठायां जायते कृमिः ॥
स्वदत्तानुपालकाः परदत्तापहारकाः ।
ते नरा नरकं यान्ति यावचंद्रदिवाकरौ ॥

शिक्का

राजश्री नार दळवी. राजश्री निलापा देसाई ता। खानापूर.

---

[१९९] श्री. २९ नोव्हेंबर १७३८.

तालीक

राजश्री जानोजीराव निंबाळकर गोसावी यासी:—

छ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्ने॥ चिमणाजी बल्लाल आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित असिलें

पाहिजे. राजश्री भगवंतराऊ रामचंद्र व राजश्री मोरेश्वर रामचंद्र व राजश्री शिवराम रामचंद्र यांचें कुळकर्ण व जोशीपण पुरातन मौजे तांदळी ता। रांजणगांव येथील असतां, नारो दत्तो व यादो तुकदेव पानगे कुळकर्णास व जोशीपणास नडले होते, आणि कज्या करीत होते. त्यावरून मौजे मजकूरचे मुकादम व समाकुल पांढरी बलुते हुजूर आणून इनसाफ मनास आणितां पंडितमशारनिल्हेचें वतन कुळकर्ण व जोशीपण खरें होऊन पानगे खोटे झाले. त्यावरून पंडितमा।निल्हेचें वतनपत्र अलाहिदा करून दिलें आहे. तरी तुह्मीं आपलेकडून अंमलदारास ताकीद करून कुळकर्ण व जोशीपणाचें वतन सुरळीत चालें तें केलें पाहिजे. पानगे यास वतनाशीं कज्याकटकट करावया संबंध नाहीं. त्याणीं यजीदखत लेहून दिल्हें आहे. तर पंडितमा।निल्हेचें वतन सुरळीत चालवणें लागवून अमिलास पत्र देविलें पाहिजे. रा। छ २७ शाबान. बहुत काय लिहिणें.

---

[१६०] श्री. १७३८.

राजश्री जानोजीराव निंबाळकर गोसावी यासी :—

छ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो। बाजीराव बल्लाळ प्रधान आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत गेलें पाहिजे. विशेष. राजश्री भगवंतराऊ रामचंद्र व मोरेश्वर रामचंद्र व शिवराऊ रामचंद्र यांचें कुळकर्ण व ज्योतिषपण पुरातन वतन मौजे तांदळी ता। रांजणगांव येथील असतां, नारो दत्तो व यादो तुकदेव पानगे कुळकर्णास व जोसपणास नडले होते, आणि कजिया करीत होते. त्यावरून मौजे मजकूरचे मोकदम व समाकुल पांढरी बलुते हुजूर आणून, इनसाफ मनास आणितां, पंडितमशारनिले वतन कुळकर्ण व जोसपण खरें होऊन पानगे खोटे जाले. त्यावरून मशारनिलेचें वतनपत्र अलाहिदा करून दिल्हें आहे. तर, तुह्मीं आपल्याकडील अंमलदारास ताकीद करून कुळकर्ण व जोसपणाचें वतन सुरळीत चालें तें केलें पाहिजे. पानगि-

यासी वतन नाहीं. कजिया कटकट करावयासी संबंध नाहीं. त्यांनीं यजितखत लेहून दिल्हें आहे. तर, पंडितमशारनिल्हेचें वतन सुरळीत चालवणें ह्मणोन अभिलाष पत्र दिल्हें पाहिजे.

---

[१६१] श्री. २९ नोव्हेंबर १७३८.
ताळीक.

छ मा अनाम देशमुख व देशपांड्ये ता। रांजणगांव सरकारकून यासी:— बाजीराव बल्लाळ प्रधान सुमा तिसा सलासीन मया अलफ. भगवंतराव रामचंद्र व मोरेश्वर रामचंद्र व शिवराम रामचंद्र जोशी कुळकरणी मौजे तांदळी ता। मजकूर यानीं पुण्याचे मुक्कामीं विनंति केली कीं, मौजे मजकूरचें कुळकर्ण व जोशीपण हीं दोनही वतनें शिवजी बिन जैतजी बेस मोकादम मौजे मजकूर याणे आपले वडील निळो सोनदेऊ व आबाजी सोनदेऊ आपले आजे यास खुशरजावंदीनें विकत देऊन खरेदी खत करून दिल्हें. त्यापासून आपण गुमास्ते ठेऊन दोनीं वतनें अनुभवीत आलों. अलीकडे नारो दत्तो व यादो तुकदेऊ पानगे कोरेगांवकर गालुमाती कागद करोन गांवांत सुखवस्तु राहत होते ते कजिया करितात. तरी स्वामींनीं मनास आणून पारपत्य करावें ह्मणून. त्यावरून नारो दत्तो व यादव तुकदेऊ पानगे यांस हुजूर आणिले व गांवचे मोकादम शिवाजी बिन भिकाजी व भिमजी बिन शिवजी पाटील व गोंदजी चौगुला वगैरे बलुते हुजूर आणून करीना पुसिला. त्याणीं तकारिया केल्या कीं, कुंभभट ऋग्वेदी आपले गांवीचा जोशी कुळकरणी पूर्वी होता. त्याचें नकल झालें. पानग्याचे वडील राघो दत्तो गांवीं सुखवस्तु राहत होता. त्याजकडून पांच सात वर्षें मुशारा देऊन कुळकर्ण लेहविलें. त्या आधारावर गालुमाती कागद आणून दोनीं वतनें आपलीं ह्मणतात. हे कुंभभटाचे नव्हेत. शिवाजी बिन जैतजी पा। याणें निळो सोनदेऊ व आबाजी सोनदेऊ यास जोशीपण व कुळकर्णपण दोनीं वतनें रजावंदीनें दिल्हीं हें खरें आहे. याप्रमाणें

हकीगत आहे. ऐसियासी, पानगे कांहीं मौजे मजकूरचे वतनदार नव्हेत. गांवीं राहिल्यामुळें खेळ करून नडत होते. ऐसें पांढरीच्या व मजालसीच्या विचारें खरें झालें. पानग्यापाशीं पुरातन कागदपत्र दस्ताऐवजी नाहींत. यामुळें पानगे खोटे झाले. भगवंतराव रामचंद्र व मोरेश्वर रामचंद्र व शिवराम रामचंद्र यांचें वतन खरें झालें. त्याजवरून गांवकरी यांस व तुह्मास आज्ञापत्र सादर केलें असे. तरी जोसपण व कुळकर्ण हीं दोनीं वतनें भगवंतराव रामचंद्र व मोरेश्वर रामचंद्र व शिवराम रामचंद्र यांजकडे चालवून सुदागतपासून हक्क, आदा व इनाम असेल तें कुळकर्णी व ज्योतिषी यांजकडे चालवणें. या पत्राची प्रत लेहोन घेऊन हें पत्र भोगवटियास परतोन देणें. जाणिजे. छ २७ सावान.

---

[१६२] श्री. २ मार्च १७३९.

तालीख.

अजम कादरखान.

छ तहवार वडिक हत दस्तगाह अजी बाजीराऊ बल्लाळ प्रधान दुवा सुा तिसा सलासीन मया व अलफ. राजश्री भगवंतराऊ रामचंद्र व मोरेश्वर रामचंद्र व शिवराम रामचंद्र यांचें कुळकर्ण व ज्योतिषपण वतन पुरातन मौजे तांदळी ताा रांजणगांव येथील आहे. त्यास नारो दत्तो व यादो तुकदेव पानगे कुळकर्णास नडोन कजिया करीत होते. याकरितां मौजे मजकूरचे मुकादम व समाकूल पांढरी व बलुते हुजूर आणून इनसाफ मनास आणिता, पंडितमानिल्हेचें वतन कुळकरण व ज्योतिषपण खरें होऊन पानगे खोटे झाले. त्यावरून मानिल्हे आपलें वतन अनुभवितील. पानगे खोटे झाले ह्मणून यजित खत लेहून दिल्हें. ऐसें असतां पानगे यास तुह्मीं आसरा देऊन गांवांत ठेविले आहेत. तुमचे इमाइतीनें ते राहिले आहेत. ह्मणून हुजूर विदित जाहालें. तरी पानगे खोटे जाहाले, ऐसें असतां त्यास गांवांत राहावयास गरज काय? व तुह्मीं त्यास आश्रा देऊन ठेवावा यास प्रयोजन काय? याउपरि त्याजपासून पेशजीचे कागदपत्र रुमाल असतील ते घेऊन पंडितमानिल्हेचे गुमास्ते

गांवांत आहेत त्यांचे स्वाधीन करून पानगे यास गांवांतून बाहेर काढणें. येविषयीं फिरोन बोभाट आला ह्मणजे कार्यास येणार नाहीं व पानगे गांवांत राहिलियास त्यांचा मुलाहिजा होणार नाहीं. जाणिजे. छ २ जिल्हेज. ज्यादा काय लिहिणें ?

---

[१६३] श्रीरामचंद्र. २९ मे १७४१.

राजश्री अमृतराऊ पडवळ नामजाद व कारकून, किल्ले गगनगड, गोसावी यांसीः—

छ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री भगवंतराऊ रामचंद्र अमात्य हुकुमतपन्हा आशीर्वाद व नमस्कार सुा इसन्ने अर्बैन मया अलफ. येसजी फलाडा बिन शहाजी फलाडा हुजूर उमेदवार होता. यासी किल्लेमजकुरीं नाईकी सांगोन पाठविला आहे. यासी वेतन दरमहा करी दामोली २९ पंचवीस केलें असे. इा सनद पैवस्तापासून वजावाटाऊ करून उरलें वतन शिरस्त्याप्रमाणें देत जाणें. यासी जमान "किला घेणें." जाणिजे. छ २० रबिलावल. बहुत काय लिहिणें.

लेखना-
वधिमुद्रा.

श्रीसीताराम-
चरण रामचंद्र
नीलकंठ शरण.

बार.

---

[१६४] श्री. १७४२.

श्रीराजा शाहूछत्रपति
हर्षनिधान । बाळाजी बाजी-
राव मुख्यप्रधान ।

राजश्री फत्तेसिंग बावा गोसावी यासी :—

छ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्ने॥ बाळाजी बाजीराव प्रधान आशीर्वाद विनंति उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित गेलें पाहिजे. विशेष. मौजे साडेगांव व मौजे बोरी पा॥ आवडें हे दोन्ही गांव आपणाकडून मुकासे राजश्री कृष्णराव पंडित अमात्य याजकडे आहेत. तरी पेशजीपासून चालत आल्याप्रमाणें चालवणें ह्मणून हरदु गांवांस आपलीं ताकीद पत्रें देऊन पंडित मानिलेकडे गांव सुरळीत चालत तें केलें पाहिजे. रा॥ छ १० सफर. बहुत काय लिहिणें. लोभ असो दिल्हा पाहिजे. हे विनंति.

लेखनसीमा.

---

[१६९] श्री.

श्रीशंभूराजचरणीं तत्पर
दत्ताजीसुत येसोजी नलगे
निरंतर.

राजश्री पंत अमात्य स्वामीचे सेवेसी.

छ श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्ने॥ येसोजी नलगे नामजाद व कारकून किल्ले पावनगड दंडवत व अनुक्रमें सा॥ नमस्कार विनंति येथील क्षेम जाणोन स्वकीय लेखन करावया आज्ञा केली पाहिजे. विशेष. सरजकातीचे व मौजे पुसेरे येथील दिवाणच्या सनदा पाठविल्या त्यावरून गांवचें व सरजकातीचें ताकीदपत्र पाठविणें ह्मणून लिहिलें. त्यावरून सरजकातीस व मौजे पुसेरे ता॥ बोरगांव यास ताकीदरोखे पाठविले आहेत. तरी सनद पैवस्तापासून ऐवज जो होईल तोच घेणें ह्मणून आपणाकडील कमाविसदारांस ताकीद करून गांवांस व सरजकातीस पाठविले पाहिजे. लटकाच कजिया कमाविसदार करितील त्यास ताकीद करून पाठविलें पाहिजे. बहुत काय लिहिणें. लोभ असो दीजे. हे विनंति.

मोर्तबसूद.

---

[१६६] श्री.

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री कृष्णराव स्वामी गोसावी यासी :—

पो बाळाजी बाजीराव कृतानेक नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन लिहित असिलें पाहिजे. विशेष. मौजे सांगरुळाविशीं विरुद्धतेचें आचरण धन्याशीं न करावें, सेवाधर्मास हे गोष्ट उत्तम नव्हे, ह्मणोन आपणास पूर्वी पत्र पाठविलें. त्याचें उत्तर तपशिलें जे, सांगरूळ द्यावयाचा करार आहे, चिकोडीकर व एसाजीराम मध्यस्त आहेत, ह्मणोन लिहिलें. त्याजवरून मध्यस्ताकडे येविशींचा शोध मनास आणिला. त्यांणीं साफ सांगितलें जे, दोन चार गांव धन्यांनीं घेतले ते कृपा करून देतात, सांगरूळ एक राहिलें तेंही धन्याची सेवा करून आर्जऊन ध्यावें. येणेप्रमाणें आह्मीं बोलिलों असें ह्मणतात. व चिकोडीकराचें पत्रही बजिन्नस याप्रमाणें आलें आहे. तुह्मीं पत्रीं लिहिलें जे, आजपर्यंत आर्जविलें त्याचें ऊर्जित काय झालें तें पुढें होणार? हे गोष्ट लिहिणें उचित नाहीं. तुमची मातबरी आहे ते धन्याचेच कृपेची आहे. याउपरि सांगरुळाविशीं वारंवार उपक्रम करून विरुद्धाचरण न करावें. धन्याच्या मर्जीपेक्षां सांगरूळ अधिकोत्तर नाहीं. ज्या गोष्टीनें धन्याचा संतोष त्याप्रों असावें. स्वत:च्या मुलखांत अधिकोत्तर बेरजा घालून रोखे करिता. बाबतीखेरीज गांव खेडीं आहेत तेथेंही रोखे पाठविता. हा बोभाट मुलखांतून धन्यासंनिध जातो. तेथून आज्ञापत्रें येथें येतात. तरी अशी गोष्ट याउपरि न करावी. बाबतीचा करार खावंदानीं ज्याप्रों करून दिल्हा आहे त्याप्रों वसूल घेऊन निष्ठेनें स्वामिसेवा करावी हेंच श्लाघ्य असे. सारांश तूर्त मसलतीचा प्रकार आहे तो सिद्धीस पावलियावर विनंति करून विनंतीच्याच मार्गें आपलें कार्य केलें जाईल. सध्या उतावळीचा प्रकार सहसा न करावा. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

[१६७] श्रीरामचंद्र. १२ सप्टेंबर १७४२.

राजश्री अमृतराऊ पडवळ नामजाद व कारकून किल्ले गगनगड गोसावी यांसी :—

छ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री भगवंतराव रामचंद्र अमात्य हुकुमतपन्हा आशिर्वाद व नमस्कार सुा सलास आर्बैन मया अलफ. राजश्री कानो काशी हे कारखानिसीकडेस किल्लेमारीं लिहिणार होते. त्यास कामाचे मर्दानें देखोन किल्लयाचे कारखानिसीचा फडनिसीचा धंदा घेत जाणें. यास वेतन पेशजीचे फडणीसाप्रों करार केलें असे. इा सनद पैवस्ता वजावाटाऊ करून उरलें वेतन शिरस्त्याप्रों देत जाणें. छ १० साबान. बहुत काय लिहिणें.

लेखनावधि मुद्रा.

श्रीसीतारामच-
रण रामचंद्र
नीळकंठ शरण ।

पैवस्ती छ १२ साबान.

---

[१६८] श्री. १८ आगटोबर १७४२.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ६९ दुंदुभि नाम संवत्सरे कार्तिक शुद्ध प्रतिपदा इंदुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शंभुछत्रपति स्वामी यांणीं

देशमुख व देशपांडे
महालानिहाय यांसी

आज्ञा केली ऐसी जेः—वेदमूर्ति राजश्री बाळजोशी बिन दशरथ जोशी, उपनाम सवदागर, गोत्र शांडिल्य, सूत्र आश्वलायन, सरज्योतिषी महालानिहाय, हे स्वामीचे पुरातन एकनिष्ठ सेवक, यांचे वडिलवडिलापासून तीर्थरूप राजश्री कैलासवासी महाराजाजवळी सेवा निष्ठेनें करीत आले. व हेही स्वामीची सेवा एकरूप निष्ठेनें करीत आहेत. स्वामीविना अन्य जाणत नाहींत. स्वामींनीं जो प्रश्न केला तो याणीं सांगि-

तल्याप्रमाणें स्वामीच्या प्रत्ययास आला. व ठाणें शिरोळ ता। अळतें येथील ठाणेस स्वामींनीं परिघ घालून मुक्काम केला होता ते समयीं स्वामींनीं यांसी कुरुंदवाडचे मुक्कामीं ठाणें कितके दिवसांत हस्तगत होईल ह्मणून प्रश्न केला. त्यावरून याणीं सिद्धांत करून ज्या दिवशीं ठाणें हस्तगत होईल ह्मणवून सांगितलें व लिहून दिल्हें तेव्हां तें त्याप्रमाणें ते दिवशीं ठाणें हस्तगत झालें. त्याजवरून स्वामी यांजवर बहुत संतोषी जाहले. यांचें दिवसेंदिवस ऊर्जित करून चालविणें हें स्वामीस आवश्यक. यांचेविशीं राणीवसा चौथा वाडा याणीं विनंति केली कीं, बाळजोशी आह्मासन्निध सेवा करित आहेत, यासी राज्यांतील सरज्योतिषणाची वृत्ति करून द्यावी, ह्मणून. त्यावरून मनास आणितां हे ज्योतिषविद्यावंत, सिद्धांतवेत्ते, ज्योतिषविद्यानिपुण, यास्तव स्वामी याजवरी कृपाळु होऊन स्वामीच्या राज्यांतील सरज्योतिषपणाचें वतन स्वामींनीं यांसी श्रींचें उदक घालून धारादत्त करून दिल्हें असे. या वतनास कानूकायदेयाची मोईन करून दिली असे. गांवगन्ना महाल्लानिहाय :—

कानूकायदे वितपशील.

किता कलम		किता कलम शूद्रादिक	
२	जकातीस दर सदे रुपये	०॥०	लग्नास
१॥	ब्राह्मणाचे घरीं	०।०	पाटास
	१ लग्नास	——	
	०॥० मुंजीस	०।॥०	
	बारसे		
	सरकार		
	——		
	१॥		
——			
३॥			

इनाम जमिनी महालनिहाय विघे.

सुभा प्रांत पन्हाळा.

ता। बोरगांव.		ता। ठाणें.	
८१ घोटवडें	८१ कणेरी	८१ भुयें	८१ कसबा
८१ सोनुरळें	८॥ नावरी	८॥ मादळें	८१ उतरें
८१ माजनाळ	८१ आळवें	८१ कळ्हें	८१ आडुर
८। वाडी मोताई	८॥ तळवें	८१ इंगळी	८। गुडें
८॥ निवडें	८॥ बांदिवडें	८१ काढगांव	८१ वाघवें
८१ काटेभोगांव	८॥ पोहळें	८१ वाडी रत्नागिरी	८१ पोरलें
८१ पाटपन्हाळा	८॥ वळोली	८१ पोहळ	८१ वरनगें
८१ परळी	८॥ नणुंदरें	८॥ कंदलगांव	८१ शिरोली
८१ कोतोली	८१ परखंदळ	८१ वडणगें	८१ असुलें
८॥ पोर्लेवाडी	८१ कोलोली	८१ इंजोलें	८१ राक्षी
८१ दिगवडें	८॥ मालेवडें	८१ निगवें	८ चिखली
८१ पुनाळ	८१ नांदगांव	८१ हेरलें	८१ केरली
८१ वारनुळ	८१ उंडरी	८१ माजगांव	८१ केरलें
८॥ मडिलगें	८१ करंजफण	८॥ देवठाण	८॥ कुशिरें
८॥ पुशिरें	८॥ पोरलें	८॥ पिंपळें	८॥ दाणेवाडी
८१ कसबा	८॥ रायभोगांव	——	——
८१ तिरपण	८॥ घुंगुर	१३	१३।
——	——	——	
८१४।	८१२	८२६।	

——

८२६।

ता। कोडोली.		ता। कळ्हें.	ता। सातवें.
८१ जाखलें	८१ मालें	८१ कसबा	८१ महुरें
८१ कसबा	८१ ऐतवडें	८॥ कळ्हें	८॥ वाडीकाळकावे

८१ कळोळ	८१ चिकुर्डें	८१ परखंदळ	८१ पिशवी
८१ पोखलें	८१ करंजवडें	८१ घरपण	८१ बोरिवडें
८१ जाफळें	८१ चाखलवेडा	८१ चिंचवडें	८१ कसबा
८१ गिरोली	८१ आइतवडें	८१ भामटें	८१ चरण
८१ खय		८१ मरळी	८१ साळसी
		८। आसगांव	८॥ माडळें
—	——	८॥ मुदकेश्वर	८१ आवळी
८७	८६	८॥ लैंघें	८१ जिऊर
——		८॥ खेरवड	८॥ नावली
८१३		८। खडोलें	८॥ आवटी
		———	८१ सावर्डें
		८८॥	८१ नेवापूर
			८॥ आंबवडें
ता॥ वडगांव.	ता॥ अळतें जमीन.		८॥ पिंपळें
८१ चावरें	८१ कुंभोज	८१ कोथळी	८॥ शहापूर
८१ नरंदें	८१ तेज	८१ कवठेसार	८१ बोरपाडळें
८१ वठार	८१ कुरुंदवाड	८१ मजलें	८१ आरळें
८१ तळसंद	८१ नांदणी	८१ चिपरी	८१ काकं
८१ आंबप	८१ सावर्डें	८१ जैनापूर	८१ मांगलें
८१ घुणकी	८१ तारदाळ	८१ बाणोली	———
८१ दरवेशपाडळी	८१ खोदशी	८१ घानवाड	८१७॥
	८१ वाठार	८१ कनवाड	ता॥ वाळवें.
८१ दामोलें	८१ तमदलगें	८१ उदगांव	८१ नागठाणें
८१ पारगांव	८१ हिंगणगांव	८१ निमशिरगांव	८१ नागांव
८१ कसबा	८१ कसबाशिरोळ	८१ चिंचवडें	८१ गोटखिंडी
८१ तासगांव	८१ कुटवाड	८१ अलास	८१ बेंद
८१ मिणचें	८१ शिरहट्टी	८१ औरवाड	८१ भादुरवाडी
८१ भेंडवडें	८१ अर्जुनवाडा	८१ गौरवाडा	८१ येवूर

८१ लाटवडें	८१ घरणगुत्ती	८१ सडेसाळ	८१ खेड.
८१ किणी	८१ हातकणंगलें	८१ कवठें	८१ पुणदी
८१ मनपाडळें	८१ कुनवाड	——	८१ पाडस
८१ टोप	८१ हेमूर	८१६	८१ दुधार्डें
८१ शिगांव	८१ सेडसाळ		८१ शिरगांव
८१ कोरेगांव	८१ कवलव		८१ यर्डें
——	——		८१ देवर्डें
८१९	२०		८१ मानेगांव
			८१ येकशी
ता। रुकडी.	ता। अष्टें.	ता। आरळें.	८१ कसबा
८१ चेंदा	८१ कसबा	८१ राशिवडें	८१ धानपड
८१ चिंचवडें	८१ पोखरणी	८१ कंचनवाडी	८१ कोनोरी
८१ येटराव	८१ वेडसांगली	८१ शिराळी	८१ मुदारी
८१ इचलकरंजी	८१ कवठें पिराचें	८१ शेडाळी	८१ मुपारी
८१ शिरढोण	८१ दुंग	८॥ तरसवडी	८१ उरुण
८१ मुडसिंगी	८१ भडकंबें	८॥ भाटणवाडी	८१ बुरबाळी
८१ माणगांव	८१ ढवळी	८१ घातवड	८१ आंगणापूर
८१ टाकवडें	८१ बावची	८१ ह्मळसवडें	८१ कुंडल
८१ कोरची	८१ किणी	८॥ माडरें	८१ भोगांव
८१ रुई	८१ समडोळी	८१ कसबा	८१ टाकारी
८१ मालें	८१ बागणी	८॥ सानाळी	८१ नांगरळ
८१ कबनूर	८१ कोळेवाडी	८१ बिरवडें	८१ बावड
८१ शाहापूर	८१ ईटीकरी	८१ सावरडें	——
८१ तिळवणी	८१ कुंडलवाडी	८॥ चाफोडी	८२८
८१ जांबळी	८१ सावळवाडी	८॥ गर्देन	
८१ आतिकिरें	८१ तांदुळवाडी	८॥ घुंगुरवाडी	
८१ कोंडिकिरें	८१ अक्कलकोट	८॥ सोनवडी	

‹१ कसबा	‹१ डिगरज बुा	‹॥ वघरवाव
‹१ हरोली	‹१ उदगांव	‹। खपाळें
‹१ शिरीदवाड	——	‹। पाल
‹१ चोकाक	‹१९	‹॥ पाठकरवाडी
‹१ साजणी		——
——		‹१४॥
‹२२		

तेरीज एकंदर जमीन बिघे.

‹२६। ता बोरगांव	‹१३ ता कोडोली
‹२६। ता ठाणें	‹१९ ता वडगांव
‹१७॥ ता सातवें	०।६ ता अळतें
‹८॥ ता कळें	‹२२ ता रुकडी
‹२८ ता वाळवें	‹१९ ता अष्टें

ता तारळें जमीन.

‹१ यळवडें	‹१ तिटवें	‹। खोपळें
‹॥ बुनवडें	‹॥ शेळेवाडी	‹॥ बेलेवाडी
‹१ साळाकूर	‹॥ मोहुडें	‹१ मानगांव
‹१ कोर्ते	‹। कवळूव	‹॥ वाघवडें
‹१ सावडें	‹॥ कोपवडें	‹१ हिरवडें
‹१ पिरळ	‹१ आवळीखुर्द	‹१ तारळेंखुर्द
‹१ असणी	‹॥ करंजफण	‹१ शिरसें
‹॥ कासारवाडा	‹। पाल	‹१ आमठाल
‹॥ कासारपुतळें	‹॥ मोघरडें	‹॥ चाफोडी
‹१ शिरगांव	‹॥ माळवें	‹१ वळवडें
‹१ तुरंबें	‹१ ठिकपुर्ली	‹१ हिरळ
‹१ नरतवडें	‹१ पनोरी	‹॥ पाठपन्हाळा
‹॥ आटेगांव	‹॥ तरसंबळें	‹॥ राडाणवाडी

८॥ घामणवाडी	८१ आणांजे	८॥ फेदवडें
८॥ दुबळेवाडी	८१ पुगांव	८१ पडळी
८१ मांगोली	८१ तळाशी	८॥ सावर्धे
८१ अकनूर	८॥ मुसळवाडी	८॥ कारिवडें
८१ अर्जुनवाडा	८१ का॥ तारळें	८॥ करंजें
८१ गुढाळ	८॥ कुकुडवाडी	८॥ दिगस
८१ आवळीबु॥	८॥ कळकवाडी	८॥ आसणगांव
८१ हारवडें	८॥ बुरबाळी	८॥ वेलवण
८१ राशिवडेंखुर्द	८॥ वरवड	८॥ जेवडें
८॥ मळेवाडी	८१ कुडुत्री	८१ आंकी
८। सुळंबी	८॥ मांजरवाडी	८१ आडोली
८॥ शेळपें	८१ केळोशीबु॥	८१ चाफाडी
८१ केळोशी	८॥ दुर्गमानवाड	८॥ लडदें
८१ हेंदूर	८१ घाटवडें	८॥ राजापूर
८१ कपिलेश्वर	८॥ कुरुकली	८॥ मागिर्णे
८॥ तळगांव	८॥ घुडेवाडी	८॥ कोनोली
८। मांगेवाडी	८॥ चांदें	८१ खांबरडें
८॥ पंडवडी	८॥ कांबळवाडी	८१ कामरडें
८१ परीत	८१ घामोड	८१ निधानखण
८१ सरवडें		८१ नानिवळें
		८॥ असनगांवबु॥
		८॥ कंथेवाडी.

ता॥ असंडोली जमीन.

८॥ वसरडें	८॥ तांदुळवाडी
८१ मांडुकली	८१ आमशी
८॥ आणदूर	८॥ गोटें
८॥ पळसंबें	८॥ वसरद
८॥ सांशी	८। कंदलगांव

८॥ कोतळी
८॥ हवेली
८॥ मठ
८॥ गारिवडें
८॥ शेळोशी
८॥ करंदवाडी
८॥ धुपवडें
८॥ तळीयें बु॥
८॥ खरिवडें
८॥ पणारें
८॥ मावळंगें
८॥ सनवडें
८१ कसबा
८॥ कोर्दे
८॥ आसळज
८॥ लखमापूर
८॥ राई
८१ वतवडेंबु॥
८॥ आंबरडें
८॥ कोदवडें
८॥ गोगवें
८॥ आकुरडें
८॥ हरपवडें
८॥ गावशी
८॥ सावरडें
८॥ नरवलें
८॥ शेतवडें
८॥ कोर्देबु॥
८॥ निवडें
८॥ पासरडें
८॥ उपवडें
८॥ आकुरळें
८॥ तळीयेंखुर्द
८१ ह्मारूळ
८१ बोळोली
८१ सांगरूळ
८१ पणुतें
८॥ जर्गी
८॥ कडवें
८१ तिसगी
८॥ साकरी
८॥ बारनेट
८॥ माननेट
८॥ वेगरगांव
८॥ वतवडेंखु॥
८॥ मणदूर
८॥ कोनोली
८॥ पडसाळी
८॥ सुळें
८१ खटागळें
८१ वाघुरडें
८१ ह्मासुर्ली
८१ तिरवें

[१६९] श्रीराजाराम. १७४९.

समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री सरकारकुनानी व. समस्त सैना हिंदुपत सरदारानी यासी आज्ञा केली ऐसी जे—काळपरत्वें आमचा प्रसंग विस्कळित होऊन चिरंजीव राजश्री संभाजी राजे व राजसबाई यांणीं गिरजोजी यादव व अंताजी त्रिमळ व लोकखासकेल गडकरी व तुळाजी सितोळे यासी पुढें करून किल्ले पनाळा येथें चिरंजीव राजश्री संभाजी राजे यांसि राज्यपदास बैसविलें, आह्मांस संकटीं घातलें, बहुत निकड केली. ते प्रसंगीं चिरंजीव राजश्री शिवाजी राजे यांसि संतान सौभाग्यवती पार्वतीबाई यांसि दोघे पुत्र झाले. त्यांपैकीं पहिला पुत्र कमला. दुसरा पुत्र त्यासी देवी सगर्भ होती. प्रसूत जाली. त्याचा फेरमोबदला करून हा मूल देवीच्या स्वाधीन केला. पाळग्रहण करविलें. सौभाग्यवती भवानीबाई सगर्भ होती. त्यानंतर चिरंजिवास देवी येऊन काळवशें समाप्त झाले. समागमें सौभाग्यवती पार्वतीबाईनीं सहगमन केलें. त्यांचा पुत्र देवीच्या स्वाधीन केला. तो अद्यापवर तिजपाशीं सुखरूप आहे. सौभाग्यवती भवानीबाई पोटीसी होती, ती प्रसूत झाली. पुत्र जाहला. तो चिरंजीव राजश्री संभाजी राजे व राजसबाई यानीं कपटबुद्धि करून मारिला. काय निमित्य ह्मणून पुसिलें. त्यास त्याणीं उत्तर दिलें जे—राजश्री शाहूराजे यांची आज्ञा आपणास आहे, त्यावरून आपण अपाय केला, ऐसें जनांत सांगो लागले. कांहीं दिवस तैसेच गेले. त्याउपरि उभयतां चिरंजीवांचा विवेक होऊन भेटी जाल्या. एक दोन वेळां सप्तऋषीस चिरंजीव करवीरवासी यांचें आगमन जालें. उभयपक्षीं सौरष झाला. त्यानंतर चिरंजीव राजश्री शाहूराजे याणीं यासि आग्रह केला जे—समस्तांच्या भेटी घ्याव्या असा हेत आहे. त्यावरून सर्वांस आह्मांस बरोबर घेऊन गेले. ते समयीं आपले वस्तु इकडील दुःख न साहवे. यास्तव चिरंजीव राजश्री शाहूराजे याजपाशीं आपणास रहावें लागलें. देवी व मूल समागमेंच होतीं. परंतु ते समयीं याणीं त्यासि पळवून समागमें घेऊन आले. त्यानंतर चिरंजीव राजश्री शाहूराजे याणीं आपणास दोन चार वेळां पृच्छा केली जे—पुढां वंशाचा

विचार कैसा आहे. परंतु आपण अंत न देतां उडवाउडवी केली. त्यावरी राजश्री शाहूराजे दत्त पुत्र गोत्रजांचा घेत होते, तेव्हांहि मागुती आपणास पुशिलें. त्यावर आह्मीं उत्तर दिलें जे—गोत्रजांचा पुत्र तुह्मीं घ्यावासा काय आहे. श्री महादेव तुह्मांस पुत्र देईल, एव्हांच त्वरा करावीशी नाहीं. त्याउपरि ते गोष्ट तैशीच राहिली. चिरंजीवाचा मनोदय निःसंशय आपणास कळला नाहीं. ऐसें पाहोन स्त्रीलोभें, धनलोभें, राज्यलोभें विसर पडोन कालहरण केलें. समयपरत्वें उद्भव होणें ते समयीं होईल, हा भाव चित्तीं आणून हा काळपर्यंत गुप्तच राहिलों. पुढें वृद्धापकाळ, देशकालवर्तमान नकळे, मुलास सतरा अठरा वर्षें होत आलीं, मागें पुढें कोणी खरें लटकें ह्मणतील, याजकरितां कैलासवासी राजश्री रामचंद्रपंत याणीं आमच्या राज्यांत वडिल वडिलां तागायत निष्ठेनें सेवा केली, मोडिलें राज्य त्याणीं संभाळून यश कीर्ति संपादिली. त्यांचे पुत्र राजश्री बाजीराव बरा शाहणा आहे, आपणाजवळ निष्ठेनें वर्तत आहेत, ऐसें पाहोन वाडियांतील मूल राणोजी माने व शिवाजी खांडेकर यांजबरोबर पत्रें व वस्त्रें देऊन राव मशारनिले याजकडेस पाठविलें. आणि येविशीची आज्ञा करणें ते केली आहे. मुलास युक्तिप्रयुक्तीनें हे आपणाजवळी आणवून, तुह्मांस लिहून व सांगून पाठवितील, त्याप्रमाणें सर्वत्र गोष्टीस साह्य होऊन कार्य करणें. यासी ऐकंदर हैगै न करणें. राजबीज खरें हें राजश्री उपाध्यांस व आपा प्रतिनिधी व चिंतो महादेव आदिकरून सर्वांस दखल आहे. याचा शोध पुर्ता व्हावा यास्तव राव मशारनिले उमरजेस चिरंजिवाच्या व आमच्या दर्शनास आले. ते समयीं आपण राव मशारनिले यासि निश्चयपूर्वक आज्ञा करणें ते केली. त्याउपर चिरंजीव राजश्री शाहुराजे याणीं या गोष्टीची पृच्छा रायांस वेव्हळे वाटेनें केली. रायांनीं इकडील आधारें उत्तर प्रतिउत्तर करणें तें केलेंच. चिरंजिवांनीं रायासि आज्ञा केली जे—तुह्मीं याचा शोध जे युक्तीनें होईल ते प्रयुक्तीनें करणें. ऐसियासि तुह्मीं सर्वांहीं राजश्री राव मशारनिले यांचे सर्वविशीं सारथ्य करून मुलास ठिकाणीं आणवणें. मग जे आज्ञा करणें ते केली जाईल. लग्न मुहूर्ताचा प्रसंग होणें आहे. त्यास राजश्री

संताजी मोहिते व नागोजी घाटगे यांच्या संमतें पुढें करणें. बहुत लिहिणें तरी सुज्ञ असा.

लेखनशुधि.

---

[१७०] श्री. जानेवारी १७४९.

श्रीमंत महाराज मातुःश्री आईसाहेब याणीं समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री भगवंतराव पंडित व शिवराम पंडित अमात्य हुकुमतपन्हा यांसी आज्ञा केली ऐसी जे :—

तुह्मांजवळ चिरंजीव राजेश्री रामराजे आहेत, अशी चिरंजीव सौभाग्यवती सकवारबाईस बातमी समजली आहे, ह्मणोन चिरंजीव राजेश्री शाहूबुवा याणीं सूचना केली. त्यास राजश्री गोविंद खंडेराव चिटणीस यांचें व तुमचें बोलणें जालें तें आह्मांस व शाहूबावास सविस्तर सांगितलें. त्यास त्याणीं व तुह्मीं मनसबा केला कीं, चिरंजीवास पानगांवीं चिरंजीव सौभाग्यवती दुर्गाबाई निंबाळकर यांचे स्वाधीन करून तुह्मीं महायात्रेस जावयाचे उद्देशानें निघोन निरोपास ह्मणून यावें, तदनंतर जो विचार जाहला आहे तो होईल. तेथें तूर्तकाळीं संचार फार जाहला. त्यास हालीं राजश्री भगवंतराव नरहरी पाठविले आहेत. व लखनपूर ताा पानगांवीं चिरंजीवास पाठवितों. वरकड चिरंजीव राजश्री शाहूबावानीं तुह्मांस वचन देऊन पत्रही तुह्मांस दिल्हें आहे. याजकरितां बहुत सावधपणें चिरंजीवाची रवानगी करणें. जाणिजे. माहे मोहोरम, सुाा खमस अर्बैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें तरी सुज्ञ असा.

---

[१७१] श्री. २६ जानेवारी १७४९.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ७१ रक्ताक्षी नाम संवत्सरे माघ शुाा ९ मंदवासर क्षत्रियकुळावतंस श्री राजा शाहूछत्रपति स्वामी याणीं समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री भगवंतराव पंडित अमात्य हुकमतपन्हा यासी आज्ञा केली ऐसी जे :—

चिरंजीव राजश्री रामराजे बावडेयासी तुह्मांजवळ आहेत ह्मणून तीर्थस्वरूप महाराज मातुःश्री काकी साहेबानीं स्वामीजवळ सांगितलें. त्याजवरून आह्मीं राजश्री भगवंतराऊ नरहरी दसरदार दी॥ मजमू यासी पाठविलें. त्याणीं तुमची भेट घेऊन चिरंजीवास पाहून आले. सकळअर्थ कळविला. त्याचें तुमचें बोलणें होऊन राजश्री सदाशिवराम पंडित यास गुप्तरूपें तेथें तुह्मीं पाठविलें आहे. त्यास तीर्थस्वरूप मातुःश्रीसाहेबांचे विद्यमानें राजश्री गोविंदराव खंडेराव चिटणीस याणें भेटोन दोन तीन वेळां त्यांशीं बोलणें ठरविलें. त्याप्रमाणें चिरंजीवास पानगांवीं पाठवून द्यावें. तिकडेही सूचनेस भगवंतराव पाठविले जातील. येथून तुह्मांकडे शिवराम पंडित यासी व मग गोविंदराव यासी पाठवावे असें ठरलें आहे. त्यास मागाहून पाठविले जातील. भगवंतराव दसरदार यासी पानगांवींहून नेहमीं इकडे व तुह्मांकडे येण्यास जाण्यास आज्ञा केली आहे. शिवराम पंडित यांणीं स्वामीसन्निध विनंति केली कीं, आमचा जिल्हा जातीचा सरंजाम व वतनें व इनामगांव व कुलअकत्यार लिहिण्याचा दरख पूर्वीं चालत आल्याप्रमाणें चालविला जाईल, याप्रमाणें स्वामीचें वचन आलें, परंतु आमचा जिल्हा स्वामीनीं प्रतिनिधीस दिल्हा, प्रधान पंडिताकडे मोठे मोठे गांव गुंतले, व दरकाचें लिहिणें ठाईं ठाईं होतें, महादाजी गदाधर यासी स्वामीनीं मजमू सांगितली आहे, त्याणें दरख राहिला नाहीं, आह्मीं पेशजी आलों ते समयीं स्वामीनीं मजमू व छंदोग्य अमात्यपद आह्मांस देऊन ठेविलें, इतक्यांत श्रीमंत राजश्री आबासाहेबीं येऊन स्वामीस विनंति केली, तेव्हां स्वामीनीं त्याजपासून शपथ घेऊन त्याचे स्वाधीन केलें, त्याप्रमाणें त्याणीं पुन्हा आह्मांस इकडे येऊंदेखील दिल्हें नाहीं, असें पुढें जाहलें, तरी आमचा सेवकाचा परिणाम काय? त्याजवरून मातुःश्रीसाहेबांचे पायावर हात ठेऊन श्रीबाळकृष्णजीची व श्रीअंबाबाईची फुलें तुळसी शिवराम पंडित अमात्य याचे हातीं दिल्हीं तीं तुह्मीं घेणें. त्याचीही शपथ स्वामीनीं घेतली आहे. प्रतिनिधीकडे तुमचा जिल्हा उत्तम आहे. त्याचे मुबदला मिरज तालुका व चिरंजीव कुसाजी व येसोजी भोंसले

याचा तालुका व गांव खेडींही मोबदला दिल्हीं जातील. जुनेरचें सरदेशमुखीचें वतन तुमचें तुह्मांकडे चालविलें जाईल. व शिवराम पंडिताची स्त्री सौभाग्यवती दुर्गाबाई याणीं रामराजे यासी फार फार जपून संरक्षण केलें ह्मणून कळलें. त्यास दुर्गाबाईस साडीचोळीबद्दल प्रांत कऱ्हाड येथील सरदेशमुखीचें वतन, स्वामीचें आहे तें, तिजला इनाम करून देऊन चालविलें जाईल. तुमचे पूर्वी लाख रकम मजमू व मजमूकडील मुतालकी, फडणिसी व सरदसरदारी वतनीं आहे, त्याप्रमाणें करून दिल्हे जातील. महादाजी गदाधर याणीं दरबाराची जुनी राहटी राखिली नाहीं, याजमुळें पायमाली आहे, तशी पुढें होणार नाहीं. स्वामीनीं शपथपूर्वक मारनिल्हेजवळ दिल्ही आहे. तुह्मीं कोणेंविशीं संशय न धरणें. तुमचें उर्जित स्वामी करितील. संपूर्ण राज्यांतील मजमू व फडणिशा व दसरदाऱ्या व किल्लेच्या जिल्हेच्या सबनिशा पेशजीपासून वतनीं तुह्मांस दिले आहेत, त्याप्रमाणें स्वामी चालवितील. जाणिजे. छ ३ जिल्काद. सुा खमस अर्बैन मया व अलफ.

मोर्तबसूद.

---

[१७२] ॥ श्रीभवानीशंकर ॥ ६ जून १७४८.

श्रीमंत महाराज राजमान्य राजश्री भगवंतराऊ स्वामीचे सेवेसीः—

सेवक नारो महादेव मुा अवरंगाबाद साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील कुशल छ २० माहे जमादिलाखर त्रितीय प्रहर जाणून निजानंद-लेखनार्थ आज्ञा इच्छितों. विशेष. स्वामीनीं अजूरदार कासद आमचा व रायाजी व सिदोजी जासूद सा।चे याबरोबर पत्रें पाठविलीं ते छ १७ माहे जमादिलाखरीं भृगुवासरीं प्रहरीं पावलीं. पत्रार्थ ध्यानास आणून बहुत संतोष जाहला, तो पत्रीं लिहितां न ये. येथील वर्तमान सांप्रत स्वामीस विदित नाहीं. आधींच तो मोंगलाई दरबार. दुसरे नबाव निजाम-नमुलूख यांची बुद्धीस ताम्रराज्यामध्यें कोणास आहे? मोठे प्रेत्नें मुत्सद्दी-यासि व मूसाहेब अमीर पलियावरी आणोन कार्य संपादिलें. त्याचे खर्च जरूरी लागला त्याचे समारंभाकारणें येथें पैसा हातीं लागेना ह्मणून

अजुरदार सेवेसी पाठविले. त्यासी उत्तर साफ लिहिलें कीं, परभारें तुह्मींच सरकारांतून एवज खर्च घ्याल त्यापैकीं साउकारास उगवणी करणें. ऐसियासि ऐसें होत नाहीं. दरबारचा व्यवहार ऐसा आहे कीं, खर्च ज्या मुत्सद्दीयासि करार करावा त्याचे घरीं आधीं थैली पावती करावी, आणि नित्य घरीं दुवरुता पाणी भरावें. मग जें होणार तें होतच आहे. ऐसा रंग दरबारचा आहे. ऐसेंही असतां मुरबी मातबर पाहिजे. स्वामींचे कार्यानिमित्य मुरबीही मातबर केले, आणि कार्य केलें, आणि अजुरदार सेवेसी रवाना केले. यावरी मागें छ ४ जमादिलाखरीं नबाब आसफज्यांचा काल जाला. ताबूत रोजियास पावला. कुल सलतनत नबाब नासरजंग यांसी सोपिली. ऐसें वर्तमान जालें. ऐसियासि नबाब साहेबांचे सरकारांत जे मुत्सद्दी आहेत ते तों पहिलियावरीच आहेत. सांप्रत नबाब नासरजंग यांचे सरकारांत मुत्सद्दी मातबर आहेत. त्यासी स्नेह बहुत आहे. आणि नबाब नासरजंगजीस अगत्य फौजेचें बहुत आहे. राजश्री पेशवेयासीही निर्मल चित्त दिसत नाहीं. पुढें पहावें. राजा व सुबा नवा जाला आहे. परंतु स्वामीचें नामाभिधान नबाब नासरजंग यांस परिच्छिन्न इनायतनामा मोठे नबाबास देती वेळेस विदित आहे. यांस अर्ज करितां इनायतनामा द्यावयासी विलंब करणार नाहींत, हें आपण जाणतों. जरी स्वामीसरंजाम अति सत्वर पावता होतो तरी दोन्हीही इनायतनामे सेवेसी येऊन पोहोंचतात. तैसी तजवीज फौजेची संचणी स्वामी करितील. सांप्रत नबाब नासरजंग यासी मोतम आहे. मोतम पुरसीचीं वस्त्रें पांच उभयतास वेगळीं वेगळीं व नजर पाठविली पाहिजे. ते व सरंजाम आलियावरी नजर नबाब साहेबास गुजराणून थैलीयाद व लखोटे स्वामीस पाठविले आहेत. अर्जी तजवीज करोन गुजराणिली आहे. येथील सर्व वृत्तांत रायाजी व सिदोजी जोडकरी पाहून आले आहेत. निवेदन करितां ध्यानास येईल. स्वामी येथील बंदोबस्त जाला ह्मणजे हस्तनापुरीं वकील पाठवून हुजूरचा बंदोबस्त करितों. हस्तनापुरी नवी मुद्रा जाली. मा। शाह पातशाह निवर्तले. त्यांचा पुत्र अहमदशाह तख्तीं बसलेत. गजशिका शहरीं आला. त्यासी

तेथील बंदोबस्त केला जाईल. जे मतालब स्वामीचे असतील ते सर्व होऊन येतील. मूळ, येथील बंदोबस्त जाला ह्मणजे कीर्तेही स्वामींचे थोरपणासारखी होईल. हस्तनापूरचा बंदोबस्त हातास आला ह्मणजे मुराद सर्व गोष्टी व मनसुबा हासल होईल ऐसें आहे. याहीवरी स्वामी थोर व सरदार आहेत. जो मनसुबा हितास येईल तो करतील. कंठुराय कमळापंत साहुकार यांचा वायदा जाला ह्मणून तगादा रुपयांचा आहे. तकरार लिहावयास कारण हेंच कीं, साऊकारापासून आह्मांस मुक्त करावें, ह्मणून विनंति असे. याचें उत्तर अतिसत्वर आह्मांस प्रविष्ट जालें पाहिजे. तैसी वर्तणूक केली जाईल. मार्गप्रतिक्षा उत्तराची करितों. कळलें पा।. हरकारे येतील त्याबरोबर शहत लहान मासीचें ८८२॥ व आंबासाल दहा शेर पाठविलें पा।. विशेष काय लिहिणें. हे विनंति.

---

[१७३] ॥ श्रीरामचंद्राय नमः ॥ ६ जून १७४८.

पंत स्वामी प्रतिनिधि.

श्रीरघुराजचरणसेवातत्पर श्रीमंत राजमान्य राजश्री भगवंतराऊ स्वामीचे सेवेसी :—

आज्ञाधारक नारो महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील कुशल छ २० माहे जमादिलाखर जाणून निजानंदवैभव सदैव इच्छितों. विशेष. राजश्री गंगाजी संकपाळ स्वामीचीं पत्रें नबाब-साहेबांकडे घेऊन आलेत. मशारनइलेहीं दरबारांत जो तलाश करावयाचा तो केला. परंतु अर्जी मुख्यास गुजरणावयासी कोण्हीं साह्यता न केली. दरबार थोर. बावीस सुभे हिंदुस्थान व सा सुभे दक्षण, अठाविस सुभियांचें काम या गृहांमध्यें आलें आहे ! ! ! आपलें वर्तमान. पूर्वीं आपण गदक लक्ष्मेश्वर येथील देसाई व्यंकपाया यांचे चाकर होतों. जे समयीं रेडी श्रीमंत राजश्री स्वामीसी भांडत होती, त्याप्रसंगीं देसाईनीहीं आपणास तीनशें स्वार व तीन हजार बारकंदाज समागमें देऊन मदतीस पाठविलें होतें. आपण तीन वर्षें श्रीमंतजीचे

सेवेमध्यें होतों. प्रतापास सर्व जाणत होतों. गंगाजी संकपाळ यांहीं वर्तमान निवेदन करतांच कळों आलें कीं, पत्र हिंदवी आहे. आपणावरी श्रीमंतजी स्वामी कृपा बहुत करीत होते. त्यापरीस विशेष कृपा स्वामींनीं करावी ऐसा मनोरथ चित्तीं धरोन एक दोघा अमिरांसी विचारलें तों त्यांची आज्ञा कीं, हिंदवीपत्र नबाब साहेबास गुजरत नाहीं. हें वृत्त परिच्छिन्न ध्यानास येतांच हिंदवी पत्र फिरविलें. पत्रार्थ ध्यानास आणोन राजश्री गोपाळराम मुनसी यांचे हस्तें फारसी अर्जी तयार करोन, थैली दाखल करोन, दरबारचे मोहोर हशममुल्लाखा पातशाही व बक्षी व अनवरखांजी व फतरुद्दीअल्लीखांजी अर्जबेगी व नजरबेगखांजी बक्षी फौजेचे व ज्यान मिर्जाखा मुनसी व दरगाह कुलीखां दरोगे हरकारे मुसाहेब सरकारचे बहुत व हकीम हसनअल्ली सर्व साधून, माह्यतेवरी आणोन, नजरबेगखां बक्षीचे मा। अर्जी गुजराणिली. हें वर्तमान सर्व गंगाजी संकपाळ यासी विदित आहे. पत्रीं सर्व लिहिलें असेल त्यावरून निवेदन होणार. आणि दरबार येथील श्रम व द्रव्यसाध्यें हातास येतो. गंगाजी रिक्तहस्तें येथें आले. यास द्रव्य कोठें मिळणार? स्वामींचे चरणासी जोड परिच्छिन्न करावी हा हेतू पूर्ण स्मरोन, अनेक उपाय योजून, इनायतनामा दरबारामधून काहाडोन कंठुराय कमळापंत साऊकार यांचे दुकानीं आणिला. स्वामींचें नांव थोर ह्मणून हरएक मुत्सद्दी वगैरे हजारो मागतात. सेवकांनीं तोडजोड करून दरबार खर्च ठरवून आपला जातरुका साहू मजकूरास देऊन, त्या हातीं मुत्सद्दी यांची निशा करविली. तपसील जैल नजरबेगखां बक्षी ५०० रुपये, व मुनसी ५००, व अर्जबेगी ५००, व मुनसीचे पेशकार दोघे व खिजमतगार, चोपदार वगैरे किरकोळ खर्च ५०० एकूण दोन हजार रुपये मोठ्या युक्तीनें ठरावून कार्य संपादिलें. गंगाजीस पैसा मिळत नाहीं ह्मणून अजुरदार कासद करोन सेवेसी पाठविला आहे. येथें रुपये १० नक्त कासदास दिधले. स्वामींनीं तेथें बावीस रुपये सध्यां देऊन रसीद बावीस रुपयांची घेऊन पत्राबरोबर पाठवावी, कीं कासदाचे मिरधियापासून रुपये मुजरा घेतले जातील. पत्राचें उत्तर पत्र सेवेसी प्रविष्ट होतांच ऐवजाची हुंडी व

कोणही आपले सरकारचे मनुष्य समागमें देऊन रवाना करावें. कामदानें १६ रोजांचा वायदा करून आला आहे. याम अविलंबें मार्गस्थ करावें. कासद येथें पावलियावरी राजश्री गोपाळराम व राजश्री शिवराम शामराज उभयता इनायतनामा घेऊन सेवेसी येतात. भेटीअंतीं सर्व वृत्त मनसुबा पेस्तर करावयाचा विचार सत्वरच केला पाहिजे. यांस यासमयीं फौजेचें बहुत अगत्य आहे. इनायतनामा देतेवेळेस नबाबसाहेबीं आज्ञा केली कीं, पन्नास हजार स्वार व पंचवीस हजार बारकंदाज सामान चांगलें घेऊन येणें. सरंजामही तुम्हास जो पाहिजे तो दिधला जाईल. मतलब हाच कीं, जैसे वैकुंठवासी श्रीमंतजीचें नांव थोर आहे तैसाच सामान योजिल्या उत्तम आहे. उभयतांच्या भेटी जाहलियावरी कामें बहुत होतील. या कामांत गंगाजीनें बहुत मेहनत केली. पत्रीं लिहितां विस्तार होतो. मा। हुसेन स्वामीकडोन गंगाजीचे समागमें आला. ते मनुष्य समागमायोग्य नाहीं. कार्याचा नाश यानें बहुत केला. स्वामीचाच प्रताप होता कीं, काम नाश न पावलें. उभयता सेवेसी पावता निवेदन करितील. नबाब साहेबांच्या चित्तीं बहुत आलें आहे कीं, एक वेळ स्वामीनीं यावें आणि भेटीअंतीं स्वामीचें उर्जित करोन मग एकचित्तें जें करावयाचें तें करावें. नबाबाहीं बोलूनही दाखविलें कीं, महाराष्ट्र राज्यामध्यें तुह्मीं बहुत दिवस चाकरी करिता, कामेंही बहुत केलीं असतील, एक वेळ मोंगलाईचीहि मजा येऊन पहाणें, आणि आपला नक्ष करावा. ऐसें वर्तमान आहे. सत्वर भेटीचा विचार जाला ह्मणजे यास फौजेचे जरूर ह्मणोन जागिरा चित्तानरूप मिळतील. आणि मदत खर्चही घेतला जाईल. श्रुत व्हावें. नजरबेगखानाचे पत्राचें उत्तर बहुत थोरपणें लिहून पाठविलें पाहिजे कीं, कितीएक कामें त्यांचे हातें घेतलीं पाहिजेत. ते मुरब्बी आहेत. कळावें हे विनंति.

राजश्री गोपाळराम व शिवराम शामराज यांचे नांवें अभयपत्रें पाठविलीं पाहिजेत. या उभयतांना पाठवावयाकारणें नजरबेगखानजीहीं सांगितलें. मनुष्यें थोर कार्याचीं आहेत. स्वामीचे भेटीअंतीं सर्व कळों येईल. विशेष काय लिहिणें. हे विनंति.

[१७४] ॥ श्री भवानीशंकर ॥ ६ जून १७४८.

राजमान्य राजश्री भगवंतराऊ साहेबांचे सेवेसीः—

छ अखंडितप्रतापयशस्वी परउपकारपरायण सेवक गंगाजी संकपाळ दंडवत विनंति उपरि येथील क्षेम साहेबांचे कृपेकरून वैशाख वद्य ८ जाणून निजानंदवैभवेंलखन अखंडित इच्छित असतों. विशेष. साहेबांची आज्ञा घेऊन रुकसत होतेसमयीं आपणांपासून स्वामींनीं शपथ कार्याची घेतली. याउपरि स्वार जालों, ते शहर औरंगाबादेस पावलों. दरबारामध्यें थैली पावती करावयासी तलास बहुत केला. हिंदवीपत्र कोणीं नबाबास प्रविष्ट करीना. दोन अडीच महिने तलास केला. मग अगत्य काम केलें पाहिजे ह्मणून पहिले राजश्री गोपाळराम व राजश्री नारो महादेव यासी स्नेह होता. यापाशीं येऊन वृत्तांत निवेदन करतांच, याहीं उभयतां एक होऊन हिंदवपित्र थैली काढोन पाहिली. वृत्तांत ध्यानास आणून, पारसीपत्र सिद्ध करोन, थैली दुरुस्त करून, मार्गेश्वरमासीं नारो महादेव यानीं नजरबेगखा बक्षी नबाबाचे फौजेचा याचे मार्फत गुजारणली. थैली पहातांच नजरबेगखानास आज्ञा केली कीं, कृष्णराऊ खटावकर यांचे कोणीं आहेत कीं आणिक कोणी आहेत. कुलवर्तमान ध्यानास आणून अर्ज करणें. त्यावरून नजरबेगखानानीं वर्तमान आणविलें. मग राजश्री नारो महादेव स्वामींचे प्रतापास बहुत दिवस जाणतात. यांहीं वर्तमान स्वामीस लिहून नजरबेगखानापाशीं दिधलें. दुसरे दिवशीं फर्द नबाबास गुजराणिली. स्वामीचें वृत्त ऐकोन बहुत खुशाल जाले कीं, ते येत असले तरी उत्तम आहे, आपण त्यांचें सर्वस्वें चालऊन. इनायतनामा मुनसी यासी ताकीद करून मुखानें तयार करविला. तितकियामधें नजरबेगखा वराडांत खजाना आणावयासी पाठविला. आणि नबाबाचाही कुच होऊन ब-हाणपुरास लष्कर गेलें. राजश्री नारो महादेव यास समागमें घेऊन आपण ब-हाणपुरास गेलों. दरबार थोर. कुलराज्य हिंदुस्थान व दक्षण एकस्थलीं आलें आहे. इनायतनामा हातास यावयासी बहुत दिवस लागले. तलास करोन इनायतनामा करविला. तो नजरबेगखानही खजाना घेऊन लष्करास आलेत. नजर-

बेगखानास साहेबाचे नांवें आपण पत्र लिहून दिधलें होतें. त्यासी साह्य करोन याचे विद्यमानें दरबारचे मोहोर हातास आणून साध्यता त्या हातीं करवून इनायतनामा घेतला. देतेवेळेस नजरबेगखानास नबाब बोलले कीं, तुह्मींहि लिहिणें कीं, जलदी फौजेचा सरंजाम, पन्नास हजार स्वार, पंचतीस हजार बरकंदाज, सामान चांगलें आणणें. सरंजामही माकुल दिधला जाईल. आह्मांस त्यांचें उर्जित करणें अगत्य. त्यांचे वडलांस आपण जाणतों. सत्वर फौजेसहवर्तमान येऊन मुलाजमत करीत त्यांचे मुदेगाफिक सर्व होऊन येईल. भेटीउपरि खर्चाचीहि मदत केली जाईल. ऐसी आज्ञा नजरबेगखानास जाली. त्यावरून खान मजकूर याणीं सेवेसी पत्र लिहिलें आहे. त्यावरून निवेदन होणार. साहेबापासून या मुलकांत आलिया शहरचा मोकदमा आणि महागाईही बहुत. खर्चवेचास बहुत हैराण जालों. पत्रीं लिहितां विस्तार होतो. साहेबांचे नांवावरी चौबे भले मनुष्यांहीं संगत द्यावयाची ते दिधली. खर्चवेंचाहि पुरविला. आणि मुत्सद्दीयांहीं थोर नांव ऐकोन मोठें तोंड पसरलें. अनेक उपाय रचोन दरबारखर्च नजरबेगखान ५०० रुपये व मूसा ५०० रुपये, अर्जबेगी ५०० रुपये व पेशकार मुनसी व दरबारचे खिजमतगार, चोपदार वगैरे किरकोळ रुपये ५००, एकूण दोन हजार रुपये मोकरार करून इनायतनामा कंठुराय कमलापंत साउकार यांचे दुकानीं ठेविला. आणि रोखा राजश्री नारो महादेव याणीं एका महिनियाचे वाइदियानें दिधला. साउकाराकडोन मुत्सद्दीयांची निशा करविली. मग आपण अवरंगाबादेस आलों. येथें पैशाचा तलाश करावयाचा तो केला. परंतु द्रव्य साध्य जालें नाहीं. ह्मणून कासद अजुरदार अजुरा रुपये ३२ मोकरार करून १६ रोजांचे वायदियानें सेवेसी पाठविला आहे. येथें १० रुपये सध्यां कासदास दिधले. रुपये वीस साहेबीं कासदास देऊन रसीद लिहून घेऊन येथें या कासदाबरोबर रसीद पाठविली पाहिजे कीं, मुजरा घेतले पाहिजेत. दरबारखर्च लिहिलेप्रमाणें कासदाबरोबर कोणी इतबारी माणूस देऊन पाठविले पाहिजे कीं, तो आपले हातें ज्याचा करार त्यास देऊन इनायत-

नामा घेऊन सेवेसी पोंहचतो. साहेबीं रुकसतसमयीं आज्ञा केली होती कीं, दरबार खर्च काय लागेल. आपण विनंति केली होती कीं, हे मोईन नाहीं. जे वेळेस जें ठरेल ते विनंति केली जाईल. त्यास सांप्रत इनायतनामा द्यावयासी दोन हजार रुपये लागले. या वेगळा पोटखर्च राजश्री गोपाळराम व राजश्री नारो महादेव व राजश्री शिवराम शामराज तिघे भले मनुष्य यांहीं आपले पदरचा आज्ञासगट खाऊन कार्य केलें. नजरबेगखानाहीं गोपाळराम व शिवराम शामराज उभयतांस सेवेसी पाठवावयाचे सा। आहे. यांचे विद्यमानें जो विचार करणें तो करून सत्वर मुलाजमतीचा मनसुबा करणें ह्मणून सांगितलें आहे. त्यास, उभयतांचे नांवें आज्ञापत्रेंहि पाठवावीं, कीं गृहस्थ निर्भय चित्तें सेवेसी येऊन मनसुबा थाट करतील. फौजेचे तजविजेमध्येंही असावयास अगत्यही आहे. ऐसियामध्यें मनसुबा योजोन आला तरी आपले मुद्दमाफींक कार्य होऊन येईल. जागिरा व मदत खर्च चांगला घेतला जाईल. जमाव पडले. साहेबीं शपथ घेतली ह्मणून शरीरश्रम करोन कार्य केलें. आतां सर्व अभिमान साहेबास आहे. देखतपत्र ऐवज जासूद पत्र-उत्तर पाठविलें पाहिजे. दिवस जातात. कळलें पाहिजे. पांच महिने जाले कीं, शेख अहमद व सुभाना जासूद पत्र देऊन पाठविला. पा। कीं नाहीं, संशय आहे. मुलामाणसांची खबर कांहीं नाहीं. साहेब धणी आहेत. परामृश करोन उत्तर पाठविलें पाहिजे. मा। हुसेन समागमें दिधला. त्याची स्थित पत्रीं लिहितां नये. काम खराब जालें होतें. परंतु तिघे गृहस्थ मातबर यांची भीड पडोन काम जालें. याची स्तुत लिहितां पत्र विस्तारेल. भेटीअंतीं सर्व निवेदन करूं हे विनंति.

---

[१७९] श्री. ६ जून १७४८.

राजमान्य राजश्री राऊसाहेब भगवंतरायजी स्वामींचे सेवेसीः—

छ अखंडलक्ष्मीमुप्रसन्न राजमुद्राविराजित सो। गंगाजी संकपाळ, मुकाम शहर अवरंगाबाद विनंति उपरि येथील कुशल छ २० जमादिलाखर जाणून निजानंदलेखन सदैव इच्छितों. विशेष. अजूरदार

कासद व रायाजी व सिदोजी जामुदांबरोबर पत्रें व खलित्या व लखोटे पाठविले, ते शहरीं प्रविष्ट जाले. येथील वर्तमान सर्व राजश्री नारो महादेव यांचे पत्रीं लिहिलें आहे, त्यावरून कळों येईल. येथें कार्याची उभारणी करावयासी आळस केला नाहीं. अगत्य जाहलें, ह्मणून अजूरदार कासद सेवेसी पाठविला. त्यासी उत्तर साफ आलें. येथें पैसा मिळत नाहीं, ह्मणून पत्रीं लिहिलें होतें. आणि उत्तरें ऐसीं आलीं. ऐसियासि, आपला इलाज काय? सर्व रायाजी व सिदोजी रोबरो पाहून आले आहेत, निवेदन करितील. तें ध्यानास आणून साहित्य येऊन पोहोचत आहे, तरी सर्वही होऊन येतें. याहीवरी सरदार आहेत! सांप्रत साउकारांस रोखा राजश्री नारो महादेव यांणीं दिधला आहे. त्यास तकाजा बहुत आहे. त्याचें साहित्य होऊन येईल, तरी उत्तम आहे. साहेबीं वचन इमानप्रमाण घेतलें ह्मणून हें कार्य करणें आलें. अभिमान सर्व साहेबांस आहे. अभिमानपूर्वक साहित्य प्रविष्ट जालिया यशकीर्ति स्वामीची आहे. आणि साहेबाचेंहि कार्य थोर होऊन येतें. कळलें पाहिजे. विशेष काय लिहिणें. हे विनंति.

---

[१७६] ॥ श्रीभवानीशंकर ॥ १९ आगस्ट १७४८.

श्रीमंत राजमान्य राजश्री शिवरामपंत व ता। राजश्री कृष्णराऊ स्वामींचे सेवेसी :—

सेवक नारो महादेव साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून निजानंदलेखनार्थ आज्ञा इच्छितों. विशेष. कृपा करून पत्रीं सनाथ केलें. उत्तम समयीं प्रविष्ट होऊन परम संतोष जाहला. येथील सर्व भावगर्भ श्रीमंत राजश्री रायांचे पत्रीं लिहिलें आहे. ध्यानास आणून सरंजामाची रवानगी अति अविलंबें येऊन पोंहोचते तरी सर्व कार्याची उभारणी होऊन येते. स्वामी प्रसंगीं सुज्ञ आहेत. हें कार्य सर्व स्वामींचे उर्जितांचें आहे. आपलें उर्जित उत्तम प्रकारें करणें

आहे. तरी श्रीमंतजीस विनंति करून सरंजाम व वस्त्रें अविलंब पावतीं जालींत, ह्मणजे सर्व होऊन येईल. याहिवरी स्वामी सुज्ञ व सरदार आहेत. जें विचारास येईल तें करतील. येथें सामाईन पावलियाचे वेगळें कांहीं कार्य होत नाहीं, ऐसें परिच्छिन्न जाणून जें चित्तास येईल तें करावें. विशेष काय लिहिणें. हे विनंति.

---

[१७७] श्री. १९ आगष्ट १७४८.

श्रीमंत राजश्री शिवरामपंत व राजश्री कृष्णरावजी स्वामींसः—

विनंति सेवक नारो महादेव मुकाम शहर अवरंगाबाद साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील कुशल भाद्रपद शुा ७ शुक्रवारपर्यंत स्वामीचे कृपेकरोन यथास्थित असे. विशेष. बहुत दिवस जाले. परंतु अभय पत्र पाठवून सो परामृश न केला. हें अपूर्व दिसोन आलें. इकडील वर्तमान सविस्तर माा राा रावसाहेब यांचे पत्रीं लिहिलें आहे, त्यावरून विदित होईल. आणि राजश्री रावसाहेब हें कार्य स्वामीसच करोन देणार, आणि स्वामी निष्ठुर बसले आहेत, हें अपूर्व आहे! जर हें कार्य स्वामीस कर्तव्य नसलें तरी गंगाजीस सत्वर पाठविजे. ज्याच्या वडिलीं घोडे कधीं दृष्टीस पाहिले नव्हते, ते या राज्यांत येऊन पंच-हजारी मनसबदार जाले! आणि स्वामीस तों नबाब साहेब आपणहून चहातात. वारंवार आपल्या वडिलांची स्तुति करितात. आणि बहुत खुश आहेत जे, राजश्री राव येथें आलिया उत्तम आहे. तरी स्वामींनीं हें कार्य चित्तीं भरून कीजे. तरी तुह्मीं माा राा रावसाहेब यासी सांगून गंगाजीस व आपला कोणी इतबारी असेल त्यासी पाठविजे. त्याच्या मार्फतीनें कार्यभाग केला जाईल. या कामास विलंब न कीजे. उत्तर व गंगाजीस सत्वर पाठविजे. हे विनंति.

जासूद
आपाजी
मलकोजी.

[१७८] श्री. १२ आगस्ट १७४८.

श्रीमंत राजश्री भगवंतराऊ रामचंद्र हुकुमतपन्हा स्वामीचे सेवेसीः—

विनंति सेवक नारो महादेव मुक्काम शहर अवरंगाबाद करद्वय जोडोन साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील कुशल भाद्रपद शुद्ध सप्तमी शुक्रवारपर्यंत स्वामीचे कृपाप्रांतवळेंकरोन यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं सिदोजी व राऊजी हरकारी यांजबरोबर पत्रें पाठविलीं तें पावलीं. त्यांत आज्ञा केली जे, नबाब नासरजंग यांसी अर्जी देणें. त्यावरून अर्जी तयार करोन छ १४ शाबानीं तिसरा प्रहरा शेर स्वारींत नजरबेगखान बक्षी यांच्या माफीतीनें गुजराणिली. नबाबांनीं अर्जी पाहोन बहुत खुश जाले, आणि नजरबेगखानास आज्ञा केली जे, इनायतनामा सिताब तयार होय आणि राऊजी सत्वर येऊन पोहोचत, त्यांचा आपल्या सरकारांत बहुत दिरिंग दिसोन येतो. आणि आपण तों स्वामीचेच नांवावर जागिराचाही फर्द दिल्हा. त्याचा नबाबाहीं जाब दिल्हा जे, रा। उदाजी चव्हाण यांची जहागीर अकरा लक्षांची विजापूर प्रांतीं देतों, बाकी जहागीर वराड प्रांतीं देतों. ऐसा करार नजरबेगखांजीशीं केला. आपणहि रुबरु होतों. त्यासी, बजिन्नस नजरबेगखांजी याणींहि पत्र सेवेसी लिहिलें आहे. आपण जे कांहीं विनंति पत्रें लिहितों त्यांचा अर्थ घडोन येत नाहीं. तस्मात् दिसोन आलें जे, स्वामीचे चित्तांत हें कार्य कर्तव्य नाहीं. तरी नाहक तहखर्चाखालें काशास यावें. ऐसेंच असेल तरी आह्मास तैसेंच उत्तर लिहिणें. आपण या कामांत एकंदर नाहीं, आणि नबाब साहेबांसही अर्जी देऊजे, त्यांचें येणें होत नाहीं. आणि जो कोणी मोंग-लाईंत आला आहे तो कोणी श्रमी झाला नाहीं. पदासच चढला. आणिख जाणें पूर जालें हें आपणही परस्पर ऐकिलें असेल. आणि स्वराज्यांत होते तेव्हांही स्वामीस विदितच होतें जे, कोणकोण रीतीनें नांवलौकिक होता, आणि सरंजाम कोणें प्रकारें होता. ऐसा प्रकार असोन स्वामीचा तो नांवलौकिक थोर असोन, नबाबसाहेब आपणहून हमेशा स्मरण करीत असतां, न यावें हें अपूर्व दिसोन आलें. राजश्री बाळाजी बाजीराव यांपेक्षां

स्वामीस नवाबसाहेब बहुत चहातात. आणि नबाब आसफज्याहा यांसी सांगून गेले जे, कुल मऱ्हाटे राज्यांतील सरदार यांचे पायजाम आहेत. ऐशियावरोन नवाबसाहेब बहुत चहातात आणि जैसी फौज येईल तैसी जहागीरही देतील. आणि मुलाजमत जालिया मदत-खर्चही उमदा देतील. ऐसें असोन महाराज चित्तीं कार्य न धरीत हें अपूर्व आहे. तरी आतां नबाब नासरजंग यांची नजर सवाशे मोहरा गुजराणावी लागतात. व वस्त्रें व दरबारखर्च व आपला सरंजाम देऊन राजश्री गंगाजी संकपाळ यासी सत्वर रवाना करोन पाठविजे. सर्व कार्य विजयादशमीपावेतों होऊन आलें तरी उत्तम. नाहीं तरी, पुढें कांहीं बेत नाहीं. गंगाजीस सत्वर पाठविजे. कासीद पाठवावा त्यासी अजुरा पोहोचत नाहीं. याकरितां कासीद येयास अनमान करितात. पथंपूर येथें कासिदानीं रुपये १० दहा आह्मांपासोन घेतले. तरी गंगाजीस सत्वर पाठविजे. फौजच तिकडे अनुकूल पडत नसली, तरी येथें पांच हजार स्वार तयार आहेत. बितपशील:— जमादार हकीम-बेगजी स्वार ५००, व खोजे रहिमतुल्ला स्वार ५००, भिवसिंग स्वार ५००, व शिदोजी पाटील जलगांवकर स्वार ५००, व खानदेशांत जमातदार स्वार १०००. आणिकही कितेक लोक उमेदवार आहेत. तरी यांचे नांवें कौल वेगळे वेगळे पाठविजे. येथें जनांत आणि दरबारांत हास होय तें न कीजे. आज दहा महिने या कामास जाहले. परंतु पैसा दृष्टीस येत नाहीं. येथें तों आधीं पैसा खर्च केलियावेगळें कार्य होत नाहीं. हे गंगाजीनेंही सेवेसी विनंति केली असेल. तरी गंगाजीस सरंजाम देऊन सत्वर पाठविजे. राजश्री पिलाजी जाधवराव यांचा लेक राजश्री जोत्याजी जाधव हेहि येऊन नबाब साहेबांस भेटले. त्यांसी मदतखर्च लक्ष रुपये दिल्हे. आणि जहागिरा चौलक्ष्याच्या दिल्या. महाल उंडणगांव वगैरे महाल गुलजार दिले. स्वामीस विदित होय. येथील कैफीयत आपाजी जासूद सांगतां विदित होईल. आपाजीस व राजश्री गंगाजी संकपाळ यासी सत्वर पाठविणें. विलंब न करणें. राजश्री मल्हारजी होळकर हेहि पातशाही

चाकर जाले. त्यांना मुलूक जहागीर हजुरीहून माळव्यांत दिल्ही. व यशवंतराव पोवार यांसीहि जहागीर माळवा प्रांतीं दिल्ही. आणि किताब पंचहजारी साहेबनौबद केले. आंवदा रा। बाळाजी बाजीराव पेशवा याचा व नबाबसाहेब यांचा कटाक्ष बहुत आहे. यामुळें व आणीक कितेका कार्यामुळें नबाबसाहेब यांस फौजेची बहुत जरूरी आहे. तरी स्वामींनीं आपला दुर्गसरंजाम सत्वर पाठविजे. दरिंग करावयाचें कार्य नाहीं. यावर महाराज थोर आहेत. आपण वारंवार लिहितों आणि स्वामी चित्तीं धरीत नाहींत. तस्मात् दिसोन आलें जे, आपणांस कार्याचें अगत्य नाहीं. अगर आमचा व गंगाजी संकपाळ यांचा इतबार नसेल. तरी साहेबीं आपला कोणी जो इतबारी असेल त्यासी पाठविजे. त्यांची व नबाब साहेबांची मुलाजमत करून देऊं आणि त्यांचे मार्फतीनें कार्य-भाग केला जाईल. सत्वर पाठविजे. लोकांत बदनक्ष होय तें न कीजे. नबाब साहेब वारंवार आपलें स्मरण करितात जे, मा। रा। राऊ सत्वर येत तरी उत्तम आहे. यावर महाराज समर्थ आहेत. सांप्रत महाराज राजश्री छत्रपति स्वामी यांचीं वस्त्रें व घोडे व हत्ती व जंबूर छ १ रमजानीं त्रितीय प्रहरीं नजर गुजराणली. व राजश्री पेशवे यांचीं वस्त्रें जवाहीर व एक हत्ती, पांच घोडे व नजर मोहरा सहस्र एक छ ९ रमजानीं नजर गुजराणली. आणीक राऊ फतेसिंग व रघोजी भोसले यांच्या नजरा आल्या आहेत. गुजरतील. व बहिरजी पांढरे छ २४ शाबानीं येऊन नबाब साहेब यांची मुलाजमत केली. व दमाजी गायकवाड यांचा वकील येऊन नबाब साहेबास भेटला. नबाबसाहेबीं नजरबेगखान बक्षी, बहिरोजी पवार, पेशवा आणावयास पाठविले आहेत. दमाजी गायकवाड यांनीं तीन क्रोड रुपये नजर कबूल केली, आणि मोंगलाईंत येतात. आणि आपणास तों नबाब साहेब आपण ह्मणून चहातात. ऐसें असतां अपूर्व आहे जे, स्वामी चित्तीं धरीत नाहींत! सर्वाविषयीं स्वामी समर्थ आहेत. उभय राज्यांत स्वामीचें नांव थोर आहे. आणि हा समय फिरोन येणार नाहीं. नवा राजा जाला आहे. येथेंही निजामनूमुलूक यामागें सर्व नूतन व्यवहार जाहला आहे. या संधींत जो जडला तो अक्षयी जाला. ऐशा समयांत जो

नबाबसाहेबांस जो अर्ज जागिरा व मनसबा व मदतखर्च मुलाजमत जालिया कराल तो घडोन येईल. त्यासी अविलंब ! ! आपाजी व मलकोजी जासूद यांजबरोबर आपला कोणी इतबारी असेल तो, व गंगाजी संकपाळ व खर्चास तपशील :—पेशजी इनायतनामा नबाब थोरले यांचा दरबारखर्च रुपये दोन हजार, व हालीं नबाब नासरजंग यांच्या इनायतनामियाचा खर्च रुपये चार हजार, नजर नबाब साहेबांची आपलें स्वरूपान योग्य, व मुत्सद्दियांस वस्त्रें आपला कोणी इतबारी पाठवाल त्याजबरोबर पाठविजे, कीं कार्य सत्वर घडोन ये. हा सरंजाम येथें पोहोंचलियानें येथील बंदोबस्त करून राजश्री गोपाळराम व राजश्री शिवराम शामराज व राजश्री राजारामपंत गुा कठोराम साउकार इनायतनामा नबाब साहेबांचा घेऊन सेवेसी पोहोंचतील. सांप्रत थोरले नबाब साहेब यांचा इनायतनामा व पत्रें नजरबेगखान बक्षी व हाकीमबेगखांजी जमातदार मातबर व एक पत्र आह्मांस नजरबेगखान याहीं लिहिलें आहे, तें बजिनस पाठविलें आहे. याचा अर्थ पारसनवीस बोलावून अक्षरशः अन्वयें ध्यानास आणावा. ह्मणजे समाधान होईल. स्वामीच्या नांवावर कुल अम्मलदार व मुत्सद्दी बहुत खुशवक्त आहेत, कीं ऐसे थोर सरदार या प्रसंगीं असतां बहुत उत्तम आहे. यावर जें विचारास येईल तें कीजे, आणि आह्मांस साउकारापासून मुक्त कीजे. आपाजी व मलकोजी यांसी अजुरा रुपये ३२ व पहिले जोडा १ जासूद पाठविले होते, यांची बाकी रुपये १०, एकूण रुपये ४२ बेताळीस यांचे पदरीं घालणें. यांनीं स्वामीच्या कार्यामध्यें श्रम बहुत केले आहेत. यांसी वस्त्रें द्यावीं. सत्वर मार्गस्त कीजे. पंधरा दिवसांचे वायदियानें आले आहेत. पंथ दूर आहे. तिकडे यावयास मनुष्य अनमान करीत आहेत. वर्तमान तों इकडील तिकडे आलें पाहिजे. अजुरा तो भारी पडतो. आज्ञा येईल तरी चार जोड जासूद ठेविले जातील. सांप्रत आपाजी व मलकोजी सेवेसी आले आहेत, यांस सही करावे. आपाजी मनुष्य कामचंग मोंगलाईत वाकीफ आहे. याचा दरमहा मोकरा गौर करार कीजे. येथील सर्व अभिपाय आपाजी सेवेसी निवेदन करितां कळों येईल.

---

[१७९] श्री. ९ आक्टोबर १७४८.

श्रीमंत राजश्री शिवरामपंत व राजश्री कृष्णराऊजी स्वामीचे सेवेसीः--

पो नारो महादेव मुक्काम अवरंगाबाद साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील कुशल ता। छ २२ सवालपर्यंत यथास्थित असो. विशेष. इकडील वर्तमान श्रीमंत मा। राजश्री राऊसाहेबास लिहिलें आहे, त्यावरून श्रुत होईल. जर तुह्मांस कार्य कर्तव्य असेल तरी श्रीमंत राजश्री राऊजीस विनंति करोन कांहीं खर्चास व कोण्ही इतबारी पाठविजे. कार्य करणें जर चित्तांत कर्तव्य नसेल तरी तैसेंच उत्तर पाठविजे. लोभ असो दीजे. यमाजी जासूद जोडी एक पाठिवला. यासी अजुरा रुपये २२. त्यापैकीं रुपये ५ पांच आपण दिल्हे. बाकी रुपये १७ आपण दीजे. हे विनंति.

---

[१८०] श्री. ९ आक्टोबर १७४८.

पुरवणी राजश्री पंत स्वामीचे सेवेसी.

विनंति उपरि. स्वामीनें गतवर्षी अनंतभट व बाळंभट रुईकर यांजपासून मोहरा १९॥ व रु० १७ देविले. त्यास, जमान नीळकंठभट रुईकर आहे. ऐसियास, मुदती श्रावणांतील केली. ते येऊन गेली त्याजवर आह्मीं भाद्रपदमासीं सेख सटू वसुलास अनंतभटाकडे पाठविला. तेव्हां गांवास आला नव्हता, ह्मणोन रिकामाच फिरोन आला. याजवरी कालीं आह्मीं अवरंगाबादेहून येतेसमयीं स्वामींचीं पत्रें व आपलीं पत्रें व खताची नक्कल ऐसी देऊन सेख सटूस छ १ सफरीं त्रिंबकास अनंतभटाकडे पाठविला. याणें जाऊन पत्रें दिधलीं. अनंतभट व बाळंभट भेटला. त्यास पत्रें देऊन पैकियाचें मागणें लाविलें. तेव्हां त्याणें जाऊन शहरचे फौजदारापाशीं फिर्याद केली. आणि त्यास अंतस्थ लाच रुपये ४० देऊन त्यांच्या प्यादियापासोन धरून सेख सटूस खोडियांत अवघ्र आठ दिवस घालविले. तेव्हां आह्मीं उमरखानाचे पत्र पाठवून सोडवून आणविला. ऐसे भट लोक होऊन त्रिंबकांतील

पास जाहले आहेत!!! याउपर रुपये त्याजपासून येत नाहींत. त्याचे जमान नीलकंठभट तेथें स्वामीपाशीं आहेत. त्यास तेथेंच जमान घेऊन त्यासी नसिहत करून पाठवावया आज्ञा करावी. ह्मणजे अनंतभटाबाबती रुपये नीलकंठभटापासून वसूल घेऊन. याउपर स्वामीनें या रुईकराचा इतबार सहसा धरिला न पाहिजे. स्वामीपाशीं येऊन गरिबी दाखविताती. परंतु हे लोक ऐसे मवाशीनें वर्तणूक करितातो. तर नीलकंठभटाची बळकटी करून पाठाविला पाहिजे. सेवेशी श्रुत होय. याउपर रुईकराचा इतबार गेला. स्वामीनें याचा विश्वास न धरावा. हे लोक भले मनुष्य नव्हेत. अपहार करावयाचे लोक आहेत. तर यांजपासून द्रव्य हातास ये ऐसी योजना केली पाहिजे. सेवेसी सूचना मात्र लिहिली असे. श्रुत होय.

---

[१८१] श्री. ९ आक्टोबर १७४८.

श्रीमंत राजश्री भगवंतराऊजी सा। सेवेसीः—

विनंति सेवक नारो महादेव मुक्काम शहर अवरंगाबाद साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील कुशल ता। छ २२ सवाल पावेतों स्वामीच्या कृपेकरून यथास्थित असे. विशेष. बहुत दिवस जाले महाराजाकडील कांहीं वर्तमान कळों आलें नाहीं. त्यावरून चित्त उद्विग्न आहे. विशेष. आपाजी व मल्कोजी हरकारे जोडी १ नबाब साहेबांचा इनायतनामा व पत्रें देऊन पाठविला. त्यासी आज सवा महिना जाला. परंतु सेवेसी पावला किंवा मार्गीं नदींत बुडाले हें नकळे. येथें तों आपणास रोज उठोन ताकीद करितात जे, मा। रा। राऊजी आले किंवा नाहींत. ऐसा विचार येथें आहे. आणि स्वामीस तों या गोष्टीचें स्मरणही नसेल, ऐसें दिसोन येतें. येथें नबाब नासरजंग यांचा इनायतनामा तयार होऊन पडला आहे. परंतु महाराजाकडील कांहीं वर्तमानच कळों येत नाहीं, त्यासी आपण काय करावें? आपणास पूर्वींच कळतें जे, हा कारभार अवघा सत्यच आहे,

तरी आपण या कर्मांत न पडतों. परंतु गंगाजी संकपाळ यानें कितीएक प्रकारें आह्मांसी आणशपथ केली. आणि आपणही पूर्वींपासून जाणतों जे, स्वामीचा दरबार एकवचनी. ऐसें जाणोन आपण या कामांत आलों नाहीं. तरी आपण कांहीं उपाशीं मरत नव्हतों. तुमचे कृपेंकरून सर्व अनुकूल होतें. परंतु हें कर्म अवलंबिलियानें इतकें जालें जे, दहा मुत्सद्दियांत लटिका वाद आला, आणि साउकारियांत पत खोटी दिसोन आली! हें मिळविलें ऐसें जालें! त्यासी, आपण इतकें उपरोधून लिहितों. परंतु येथें लहानथोर अंमलदार कुल जमा जाले आहेत. आणि नबाबसाहेबीं दोन चार वेळां स्मरण केलें जे, राजश्री राऊजी अद्याप न आले. नबाब कुच करोन काळ्या चौत्रियावर डेरे जाले आहेत. दिवाळी जालिया भागानगराकडे जायाचा निश्चय आहे. यावर न कळे. जर आपल्या चित्तांत हें कार्य कर्तव्य असलें तरी कांहीं खर्चास व कोणी इतबारी पाठविजे. सर्व मनोदयाप्रमाणें घडोन येईल. नाहीं तरी तैसेंच उत्तर पाठविजे. त्यावरोन नबाब साहेबांस अर्जी देऊन, ते येत नाहींत. येथें जागिराची फर्द लिहून द्यावी, तरी आपणापाशीं मोहरही नाहीं, आणि तुमचाही कांहीं आश्रय दिसोन येत नाहीं. याकारितां आपण कांहीं बोली केली नाहीं. दिल्लीचें वर्तमान तर, पातशहा आगरियास आले. यासीही फर्मान आला आहे. याकारितां यानींही कुच केलें आहे. ऐसियांत आलिया उत्तम आहे. सर्व मनोदयाप्रमाणें घडोन येईल. यावर स्वामी समर्थ आहेत. तरी कृपा करोन गंगाजी संकपाळ यासी येथवर पाठविजे. आपला जिमा सारुत करोन जाईल. नबाब नासरजंग यांचा इनायतनामा पाठवावा तरी साउकाराचे घरीं आहे. विना त्याचा पैका दिलियावेगळा हातास येत नाहीं. आपणांकडील तों पैसा एक दृष्टीस पडत नाहीं. याकारितां साउकारास खरेंपण वाटत नाहीं. यगाजी हरकारे दोघे पाठविले आहेत. यासी अजुरा रुपये २२ देणें, अतःपर उत्तर आलिया मनुष्य पाठविणार नाहीं. स्वामीस कार्य कर्तव्य नाहीं आणि आपण नाहाक श्रम करावे, यांत जीव नाहीं. तरी गंगाजीस

पाठविजे. कृपालोभ असो दीजे. हे विज्ञप्ति. यमाजीस अजुरा रुपये २२ त्यापैकीं येथें दिले रुपये ६, बाकी देणें रुपये १६. हे विनंति. सांप्रत वर्तमान दाभाडे यांचीं वस्त्रें व घोडे २ व नजर ५०० मोहरा आल्यात. व राणा उदेपूरकर व सवाई जेसिंग यांचीं वस्त्रें वैगेरे नबाबसाहेबांस आलींत. हुजुरून एक फर्मान पहिले आला होता. सांप्रत फर्मान व हत्ती एक व पांच घोडे व कलगी व सिरपेच व मोतियाची माळ व वस्त्रें व तरवार आली. बदस्तुर साबिला मोठे नबाब हे बहाल जाले. यामुळें नबाब नासरजंग बहुत खुशवखत आहेत. या खुशवखतीमध्यें स्वामीचें स्मरण जालें. लहान थोर अमिरांस कळों आलें कीं, राऊ येथें येतात. राजश्री प्रधान यांसही परस्परें श्रुत जालें कीं, राऊजींहीं या दरबारांत परिश्रम केला. नबाबांनीं बहुत चहा करोन बोलाविलें आहे, ऐसें जनामध्यें प्रसिद्ध जालें. आणि स्वामीकडील वर्तमान, गंगाजी संकपाळ गेलियासी पांच महिने होत आले, आणि आपाजी व मलकोजी जासूद जोडी गेलियास आज दोन महिने जाले, अद्याप कोणी फिरत नाहीं. स्वामी सरदार व मनसुबा उमदा जाणून या कार्यांत आलों. तेथें मनसुबा उत्तम दिसोन येत नाहीं. याचा भावगर्भ काय तो न कळे. पत्रें येथून वर्तमान सर्व लिहून सेवेसी पाठवितों. आपले दृष्टीस स्वामी अवलोकितात कीं नाहीं, हेंही कळत नाहीं. थोरपणास लौकिक राहे, आणि श्रीमंत कैलासवासी यांच्या नांवापरीस विशेष कीर्ति होय, जनामध्यें हांसें न होय, तें केलें पाहिजे. स्वामीचे नांवास दहा वीस हजार रुपये खर्च जाले. ते बहुत नाहींत. काम थोर आहे. न जाणो आपण काय तजविजीमधें आहेत. आपलें नेत्र अहर्निस तिकडे लागून राहिले आहेत. तेथें दरबारांत ज्या थोर लोकांचे विद्यमानें कार्याची उभारणी केली आहे, त्यांचीं माणसें नित्य येऊन शरमिंदे करितात. नजरबेगखांजी नित्य ह्मणतात कीं, ऐसें न करणें कीं, मजवरी शब्द ये. माझें कार्य नासलें. नवे दिगर जाले तरी मजवरी इतराज होतील, कीं लटिका मनसुबा तुमचा आहे. ऐसें वर्तमान येथील आहे. स्वामीस आपल्या नांवासारखें कर्तव्य तरी दोन्ही इनायत-

नामियांचा खर्च रुपये सा हजार व वस्त्रें वगैरे सरंजाम पाठवून देणें. कार्याची तरतूद केली जाईल. कर्तव्य नसलें तरी स्पष्ट उत्तर लिहावें, कीं आह्मांस कर्तव्य नाहीं. आणि गंगाजीस अतिसत्वर पाठवणें, कीं आह्मांस साउकारापासून मुक्त करून जाई. बहुत काय लिहिणें. हे विनंति.

---

[१८२] श्रीराम. ९ आक्टोबर १७४८.

श्रीमंतजीचे सेवेसी विनंति ऐसीजे:—

पूर्वीं आपाजी मलकोजी जासूद याजबरोबर पत्र लिहिलें आहे कीं, पांच हजार स्वारांची बेगमी येथें केली आहे. जमातदारांचीं नांवें पूर्वीं लिहिलीं आहेत. त्यावरून कळों आलें असेल. सांप्रत आपाजी वगैरे जासुदांस दोन महिने जाले, न आले. ह्मणून वसवास झाला कीं, मार्गीं नदीनाला व चोर वगैरे कांहीं उपद्रव जाला. मारले गेले. ह्मणून येमाजी रंगोजी जोडी पाठविणें अगत्य जालें. स्वामीस या कार्याची उभारणी करणें अगत्य असलें तरी उत्तर तैसेंच लिहावें. आणि जमातदार यांचे वकील हजर आहेत त्यांचे नांवें कौल पाठविणें. हकीमबेग जमातदार राऊत ९०० व खोजे रहमतुला जमादार ९०० व सिदोजी जळगांऊकर पाटील ९०० व भीमसेन हजारी १००० व खानदेशचे जमातदार नामीबचुमिया व चांदसाहेब व अलीसाहेब फारोखी दखनी १९०० राऊत चांगले नामांकित तजवीज केले आहेत. यांचे नांवें कौल आधीं अलाहिदे पाठविले पाहिजेत कीं, ते चांगले घोडे व राऊत करतील. अथवा हें कार्य करणें नाहीं, तरी खरें उत्तर साफ पाठवणें कीं, आपण या कामापासून दूर आहों. हात उचलून एक वरीस जालें कीं, या कामांत आपण श्रम करितों आणि हा काळपर्यंत जाबसालच पुरता नाहीं. मग काम कधीं होणार? स्वामीचा दरबार एकवचनी थोर ह्मणून श्रम केले. दिसोन आलें कीं, श्रम साध्य नाहीं. नस्ता सर्व अमीर व मुत्सद्दि-यामध्यें लटिका वाद आला. नित्य थोर लोकाशीं मिथ्या किती बोलावें.

व दरबार मोंगलाई आहे. येथें एक वेळ लटकें पडलें ह्मणजे मनुष्यास पुन्हा जवळ उभें राहूं देत नाहींत. येथील रव या प्रकारचा. स्वामी-कडील उत्तर निर्मळ येत नाहीं. मध्यस्थानें कोठपावेतों मिथ्या भाषण करावें? हें कर्म कार्याचें नाहीं. देखत पत्र कर्तव्य असलें तरी सरंजाम लिहिलेप्रमाणें पाठविणें. कर्तव्य नाहीं तरी उत्तर साफ व गंगाजी संकपाळ यास अतिसत्वर जासुदाबरोबर पाठवणें. विलंब करावयाचें कार्य नाहीं. स्वामी समर्थ व सुज्ञाप्रति विशेष लिहिणें नलगे. हे विनंति.

पेशवियांचें व यांचें चित्त शुद्ध नाहीं. चंपाषष्ठी जाहलियावरी यांचा त्यांचा हर्षामर्ष होऊन युद्धप्रसंग होणार. ऐसियामधें जमलें तरी चित्तानुरूप कार्य होईल. तेथें फौजेचा सरंजाम होत नसला तरी राजश्री शिवरामपंतास एक हजार स्वार समागमें देऊन कांहीं खर्च देऊन पाठविजे. येथें जुळू मुलाजमत करवून मग राजश्री कृष्ण-राऊजीस बोलाविलें जाईल. सरंजामही होऊन येईल. जागिराचें काम फत्ते केलें जाईल. विनंति. अडिच शेर गहू व अर्धा तूर १ रुपयाचे जासुदाबरोबर पाठविजे. विनंति.

---

[१८३] श्री. १७५०

विनंति उपरि येथें वर्तमान ऐकतों जेः—

पाणगांवमधें राजा असे. तो निघोन सप्तऋषीस येत असे. त्यास हें वर्तमान आपल्यास विदित आहे कीं नाहीं हें कळत नाहीं. कोणत्या विचारें येतात हें कळत नाहीं. यावें, यामधें उत्तम नाहीं. सौभाग्यवती मातुःश्री सकवरबाईचा मजकूर तर आपल्यास विदितच असे. त्याचें मानस एक प्रकार असे. ती चिंतितात जेः— एक वेळ आपले हातीं यावा, मग ईश्वर असे. महाराजाच्या चित्तांतील शोध घ्यावा, तर तूर्त समाधान नाहीं. यास्तव घनीन जवळ असे. बोलतां येत नाहीं. बरे जाहलेवर चित्तांतील शोध करून लिहून पाठवितों. तंवर उतावळी करून आणाल तर न आणणें. येथें

आलेवर परिणाम बरा नाहीं. तुह्मीं सुखरूप राहणें, राजश्री बरे जाहलेवर आह्मीं निरोप घेऊन येतों. मग आपले चित्तामधें जावयाचें असेल तर निरोप देऊं. परंतु तुह्मीं तूर्त आहे ऐसाच असो देणें. तुह्मीं तेथेंच राहणें. खर्चावेचाविषयीं राजश्री जानोजी पवार यांस लिहिलें असे. ते देतील. सकल वर्तमान शिवाजीपंत लिहितील. सेकू सांगतां विदित होईल. बहुत काय लिहिणें. हे विनंति. पत्र फाडून टाकावें.

---

[१८४] श्रीराजाराम. १७९१.

माहाराजाचे सेवेसी विज्ञापना. उपरि. आह्मीं ब्राह्मण कैलासवासी थोरले माहाराज यांचे नवाजीस. आजे बाप यांचें उर्जित केलें. हुद्दा, मामला, कैद, कानू, सरंजाम देऊन चालविलें. अर्ज विनंति चाळवीत आले. आह्मास मातुःश्री आईसाहेबीं वाढविलें, नांवारूपास आणिलें. चाकरी घेतली. शेवटीं राज्यांतील विचार पाहोन वनवास करीत राहिलों. साहेबाचा जन्म झाला तेसमयीं मातुःश्रीच्या आज्ञेप्रमाणें दोबातिघांनीं जिवावर होडखे केला. साहेबांस पळविलें, ते बावडियासी नेलें. तेथें आह्मीं मागाहून गेलों. साहेबांचें पाळणपोषण केलें. दहा बारा वर्षे जालीं. तेथें आह्मावरी राजा शंभूची इतराजी झाली. सौ जिजाबाईसाहेब चालोन आलीं. तेसमयीं परदेशी घासीराम याणें व बाइकोनें आह्मास नकळत पळवून साहेबास घाटाखालीं नेलें. तेथून चौऱ्यायशींचे फेरे फिरत, विरक्त्या घेत श्रीतुळजापुरास गेले. तेथें थांग आह्मास लागला. नारोजीबाबा आधारी यांचा सहवास जाला. तेथें रहाणें जालें. श्रीतुकाईनें दया केली, ते समयीं साहेब पाणगांवास आले. बाईचा सहवास जाला. मुलकांत पुकारा होऊन राजा शाहूपर्यंत चहूकडे नांव गाजलें. यामुळें आह्मीं बावडियाहून श्रीपंढरीचे यात्रेस आलों. साहेबाकडे पत्र लेहून मातुःश्रीचे आज्ञेप्रमाणें भुजंग हुजरे व राजश्री एस ठाकूर व बहीरजी पडवळ व एसू वस्त्रें देऊन पाठविलें. साहेबीं इमान वचन दिल्हें, पत्रें पाठविलीं. दर्याबाई यांसी वस्त्रें व पत्रें पाठविलीं. तेथील

बोलीचाली अवघी एकीकडेस राहून नवाच पंथ अविद्या चित्तीं धरून मातु:श्रीची सोय व आमची सोय टाकून ज्यांणीं जें सांगितलें तेंच ऐकावेसें जालें. साहेबामुळें मातु:श्रीनीं उपभोगिलें, आम्हीं श्रम साहस करून उपभोगिलें, तें एकीकडेस राहिलें, तें ईश्वर जाणें! साहेबाकरितां ऊर्जितास्तव श्रीदेवाजवळ अनुष्ठानें केलीं, ब्राह्मण घातले, नवस केले, त्याची यादी अलाहिदा लिहिली आहे. राजा शाहूचा अवतार संपूर्ण जाल्यास कोणी खावंद नाहीं, ऐसें जालें. तेसमयीं मातु:श्री आईसाहेबीं अवसान धरून साहेबास आणविलें. माता लेकराजवळ धावली. ऐसें असोन साहेबीं मायीचा जिव्हाळा सोडिला. मुंज, लग्न मातु:श्रीमुळें साहेबाचें जालें. स्थापना आईसाहेबामुळें राज्यपदावरी जाली. ती एकीकडे राहून साहेब दुसरियाचे मायेस गुंतले. धनलोभास मोहो पावले. मातु:श्रीची उपेक्षा केली. ही ईश्वरास न मानें. येणेंकरून राज्यास अपाय आहे. एक वर्ष साहेबास राज्यपदावरी बसोन जालें. साहेबाचें धणीपण चाकरलोकीं बाकीस ठेविलें नाहीं. धकाबुकी जाल्या. शिवनिर्माल्य करून ठेविलें. हुजरेयांसी मारिलें. ये गोष्टीची ईरे अभिमान सोडून आपला हेका तिरपगडा खरा! मातु:श्री नलगेत! ऐसा मोहो घालून, दुष्टांनीं कपटविद्या करून मातापुत्रास अंतर पाडिलें. हें आमच्या चित्तास येत नाहीं. माता पुत्र, गुरु चेला, धणी चाकर, ही मर्यादा चालावी; साहेबीं उत्तम वासना धरावी; वडिलांचे आज्ञेप्रमाणें कारभार करावा; हें उत्तम आहे. राजा शंभू कोल्हापुराहून दुष्टांनीं वारणे ऐलीकडेस दहा राउतानिशीं आणिले. ते सातारियाचे शहरांत येऊन, घरोघर हिंडोन, साहेबाचे अदृष्टाचे बाल्याबोला माघारे घालविलें. चोर एकीकडेस राहून संन्यासी मोठा पाहोन सुळीं दिल्हा, ऐसी गत जाली. राज्यांत डोहाणा फितूर आला. चोहूकडे गर्दी जाली. गड, किल्ले गेले. दुष्ट बळावले. ये गोष्टीची ईरे अभिमान साहेबास नाहीं. हें दु:ख कोणाजवळ सांगावें. आम्हांस गवत, फाटें, पाणी, पानें तुमच्या राज्यांत मिळत नाहीं. कर्जदार जालों. लोकांचीं घरें बुडविलीं. शिराळें, सातारा येथें येऊन फजित पावलों. साहेबाजवळ अर्ज केला

तो चालत नाहीं. चोर, चहाड, लबाड यांचा पर्वकाळ, इतबार साहेबांस वाटतो. आमचा विश्वास इतबार नाहीं. सीमा जाली. साहेबांस सद्गुरु करणें नाहीं. अविद्येचे गुरु करून परिणाम लागत नाहीं. वारणपलीकडेस राजा शंभु साहेबांचे अपायावरी जपत आहेत. वरकड दुष्ट लोक वेळास जपत आहेत. साहेबाच्या चित्तांत विवेक, विचार, शास्त्रें, पुराणें, राजनीति, वडिलांचा कदीम पाया, पद्धत येत नाहीं. यामुळें गड, किल्ले, मवास होऊन अन्नावस्त्रास महाग जाले. रयत व वतनदार चाकरमामे सर्वस्वें बुडाले. पाऊस गेला. कदीम चाकरलोकांस थारा नाहीं, ऐसें जालें. परीक्षा दरबारीं नाहीं. अपकीर्ति होत चालिली. याउपरि तरी देहावरी येऊन उत्तम विचार चित्तांत करावा. मातापुत्रांनीं बसोन कारभार एकचित्तें करावा. चौघे भले सरकारकून व जातिवंत मराठे हातीं धरून ज्याचें त्याप्रमाणें चालवावें, बळ पाडावें, जुना वडिलांचा पाया धरून वर्तावें, ऐसी नीत आहे. याप्रमाणें वर्तलिया अवघें कल्याण होईल. देव, ब्राह्मण, रयत संतोषी होईल, आणि साहेबांचें कल्याण इच्छितील. ईश्वर संतत संपत साहेबास देईल. आडमार्गें गेलिया ईश्वर बरें करीत नाहीं. हे आज्ञा देवाची व ब्राह्मणाची आहे. उत्तम विचार असेल तो करावा. स्वधर्म राखावा. सत्यं जय, ऐसें आहे. खरें नाणें, रुपया खरा असेल तोच साहेबीं हातीं धरावा. खोटाळ टिका हातीं धरलियानें उत्तम परिणाम नाहीं. यासी साक्ष शास्त्रें, पुराणें, वडिल परंपरागत पद्धति आहेत.

यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ।
स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥ १ ॥

ऐसी नीति आहे. राजे लोकांस स्वभाव असावे :—

दातृत्वं प्रियवक्तृत्वं धीरत्वमुचितज्ञता ।
अभ्यासेन न लभ्यंते चत्वारि (रः ?) सहजा गुणाः ॥

ऐसा विचार आहे. साहेबांस निष्ठुर वादें कोणी सांगणार नाहीं. आह्मांस वडिल ह्मणविता यानिमित्त गुरुबोधाचे आज्ञाप्रमाणें हें विनंतिपत्र लिहिलें असे.

अप्रियस्य च पथ्यस्य श्रोता वक्ता च दुर्लभः ॥

ऐसें आहे. कैलासवासी माहाराज थोरले यांचीं पत्रें व पद्धत व मातुः- श्रीची पद्धत व राजारामसाहेब यांची पद्धत वळवटा आह्मांजवळ लिहिला आहे. शाहाणपणें अक्कल बुद्धीनें विचार करून चित्तीं धरिला तरी वाचून पाहावा. राज्य ह्मणजे बुद्धिबळाचा डाव आहे. बुद्धीकरून जिंकिला पाहिजे. थोर थोर राजे या मार्गे होऊन गेले, सरकारकून होऊन गेले, आह्मी जाणार, साहेबाची कीर्ति वंश राहिला पाहिजे. यांत उत्तम दिसेल तें करावें. *

---

[१८९] श्री. १७७४.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री आपाजीपंत स्वामीचे सेवेसीः—

पो रामचंद्र महादेव सा। नमस्कार विनंति उपरि येथील कुशल ता। मात्र शु॥ २ पावेतो मु॥ लष्कर नजीक बरहारी येथें क्षेमरूप जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असावें. विशेष. श्रीमंत राजश्री पंत अमात्य याजकडील तालुक्यांत तुह्माकडून उपसर्ग होऊं नये एविसीं पुण्याचे मुक्कामीं बोलणें झालेंच आहे. तुह्मींही करणार नाहीं हे खातर-जमाच आहे. परंतु एक दोन बोभाट बोडकीहाळ, यळगुड वगैरे येथें आइकिले यामुळें पत्र ल्याहावें लागलें. श्रीमंत राजश्री अमात्य पंताचे ठायीं श्रीमंताचा व बापूचा व सर्व मुत्सद्दी यांचा लोभ कोणे रीतीचा हेंहि सर्व पाहिलेंच आहे. तुह्मासही अगत्य असावें ऐसाच योग आहे. परंतु न कळे. अवाईस मिळोन हरएकविशीं त्याजकडील प्रांतास घासदाणा किंवा रोखपत्र ऐसे उपसर्ग लागतील तर फार सांभाळून दरोबस्त त्याजकडील प्रांतास काडीमात्र उपसर्ग न लागे तें करावें. यावेळीं निमित्यधारी तुह्मीच आहे. शिमगा जाई आणि कवित्व राहे ऐसें न व्हावें यांत सर्व आहे. त्यास तो ईश्वरेंच थोर केलेलें आहे. तुमच्या आमच्या उपसर्गानें उणें पडतें ऐसें नाहीं. परंतु करणारांनीं मात्र बहुत दूर आंदेशा पाहून चालत असावें. ऐसेंच घर तें आहे. हें समजोन लि॥ आहे. याप्रमाणेंच निदर्शनांत यावें. विस्तारें लिहावें तरी सुज्ञ असा. कृपा लोभ कीजे. हे विनंति.

---

* हें पत्र अस्सल आहे.

[१८६] श्री. १७ जानेवारी १७७४.

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री आपाजी शामराव गोसावी यासीः—

सेवक रघुनाथ बाजीराव प्रधान नमस्कार सुा अर्बा सबैन मया व अलफ. राजश्री सुबराव पंडित अमात्य यांच्या गांवांस घासदाण्याचा उपसर्ग करितां ह्मणून हुजूर विदित जालें. त्याजवरून हें पत्र तुह्मांस सादर केलें असे. तरी पंडित मशारनिलेकडील गांव खेड्यास उपसर्ग न करणें. कराराप्रमाणें चालविणें. नवीन काडीमात्र उपद्रव न करणें. फिरोन बोभाट येऊं न देणें. जाणिजे. छ ४ जिल्काद. आज्ञा प्रमाण.

लेखनावधि.

---

[१८७] श्री. १७ जानेवारी १७७४.

राजश्री येशवंतराव शिंदे गोसावी यासी.

छ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो रघुनाथ बाजीराव प्रधान आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. राजश्री सुबराव पंडित अमात्य याजकडील गांव खेड्यास व जिल्हेच्या अमलास खलेल करितां, उपसर्ग देता, ह्मणून हुजूर बोभाट आला. त्याजवरून हें पत्र तुह्मास लिहिलें असे. तरी कराराप्रमाणें चालवणें. नवीन काडीमात्र उपद्रव न लावणें. फिरोन बोभाट येऊं न देणें. जाणिजे. छ ४ जिलकाद सुा अर्बा सबैन मय्या व अलफ. बहुत काय लिहिणें.

लेखनावधि.

---

[१८८] श्री.

पौा छ १० जिल्हेज.

श्रीमंत राजश्री सुबराव पंडित स्वामीचे सेवेसीः—

पोा बाळाजी जनार्दन कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील वर्तमान ताा छ १९ जिलकाद पावेतों यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहालें. राजमंडलाकडील तह राजश्री परशुरामपंत यांचे विद्यमानें होत आहे, याजकरितां त्यास लिहून पाठवून

आपलेकडील बंदोबस्त पूर्ववत्प्रमाणें होय तें करावें, येविशीं राजश्री गंगाजीपंत सूचना करितील ते मनन करावें, ह्मणोन विस्तारें लिहिलें, व गंगाजीपंतांनीं सांगितलें, त्याजवरून कळो आलें. ऐसियास, येविशीं परशुरामपंत यांस अलाहिदा सरकारचें पत्र पाठविलें आहे. ते आपणा-कडील बंदोबस्त करून देतील. बहुत काय लिहिणें. लोभ असो दीजे. हे विनंति.

[१८९] श्री. १ मार्च १७७४.

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री बाळाजी गणेश यासी :—

प्रति मातुःश्री गंगाबाई आशीर्वाद. अर्बा सबैन मया व अलफ. ता। साळसी येथें राजश्री सुबराव पंडित अमात्य याजकडे दीड तक्षीम वगैरे अंमल पेशजीपासून आहे. त्यास सालमजकुरीं मालवणकरी यांणीं कजिया करून अंमल उठविला आहे. ह्मणोन हुजूर विदित जाहलें. त्याजवरून हें पत्र तुह्मास सादर केलें असे. तरी सरकार अंमल अलीकडे पंडित मशारनिल्हेकडील ता। मजकूरीं चालत असेल त्याप्रमाणें चालवणें. मालवणकरी नवीन कजिया करीत असल्यास करून देणें. सुदामत चालत असेल त्याजप्रमाणें चालवणें. तुह्मी आपले तर्फेनें हरएकविसीं साहित्य करीत जाणें. जाणिजे. छ १७ जिल्हेज. आज्ञा प्रमाण.

लेखनसीमा.

[१९०] श्री. १७७४.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बाळाजीपंत स्वामीचे सेवेसी.

पोष्य सखाराम भगवंत साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील कुशल ता। छ २३ सफर जाणून स्वकीय कुशल लेखन करीत जावें. विशेष. राजश्री पंत अमात्य यांजकडील प्रांत साळशी येथील अंमल सुरळीत चालत आल्याप्रमाणें चालावा, त्यांत कितेक प्रकारें मामलेदाराकडून उपद्रव होतो, पुरातन चालत आल्याप्रमाणें चालत नाहीं, ह्मणोन ऐकिलें. त्यास मालवणकरी यांस ताकिद असावी. आपल्यास वर्तमान कळल्यावर ताकिद होऊन त्याजकडील सुदामत चालत आलें असेल त्यास अडथळा न व्हावा. आपल्यास ल्याहावेंसें नाहीं. जें प्राचीन चालत आलें आहे तें

चालवावें. पहिलेपासून चालत आलें आहे त्याप्रमाणें करावें. नवीन न करावें. बहुत काय लिहिणें. लोभ असा दीजे. हे विनंति.

---

[१९१] श्री.

विशेष. आपणापासून बावड्याच्या संस्थानचा अभिलाषास्तव शेणवी याणीं फितुर करून आह्मास आणून, तीर्थस्वरूप राजश्री सुबराव पंडित अमात्य यासी व आह्मासी खटला करून, त्यासी बाहिर आठ वर्षें परागंदा करून, शिबंदीच्या पेचांत आणून, संस्थान श्रीमंत महाराजानीं हस्तगत करून, आह्मास कैद करून आणिलें. वडिलावर कृपा करून त्यांचें संस्थान त्यांचे स्वाधीन केलें. उपरांत वडील आह्मावर कृपा करून सोडवून घेऊन सातान्यास लावून दिल्हें. पेशजी सदाशिवभट नानल यांचे विद्यमानें आपले कानावर संस्थानविशीं व कर्जाविशीं नाना प्रकारचे खटले बोलणेंत आले असतील ते आह्मीं आपले स्वसंतोषें सोडून वडिलाकडे आलोंच. कर्जाचे व गांव खेडचे व चीजवस्तीचे व संस्थानविशीं गुंता आमचा त्रिवर्गाचा व मातु:श्रीचा व आमच्या वंशाचा तीर्थस्वरूप राजश्री सुबराव पंडित अमात्य व त्यांचे संस्थानचा गुंता व खटला आमचा नाहीं. पेशजीच समजावणी आपण त्याजविशीं व संस्थानविशीं आमचे खटलेमुळें आपण त्याजवर अरज नसावी, आमचें व त्यांचें खटलें माहाराज यांचे संनिध तुटलें. अत:पर किमपि आमचा व त्यांचे संस्थानविषयींचा गुंता आह्माकडे नाहीं. व त्याजकडे आमचा गुंता किमपि तिळप्राय राहिला नाहीं. आपण आमचे कारभारी व आणखी घरांतील कोणी दरजा आपणास समजावून वडील——

अपूर्ण.

---

[१९२] श्री. १७७४.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री पांडुरंगराव स्वामीचे सेवेसी:-

पो॥ मोरो बाबूराव सा॥ नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जावें. विशेष. राजश्री मुराराराव हिंदुराव घोरपडे

मगलकत गदार सेनापति यांहीं सरदेशमुखी व इनामगांव मातुःश्री आई साहेब यांचे विद्यमानें गाहाण ठेविले. कराराप्रों ऐवजही घेतला. हल्लीं वर्षें जबरदस्तीनें सरकारांत वसूल घेतात. हें वर्तमान विदित झालियावर हुजूरचींही पत्रें तुह्मांस आहेत. त्याप्रों मागील भोगवटेयाप्रमाणें व सरकारचे पत्राचे अन्वयें यांजकडे सुरळीत चाले तो अर्थ करावा. मानिल्हेकडून रा० गोविंद बाबुराव कारकून पत्रें घेऊन आले आहेत. हे आपणास तेथील कच्ची वहिवाट समजावितील. त्याप्रों बंदोबस्त करून द्यावा. कारकून मानिल्हेस आपणाजवळ ठेऊन हरएकविसीं फिरोन बोभाट न येई तें करावें. बहुत काय लिहिणें. लोभ कीजे. हे विनंति.

---

[१९३] श्री महालक्ष्मी प्रा.

श्री

त्रैलोक्याभयदात्रीश्रीकर-
वीरनरेश्वरी । मुद्रा तस्या
जगन्मातुर्वर्वर्ति सकलेश्वरी ॥

श्रीमहालक्ष्मी
२१ सप्टेंबर
१७९९.

आज्ञापत्र श्री देवी संस्थान क्षेत्र करवीर याणीं राजमान्य राजश्री सुबराव पंडित अमात्य यासी आज्ञा केली ऐसीजेः—पेशजी किल्ले गगनगड जकायतच्या ऐवजी वो राजश्री रघुनाथ भट सावगांवकर प्रधान निा संस्थान याचे विद्यमानें वर्षासन शारदी नवरात्र उत्साहास नक्त रुपये व सामान नारळ व पानें विडेचीं व सुपारी व हळद व सोल येणेंप्रमाणें चालत होतें. प्रस्तुत हल्लीमानीमुळें ऐलीकडे येत नाहीं. याजवरून आज्ञापत्र सादर होऊन संस्थान निा गडी पाठविले आहेत. नवरात्र उत्साह समीप आला आहे. त्यास पूर्ववत नगद रुपये व सामान पाठवून द्यावें. बहुत काय लिहिणें. सुमा सबा तिसैन मया व अलफ. जाणिजे. रवाना छ १९ माहे रबिलावल.

लेखनसीमा.

---

[१९४] श्री. २३ डिसेंबर १८००.

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री सुबराव पंडित स्वामी गो यासीः—

पो अमृतराव रघुनाथ नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित असावें. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. पूर्व रुणानुबंधाचे अर्थ व श्रीमंत महाराज यांचे लक्षाचे भाव लिहिले ते व राजश्री बच्याजी जिवाजी याचे पत्रावरून अवगत जाहालें. ऐशास पूर्व स्नेह आहे तो परस्परें वृद्धिंगत असावा हें उचित आहे. आह्मी भिवंडीस स्वस्थ आहों. श्रीमंत महाराज यांचे क्रियेचा अवलंब असे. रा छ ६ शाबान. बहुत काय लिहिणें. लोभ कीजे. हे विनंति.

---

[१९९] श्री. २१ मे १८१७.

राजश्री कमाविसदार मा। हाय व समस्त सरनाईक सरदार गोसावी यासीः—

छ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो। बाजीराव रघुनाथ प्रधान आशीर्वाद व नमस्कार. सुरुसन सबा अशर मैयातैन व अलफ. त्रिंबकजी डेंगळा कुंपणी इंग्रजबहादर याचे कैदेंतून पळून बंड करीत आहे. त्याची चौकशी गांवगन्ना करून डेंगळा मजकूर याचा ठिकाण लावून जिवंत अगर मेलेला सरकारांत हावाला करून देईल त्याजला बक्षीस दोन लक्ष रुपये व हजार रुपयाचे गांव इनाम इंग्रजबहादर याचे विद्यमानें दिल्हा जाईल. याप्रमाणें खातरजमा राखोन सरकार चाकरी करून दाखवावी. याची पुरती चौकशी करून जो त्रिंबकजीस धरून आणोन देईल त्याजवरी सरकारची सरफराजी होईल. येविशीं जो कोणी अनमान करील त्याजवर सरकारची इतराजी होईल. व समस्त गरीब रयत ब्राह्मण व मराठे व परदेशी व मुसलमान व वाणी उदमी व बेरड, भिल्ल, मांग, रामोशी व रहेदार वगैरे जे कोणी त्रिंबकजी डेंगळा याचा पत्ता अमुक जाग्यावरी आहे असा प्रत्यक्ष सरकारांत दाखवून देतील त्यास पांच हजार रुपये बक्षीस व एक चावर जमीन इनाम इंग्रजबहादूर याचे विद्यमानें पावेल. डेंगळा मजकूर याचा पत्ता ठावोक असोन जर कोणी सरकारांत समजावयास आळस केला असें विदित जाहलें तरी त्याचें पारपत्य होईल. त्रिंबकजी डेंगळा बंडवाला याच्या मिलाफांतील इसम १२.

१ बापू गाईकवाड सेट फलकर.
१ भागाजी.
१ रविराव शिंदे लोणीकर.
१ तिगापा वडारी.
१ माहादाजीपंत नातेपोतेकर.
१ गोधोजी डेंगळा.
१ सयाजी मुळे.
१ अप्पाजी पा। कुंरुवंवीकर.
१ निंबाजी यादव फलटणकर.
१ महीपंत डेंगळा.
१ बापू बारडकर.
१ दाजी डपळे.

१२

येणेंप्रमाणें येकूण बाराजण याचे कुटुंबाचीं मुलेंमाणसें कैद करून बेड्या घालोन बंदोबस्तीनें हुजूर पोचते करणें व त्यांचीं घरें जमीनदोस्त करून घरांतील चीजवस्त सुतळीचे तोड्यासुद्धां जप्त करून त्याचा आकार होईल तो ज्याजती शिबंदी वगैरे खर्च लागल त्याएवजीं घेणें व त्यांची इनामवतनवृत्ती असतील त्या जप्त करणें. या बाराजणापैकीं जे कोणी त्रिंबकजी डेंगळा यांसी धरून आणोन देतील त्याचा अपराध माफ होईल. वर लिहिलेप्रमाणें बक्षीस पावेल. या बाराजणाखेरीजकरून बंडाचे मिलाफी स्वार व पायदळ व कारकून व शागिर्दपेशा वगैरे बंडाची चाकरी सोडून आपल्याले घरीं येऊन जमेदार व मोकदम यासी रुजू होऊन राहिले असतां त्यास बंडाचे मिलाफाचा अपराध माफ केला जाईल. बंडाची चाकरी सोडून न आलेस वर बाराजणांचें पारपत्य करावयाचें लिहिलें आहे त्याप्रमाणें याचें पारपत्य करणें. बंडाचे मिलाफी गरीब लोक यांतून कोणी त्रिंबकजी डेंग्रळा याचा पत्ता लावून प्रत्यक्ष सरकारांत दाखवून देईल त्यासही वर लिहिल्याप्रमाणें बक्षीस पावलें जाईल. जाणिजे. छ ४ रजब. सिक्का. आज्ञाप्रमाणें मोर्तब.